# सहज ज्ञानप्रदीप

परमपूज्य माताजी श्री निर्मलादेवी यांच्या प्रवचनांचे संकलन




– हिंदी संकलक –

श्रीमती लीला अग्रवाल / डॉ. (श्रीमती) सरोजिनी अग्रवाल

– मराठी अनुवाद–

प्रा. उषाताई बी. पाटील / डॉ. नलिनी बी. पिचड

# सहज ज्ञानप्रदीप

परमपूज्य माताजी श्री निर्मलादेवी यांच्या
प्रवचनांचे संकलन

— हिंदी संकलक —

श्रीमती लीला अग्रवाल
डॉ. (श्रीमती) सरोजिनी अग्रवाल

— मराठी अनुवाद—

प्रा. उषाताई बी. पाटील
डॉ. नलिनी बी. पिचड

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means, without permission. Any person who does any unauthorised act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

**Published By**
**THE LIFE ENTERNAL TRUST PUNE**
Sahaja Yoga Dhyan Kendra,
Plot No. 79, Sr. No.98,
Right Bhusari Colony,
Kothrud, Pune - 411 008.
Ph. : 020 - 25283830

To know more about Sahaja Yoga Visit us at : www.sahajayoga.org.
www.thelifeeternaltrust.org

**Print (1) - Oct. 2017**

**Printed by : NewBharat Printers, 520, Narayan Peth, Pune - 30.**

# मनोगत

मराठीत अनुवाद केलेले सहज ज्ञानप्रदिप हे पुस्तक आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. केवळ श्री माताजींचे आशीर्वाद आणि सहजयोग्यांची इच्छा व मागणी यामुळेच सहज ज्ञानप्रदिप या मूळ हिंदी ग्रंथाचे मराठीत भाषांतर करण्याची कल्पना सुचली आणि प्रत्यक्षात आली.

इंग्रजी आणि हिंदी भाषांमध्ये सहजयोगावर वाचन साहित्य व ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. जगात इंग्रजी, भारतात हिंदी परंतु महाराष्ट्रात मात्र मराठीचा प्रभाव आहे. महाराष्ट्रातील मराठी सहजयोग्यांसाठी मराठी ग्रंथसंपदा उपलब्ध असावी असा विचारही मनात होताच.

श्री माताजींच्या प्रवचनांना ऑडीओ / व्हिडीओ सीडीज् , डीव्हीडीज् उपलब्ध आहेत, परंतु त्या वापरण्यासाठी किमान यंत्रसामुग्रीची आवश्यकता असते. पुस्तक उपलब्ध असेल कर ते हवे तेव्हा, हवे तिथे, सोयीने वाचता येवू शकते; असा विचारही मनात होताच.

श्रीमती लीला अग्रवाल आणि डॉ. श्रीमती सरोजिनी अग्रवाल या सहजयोगी भगिनींनी सहज ज्ञानप्रदिप हा ग्रंथ खुप कष्टाने, मेहनतीने आणि श्रीमाताजींवरील मोठ्या श्रध्देने संकलीत केलेला आहे. मूळ आशयाला जराही धक्का न लावता मराठी अनुवाद करणे हे एक आव्हान होते; परंतु श्रीमाताजींचे आशीर्वाद या पुस्तक निर्मितीच्या वेळी सतत जाणवत होते; त्यामुळे वाटले तितके हे काम अवघड गेले नाही.

हस्तलिखिताचे डिटीपी, शुध्दलेखन तपासणी, इ. अनेक तांत्रिक बाबी सर्वश्री संदीप बिरारी, तानाजी म्हस्के, शिबू नायर यांनी जबाबदारीने वेळेत आणि विनातक्रार पूर्ण केले. सहजयोगी बंधु श्री. एम. जे. कुलकर्णी यांनी सातत्याने

प्रोत्साहन दिले. हस्तलिखित तपासण्यास सहाय्य केले. आमचे पाटील आणि पिचड कुटुंबिय यांचे आम्हाला मौल्यवान सहकार्य लाभले. सहजयोगी श्री सागर(दादा) देवरे यांची भरपूर मदत झाली. या सर्वांच्या प्रति आम्ही आभार व ऋणनिर्देश व्यक्त करतो.

द लाईफ इटर्नल ट्रस्ट, पुणे यांनी सदर पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी स्विकारली. पुण्यातील सहजयोगी सर्वश्री प्रविण जावळकर, योगीराज देवकर, वसंत शेवाळे, गोविंद जाधव, किरण पवार यांचे प्रुफरिडींग, दुरुस्त्या, छपाई इ. कार्यासाठी योगदान लाभले. द लाईफ इटर्नल ट्रस्ट, पुणे चे पदाधिकारी या सर्वांचे शतश: आभारी आहोत.

महाराष्ट्रातील तमाम सहजयोगी या ग्रंथाचे स्वागत करतील आणि स्वत:ची गहनता वाढीसाठी प्रयत्न करतील. आम्हाला मिळालेल्या संधीसाठी श्रीमाताजींच्या चरणी कोटी कोटी प्रणाम.

प्रा. उषाताई बी. पाटील, नाशिक
डॉ. नलिनी बी. पिचड, नाशिक

# अनुक्रमणिका


| अ. क्र | प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | माझ्या फुलासम बाळांनो | | १ |
| १ | आई | | ३ |
| २ | निर्मला | | ७ |
| ३ | सहजयोग - शांती आणि आनंद | | १६ |
| ४ | निर्मल विद्या | | २३ |
| ५ | सृष्टीची सूत्रधार - श्री आदिशक्ती | | २६ |
| ६ | आदिशक्तीच्या अवताराचे प्रयोजन व रहस्य | | ३६ |
| ७ | मानवाचा विकासक्रम व कलियुगातील उत्क्रांती (विकास) | | ४७ |
| ८ | सूक्ष्मतंत्र आणि कुंडलिनी शक्ती | | ६१ |
| ९ | तत्त्व | | ८१ |
| १० | नाड्यांवरील स्थापित शक्ती | | ८३ |
| | ईडा नाडी | १) श्री महाकाली | ८३ |
| | | २) श्री भैरवनाथ | ८८ |
| | पिंगला नाडी | १) श्री महासरस्वती | ९१ |
| | | २) श्री हनुमान | ९७ |
| | सुषुम्ना नाडी | - श्री महालक्ष्मी | १०१ |
| ११ | सूक्ष्म चक्रांवरील स्थापित शक्ती | | १०८ |
| | मूलाधार - | श्री गणेश | ११८ |
| | मूलाधार - (कुंडलिनी) | श्री गौरी | ११८ |
| | स्वाधिष्ठान चक्र- | १) श्री सरस्वती | १२० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २) श्री ब्रम्हदेव | १२४ |
| | नाभी चक्र - | १) श्री विष्णुधर्म आणि | |
| | विकासचा आधार | | १२६ |
| | | २) श्री लक्ष्मी - | |
| | क्षेमप्रदायिका | | १३१ |
| | भवसागर - | श्री आदिगुरुदत्त - | |
| | गुरुतत्त्व | | १४२ |
| | अनाहत चक्र - | (मध्य)शक्तीप्रदायिनी श्री | |
| | जगदंबा | | १५१ |
| | अनाहत चक्र - | (उजवी बाजू) मर्यादा | |
| | पुरुषोत्तम राम | | १५६ |
| | अनाहत चक्र - | (डावी बाजू) आत्मज्योती | |
| | - श्री शिव | | १६१ |
| | विशुद्धि चक्र - | १) श्री योगेश्वर | |
| | कृष्ण | | १७५ |
| | | २) कृष्ण शक्ती - | |
| | श्री विष्णुमाया | | १६९ |
| | आज्ञाचक्र - | १) भगवान येशू | |
| | ख्रिस्त | | १९१ |
| | | २) ज्ञानमूर्ती | |
| | भगवान बुद्ध | | २०० |
| | | ३) भगवान महावीर | २०४ |
| | | ४) श्री एकादश रुद्र | २११ |
| | सहस्त्रार चक्र - | सहस्त्रार स्वामिनी - | |
| | महामाया - माताजी | - श्री निर्मला देवी | २१६ |
| ११ अ | श्री कल्की | | २२५ |
| १२ | परमेश्वराचे अस्तित्त्व - अवतरण | | २३१ |
| १३ | आत्मसाक्षात्काराचा अर्थ आणि आशीर्वाद | | २४२ |
| १४ | आत्मसाक्षात्कारात - स्थिरता | | २४८ |
| १५ | ध्यानात गहनता आणि निर्विचार चैतन्य | | २५५ |

| | | |
|---|---|---|
| १६ | आत्मपरीक्षण | २६५ |
| १७ | सामूहिक चेतना | २७० |
| १८ | निर्व्याज प्रेम | २७४ |
| १९ | उन्नत्तीच्या मार्गातील अडचणी | २८० |
| २० | सहजयोगात परिपक्वता | २८८ |
| २१ | अंतिम निर्णय | २९८ |
| २१ अ | उत्क्रांतीचा मध्यमार्ग | ३१२ |
| २२ | सूक्ष्म अवस्थेची प्राप्ती व पुनर्जन्म | ३२४ |
| २३ | सहस्त्रार - समग्रता | ३३१ |
| २४ | निरानंदाचा अनुभव | ३३५ |
| २५ | सत्-चित्-आनंद | ३३८ |
| २६ | आत्मा आणि आत्मबोध | ३४३ |
| २७ | परमात्मसाक्षात्कार (God Realization) | ३४९ |
| २८ | खऱ्या सहजयोग्याची ओळख | ३५२ |
| २९ | पूर्ण समर्पण आणि अखंड श्रद्धा | ३५९ |
| ३० | सहजयोग - प्रचार - प्रसार | ३६९ |
| ३१ | पूजेचे महत्त्व आणि नियम | ३७५ |
| ३२ | श्री मातृवंदना | ४०० |

## –माझ्या फुलासम बाळांनो–

माझ्या फुलासम बाळांनो
जीवनात तुम्ही नाराज आहात
आई ज्यांची अंधारात हरवली
त्या चिमुकल्या भेदरलेल्या बाळा समान
शोध यात्रेतील निराशेने
रागावलात तुम्ही
सौंदर्याच्या शोधात
कुरूपता पांघरता तुम्ही
सत्याच्या नावावर असत्य जपता तुम्ही
प्रेमपेला भरण्यासाठी भावना वाहवता तुम्ही
माझ्या गोड गोड बाळांनो
स्वत:शी आपल्या अस्तित्वाशी
साक्षात युद्धरत आहात, आनंदाशी
खूप झाले प्रयत्न आता त्यागाचे
अन् शांतीच्या खोट्या बुरख्याचे
आपल्या महान मातेच्या कुशीत
कमल दलावर विसावा खुशीत
सुंदर पुष्पासमान
जीवन सजवीन तुमचे
आनंद सुगंधाने
भरुन टाकीन दरक्षण तुमचे
करीन दिव्य प्रेमाने
भिजवीन मस्तक तुमचे अभिषेकाने

कष्ट आता तुमचे
सहन होत नाहीत मला.
चला आनंद सागरात
या डुंबवते तुम्हाला
बुडवा आपल्या अस्तित्वाला
एका दुसऱ्या महान अस्तित्वात,
आत्म्याच्या बाह्य दलपुंजात
हसतो आहे नेहमी
तुम्हाला छेडण्यासाठी
रहस्यमय प्रकारे लपण्यासाठी
सचेत होऊन बघा त्याला
दिव्य आनंदाने रोमरोमी तुम्हाला
चैतन्यमय करीत
प्रकाशमान करील पूर्ण ब्रम्हांडाला.

तुमची आई निर्मला

(परमपूज्य श्री माताजींच्या रुपांतरित
हिंदी कवितेचा मराठी स्वैर अनुवाद.)

# सहज ज्ञानप्रदीप

## प्रकरण – १

## आई

मी तुमची आई आहे. मी तुमची आई आहे. हे तुम्ही चांगल्या प्रकारे समजून घ्या. आई असणं म्हणजे संपूर्ण संरक्षण. मी आदिमाँ आहे आणि मीच आदिशक्तीही आहे.

प.पू. श्रीमाताजी - मुंबई - ०१.०२.१९७५

मुलांमध्ये असणारे दोष आई योग्यप्रकारे ओळखते. हे खरं आहे का? का थांबलात? आईला दोष किती खोलवर आहेत हे माहीत असते. त्याला कसे सुधारायचे हे ती जाणते. काहीवेळा रागावते, दटावते तर काही वेळा प्रेमाने समजावते. हेच तर मातेचे काम आहे. हे काम आईशिवाय कोणी करु शकत नाही. हे काम कठीण असते, ते प्रेमाने करायचे असते. त्यामुळे ते आईच करु शकते. तुम्ही माझ्यापासून हजारो मैल दूर असलात, तुमची सांसरिक नावे मला माहीत नसली तरी माझ्याच अंगप्रत्यंगाची रुपे आहात म्हणून मी तुम्हा सगळयांना चांगली ओळखते.

प.पू. श्री माताजी - दिल्ली - १०.०२.१९८५

मुलांना किती संकटातून आणि त्रासातून जावे लागते, त्याचा भार आपण कसा उचलावा हे आई जाणते. मुलांमध्ये परमेश्वराचे अस्तित्व जागृत कसे करायचे हे आईच समजू शकते म्हणून करु शकते. तुम्ही माझे स्वत:चे आहात, माझे आवडते आहात, पण तुम्ही चुकीच्या गोष्टीत भटकले आहात म्हणून भरकटलेले आहात. मग विचार करा तुमचे भटकणे आईसाठी दु:खाची, खेदाची गोष्ट आहे.

प.पू. श्री माताजी - ३१.०३.१९८५

मला असे जाणवते की आतापर्यंत जितके अवतार झाले त्यांचा कार्यकाल कमी होता. (ते खूप लवकर जगातून गेले). पण आईची गोष्ट वेगळी आहे. ती आपल्या मुलांसाठी लढत राहते, संघर्ष करीत राहते. जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या मुलांना परमेश्वरी आशीर्वाद मिळावेत यासाठी ती लढा देत राहते. आई जवळ धैर्य, प्रेम आणि क्षमाभाव असतो. त्यामुळे ती हे करु शकते. तिला कोणतेही पुरस्कार - नावलौकिक, यश याची आवश्यकता नसते. केवळ आई आहे म्हणून ती या गोष्टी करते. खऱ्या आईची हीच ओळख आहे. आपल्या मुलांसाठी ती कोणत्याही मर्यादेपर्यंत जाऊ शकते. आपल्या मुलांचा विनाश होऊ नये म्हणून ती दिवसरात्र परिश्रम करते. मुलांचे पालनपोषण कसे करायचे हे आईच जाणू शकते.

प.पू. श्री माताजी - १०.०५.१९९८

मुलाला स्वच्छ करण्यासाठी आणि नीटनेटके करण्यासाठी प्रसंगी आईला घाणीतही हात घालावे लागतात. ती जर घाणीचा तिरस्कार करीत राहिली तर मुल स्वच्छ कसे राहील? हेच आईचे कर्तव्य आहे आणि तेच सहजयोगात केले जाते. या आईची हीच इच्छा आहे की, त्या आनंदात तुम्ही पूर्णपणे डुंबून घ्या. आईची एकच इच्छा आहे. माझ्यात असणारी शक्ती माझ्या मुलांमध्ये यायला हवी.

प.पू. श्री माताजी - दिल्ली - २२.०९.१९७९

एक आईच हे जाणू शकते की, तुला सुख कसे मिळेल? शांती समाधान कसे मिळेल? जगात एक सज्जन माणूस म्हणून तू ओळखला जावा हाच आईचा प्रयत्न असतो. तुम्हाला पुनर्जन्म देणारी आई आहे. तिच्याजवळ मातृत्वाची शक्ती आहे. त्यामुळे ती तुम्हाला संरक्षण देते, ती तुमची गुरु आहे आणि आदर्शही आहे.

प.पू. श्री माताजी - दिल्ली - १४.०२.१९९९

तुमच्यामध्ये जी शक्ती आहे ती मी पाहू शकते. ती जागृत करुन परमात्म्याशी मिलन करवून देण्यासाठी मी आले आहे. आई म्हणून मला तुम्हाला हे सांगावसे वाटते की, तुम्हाला आत्मसाक्षात्कार प्राप्त करु देण्यासाठी मी आले आहे.

प.पू. श्री माताजी - फेब्रुवारी, १९८१

ही भाग्याची गोष्ट आहे की, या काळात तुम्ही जन्माला आले आहात. आपण युगानुयुगे साधक असल्यामुळे आत्मसाक्षात्कार प्राप्त करण्यासाठी जन्म घेतला आहे. आपले अस्तित्व, आपली महानता, ओळखण्याची वेळ आता आली आहे.

प.पू. श्री माताजी : किंगस्टन - ११.०६.१९८०

तुमच्यात विचाराचे इतके भांडार आहे, इतका भ्रम आहे की, काही निर्णय घेऊ शकत नाही. त्यामुळे आदिशक्तीला मानवरुपात पृथ्वीवर अवतार घ्यावा लागला आणि अत्यंत चातुर्याने तुम्हाला सर्व काही सांगावे लागले. सर्व विचारांचे समन्वय आणि मानवी स्वभाव समजून संतुलन करण्यासाठी एका आईचीच आवश्यकता आहे.

प.पू.श्री माताजी - ०३.०१.१९७८

जी आई असते ती समजावून सांगते. असे नाही की प्रत्येक वेळेस तुमची परीक्षा घेईन आणि तुम्हाला त्रास देईन आणि बघेन की तुम्ही यासाठी योग्य आहात की नाही, किंवा पात्र आहात की नाही.

प.पू.श्री माताजी - १०.०२.१९८१

या कलियुगात तुमची मदत करण्यासाठी तसेच प्रत्येक गोष्ट प्रेमाने समजावण्यासाठी (सांगण्यासाठी) तुमची आई अवतरली आहे. (तुमच्या आईने अवतार घेतला आहे).

प.पू.श्री माताजी - २४.१०.१९९३

जितके काही गुप्त आहे ते सर्व मी तुम्हाला सांगते आहे. जितके उघडपणे, (स्पष्टपणे) मी या जन्मात सांगितले आहे तितके कधी सांगितले नाही.

आईला नेहमी चिंता वाटते की आपल्या मुलाचे हित कशात आहे? जर मुलाला आपले हित समजले तर आईचे कर्तव्य पूर्ण होईल.

प.पू.श्री माताजी - ३१.०३.१९९१

तर आई होण्याच्या नात्याने मी विनंती करते आणि शक्ती या नात्याने पूर्व सूचना देते की जितके खोलात जाणे शक्य आहे तितकी खोली (सहजयोगात) प्राप्त करा. (खोलात जा) खोली प्राप्त करण्याची वेळ आली आहे. प्रत्येक पावलावर, प्रत्येक ठिकाणी मी तुमच्या बरोबर आहे, सर्वत्र तुम्ही कुठेही जा, प्रत्येक ठिकाणी मी तुमच्या बरोबरच आहे. पूर्णपणे व्यक्तिगत रुपात, प्रत्येक प्रकारे, मनाने (हृदयाने) आणि बुद्धिनेही. जेव्हा तुम्ही मला स्मराल (आठवण काढाल) तेव्हा पूर्ण शक्तिने तुमच्यापाशी असेन. हे माझे वचन आहे.

प.पू.श्रीमाताजी, मुंबई - २७.०५.१९७६

# <u>प्रकरण – २</u>

## <u>निर्मला</u>

तुमच्या स्वतःच्या आईचे नाव निर्मला आहे. ज्यात अनेक शक्ती आहेत.

'नि' - माझ्या नावातलं पहिलं अक्षर 'नि' आहे. त्याचा नाही हा अर्थ आहे. एखादी बाब (गोष्ट) अशी असते जी अस्तित्वात नसते पण तिचे अस्तित्व जाणवते. त्याला महामाया (भ्रम) म्हणतात. संपूर्ण विश्व असेच आहे. जे दिसते पण वास्तविक ते नाही. जर आपण यात तल्लीन झालो तर वाटते की, हेच सर्व काही आहे. आपल्याला असे वाटते की, माझी आर्थिक स्थिती चांगली नाही, सामाजिक आणि प्रापंचिक परिस्थिती समाधानकारक नाही. आपल्याभोवती सर्व जे काही आहे सगळं वाईट आहे. आपण कोणत्याही गोष्टीत समाधानी नाही. (सर्वत्र असमाधान आहे).

समुद्राच्या वरच्या भागात पाणी खूप खराब (गढूळ) अस्वच्छ असते. त्याच्यावर अनेक वस्तू तरंगत असतात, पण आपण पाण्याच्या खोलात गेलो तर लक्षात येते की, समुद्र किती सुंदर आहे, किती धनसंपदा आहे, किती शक्ती- ताकद आहे. हे बघितल्यावर पृष्ठभागावरची घाण आपण विसरुन जाऊ. सांगायाचे तात्पर्य हे की, आपण आपल्या चहुबाजूस जे बघतो ते सर्व माया, मिथ्या (भ्रम) आहे. जे दिसत असते ते सत्य नसते हे आपण पहिल्यांदा लक्षात ठेवले पाहिजे. जर तुम्हाला 'नि' भावना आपल्या मनात निर्माण करावयाची असेल तर जेव्हा तुमच्या मनात विचार येईल तेव्हा म्हणा 'हे अस्तित्वात नाही'. हा भ्रम आहे, मिथ्या आहे. मनात दुसरा विचार आला की, म्हणा 'हे काहीच नाही' आपल्याला वारंवार मनाला असे बजावावे लागेल. तेव्हाच आपण 'नि' शब्दाचा अर्थ समजू शकाल.

आपल्याला जे काही माया स्वरुपात दिसते ते संपूर्ण भ्रमही नाही. या दृष्य अस्तित्वापलीकडे काही आहे. आपण मात्र खरेतर ज्याचे अस्तित्वच नाही अशा अनेक गोष्टींमध्ये (बाबींमध्ये) आपल्या जीवनातील बहुमूल्य वर्षे वाया घालविली.

अस्तित्वहीन बाबींना महत्त्व देऊन आपण पापाचे ढीग जमा केले. मोह मायेच्या या वस्तूंपासून आपण आनंद मिळवायचा प्रयत्न केला पण प्रत्यक्षात तसा आनंद मिळाला नाही. तत्त्वत: हे काहीच नाही. त्यामुळे दृष्टिकोन असा हवा की हे सर्वकाही 'खरे नाही' फक्त ब्रम्ह सत्य आहे. बाकी सर्व खोटे, भ्रम, मिथ्या आहे. जीवनातील प्रत्येक क्षेत्रात हा दृष्टिकोन ठेवावा लागेल तरच तुम्हाला सहजयोग समजेल.

साक्षात्कारानंतर बऱ्याच सहजयोगींचे असे होते. त्यांना असे वाटते की, आपल्याला सिद्धी प्राप्त झाली आहे. जर पूज्य माताजींचा आशीर्वाद मिळाला आहे तर आम्ही समृद्ध (परिपूर्ण) का नाही? अशा व्यक्तींच्या मते परमात्मा म्हणजे समृद्धी होय. जरा विचार करा की, साक्षात्कारानंतरही तुमचा स्वभाव बदलला नाही याचे कारण काय असेल? कारण आपल्या आत्म्याचे स्वरुप बदलले नाही. बघा हं, 'स्व' म्हणजे आत्मा आणि भाव म्हणजे स्वरुप. या दोन्ही शब्दांच्या संधीतून स्वभाव शब्द तयार होतो. स्वभाव हा शब्द अतिशय सुंदर आहे. मला सांगा तुम्ही तुमच्या आत्म्याचे स्वरुप प्राप्त केले आहे?

जर तुम्ही आत्म्याशी तादात्म्य पावले (एकरुप झाले) तर आंतरसौंदर्यापुढे बाह्य जग सगळे नाटकी वाटू लागेल. जोपर्यंत आपल्यात हा साक्षीभाव निर्माण होत नाही, आपण 'नि' अक्षराचे अनुकरण केले नाही, त्यानुसार वर्तन केले नाही तर 'नि' तुमच्यात सामावला गेला नाही.

आपण ना इकडे ना तिकडे, ना या परिस्थितीत ना त्या परिस्थितीत म्हणजे सैरभैर स्थितीत आहात. 'नि' स्थिती ध्यान - योग यात सर्वश्रेष्ठ स्वरुपात प्राप्त केली जाऊ शकते. आपल्या जीवनात आपण 'नि' विचारानुसार अनुकरण केल्यास निर्विचार स्थिती प्राप्त कराल.

निर्विचार अवस्थेत आपण परमात्म्याच्या शक्तीबरोबर एकरुप होता. म्हणजे थेंब (स्वत:) समुद्र (परमात्मा) मध्ये मिसळून (एकरुप) जातो. तेव्हा परमात्म्याची शक्तीही आपल्यात येते. म्हणजेच परमात्म्याच्या शक्तीशी आपण

एकरुप होऊन जाता तो (परमात्मा) तुमची (देखरेख), तुमचा सांभाळ करतो. तुमच्या छोट्याछोट्या गोष्टींबद्दल विचार करतो - हे आश्चर्यकारक आहे.

आता मी तुम्हाला माझे एक रहस्य सांगते. तुम्ही प्रार्थना करा 'माते माझ्यासाठी कृपा करुन असे असे कर' तुम्हाला आश्चर्य वाटेल मी तुमच्या विनंतीचा विचार करीत नाही. तर त्या मागणीला माझ्या निर्विचारी अवस्थेकडे सोपवते, अर्पण करते. संपूर्ण संयंत्र तिथे कार्यरत होते. त्याला (विचाराला) संयंत्रात घाला माल तयार होऊन आपणासमोर हजर होईल. तुम्ही या संयंत्राला नीरव वा शांत यंत्राला काम तर करु द्या. आपल्या सर्व काळज्या, चिंता त्याच्यावर सोपवा तर खरे.

आपण निरासक्त असले पाहिजे. आपण म्हटले पाहिजे माझे काही नाही. सर्वकाही तुमचे आहे. संत कबीर म्हणतात 'जोपर्यंत बकरी जिवंत असते तोपर्यंत ती 'मैं मैं' करते. तिला मारल्यानंतर तिच्या आतडयाच्या दोरीपासून पिंजऱ्याच्या धनुकलीची तार बनते. कापूस पिंजतांना त्यातून आवाज येतो तू ही तू ही आपल्यालाही 'तूच तू' भावनेत मग्न रहायला हवे. जेव्हा तुम्ही 'मी कोणी नाही' 'माझे अस्तित्व नाही' ('मी अस्तित्वहीन आहे') या भावनेवर निश्चयी असाल, दृढ असाल तेव्हाच तुम्हाला 'नि' शब्दाचा अर्थ उमगू शकेल- समजू शकेल.

'ला' आता निर्मला शब्दातील शेवटचे अक्षर. 'ला' चा विचार करु. माझे दुसरे नाव आहे 'ललित'. हा देवीचा आशीर्वाद आहे. हे देवीचे शस्त्र आहे. जेव्हा 'ला' म्हणजे देवी ललिता रुप धारण करते किंवा जेव्हा शक्ती ललित म्हणजे क्रियाशील रुप धारण करते किंवा जेव्हा तिच्यात चैतन्यलहरी (प्रवाहित होणे सुरु होते) प्रवाहित होतात, तुम्ही तुमच्या हाताच्या तळव्यावर ज्या शक्तीचा अनुभव घेता (चैतन्य लहरी) त्या शक्ती म्हणजेच ललिता शक्ती होय. ती सौंदर्य आणि प्रेमाने परिपूर्ण आहे. जेव्हा प्रेमाची शक्ती जागृत होते तेव्हा ती 'ला' शक्ती होते. ती तुम्हाला चारीबाजूने (प्रेमाने) घेरुन टाकते. जर (जेव्हा) ती कार्यान्वित होते, क्रियाशील होते मग काळजी कसली? त्यात तुमची स्वत:ची ताकद किती असते? (त्याचा विचार करा) विचार करा की, तुम्ही झाडावर एकतरी फळ निर्माण करु शकता का?

फळाची गोष्ट सोडा तुम्ही एक पान किंवा एखादे मूळही तयार करु शकत नाही. फक्त 'ला' शक्तीच हे कार्य करु शकते. तुम्हाला जो आत्मसाक्षात्कार झालेला आहे (प्राप्त झाला आहे) ते ही 'ला' शक्तीचेच कार्य होय. याच शक्तीतून 'नि' आणि 'म' (निर्मला नावातील पहिले व दुसरे अक्षर) शक्तींचा जन्म झाला. 'ल' अक्षरात त्याचे स्वत:चे एक माधूर्य आहे. आपण त्याने (माधुर्याने) दुसऱ्यांना प्रभावित केले पाहिजे. इतरांशी बोलतांना, वार्तालाप करतांना तुम्ही ही शक्ती वापरायला हवी. ही प्रेमशक्ती चराचर व्यापून राहिली आहे. अशा वेळेस तुमचे कर्तव्य कोणते?

'नि' शक्ती श्री ब्रम्हदेवाची श्री सरस्वती शक्ती होय. सरस्वती शक्तीत तुम्हाला 'नि' चे गुण प्राप्त करावे लागतात. 'नि' शक्ती प्राप्त करणे म्हणजे पूर्ण निरासक्त बनणे. तुम्ही पूर्णपणे निरासक्त व्हा.

'ला' शक्तीत प्रेमाचा समावेश असतो. ते आमचे इतरांशी नाते जोडते. 'ल' शब्द 'ललाम' 'लावण्य' यात येतो. 'ल' अक्षरात त्याचे स्वत:चे एक माधुर्य आहे. आपण त्याने (माधुर्याने) इतरांना प्रमाणित केले पाहिजे. इतरांशी बोलताना, वार्तालाप करताना तुम्ही ही शक्ती वापरली पाहिजे. ही प्रेम शक्ती चराचर व्यापून राहिली आहे. अशा वेळी तुमचे काम काय तर तुम्ही तुमचे सर्व विचार 'नि' शक्तीवर सोपवून द्या. कारण विचाराचा जन्म त्या प्रथम शक्तीपासूनच होतो. त्यातून तुम्हाला प्रेमानंदाचा रसास्वाद घेता आला पाहिजे. हे कसे करायचे? स्वत:ला इतरांविषयीच्या प्रेमभावनेत विसरुन जा, रंगून जा, हरवून जा, ती इतरांवर अमर्याद किती प्रेम करते याचा विचार, याचा तर्क कोणी कधी केला आहे का? ही प्रेमधारा वाढतच राहिली पाहिजे, वाहत राहिली पाहिजे.

प्रेम अबोधित (निरागस) रुपात प्रवाहित व्हायला हवे. त्यामुळे चैतन्य लहरींच्या शुद्ध, दिव्य प्रेमशक्तीच्या रुपात जी 'ललाम' शक्ती आहे तिला स्वत:मध्ये जागृत करा.

तुम्ही दिव्य प्रेममय शक्ती जी शुद्ध चैतन्य लहरींच्या स्वरुपात प्राप्त झालेल्या 'ललाम' शक्तीचा उपयोग केला पाहिजे.

चैतन्यलहरींच्या रुपात ही दिव्य प्रेमशक्ती तुमच्या जवळ आहे. तिचा उपयोग करा, वापर करा. दुसऱ्या व्यक्तीला बघताक्षणी तुम्ही निर्विचार अवस्थेत जा. त्यामुळे समोरची व्यक्तीही निर्विचारी अवस्थेत जाईल (होईल). त्यामुळे तुम्ही स्वत:ला आणि दुसऱ्यालाही विशुद्धदिव्य प्रेमाच्या बंधनात बांधाल. 'नि' शक्ती आणि 'ला' शक्तीलाही बंधन द्या. 'ला' शक्ती म्हणजे चैतन्यलहरींच्या स्वरुपातील प्रेममयशक्ती आणि 'नि' म्हणजे निर्विचार स्थितीत जाणे परावर्तित करणे होय.

दोन्हीना बंधन देणे लाभदायक असते.

ज्यांना खूप अभिमान असतो असे बरेच लोक विचार करतात की, ते भरपूर काम करणारे कर्मवीर (कामसू) आहेत. त्यांना मी त्यांचा डावाभाग (पार्श्व) उचलायला सांगते, त्या कृतीमुळे आपण जी पंचमहाभुते आहेत (पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश) त्यांच्यात आपले शुद्ध प्रेम संचारित करतो. आपल्या हृदयातील प्रेमशक्ती (आपला डावाभाग) ला आपल्या कार्यशक्तीत (आपला उजवा भाग) पोहोचवले पाहिजे. जसे आपण कापडावर रंगाने चित्रे रंगवतो. जेव्हा अशाप्रकारे कार्य शक्तीत प्रेमशक्ती समर्पित होते, तेव्हा ती व्यक्ती अत्यंत मधूर प्रेममय होत जाते आणि हळूहळू ते माधुर्य, ते प्रेम त्या व्यक्तीच्या आचरणातून प्रकाशमान होत जाते. व्यक्त होते.

ललामशक्तीमुळे व्यक्तीला एक प्रकारची भव्यता, सौंदर्य आणि स्वभावात गोडवा (माधुर्य) प्राप्त होतो (येतो). या शक्तीला आपले बोलणे, वागणे आणि इतर कृतीतून विकसित करण्याचा प्रयत्न करा. काही लोकांचा रागही लोभस असतो. याच मधूर, मनोहर शक्तीला 'ललिता' शक्ती म्हणतात. लोकांनी त्या भावनेला विकृत केले आहे. ते म्हणतात ही शक्ती संहारक शक्ती आहे. हे अजिबात खरे नाही. उलट ही शक्ती अतिशय मनोरम, सृजनात्मक आणि कलात्मक आहे. तिलाच ललिता शक्ती म्हटले जाते. उदाहरणार्थ, तुम्ही एखादे बी पेरता तेव्हा जमिनीत त्याचे काही अवशेष (साल) नष्ट होतात. परंतु हा विनाश अतिशय कोमल सहज असतो. नंतर ते बी उगवते, त्यापासून वृक्ष निर्माण होतो. त्याला पाने येतात - हिवाळयात पानगळ

होते, पाने झडतात, ही क्रियाही अतिशय कोमल असते. नाजूक असते. नंतर झाडाला फुले येतात. फुले आल्यावरही त्याच्या पाकळया सुकून गळून जातात आणि झाडाला फळे लगडतात. ती फळेही खाण्यासाठी कापली जातात. फळे चवदार असतात. तो स्वाद आपण घेतो. ही पण एक शक्ती आहे. अशाप्रकारे या दोन्ही शक्ती कार्य करतात. तुम्हाला हे ही माहीत आहे की, कापल्याशिवाय, आकार दिल्याशिवाय मूर्ती तयार होत नाही. तुम्ही लक्षात ठेवा कापणे, आकार देणे याही अशाच प्रकारच्या कृती आहेत. भविष्यात तुम्हालाही कधी असे करावे लागले तर वाईट वाटून घेऊ नका. नवीन काही घडविण्यासाठी हे ही आवश्यक असते.

'म' - 'नि:' आणि 'ला' च्या मध्यावर 'म' अक्षर अतिशय महत्वाचे आहे. 'म' महालक्ष्मीचे प्रथम अक्षर आहे. 'म' धर्म (पवित्र आचरण) पालन आणि उत्क्रांतीची शक्ती आहे. 'म' शक्तीमध्ये प्रथम समजून घेणे, नंतर आत्मसात करणे आणि शेवटी पूर्ण कौशल्य (ास्त्एरय) मिळविणे हे टप्पे येतात. उदाहरणार्थ, एखाद्या कलाकारात 'ल' शक्तीमुळे त्याच्यात सृजनाचा (नवे काही करण्याचा) विचार उदय पावतो. 'नि' शक्तीमुळे तो निर्मिती करतो आणि 'म' शक्तीद्वारा तो आपल्या विचारानुसार ती वस्तू बनवितो. प्रत्येक पावलागणिक तो बघतो की, मला हवे तसेच 'हे' घडविले जाते ना? जर तसे होत नसेल तर त्याच्यात सुधारणा करतो. तसा प्रयत्न करतो. हे तो वारंवार करतो. हीच 'म' शक्ती होय. जर एखादी वस्तू योग्य उतरत नसेल, घडत नसेल तर एकदा, दोनदा नव्हे वारंवार त्यात सुधारणा करा.

अशा सुधारणा करण्यासाठी परिश्रम लागतात. आपण आपल्या स्वत:तही सुधारणा करायला हव्यात. जर असे झाले नसते तर उत्क्रांतीची प्रक्रिया शक्यच नव्हती. यासाठी परमात्म्यालाही कठोर परिश्रम करावे लागतात. आपल्याला 'म' शक्ती प्राप्त करायची आहे आणि ती सांभाळायचीही आहे. जर असे केले नाही तर इतर शक्तीही लुप्त होतील. कारण ही शक्ती गुरुत्वाकर्षण मध्यबिंदू (छएन्त्एर फ घाव्ँत्य) आहे. तुम्हाला गुरुत्वाकर्षणावर स्थिर राहता यायला हवे. आपल्या उत्क्रांतीबिंदूचा गुरुत्वमध्य 'म' शक्ती आहे. उरलेल्या देवशक्ती तेव्हाच तुमच्यात

येतील जेव्हा तुम्ही उत्क्रांतीशक्तीनुसार प्रगती कराल. मात्र त्याकरिता तुम्हाला 'म' शक्ती पूर्णपणे समजावून घ्यायला हवी. तिचा स्वतःत विकास करायला हवा. तोपर्यंत तुम्ही असे म्हणू शकता की, जर परमेश्वर माझ्यावर प्रेम करीत असेल तर त्याने माझ्याजवळ यायला हवे. मात्र साक्षात्कार प्राप्तीनंतर आपण असे म्हणू शकणार नाही. कारण 'म' शक्तीच्या सहाय्याने दुसऱ्या दोन शक्तींचे संतुलन करायचे आहे. संगीतात तुम्हाला रागांचे संतुलन करावे लागते, चित्रकलेत रंगांचे संतुलन (समतोल) करावे लागते. याचप्रकारे तुम्हाला 'निः' आणि 'ला' शक्तींचे संतुलन करणे आवश्यक आहे. या संतुलन प्राप्तीसाठी तुम्हाला परिश्रम - कष्ट घ्यावे लागतील. अनेक वेळा पदरी निराशा येते. जो सहजयोगी हे संतुलन कायम राखू शकतो तो उच्चतम स्तरावर पोहोचतो. अति भावनाप्रधानता (भावुकता) सहजयोगी व्यक्तीसाठी योग्य नव्हे. त्याचप्रमाणे अत्यंत कार्यव्यग्रताही सहजयोगीसाठी चांगली नसते. तुम्ही आपल्याच प्रेमशक्तीला सक्रिय करुन बघावे की, आतापर्यंत ती (शक्ती) कशी कार्य रत राहिली? उदाहरणार्थ, मी किती एकाप्रकारे कार्य करते. तुम्ही बघितले असेल की, प्रत्येक वेळी काहीतरी नवीन नवख्या प्रकार असतो. एकाप्रकारे काम होत नसेल तर दुसऱ्या प्रकाराने ते करा. यातही यश आले नाही तर आणखीन वेगळा मार्ग शोधा. तुम्ही सकाळी उठता, कुंकू लावता, श्री माताजींना वंदन करता. हे सर्व यांत्रिक (मेकॅनिकल) होते. ही जिवंत प्रक्रिया नव्हे. जिवंत प्रक्रियेत तुम्हाला नित्यनूतन पद्धती शोधाव्या लागतील. मी नेहमी वृक्षाच्या मुळांचे उदाहरण देते. मुळे वळणे घेत, मार्गातील अडथळे दूर सारीत पृथ्वीच्या गाभ्यात खोलवर उतरतात. मुळे अडथळ्यांशी भांडत नाहीत, अडथळ्यांशिवाय मुळे वृक्षाला आधार देऊ शकत नाहीत. त्यामुळे समस्या, अडचणी, अडथळे आवश्यक असतात. ते नसतील तर आपली प्रगती होणार नाही. जी शक्ती तुम्हाला अडचणींवर विजय मिळवायला शिकवते (अडथळे पार करायला शिकवते) ती शक्ती 'म' होय. 'म' शक्ती 'माँ' ची आईची शक्ती आहे. त्यासाठी पहिल्यांदा आवश्यक बाब आहे बुद्धिमत्ता.

'म' शक्तीमुळे तुम्ही संतुलन आणि एकाग्रता प्राप्त करु शकता. जेव्हा तुम्ही या शक्तीला उच्चतम स्तरावर विकसित करता तेव्हा तुमच्या संतुलन आणि बौद्धिक स्तरावर चैतन्यलहरींचा अनुभव मिळविता येतो. जर आपल्यात बौद्धिकता

नसेल तर आपल्यात चैतन्यलहरींची निर्मिती होणार नाही. असंतुलन आपल्याला निर्दे श करतो की, 'म' शक्ती दुर्बल आहे.

जर 'नि' आणि 'ला' या दोनच शक्ती असत्या तर कार्य शक्य नव्हते. मी तिन्ही शक्तींसह आले आहे. मात्र 'म' ही शक्ती सर्वात श्रेष्ठ आहे. आपण बघितले की आईची शक्ती किती महान आहे. हे सिद्ध करावे लागेल की, ती तुमची आई आहे. जर कोणी आले आणि म्हणाले की ती तुमची आई आहे तर तुम्ही स्वीकाराल का? नाही, आपण त्याचा स्वीकार करणार नाही. आईपण सिद्ध करावे लागेल.

**आई म्हणजे काय?**

आईने आपल्याला तिच्या हृदयात स्थान दिले आहे. आमचा आईवर पूर्ण अधिकार आहे? का? कारण ती आमच्यावर अमर्याद प्रेम करते. तिचे प्रेम नितांत आणि निःस्वार्थ आहे. ती सतत शुभचिंतन करते आणि तिच्या हृदयात प्रेम, वात्सल्य आहे. त्या व्यतिरिक्त काही नाही. जेव्हा तुमच्या लक्षात येईल की, माझा आत्मा तिच्यात वसतो किंवा वास्तव्य करतो तेव्हा तुमच्यात आईबद्दल आस्था, प्रेम निर्माण होईल. हे तुम्ही इतरांना सिद्ध करुन दाखवा. सहजयोगीत हे सामर्थ्य असले पाहिजे.

विचार करा या तिन्ही शक्तीं कार्यान्वित करुन त्याचा वापर केला पाहिजे या तीन शक्ती म्हणजे'नि' शक्ती आपल्या कुटुंबात सौंदर्य, गांभीरता व गहनता आणेल. आपण जनसंपर्कासाठी नवनवे मार्ग शोधा. या शक्तींचा सहजयोगाच्या प्रचारासाठी उपयोग करा. याच्या योग्य उपयोगासाठी आपल्याला 'नि' शक्ती म्हणजे क्रियाशक्ती बलशाली (शक्तिमान) असणे आवश्यक आहे. जरी आपल्यामध्ये 'ला' शक्ती अर्थात प्रेमाची शक्ती गरजेची असली तरीसुद्धा 'नि' शक्तीबरोबरच कार्यान्वित होणे आवश्यक आहे. एखाद्याप्रकारे यशस्वी झाले नाही तर दुसऱ्याप्रकारे उपयोग करा - वापरा - हट्ट करणे. किंवा एखाद्या गोष्टीसाठी अडून बसणे हे बुद्धिमत्तेचे लक्षण नव्हे. हट्टी व्यक्ती सहज योगात काही करु शकत नाहीत. आपला हेतू केवळ सहजयोगाचा प्रचार करणे आहे तर त्यासाठी वेगवेगळया मार्गांचा अवलंब करुन बघावा - आपल्याला सिद्धी प्राप्त करावयाची आहे. जो सिद्धयोगी आहे तो परमेश्वराशी एकरुप होऊन परमेश्वराला वश करुन घेतो. कधीकधी मी तुम्हाला काही गोष्टींसाठी मनाई करते. त्याचे तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. 'म' शक्तीच्या

सिद्धांतानुसार आपण निराश होता कामा नये. आपल्याला मार्गदर्शन करणे माझे कर्तव्य आहे. काही लोक नाराज होतात. आपण लक्षात ठेवा आपल्याला सिद्ध सहजयोगी बनायचे आहे आणि इतरांनीही ते मान्य केले पाहिजे.

राहूरी - १८ जानेवारी १९८० (मराठी)

# प्रकरण – ३

# सहजयोग – शांती आणि आनंद

फार पूर्वीपासून शोध होत आहेत. माणूस सतत काही शोधत असतो. शोधामागे तो पळतो आहे. त्याने पैसे शोधले किंवा त्याने सत्ता शोधली तो कशा ना कशा शोधाच्या मागे पळतो आहे. मात्र या शोधामागे कोणती तृष्णा - तहान आहे हे कदाचित त्यालाही माहीत नाही. याच्यामागे फक्त आनंदाचा शोध आहे.

प्रत्येक शोधामागे आनंदाची तहान तुम्हाला फरपटत घेऊन चाललेली असते. कुठल्यातरी अज्ञानाच्या मागे शोध घेता घेता माणूस जेव्हा थकतो, हारतो, कुठे काही मिळत नाही तेव्हा तो धर्माकडे आकृष्ट होतो - वळतो. जेव्हा तो धर्माकडे वळतो तेव्हाही तो बाहेरच शोधतो. याचे कारण हे आहे की, व्यक्ती स्वयं जशी असते, त्याचप्रमाणे ती शोध घेते. त्यामुळे माणूस स्वतःपासूनही दूर जाऊ लागतो. पलायन करतो. स्वतःपासून दूर जाताना आपल्यासोबत दोन मिनिटेही बसू शकत नाही. थोडक्यात अनेक गोष्टींचा शोध घेत असताना माणूस स्वतःपासूनही दूर जातो आहे.

विचार करण्याची गोष्ट अशी आहे की माणूस स्वतःपासून असा दूर का जातो आहे? का पळतो आहे? कारण तो स्वतःशी अपरिचित आहे. त्याने स्वतःला ओळखलेच नाही.आपले सौंदर्य, आपले वैभव, आपले ज्ञान व आपले प्रेम यांपासून अपरिचित राहून, तो आनंदाचा शोध बाहेर घेतो. त्यामागे धावत राहतो. पण आनंद बाहेर नसून तो आपल्या आत अंतरंगात असतो. आपण स्वतः आनंद स्वरुप आहात. आपण परमात्मा स्वरुप आहात. असे सर्व लोक म्हणतात.

पण फक्त असे म्हटल्याने ही गोष्ट पूर्ण होत नाही. मी तुम्हाला सांगितले की, तुम्ही निराकाराचा शोध घ्या अथवा साकाराचा शोध घ्या. ह्या सर्व बोलण्याच्या गोष्टी झाल्या. करोडो पुस्तके लिहिली गेली. हजारो गोष्टी बोलल्या गेल्या, न जाणो किती जीवनांचा अंत झाला, ती जीवने बरबाद झाली, माणसाच्या शोधाला अंत

नाही. जसे माझे भाषण आहे हे पण तुमच्यासाठी केवळ बोलणे आहे, शब्द आहेत. कारण या शब्दांमुळे परमात्म्याची ओळख पटत नाही.

गुरु पौर्णिमा - ०१.०६.१९७२

आपल्या अस्तित्वाची शांती, सौंदर्य, मोठेपणा आपल्या अंतर्गत आतमध्ये असते. एक मोठा सागर आपल्या आतच असतो. त्याला आपण बाहेर शोधू शकत नाही. त्याला आपल्याला आपल्या आतच शोधावे लागेल.

बाहेर पसरलेल्या वस्तू कशाप्रकारे आपल्याला तो गाढ, गहन आनंद देऊ शकतात? जो आनंद आपल्या अंतरंगात आहे. तुम्ही त्या आनंदाला बाहेर शोधण्याचा प्रयत्न करीत आहात. तो इथे नाही तर तुमच्या अंतरंगात आहे. तुमच्या आत आहे. हा आनंद तुमचा आहे अतिशय सहज आहे. तुमच्या जवळपास आहे. त्याच्यापाशी तुम्ही पोहोचू शकता. तुम्ही जे काही करता तो तथाकथित, वरवरचा आनंद, प्रसन्नता, सांसरिक शक्तीचे महत्त्व मोठेपण (गरीमा) आणि सांसरिक वस्तूंच्यामागे धावणे होते. आता या सर्व कृती विरुद्ध कार्य करावे लागेल. तुम्हाला तुमच्या अंतरंगात डोकवावे लागेल.

प.पू. श्री माताजी - १४.०३.१९८३

तुम्ही तुमच्यासाठी आनंद शोधता आहात. स्वत:चीच धनसंपदा शोधता आहात. तुम्ही तुमच्याच हरवलेल्या लपलेल्या संपत्तीला मी तुमच्यापुढे अनावृत, प्रकट करणार आहे.

प.पू. श्री माताजी, डोलिस हिल्ज - १८.११.१९७९

एका नवनिर्मितीची गोष्ट मी तुम्हाला सांगणार आहे. फक्त गोष्टी नाही (बात) तर एक आविष्कार ज्याचे संशोधन झाले आहे.

हा सामूहिक शोध आहे. एक तथ्य (फाक्ट) आहे. हे सत्य आहे हाच सहजयोग होय.

सहजयोग - परमतत्त्वाचा मार्ग आहे. पद्धत आहे. सहजयोग - हा आपला एक प्रकार आहे. मानव जातीच्या उत्क्रांतीच्या त्या टोकापर्यंत पोहोचवण्याचा मार्ग

आहे. एक अशी व्यवस्था की, ज्यामुळे मानव उच्च संवेदनांशी परिचित होईल. ज्या संवेदनेमुळे हे सर्व जग, सर्व सृष्टी आणि मानवी हृदय चालू आहे. अशा उच्च संवेदनेशी परिचय होईल. ती उच्चतम चेतना आत्मसात करील.

पूर्ण सतर्कतापूर्वक स्वत: आपल्यात होणारा मानवी जीवनाचा विकास हाच सहजयोग होय.

प.पू. श्री माताजी - गुरुपौर्णिमा - ०१.०६.१९७२

सहज काय असते? सहजचा अर्थ सहज 'सह' म्हणजे साथ, बरोबर, 'ज' म्हणजे जन्म घेणे, तुमच्या बरोबरच ज्याचा जन्म झाला आहे. प्रत्येक व्यक्तीचा असा अधिकार आहे की, तुम्ही हा योग (परमात्म्याशी जोडणे) प्राप्त करा.

सहजयोगाचा दुसरा अर्थ आपण असाही लावतो की, सहज म्हणजे सरळ (एफर्टलेस, स्पाँटेनियस) आकस्मिक घडणारी गोष्ट होय कारण ती, एक जिवंत घटना आहे. जसे आपला जन्म होणे, जसे आपल्या मातेस गर्भ राहणे, जसे फुलांनी झाड लगडून जाणे, ते फळात परावर्तित होणे तशीच ही एक फार मोठी सहज घटना आहे. स्पाँटेनियस, नॅचरल, नैसर्गिक घटना आहे आणि ती घटना मानवाच्या उत्क्रांतीची परमोच्च सीमा होय.

जे सहज आहे ते अनेक वर्षांपासून आहे. जेव्हा नवनिर्मिती (क्रिएशन) झाली तेव्हापासून सहजयोग अस्तित्वात आहे. फक्त फरक इतकाच आहे की, सहजयोग आज अशा स्थानी पोहोचला आहे की, आपला संबंध (कनेक्शन) त्या अनादी (परमात्मा) बरोबर होऊ शकतो. 'सहज' अनेक प्रकारे चालत आला आहे. पहिल्यांदा पृथ्वी तयार झाली (केली गेली) त्यानंतर पृथ्वीला थंड, गरम केले गेले, जेव्हा तिच्या आत (निवृत्ती) शितलता आली. नंतर तिच्यावर जीवजंतू आले. माणसे आली. प्रत्येक बाब सहज होत गेली. कृष्णाचाही सहजयोग आहे. त्याचे रास करणे, मडकी फोडणे, सर्वकाही सहजयोग होय. मोहम्मद पैगंबर साहेबांचे सर्व कार्य म्हणजेच सहजयोग. आज सहजयोग अशा स्थानावर पोहोचला आहे की, जेथे

सामूहिक साक्षात्काराची जाणीव होणार आहे (Enmass Realisation) याची आवश्यकता होतीच. आज ती ऐतिहासिक वेळ आली आहे. ऐतिहासिक वेळ यावी लागते. जेव्हा ऋतू येतो तेव्हा बहर येतो. (bahar Blossom) जसे आधी एक दोन फुले फुलतात, आज अनेक, अनंत फुले बहरण्याची वेळ आली आहे. आजचा सहजयोग अंतिम स्थितीत आहे. परमेश्वराने आपल्या शक्तीने मानवाची निर्मिती केली. पोषण केले. त्यामुळे मानवाने कुंडलिनी जागृतीद्वारे परमात्म्याला समजून घ्यावे, ओळखावे आणि आज, अत्यंत मोठ्या संख्येने साधक आत्मसाक्षात्कार प्राप्त करुन कृतकृत्य होत आहेत.

प.पू. श्री माताजी - ०३.०१.१९७८

आज सहजयोग उच्च स्थानावर स्थिरावला आहे. त्याला आपण महायोग म्हणायला हवे. सहजयोगात जेव्हा कुंडलिनीशक्ती सहस्त्रारात येऊन ब्रम्हरंध्राचा छेद करते त्यावेळी महायोग निर्माण होतो. त्यामुळे सहजयोग जो अनादी आहे, आपल्या जन्माबरोबरच जन्म घेतो आणि आपल्याबरोबरच वर्षानुवर्षे चालत आला आहे. ज्यात तुमची परिपूर्ती (पूर्णता) होत आहे त्याला महायोग मानायला हवे.

प.पू. श्री माताजी - २५.०७.१९७९

हा महायोग आहे. सहजयोगाचा हा सर्वोच्च बिंदू आहे. एकदा हा तुम्हाला प्राप्त झाला की तुम्हाला इतर काही करण्याची आवश्यकता उरत नाही. जी अवस्था प्राप्त करण्यासाठी लोकांना हजारो वर्षे लागत होती ती अवस्था तुम्हाला सहज प्राप्त झाली आहे.

ही एक जीवन प्रक्रिया आहे. पूर्णपणे जिवंत प्रक्रिया असल्यामुळे याबाबत तुम्ही काही करु शकत नाही. ती सहज आहे. जी कोणती गोष्ट जिवंत असते ती आपल्या आत अनेक संस्था मिळून स्वत: कार्यरत असते.

प.पू. श्री माताजी - ११.११.१९७९

सहजयोगात तुम्हाला मुंडण करायचे नाही, अनवाणी चालायचे नाही, उपाशी रहायचे नाही किंवा गृहस्थाश्रमाचा त्यागही करावयाचा नाही........ सहजयोग अतिशय व्यावहारिक आहे. कारण तो पूर्ण सत्य आहे. त्यामुळे आपल्या सर्व शक्ती, समज उमज करुणामय प्रेमाने तुम्हाला तुमच्या विषयात अश्वस्त व्हायचे आहे. हे ही लक्षात घ्यायचे आहे की, नेहमीच परमात्म्याची सर्वसमावेशक शक्ती तुमच्याबरोबर आहे. ती शक्ती तुमच्या प्रगतीत मदत, रक्षण, मार्गदर्शन, पोषण आणि देखभाल सातत्याने करते आहे.

प.पू. श्री माताजी - २१.०५.१९९२

आजचा जो आपला सहजयोग आहे त्यात प्रथम तुमची कुंडलिनी जागृत केली जाते. तुम्ही कसेही असाल, तुमची जीवनपद्धती कोणतीही असूदे, कुठल्याही चुकीच्या मार्गाने तुम्ही जात असाल पण कुंडलिनी जागृतीनंतर तुम्ही आपोआप योग्य मार्गाला लागता.

'आई' ने काही सांगण्याची गरज भासणार नाही. तुम्ही स्वतःच बघता की, ही काय गोष्ट आहे.

प.पू. श्री माताजी - ३१.०३.१९८५

ह्या जागृतीच्या थोड्याशा प्रकाशात तुम्हाला हे जाणवेल की, तुमच्यात कोणत्या त्रुटी आहेत आणि त्या दूर करण्याची शक्तीही तुमच्या स्वतःतच आहे. अंधारात दोरी म्हणून हाती घेतलेल्या सापाला उजेड पडताच तुम्ही जसे फेकून देता सहजयोगही याप्रकारेच कार्य करतो.

प.पू. श्री मांताजी - २३.०३.१९९२

पूर्ण विश्वात जेव्हा सहजयोग पसरेल तेव्हा सारे जग घृणा, वैमनस्य, दुष्टपणा यापासून मुक्त होईल. (मानव) शांती व आनंदात विराजमान होईल. कारण आणि परिणाम याच्यावर मनुष्य जाईल. तेथे परमेश्वराचे साम्राज्य असेल आणि परमेश्वराच्या साम्राज्यात कोणत्याही गोष्टींची कमतरता नसते. परमेश्वराच्या संपूर्ण सृष्टीची रचना सहज झाली आहे. त्याला जेव्हाही करायचे असते ते तो (परमेश्वर) करतो. त्याची इच्छा आहे की, तुम्ही त्याच्या साम्राज्यात यावे आणि आपल्या

सिंहासनावर, विराजमान व्हावे.ते सिंहासन तुमच्या सहस्त्रारात आहे. त्यात तुम्ही प्रवेश करणार आहात आणि ब्रम्हरंध्र भेदल्यावर परमेश्वरी कृपेचा, आशीर्वादाचा तुम्हाला अनुभव येईल. तो तुमच्या नसांमधून जाणवेल. आपला देश आणि विश्वातूनही जाणवेल. हा परमेश्वरी आशीर्वाद आहे. आज तो दिवस उगवला आहे की, त्याला (परमात्म्याला) पुन्हा प्रस्थापित केले जाईल. त्याला विसरले जाणार नाही.

प.पू. श्री माताजी दिल्ली - १६.०२.१९८५

मी काही विशेष कार्य केले नाही. जन्मापासूनच मला याचे ज्ञान होते. मी स्वतःला ओळखते. मी केवळ माणूस आणि त्याच्या अडचणी समजून घेतल्या. मनुष्य, येशूख्रिस्त, मोहम्मद पैगंबर साहेब, श्रीराम, श्रीकृष्ण यांना मानता, भक्ती करता. पण त्यांच्यात (मानव) आंतरिक परिवर्तन बदल होत नाही. त्याच्या डोक्यात काही बाबी शिरत नाहीत, काय कारण असेल? याचे कारण मी शोधले आहे की, अजून त्यांचा योग आला नाही. ते परमचैतन्याशी जोडले गेले नाहीत. मी मानवी स्वभावाच्या क्रमपरिवर्तन व संयोजन व एकत्रीकरण याचा अभ्यास केला आहे. हे अवघड नाही. कारण फक्त सात चक्रे आहेत. ज्याना कार्यप्रवण करुन सहस्त्रार भेदनासाठी कुंडलिनी शक्तीला जागवावे लागेल. या विधीने कृतीने काम केले. आज ते हजारो लोकात कार्यान्वित होत आहे. त्याचा प्रसार होत आहे.

प.पू. श्री माताजी दिल्ली - २१.०३.१९९५

तुम्हाला सत्य बहाल करणे माझे काम आहे. तुम्हाला आत्मसाक्षात्कार देणे माझे कार्य आहे. मला हे कार्य पार पाडायचे आहे.

प.पू. श्री माताजी यू.के. - १५.११.१९७९

❖ सहजयोग फक्त कुंडलिनी जागृती आणि परमात्म्याशी मिलन इतकीच गोष्ट आहे. आणखी काही नाही.

०१.०६.१९७२


❖ मानवाच्या रुपात आत्मा बनणे (आत्मसाक्षात्कार प्राप्त करणे) आपला जन्मसिद्ध अधिकार आहे. हाच सहजयोग होय.

०१.०८.१९८९

❖ आधुनिक सहजयोगाने एक अशी पद्धत (कृती) शोधली आहे ज्यात सामूहिक रीतीने आत्मसाक्षात्कार (कुंडलिनी जागृती) दिला जाऊ शकतो. सहजयोग मोठया प्रमाणावर कार्य करतो त्याला महायोग म्हणता येऊ शकते.

सहज़योग - पृ. १५-१६

❋❋❋



ॐ त्वमेव साक्षात श्री महालक्ष्मी, महासरस्वती, महाकाली
त्रिगुणात्मिका, कुंडलिनी साक्षात,
श्री आदिशक्ती माताजी, श्री निर्मला देव्यै नमोनमः!

ॐ त्वमेव साक्षात श्रीकल्कि साक्षात,
श्री आदिशक्ती माताजी, श्री निर्मला देव्यै नमोनमः!

ॐ त्वमेव साक्षात श्रीकल्कि साक्षात,
श्री सहस्त्रार स्वामिनी, मोक्षप्रदायिनी माताजी
श्री निर्मला देव्यै नमोनमः!

# प्रकरण – ४

## निर्मल विद्या

सर्व परमेश्वरी कार्य, आपण एखाद्याला क्षमा करतो. एका विशिष्ट शक्तिद्वारा हे घडते. जेव्हा तुम्ही म्हणता - 'श्री माताजी आम्हाला क्षमा करा' ज्या तंत्राद्वारे मी तुम्हाला माफ करते ती 'निर्मल विद्या' होय. ज्या तंत्रानुसार मी तुमच्यावर प्रेम करते, माया करते, ती पण 'निर्मल विद्या' च. ज्या तंत्रामुळे सर्व मंत्रांची अभिव्यक्ती होते ते मंत्र म्हटले जातात आणि ते प्रभावशाली होतात ती विद्या ही निर्मल विद्या होय.

'निर्मला' म्हणजे पावन, पवित्र. विद्येचा अर्थ आहे ज्ञान - निर्मल विद्या या तंत्राचे अत्यंत आध्यात्मिक ज्ञान होय. वलयांची ही शक्ती चक्रांची निर्मिती करते. ही शक्ती वर्तुळ, वलय, याची निर्मिती करते. ही शक्ती जशी वलयांची निर्मिती करते तसेच आणखी काही वेगवेगळ्या आकारांची रचना (निर्मिती) करते. त्यामुळे या शक्तीला गती प्राप्त होते. या गतीमुळे ती सर्व नको असणाऱ्या (अवांछित) आणि अपवित्र घटकांना घालवते, त्यांचे उच्चाटन करते आणि स्वतःच्या शक्तीने स्वतःस परिपूर्ण बनवते. हे 'दिव्यतंत्र' आहे. मी तुमच्यासमोर या 'दिव्यतंत्राचे' पूर्ण वर्णन कदाचित करु शकणार नाही. कारण तुमचे शरीररुपी यंत्र अजून हे कार्य करीत नाही. तुमच्याजवळ तसे दिव्ययंत्र नाही.

तुम्ही बघा ही किती सूक्ष्म आहे, 'निर्मल विद्या' असा शब्द उच्चारताच तुम्ही या शक्तीला, पूर्ण वस्तूला, पूर्ण तंत्रास आमंत्रण देता. आमंत्रण देता की, तिने (निर्मल शक्ती) येऊन तुमची देखभाल करावी आणि शक्ती तसेच करते. तुम्हाला काळजी करावी लागत नाही. कुठल्याही देशाच्या सरकारात (शासनात) किंवा विश्वातही असे घडत नाही. तुम्ही आव्हान केले आणि सरकार दरबारी लगेचच कार्य झाले असे होत नाही. पूर्ण ब्रम्हांडात, पूर्णसृष्टीमध्ये या तंत्राला 'निर्मल विद्या' म्हणतात. या विद्येला पूर्णपणे शरण जा. त्यात कौशल्य मिळवा तर ही विद्या तुमच्या

सर्व आज्ञांचे पालन करील. ही 'गणेश शक्ती' आहे 'अबोधिताची शक्ती'. तिला 'अबोधिता' (इनोसन्स) म्हटले जाते. (पूर्ण शक्ती तीच अबोधितता आहे) अबोधिता कार्यभार सांभाळून सर्व कार्यांना गती देते. याप्रकारे ही शक्ती कार्यप्रवण होते. कार्य करते.

त्यानंतर ती प्रगत होत जाते आणि 'पराशक्ती' म्हणून ओळखली जाते. पराशक्ती म्हणजे शक्तीच्या पलीकडे अधिक काही. त्यानंतर ती 'मध्यमा' होते. जेव्हा ती डाव्या विशुद्धीवर येते तेव्हा व्यक्तीत दोषभाव निर्माण होतो (काही दोष येतात). या दोष भावनेमुळे आपण म्हणतो की, गोष्ट फार कठीण आहे. डाव्या विशुद्धीवर गणेश शक्तीची पकड असते. श्री गणेश म्हणजे प्रत्यक्ष माधुर्य, मधुरता. श्री गणेशाच्या नुसत्या दर्शनानेही हे कौतुक, पावित्र्य वाहू लागते. श्री गणेशाच्या विचारानेही मन प्रसन्न होते. डाव्या विशुद्धीवर अबोधिता कटोर होते. म्हणून डाव्या विशुद्धीची पकड दूर करण्यासाठी तुम्ही सर्वांशी गोड बोलले पाहिजे. तुमच्या वाणीत माधुर्य हवे. विशेषतः पुरुषांनी आपल्या पत्नीशी अतिशय गोड बोलायला हवे. हे माधुर्य, हा गोडवा तुमच्या डाव्या विशुद्धीला ठीक करील. नेहमी गोड बोला. मधूर शब्द शोधा, बोलण्यात ते योजा. मधुर शब्द हे दोषभाव दुरुस्त करण्याचे मोठे साधन आहे. तुम्ही दुसऱ्यांशी वागताना कडक शब्द वापरले तर शक्यता आहे की, ते तुम्ही सवयीनुसार वापरले किंवा तसे बोलण्याने तुम्हाला आनंद मिळत असेल मात्र असे कटोर बोल बोलल्यानंतर लगेचच परमेश्वराला सांगतो की, परमेश्वरा हे मी काय बोललो? हा सगळयात मोठा दोष आहे. व्यक्तीने सदैव मधूर शब्द शोधण्याचा प्रयत्न करीत रहायला हवे. पक्षी जशी चिवचिव करतात तुम्हीही आजुबाजूला पर्यावरणातून मधूर स्वर शिकावयास हवे. त्यामुळे तुम्ही इतरांना प्रसन्न, आनंदी करु शकाल. असे करणे आवश्यक आहे. नाही तर जर तुमची डावी विशुद्धीची पकड खूप वाढली तर बोलताना अशी परिस्थिती येईल की, ओठ डाव्या बाजूस ओढले जातील (तोंड वाकडे होईल).

त्यानंतर प्रसार (चैतन्य) आज्ञाचक्रात जाऊ लागते. तिथे गणेश शक्ती महाक्षमाशक्तीत परावर्तित होते. यानंतर ती मेंदूच्या भागात (मस्तिष्क) प्रवेश करते. तिथे गणेश शक्ती  सूर्याच्यावर जाते. प्रति अहं प्रकट होतो. ती चंद्राची शक्ती आहे चंद्राचा आत्मा होय. आत्मा होऊन तो शंकराच्या माथ्यावर स्थिरावतो. शंकराच्या जटांमध्ये शोभणारी चंद्रकोर म्हणजे ही शक्ती. गणेश शक्तीचा पूर्ण विकास हा अतिशय सुंदर आहे. अशाप्रकारे आपल्या इच्छा आत्मा बनतात. आपल्या इच्छा आणि आत्मा एकरुप होतात. परंतु कधीकधी ही बाधा अत्यंत घातक होऊ शकते. तुम्ही बघितले असेल की, ज्यांची डावी विशुद्धीची पकड असते ते कडवट बोलतात. त्यांनी त्यावेळेस लक्षात टेवले पाहिजे की, हे कडवट बोल आहेत ते तुम्ही बोलत नाही. कारण तुम्ही आत्मा आहात आणि आत्मा कठोर अथवा विध्वंसक बोलू शकत नाही. कोणाला सुधारणे अत्यावश्यक असेल तरच तो थोडे कडक बोलेल. पण तुम्ही त्याला सुधारण्याची जबाबदारी घेऊ नका. हे काम कोणीतरी दुसरा करील.

प. पू. श्री माताजी - ३१.१२.१९८०

***

# प्रकरण – ५

## सृष्टीची सूत्रधार – श्री आदिशक्ती

हा जो परमात्मा, परमेश्वर आहे, आपला निर्माता आहे. आपला रक्षणकर्ता आहे. आमचे अस्तित्व अबाधित रहावे, ही त्याची इच्छा आहे. त्याचे असणे हेच आमचे असणे असते. तो सर्व शक्तीमान परमेश्वर आहे.

प. पू. श्रीमाताजी, निर्मलायोग - मे, जून १९८५

सगळ्या जगात जितकी सुखे आणि मौज आहे, सर्व जगाचे जे आकर्षण आणि सौंदर्य आहे, सर्व जगात जितके वैभव आहे सर्वकाही जे जे आहे ज्याला तुम्ही नॉलेज म्हणता, ज्याला तुम्ही ज्ञान समजता, त्या सर्वाचा प्रवाह (उगम) हा परमात्मा आहे. तो समजतो आणि प्रेम पण करतो.

प. पू. श्रीमाताजी, इटली - फेब्रुवारी १९९१

परमात्म्याने या विश्वाची, ब्रम्हांडाची निर्मिती केली आहे. कारण परमात्मा आपल्यावर प्रेम करतो. या प्रेमामुळे परमेश्वर तुमच्यावर आशीर्वादाचा वर्षाव करु इच्छितो.

प.पू. श्रीमाताजी, लंडन - ०५.१०.१९७९

परमात्मा अत्यंत करुणामय आहे. प्रेममय आणि दयाळू आहे. त्याने आम्हाला आत्मज्ञान प्राप्त करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. परमेश्वराने आपल्याला अमिबा ते मानव या अवस्थांपर्यंत विकसित केले आहे. परमेश्वर हे साम्राज्य तुम्हाला अर्पण करु इच्छितो. या साम्राज्याचा राजकुमार करु इच्छितो.

प. पू. श्री माताजी - ११.०६.१९८०

परमात्मा एक आहे, हे सत्य आहे. परमात्मा एकच आहे. तो सर्व शक्तीमान आहे. त्याच्या स्वतःच्या काही शक्ती आहेत. त्या शक्तींचे स्पष्ट प्रदर्शन (अभिव्यक्ती) तो कोणत्याही माध्यमातून करु शकतो. त्यानुसार परमात्म्याने सर्व प्रथम आदिशक्तीच्या शक्तींची निर्मिती केली. आदिशक्तीच सर्व शक्तीमान

परमेश्वराच्या इच्छेला साकारते. दृष्यरुप देते.

प. पू. श्रीमाताजी, कबेला - ०५.०६.१९९६

आदिशक्तीने मानवीरुप धारण केले आणि ती दृष्यस्वरुप बनली. कार्य करण्यासाठी तिला साकार रुप घेणे आवश्यक होते.

प. पू. श्री माताजी - १५.११.१९७९

आदिशक्ती परमात्म्याचे स्त्री रुप आहे.

प. पू. श्री माताजी - ०६.०६.१९९३

'श्री आदिशक्ती' च्या शक्तीनेही तुम्हाला आत्मसाक्षात्कार दिला आहे. या शक्तीनेच तुम्हाला सत्य, करुणा आणि प्रेमाची शक्ती बहाल केली आहे. ही तीच शक्ती आहे जी ब्रम्हांडाची निर्मिती करु इच्छित होती. त्यामुळेच ती श्री शंकरापासून अलग झाली होती. ती निर्मिती करते म्हणून प्रेम करते. प्रेमामुळेच तिने विश्वनिर्मिती केली. मानवाची निर्मिती केली. मानवाची निर्मिती तिचे महान कार्य आहे. अतिशय प्रेमाने आणि स्नेहाने हे कार्य झाले कारण तिला आशा होती की, माणसाची मुले सत्याचे ज्ञान मिळवतील. इतर सर्व बाबींचे ज्ञान मिळवतील आणि सरतेशेवटी स्वत:ला ओळखतील. आदिशक्तीचे अतिशय महत्त्वाचे कार्य म्हणजे कुंडलिनीला तुमच्या त्रिकोणी अस्थीमध्ये स्थापन करणे. कुंडलिनी म्हणजे आदिशक्ती नव्हे. कुंडलिनी आदिशक्तीचे फक्त प्रतिबिंब आहे.

प. पू. श्री माताजी कबेला, आदिशक्ती पूजा - ०३.०६.२००१

आदिशक्तीपासूनच साऱ्या शक्तींचा उगम होतो. महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती या सर्व शक्ती पुन्हा आदिशक्तीत विलीन होतात. आदिशक्तीशिवाय हे कार्य संपन्न होऊ शकत नाही. कारण सर्व चक्रांवर त्यांचा प्रभाव आहे आणि चक्रांच्या हरतऱ्हेच्या संबंधांना ती सांभाळते. यालाच 'त्रयसंयोग' म्हणतात.

प. पू. श्री माताजी - ०९.०४.१९९०

श्री सदाशिवांची इच्छा जेव्हा शक्ती स्वरुपात परावर्तित झाली तेव्हा ती शक्ती किंवा महाशक्ती किंवा आदिशक्ती म्हटली गेली. या आदिशक्तीने एक

व्यक्तिमत्व धारण केले आणि सजीव स्वरुपात आली कारण विहित कार्य करण्यासाठी शक्तीला साकार रुप धारण करणे आवश्यक होते.

प. पू. श्री माताजी - १५.११.१९७९

आदिशक्ती कोण आहे? सर्व शक्तीमान परमात्मा श्री सदाशिवाची शुद्ध इच्छा होय. आदिशक्ती परमात्म्याच्या प्रेमाची प्रतिमूर्ती आहे. परमात्म्याचे विशुद्ध प्रेम आहे. आपल्या प्रेमात त्यांनी कोणती इच्छा प्रकट केली! त्यांनी अशी इच्छा प्रकट केली की, आज्ञापालन करणारा अतिउत्तम, देवदुताप्रमाणे असणाऱ्या मानवाची निर्मिती करावी. या विचाराने श्री सदाशिवाने ॲडम आणि इव्ह ची निर्मिती केली. आदिशक्ती शुद्ध प्रेम आणि करुणेची शक्ती आहे. या शिवाय त्यांच्यापाशी काहीही नाही. त्यांच्या हृदयात केवळ शुद्ध प्रेम आहे. परंतु हे प्रेम अतिशय शक्तीशाली आहे. तेच प्रेम त्यांनी पृथ्वीमातेला दिले. या प्रेमप्रभावामुळेच आम्ही कितीही पापे केली, काहीही केले तरी अनेक सुंदर सुंदर गोष्टी आम्हाला देऊन त्या माध्यमातून पृथ्वी माता आपल्या प्रेमाचा वर्षाव आम्हावर करीतच असते. हरप्रकारे तिने आपल्या प्रेमाची अभिव्यक्ती केली आहे. पृथ्वीवर कोणत्याही गोष्टीची निर्मिती झाली, ब्रम्हांडात नव्यागोष्टीची निर्मिती झाली हे सर्वकाही परमेश्वरी (मातेच्या) प्रेमामुळेच होते आहे. या 'आदिशक्ती' चे प्रेम इतके सूक्ष्म आहे, इतके सूक्ष्म आहे की, कधीकधी तुम्ही ते समजू शकत नाही.

प. पू. श्री माताजी - कबेला - ०६.०६.१९९३

आदिशक्तीने सर्व ब्रम्हांडांची निर्मिती केली. तिने या पृथ्वी मातेची निर्मिती केली. सर्व सृष्टी साकारली आणि तिनेच सर्व पशू मानव निर्माण केले. अशा प्रकारे संपूर्ण सृष्टीची निर्मिती होऊ शकली.

हे ब्रम्हचैतन्य आहे. संपूर्ण ब्रम्हांडाची निर्मिती करणारी ही शक्ती आहे. त्यातील परम सत्य हे आहे की, संपूर्ण सृष्टी या चराचरात सूक्ष्मपणे पसरलेल्या ब्रम्हचैतन्याच्या मदतीने चालत आहे. हे सारे चैतन्य ही परमेश्वरी इच्छा होय. या

परमेश्वरी चैतन्याच्या इच्छेमुळेच आज आपणाला मनुष्य जन्म, मनुष्य रुप, मनुष्य स्थिती मिळाली आहे.

प. पू. श्री माताजी - ०५.०४.१९९६

ही आदिशक्तीच सृष्टीच्या नाटकाची प्रस्तावना करते. या मूक अभिनय नाट्यात सर्व सूत्रे तिच्या हाती आहेत. तीच सूत्रधार आहे. आदिशक्तीने प्रथम जगाची निर्मिती केली. त्यानंतर उत्क्रांती प्रक्रियेनुसार मानवाची निर्मिती करण्यासाठी विश्वात अनेक वस्तू कार्यान्वित केल्या. त्यानंतर शक्तीने मानवास सुख व मार्गदर्शन यासाठी कार्य केले. मानवाच्या मार्गदर्शनासाठी अनेक अवतारांनी पृथ्वीवर जन्म घेतला. त्यांनी योग्य काय व अयोग्य काय? (काय करावे व काय करु नये) यातील भेद समजावून सांगितला.

प. पू. श्री माताजी, काना जोहारी - ०२.०७.२०००

आदिशक्तीने सृष्टीतील वस्तूंची निर्मिती तुमच्यासाठी केली. कारण विकासाचे प्रतिक जो मानव त्याची मदत केली जाऊ शकेल. तुम्ही आत्मसाक्षात्कार प्राप्त करु शकाल. आपल्या जीवनाचा अर्थ समजू शकाल. सर्व व्यापक शक्तीशी जोडून परमात्म्याच्या साम्राज्यात प्रवेश मिळवू शकाल. हे सर्व कार्य (आदिशक्ती) देवीचे आहे. नऊ वेळा तिने अवतार धारण केले आणि दहाव्या वेळेस तुम्हा सर्वांना आत्मसाक्षात्कार देण्यासाठी अवतरित झाली आहे. तिला 'त्रिगुणात्मिका' म्हणतात. म्हणूनच गौतमबुद्धाने तिला मात्रेया म्हटले. मात्रेया म्हणजे तीन माता.

प. पू. श्री माताजी, कबेला - २७.०९.१९९२

पूर्ण जगात जे चैतन्य प्रवाहित होते आहे ती महामाया (आदिशक्ती) शक्ती आहे. मायेच्या शक्तीमुळेच सारे कार्य होते. ही शक्ती सर्व बाबींचा विचार करते, समजते, सर्वांना पूर्णपणे, व्यवस्थित रुपात आणते.

सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे ती तुमच्यावर निर्व्याज प्रेम करते. या प्रेमापायी ती काही मागत नाही. फक्त देण्याची इच्छा असते. तुमच्या प्रगतीची,

मोठेपणाची इच्छा असते. तुमचे भले व्हावे हीच इच्छा ती सदैव करते.

प. पू. श्री माताजी, पुणे - १६.१०.१९८८

मी (श्री माताजी) घोषणा करते की, मीच मानवतेच्या रक्षणासाठी अवतरित झाले आहे. मी घोषणा करते की, मी आदिशक्ती आहे. जी सर्व मातांमध्ये परम आहे. जी (आदि माँ) आदि माता आहे. मी अशी शक्ती आहे जी परमात्म्याची शुद्ध इच्छा आहे. मी अशी शक्ती आहे जी तुमच्या अस्तित्वाला अर्थ देण्यासाठी अवतरित झाली आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, प्रेम, धैर्य व शक्तीद्वारा मी या लक्ष्यापर्यंत पोहोचेन. मीच ती शक्ती आहे जिने पुन्हा पुन्हा अवतार घेतले. पूर्ण शक्ती आणि सर्व कलांसाठी मी आले. माणसाला त्याचा उद्धार करुन मुक्त करण्यासाठी आले नाही तर त्याला स्वर्गाचे साम्राज्य, तो आनंद व आशीर्वाद देण्यासाठी आले आहे. आपला जो परमपिता आहे. (परमात्मा, अल्लाह, सदाशिव) तो या सर्व गोष्टींचा वर्षाव करण्यासाठी इच्छा करीत आहे.

प.पू.श्री माताजी, यू. के. - ०२.१२.१९७९

मीच आदिशक्ती आहे. (परमेश्वराची चैतन्य शक्ती) मी हे आश्चर्यजनक काम करण्यासाठी प्रथमच अवतीर्ण झाले आहे. या गोष्टी तुम्ही चांगल्या पद्धतीने समजावून घ्या आणि त्यामुळे तुमच्यात आश्चर्यकारक बदल घडतील. मला हे माहीत आहे की, मी कोण आहे हे तुम्हाला कधी ना कधी सांगावेच लागेल. आज मी ती गोष्ट तुम्हाला सांगितली. आता तुम्ही लोकांनी हे शाबीत करायचे आहे की मी तीच (शक्ती) आहे.

प.पू. श्री माताजी, सिडनी, ऑस्ट्रेलिया - २१.०३.१९८३

मी स्वतः आले नाही. तुम्ही बोलावले म्हणून आले आहे. अनादीकाळापासून तुमची मागणी आणि चित्कार, तुमचा आक्रोश यामुळे मी हे शरीर धारण केले आहे. मी आज तुम्हाला स्पष्टपणे सांगते - जोपर्यंत तुम्ही माझा स्वीकार करणार नाही तोपर्यंत काम होणार नाही. मला आई मानावे लागेल आणि माझा मुलगा म्हणून जगावे लागेल. त्याशिवाय तुमचे काम होणार नाही.

प.पू.श्री माताजी, एप्रिल, २००५

ही फार महत्त्वाची गोष्ट आहे की, तुम्ही मला ओळखले पाहिजे. अत्यंत नम्रतापूर्वक तुम्हाला सांगते की, मला तुम्ही ओळखा माझा सन्मान करा, माझ्यावर प्रेम करा - ओळखणे याचा अर्थ मी आदिशक्ती आहे. असा नव्हे आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षणी मी तुमच्या बरोबर आहे. याची जाणीव होते.

प.पू.श्री माताजी, गणपतीपुळे - २७.१२.१९९४

माझे नाव निर्मला आहे. निर्मला शब्दाचा अर्थ आहे निष्कलंक (निर्मळ). अर्थात पवित्र करण्याची शक्ती असणारा. माझे मूळ नाव ललिता आहे. ते आदिशक्तीचे नाव आहे.

प.पू.श्री माताजी, न्यूयॉर्क - ३०.०९.१९८१

मी आदिशक्तीचे महामाया रुप आहे -

मी आदिशक्तीचे महामाया रुप आहे. हे खरे आहे की, मी भासमय आहे. माझे नांव महामाया आहे. मी भ्रांतीरुप आहे. मला समजणे सोपे नाही. एकीकडे मी दिव्यशक्ती आहे तर दुसरीकडे अतिशय अतिमानवी आहे.

प.पू.श्री माताजी, ०१.०३.१९९२

तुमच्या समोर माझे मानवी रुप महामायेच्या रुपात आहे. ती तुमच्यासारखाच व्यवहार करते. हे काम खूप कठीण होते तरी मी स्वतःला बदलले आहे.

प.पू.श्री माताजी, २४.०५.१९८६

मी सर्वसाधारण मानवासारखे आचरण करुन अगदी तुमच्यासारखी वृद्ध होणार. मी चष्मा घालते आणि सर्व कामेही करते. जी कामे मला पूर्ण मानवी रुप देतात.

प.पू.श्री माताजी, इटली - ०४.०५.१९८६

माझ्या शरीरातून सातत्याने चैतन्य प्रवाहित होते. इतके वजन घेऊन चालणं सोपे नाही. माणसाप्रमाणे आचरण करणे, दिसणे, मानवासारखे राहणे आवश्यक आहे. कारण तुमच्या माझ्यात सामंजस्य राहावे हे महत्त्वाचे. अवताराचे कारण काय? कारण अचेतन (निराकार) तुमच्याशी बोलू शकत नाही.

प.पू.श्री माताजी, न्यूयॉर्क - ३०.०९.१९८१

तुम्हाला सहजयोग समजावण्यासाठी व तुमच्यात जी शक्ती आहे तिची जाणीव करुन देण्यासाठी मला खूप सहन करावे लागते.

प.पू.श्री माताजी, मैंड्रीड - २४.०५.१९८६

आदिशक्तीला महामाया स्वरुपात राहणे आवश्यक आहे. कारण की शक्तीचा ज्यात समन्वय, प्रकाश आहे आणि सर्व तऱ्हेच्या शक्तींची अधिकारी तिला मायेचे स्वरुप घ्यावे लागते. याचे कारण असे आहे की, ती प्रचंड शक्ती महामायेच्या स्वरुपात येते. आदिशक्तीच्या अनंत शक्ती आहेत परंतु त्या दडवून ठेवाव्या लागतात. याची कारणे अशी आहेत:

(१) जर लोकांनी ही आदिशक्ती आहे असे ओळखले तर अनेक प्रकारचे लोक तिच्यावर प्रहार करतील. कारण ते दुष्ट लोक आहेत आणि ते परमेश्वराच्या रुपात उभे राहतात. आदिशक्ती या जगात आली आहे हे कळल्यावर ते पळून जातील किंवा एकजूट होतील व आदिशक्तीचे कार्य होऊ नये असा प्रयत्न करतील.

<u>जेव्हा परमेश्वर अवतार घेतो तेव्हा आसुरी वृत्ती कोणत्या ना कोणत्या फसव्या वेशात येतात आणि एकत्र येऊन परमेश्वराशी लढतात.</u>

(२) दुसरे या स्वरुपात गहन आणि सूक्ष्म स्वरुपात कार्य करायचे आहे. जे आतापर्यंत कोणी ही केले नाही. ते म्हणजे सामूहिक आत्मसाक्षात्कार देणे. हे कार्य कुणालाही त्रास न होता, हानी न पोहोचता करावयाचे आहे. कसे करायचे? जसे नावेत बसल्यावर आरामात दुसऱ्या किनाऱ्यावर पोहोचता यायला हवे.

प.पू.श्री माताजी, जयपुर -१०.१२.१९९४

(३) आदिशक्ती माया स्वरुपात का आली आहे? तर ती माया स्वरुपात नसती तर तुम्ही तिला ओळखू शकला नसता. वास्तविक मी जोपर्यंत मायेच्या स्वरुपात आहे तोपर्यंत तुम्ही माझ्याजवळ येऊ शकता अन्यथा नाही. आपण विचार कराल की, ही तर शक्ती आहे. तिच्याजवळ कसे जायचे, पदस्पर्श कसा करायचा? संवाद कसा साधायचा? मात्र माया स्वरुपामुळे या गोष्टी शक्य होतात. मी माया स्वरुपात राहीन आणि तुम्ही सर्व गोष्टी प्राप्त करुन घ्याल.

प.पू.श्री माताजी, जयपुर - ०८.०५.१९९४

मी लोकांमध्ये आंतरिक बदल करण्याचा प्रयत्न करते. देवांच्या समूहात हा निर्णय घेतला गेला. सर्व देव देवतांनी कार्याची ही जबाबदारी कोणा सामर्थ्यवान व्यक्तीला देण्याचा निर्णय केला. त्यांनी म्हटले की आमच्या सर्व शक्ती तुमच्याबरोबर असतील. परंतु आपण कलीयुगात मानवात बदल करण्याचा कार्यभार सांभाळा.

प.पू.श्री माताजी, कबेला - २६.०४.१९९४

यासाठी प्रेम, सहनशीलता आणि समज उमज नसेल तर ती हे कार्य करु शकत नाही. म्हणून या अवताराचे हे खूप महत्त्व आहे. माझे पहिले कार्य तुम्हाला आत्मसाक्षात्कार देणे हे आहे. तुमचे जीवन सुखी समृद्ध करणे. जर शारीरिक आजार असतील तर आदिशक्ती पूर्ण शक्तीने लक्ष ठेवेल व तुमच्या समस्या, अडचणी दूर होतील. ही शक्ती आरामदायी आणि तुमचे रक्षण करणारी आहे. आदिशक्तीच हे कार्य करु शकते. ती सर्व चक्रांचे कार्य जाणते. मानवी रूपात येऊन मानवात काय दोष आहे, ते दोष, दूर करण्यासाठी काय करावे लागेल? हे सर्व दोष असले तरी कुंडलिनी कशी जागृत होईल? ब्रम्हनाडीतून कुंडलिनी कशी जागृत होईल? हे ती जाणते.

हे कार्य असे होते की, ज्यात सर्व देव देवतांचे, सर्व अवतारांचे, सर्व महापुरुषांचे येणे (सहभाग) आवश्यक होते. आपल्या शरीरात त्या सर्वांच्या शक्ती धारण करुन या जगात अवतार घेणे आवश्यक होते. म्हणून हा अवतार पृथ्वीवर आला. त्यामुळे सर्व जगाचा उद्धार होणार आहे.

प. पू. श्री माताजी

आदिशक्तीच्या आगमनापासूनच हे कार्य सुरु झाले आहे आणि खूप चांगल्याप्रकारे ते होत आहे. आशा आहे तुमच्या लक्षात येईल की, बाजारात बरेच चमत्कार दाखविणारे फोटो आले आहेत. त्या फोटोत माझ्या माथ्यावर परमचैतन्य दाखविले आहे. असे चैतन्य जर असेल तर प्रत्यक्षात तुम्हाला माझ्या डोक्यावर ते दिसायला हवे. हा प्रकाश तुम्हाला दिसत नाही. फक्त कॅमेऱ्यालाच दिसतो. तुमच्यासाठी तर मी महामाया आहे. कॅमेऱ्यासाठी बहुतेक नाही. कॅमेऱ्याच्या आत जे अणूरेणू आहेत ते मला ओळखतात.

तुम्हाला परमेश्वराने स्वातंत्र्य दिले आहे. या निर्जिव वस्तूंनाही तुमच्या स्वातंत्र्यात कुठल्याही प्रकारचे विघ्न येऊ नये म्हणून आम्ही महामाया स्वरुपात आहोत. आम्ही तुमच्यासारखेच आहोत आमचे सर्व वागणेही (व्यवहार) तुमच्यासारखेच सामान्य आहेत.

प. पू. श्री माताजी

सर्वसाधारण मी स्वतःबद्दल बोलत नाही. आपल्याबद्दल काहीही व्यावहारिक बोलणे योग्य नव्हे. उत्तम हे असेल की, तुम्ही मला ओळखा, जाणून घ्या आणि नंतर मी बोलेन. येशू ख्रिस्ताला सुळावर चढवले गेले. इतर सर्वांना त्रास दिला गेला. मला नाही वाटत माझ्या नियोजित कार्यात काही अडचणी याव्यात.

प. पू. श्री माताजी

एक कामगार बाई एकदा माझ्या कार्यक्रमाला आली आणि बेशुद्ध झाली. बेशुद्धिमध्ये ती संस्कृतमध्ये बोलू लागली. पंधरा श्लोकात तिने माझे संपूर्ण वर्णन केले. तिने प्रथम माझ्या विषयी सर्व काही सांगितले. या आधी मी स्वतःबद्दल काहीही सांगितले नव्हते. अशाप्रकारे हे सुरु झाले.

प. पू. श्री माताजी - दिल्ली - १५.०२.१९७७

तुम्ही मला ओळखणे ही सहजयोगाची चावी (किल्ली) आहे. तुम्ही जर मला ओळखू शकला नाही तर सहज योगात प्रगती करु शकणार नाही.

प. पू. श्री माताजी -३०.०९.१९८१

सहजयोगात माझा संबंध एक गुरु आणि माता असा आहे. एक गुरु म्हणून मला अशी काळजी वाटते की, तुम्हाला सहज योगाचे पूर्ण ज्ञान प्राप्त व्हावे. सहजयोगात अधिकारी होऊन स्वतःचे गुरु बना.

मी तुमची माता आहे. मातेची करुणा मला सांगते की, अजून खूप साऱ्या लोकांना सहजयोगी व्हायचे आहे. आम्हाला खूप मोठ्या स्तरावर मोक्ष द्यायचा आहे. सर्व सृष्टी, पूर्ण ब्रम्हांड आणि सर्व देवीदेवता तुम्हा साधकांसाठी आहेत. त्यांची नजर तुमच्यावर आहे.

मी पूर्ण प्रयत्न करते आहे. तुम्हाला आत्मसाक्षात्कार द्यावयाचा आहे. गहनतेने (मनापासून) साधना करणाऱ्यांना सत्याची प्राप्ती होईल. जरुर जरुर होईल.

प. पू. श्री माताजी

जेव्हा तुम्ही चेतना (सचेत) अवस्थेत असाल तेव्हा तुम्ही एकत्र चालाल. एकदम एका बरोबर एक हा एक मोठा (मानवी) समुद्र आहे आणि त्याच्या लाटाबरोबर चालताहेत. सर्वांचे आंदोलन एकाबरोबर चालणार आहे. यात लहान मोठे कोणी नाही. यात ज्येष्ठतेचाही प्रश्न नाही. हे मंथन आहे. मंथन चालू आहे. एक खाली एक वर मी बस मंथन करते आहे. खूप घुसळण होऊन येणारे लोणी कोण चोरणार आहे? हे घुसळण सातत्याने सुरु आहे. कधी गरम कधी गार. यातून लोणी वर येऊन तरंगायला लागेल. कारण ते हलके आहे. यात कोणी उच्च कोणी निच नाही. ज्याने उच्च नीच्चतेचा भेद केला त्याच्यासाठी मी एक महामाया बसलेलीच आहे. लक्षात ठेवा अशी कुंडलिनी पकडून खाली बघेन - कोण कोण मोठे आहे? मंथनात कोणाची कुठलीच जागा निश्चित नसते. हा हिशोब आहे. सहजयोगाचा प्रकार एकदम वेगळा आहे. नवीन अभिनव आहे. आजपर्यंत कोणी असे केले नाही. ना कधी असे मंथन झाले.

मुंबई- २०.०१.१९७५

***

## प्रकरण – ६

## आदिशक्तीच्या अवताराचे प्रयोजन व रहस्य

आदिशक्ती परमात्म्याच्या दैवी प्रेमाचा अवतार आहे. पवित्र प्रेम आणि करुणेची शक्ती आहे. तिच्या हृदयात फक्त पवित्र प्रेम आहे. पण ती अतिशय शक्तीशालीही आहे. हेच प्रेम तिने पृथ्वीमातेसही अर्पण केले आहे. पृथ्वी माता सुंदर वस्तूंच्या स्वरुपात आपले प्रेम व्यक्त करते. तारे व आकाशगंगेच्या माध्यमातून तिच्या सुंदरतेची प्रचिती (अभिव्यक्ती) होते. ब्रम्हांडातील प्रत्येक निर्मितीचे अस्तित्व टिकून आहे.

दैवी प्रेमापासून शरीराच्या अंगप्रत्यंगाची निर्मिती केली गेली. त्याचा कण न् कण दैवी प्रेमाचे वहन करतो.

माझ्या चैतन्यलहरी दैवी प्रेमाव्यतिरिक्त दुसरे काही नाही. तुमचे प्रेम माझ्या हृदयात या दैवी प्रेमाची चमक आणि सौंदर्याचा गुंजारव करतो. सर्वप्रथम माझ्या नेत्रात या अनुभवामुळे अश्रू उभे राहतात. कारण ही करुणा सांद्रकरुणा आहे. हा अनुभव कशामुळे येतो याचे वर्णन मी करु शकत नाही.

हे परमात्म्याचे प्रेम आहे. या पावन प्रेमातून परमात्म्याने आज्ञाधारक, महान व देवदूताप्रमाणे असणाऱ्या मानवी जगाची निर्मिती करण्याचे ठरविले. ॲडम आणि इव्ह च्या निर्मितीतही हा विचार प्रमुख होता. देवदूत स्वतंत्र नसतात. त्यांची निर्मितीच अशाप्रकारे होते. ते अबद्ध असतात, कार्याच्या कारणाची त्यांना कल्पना नसते. पशूंनाही एखादे काम करतात याचे कारण माहीत नसते. प्रकृती स्वभावानुसार त्यांचे काम चालू राहते. ते परमात्म्याच्या पाशात बद्ध असतात. स्वतंत्र नसतात. अशास्थितीत परमात्म्याचे प्रेम असणाऱ्या आदिशक्तीने मानवाची निर्मिती केली.

आदिशक्ती हे परमेश्वराचे पवित्र प्रेम आहे आणि तिने मानवाला निर्माण केले. ज्याने आपले सर्व प्रेम पणाला लावले त्या पित्याची कल्पना करा. (परमेश्वर तुमच्या इच्छेचा तमाशा पाहतो). तो ओळखतो की, आपण निर्माण केलेले

व्यक्तिमत्त्व पावन प्रेमाचे प्रतिक होय. त्याची करुणा इतकी श्रेष्ठ दर्जाची असते की, त्या करुणेस आव्हान किंवा अपमान करु शकत नाही. ते अतिशय चपळ आणि सावध आहेत. आता मात्र ते आणि त्यांच्या प्रेम शक्तीत दरी निर्माण झाली.या प्रेमात अहं आडवा आला. त्याला मनाप्रमाणे काम करायचे होते.

या सुंदर दरीमुळे आदिशक्तीने तिच्या योजनेत बदल करण्याचा निर्णय घेतला. परमेश्वर संकल्प - विकल्प - करण्यात प्रसिद्ध आहे. ॲडम आणि इव्हची निर्मिती केली तेव्हा देवदूत व पशूपक्षी प्रमाणे आचरण करतील अशी आदिशक्तीची अपेक्षा होती. ज्ञान समजण्यासाठी त्यांना स्वातंत्र्य हवे. पशुप्रमाणे त्यांचे जीवन बंदिस्त नको. सर्पिणीच्या रुपात येऊन आदिशक्तीने त्या फलरुपी ज्ञानाची चव घ्यायला सांगितले.

प.पू. श्री माताजी, कबेला - ०६.०६.१९९३

आदिशक्तीला ॲडम व इव्ह यांचा विकास व्हावा असे वाटत होते. ॲडम व इव्ह हे चमत्कार करु शकतील व माणसाला ज्ञान देऊ शकतील हे आदिशक्तीला माहीत होते. म्हणून तिने सांगितले की, या ज्ञानाच्या फळाची चव घ्या त्यांनी ते खाल्ले आणि नंतर 'मानव' या एका नव्या जातीचा जन्म झाला. जे ज्ञान समजू शकत होते.

प.पू. श्री माताजी, कबेला - २७.०९.१९९२

आदिशक्तीनेच आपल्याला आत्मसाक्षात्कार दिला. त्या शक्तीनेच सत्य, करुणा आणि प्रेम या शक्ती दिल्या. ही शक्ती सदाशिवापासून वेगळी झाली होती कारण ती ब्रम्हांडाचे सृजन करु इच्छित होती. ती निर्मिती करते आणि प्रेमही करील. आपल्या प्रेमाने तिने या महान विश्वाची निर्मिती केली. मानवाची निर्मिती हे महत्त्वाचे कार्य होय. तिची मुले सत्याचे ज्ञान प्राप्त करुन स्वतःला ओळखतील. इतर वस्तूंचेही ज्ञान प्राप्त करतील अशा आशेने व प्रेमाने तिने निर्माण केले.

प.पू. श्री माताजी, कबेला - ०३.०६.२००१

आदिशक्तीने सर्वप्रथम जगात मानव निर्मिती करण्यासाठी अनेक गोष्टी उत्क्रांती प्रक्रियेनुसार कार्यान्वित केल्या. त्यानंतर मानवाला सुख मार्गदर्शन मिळण्यासाठी कार्य केले. मानवाला मार्गदर्शन करण्यासाठी अनेक अवतार पृथ्वीतलावर जन्मले.

प.पू. श्री माताजी - ०२.०७.२०००

प्रत्येक वेळी शक्ती कार्य करते. कार्यान्वित होते. सर्वांना चालवते, एकत्र करते आणि प्रेम करते. ही अशी शक्ती आहे जी प्रेमाने कार्य करते. या शक्तीत साऱ्या शक्ती एकत्रित झाल्या आहेत.त्यात प्रकाश आहे. चुंबकीय शक्ती आहे. त्याच शक्तीची तीन अंगे आहेत. महालक्ष्मी, महासरस्वती, महाकाली या तीन शक्ती होत. तीच आम्हाला आजपर्यंत मार्गदर्शन करते.

प.पू. श्री माताजी, दिल्ली - ०३.०२.१९७८

पूर्ण ब्रम्हांडाची प्रथम निर्मिती झाली. त्यानंतर आदिशक्ती निर्माण झाली आणि उरलेल्या इच्छाशक्तीपासून कुंडलिनीची निर्मिती झाली. आमच्यामध्ये अशाच तीन महाशक्ती आणि उरलेल्या शक्ती जी इच्छाशक्ती आहे. ती तुमच्यात स्थित आहे. ती तुम्हाला पुनर्जन्म देणार आहे.

प. पू. श्री माताजी, यू. के. - १५.११.१९७९

सर्वप्रथम आदिशक्ती डाव्यबाजूस प्रकट होते. महाकालीच्या कार्यासाठी डाव्या बाजूला पवित्रता, अबोधितता व मांगल्य या गुणांसाठी गणेशाची निर्मिती केली. ब्रम्हांडाच्या निर्मितीच्या आधी हे होणे आवश्यक होते. सर्वप्रथम श्रीगणेशाची निर्मिती करुन कुंडलिनी स्थापित होते. त्यानंतर विराटाच्या भागात (शरीरात) प्रवेश करुन उजव्या बाजूस जाते. जेथे सर्व ब्रम्हांड भूवन यांची निर्मिती करते. अशी एकूण चौदा भवने आहेत आणि अनेक ब्रम्हांडे मिळून एक भूवन तयार होते. उजव्या बाजूस ती या सर्वाची निर्मिती करते. तेव्हा ती वर जाते पुन्हा खाली येते, सर्व चक्र इतर चक्रे, पीठांची निर्मिती करते. नंतर कुंडलिनी स्थापित होते. उरलेल्या, अवशिष्ट,

अर्थ हा की, ही सर्व यात्रा करुन आल्यावर ती शक्ती कुंडलिनी स्वरुपात स्थापित होते.

या कुंडलिनी व चक्रांमुळे एका क्षेत्राची (स्थानाची) रचना करते. त्याला आम्ही चक्र म्हणतो. सर्वप्रथम चक्रांचे स्थान (पीठ) याची निर्मिती करते आणि खाली येऊन इतर चक्रांची स्थापना करते. जे विराटाच्या रुपात (शरीरात) आहे. हे सर्व झाल्यानंतर विकास प्रक्रियेनुसार मानवाची निर्मिती केली जाते व अशाप्रकारे विकास घडतो. मानवाचा विकास पाण्यातील सूक्ष्म जीवांपासून सुरु झाला. आपल्या विकास प्रक्रियेमध्ये पृथ्विमातेला सर्वोत्तम स्थान आहे. तिथे आदिशक्ती सूक्ष्म जीवाला तयार करते.

प. पू. श्री माताजी, कबेला - २१.०६.१९९८

पृथ्वीमाता, पूर्ण वातावरण, पंचमहाभुते हे सर्व आदिशक्तीत एकवटले आहेत. या सर्वांची निर्मिती तिने सहजतेने केली आहे. जेव्हा मानवाच्या निर्मितीची वेळ आली तेव्हा त्याला स्वातंत्र्य मिळाले. मनुष्य प्राण्यात अहंकार आहे. तो विचार आचाराच्या भोवऱ्यात अडकला आहे. अहंकारात मायेने त्याच्यावर कार्य केले. विश्वनिर्मितीचे जे सिद्धांत होते ते विसरले गेले. मानवाने आपला अधिकार समजून, हे आपल्या श्रमाचे फळ आहे.

मानवाला जे स्वातंत्र्य मिळाले त्यामुळे पूर्ण विश्वात उलथापालथ झाली हे असे पृथ्वीवर अनेकदा झाले.

प. पू. श्री माताजी, कबेला - १९९६

आदिशक्तीने पर्यावरणातील घटकांची निर्मिती तुमच्यासाठी केली कारण त्यामुळे मानवी विकासास मदत व्हावी हा हेतू होता. आपल्याला आत्मसाक्षात्कार मिळावा, जीवनाचा अर्थ समजावा, सर्व व्यापक शक्तीशी जोडले जावे. परमात्म्याच्या साम्राज्यात प्रवेश व्हावा. हे सर्व कार्य देवीचे आहे. नऊ वेळा देवीने अवतार घेतला आणि दहाव्यांदा ती तुम्हाला आत्मसाक्षात्कार देण्यासाठी आली.

दहाव्या वेळेस तीन शक्ती एकत्रित आल्यामुळे तिला त्रिगुणात्मक म्हणतात. यामुळे बुद्धाने तिला मात्रेया म्हटले आहे. अर्थात तीन माता.

ही शक्ती जेव्हा कार्य करु लागते तेव्हा तिन्ही मार्ग (नाड्या) आणि सात चक्र आदिशक्तीच्या प्रभावाखाली येतात (वश होतात). आदिशक्तीचे नाव घेतल्याशिवाय तुम्ही काहीच मिळवू शकत नाही.

प. पू. श्री माताजी, कबेला - २७.०९.१९९२

आदिशक्तीपासून महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती या ती शक्तींची निर्मिती झाली. त्या तिन्ही शक्ती आदिशक्तीत समाविष्ट आहेत. आदिशक्तीशिवाय हे कार्य होऊ शकत नाही. कारण सर्व चक्रांवर त्यांचा प्रभाव आहे आणि प्रत्येक वेळेला चक्रांना परस्पर संबंध सांभाळते. याला त्रयसंयोग (त्रीसंयोग) म्हणतात. आपल्याला सिंहासनावर बसून या शक्तीचा आनंद घेत आहात हे आदिशक्तीला बघायचे आहे. म्हणून हे कार्य अत्यंत दक्षतेने केले गेले आहे.

प. पू. श्री माताजी, ०९.०४.१९९०

माझा उद्देश :

सहजयोगाचेज्ञान मला सुरवातीपासून होते. या अद्वितीय ज्ञानाबरोबरच माझा जन्म झाला. परंतु हे ज्ञान प्रकट करणे सोपे काम नव्हते. त्यामुळे त्याच्या प्रगटीकरणाची पद्धत मी शोधू इच्छित होते.

सर्वप्रथम मी विचार केला की, सातवे चक्र (सहस्त्रार) उघडणे आवश्यक आहे आणि ५ मे १९७० ला मी हे चक्र उघडले. ते एक रहस्यच आहे. प्रथम ब्रम्हचैतन्य समजत नव्हते (व्यक्त नव्हते) त्याची अभिव्यक्ती झाली नव्हती. ब्रम्हचैतन्य ही संकल्पना अस्पस्ष्ट होती. जे लोक आत्मसाक्षात्कार मिळवून ब्रम्हचैतन्यापर्यंत जात होते ते म्हणत होते की, हे निराकार आहे. व्यक्ती एका थेंबासारखी आहे जी सागरात मिसळून जाते. या व्यतिरिक्त वर्णन करु शकत नव्हते, सांगता येत नव्हते. ब्रम्हचैतन्यरुपी सागरात जे अवतार झाले त्यांनी ही आपल्या थोड्या फार शिष्यांना ही माहिती देण्याचा प्रयत्न केला. परंतु ब्रम्हचैतन्य दृष्य स्वरुपात नसल्यामुळे ते अवतार यात विलीन झाले. श्री ज्ञानेश्वरांनी जेव्हा समाधी घेतली, ते ही या गोष्टी सांगू शकत नव्हते. याचा अनुभव घ्या असे ते म्हणत होते. फार कमी लोक हे प्राप्त करु शकले.

कोणीही आपल्या हाताच्या बोटांवर आपले मस्तक, आपल्या नाड्या या वरील आत्मसाक्षात्काराचा अनुभव घेऊन किंवा बुद्धीने समजून आपल्याला आलेल्या अनुभवांची जाणीव देऊ शकले नाही, अनुभवाचे विश्लेषण करुन इतरांना सांगता आले नाही. ही फार मोठी समस्या अथवा अडचण होती. सर्वांनी यासाठी पार्श्वभूमी निर्माण केली होती.

आता ब्रम्हचैतन्याच्या विराट रुपाने मी अवतार घेतला आहे. निराकार सागराचा एक मोठा ढग (साकार) तयार झाला आहे.

यापूर्वी जे अवतार जन्माला आले ते याचेच अंगप्रत्यंग होते. आता मात्र पूर्ण अवतार झाला. आता खूप गोष्टी प्रकट झाल्या आहेत. त्यात पाणी आहे.

पावसाचे पाणी लोकांच्या मस्तकावर पडून त्यांचा विकास करीत आहे. हळूहळू ते या स्तरापर्यंत आले. कुंडलिनी जागृत झाली. मग आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला. त्यांना नसा व नाड्यांवर आपल्या सर्व समस्यांची जाणीव होते.

याच कारणाने आजपर्यंत चैतन्यलहरींच्या स्वरुपाविषयी स्पष्ट स्वरुपात सांगितले नव्हते. त्यांनी चैतन्य लहरींबद्दल सांगितले परंतु ती गोष्ट अव्यक्त स्वरुपातच होती. ती फक्त एक आनंदाची अवस्था होती. मात्र ती सूक्ष्म स्वरुपात होती. त्या वेळी त्या अवस्थेत ते राग, लोभ यापासून मुक्त झाले. आमच्यासमोर याचे उदाहरण, दाखले आहेत. ते हे कसे करु शकले? ब्रम्हचैतन्य काय आहे? केवळ उपमा व नितीकथांच्या माध्यमातून त्यांनी त्या विषयाबद्दल सांगितले.

मी हेच प्राप्त केले. हे प्रत्यक्ष रुप आहे. मी सागरातून ब्रम्हचैतन्याचे साकार रुप घेऊन आले आता मी तुम्हाला यात विलीन होण्याची परवानगी देत नाही. त्याला मी एका मोठ्या घड्यात स्थापित केले. तुम्ही म्हणजे छोटे घडे. दुसऱ्या शब्दात तुम्हाला सूक्ष्म रुपात धारण करते आणि तिथे तुमची देखभाल करते. पालन पोषण करते; बाधा शुद्ध करुन तुम्हाला कार्यान्वित करते. मी महामाया आहे. मला क्षणोक्षणी योग्य वेळी, योग्य परिस्थितीला काम करावे लागते.

जेव्हा सातवे चक्र खोलले गेले तेव्हा सर्व चक्रे तुमच्या सहस्त्रारात आली. मी सर्व चक्रे आणि सर्व देवदेवतांचे संचालन करु शकले. कोणत्याही देवाच्या स्वरुपात माझी प्रार्थना केल्यास तुम्हाला चैतन्यलहरी येऊ लागतात. त्यामुळे मी ब्रम्हचैतन्य आहे हे प्रमाणित होते.

ब्रम्हचैतन्य म्हणजेच आदिशक्ती. पूर्वीच्या सर्व अवतारांचा माझ्यात समावेश आहे. सदाशिव (श्री शंकर) माझ्या हृदयात विराजमान आहेत. परंतु मी पूर्ण मानवी स्वरुपात असल्याने माझ्यातील सदाशिव शोधणे (अवघड आहे) सोपे नाही.

आतापर्यंत कोणीही अन्य लोकांना आत्मसाक्षात्कार देऊ शकला नाही. कदाचित एक दोघांनी इतरांना आत्मसाक्षात्कार दिला असावा. बहुतांशींना तपश्चर्येमुळे आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला आहे. उदाहरणार्थ, भगवान बुद्धाला

तपश्चर्येनंतरच आत्मज्ञान प्राप्त झाले. त्यांनी प्रार्थना केली म्हणून ब्रम्हचैतन्याने त्यांच्यात प्रवेश केला. त्यासाठी त्यांनी शुद्ध इच्छा केली. नंतर ब्रम्हचैतन्याने भगवान बुद्धांचे शुद्धीकरण केले. ब्रम्हचैतन्य प्राप्त झाल्यानंतर ते बुद्धपदास प्राप्त झाले. मात्र त्यानंतर भगवान बुद्धांनी त्याविषयी कोणतीही चर्चा केली नाही. (आत्मसाक्षात्काराचे रहस्य उघड केले नाही). आता मात्र हा साक्षात्कार सामुदायिक स्वरुपात प्राप्त होत आहे. सामूहिक साक्षात्कारासाठी आता योग्य परिस्थिती निर्माण झाली आहे.

त्या काळात ही अवस्था समजणारा आणि प्राप्त करणारा कोणी नव्हता. ज्यांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला ते त्यातच मिसळून गेले. विलीन झाले. त्यामुळे सर्व अनुभव व्यक्तिगत राहिले. सामुदायिक होऊ शकले नाही. ती परिस्थिती आता समाप्त झाली आहे. आत्मसाक्षात्कार सामूहिक झाला आहे.

एका बिंदूवर येऊन सर्व वस्तूंना सामुहिक व्हावे लागते. या अवस्थेपर्यंत पोहोचण्यासाठीही परीक्षा द्याव्या लागल्या. सरतेशेवटी येशूख्रिस्ताने आपले बलिदान दिले. याचप्रकारे महम्मद पैगंबर साहेब, गुरुनानकजी, संत तुकारामांनाही परीक्षा द्याव्या लागल्या. वैकुंठातून आलेल्या या संताशी लोकांनी कोणत्याप्रकारे वर्तन केले हे तुम्हाला माहीत आहे. तेव्हाही या गोष्टी कार्यान्वित होऊ शकल्या नाहीत.

वैकुंठाच्या पुढील सर्व बाबी मी जाणते. मात्र अजूनपर्यंत मी त्याबद्दल वाच्यता केली नाही. हळूहळू मी हे सर्व प्रकट करीन. कारण अजून लोक हे आत्मसात करण्यास तयार नाहीत. जी खिचडी अजून शिजली नाही ती शिजवण्यासारखे हे आहे. त्यामुळे खिचडी तयार होऊ द्या. तुम्ही सर्वजण त्या खिचडीच्या घड्यात आहात. जे लोक तयार होत आहेत. त्यांची गुणवत्ता पैगंबराच्या मोजक्या शिष्यांच्या गुणवत्तेबरोबर आहे. आता इथे तुम्ही सर्वजण हळूहळू प्रगत व्हाल. जे लोक या दिव्य वल्लभाचार्यांच्या (रसोईया) हांडीत येतील ते तयार होतील. जे या हांडीच्या बाहेर राहतील ते बाहेरच राहतील.

ही सर्व काळाच्या पलीकडची गोष्ट आहे. प्रत्येक व्यक्तीत काही गोष्टी प्राप्त करण्याची स्वत:ची एक पात्रता, योग्यता असते. वेळेचे बंधन ही मानव निर्मित बाब आहे. खरेतर शरीराला काही बंधन नाही. सवयीमुळे माणसाने वेळेची निर्मिती केली. सवयींबरोबरच काळ आणि वेळ यांची बंधने आली. आपल्याला जर सवय नसेल तर वेळेचे बंधन राहत नाही. सहजयोग स्वीकारल्यानंतर काही बंधनातून आपली मुक्ती होते. त्यालाही वेळ लागतो. सवयीतून मुक्ती हवी असल्यास सवयींना महत्त्व देऊ नका. महत्त्व दिल्यामुळे सवयी तशाच राहतात. एका आयुष्यात तुम्ही आत्मसाक्षात्कार करु इच्छित असाल ते शक्य आहे. मात्र हे कार्य या आयुष्यात अपूर्ण राहिले असेल तर ते कार्य पूर्ण करण्यासाठी तुम्हाला पुन्हा जन्म घ्यावा लागेल. सहजयोग काही काळ याप्रकारे कार्य करील. हा अंतिम निर्णय आहे.

सदैव मध्यात रहा. सहजयोगातील तुमच्या प्रगतीची काळजी करु नका. सहजयोग ती करील. जेव्हा तुम्ही मध्यात असता तेव्हा तुमची उन्नती आपोआप होते. मी त्यासाठी मदत करते. दररोज आपण डावी उजवीकडे होत राहतो. आपल्या सवयीमुळे आपण डावीकडे जातो तर अपेक्षा, इच्छांमुळे उजवीकडे जातो.

मला तुमच्या हृदयात स्थानापन्न करणे ही एक अनुभूती (अनुभव) आहे. ज्याप्रकारे आपल्यात सवयी विकसित होतात त्याच सहजतेने मला तुमच्यात स्थापित करण्याचा प्रयत्न करा. एकदा मला तुम्ही तुमच्यात सामावून घेतले की, तुमच्या पूर्ण शरीरात ते आपल्या शरीराचा ताबा घेते. ते शाश्वत स्वरुपात राहते. अंत:करणाच्या शुद्धीसाठी तुम्ही मला तुमच्या हृदयात किती खोलवर स्थापित करता त्यावर तुमची प्रगती अवलंबून असते.

आता हा प्रश्न निर्माण होतो की, तुम्ही मला तुमच्या हृदयात कसे स्थापित कराल? चित्तावर अंकुश ठेवला तर चित्त स्थिर होते. सतत चित्तनिरोध केले पाहिजे. चित्त आत ठेवा. त्याचबरोबर तुम्हाला सामूहिक व्हायला हवे. नाहीतर व्यक्तिगत रुपात तुम्ही निराकारात हरवून जाल आणि माझे दर्शनही घेऊ शकणार नाही. कारण तुम्ही अशा अवस्थेत असाल तर त्या सागरात विलीन होऊन जाल. सागरातून

विकसित होणे किंवा त्यांच्यात सामावून जाणे ही काही फार मोठी गोष्ट नाही. सागरातून वाफ होऊन ढग होणे आणि सर्वांवर जलाचा वर्षाव करणे हे अद्वितीय कार्य आहे. माझा हाच उद्देश आहे आणि हा महामायेचा खेळ आहे.

डॉ. तलवारांबरोबर चर्चा - २६, २७ फेब्रु. १९८७

सहजयोगींना मी विचार न करता शरीरात धारण केले. त्यामुळे मला कष्ट होतात (कष्ट घ्यावे लागतात). जेव्हा माझे लक्ष तुमच्याकडे असते तेव्हा तुमच्या सर्व समस्या माझ्यात खेचून घेते. तुमच्या अडचणी दूर करण्यासाठी कष्ट घेते. परंतु हे कधी घडते? मी जेव्हा तसा विचार करते. इच्छा करते तेव्हा हे घडते.

सहजयोगी बॅरोमिटरप्रमाणे आहेत. त्यांना माझ्याप्रमाणे त्रास होत नाही. काहीवेळा थोडा फार त्रास होऊ शकतो. कारण काही नकारात्मकता त्यांच्यात येते. ती विशाल सागरात निघून जाते (सामुदायिकतेत ती विलीन होते).

तुमचा विवेक आणि जिज्ञासा तुम्हाला घेऊन आले आहेत. सामूहिक कार्य क्रम हे सामूहिक जागृतीसाठी असतात. त्यात मला तुमची कुंडलिनी जागृत करावयाची असते. मी माझ्या कुंडलिनीत तुमच्या सर्व समस्या खेचून घेते. हे फार कष्टप्रद असते. यामुळेच पूजेनंतर मी थकून जाते. मी तुम्हा सर्वांना माझ्या शरीरात धारण करते. तुम्ही सर्व माझे अंगप्रत्यंग आहात.

तुमच्या उत्थानासाठी माझी पेशी न् पेशी कार्यरत आहे. हे समजण्यासाठी तुम्हाला सूक्ष्म व्हावे लागेल.

प. पू. श्री माताजी, कबेला - ०६.०६.१९९३

हा अवतार पृथ्वीवर स्वयं फक्त तुमचे रक्षण, पोषण किंवा राक्षसांना नष्ट करण्यासाठी झालेला नाही. तुमच्यात असलेली सूक्ष्मता, तुमच्या अंतर्गत व बाह्य संबंधाबाबत तुम्हाला सांगण्यासाठी तीने पृथ्वीवर अवतार घेतला आहे. तुम्ही कधीच त्या सर्व शक्तीमान सत्य, परमात्म्याच्या शक्तीशी जोडलेले नव्हते. ही किती मोठी महत्त्वाची घटना घडली. माझ्याकडून कुंडलिनी जागृत होऊन सर्व चक्रांना स्पर्श

करते हे कधीच घडले नव्हते. ते घटित झाले व साधकांचे रक्षण आणि देखभाल झाली.

प. पू. श्री माताजी, कबेला - २४.१०.१९९३

मीच आदिशक्ती आहे (होली घोस्ट). नि:संदेह मीच आदिशक्ती आहे. ती शक्ती जिच्या संबंधी येशू ख्रिस्ताने म्हटले होते. मी घोषणा करते की, मीच आदिशक्ती आहे. मीच तो पावन आत्मा आहे. जो तुम्हाला आत्मसाक्षात्कार देण्यासाठी अवतरित झाला आहे.

प.पू. श्री माताजी, न्यूयॉर्क - ३०.०९.१९८१

ॐ - सर्व देवीदेवता देवीजवळ गेले आणि नम्रपणे विचारले
'हे महादेवी! आपण कोण आहात? ।।१।।
ती म्हणाली - मी ब्रम्हस्वरुप आहे. माझ्यामुळे प्रकृती आणि पुरुष
निर्माण झाले, जग निर्माण झाले. काही वेळा ते दृष्य
स्वरुपात आहेत काही वेळा नाही. ।।२।।
मी आनंद आणि आनंदस्वरुप आहे.
ब्रम्ह आणि अब्रम्ह ही मीच आहे.
पंचमहाभूते व पंचमहाभूताव्यतिरिक्त मीच आहे.
वेद आणि अवेद (वेदाव्यतिरिक्त), विद्या, अविद्या, मीच आहे ।।३।।
अजा व अनजा (प्रकृती व त्यापेक्षा भिन्न) मी आहे.
खालीवर आजूबाजूला मीच आहे. ।।४।।

श्रीदेवी अथर्वशीर्ष

***

# प्रकरण – ७

## मानवाचा विकासक्रम व कलियुगातील उत्क्रांती (विकास)

तुम्ही सृष्टीची एक सुंदर रचना (निर्मिती) आहात. खूप कष्ट घेऊन नाजूकपणे, अत्यंत प्रेमाने परमात्म्याने तुम्हाला घडविले आहे. तुम्ही एका विशेष अनंत योनीतून येऊन मानव योनीत स्थिर झालात.

कार्बनपासून अमिबा अवस्थेपर्यंत, अमिबा ते पशु अवस्थेपर्यंत, पशु ते मानवी अवस्थेपर्यंत कार्बन - अमिबा - मासा - सरपटणारे प्राणी - सस्तन प्राणी - वानर - मानव यानुसार

प. पू. श्री माताजी, मुंबई- २२.०३.१९७९

चौदा हजार वर्षांपासून असे म्हटले जाते की, आम्ही मानव आहोत. पूर्ण स्वातंत्र्याने आम्ही आतून पूर्ण विकसित होत आहोत. मनुष्य एक असा जीव आहे, ज्याला स्वत:चा विकास करण्याचे स्वातंत्र्य आहे. या विकासात तो भल्या बुऱ्याचा भेद समजू शकतो. हे स्वातंत्र्य दिले गेले कारण स्वातंत्र्याशिवाय आपण पुढे जाऊ शकत नाही.


आता तुम्ही विकासाच्या विशेष अवस्थेत आहात. या अवस्थेत शोधाचे स्वातंत्र्य तुम्हाला मिळाले आहे. अशाप्रकारे आपला विकास होतो आहे.

माणसाला समजून घेणे त्याच्यातील कौशल्ये विकसित करणे, सृष्टीचा निर्माता आणि त्याची शक्ती प्राप्त करण्याचे स्वातंत्र्य दिले गेले आहे. या कारणांमुळेच मानवात कुंडलिनीशक्ती स्थापित केली आहे. जरी कुंडलिनी शक्ती आणि कुंडलिनी सर्व जीवजंतूमध्ये आहे. परंतू केवळ मनुष्यामध्येच या शक्तिला

त्रिकोणाकार अस्थिमध्ये ठेवले आहे. कारण अज्ञात क्षेत्रात त्याच्या उत्क्रांतीला ही अंतिम उर्जा (शक्ती) देऊ शकेल. ही कुंडलिनी आहे, तिचे अस्तित्व आहे.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - फेब्रुवारी १९७९

मानवाचा विकासक्रम




## पराआधुनिक युग

संयोगाच्या नियमाप्रमाणे माणसाचा विकास फार कमी वेळात झाला. मानवी स्तराची विकासाची तुलना अंतरिक्षयान (स्फोटिका - कॅप्सुल) बरोबर केली जाते. त्यात अनेक यंत्रे असतात, (कॅप्सूल) मध्ये अनेक स्तर असतात. अंतरिक्षात जेव्हा ते सोडतात, तेव्हा त्यात ठेवलेल्या सर्व यंत्रसामग्रीसह ते अंतराळात वेगाने जाते. आगीच्या प्रचंड दाबाने बाह्य भागात स्फोट होतो. जळलेला भाग खाली टाकून स्फोटापासून उर्जा घेऊन यान अंतराळात तीव्र गतीने जाते.

याच प्रमाणे मानवी शरीराचा विकास झाला. तो खालीलप्रमाणे :

(१) शारीरिक अवस्था

(२) मानसिक अवस्था

(३) भावनात्मक अवस्था

(४) मानवीय अवस्था

(५) आधुनिक युगात त्यात प्रस्फोट होऊन त्याच्यात आध्यात्मिक जिज्ञासा सुरु झाली. सर्व प्रगती मध्यनाडी तंत्रावर होते आणि आमच्या चेतनेचा विकास करते.

(६) आत्मतत्त्व सहावी प्राप्ती (उपलब्धी) सहजयोगाच्या माध्यमातून प्राप्त केली जाते. ज्यात आत्मप्रकाश प्राप्त कुंडलिनीच्या माध्यमातून आपण आत्मज्ञान प्राप्त करु शकतो.

(७) परमेश्वरी ज्ञानाकडे आपली यात्रा आरंभ होते. आत्मज्ञानाशिवाय व्यक्ती परमेश्वराला अनुभूत ज्ञानाच्या रुपात समजू शकत नाही.... आपल्या धर्मग्रंथांमध्ये असे वर्णन आहे की, मानवाला एका अशा साम्राज्यापर्यंत उन्नत व्हायचे आहे जिथे तो आपल्या चेतनेची चतुर्थअवस्था (तुर्याअवस्था) प्राप्त करुन घेईल.... तुर्यावस्था संपूर्ण चेतनेची अवस्था आहे.... खरेतर आपण तीन अवस्थांमध्ये जीवंत आहोत. संतांनी चौथी अवस्था प्राप्त केली आणि या उत्क्रांतीच्या अवस्थेमध्ये ते संपूर्ण शांती, संपूर्ण सामंजस्य आणि वास्तविकतेची पूर्ण चेतना अवस्था प्राप्त करतात.

ज्या तीन अवस्थांमध्ये पातळ्यांवर आपण जीवीत आहोत.... शारिरिक, मानसिक आणि भावनिक. चतुर्थ अवस्था आध्यात्मिकता आहे. पहिल्या तीन अवस्थांचे गहनापूर्वक उपयोग केल्यानंतर आम्हाला आपल्या जीवनातील निरसता (सारहीनता) लक्षात येते. त्यानंतर संपूर्ण सत्याचा शोध सुरु होतो. कारण आम्ही असंतुष्ट होतो की, जे ज्ञान आम्ही मिळविले आहे ते तर मानसिक शांतीसुद्धा मिळवून देत नाही.

पराआधुनिक युग

संपूर्ण ब्रम्हांडाची निर्मिती केली गेली, सर्व वातावरण निर्मिती झाली. प्रगती झाली. कशासाठी? मानवाने सत्य शोधावे, ओळखावे म्हणून.

प. पू. श्री माताजी - २४.१०.१९९३

आपला जन्म केवळ मानव होण्यासाठी नाही. परंतु महामानव होण्यासाठी झाला आहे. आपल्याला आनंद मिळवावा लागेल. आपले जीवन आनंदमय करण्यासाठी योग्य हवे. (आनंदाचा उपभोग घ्यावा) आपण सकाळपासून संध्याकाळपर्यंत वेगवेगळ्या विषयांची काळजी, चिंता करा किंवा रक्षणाची काळजी करा, भांडणे करा यासाठी परमेश्वराने ही सृष्टी निर्माण केली नाही. तर तुम्ही पूर्ण एक होऊन आनंदात जीवन व्यतित करावे यासाठी परमेश्वराने सृष्टीची निर्मिती केली. यासाठीच तुम्हाला निर्माण केले व ध्येयही तेच आहे. हीच वास्तविकता आहे म्हणून तुम्हाला हे सांगते.

प. पू. श्री माताजी, लंडन - १४.०७.२००१

मी म्हणते की, हे परमात्म्याचे दिव्य प्रेम आहे. परमेश्वर कृपा आहे की मानवयोनीत जन्म झाला व त्याच्या कृपेने आपण श्रेष्ठ मानव म्हणून जगू.

प. पू. श्री माताजी - २२.०३.१९८१

माणसाला परमेश्वराने स्वातंत्र्य दिले आहे. आपण वेगळे आहोत. स्वत: शिका - स्वत: शिकल्याने तुम्हाला समजेल की, आपण परमेश्वराचे एक अंग (घटक) आहात. हा घटक तो जागृत झाल्यावर संपूर्णाशी एकाकार होईल. तेव्हाच त्याला पूर्णत्व प्राप्त होईल.

प. पू. श्री माताजी - ०८.०९.१९७९

आपण मनुष्य स्थितीत (मनुष्य जन्मात) आलो आहोत तर आपल्याला त्याचा अर्थ जाणून घ्यावा लागेल. जन्मभर त्याच त्या (रुढीवादी) बोलबोलण्यात काही अर्थ नाही. जसजसे लोक परमेश्वराकडे तत्वत: पाठ फिरवीत आहेत, त्यापासून दूर जात आहेत ते केवळ परमेश्वराच्या नावाला चिकटले आहेत. सकाळी उठून देवाजवळ दिवा लावला, घंटीवाजवली की झाले काम पूर्ण. अशाप्रकारच्या निरर्थक गोष्टींनी परमेश्वर कदापी प्रसन्न होणार नाही. परमेश्वर तुमच्यात आहे. त्याला जागृत करावे लागेल.

प.पू. श्री माताजी - २२.०९.१९७९

आपले मस्तक (मेंदू) सीमित आहे. हा अत्यंत मर्यादित मार्ग आहे. तुमच्या या मेंदूमुळे तुम्ही काही करु शकत नाही. तुम्हाला त्याच्यापुढे जावे लागेल. एखादी व्यक्ती अशी हवी जी तुम्हाला अंतरिक्षात ढकलेल. तुम्हाला तिथे जायचे आहे. तुम्हाला आत्मा व्हायचे आहे. फक्त आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला तरच परमात्म्याशी तुमच्या तारा जुळतील. (संबंध जुळेल). या आधी तुम्ही परमात्म्याशी जोडलेले नसता. म्हणून तुम्हाला आत्मा व्हावे लागेल. कारण आत्मा म्हणजे हा योग होय. परमात्म्याशी जोडणारी तार. याशिवाय परमात्म्याशी जोडणारा दुसरा मार्ग नाही. तुम्ही तुम्हाला भ्रमात ठेवू इच्छित असाल तर ठीक, पण मी हेच सांगेन की, केवळ हेच सत्य आहे.

प.पू. श्री माताजी, न्यूयॉर्क - ३०.०९.१९८१

सत्याला जाणणे म्हणजे सर्व गोष्टीचे सार तत्त्व होय. माणसाचे सार, तत्त्व काय आहे? मानवाचे सार आणि तत्त्व त्याचा आत्मा होय.

प. पू. श्री माताजी - १०.०२.१९८५

तुमच्या जीवनाचे लक्ष्य आत्मा प्राप्त करणे होय.

आत्म्याच्या प्राप्तीनंतर बाकी सर्व गोष्टी संपतात. आपोआप इतर सर्व गोष्टी घडत राहतात.

आत्म्याच्या प्राप्तीनंतर पूर्ण ज्ञान प्राप्त होते. आत्म्याला समजून घेतल्याशिवाय पूर्ण सत्य पूर्णपणे समजू शकत नाही.

'सहजयोग' मधून

परमात्मा म्हणजे पूर्ण सत्य

जर आपण पूर्ण स्वरुपात संतुलनात असलो तर आम्ही हे जाणतो की, प्रत्येक गोष्टीसाठी एकच सत्य आहे. तेव्हा कोणताही तर्क नसेल किंवा वादविवाद नसेल. प्रत्येक व्यक्ती या सत्याचा आनंद घेईल कारण ते पूर्ण आहे.

सत्य व आनंद हे दोन्ही एकच आहेत. जसे चंद्र आणि चंद्रिका (किरणे) किंवा सूर्याचा त्याचा स्वतःचा प्रकाश. तसेच सत्य आणि आनंद दोन्हीही एकत्र आहेत. जेव्हा तुम्ही सत्याशी परिचित होता (परमात्म्याला भेटता) तेव्हा आत्मविभोर होऊन जाता.

प.पू. श्री माताजी, दीपावली पूजा - ०९.०३.१९७९

(आज) परमात्म्याच्या नावावर जे काही करतात ते हृदय हादरवून टाकणारे आहे. या कलियुगात माणसाने सारा विवेक गमावला आहे (माणूस विवेकहीन झाला आहे). माणूस अतिशय व्यक्तिनिष्ठ झाला आहे. त्याचे स्वतःवर नियंत्रण राहिले नाही. लोक गुलाम झाले आहेत आणि विचार करतात की, आपण स्वतंत्र्य आहोत. आपण स्वातंत्र्यामुळे हवे ते करु शकतो. या स्वातंत्र्याच्या दुरुपयोगामुळे ते इतके किळसवाणे झाले आहेत, अशी दुष्कर्मे करतात की, त्यावर विश्वास बसत नाही. कलियुगाबद्दल असे म्हटले आहे की, हे भ्रमाचे युग आहे. या भ्रमात तुम्ही अडकलात तर नष्ट व्हाल पण भ्रमाला ओळखले तर सत्य शोधाल. यामुळे आज जिज्ञासा खूप वाढली आहे. कारण लोक भ्रमाला ओळखतात. त्यांना माहीत आहे की, हे सत्य नव्हे. जेव्हा ते भ्रमाची असत्यता ओळखतात तेव्हा ते सत्याचा शोध घेऊ लागतात. याप्रमाणे कलियुगात सत्याचा शोध सुरु झाला आहे.

प.पू. श्री माताजी, डेल्फी - ०७.११.१९९९

कलियुगातच हे होणार आहे. कलियुग जोपर्यंत पूर्णपणे परिपक्व झाले नव्हते माणसत्याला जिथे पोहोचायचे होते तिथे पूर्णपणे संतुलनात पोहोचू शकत नाही. परमेश्वराची कृती माणूस पूर्णपणे तयार झाला नाही तोपर्यंत हे कार्य (आत्मसाक्षात्कार) होणार नव्हते. कलियुगातच, जे अत्यंत बिकट आणि दुःखदायक आहे, अत्यंत भीषण आणि भयंकर दिसत आहे. याच कलियुगाच्या आगीत तापून तुम्ही ते बनणार आहात जे तुम्ही व्हायला हवे.

प.पू. श्री माताजी - २६.१२.१९७६

मनुष्य ज्याचा विचार करतो आपल्या मनाने, तो मनाच्या दरम्यान शोध घेतो, मनाच्या पलिकडची (परमेश्वराची) जी बाब आहे ती या मनाने समजणारी नाही. आता एका वेगळ्या मानवाच्या आगमनाची गरज आहे. तो मानव मनापेक्षाही वरच्या अशा शक्तीला समजून घेईल. मन व हृदयाची स्पंदने जाणणाऱ्या मानवाची आता गरज आहे.

प. पू. श्री माताजी - ०१.०६.१९७२

मी हात जोडून विनंती करते की, तुमच्या जीवनाविषयी एकप्रकारे मान्यता मिळविण्याचा विचार होणे गरजेचे आहे. मी अनेक योनीत जन्म घेऊन आता मनुष्याच्या जन्मात आलो आहे आणि मला आत्मा व्हायचे आहे. त्या आत्म्याच्या प्रकाशात मला चालायचे आहे (मार्गक्रमण करायचे आहे). त्यामुळे परमेश्वराच्या सान्निध्यात मी अनंतकाळ आणि अनेक जीवने उपभोगू शकेन त्याचा आनंद उपभोगीन.

प.पू. श्री माताजी - १५.०१.१९८४

सर्व व्यापक शक्ती अत्यंत क्रियाशील झाली आहे. त्यामुळे कलियुग ब्रम्हचैतन्य युगात रुपांतरित होत आहे. हे सामूहिक ज्ञान, बोध प्राप्ती, आत्मसाक्षात्कारात मदत करीत आहेत. सतत या सर्वशक्तिमान शक्तीच्या सान्निध्यात राहून, आपला साक्षात्कार प्राप्त करुन, त्याला कायम स्वरुपात आणून आपण ब्रम्हचैतन्याच्या कार्यापासून लाभ उठवायला हवा.

## सहजयोग

श्री आदिशक्तीने विश्वाची निर्मिती केली. आपल्या चहुबाजूस तुम्ही जे बघता त्याची निर्मिती तिनेच केली आहे. दोन प्रकारची विश्वे निर्माण केली. एक दैवी होते तर दुसऱ्या विश्वाच्या विकासास सुरुवात झाली होती. ते बघणे हे मोठे कार्य होते. अशाप्रकारचे कार्य करण्यासाठी करोडो वर्षे लागली.

प.पू. श्री माताजी, कबेला - २६.०६.१९९४

आता बघा पृथ्वी कशी तयार झाली? भगवती मातेने पृथ्वीची निर्मिती कशी केली? प्रथम भगवतीने सूर्यापासून त्याचा काही भाग काढला. त्यानंतर त्या तप्त हिश्याला खूप दूर घेऊन गेली. त्यामुळे तो भाग थंड झाला. बर्फासारखा. नंतर हळूहळू त्या गोळ्याला सूर्याजवळ घेऊन गेली. त्यामुळे हळूहळू बर्फ वितळू लागले. त्यातून पाण्याचे प्रवाह सुरु झाले. त्यानंतर पुन्हा त्या गोळ्याला सूर्यापासून दूर घेऊन गेली. पुन्हा सूर्याजवळ घेऊन आली आणि असे वातावरण निर्माण केले की, पृथ्वीवर जीवजंतू जन्मले. (जीवधारणा होऊ शकली).

प. पू. श्री माताजी, दिल्ली - ०३.०२.१९७८

समुद्रातच प्रथम जीवधारणा झाली. जीव जन्माला आले. आपण आधी एकपेशीय अमिबा होतो. अगदी पहिल्यांदा आपण सर्वजण पाण्यातल्या मासोळ्याच होतो. त्यानंतर काही मासे पाण्याबाहेर गेले. त्या माशांना प्रथम आणणारा मत्स्यअवतार जन्माला आला.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - १७.०२.१९८१

सुरुवातीला एकच मासोळी पाण्याबाहेर आली. नंतर आठ, दहा नंतर कदाचित हजारो बाहेर आल्या असतील. त्यानंतर कित्येक मासोळ्या समुद्राबाहेर येऊन आज मानवी रुपात आल्या आहेत. अशाप्रकारे तुम्ही हजारो वर्षे तपश्चर्या केली आहे. परमात्म्याकडून योगाचे वरदान दिले. मेहनत केली आणि आज सर्व सामान्य माणूस जगात आला आहे. आज त्याला (परमात्मा) मिळविण्याची तुमची जी इच्छा आहे, हक्क आहे, ती तुमची इच्छा पूर्ण होईल.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - १६.०२.१९८५

## रहस्यमय मानवी शरीर

अमिबापासून प्रगती करीत आपण मनुष्य रुपात जन्माला आलो आहोत. मानवाचे दहा धर्म आहेत. ते धर्म आमच्या अंतर्गत असतात. या धर्मांमुळेच आमचे मूल्यमापन होते. उत्क्रांती झाली आहे. आपण अमिबा होतो. धर्म आमच्यात होते. ते

बदलत गेले. जेव्हा माणसाच्या धर्मात आपण आलो ते मनुष्य म्हणून ओळखले जाऊ लागलो. मनुष्याचा धर्म जनावराच्या धर्मापेक्षा उच्च आहे.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - १७.०२.१९८१

सर्व काही जे सृष्टी बनविताना केले गेले ते सर्व काही माणसाच्या शरीरांतर्गत बनविले आहे. प्रथम वलय, नंतर बिंदू, त्यानंतर अर्धबिंदू त्यानंतर संपूर्ण कुंडलिनीची निर्मिती केली गेली. पूर्ण कुंडलिनी तयार झाली. जी आदि कुंडलिनी आहे. तुमच्या आत आली आणि तुमची कुंडलिनी बनली.

प. पू. श्री माताजी - २५.११.१९७३

आदिशक्ती आणि कुंडलिनी यांच्यात अंतर आहे. एकीकडे आदिकुंडलिनी कुंडलिनीचे प्रतिबिंब होय. दुसरीकडे आदिशक्ती परमचैतन्य स्वरुपात आहे. पूर्ण स्वरुपात बघितल्यास हिचे दोन भाग आहेत. एकशक्ती परमचैतन्याच्या स्वरुपात आहे. दुसरे - कुंडलिनीच्या स्वरुपात मानवात हिचे प्रतिबिंब आहे.

प. पू. श्री माताजी, कबेला - २६.०६.१९९४

आदिकुंडलिनी तयार करण्यासाठी प्रथम काही लोकांना बसवले होते. सुरुवात कोणापासून तरी करावी लागते. प्रथम त्यांनी श्रीगणेशाला बसवले. आदिशक्तीने केवळ एक चक्रावर श्री गणेशाची स्थापना केली. एक गणेश. एकाच 'चक्राबरोबर! श्री गणेश!'

त्यानंतर दुसरे चक्र घेऊन ती आली तेव्हा तिने ब्रम्हदेवाची स्थापना (निर्मि ती) केली. पण उलट्या प्रकारे. प्रथम देवीने श्री विष्णूची निर्मिती केली. विष्णूचे कार्य पोषणकर्त्याचे आहे. ब्रम्हा नवनिर्मितीचे कार्य करतो. म्हणजे आधी पालनकर्ता श्री विष्णू आणि त्याच्या नाभीतून श्री ब्रम्हदेव जो सृष्टीचा निर्माता आहे त्याचा जन्म झाला. त्यामुळे नाभीचक्रातून आपल्याला मातेच्या गर्भात जाऊन स्थिर होण्यासाठी पैदा केले जाते. असे खरेच घडले आहे. असेच झाले आहे. जसे खुंटे रोवले जातात तसेच हे केले. यात असत्य काही नाही.

आता भवसागर तयार झाला. सर्व Void तयार झाले. Vagus Nevre आणि Plexus भवसागराच्या चहुबाजूस, भवसागराच्या आत वाहणारा स्नेह क्रिएशन त्यातच अडकले. All Pervading Power म्हणजे स्नेह प्रेम त्याच्यामध्ये क्रिएशन (नवनिर्मिती) आता या भवसागराला ओलांडणे खूप गरजेचे असते.

भवसागरात अडकलेल्यांना काढण्याची काहीतरी व्यवस्था करणे गरजेचे होते. त्यासाठी ब्रम्हा, विष्णू, महेश या त्रयींची निर्मिती झाली. हे तिघे म्हणजे अजब व्यक्तिमत्त्व होय. या तिघांची धर्मावर स्थापना केली. दत्तायेत्र हे या तिघांचे एकत्रित रुप. दत्तायेत्र आदिगुरु होत. ते नेहमी गुरु रुपात राहिले. अनेकदा जन्म घेतला. त्यांचा जन्म राजा जनकाच्या रुपात झाला. ते आदिशक्तीच्या पित्यासमान आहेत. त्यानंतर त्यांचा जन्म ईराणमध्ये झाला. झरतुष्ट्र हे त्याचे नाव होते. मच्छींद्रनाथ, मोहम्मद साहेब, गुरुनानकजी आणि शिर्डीचे श्री साईबाबा ही सर्व आदिगुरु दत्तात्रयाचीच रुपे होत. माझे (श्री माताजींचे) ही तेच गुरु आहेत. त्यांनी मला हा धंदा शिकविला. ते मला जन्मजन्मांतरी शिकवित होते. अंतिमतः मलाच येऊन हे काम करावे लागले. हे त्यांनीही केले नाही आणि या जन्मी मला गुरुस्थानी बसवले, गुरु बनण्यासाठी.

आता भवसागर पार करण्यासाठी ज्या गुरुची स्थापना झाली त्यावरही बरेच काम केले गेले. ज्यामुळे गुरु काहीही करुन भवसागरातून माणसाला पार करतील. काही कामे झाली, काही नाही. बरेच जण भवसागर पार झाले. ते चिरंजीव झाले. ते आजही मदत करतात. पण त्यांच्यासाठी एक प्रयोग होता. सर्वांनी वेगवेगळे प्रयोग केले. दिशा वेगळ्या पण ध्येय एकच. माणसाला भवसागर पार करणे. थोडेबहुत पार झाले. चिरंजीवही झाले. परंतु amass ज्यांना म्हणता येईल त्या जास्तीत जास्त जणांना भवसागर कलियुगातच पार करणे शक्य होणार आहे.

आता जो ईश्वर आहे आपल्या हृदयात आत्मस्वरुपात बसले आहेत. जेव्हा बालक मातेच्या उदरात असते तेव्हा साक्षीस्वरुप ईश्वर त्याच्या हृदयात विराजमान

होतात. एखाद्या ज्योतीसारखे दिसतात. आपल्या हाताच्या अंगठयाप्रमाणे. हे डाव्या बाजूला हृदयात असते. हृदयचक्रात नव्हे. हृदयचक्रात का नाही? कारण तो कुंडलिनी जाण्याचा मार्ग आहे. त्यानंतर श्रीराम जगात आले ते पूर्ण मानव झाले. लोक त्यांना विसरले कारण ते मानवी स्वरुप होते. स्वत:ला विसरुन श्रीराम मायेत अडकले आणि मानवी स्वरुपात आले. मनुष्य म्हणूनच ते जगले. हा भवसागर तुम्ही पार करावा म्हणून ते स्वत:ला विसरले. त्याकाळीही दोन चार माणसे पार झाली नाही असे नाही पण खूप जास्त नाही.

श्रीरामानंतर आणि सहा हजार वर्षांपूर्वी श्रीकृष्णांचा अवतार झाला. श्रीकृष्णाच्या आधी आदिकालात जेव्हा लोक भवसागर पार करु इच्छित होते. पण त्यासाठी भक्तांना खूप अडचणी येत असत. ते जेव्हा पूजेसाठी - ध्यानासाठी (मेडिटेशन) बसत तेव्हा त्यांना सतावले जायचे. तेव्हा आदिशक्ती आपल्या पूर्ण अवतारात प्रकटली. तिने १०८ अवतार (जन्म) रुपे घेतली. देवी महात्म्यात हे सांगितले आहे. वाचा तुमच्या लक्षात येईल.

देवी स्वरुपात ती जगात आली आणि लोकांना ओळखले. पण तेव्हा ती फक्त देवी स्वरुपातच होती. देवीची कोणतीही माया मध्ये नव्हती. त्यामुळे मनुष्याला तारणहार मिळाला नाही. मानवाचे केवळ संरक्षण झाले पण तो तरु शकला नाही. देवीने महिषासुराचा वध केला. शुंभ-निशुंभ राक्षसांना मारले. जे त्रास देत होते, जे भक्तांना छळत होते त्या राक्षसांना मारले. जे नकारात्मक लोक (णएगतविए) होते त्यांना मारले, शिक्षा केली. परंतु तरीही सर्वांचे तारण झाले नाही. कारण (देवी) पूर्ण मानवी स्वरुप नव्हती.

नंतर राधेचा जन्म झाला. सीतेनंतर राधेचा जन्म झाला ती पूर्ण मानवी स्वरुप होती. तिने प्रेमाचे संगीत गायले. विशुद्धी चक्रावर तिचे स्थान आहे. हे पाचवे चक्र होय. श्रीकृष्णाने आपला मामा कंस याचा वध केला तेव्हा राधेस बोलावले होते. राधाजी कृष्णाची शक्ती होती. पुढे ती दोन भागांत विभागली गेली. त्यातली एक

रुक्मिणी या नावाने द्वारकेत आणि राधा म्हणून वृंदावनात राहिल्या. पूर्ण मानवीय (Human) होऊन.

त्यानंतर श्रीकृष्णाला एक पुत्र होता. तो साक्षात ॐकार स्वरुप होता. त्याने येथे (आज्ञाचक्रावर) अवतार घेतला. त्याचे नाव जीजस क्राईस्ट (येशू ख्रिस्त) आहे. त्याच्या मातेचे नाव 'मेरी' आहे (आज्ञाचक्रावर ते आले). आज्ञाचक्रावर भगवान येशूचे नाव आहे आणि महालक्ष्मी म्हणजे साक्षात मेरी माता होय (मदर मेरी). ती जेव्हा आपल्या मुलाबरोबर येते. शांत असते. पण एकटी येते तेव्हा भयंकर किंवा भयानक होते.

सहस्त्राराचे स्थान प्रत्यक्ष भगवतीचे स्थान आहे. ती स्वयं ते तोडते. येथे सातही चक्रे पूर्ण होतात. त्यामुळे माया ही सात पटलांची आहे. मायेची ओळख महाकठीण आहे. तिचे सातचक्रांचे मानवीय (Human) चक्र येथे पूर्णत्व पावते.

प.पू. श्री माताजी - २५.११.१९७३

आपल्या आत परमेश्वराने चौदा स्तर बनविले आहेत. आपण सरळ मोजले तरी लक्षात येते. तुम्हाला सात चक्रे तर माहीत आहेत. याशिवाय दोन आणखी चक्रे आहेत. चंद्राचे चक्र व सूर्याचे चक्र. नंतर एक हंसा चक्र आहे. झाली दहा चक्रे. त्याच्यावर आणखी चार चक्रे आहेत. अर्धबिंदू, बिंदू, वलय आणि प्रदक्षिणा. सहस्त्रारानंतर येणारी ही चार चक्रे होत. सहस्त्रार उघडल्यानंतर त्यावर असणाऱ्या या चारी चक्रांपर्यंत तुम्हाला जायचे आहे (माताजींना तुम्हाला तिथे न्यायचे आहे).

या चार चक्रानंतर (गेल्यावर) म्हणता येईल की आपण सहजयोगी झालो.

दुसऱ्या प्रकारे बघितले तरी चौदा स्थिती आपल्यात सहस्त्रारापर्यंत जाण्यासाठी आहेत. सात चक्रे इडा नाडीवर, सात चक्रे पिंगला नाडीवर मनुष्य जेव्हा चढतो तेव्हा तो सरळ सरळ चढत नाही (क्रमाने एक एक सरळ चक्र घेत नाही). माणूस प्रथम डावीकडे जातो मग उजवीकडे येतो. पुन्हा डावीकडे येतो आणि नंतर उजवीकडे. कुंडलिनी जी वर चढते ती या दोन्हींना विभागून वर चढत जाते.

आता आपला मेंदू. आपला जो मेंदू आहे आपल्या सर्व उत्क्रांती, प्रगतीचे फलित आहे. आजपर्यंत आपले जे Evolution (प्रगती) झाले. ते अमिबा ते मानव ही आपली प्रगती झाली ते ही या मेंदुमुळेच. आम्ही प्रगतीत जे जे मिळविले ते सर्व या मेंदूत आहे (मेंदूमुळे आहे). यात सर्व शक्ती समाविष्ट आहेत. मिळविलेले ज्ञानरुपी धनही या मेंदूत साठविलेले आहे.

आता सत्य. या हृदयात जो आत्मा विराजमान आहे आणि सहज योगानंतर या आत्म्याचा प्रकाश आमच्या हृदयात पसरतो. सात स्तरात पसरतो. जेव्हा मानवाचे सहस्त्रार उघडेल तेव्हाच हे शक्य होईल. स्वतःची इज्जत स्वतःच करायला हवी. जसजशी तुम्ही तुमची किंमत कराल स्वतःला मानसन्मान द्याल तसतशी तुमची स्थापना आत होईल. कारण हे हृदय मंदिर आहे. या मंदिराला तुम्ही जितका सन्मान द्याल तितका त्यात परमात्म्याचा प्रकाश उजळेल.


तुमचा जन्म केवळ मानव होण्यासाठी नाही तर महामानव होण्यासाठी झाला आहे. तुम्हाला सर्व आनंद घ्यावा लागेल. परमात्म्याने ही सृष्टी लढाया, भांडणे यासाठी किंवा संरक्षणाच्या काळजीसाठी निर्माण केली नाही. उलट निखळ शांती, पूर्ण तादात्म्यभावना आणि आनंदाने जीवन व्यतित करावे यासाठी सृष्टीची रचना परमात्म्याने केली आहे. माणसाची निर्मितीही या आनंदासाठीच झाली आहे हेच आमचे लक्ष्य आहे. मी हे केवळ सांगत नाही हीच वास्तविकता आहे.

आता सहजयोगाची सुरुवात झाली आहे. या आरंभानंतर सहजयोगी आदिशक्तीकडून सरळ आशीर्वाद प्राप्त करीत आहेत. तुम्ही हे समजावून घेणे आवश्यक आहे की, तुम्ही अतिशय उच्च चेतनेच्या जगात क्षेत्रात प्रवेश करीत आहात. जेथे तुम्ही परमात्म्याशी, परमेश्वराशी जोडले गेले आहात.

प. पू. श्री माताजी - ०५.०५.१९८३

हे विधिलिखित आहे की, या कलियुगातच हे कार्य
(तुमचा आध्यात्मिक विकास) होणार आहे आणि ते
संपन्नही होईल (पूर्णत्वास जाईल) वेळ येणे आवश्यक
असते आणि आज ती वेळ आली आहे. कलियुगाचे हेच
वैशिष्टय आहे की, भ्रमित होणे. माणूस भ्रमित होतो.
आणि भ्रमित अवस्थेमुळे तो कारणे शोधू लागतो.
अंधारात जेव्हा तो पूर्णपणे चक्रावून जातो तेव्हा त्याचा शोध जारी असतो.
ती वेळ येते आणि योग्य वेळी
सर्व कार्य पूर्ण होईल (आध्यात्मिक विकास होईल)
चैतन्यलहरी, जुलै-ऑगस्ट-२००३

❋ ❋ ❋



सूक्ष्म तन्त्र
उत्क्रान्ति का मध्यमार्ग
सामूहिक चेतन
वर्तमान
प्रति अहंकार
अहंकार
सामूहिक अतिचेतन
( भविष्य )
भूतकाल
सामूहिक अवचेतन
पिंगला नाडी
ईडा नाडी
आत्मा
सुषुम्ना नाडी
भवसागर
कुंडलिनी
मूलाधार
स्वाधिष्ठान
नाभि
अनाहत
विशुध्दि
आज्ञा
सहस्त्रार
अबोधिता
उत्क्रांती
सुरक्षा
सामूहिकता
समन्वयन

## <u>प्रकरण – ८</u>

# <u>सूक्ष्मतंत्र आणि कुंडलिनी शक्ती</u>

आपण कोण आहोत? आपल्या आतमध्ये कोणती व्यवस्था परमेश्वराने केली आहे. कोणते यंत्र, कोणत्या तंत्रामुळे आपण परमेश्वराला प्राप्त करु शकतो. हे मी तुम्हाला सांगते. संपूर्ण तयारी परमेश्वराने केली आहे. ती शक्ती जागृत करायची. जेव्हा तुम्ही जागृत होता तेव्हा सर्व गोष्टी सहजतेने समजतात. उत्क्रांतीच्या शेवटच्या टप्प्यात जाण्यासाठी आपल्या शरीरात सूक्ष्मतंत्र (विद्यमान) हजर आहे.

प. पू. श्री माताजी - २२.०३.१९७९

(अनुकंपी) नाडीतंत्र-

(१) डावीनाडी (इडानाडी, चंद्रनाडी)

(२) उजवीनाडी (पिंगलानाडी, सूर्यनाडी)

(३) मध्यनाडी (सुषुम्ना नाडी)

<u>प्रत्यक्षात आपल्या नाडीतंत्रात तीन मार्ग आहेत.</u>

(१) इडानाडी : डावीबाजूच्या मार्गास इडानाडी म्हणतात. ही सूक्ष्म नाडी आहे. डाव्या बाजूच्या नाड्यांचे ती पोषण करते. तिला चंद्र नाडी म्हणतात. हा मार्ग आमचा भावनात्मक किंवा भूतकालीन गोष्टींची जपणूक करतो. आमच्या भूतकाळाची नोंद ठेवतो. अचेतन मन याच मार्गाद्वारा सूचना मिळविते.

(२) पिंगला नाडी : उजव्या बाजूच्या नाडीस पिंगला नाडी म्हणतात. हा मार्ग उजव्या नाडीसाठी कार्य करतो. पिंगला नाडी शारीरिक आणि बौद्धिक कार्य करते. उजव्या भागातील सचेतन मनाद्वारे भविष्याची निर्मिती होते. ही सूर्य नाडी होय.

(३) सुषुम्ना नाडी : मध्यमार्ग सुषुम्ना नाडी म्हणून ओळखला जातो. या मार्गाने ब्रम्हरंध्राचे भेदन करण्यासाठी सर्व व्यापक शक्तीची सूक्ष्म ऊर्जा प्राप्त करण्यासाठी कुंडलिनी वर जाते.

डावी व उजवी नाडी विपरीत दिशेने कार्य करत असून सुद्धा परस्परपूरक आहे.

परानुकंपी डाव्या आणि उजव्या नाडीतंत्राच्या वलयांपासून (चक्रांपासून) बनले आहे. संकटकाळात आपत्तीजन्य परिस्थितीत जेव्हाजेव्हा अनुकंपा नाडीतंत्र थकते तेव्हा (परानुकंपी) या दोन्ही नाडयांना शांत करुन (पोषण) दोष काढून शुद्ध करते व शेवटी त्याची मदत करते. ज्या स्थानावर ही वलये एकमेकांना स्पर्श करतात - Cross करतात. तेथे ऊर्जाकेंद्राची निर्मिती होते. त्या ऊर्जाकेंद्राला चक्र म्हणतात. ही वलये जीन्सनुसार असतात. आपल्या डाव्या आणि उजव्या अनुकंपी नाडीतंत्राच्या दैनंदिन कामकाजाने प्रभावित होते.

**चक्र**

आपला उत्थानमार्ग (सुषुम्ना मार्ग) वर सात सूक्ष्म ऊर्जा चक्रे आहेत. काही सहाय्यक चक्रेही आहेत. आपल्या विकासप्रक्रियेच्या दरम्यान या सूक्ष्मचक्रांचे सृजन झाले.

(१) मूलाधारचक्र (श्रोणीय - Pelvic)

(२) स्वाधिष्ठान चक्र (महाधमणी - Aortic)

(३) नाभिचक्र (भवसागर - Void)

(४) अनाहतचक्र (हृदय - Cardiac)

(५) विशुद्धी चक्र (Cercical Plexus)

(६) आज्ञाचक्र (पीयुष आणि शंकुरुपी ग्रंथी)

(७) सहस्त्रार चक्र (ब्रम्हरंध्र - Fontanelle)

हंसाचक्र, श्रीचक्र आणि श्री ललिता चक्र इ. आहेत.

# कुंडलिनी

एक शुद्ध इच्छाशक्ती (परमचैतन्य) जी कणाकणात व्याप्त आहे आणि सूक्ष्मचैतन्य आहे. ती माणसाच्या पवित्र अस्थित ठेवली आहे. तिलाच कुंडलिनी म्हटले जाते. ती कुंडलाकार असते. ती साडेतीन कुंडलात विद्यमान आहे. कुंडलांचा (गोलाकाराला) दैवी गणिती महत्त्व आहे. पवित्र त्रिकोणाकार अस्थी 'सेक्रमबोन' या नावाने ओळखतात. ही पवित्र अस्थी पाठीच्या कण्याच्या (मज्जारज्जू) आधाराने स्थित आहे.

आपल्या शरीरामध्ये एक स्वयंचलित नाडीतंत्र (ऑटोनॉमस नर्वस सिस्टीम) कार्य करते.

हा 'स्व' म्हणजे आत्मा होय. जो हे स्वयंचलित नाडीतंत्र चालवतो. हा आत्मा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो. सर्व शक्तिमान परमात्म्याचे ते प्रतिबिंब आहे आणि कुंडलिनी ही शक्तीचे प्रतिबिंब होय. परमात्म्याची शुद्ध इच्छाशक्ती आदिमाता आहे. तिला आपण आदिशक्ती, होली घोस्ट, (आदिशक्ती) किंवा अथेना म्हणू शकतो.

कुंडलिनी एखाद्या विजेच्या यंत्राशी संबंध जोडणाऱ्या तारेप्रमाणे आहे. ही तार यंत्राचा संबंध विजेशी जोडते. त्याचप्रमाणे जेव्हा कुंडलिनीची शक्ती जागृत होते तेव्हा तिचे काही धागे तेजस्वी प्रकाशित होतात. शेवटी मानवाला सर्व शक्तीशी (परमचैतन्य) जोडतात.

ही एक सहज घटना आहे. ती जिवंत क्रिया आहे. विकासाच्या सर्व क्रिया जिवंत क्रिया आहेत. आता वेळ आली आहे की, आत्मसाक्षात्काराद्वारे मानव आध्यात्मिक अस्तित्वाची अंतिम अवस्था प्राप्त करील. मानवाची तुलना 'बी' बरोबर करता येईल. ही बी अशी आहे जी आध्यात्मिकतेत सक्रिय नाही. आध्यात्मिक क्षेत्रात प्रगत होण्याची जिवंत प्रक्रिया सुरु झाली नाही. बी जेव्हा जमिनीत गाडले जाते तेव्हा

पाण्याच्या मदतीने ते अंकुरित करण्याची शक्ती पृथ्वीमातेत असते. याचप्रकारे सहजयोगाच्या शक्तीने कुंडलिनी जागृत केली जाऊ शकते.

जेव्हा ही कुंडलिनी जागृत होते, उठते तेव्हा मानवी चैतन्यात जिवंत क्रिया सुरु होते. ज्याचा परिणाम म्हणजे आध्यात्मिक उत्क्रांती होय. आध्यात्मिक जीवनाचा हा विकास एक नवी अवस्था आहे. त्यामुळे मनुष्य आपल्या अंतर्गत देवत्वात प्रगती करु लागतो. हे त्याच्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि अध्यात्मिक व्यक्तिमत्त्वाचा विकास करतात आणि प्रकाशित करतात.

कुंडलिनी जेव्हा वर चढते - जागृत होते - तेव्हा आपल्या डोक्याच्या टाळूवर सहजच थंड लहरी वाहू लागतात. त्यांचा अनुभव घेऊ शकतो. व्यक्ती स्वतःच हे अनुभवते आणि स्वतः प्रमाणित करते. या शीतलहरी व्यक्ती आपल्या चहुबाजूसही अनुभवू शकतो. परमात्म्याच्या प्रेमाच्या सर्व व्यापक शक्तीद्वारे हा शीतल वायू प्रगट होत असतो. जीवनात प्रथमच माणूस या दैवी शक्तीचा अनुभव घेतो. साक्षात अनुभवतो.

कुंडलिनी जागृत होते तेव्हा ब्रम्हरंध्र भेदते. तेव्हा आपल्या हृदयातील प्रतिबिंबित आत्मा प्रदीप्त होतो (प्रकाशमान) आणि आपल्या चित्ताला प्रकाशित करतो. आपल्या आत्म्याच्या प्रकाशाने चित्तात पसरतो. हे सर्व आपण त्याक्षणी प्रत्यक्षात अनुभवतो. हे सर्व घटित होते. बोटांच्या अग्रावरही (टोकावर) थंड लहरींचा अनुभव येतो.

सहजयोग व परा-आधुनिक युग

परमात्म्याच्या सर्वसमावेशक शक्तीशी न जोडलेली व्यक्ती म्हणजे अशी व्यक्ती असते जी आपल्या स्त्रोताशी जोडलेली नसते, त्या व्यक्तीला व्यक्तिमत्त्वही नसते. ना अर्थ ना लक्ष्य. स्त्रोताशी जोडले गेल्याबरोबर सारी यंत्रे काम करु लागतात. अभिव्यक्त होतात.

प. पू. श्री माताजी- १३.०९.१९९५

मनुष्य विशिष्ट रुपात, विशिष्ट विचाराने तयार केला आहे. त्याचे जे भविष्य असेल ते त्याला प्राप्त होऊ शकते. मिळू शकते पण केव्हा? त्याची पहिली पायरी आहे. आत्मसाक्षात्कार (कुंडलिनीची जागृती) जसे एखादा दिवा लावायचा असेल तर आधी त्यात वात घालावी लागते. त्याचप्रमाणे तुमच्या आत ज्योत लागली तर तुम्ही तिला पुन्हा प्रज्वलित करु शकता किंवा प्रकाश वाढवू शकता. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अंतरात दीप प्रज्वलित होणे. मात्र त्यासाठी आत्मसाक्षात्कार होणे महत्त्वाचे असते. नितांत आवश्यक असते.

प.पू. श्री माताजी, लंडन - १६.१०.१९८८

तुमचा संबंध केवळ परमात्म्याच्या साम्राज्याशी आहे. आम्हाला तेच प्राप्त करायचं आहे. तेथेच राहायचे आहे. त्यासाठी आदिशक्तीने आतली व्यवस्था केली आहे. त्यालाच कुंडलिनी म्हणतात. तिची जागृती होऊ शकते आणि आपल्याला आत्मसाक्षात्कार (आत्मज्ञान) मिळू शकते. आपल्या जीवनात आत्मसाक्षात्कार प्राप्त करणे अतिशय महत्त्वपूर्ण घटना आहे. आपण सर्व आत्मसाक्षात्कार प्राप्त करुन घ्या.

तुमची अंतर्गत शक्ती जागृत होईल. चांगल्याप्रकारे त्याचे नियोजन केले आहे. परमेश्वर मोठा निर्माता आहे. ज्याप्रकारे त्यांनी संतुलन करुन हे कार्यान्वित केले ते प्रशंसनीयकार्य आहे. हे कार्य अतिशय सूक्ष्म स्वरुपात केले गेले. आपण सर्व याच्यात प्रगत व्हा. जेव्हा आपण यात उन्नत होता तेव्हा जाणीव होते की, आपण किती महान आहोत. आपण मोठया व्यक्ती आहोत. बहुमूल्यरत्न आहोत. प्रेमळ आहोत. आज आपण हा अनुभव प्राप्त करु शकतो. आत्म्याचा अनुभव ही एक विशिष्ट गोष्ट आहे. यापूर्वी यापद्धतीने ती कधीच प्राप्त करता येत नव्हती. आज मात्र आपण ती प्राप्त करु शकतो. मी तुम्हाला मदत करु शकते. कुंडलिनी कार्यान्वित करु शकते मी तुम्हाला प्रार्थना करते की, तुम्ही आपला आत्मसाक्षात्कार करुन घ्या. ज्यांना तो प्राप्त करायचा नसेल तर त्यांच्यावर जबरदस्ती करु नका.

प.पू. श्री माताजी, लंडन - १४.०७.२००१

माणसाला परमेश्वराने स्वातंत्र्य दिले आहे. हे स्वातंत्र्य परमेश्वराने विशेष रुपात या साठी दिले आहे की, परमेश्वराच्या साम्राज्यात जर आम्हाला जायचे असेल

तर प्रथम आमच्या स्वतंत्रेत आम्ही त्याची अपेक्षा, इच्छा (वरण) करायला हवी. आपल्या स्वातंत्र्यात असे म्हटले पाहिजे की मला परमात्मा हवा (मला परमेश्वराचे दर्शन होवो).

अशा स्वातंत्र्यात जेव्हा तुम्ही जाता आणि परमची इच्छा करता तेव्हाच परमात्मा आपले महाद्वार तुमच्यासाठी उघडतो.

प. पू. श्री माताजी - २२.०३.१९७९

## 'कुंडलिनी' आपली आध्यात्मिक आई आहे

ही कुंडलिनी तुमच्या आत स्थित तुमची आई आहे. हजारो वर्षापासून तुम्ही जन्म घेतला की तुमच्यात प्रवेश करते, ती तुमची साथ सोडीत नाही. जो पर्यंत तुम्ही पार होत नाही (आत्मसाक्षात्कार प्राप्त करुन घेत नाही) ती तुमची सोबत (साथ) सोडत नाही. ती प्रतीक रुपात तुमची आईच आहे. म्हणजे असे समजा की तुमची महामाता (महा आई) ची एक सावली (छबी बघणे) आहे. एक रुप आहे.

प.पू.श्री माताजी - १०.०२.१९८१

ही कुंडलिनी तुमची आई आहे. जन्मोजन्मी तुमच्याबरोबरच जन्माला आली. तुमच्यातच स्थित आहे. मृत्यूनंतरही जीवात्म्याबरोबर वर आत्मा आणि कुंडलिनी दोघे बरोबर राहतात. ती प्रत्येक वेळेस तुमच्या बरोबरच असते आणि ती तुमच्या अवचेतना (सबकॉन्शस) चा पूर्ण जमाखर्च आहे.

प. पू. श्री माताजी - ०३.०२.१९९८

आजपर्यंत आपण जे काही केले. आपला पूर्ण भूतकाळ व भविष्यकाळ हा वृत्तांत कुंडलिनीत नोंद केला जातो. ते आपण थांबवू शकत नाही. आपली संपत्ती (संपदा) काय आहे? तुमच्या चुका तुमचे बरे वाईट वागणे, गुण अवगुण या सर्वांची नोंद त्यात होते. त्या त्रिकोणाकृती अस्थीमध्ये आपली पवित्र आई आहे.

प. पू. श्री माताजी - २२.०३.१९७९

कुंडलिनी अवशिष्ट ऊर्जा आहे. अवशिष्ट शक्ती म्हणजे ती मूल आदिशक्ती आहे. तिचे विभाजन झाले नाही. परमेश्वरी शक्ती जेव्हा पूर्ण विकसित

अर्भकाच्या (भ्रूण) मेंदूवर (मस्तक) पडते तेव्हा प्रिझमसमान मेंदूत ती तीन श्रेणींमध्ये येते. असे रीफ्रॅक्शन (विकीर्णन) मुळे होते. जी उर्जा मेंदूच्या किनाऱ्यावर (कडेला) पडते. ती अनुकंपी नाडीतंत्राची निर्मिती करण्यासाठी एकमेकींना पार करुन (छेडून) जातात. परंतू परमेश्वरी उर्जा मेंदूच्या शिखरावर जेव्हा पडते तेव्हा मेंदू प्रिझम सारखा असल्यामुळे ही मूलभूत शक्ती विकसित होत नाही (वळत नाही). ती मेंदूतून जाऊन पावनअस्थीमध्ये कुंडलाच्या आकारात कुंडलिनीच्या रुपात बसते. ही मूलभूत शक्ती पूर्ण साडेतीन वलयात असते आणि सर्वसाधारण सुप्त अवस्थेत असते (Resting Potential State).

पराआधुनिक युग

कुंडलिनी एक ऊर्जा स्त्रोत आहे. ती विचार करते, समजते, तुमच्यावर प्रेम करते, तुमचे सद्यजीवन व पूर्वजीवन या विषयी सर्व जाणते. ती प्रत्येक व्यक्तीची व्यक्तिगत माता (आई) आहे. तीच तुम्हाला आत्मासाक्षात्कार देते. तुम्हाला तुमचा पुनर्जन्म देते. कुंडलिनी पूर्ण धर्मपरायण आहे. पूर्ण पवित्र आहे. ती आपल्या विचारानुसार कल्पना केलेल्या विचारानुसार आदर्श व्यक्तिमत्त्व आहे. ती कुठल्याही प्रकारचा मूर्खपणा, खोटेपणा सहन करीत नाही.

ती निर्मळ आहे. तुम्ही तिला निर्मल म्हणू शकता. ती पवित्र आहे. पवित्रतेचा अवतार (अवतरण) आहे. कोणत्याही प्रकारचा मूर्खपणा ती स्वीकारत नाही किंवा कोणत्याही प्रकारची तडजोड (Adjustment) तिला मान्य नाही. ती तुमच्यात विद्यमान आहे. तुम्ही बघा ती किती सुंदर आहे. हिला कोणत्याही गोष्टीची भीती नाही. तिला कोणत्याही गोष्टीत फसवता येत नाही किंवा कोणत्याही बाबीत तिला प्रलोभित करता येत नाही. तुमच्या आत विराजमान असणारी कुंडलिनी स्वत: परमात्म्याची इच्छा आहे. ती परमात्म्यासाठी इच्छा नाही. तुमच्यासाठी परमात्म्याची इच्छा (आकांक्षा) आहे. केवळ त्या इच्छेमुळेच कुंडलिनीला जागृत करता येते.

परमात्म्याच्या इच्छेस जागृत करता येते. परमात्म्याची इच्छा म्हणजे ही शक्ती आणि परमात्म्याचे प्रेम म्हणजेच परमात्म्याची इच्छा. त्या परमेश्वराची इच्छा आहे की, तो आपल्या शक्ती, आपले वैभव आणि प्रेम करण्याचे सामर्थ्य तुम्हाला द्यावे. या इच्छेस तुमच्या आत स्थापित केले गेले आहे.ती सुप्त आहे. जेव्हा जागृत होते तेव्हा तुमच्या अंतरात परमेश्वराची इच्छा पूर्ण होते. तुम्ही परिपुर्ण होता. जोपर्यंत तुम्ही परमेश्वर नाही आहात (नसता) तोपर्यंत परमात्म्याच्या इच्छेस नियंत्रित करु शकत नाही. आत्मसाक्षात्कारानंतर (कुंडलिनी जागृती) परमात्मा तुम्हाला आपल्या शक्ती प्रदान करतो. त्यामुळे परमेश्वरी इच्छेचे संचालन आता तुम्ही करु शकता. इतरांची कुंडलिनी जागृत करु शकता. कारण हीच परमेश्वरी इच्छा आहे.

प.पू. श्री माताजी - ११.११.१९७९

कुंडलिनी अत्यंत शुद्ध रुप आहे. त्या शुद्धतेतच ती पवित्र अस्थित बसली आहे. त्याची अनेक कारणे आहेत. कुंडलिनी ही परमेश्वरी इच्छा रुप आहे. आपल्या इच्छा कुंडलिनीवर प्रभाव पाडू शकत नाहीत, म्हणून आपला तिच्यावर परिणाम होत नाही. यामुळे ती विशुद्ध स्वरुपात आपल्यात विद्यमान आहे.

कुंडलिनी शक्ती महाकालीच्या त्या इच्छेचे शुद्ध स्वरुप आहे. पूर्ण रुपेण ती शुद्ध आहे. माणूस जेव्हा जगात येतो तेव्हा त्याला एकच इच्छा असते. त्याचे परमेश्वराशी मिलन व्हावे. परमेश्वर त्याला भेटावा. या व्यतिरिक्त दुसरी कोणतीच इच्छा त्याच्या मनात नसते. हेच इच्छेचे शुद्ध रुप होय.

ही इच्छा कुंडलिनी स्वरुपात व्यक्तित वास करते आणि मनुष्याचा पूर्ण पिंड तयार करते. परंतु अजून इच्छाच आहे. पूर्ण मनुष्य बनविल्यानंतरही ती इच्छा म्हणूनच राहते, कारण तिची जागृती नाही, म्हणून पूर्णपणे जशीच्या तशीच बनून राहते आणि ती इच्छा छायेप्रमाणे तुम्हाला सांभाळत राहते. की बघा या रस्त्याने गेलात तर इथे इच्छा पूर्ण होणार नाही. जी संपूर्ण शुद्ध इच्छा तुमच्या आत आहे, ती पूर्ण होणार नाही. ती इच्छा पूर्ण झाल्याशिवाय तुम्ही सुखी होणार नाही. तुमचा जो सगळा पिंड (देह) आहे तो यासाठी बनविला आहे की तुम्हाला परमेश्वर प्राप्ती

व्हावी, ती इच्छा पूर्ण व्हावी. परंतू महाकाली शक्ती (तुमची इच्छा शक्ती) ला जेव्हा तुम्ही वापरु लागता तेव्हा तुमच्या महाकालीशक्ती मध्ये तिचे जे कार्य आहे ते बाहेरच्या बाजूस होऊ लागते. म्हणजे तुमच्या ज्या इच्छा आहेत त्या बाहेरच्या दिशेने जायला लागतात. (भौतिक, सांसारिक वस्तू मिळविण्याची इच्छा निर्माण होते) तुम्ही विचार करता की, मी ही वस्तू घेईन आणि तेव्हा तुमचे चित्त बाहेरच्या बाजूस जायला लागते. यामुळे 'परमेश्वराबरोबर योग घडावा' ही तुमच्या अंतर्मनातील शुद्ध इच्छा कार्यान्वित होत नाही. तुम्ही फक्त हा विचार करीत राहता. मी हे मिळविन ते मिळवावे यासाठी तुमची शुद्ध इच्छा जशीच्या तशीच राहून जाते. म्हणून हिला वाचलेली (उरलेली) शक्ती म्हणतात.

आता ही जी तुमची शुद्ध इच्छा आहे तीच तुम्हाला इकडे तिकडे ओढत राहते आणि तुम्ही दारोदार धक्के खात राहता. कर्मकांड करता, इकडे तिकडे शोधता, पुस्तके वाचता आणि मनात एक धारणा नक्की करता की, देवाला भेटणे म्हणजे हे सर्व करणे. जोपर्यंत परमेश्वर तुम्हाला पावत नाही तोपर्यंत तुम्हाला वाटते की, तुमची इच्छा असे केल्याने पूर्ण होईल किंवा ते केल्याने पूर्ण होईल. पण होत नाही. तुम्ही गुरुला शरण जाता, बरेचसे अगुरु (फसवे गुरु) जगात आहेत. बऱ्याच दुष्ट लोकांनीही साधूसंतांची सोंगे घेतली आहेत आणि त्यामुळे हे ढोंगी साधू तुमच्या इच्छांना मंत्रमुग्ध करतात. भुलवतात. म्हणजे कुंडलिनीला तर कोणी स्पर्शही करु शकत नाही. पण तुमची महाकालीची जी शक्ती आहे तिला मंत्रमुग्ध करतात. यामुळे परमेश्वर प्राप्तीची तुमची वास्तविक इच्छा पूर्ण होत नाही. पण तुम्हाला वाटते की, ह्या गुरुंमुळे परमेश्वर प्राप्तीची तुमची इच्छा पूर्ण होईल. म्हणून तुम्ही त्या अगुरुंना चिकटून राहता. तुमच्या हे ध्यानातच येत नाही की, तुमची खरी इच्छा पूर्ण झाली नाही आणि तुम्ही चुकीच्या मार्गावर चालत आहात. कुंडलिनीच्या जागृतीनंतरच परमेश्वरप्राप्ती होऊ शकते. कुंडलिनी ही सहज जागृत होते.

प.पू. श्री माताजी - १०.०२.१९८१

ही कुंडलिनी आहे. हिचे सारे चित्त (लक्ष) तुमच्याकडे लागलेले असते. ती सतत तुमचा विचार करते. ती उत्सुक आहे आणि वाट बघते की माझा मुलगा (पुत्र) केव्हा येईल आणि स्वत:बरोबर माझाही पुनर्जन्म करील. तिला जगातली दुसरी कुठलीही गोष्ट नको. जोपर्यंत तिचे हे कार्य पूर्ण होत नाही तोपर्यंत तिला शांती मिळत नाही. ती शोधत राहील. इकडे जा तिकडे जा. पैशात शोध, यात शोध, त्यात शोध. तुम्ही चुका कराल आणि ती कष्टात राहील पण आतापर्यंत बसलेली असेल आणि आशा करील की, एक दिवस असा येईल, जरुर येईल आणि माझ्या मुलाला सुबुद्धी होईल. तो हा योग प्राप्त करील.

प. पू. श्री माताजी - १६.०२.१९८५

ही कुंडलिनी तुमची,प्रत्येक व्यक्तीची आध्यात्मिक आई आहे. आपल्या मुलांच्या आकांक्षा जाणते. त्या आकांक्षा पूर्ण करु इच्छिते. ती आपल्या बालकाला दुसरा जन्म देऊ इच्छिते. त्यामुळे तिच्या उत्थानाच्या वेळी मुलाच्या इतर सहा शक्ती केंद्रांना शक्ती देते.

प.पू. श्री माताजी - १३.०९.१९९५

माणसाच्या पूर्ण अस्तित्वाची अभिव्यक्ती (प्रगटीकरण) झाली आहे. पण कुंडलिनी अजूनही सुप्तावस्थेत आहे. जीवाची मानवरुपात निर्मिती झाल्यावरही कुंडलिनी सुप्तावस्थेत आहे. कारण इच्छेच्या या शक्तीला आपल्या प्रगटीकरणाची (अभिव्यक्ती) संधी मिळाली नाही. या इच्छाशक्तीच्या संदर्भात लोक असा विचार करतात की, कुंडलिनीला उत्तेजित करता येते. काही जणांनी तर कुंडलिनी योगाचा धंदा सुरु केला आहे. ती व्यापाराची बाब नव्हे. ती जिवंत प्रक्रिया आहे. तिला तुम्ही व्यापारात रुपांतरित करु शकत नाही.

आमच्या डोक्यात मेंदू आहे. आपण मानव आहोत. परमेश्वराचे प्रेम पैशाने खरेदी करता येत नाही. हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. वानरापासून माणूस होण्यासाठी तुम्ही किती पैसे खर्च केले?

हे आपोआप घडते. जसे अंकुरित मोडाच्या माध्यमातून बिजाला अंकूर येतो. आणि नंतर तोच अंकुरातील मोड झाडाचे मूळ बनतो. मूळाच्या टोकावरील एक छोटी पेशी (गाठ) जमिनीत स्वत: खोदकाम करते. झाडाच्या पूर्ण अस्तित्वाचे स्वरुप त्या इवल्याशा बी मध्ये दडलेले असते. याचप्रमाणे आमच्यातही अंकुरणाचे तत्त्व वसलेले असते. 'अंकुरित करणारी शक्ती' तिलाच कुंडलिनी म्हणतात.

प.पू. श्री माताजी, ऑस्ट्रेलिया - २२.०३.१९८१

<u>जागृत होऊन कुंडलिनी सर्व चक्रांना प्रकाशित करते.</u>

कुंडलिनी श्री गणेशाची पवित्र (कुमारी) माता आहे. आपल्या पावित्र्याच्या रक्षणासाठी तिने श्री गणेशाला जन्म दिला. कुंडलिनी म्हणजेच गौरी. मुलाधार गौरी कुंडलिनीचा निवास होय आणि श्री गणेश कुंडलिनीचे रक्षण करतात.

मुलाधाराखाली श्री गणेशांचे चक्र आहे (मूलाधार चक्र)जेव्हा कुंडलिनी जागृत होते, तुम्ही गणेश स्वरुप होता. कारण तुमचे हात माझ्याकडे आहेत तेव्हा वाहणारे चैतन्य हातांमधून या दोन्ही नाड्यांतून (इडा - पिंगला) खाली उतरते आणि जाऊन श्री गणेशजींना वर्दी देते की आता कुंडलिनी वर उठू शकते.

ही शक्ती अत्यंत पवित्र आहे. अस्पर्षा आहे. तिच्यापर्यंत कोणी पोहोचू शकत नाही. कोणीही पोहचू शकत नाही. जोपर्यंत ती व्यक्ती त्याची अधिकारी आहे (त्यासाठी लायक आहे) आपल्यापुढे उभा राहत नाही. जेव्हा याची अधिकारी व्यक्ती तुमच्यापुढे उभी राहते तेव्हा तुमच्या हातांमार्फत ही शक्ती आत जाते आणि कुंडलिनी जागृत होते. ती आपोआप जागृत होते त्यासाठी कोणती मेहनत करावी लागत नाही कारण ती जीवंत क्रिया आहे.

प.पू. श्री माताजी - २२.०३.१९७९

कुंडलिनी जागृत होते. गणेश तिला आधार देतात व देखभाल करतात. कुंडलिनी पवित्र शक्ती आहे. ती अलिप्त शक्ती आहे. कोणतेही चक्र आणि कार्यात ती अडकत नाही. तिचे एकच कार्य आहे. <u>हळूहळू संतुलन ठेवून सर्व चक्रातून जाणे आणि चक्रांच्या सहनशक्तीनुसार त्यांची गरज पूर्ण करणे.</u>

ती इतकी विवेकशील आणि प्रेमळ आहे की जागृतीच्या वेळेस कोणतीही अडचण निर्माण करीत नाही. नियमित स्वरुपात, हळूहळू सहस्त्रार उघडणे हे तिचे कार्य आहे. साधारणपणे कुंडलिनीच्या उठण्याचा पत्ता लागत नाही. पूर्णतंत्रावर अवलंबून असणारी ही (कुंडलिनी) एकप्रकारे स्वतःच वरवर जाते. एका केंद्रातून दुसऱ्या केंद्रात ती जाते. सर्वात प्रथम खालचे चक्र तिच्या प्रवेशा (उत्थाना) साठी उघडते. नंतर मोठे करते (संवर्ध) आणि नंतर बंद होते. त्यामुळे कुंडलिनीला तिच्या स्थानावर ठेवण्यात मदत होते.

प.पू. श्री माताजी - ०८.०४.१९९१

कुंडलिनी यानंतर सहा चक्रांना भेदत वर उठते. वर जाते. त्यातील नाभीचक्र हे महत्वाचे चक्र आहे. खरे तर याला तिसरे चक्र मानतात. परंतू कुंडलिनी दुसऱ्या चक्राला न भेदता प्रथम तिसऱ्या (नाभी) चक्रावर जाते. कारण दुसरे चक्र नाभीतून निघून वरती फिरत असते.

प.पू. श्री माताजी - २२.०३.१९७९

हा जो मधला Void आहे. 'भवसागर' त्यातून वर जाण्यासाठी कोणतीही शिडी नाही. समजा अशा दोन शिड्या (इडा - पिंगला) लावलेल्या आहेत परंतू मधली शिडी (सुषुम्ना) अर्धवट लटकते आहे आणि तिच्यावर चढण्याचा मार्ग खाली आहे. कुंडलिनी. म्हणून कुंडलिनीला ही गॅप (पोकळी) भरायची असते.

प.पू. श्री माताजी - ०३.०२.१९७८

एक मात्र कुंडलिनीच्या जागरणानेच हा मध्य मार्ग तुम्ही मोजू शकता. प्रथमतर एक सोपान (ब्रिज) बनवतात, भवसागरावर आणि त्यावरुन जाऊन ही कुंडलिनी शक्ती मध्यमार्गावरुन उठते (वर चढते) आणि ब्रम्हरंध्राचे भेदन करुन एकाकारिता प्राप्त करते आणि जेव्हा ही घटना घडते त्यानंतर त्रिगुणात्मिकता मिळून तुमची मदत करतात.

प.पू. श्री माताजी - मार्च १९९३

जेव्हा कुंडलिनी <u>नाभिचक्राच्या</u> पुढे स्थित तिसऱ्या भागात पोहोचते त्यामुळे आपण पूर्णपणे धर्मपरायण होऊन जातो. ज्या क्षेत्राला आपण भवसागर म्हणतो तो गुरुतत्वाच्या दहा धर्मोपदेशकामुळे प्रकाशित (ज्योतित) होतो. आपल्या आचरणात कठोरता आणण्याची आवश्यकता नाही. आम्ही स्वतःच्या स्वतःच वास्तवात आध्यात्मिक होऊन जातो.

जागृतीनंतर कुंडलिनी जेव्हा <u>भवसागरात</u> येते तेव्हा आपल्याला आत (अंतस्थ) शाश्वत पावनधर्म जाणवू लागतो. हे चक्र जेव्हा <u>पुर्णपणे प्रकाशित होते आणि यांच्यात जेव्हा अध्यात्मिकता प्रस्थापित होते ते आपण स्वतःच धर्मपारायण होतो.</u> आपल्या मूल्यांचा आपण आदर करायला लागतो आणि चारित्र्यवान, ईमानदार, अहिंसावादी, तसेच आंतरिक रुपात करुणामय होतो. आपल्या आत हे सर्व गुण इतक्या प्रकर्षाने दिसू लागतात की आपण परावर्तित होतो (आपल्यात परिवर्तन येते) नवे रुप धारण करतो ते अत्यंत धर्मनिष्ठ, संतांप्रमाणे असते.

<u>दुसरेचक्र (स्वाधिष्ठान)</u> हे चक्र जेव्हा प्रकाशित होते तेव्हा आपल्यात सृजनात्मक (नवनिर्मिती) आश्चर्यकारकपणे विकसित होते. स्वाधिष्ठान चक्राचा डावाभाग आपल्याला परमेश्वरी नियमांचे ज्ञान प्राप्त करुन देतो. हे नियम कसे कार्य करतात, शक्तींचा उपयोग कसा करुन देता येईल, हे ही समजते. स्वाधिष्टानचक्र नाभीच्या मध्यात असणाऱ्या नाभीचक्रातून उगम पावते. हे चक्र कमळाप्रमाणे भवसागरात फिरत असते. हे चक्र जेव्हा डाव्या बाजूस येते, (डावे स्वाधिष्ठान) तेव्हा डाव्या भागातील व्याधी, बाधा दूर करते. तसेच प्रकाशित स्वाधिष्ठान चक्र उजव्या बाजूस जाते तेव्हा सरळ पिंगला नाडीशी जोडले जाते आणि मानवी बुद्धि अत्यंत विवेकी संतुलित, चेतनामय स्वरुपात परावर्तित करते.

भविष्यवादी जे लोक आक्रमक असतात. प्रचंड व्यवहार करतात. लोक त्यांच्यावर प्रहार करतात (नावे ठेवतात) अशा लोकांना अनेक रोगांचा सामना करावा लागतो.

लिव्हरची दुखणी, जुनाट बद्धकोष्ट, अस्थमा, भयंकर हृदयविकार, पक्षाघात, मधुमेह, रक्त कॅन्सर, इ. रोग. प्रचंड व्यवहारामुळे उजव्या अनुपयोगी सहनशीलतेमुळे झालेले रोग कुंडलिनीच्या मदतीने बरे होऊ शकतात. कारण जेव्हा कुंडलिनी जागृत होते तेव्हा ती मध्यावर चित्ताला खेचते. तेव्हा व्यक्ती मोठेपण व लज्जा सोडून अत्यंत संतुलित व्यक्तिमत्त्वात येते. इतकेच नव्हे तर अहं (मी म्हणजे कोण) शी संबंधित सवयीही सुटतात.

पराआधुनिक युग

या स्वाधिष्ठान चक्रात आपले चित्त आहे. या चक्रातून चित्ताला बाजूला करुन स्वतःत सामावून घेते. जसे तुम्ही कल्पना करा की एखाद्या कापडात माझा हात लपेटला आहे. तुमचे जे चित्त आहे तुम्हाला आश्चर्य वाटते ते तुमच्या पोटात राहते. तुमच्या मस्तकात नाही. परंतु ज्ञान आपल्या मस्तकातून होते. या चित्तामुळेच कुंडलिनी वर वर चढते.

प. पू. श्री माताजी - २२.०३.१९७९

पाठीच्या कण्यावर उरोस्थि (sturnumbone) च्या मागे मध्य नाडी तंत्रावर (सुषुम्ना नाडीवर) जे चक्र आहे त्याला अनाहत किंवा हृदयचक्र म्हणतात. त्या चक्राची दोन उपचक्रे आहेत. डाव्या बाजूस असलेले हृदयचक्र हृदयावर लक्ष देते. याच चक्रात सर्वशक्तिमान परमात्मा आत्म्याच्या रुपात प्रतिबिंबित आहे. आत्मसाक्षात्कार (कुंडलिनी जागरण) झाल्यानंतर आत्मा चित्ताला प्रकाशमान करतो.

पराआधुनिक युग

हृदयात आत्म्याच्या स्वरुपात श्री शिवजींचा वास आहे. यासाठी मी नेहमी उदाहरण देते. ज्याप्रमाणे लाईटमध्ये (Light) एक छोटा दिवा जळत असतो. त्यात एक छोटी फ्लिकर जळत असते. जेव्हा लाईट येते किंवा गॅस येतो समजा कुंडलिनी वर उठते. तुमची कोणती (चेतना) अजून प्रकाशित झाली नसेल तर कसेही करुन

तिला हृदयाजवळ न्यायला हवे आणि हृदयात शिवाचे स्थान आहे. खरेतर सदाशिवाचे पीठ डोके आहे. स्थान हृदय पण पीठ येथे आहे. कुंडलिनी जशी येथे स्पर्श करते त्याबरोबर हृदय प्रकाशमान होते. हे आहे सदाशिवाचे स्थान. ज्याला आपण म्हणतो ब्रम्हरंध्राच्या वर सदाशिवाचे स्थान आहे. जशी कुंडलिनी तिथे स्पर्श करते आपली चेतना प्रदीप्त (अलोकित) होते. तेव्हा परब्रम्ह तुमच्यातून वाहू लागते. हे जे प्रवाहित होते ते साक्षात ब्रम्ह असते.

हे ब्रम्ह तुमच्या आतून प्रवाहित होते. ब्रम्ह आत्म्याचा प्रकाश आहे. आत्मा परमात्म्याचे प्रतिबिंब आहे. सावली आहे.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - ०३.०१.१९७८

हृदयचक्राच्या वर एक अन्य चक्र आहे. ज्याला 'विशुद्धी चक्र' म्हणतात. ते पाठीच्या कण्यावर खांद्याच्या उतारावर दोन्ही ग्रीवाअस्थी (सर्वायकलबोन) च्या मध्ये स्थिर आहे. सामूहिक रुपात हे चक्र संचारणासाठी आहे. हे चक्र उजव्या बाजूस अधिक गतिशील होते तेव्हा व्यक्तीचे बोलणे आक्रमक व अहंकारपूर्ण होते.

लोक जेव्हा हीनभावनाग्रस्त होतात तेव्हा विशुद्धी चक्राचा डावा भाग अडचणीत येऊ शकतो. अशी व्यक्ती अत्यंत लाजाळू भित्रट व चलाख होते.

कुंडलिनी जागृत होऊन या चक्राचे सारे दोष दूर करते.

## खेचरीमुद्रा –

विशुद्धी चक्रावर कुंडलिनी विशुद्धीला उघडते. जेव्हा कुंडलिनी विशुद्धीतून जाते तेव्हा तिचा प्रवाह चालू राहण्यासाठी जीभ थोडीशी ओढली जाते. या कार्यास 'खेचरी' म्हणतात. लोक जेव्हा गहन ध्यानात असतात तेव्हा ते अचानक खेचरी मुद्रेत जातात.

या अवस्थेत जर तुम्ही जीभ हलवली तर टाळूतून एक अमृताचा प्रवाह सुरु होतो व तो प्रवाह जीभेला थंड करतो.

प. पू. श्री माताजी - ०८.०४.१९९१

भुवयांच्या मध्ये विशुद्धी चक्राची एक अन्य शाखा आहे. त्यास हंसाचक्र म्हणतात. हे चक्र विवेकाचे चक्र आहे. आत्मसाक्षात्कारा (कुंडलिनी जागरण) नंतर प्रकाशित झाल्यावर ती दिव्य विवेक प्रदान करते. अविवेकीपणे जेव्हा व्यक्तीस निर्णय घ्यायची वेळ येते तेव्हा सायनस किंवा अर्धशिशी होऊ शकते..

(मस्तिष्क) माथ्यावर (Optic Chiasma) च्या चौकामध्ये आज्ञाचक्र आहे. या चक्राच्या दोन पाकळ्या आहेत. आत्यंतिक विचारामुळे या चक्राच्या उजव्या बाजूस समस्या होऊ शकतात. अहं चा फुगा माथ्याच्या उजव्या बाजूस फुगत राहतो आणि विवेकास झाकून टाकतो. लहानपणापासून आपल्यावरील बंधने मेंदूच्या उजव्या बाजूस जातात आणि समस्या सुरु होतात.

कुंडलिनी आज्ञाचक्र ओलांडून जाते. तेव्हा आपण निर्विचार होतो.

टाळू क्षेत्रात अंतिम चक्र आहे. त्यावर टाळू अस्थि आहे. (टाळूचे हाड). ज्याचे भेदन आमचे अंतिम भेदन, ब्रम्हरंध्र भेदन, हे सहस्त्रारचक्र महत्त्वपूर्णतम आहे. सहस्त्रार चक्राला एक हजार पाकळ्या आहेत. म्हणजे एक हजार नसा (नाड्या) आहेत. हे चक्र जेव्हा जोतिर्मय होते तेव्हा या नाड्या शांतपणे तेवणाऱ्या ज्योतींप्रमाणे चमकतात.

सातव्या चक्राला पार करीत कुंडलिनी टाळू अस्थि भेदन करते. तेव्हा पुन्हा एकदा शैशवकालाप्रमाणे थोडी कोमल होते आणि परमेश्वरी प्रेमाच्या सर्वव्यापक शक्तीशी कुंडलिनी जोडली जाते. त्याचा परिणाम म्हणून हाताच्या बोटाच्या टोकावर, नंतर हातावर, टाळूवर चैतन्याच्या थंड लहरींचा अनुभव करु लागतो. अशाप्रकारे आपण प्रथमच प्रेमाच्या शक्तीचा अनुभव घेतो.

पराआधुनिक युग

सहस्त्रार हे सहस्त्र नसांनी (नाड्यांनी) बंधीत आहे. त्यांना छेदून टाळूतून कुंडलिनी वर निघते तेव्हा ती सर्वव्यापी शक्तीत एकरुप होते. त्यावेळेस हातातून

हृदय चक्राची स्पंदने सुरु होतात. कारण सदाशिवाचे स्थान आमच्या माथ्यात आहे आणि तोच शीव आमच्या हृदयात स्थानापन्न आहे. जसा तिथे प्रकाश होतो हृदयातून आत्म्याचा प्रकाश आपल्या अंतरात वाहू लागतो आणि अनुकंपानाडी तंत्र आपण नियंत्रित करतो. एकदम आपल्याला वाटते थंडथंड हवा सुरु झाली. ह्या चक्राचे उघडणे अतिशय महत्त्वाचे आहे. जो पर्यंत हे चक्र उघडत नाही तोपर्यंत सहस्त्राराला कुंडलिनी छेदू शकत नाही आणि आपण पार होऊ शकत नाही.

प. पू. श्री माताजी - २३.०३.१९७९

आपल्या आतील कुंडलिनी तुम्हाला ओळखते. उन्मादात, आवेगात, सौख्यात तुम्हाला बघून ती उत्तेजित होते व बाहेर येते. तुम्हाला हे जाणवते. तसा अनुभव येतो. पण हे अनुभव अतिशय अस्थिर असतात. त्याची अस्थिरता टिकाऊ नसते कारण तुमच्यात अनेक दोष असतात. जसा पूर येतो नदी पुढे पुढे जाते आणि मार्गातील खड्डे भरुन जातात. त्याचप्रमाणे जागृत कुंडलिनी तुमचे अनेक आजार, रोग, काळज्या, कष्ट ठीक करु लागते. एक वेळ अनुभव आल्यानंतर पुन्हा पुन्हा तसे अनुभव घ्यावे लागतात.

एकदा सहस्त्राराचे भेदन झाले की ब्रम्हरंध्र उघडले जाते. तेव्हा तुम्ही परमेश्वराच्या चैतन्याला अनुभवू लागता. हे चैतन्य कुंडलिनी नव्हे. जे चहूबाजूस व्यापलेले आपल्या डाव्या आणि उजव्या बाजूला नाड्यांना शांत करते आणि त्यामुळे आपली चक्रे उघडतात. कुंडलिनीचे अधिकाधिक तंतू या चक्रांना भेदू लागतात. भेदन करतात.

प. पू. श्री माताजी - ०६.०५.२००२

कुंडलिनी इतकी सुहृदय, मधूर, भली आणि प्रभावी आहे की, ती आमच्या जीवनास अर्थ देते. आमच्या इच्छांची पूर्तता करते. आम्हाला अशा उंचीवर घेऊन जाते जेथून पूर्ण ब्रम्हांडाला अखंड रुपात बघू लागतो. कुंडलिनी आपल्याला सामुदायिक चेतना प्राप्त करुन देते, एकटी कुंडलिनी हे सर्व कार्य करते. <u>जर ती एखाद्या चक्रावर गेली आणि त्या चक्राच्या देवतेला जागृत केले नाही तर त्या चक्राचे</u>

फळ आम्हाला प्राप्त होणार नाही. हे सर्व कार्य कुंडलिनीचे आहे. तिच्या समजउमजेमुळे आणि विवेकामुळे आपल्याला ही सुंदर अवस्था प्राप्त होते आणि आपण स्वत:ला योगी म्हणवितो.

आमचे शारीरिक, मानसिक, भौतिक सर्व अस्तित्व चक्रांवर अवलंबून आहे. ते आमचे शक्तिदायक स्त्रोत आहेत. समजा तुमची चक्रे खूप काम करताहेत, तुमचे नाडी तंत्रही खूप काम करत आहे. वापरुन वापरुन ते संकुचित झाले आहे. (संकिर्ण) चक्रे आक्रसली गेल्यास त्यांची शक्ती कमी होईल किंवा ती तुटून जातील. चक्रे तुटल्यावर तुमचा जो संपूर्णाशी संबंध आहे तो तुमच्या मेंदूतून तुटला. अलग झाला. त्यामुळे तुम्ही एकाकी, वेगळे अलग झालात. याला म्हणतात मॅलीग्नेंट, कॅन्सर तुम्हाला झाला. आता कुंडलिनी काय करते? जसे आपण दोऱ्यात मोती ओवतो तशी हळूहळू कुंडलिनी प्रत्येक चक्रावर डाव्या उजव्या दोन्ही जाताना दोन्हीतून सरळ निघून वर जाते. यामुळे ती चक्रे पुन्हा पल्लवीत कार्यान्वित होतात. पुष्ट होतात, एकमेकांना जोडले गेल्याने त्यांचा संबंध मेंदूशी (मस्तिष्क) सुरु होतो आणि परमचैतन्याशीही होतो.

एकवेळ हा संबंध नीटपणे जोडला गेला की त्यानंतर कोणीही आजारी पडत नाही. जर कोणी सहयोगी असेल तर त्याला कोणता आजार होणार नाही. आत्मसाक्षात्कारानंतर तुम्हाला चक्रांची अनुभूती येते. जाणीव येऊ लागते आणि यालाच म्हणतात 'आपले ज्ञान स्वयंज्ञान!'.

प. पू. श्री माताजी - २२.०३.१९९३

जेव्हा कुंडलिनी चक्रांना छेदत ब्रम्हरंध्रांपर्यंत पोहोचते तेव्हा तिच्या उत्थानामुळे प्रत्येक चक्रात कल्पना नाही इतक्या अनेक हालचाली सुरु होतात.

प. पू. श्री माताजी - १६.०२.१९८५

कुंडलिनी जेव्हा उठते तेव्हा सर्व चक्रातून येते आणि त्यांना स्पर्श करते. चिकित्साविज्ञानात याला प्लेक्सेस (केंद्र) च्या रुपात ओळखले जाते. त्याच्या खालीच ही सूक्ष्म चक्रे असतात. चक्रे प्रकाशित झाल्यावर तुम्ही आत्मसाक्षात्कारी

होता. तुम्ही स्वतः सामूहिक चैतन्यात येता. याद्वारे तुम्ही मानसिक, भावनिक आणि आध्यात्मिक सामंजस्य प्राप्त करु शकता. कारण सर्व केंद्रे जागृत होतात आणि जीवनाच्या चारी पैलूंना प्रकाशित करतात. तुम्हाला पूर्णत्वाकडे घेऊन जातात. त्यामुळे सामूहिक चैतन्यात तुम्ही आपले पूर्णत्व शोधता.

प. पू. श्री माताजी - १५.११.१९७९

ब्रम्हरंध्राचे छेदन आमच्या हृदयात आहे. याचा अर्थ असा की, आपल्या हृदयात परमेश्वराला भेटण्याची (मिळविण्याची) इच्छा निर्माण होणार नाही तोपर्यंत हे भेदन योग्य होणार नाही. हे सर्वकाम हृदयाचे आहे. हे समजून घ्यायला हवे. तुम्ही लोकांनी बुद्धिने ही बाब समजून घेतली. बुद्धिने समजावून घेतले हे चांगले झाले. परंतू जोपर्यंत ती हृदयापासून येणार नाही, जोपर्यंत ती हृदयापासून (मनापासून) पल्लवित होणार नाही तोपर्यंत आपल्या अंग प्रत्यंगात वसणारी ही गोष्ट नव्हे. पण हृदयात आपल्या आत्म्याचे स्थान आहे. म्हणून हे समजून घ्यायला हवे की, हृदयाला छेदण्यासाठी प्रथम आपण हृदयाची दारे उघडूया. जेव्हा कुंडलिनी वर जाऊन सहस्त्राराला भेदते तेव्हा आपण सर्व ज्ञानाचे अधिकारी होतो. ज्ञानाचे धनी होतो.

प. पू. श्री माताजी - १६.०२.१९८५

जरी कुंडलिनी शक्तीचे ज्ञान भारतात हजारो वर्षांपासून उपलब्ध होते तरी परंपरागत कुंडलिनी जागृती केवळ वैयक्तिक स्तरावर केली गेली. एक गुरु केवळ एक शिष्यास जागृती देत असे. त्या जागृतीमुळे व्यक्तीला आत्मसाक्षात्कार, अमरत्व प्राप्त होत होते.

प.पू.श्री माताजी - १३.०९.१९९५

कुंडलिनीची ही शक्ती तुमच्या आत विद्यमान आहे. आपण फक्त त्याचा उपयोग करुन घ्यायचा आहे. तुमचा अहंकार (अहं) आणि बंधनांनी तिला झाकून टाकले आहे. आपल्या कुंडलिनीला पुढे जाऊ द्या. ती तुम्हाला हे दाखवून देईल की, तुम्ही किती महान आणि मोठे आहात. मी (माताजी) काही करीत नाही. सर्व कार्य आपली कुंडलिनीच करते.

प. पू. श्री माताजी - २१.०३.१९९४

आता 'कुंभ' नावाच्या पर्वाचा प्रारंभ झाला आहे. पवित्र व आध्यात्मिक जल घेऊन चालणे हे कुंडलिनीचे कार्य आहे. कुंभ हे कार्य पूर्णत्वास नेणारा घडा आहे. कुंडलिनीचे कार्य त्या जीवनरसाप्रमाणे आहे. वृक्षातील जीवनरस वरवर चढतो, वृक्षाच्या प्रत्येक भागाचे पोषण, संगोपन करतो, पण झाडाच्या कोणत्याही भागाशी बांधील रहात नाही. (तटस्थ राहतो).

प. पू. श्री माताजी - सहजयोग

❋ ❋ ❋

# प्रकरण – ९

## तत्त्व

आज तुम्हाला तत्त्वाची गोष्ट सांगते. जर आपण वृक्षाकडे बघितले तर त्याचे उंच वाढणे, वरवर जाणे, बघितले तर हे लक्षात येते की, या झाडात अशी कोणतीतरी शक्ती विद्यमान आहे किंवा प्रभावित आहे, ज्यामुळे हे झाड वाढते आहे आणि आपल्या पूर्ण वाढीकडे अग्रेसर आहे. ही शक्ती झाडाच्या आत कार्य करते. नाहीतर हे कार्य होऊ शकले नसते. पण ही शक्ती झाडाने कुठून आणली? त्याचे तत्त्व, मर्म काय आहे? ज्या बाबी बाह्य जगात दिसतात त्या म्हणजे प्रत्यक्ष वृक्ष दिसतो, त्याची पाने, फुले, फळे दिसतात. पण हे काही कोणते तत्त्व नव्हे. या तत्त्वावर ही गोष्ट आधारीत नाही. ती गोष्ट यापेक्षा सूक्ष्म आहे. त्या सूक्ष्माला तर आम्ही बघू शकत नाही. जर ते साकार स्वरुपात असते तर दिसले असते पण ते निराकार स्वरुप आहे. जसे झाडाच्या आत असणारे पाणी. पण तेही झाडाचे तत्त्व नव्हे पण ते झाडाची वाढ करीत आहे. झाडात वाहते. पाणी पण त्या शक्तीला आपल्या आत वाहून नेते. पण पाणीपण झाडाचे तत्त्व नव्हे. कारण पाणी जर तत्त्व असते तर दगडावर पाणी घातल्यावर त्यातून झाड जन्माला यायला हवे पण दगडातून झाड उगवत नाही. म्हणून तत्त्वाबाबत असे म्हणता येते की, प्रत्येक गोष्टीचे आपआपले तत्त्व असते. पाण्याचे आपले तत्त्व आहे, झाडाचे आपले तत्त्व आहे आणि दगडाचेही आपले एक तत्त्व आहेच.

त्याचप्रमाणे मानवाचेही आपले एक तत्त्व आहे. प्रिन्सिपल आहे. ज्याच्या पायावर (base) तो चालत आहे. मोठा होत आहे. त्यामुळे मानवाची उद्दिष्टप्राप्ती होते.

हे तत्त्व एकच नसते. जसे पाण्यापासून झाड वाढते पण दगडावर पाणी घातले तर झाड उगवत नाही हे आपण बघितले. जर बी पाणीतत्त्वामुळे उगवते, [illegible] तर बी धरणीमातेला शरण का जाते? जर धरणीमातेमुळे सारे कार्य सफल होत

असेल तर मातीत ते दगड आहेत त्याच पीक मातीतून का येत नाही? याचा अर्थ अनेक तत्त्वात एक तत्त्व आहे. पण तत्त्वे अनेक आहेत.

ही जी अनेक तत्त्वे आहेत ती एकात सामावली आहेत. जी अनेक तत्त्वे आहेत ती आमच्यात सामावलेली आहेत. वेगवेगळ्या चक्रांवर त्यांचा वास आहे पण एकाच शरीरात सामावले आहेत आणि एका बाजूसच त्यांचे कार्य चालते. त्यांचे लक्ष्यही एकच आहे आणि एकच गोष्ट त्यांना मिळवायची आहे.

ज्याप्रमाणे मूलाधार चक्रावर गणेशतत्व आहे. ते गणेशजीचे तत्त्व आहे. गणेशतत्त्वामुळे तुम्ही आम्ही पृथ्वीवर बसलेलो आहोत. पडत नाही. जर आमच्यात गणेशाचे तत्त्व नसते तर आपण पृथ्वीवर टिकलो नसतो. पृथ्वी इतकी जोरात फिरते आहे. त्या गतीत आपण पृथ्वीवर चिकटून राहिलो नसतो. कोणी म्हणेल की 'माँ पृथ्वीच्या आतच हे गणेश तत्त्व विद्यमान आहे' ही गोष्टही खरी आहे. पृथ्वीतील गणेशतत्त्वामुळेच आपण पृथ्वीवर घट्ट स्थिर आहोत. पडत नाही. फेकले जात नाही. पृथ्वीचा जो आस आहे (axis) त्या आसावर हे (गुरुत्वाकर्षणाचे) तत्त्व विद्यमान आहे. तसे बघितले तर axis किंवा आस ही आभासी संकल्पना आहे. प्रत्यक्षात असा आस अस्तित्वात नाही.. ती एक भौगोलिक कल्पना मात्र आहे. मात्र अशी मान्यता आहे की, या तत्त्वाची जी शक्ती आहे ती या रेषेवर (आस) चालते. ते तत्त्व आमच्या आत राहते त्यामुळे आम्हाला दिशांचे भान येते.

आमची सूक्ष्मतंत्रात वाहिका आणि चक्रांवर या शक्तींची (तत्त्वे) स्थापना केली आहे. (त्याचे वर्णन पुढे येईल)

प. पू. श्री माताजी - १५.०२.१९८१

***

# प्रकरण१०

## नाड्यांवरील स्थापित शक्ती

ईडानाडी :

१) श्री महाकाली:

सर्वप्रथम आदिशक्तीची अभिव्यक्ती डाव्या बाजूला होते. ही महाकालीची अभिव्यक्ती आहे. महाकालीची शक्ती आपल्या (मानव शरीर) डावीकडे ईडानाडीतून प्रवाहित होत असते.

आपल्याला महाकाली काय करते याचे ज्ञान नाही. पहिले कार्य ती जे करते ते म्हणजे आमचे रक्षण करणे. तुम्ही कुठेही असा तुम्ही हवे ते करत असाल, कोणत्याही संकटात तुम्ही अडकले असाल महाकाली तुमचे संरक्षण करते. ती तुमच्या आत विद्यमान आहे. ती तुमच्या जीवनाचे रक्षण करते. तुमच्या शरीराच्या सर्व अवयवांचे संरक्षण करते. तिच्या साम्राज्यात तुम्ही स्वतःला सुरक्षित समजता.

वास्तविक ती पथप्रदर्शक शक्ती आहे. तीच आम्हाला आमचे अस्तित्व देते. तीच आम्हाला आराम, झोप, सत्य प्रदान करते. ती आपल्याला सत्य आणि असत्य समजावते. कधीकधी अहंकारी लोक माझेच खरे असे समजतात. तेव्हा मायेची सृष्टी दूर करुन सत्य उजेडात आणते. ती मायासृष्टी बघून आपण विचारात पडतो की, हे असे काय झाले? ती भ्रांती होय. भ्रांती आपल्याला मायेत फसवते व मुक्तही करते. आपण सर्व समस्या तिच्यावर सोडल्या तर त्या अडचणींचे निराकरण होते. एवढेच नाहीतर तिचाआशीर्वादही मिळतो. हे आशीर्वाद शारीरिकच नाही तर ते आपल्याला चिंतामुक्त करते, भयंकर आजारातून मुक्त करते. आपण अहंकारी असलेले तिला आवडत नाही. आपण अहंकार करु नये अशी तिची इच्छा आहे. आपल्यातील मालकत्व, देखभाल करणे, अबोधितांना प्रेम यांची देखभाल करणे हे महाकालीचे कार्य होय.

प. पू. श्री माताजी, कबेला - १७.१०.१९९९

जोपर्यंत महाकाली तत्त्व प्रकट होत नाही तोपर्यंत डावीकडील पकड जात नाही. डावीकडे पकड असण्याचे कारण काय? पहिले कारण तुम्ही भूतकाळात जास्त रमता. त्याचा जास्त विचार. दुसरी गोष्ट माझे वडील असे होते तसे होते याचा विचार करतो. अशा लोकांना ठीक करण्यासाठी महाकाली आहे. महाकाली तत्त्वामुळे हा वेडेपणा कमी होतो. सुटतो. महाकालीचे एक स्वरुप अतिशय भयंकर आहे. जे लोक भूतपिशाच्च बाधा झाली आहे. ती भूते चलाख आहेत मला महाकालीच्या रुपात ओळखतात. जे भूतग्रस्त लोक असतात ते माझ्यासमोर थरथर कापतात कारण त्यांना पिशाच्च महाकालीचे रुप प्रत्यक्ष दिसते. अहंकाराचे भूत आपल्याला लागले तर त्यालाही महाकालीचेच रुप दिसेल. खोट्या गुरुंपासून मुक्त करण्यासाठी महाकालीची गरज आहे. बाधा पळवून लावण्यासाठी महाकालीचे रौद्र स्वरुप आवश्यक आहे. एकादशरुद्रामध्ये जे अकरा रुद्र आहेत त्यांच्यामध्ये महाकालीची शक्ती आहे.

महाकाली स्वरुपात उपयोग कलियुगात केला नाही तर सहजयोग होणार नाही. कारण राक्षसशक्तींमुळे सर्व चक्रांवर पकड येते आणि चक्रे ठीक केल्याशिवाय कुंडलिनी वर चढत नाही. महाकाली कौतुकास्पद, वंदनीय आहे. ती कुणाला शारीरिक, मानसिक भौतिक हानी पोहोचवीत नाही. तिच्यामुळे वाईट गोष्टी दूर होतात, पळून जातात.

प.पू. श्री माताजी, जयपूर - ११.१२.१९९४

श्री महाकाली आनंददायी आहे. आपल्या भक्तांना आनंदित बघून ती प्रसन्न होते. आनंद हा तिचा गुण व शक्ती आहे. सर्व चक्रांवर आनंद आपण अनुभवतो ती महाकालीची देणगी होय.

प.पू. श्री माताजी, फ्रान्स - १२.०९.१९९०

श्री महाकाली दोन प्रकारे कार्य करते. एक ती फार प्रेमळ आनंदी खूष आहे. दुसरीकडे अतिक्रूर, क्रुद्ध, रागीट राक्षसीवृत्तीची आहे. आम्ही जाणतो की, महाकालीने अनेक राक्षसांचा संहार केला. अजूनही काही राक्षस आहेत. मला

विश्वास आहे की, तेही समाप्त होतील त्यातील एकही जिवंत राहू शकणार नाही. आपल्याला यात परिपक्व व्हायचे आहे. तेव्हाच राक्षसी प्रवृत्ती असणाऱ्यांबद्दल समजेल. आपले चित्त प्रकाशित झाले आहे त्यातून हे दोष शोधता येतील. आपण काय करायचे. फक्त ध्यानधारणा करुन प्रार्थना करायची आहे की,हे महाकाली कृपाकरुन दुष्टांचा वध करा. हे तिचे कार्य आहे. असे कार्य केल्याने ती प्रसन्न होते. जोपर्यंत तुम्ही प्रार्थना करीत नाही तोपर्यंत तिचे लक्ष तिकडे जाणार नाही. व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरुपात तिला विनंती करा. तिची पूजा करणे, जागृत करणे हे आपले कर्तव्य आहे. ती सहजयोगांच्या बरोबर असते. तुम्ही काही केले तरी ती बरोबर असते दुर्घटना घडल्यास देखभाल करते. देवदूताप्रमाणे सदैव तुमच्या मागे असते.

प.पू.श्री माताजी, कबेला - १७.१०.१९९९

जेव्हा महाकाली अत्यंत शांत होते तेव्हा ती गृहलक्ष्मी होते. महाकालीची शक्ती जी स्त्री मधील शालीनतेच्या स्वरुपात प्रकट होते. जोपर्यंत स्त्रीमध्ये शालीनता कार्यान्वित होत नाही तोपर्यंत गृहलक्ष्मीची शक्ती गृहिणीमध्ये प्रगट होत नाही. आपण फातिमाबी ला मानतो. ती गृहलक्ष्मीचे सिंहासनावर विराजमान आहे. महाकालीच्या या शक्तीमुळे स्त्री आपल्या मुलांना योग्य मार्गावर ठेवू शकते. आपले चारित्र्य उज्ज्वल राखते.

शालीन स्त्रीमध्ये हास्य प्रस्फुटित व्हायला हवे. (तिच्या चेहऱ्यावर हास्य दिसायला हवे). काही गोष्टी ती हसण्यावारी नेते आणि हसून हजारो प्रश्न ठीक करते.

प. पू. श्री माताजी, जयपूर - ११.१२.१९९४

श्री महाकालीला प्रकाश आवडतो. तिची पूजा म्हणून रात्री करतात. कारण रात्री आपण दीप लावू शकतो. महाकाली माणसाला जोतिर्मय (प्रकाशमान) करते. तिला ज्या ज्या गोष्टी चमकदार आहेत त्या आवडतात.

तुम्ही महाकालीच्या प्रत्यक्षमूर्तीचे ध्यान करु शकता. तिची प्रार्थना करु शकता. आपल्या मुलांनी आपली पूजा करावी हे देवीला खूप आवडते. त्या स्तरावर ती तुमच्याशी एकरुप होते आणि आपली करुणा, प्रेमाचा वर्षाव करते.

प. पू. श्री माताजी, कबेला - १७.१०.१९९९

तुम्ही अत्यंत पवित्र प्रकारे सहजयोग केला पाहिजे. जणू काही लहान शिशूप्रमाणे आपल्या मातेची पूजा करीत आहात. जसे लहान बाळ आपल्या आईवर प्रेम करते. हा अत्यंत सहज संबंध आहे जो आपण विसरुन गेलो आहोत. आम्ही आमच्या आईवर कसे प्रेम करावे? तिचे मार्गदर्शन कसे मिळवावे? तिच्या सुरक्षित छत्राखाली कसे राहावे? ह्या अतिशय साध्या सोप्या गोष्टी आहेत. मी माझ्या लहानपणीच ह्या गोष्टी समजून घेतल्या होत्या. जर तुम्ही खरेच आईची पूजा करु इच्छिता तर तुमच्यात ते निरागस बालपण पुन्हा परतून यायला हवे.

प. पू. श्री माताजी, कबेला - १७.१०.१९९९

श्री महाकाली तुम्हाला दृढ राहण्याची शक्ती देते. जेव्हा आम्हाला आत्मसाक्षात्कार प्राप्त होतो तेव्हा महाकालीचे प्रगटीकरण (तुमच्यात) सुरु होते. महाकालीत शुद्धिकरणाची शक्ती आहे. तीं स्वतः पवित्र शक्तीच्या रुपात राहते. तीच कुंडलिनी आहे तीच महाकाली शक्ती होय.

प. पू. श्री माताजी, फ्रान्स - १२.०९.१९९०

***

आपल्यात तीन प्रकारच्या शक्ती विराजित असतात. पहिली शक्ती इच्छाशक्ती, जर परमात्म्याची इच्छा नसती तर हे जग तयार केले नसते. परमेश्वराच्या इच्छाशक्तीतूनच इतर इच्छांचा जन्म झाला. याच शक्तीला सहजयोगाच्या भाषेत महाकालीची शक्ती म्हणतात. याच शक्तीमुळे आज तुम्ही भक्तीचा रस घेत आहात. कारण मला इच्छा आहे की भक्ती करावी, भक्तीची मजा येऊ लागली आहे. भक्तीत रमावे, परमात्म्याची आठवण काढावी, त्याला साद घालावी, बोलवावे. हे मानवच करु शकतो, जनावरांना हे शक्य नाही. जनावर भक्ती करीत नाही. ती मानवच करु शकतो.

प.पू. श्री माताजी, नवी दिल्ली - १७.०२.१९८१

(२) **श्री भैरवनाथ**

मला असे वाटते की, भैरवनाथ जे ईडानाडीवर आहेत आणि खालीवर भ्रमण करतात त्यांचे महत्त्व जाणले नाही. ईडानाडी म्हणजेच चंद्र नाडी आहे. हा स्वत:ला शांत करण्याचा मार्ग आहे. उदाहरणार्थ, अहं आणि जिगरच्या उष्णतेमुळे तुम्हाला राग येतो. जेव्हा मनुष्य अतिशय रागात असतो त्यावेळेस भैरवनाथ क्रोध कमी करण्यासाठी युक्ती करतात. ते हनुमानाच्या मदतीने त्या रागावलेल्या माणसाला हे समजावतात की, रागावणे हा एक मूर्खपणा आहे. रागावणे चांगली गोष्ट नव्हे.

दुष्ट प्रवृत्तीची व्यक्ती सामूहिक नसते. उदास, अप्रसन्न, चिंतीत व्यक्तीला सामुदायिकतेचा आनंद घेणे अतिकठीण आहे. उलट रागीट, राजसी व्यक्ती इतरांनाही सामूहिकतेचा आनंद घेऊ देत नाही. मात्र स्वत: सामूहिकतेत राहण्याचा प्रयत्न करतो. ज्यामुळे त्याचे उत्थान होईल अशी व्यक्ती केवळ आपले महत्त्व दाखवू इच्छिते. त्यामुळे सामूहिकतेतला आनंद घेऊ शकत नाही. याउलट ज्या व्यक्ती नेहमी खिन्न राहतात, विचार करतात की, माझ्यावर कोणी प्रेम करीत नाही, कोणी माझी चिंता करीत नाही. अशा प्रकारच्या वाम प्रवृत्तीमुळे तुम्ही डाव्या बाजूस हानी पोहोचवता.

श्री भैरवनाथ हातात प्रकाशदीप घेऊन ईडानाडीच्या खालीवर धावत तुमचा मार्ग प्रकाशित करीत असतात. त्या प्रकाशात तुम्ही नकारात्मकता आहे की नाही हे बघू शकता. अनेक प्रकारे आपल्यात नकारात्मकता येते. एक नकारात्मक तत्त्व असे असते की, हे माझे मुल आहे. माझा पती, माझी संपत्ती अशाप्रकारे तुम्ही माझे, मला यात बुडून जाता. त्यामुळे तुमच्या मुलांमध्येही हा नकारभाव निर्माण होतो. पण तुम्ही सकारात्मक होऊ इच्छित असाल तर ते सोपे, सुगम असते. त्यासाठी तुम्ही हे बघायला हवे की, तुमचे चित्त कुठे आहे? प्रत्येक नकारात्मक गोष्टीतून सकारात्मकता शोधणे हे सहजयोगाचे वैशिष्टय आहे. नकारात्मकतेला काही अस्तित्व नाही. हे केवळ अज्ञान होय. अज्ञानाचेही कोणते अस्तित्व नाही. प्रत्येक गोष्ट सर्व

व्याप्त शक्ती मात्र आहे. मग अज्ञानाचे अस्तित्व असू शकते? पण जर तुम्ही या शक्तीच्या पटलामध्ये दडलात किंवा त्यापासून दूर पळून गेलात तर तुम्ही म्हणाल ही नकारात्मकता आहे. उदाहरणार्थ, तुम्ही स्वतःला एका गुहेत लपवले आणि गुहा चांगली बंद केली आणि म्हटले की, सूर्य नाही फक्त काळोख आहे. (ते लोक सामूहिक रहात नाहीत) मध्यममार्गी रहात नाही. एकतर डावीकडचे होतात किंवा डावीकडेच राहतात. डाव्या बाजूचे लोक नकारात्मकतेत सामूहिक होतात. जसे दारुडयांचा बंधुभाव. हे लोक शेवटी वेडेपणाच्या सीमेपर्यंत जातात. तर उजव्या बाजूचे लोक मूर्खपणा करु लागतात. (मूर्ख होतात).

जर एक सहजयोगी सामूहिक होऊ शकत नसेल तर त्याने हे समजायला हवे की, तो सहजयोगी नाही. श्री भैरवनाथ आम्हाला अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचे कार्य करतात कारण ते आमच्यातील भूतपिशाच्चांचे विचार आणि पिशाच्चांचा विनाश करतात. श्री भैरवनाथ श्री गणेशाशीही संबंधित आहेत. गणेश मुलाधारचक्रावर विराजमान आहेत. श्री भैरवनाथ डावीकडून उजवीकडे जातात. त्यामुळे प्रत्येक प्रकारची बंधने आणि सवयी यावर भैरवनाथांच्या मदतीने विजय मिळविता येतो. (सुटका करुन घेता येते) नेपाळमध्ये भैरवनाथाची एक मोठी स्वयंभु मूर्ती आहे. तेथील बरेचसे लोक डाव्या बाजूचे (बाईओर) आहेत आणि ते भैरवनाथाला घाबरतात. जर एखाद्याला चोरी करण्याची वाईट सवय असेल तर त्याला भैरवनाथापुढे उभे करतात. दिवा लावतात आणि त्यासमोर गुन्हा कबूल करतात आणि ही वाईट सवय सुटण्याची विनंती करतात. ह्या वाईट सवयी सुटण्यासाठी भैरवनाथाची मदत मिळते. अयोग्य आणि धूर्ततेपासूनही भैरवनाथ आपले रक्षण करतात. जे काम आपण अत्यंत गुप्तपणे करतो तेही भैरवनाथापासून लपून राहत नाही. चुकीच्या सवयींपासून तुम्ही तुम्हाला दूर केले नाही, तर भैरवनाथ तुमच्या या सवयी, व्यसने उघडकीस आणतात. ते सर्व सार्वजनिक करतात. यानुसार त्यांनी सर्व भयंकर गुरुंचाही बुरखा फाडला आहे.

नंतर श्री भैरवनाथांनी महावीराच्या रुपात अवतार घेतला. लोक नरकात पडू नये म्हणून ते नरकाच्या दारावर उभे राहतात. नरकापासून लोकांना वाचवतात पण ज्यांना नरकात पडायचेच असेल त्यांना थांबवित नाहीत. आपण आपल्या नकारात्मकतेला सोडण्याचा प्रयत्न केला तर ते चांगले. इतरांमध्ये मिसळणारे, इतरांवर प्रेम करणारे लोक बना. दुसरे तुमच्यासाठी काय करतात याचा विचार करण्यापेक्षा तुम्ही इतरांसाठी काय केले, काय करु शकता हा विचार करा. आपण श्री भैरवनाथाची प्रार्थना करु या की, ते आम्हाला हास्य, आनंद व चंचलता देतील.

प.पू. श्री माताजी, कारटेल, इटली - ०६.०८.१९८९

## पिंगला नाडी

श्री महासरस्वती:

प्रेमाने सर्व प्रकारची सृजनात्मक कामे सफल होतात. जसजसे प्रेम वाढेल तुमच्या नवनिर्मितीच्या गुणांचा विकास होत जाईल म्हणजे प्रेमच श्री सरस्वतीच्या सृजनाचा आधार आहे. जर प्रेम नसते तर नवनिर्मितीही नसती.

उजव्या बाजूची सरस्वतीची सर्व कार्ये (गतिविधी) मूलतः प्रेमाने समाप्त होतात. प्रेमाने आरंभ आणि प्रेमाने समाप्ती. ज्या गोष्टीचा शेवट प्रेमाने होत नाही तो शेवटी नष्ट होते. बस लुप्त होतो.

आता ज्या प्रेमाबद्दल आपण बोलतो. आपण परमात्म्याच्या प्रेमाबद्दल बोलतो. हे आपण नक्कीच चैतन्यलहरींच्या माध्यमातून समजू शकतो. लोकांमध्ये चैतन्यलहरी नसतात तरी ते अचेतना अवस्थेत चैतन्यलहरींचा अनुभव घेऊ शकतात. विश्वातील सर्व महान चित्रकृतीमध्ये चैतन्य आहे. जगातील सर्व सृजनात्मक कार्यात चैतन्य आहे. ज्या कलाकृतीत चैतन्याचा वास आहे त्या आजपर्यंत टिकून आहेत. ज्यामध्ये चैतन्य नव्हते त्या काळाच्या आड गेल्या (नष्ट झाल्या). थोडक्यात जे काही दीर्घायुषी आहे, पोषक आहे आणि श्रेष्ठ आहे ते या प्रेम व विवेकामुळेच आहेत. आमच्या अंतरात अत्यंत विकसित आहेत. परंतु हे इतरही काही लोकांमध्ये आहे जे आत्मसाक्षात्कारी नाहीत. शेवटी सर्व विश्वाला हे मान्य करावे लागेल की, व्यक्तीला परमात्म्याच्या परमप्रेमापर्यंत जायचे आहे. नाहीतर या विश्वाला काही अर्थ नाही.

मी म्हणेन पश्चिमेत विशेषत्वाने सरस्वतीची खूप पूजा केली आहे. भारतीयांपेक्षाही अधिक पूजा केली. कारण ते शिकण्यासाठी गेले आणि अनेक गोष्टी शोधून काढल्या. फक्त हे विसरले की, ती देवी आहे. परमात्मा देणारा (Giver) असतो. प्रत्येक गोष्ट देवीकडून येते. ही गोष्ट पाश्चात्त्य लोक विसरले आणि खूप समस्या निर्माण झाल्या. तुमच्या शिक्षणात आत्मा नसेल, देवीचा स्त्रोत नसेल तर शिक्षण व्यर्थ होय. त्यांना जर या गोष्टीची जाणीव झाली असती की, आत्मा कार्य

करीत आहे तर ते इतक्या दूर गेले नसते. भारतीयांनाही मी हाच इशारा देत होते की, तुम्ही लोक आता औद्योगिक क्रांतीला आपले लक्ष्य बनवीत आहात. पण तुम्हाला औद्योगिक क्रांतीच्या क्लिष्टतेपासून (अवघड) वाचायचे आहे (दूर राहायचे आहे). आत्मा जाणण्याचा प्रयत्न अवश्य करा. आत्मज्ञान प्राप्त केले नाही तर पाश्चात्त्यांना ज्या समस्या आल्या त्या तुम्हालाही सतावतील. कारण तेही मानव आहेत आणि तुम्हीही. तुम्हीपण त्याच मार्गावर चालणार. अचानक तुम्ही पळू लागाल आणि समस्या येतील. अगदी त्याच समस्या ज्या पश्चिमेकडील लोकांना आल्या.

सरस्वतीजींचे इतके आशीर्वाद आहेत की, इतक्या कमी वेळेत त्याचे वर्णन करता येणार नाही. सूर्याने आपल्याला इतक्या शक्ती प्रदान केल्या आहेत की, एक काय दहा प्रवचनांमध्ये सांगणे संभव नाही. पण आपण सूर्याच्या विरोधात जातो, सरस्वतीच्या विरोधात जातो. सरस्वती पूजनात तुमच्यात ही बाब मी स्पष्टपणे जाणली आहे. उदाहरणस्वरुप पाश्चिमात्य लोकांना सूर्य खूप आवडतो कारण त्यांच्या देशात सतत ढगाळ वातावरण असते. सूर्यदर्शन कमी होते. परंतु ते आपल्या सीमा तोडतात आणि आपल्यात सूर्यासंबंधी कठीण गोष्टी निर्माण करतात.

मुख्य गोष्ट ही की, व्यक्तीने सूर्याच्या माध्यमातून मिळवायची ती ही की, प्रकाश विवेक - अन्तर्प्रकाश. आज्ञाचक्रावर असलेल्या सूर्यचक्रावर येशू ख्रिस्त विराजमान आहे. त्यामुळे जीवनात पावित्र्य ज्याला आपण नीती म्हणतो ती अत्यंत आवश्यक होते. हीच जीवनाची नैतिकता होय. पश्चिमेत नैतिकता हा चर्चेचा मुद्दा झाला आहे. लोकांमध्ये पूर्ण नैतिकतेचा विवेक लोप पावतो आहे. चैतन्यलहरीवरुन तुम्ही हे समजू शकता. पण ते सर्व याच्या विरुद्ध गेले आहेत. जे लोक येशू ख्रिस्ताचे पुजारी आहेत, जे सरस्वतीला पूजतात, सूर्याला पूजतात ते सर्व विरोधात गेले. सूर्याची अवज्ञा करीत सूर्याच्या विरोधात गेले. कारण तुमच्यात जर नैतिकता आणि पावित्र्य यांचा विवेक नसेल तर तुम्ही सूर्य बनू शकणार नाही. सर्व काही स्पष्ट दिसण्यासाठी सूर्य स्वतः प्रकाश देत असतो. सूर्यात खूप गुण आहेत. सूर्यप्रकाशामुळे, सर्व ओल्या, घाणेरड्या, मळकट गोष्टी सुकतात. स्वच्छ होतात. परजीवी जंतू उत्पन्न करणाऱ्या

दमट, कुबट जागा प्रकाशामुळे स्वच्छ होतात. परंतु पश्चिमेत अनेक परजीवी जन्मतात, अनेक अघोरी पंथ आणि भयानक वस्तू पश्चिमेत आल्या आहेत. ते देश प्रकाशाने परिपूर्ण होणे आवश्यक होते मात्र ते त्याच अंध:कारात वावरत आहेत. आत्म्याच्या विषयी अंधार, प्रेमाच्या विषयात अंध:कार, आपल्या ज्ञानविषयी अंध:कार, जिथे प्रेमप्रकाश व्हायला हवा होता तिथे या तिन्ही गोष्टींचे साम्राज्य आहे. प्रकाशाचा अर्थ नेहमी स्थुलमानाने दृष्टीने घेतला जातो तो नव्हे हे लक्षात घ्या.

प्रकाशाचा अर्थ आहे - अंतर्प्रकाश - प्रेमाचा प्रकाश. तो इतका सुखकर आहे, इतका आकर्षक आहे आणि इतका विपूल आहे की, जोपर्यंत आपण त्या प्रकाशाला आपल्या आत अनुभवत नाही. हा प्रकाश जो पवित्रप्रेम आहे, पावनता आहे, पवित्र संबंध आहे, पवित्र समजउमज आहे. अशा प्रकारचा प्रकाश तुमचा अंतरंगात विकसित झाला तर सर्व काही स्वच्छ होईल. 'मला धुवा मी बर्फापेक्षाही स्वच्छ होईन' पूर्णपणे आतून बाहेरुन स्वच्छ झाल्यावर तुमच्या बाबतीतही वरील उक्तीप्रमाणे घडेल. असेच घडते.

निसर्गाचे पावनतम रुप आपल्या आत स्थित आहे. प्रकृतीच्या पावनतम रुपापासून आपली चक्रे निर्माण झाली आहेत. मानसिक विचारामुळे आपणच ती चक्रे बिघडवीत असतो. हे साक्षात सरस्वतीविरोधी कार्य आहे. प्रकृतीच्या (सृष्टीच्या) सर्व अशुद्धतेला सरस्वती शुद्ध करते. परंतु आपल्या मानसिक (गतविधी कार्यांमुळे) पवित्र विवेकाविरुद्ध जाते, आणि हीच बाब व्यक्तीने समजायला हवी की, आमच्या विचारामुळे आम्ही शुद्ध विवेकाला बिघडविले नाही. तर आमचे विचार आम्हाला इतके अहंकारी, इतके अहंवादी, अस्वच्छ करतात की, जणूकाही आम्ही या वर्त नस्वरुप विषपान करतो आणि सहज म्हणतो यात काय वाईट आहे? सरस्वतीच्या बिलकुल विरुद्ध वर्तन. सरस्वतीचा वास जर आमच्या आत असेल तर ती सुबुद्धी देते. विवेक देते. या कारणांमुळे सरस्वती पूजन, सूर्यपूजन, त्यासाठी आमच्यात स्पष्ट दृष्टी असायला हवी आम्हाला काय व्हायचे आहे, आम्ही काय करतो? या बद्दल स्पष्ट विचार हवेत. कशा घ़ाणीत आम्ही राहतो. आमचा मेंदू कोठे जात आहे. शेवटी

आम्ही येथे मोक्षप्राप्तीसाठी आलो आहोत. आपल्या अहंकाराला वाढू देणे किंवा आपल्या आतील घाणेरड्या विचारांबरोबर जीवन जगण्याकरीता नव्हे.

मी तुम्हाला भेटेन अगर नाही. काही फरक पडत नाही. परंतु मी तुम्हा सर्वा मध्ये व्याप्त आहे. छोट्या छोट्या गोष्टींमधून मी तुमच्या बरोबर असते. अशाचप्रकारे तुम्ही एकमेकांमध्ये सामावून जाण्याचा प्रयत्न करा आणि आपल्या अंतर्मनातील सौंदर्य शोधा. भरपूर आनंद मिळवा. ती मोठी गोष्ट आहे आणि ती प्राप्त करावयाची आहे. हा अहंकार तुम्हाला टरफलाप्रमाणे (Nutshell) (पोकळ) करतो. तो सौंदर्याशी ताळमेळ जोडीत नाही. बघा (संगिताचे) सूर कसे एकमेकात मिसळून जातात.

हे व्याप्तिकरण तेव्हाच शक्य आहे जेव्हा तुमचा अहं चारीबाजूस व्याप्त होईल आणि उजवीकडच्या समस्यांवर नियंत्रण ठेवण्याचा हाच मार्ग आहे. सरस्वतीची पूजाही याचप्रकारे करायला हवी. तिच्या हातात वीणा आहे आणि वीणा आदि वाद्ययंत्र आहे, ज्याचे संगित ती वाजवते. हे संगीत हृदयात जाते (हृदयाला स्पर्ष करते),तुमच्यात हे संगीत कसे प्रवेश करते आणि कसे कार्य करते कळत नाही.

याचप्रकारे सहजयोगीनेही व्याप्त व्हायला हवे. संगिताप्रमाणे. मी जसे तुम्हाला सांगितले, अनेक गुण आहेत ज्याचे वर्णन एका प्रवचनात करता येत नाही. परंतु श्री सरस्वतीजीचा एक गुण असा आहे की ती सूक्ष्मात प्रवेश करते. जसी पृथ्वी माता सुगंधात परावर्तित होते. त्याचप्रकारे संगित लयीत परावर्तित होते. कोणत्याही गोष्टीचे ती सृजन करते ती अधिक महान होते. जो पदार्थ ती उत्पन्न करते तो सौंदर्य संपन्न होऊन जातो. सौंदर्य रहित पदार्थ स्थूल आहेत. असेच सर्व काही आहे, आता तुम्ही म्हणाल जल काय आहे? जल गंगानदी होऊन जाते. या सर्व सुक्ष्म गोष्टी आहेत. म्हणून पदार्थ सूक्ष्म होतात कारण त्यांना व्हायचेच असते. सर्वत्र प्रवेश करायचा असतो. त्यामुळे प्रत्येक गोष्ट ती कोणतीही असते आणि वायू सर्वोत्तम आहे. वायूसृद्धा चैतन्यलहरींनी परावर्तित होतो.

म्हणून तुम्ही बघू शकता की कशाप्रकारे पदार्थांपासून बनविलेल्या वस्तू या पाच तत्वांनी बनविलेल्या वस्तू - सूक्ष्म होतात. निश्चितच डावी आणि उजवी बाजू दोन्ही पक्ष याला कार्यान्वित करतात. कारण 'प्रेमाने यावर कार्य करायचे असते आणि प्रेम जेव्हा पदार्थावर कार्य करते तेव्हा पदार्थही 'प्रेम' होतो. अशाच दृष्टीने व्यक्तिने आपल्या जीवनाकडे बघायला हवे. प्रेम आणि पदार्थाचा सुंदर संयोग होण्यासाठी - परमात्मा तुम्हाला धन्य करो.

प.पू. श्री माताजी, धुळे - १४.०१.१९८३

संन्यासीवृत्ती पिंगलानाडीच्या जागृतीने येते. परंतु ही नाडी सहजयोगात आत्मज्ञानप्राप्त झाल्यानंतर जागृत व्हायला हवी. त्याच्या आधीची जागृती योग्य नाही. ती अर्धवट म्हणजे एकांगी असते. म्हणून चूक आहे. कधी, कधी मला वाटते की अर्धे, पोहोचलेले लोक संन्यासी असल्याचे पाखंड रचतात. ढोंग करुन फिरतात.

प.पू. श्री माताजी - २३.०९.१९७९

सरस्वतीचे कार्य खूप महान आहे. महासरस्वतीने प्रथम सर्व आंतरिक्ष बनविले. यात पृथ्वितत्व विशेष आहे. पृथ्वी तत्वाला अशाप्रकारे सूर्य आणि चंद्राच्या मध्ये आणून ठेवले की तेथे कोणतीही जीवंत क्रिया सहजतेने होऊ शकते. या जीवंत क्रियेमधून हळू - हळू मनुष्याची उत्पत्ती झाली. परंतु आम्हाला आमची खूप मोठी शक्ती समजून घ्यायला हवी. ती शक्ती जिला आपण सृजनशक्ती म्हणतो. ही सृजनशक्ती सरस्वतीजींचा आशीर्वाद आहे. त्यांच्याद्वारे अनेक कलांची निर्मिती झाली. कलांचा प्रसार श्री सरस्वतीजींच्या आशीर्वादाने झाला.

हाताने बनविलेल्या वस्तूंमधून चैतन्य वाहते. हाती बनविलेल्या वस्तूद्वारा हृदयाचा आनंद आपण इतरांना समर्पित करतो. कलात्मक वस्तू तुम्हाला नक्की निर्वि चारीतेत नेतात. कारण ते सौंदर्य बघताक्षणी चैतन्य प्रवाहित होऊ लागते. आत्मसाक्षात्कारी व्यक्ती जे सृजन करते त्यात अनंताची शक्ती सामवलेली असते. अनंतापर्यंत त्याची सौंदर्यशक्ती प्रदर्शित होत राहते.

प.पू.श्री माताजी - ०४.०४.१९९२

सरस्वतीचे कार्यक्षेत्र शरीराचा उजवाभाग आहे. स्वाधिष्ठानावर कार्य करुन जेव्हा ही डाव्या बाजूस जाते तेव्हा कला-विवेक वाढतो. व्यक्तिने सरस्वती तत्वाकडून महासरस्वती तत्वापर्यंत जायला हवे. कारण सरस्वतीतत्व जर 'बी' आहे तर महासरस्वती तत्व 'झाड' आहे. या 'बी' चे झाड केल्याशिवाय तुम्ही महालक्ष्मी तत्वाशी जोडले जाऊ शकत नाही. सहजयोगात सरस्वती आणि लक्ष्मी आज्ञाचक्रावर भेटतात. दोन्ही तत्वांना योग्य दृष्टीने बघितल्याशिवाय आपण उन्नती करु शकत नाही. कलेला लक्ष्मीशी जोडण्यासाठी आमच्यात शुद्ध दृष्टी हवी.

तुम्ही आपल्या शक्तिंचा जितका उपयोग कराल तितक्या त्या जास्त वाढतील. आता तुम्हाला सहजयोग द्यायचा आहे, जेव्हा तुम्ही हे कार्य करु लागाल तेव्हा महासरस्वती तत्व जागृत होईल आणि देशाची उन्नती बघून तुम्ही आश्चर्य चकित व्हाल.

प.पू. श्री माताजी - ०३.०२.१९९२

महाकाली शक्तीबरोबर आपल्या आत एक दुसरी शक्ती निवास करते ती म्हणजे इच्छाशक्तीला कार्यप्रवण करणारी शक्ती, क्रियाशक्ती. तिला सहजयोगाच्या भाषेत माता सरस्वती शक्ती म्हणतात. मी हिंदू किंवा मुस्लीम धर्म शिकवीत नाही. ते मला समजत नाही. मी जे शिकवीत आहे ती तत्त्वाची गोष्ट आहे. हे तत्त्व सर्व धर्मांमध्ये एकच आहे. म्हणून कोणीही हे समजू नये की, मी कालीमाता किंवा सरस्वतीबद्दल बोलते त्या हिंदू देवता आहेत. हिंदू धर्मात लोक त्यांना मानतात. जर कोणाला असे म्हणणे बरे वाटत नसेल तर क्रियाशक्ती म्हणा. परंतु ती महासरस्वतीची शक्ती आहे.

प.पू. श्री माताजी, नवी दिल्ली - १७.०२.१९८१

२) श्री हनुमान

मानवी अस्तित्त्वात हनुमानाची भूमिका महत्त्वाची आहे. ते स्वाधिष्ठान ते माथ्यापर्यंत (पिंगलानाडी) चालत राहतात. त्यात भविष्याची योजना, मानसिक कार्या साठी आवश्यक मार्गदर्शन व सुरक्षितता देतात. हनुमानासारखी देवता जी वानरासारखी परंतु प्रगत बालक आहे. त्यांचे मानवाच्या उजव्या बाजूस सतत धावत राहणे हे आश्चर्यजनक होय. मानवाच्या आत असणारे सूर्यतत्त्व शांत व कोमल करण्यासाठी त्यांना सांगितले गेले आहे. जन्माच्या वेळेस त्यांना सूर्याला नियंत्रित करायला सांगितले गेले. बालस्वभावामुळे त्याने विचार केला की सूर्याला खाऊन टाकावे. असा विचार करुन विराट रुप धारण करुन सूर्याला गिळून घेतले. कारण त्यांना वाटले की, सूर्य पोटात शांत राहील. मानवाची उजवी बाजू नियंत्रित राहण्यासाठी त्याचे बालसुलभ आचरण हे त्याच्या चारित्र्याचे सौंदर्य आहे.

मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामांना आपल्या मदतीसाठी सचिवाची आवश्यकता होती. त्या कार्यासाठी हनुमानाची निर्मिती झाली. श्री हनुमान रामाचे मदतनीस व दास होते. ते समर्पितही होते. हनुमानासारखा कोणताच सेवक आपल्या स्वामीसाठी समर्पित नसतो. त्यांच्या समर्पणाचे फळ शारीरिक रुपात विकसित होण्यापूर्वी 'नवधा' नऊ सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. या सिद्धी स्वरुप त्यांना पर्व ताप्रमाणे विशाल किंवा अत्यंत सूक्ष्म रुप धारण करण्याची शक्ती प्राप्त झाली. अत्यंत उग्र स्वभावाच्या व्यक्तीला श्री हनुमान नियंत्रित करतात.

श्री हनुमानांना आपल्या शेपटीस कितीही लांब करुन लोकांना नियंत्रित करता येते. हवेत उडू शकतात. हवेत उडण्याच्या सामर्थ्यामुळे ते संदेशवाहकाचे काम करु शकत होते.

आकाशाची सूक्ष्मता हनुमानाच्या नियंत्रणात आहे. त्याचे ते स्वामी आहेत. त्या माध्यमातून ते संदेश पाठवतात. दूरदर्शन, आकाशवाणी व ध्वनीवर्धक ह्या त्यांच्याच शक्तीच्या देणग्या होत. कुठल्याही प्रकारचा चालक नसताना वायूशी संबंध प्रस्थापित करणारा तो महान अभियंता आहे. या कार्यात तुम्ही कोणतीही त्रुटी काढू

शकत नाही. तुमच्या यंत्रांमध्ये त्रुटी निघू शकते. परंतु श्री हनुमानाच्या कार्यकुशलतेत नाही. आमच्या अंतरात सूक्ष्म लहरींचा नसा आणि नाडी वर आणि रोमारोमावर अनुभव येतो ही हनुमानाची कृपा आहे. श्री हनुमानाला 'अणिमा' नामक सिद्धी प्राप्त आहे. त्यामुळे अणु व परमाणुमध्ये प्रवेश करण्याची शक्ती मिळाली आहे.

विद्युतचुंबकीय शक्ती गतिमान होणे ही देखील हनुमानाची कृपा आहे. श्री गणेशाने श्री हनुमानात चुंबकीय शक्ती भरुन दिली आहे. गणेशजी स्वतः चुंबक आहेत. भौतिक स्तरावर ते विद्युतचुंबकीय शक्ती हनुमानाची शक्ती आहे. ती शक्ती स्वादिष्ठानापासून मस्तकापर्यंत जाते. मस्तकात वेगवेगळया घटकांशी सहसंबंध प्रस्थापित करतात. गणेश आम्हाला विवेकी करतात तर हनुमान विचार करण्याची शक्ती देतात.

वाईट विचारांपासून वाचविण्यासाठी हनुमान आपले रक्षण करतात. सद्सद् विवेकबुद्धी देतात. सद्सद् विवेक त्यांनी दिलेली सूक्ष्म शक्ती आहे. ती आपल्याला खरे आणि खोटे यांमधील भेद समजण्याचा विवेक प्रदान करते.

सहजयोगात आपण म्हणतो की, श्री गणेश या विश्वविद्यालयाचे कुलपती आहेत. ते आम्हाला पदव्या देतात आणि आमच्या अवस्थेतील गहनता जाणण्याची मदत करतात. ते आम्हाला निर्विचार, निर्विकल्प समाधी आणि आनंद देतात. बुद्धिवादी असल्यामुळे पाश्चात्त्यांसाठी ती महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. मार्गदर्शन आणि सुरक्षा ही हनुमानाची देणगी आहे.

श्रीरामाचे कार्य करण्यासाठी हनुमान सतत उत्सुक असतात. श्रीरामाला समर्पित झालात, तर तुमच्यात माझ्यासारख्या नऊ शक्ती जागृत होतील असे श्री हनुमान म्हणतात.

आपल्या अहंकाराबरोबर इतर जे दोष येतात त्या दोषांचाही हनुमान प्रतिकार करतात. अहंकारापासून हनुमान आपले रक्षण करतात.

आमच्या आत असणारे हनुमान तत्त्व आमच्या अहंकारावर लक्ष ठेवतात आणि बालसुलभ, विनोदी व प्रसन्नशील आदिशक्तीच्या पाठीमागे श्री गणेश असून

चरणांजवळ श्री हनुमान जवळ बसले आहेत. श्री हनुमान अहंकारी लोकांना समर्पण करायला शिकवतात.

गुरुप्रती समर्पणाची शक्ती हनुमान देतो. गुरुशी तादात्म्य पावण्याची ही समज आपल्यात हनुमान निर्माण करतात. माझ्यापासून दूर राहूनही सहजयोगी आपल्या हृदयात मला पाहू शकतात. ही शक्ती तुम्हाला हनुमानाकडून प्राप्त करावयाची आहे. हनुमानजी जसे आपले रक्षण करतात. तसेच सर्व देवदेवतांचेही रक्षण करतात. गणेश शक्ती देतात. हनुमान रक्षण करतात.

श्री हनुमान (देवदूत 'गॅब्रील') रक्षक होते. संदेशवाहक गॅब्रीयल यांनी इमॅक्युलेट साळवे (साल्वे) म्हणजे 'निर्मल साल्वे' शब्दाचा प्रयोग केला जे माझे नाव आहे. जीवनभर मारीयाला हनुमानाची सेवा स्वीकारावी लागली. मारीया महालक्ष्मी आहे. ज्या गोष्टी माझ्या डोक्यात येतात त्या हनुमान करुन टाकतात. कारण सर्व संस्था संघटित आहे. या घटनांना आपण चमत्कार म्हणतो ते हनुमानच करतात. हनुमान आमचा उतावीळपणा, घाईगर्दी, आक्रमकता ठीक करतात. पाऊस, ऊन, हवा याची ते निर्मिती करतात. कुणालाही न सांगता ते सर्व कार्य करतात. त्यांच्या प्रती नेहमी कृतज्ञ रहावे. हनुमान एक तेजस्वी देवदूत आहे.

प. पू. श्री माताजी - फ्रँकफर्ट, जर्मनी - ३१.०८.१९९०

हनुमानाबद्दल काय सांगावे.

हनुमान हे विशेष गुणधारी देवता आहेत. ते जितके बलवान होते तितके ते भक्त होते. शक्ती भक्तिचा उत्तम मिलाप त्यांच्यात होता. हे संतुलन त्यांनी प्राप्त केले होते.

ते शक्तिमान भक्तिवान होते. त्यामुळे देशविदेशात बजरंगबली म्हणून पुजले जातात. भक्ती व शक्ती या दोन वेगळया गोष्टी नसून ते या दोन गोष्टींचा संगम आहेत. दुसरी विशेष गोष्ट म्हणजे ते अर्धे वानर व अर्धे मानव होते. पशू व मानवाचे ते उत्तम मिश्रण होते.

प्रेमाची अथांगता त्यांच्यात होती दुष्टांचा संहार करण्यात ते मागेपुढे बघत नसत.

श्री हनुमान पूजा - १९९९

❋❋❋

# सुषुम्ना

## श्री महालक्ष्मी

आदिशक्ती ही तिसरी शक्ती आहे. त्रिगुणात्मिका अशी ती महालक्ष्मीची शक्ती आहे (तीन गुणांनी युक्त). या शक्तीपासून आपण धर्मधारण करतो. कुंडलिनीच्या उत्थानासाठी महालक्ष्मीने उत्क्रांतीच्या मध्यमार्गाची निर्मिती केली. कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरात लोक नेहमी उदे ग अंबे उदे हे भजन म्हणतात. तो कुंडलिनीचा जागर आहे. कारण कुंडलिनीच अंबा आहे.

कुंडलिनी वाहिका (सुषुम्ना) महालक्ष्मी शक्तीने आमच्या आत संतुलन व योग्य मार्गाची निर्मिती केली. त्यामुळे कुंडलिनी जागृत होऊन वर चढू शकते. डाव्या व उजव्या नाडीला संतुलित करुन कुंडलिनीच्या जागृतीसाठी ती मार्ग खुला करते.

हा प्रेम वा करुणेचा मार्ग आहे. करुणा व प्रेमाच्या माध्यमात हा मार्ग बनवते कारण हा मार्ग जर तयार झाला नाही तर कुंडलिनी जागृत होणार नाही. शेवटी व्यक्ती अशा अवस्थेला पोहोचते. तिथे जिज्ञासा सुरु होते. आपल्यात जिज्ञासा जागृत होते तेव्हा महालक्ष्मी तत्त्व जागृत होते.

दुसरे कार्य हे तत्त्व करते ते म्हणजे कुंडलिनीशक्ती वेगवेगळ्या चक्रातून जाण्याचा मार्ग दाखवते कारण त्या चक्रांचे दोष दूर होतील. ही अत्यंत लवचीक शक्ती आहे. ती वेगवेगळ्या चक्रांमध्ये कुंडलिनीला मार्ग दाखवते. ज्या चक्राला कुंडलिनीची मदत हवी ते समजते. आपण बघितले असेल की कोणत्याही बाधित चक्राकडे जाऊन त्याला दुरुस्त करुन चक्राची स्पंदने वाढतात. हे तुम्हाला जाणवले असेल. हे कार्य प्रेम आणि करुणेने होते आणि तिची इच्छा आहे की, तुम्ही पूर्ण सत्य प्राप्त करा.

पूर्वकर्म व समस्या उत्थानात अडचणी निर्माण करतात. षड्रीपू उत्थानात अडसर आणतात. परंतु महालक्ष्मी तत्त्व प्रकाशित व जागृत झाल्यावर मानवाचे उत्थान होते त्याचे आत्मतत्त्व जागृत होते. प्रकृतीच्या पाशातून मुक्त होऊन साधक

परमेश्वरी लिलेचा साक्षीदार बनतो व आपला गुरु बनतो. महालक्ष्मी शक्ती तत्त्व जागृत होऊन स्थापित झाल्यावर माणूस (परेशान) त्रस्त होत नाही. प्रेम आणि करुणेचा आनंद घेऊ शकतो. साधकाला श्री कृष्णाने वर्णन केलेली स्थितप्रज्ञाची स्थिती प्राप्त होते. त्याच्यात सामुदायिक स्थिती प्राप्त होते. नवा प्रकार विकसित होतो. थेंब थेंब समुद्राला मिळून 'पूर्ण समुद्र' परमेश्वरी प्रेमाची शक्ती बनते आणि बरेच दीपक प्रज्ज्वलित करते.

प. पू. श्री माताजी - १० नोव्हेंबर १९९६

**<u>महालक्ष्मी उत्क्रांतीची शिडी होय</u> :**

भारतीय शास्त्रात शक्तीला खूप महत्त्व दिले आहे. ज्या व्यक्तीला आत्मा बनण्याची शक्ती नसते ती व्यक्ती व्यर्थ होय. यासाठी ती शक्ती आमच्यात जागृत व्हायला हवी. म्हणूनही शक्ती आमच्यात विकसित होणे आवश्यक आहे. महालक्ष्मीशिवाय उत्क्रांती होत नाही. ही शिडी आहे. तिच्या माध्यमातून कुंडलिनी जागृत होते. थोडक्यात दोन्ही शक्ती महत्त्वपूर्ण आणि संबंधित आहेत. लक्ष्मी तत्त्व संतुष्ट झाल्यावर महालक्ष्मी तत्त्व सुरु होते.

महालक्ष्मी अत्यंत महत्त्वपूर्ण तत्त्व आहे. जेव्हा तुम्हाला वैभवाचाही कंटाळा येतो तेव्हा वाटते की, अवश्य अशी काही गोष्ट आहे, ज्याची माझ्या जीवनात कमतरता आहे. त्यावेळी तुम्ही महालक्ष्मी तत्त्वाकडे आकृष्ट होता.

प. पू. श्री माताजी - कोल्हापूर (भारत - महाराष्ट्र) - २१.१२.१९९०

**<u>महालक्ष्मी तत्त्वात प्रवेश</u> :**

महालक्ष्मी तत्त्वाचे महत्त्व हे की, सुषुम्ना नाडी महालक्ष्मीची वाहक आहे. आपल्या महालक्ष्मी तत्त्वाची अभिव्यक्ती लक्ष्मी तत्त्वाच्या संतुष्टीनंतर होते. परमेश्वरी तत्त्व महालक्ष्मीच्या माध्यमातून कार्य करते. मोठी विचित्र गोष्ट आहे की, महालक्ष्मी तत्त्व संतुष्ट झाल्याशिवाय आपल्यात जिज्ञासा निर्माण होत नाही.

पण आपण लक्ष्मीतत्त्वाला संतुष्ट कसे करायचे? जेव्हा आपल्याकडे जरुरीपेक्षा जास्त पैसा, संपत्ती (धन) येते तेव्हा आपण विचार करता की, इतक्या पैशाचे करायचे काय? काही लोक विचार करतात मी अजून एक घर घेईन, अजून एक गाडी घेईन, हे घेईन ते घेईन? परंतु मनात एकप्रकारे विवेक उदय पावतो. संतुष्टतेची, संतोषाची भावना हळूहळू निर्माण होते. आता आणखी काय? प्रश्न पडतो. नंतर पैशाबरोबर टॅक्सची काळजी सुरु होते. मग विचार करतो. 'आता खूप झाले. आणखी नको. आहे ते पुरेसे आहे'. मग मिळविण्याची इच्छा समाप्त होत जाते. धनाची लालसा समाप्त होते. सहजयोगात तुम्हाला इतके आशीर्वाद कृपा मिळते की, आपोआप हवे ते मिळू लागते. एका टप्प्यावर येऊन आपण विचार करतो, वा! खूप मिळाले आता आणखी काही नको. माझ्याजवळ सर्व काही आहे.

लक्ष्मीतत्त्व संतुष्ट होण्यापूर्वी जर तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला तर आधीच तुम्ही या स्थितीपर्यंत पोहोचता आणि असे तुम्ही पोहोचलात तर महालक्ष्मी तत्त्वात प्रवेश करु शकता.

परंतु जर तुम्ही एकदम श्रीमंत झालात आणि ती श्रीमंती डोक्यात चढली, तुम्हाला तुमच्या मर्यादा समजल्या नाहीत तरीही तुम्ही सहजयोगात येऊ शकता. समजा एखादा श्रीमंत माणूस कॅन्सरने आजारी पडला. त्याची मुले त्याच्याशी नीट वागत नसतील, त्याचा अपमान झाला, उजव्या बाजूने धक्का बसला (सदमा) तर तो त्याला मध्यात महालक्ष्मी तत्त्वाकडे ढकलू शकतो. आता लक्ष्मीतत्त्व - उदारता - गतीशील होते. अशा स्थितीत श्रीमंत लोक आपल्या श्रीमंतीचा उपयोग करतात. पण ही उदारताही त्यांच्या डोक्यात चढते आणि त्यातून निर्माण होणारा असंतोष 'जीवनातील सत्य' शोधण्याविषयी विचार करण्यास बाध्य करतो. प्रवृत्त करतो. सत्य जिज्ञासा शेवटी त्याला महालक्ष्मी तत्त्वाकडे घेऊन जाते.

प. पू. श्री माताजी, कोल्हापूर (भारत, महाराष्ट्र) - २१.१२.१९९१

जेव्हा महालक्ष्मी तत्त्वाचा उपयोग जास्त झाला तेव्हा बुद्ध, महावीर यांच्याप्रमाणे विरक्ती येते. ते परमेश्वराला शोधू लागले. ही शोधण्याची शक्ती म्हणजे

महालक्ष्मी तत्त्व. महाराष्ट्रात कोल्हापूर येथे महालक्ष्मीचे मंदिर आहे. तेथे जोगवा म्हटला जातो. हे अंबे तू जाग - नामदेवाने १६ व्या शतकात लिहिले. माताजींनी तेथील पुजाऱ्यांना विचारले की, हे गीत का म्हटले जाते. त्यांनी सांगितले की, फार पूर्वीपासून हे गीत म्हटले जाते. परंतु का म्हणतात त्याचे कारण माहीत नाही. अंबा म्हणजेच महालक्ष्मी. मध्यमार्ग म्हणजे सुषुम्नानाडी किंवा महालक्ष्मी. आपला सारा डावा, उजवा शोध इथे संपतो. आपण मध्य मार्गावर येतो. जेव्हा आपण शोधाला सुरुवात करतो तेव्हा महालक्ष्मीची कृपा होते. होली घोस्ट याच्या तीन शक्ती आहेत. आपण जेव्हा मध्यमार्गाने प्रवेश करतो व मध्यमार्गात जातो तेव्हा साधक बनतो. तेव्हा महालक्ष्मी शक्ती कृपावंत होते. महालक्ष्मी शक्ती जागृत होणे कठीण असते. कारण आपले मन डाव्या किंवा उजव्या बाजूला जाते. मन अस्थिर असते. कुंडलिनी जागृतीनंतर चित्त स्थिर होते व मध्यमार्गावर स्थिरावते.

मध्यनाडी सुरुवातीला एक पूल तयार करते. भवसागरातून जाऊन कुंडलिनी मध्यमार्गातून जाते. ब्रम्हरंध्राला छेदते आणि ब्रम्हांडाशी एकरुप होते. (आत्मा परमात्मा यांचे मिलन होते). डावी, उजवी आणि मध्यनाडी एकत्र येतात आणि आज्ञाचक्राला भेदून सहस्त्रारात जातात. सहस्त्रारात आदिशक्ती महामायेच्या रुपात प्रकट होते. 'सहस्त्रारे महामाया', सहस्त्रार उघडण्याची वेळ येते तेव्हा आदिशक्ती महामायेचे रुप धारण करते.

प. पू. श्री माताजी, जयपूर - ११.१२.१९९४

....महालक्ष्मी तत्त्वाने मनुष्य समाधानी होतो. या तत्त्वामुळेच तो शक्तीला शोधतो. असत्याला सोडतो. सांसरिक किंवा भौतिक गोष्टींबद्दल समाधान येते तेव्हाच महालक्ष्मी तत्त्व आत जागृत होते. तेव्हा व्यक्तीच्या चेहऱ्यावर तेज येते. महालक्ष्मी तत्त्व आपल्याला आपल्या साधनेकडे घेऊन जाते. जेव्हा तुम्ही सत्य प्राप्त करता तेव्हा प्रगती होते. महालक्ष्मी तत्त्व जागृतीनंतर आत्मसाक्षात्कार प्राप्त होतो. महालक्ष्मीतत्त्व जागृत झाल्यावर आपण निर्लिप्त होतो. विचार करु लागतो की संसार, जग काय चीज आहे? या विचारातून आपण स्थितप्रज्ञतेकडे जातो. साक्षीभाव निर्माण होतो.

अशी व्यक्ती पदार्थाच्या मोहात अडकत नाही. जेव्हा मनात विचार येतो की, संसारापेक्षा, जगापेक्षा आणखी वेगळे चांगले काय आहे? त्या पलीकडे आणखी काही सत्य असेल असे विचार येतात तेव्हा महालक्ष्मी तत्त्व आपल्यात येते. हे उत्थानाचे दैवी तत्त्व आहे. देवी आपल्या डोक्यात विचार उत्पन्न करते की पुढे काय आहे, जीवनाचा उद्देश काय आहे? हे जीवन का आहे? आपण कशासाठी आलो? पृथ्वीवर असे काय विशेष आहे? आम्ही इथे का रहावे. मूलभूत प्रश्न उठतात. आपण जिज्ञासू होतो.

आपली जिज्ञासा ज्ञानमय होणे आवश्यक आहे. मेंदूच्या माध्यमातून वैज्ञानिक, तर्कसंगत असली पाहिजे. महालक्ष्मीच्या सिद्धांतानुसार सत्य आणि फक्त सत्य जाणण्याची इच्छा असली पाहिजे. तेव्हाच सत्याचा शोध लागेल.

प. पू. श्री माताजी, कबेला - १७.१०.१९९९

हे महालक्ष्मीचे तत्त्व आपल्याला सत्य साधनेकडे नेते. आपण विशेष श्रेणीतील व्यक्ती बनतो. आपल्यात नऊ शक्ती 'नवधा' येतात. अभिव्यक्त होतात.

महालक्ष्मी आपल्याजवळ आहे त्यात समाधानी ठेवते. जेव्हा महालक्ष्मी तत्त्व जागृत होते तेव्हा अधिक मिळविण्याची इच्छा होत नाही. आपण दुसऱ्यांना देतो व आपल्या उदारतेचा आनंद घेतो.

लॉस एंजील्स - २९.१०.२०००

महालक्ष्मी तत्त्व स्थिर करण्यासाठी नियम सांगितले आहे.

(१) आपले शरीर निरोगी हवे. त्यामुळे आपण प्रसन्न राहतो.

(२) मध्यात असलो तर चित्त शुद्धी आणि तिची कार्यप्रणाली याकडे लक्ष हवे. निसर्गाचा आनंद घ्या. हा आनंद आश्चर्यजनक, गहन आणि आनंदमय असतो आणि निर्विचार स्थितीत नेतो.

महालक्ष्मी तत्त्व आतील तत्त्व आहे. ते आपल्याला संतुलन प्रदान करते. मार्गदर्शक तत्त्व आहे. सर्व कार्य करते. आपल्याला विवेकी बनवते, परमेश्वर व सत्याबद्दल प्रेम निर्माण करते. आपली प्रगती होते. महालक्ष्मी तत्त्वाच्या आशीर्वा

दामुळे समाधान प्राप्त होते. आपल्या आत्म्यात आनंदी राहतो. महालक्ष्मी तत्त्व जेव्हा मस्तकात प्रवेश करते तेव्हा विराटाची अभिव्यक्ती होते. आपण सामूहिक होतो. तेव्हा आपण कोणतेही भेदभाव करीत नाही. देश प्रांत, रंग, श्रीमंती - गरिबी हे गौण होतात. महालक्ष्मी तत्त्वाने सहस्त्रार प्रकाशित होते आपण आनंदी होतो. पूर्णत्त्वात विराटात सामुदायिकतेत मिसळतो. विराटामुळे आपल्याला शांती व संरक्षण मिळते.

आपल्या अहंकार व बंधनाचा त्याग हेच महालक्ष्मी तत्त्व होय. म्हणून महालक्ष्मी तत्त्व महत्त्वाचे आहे.

प. पू. श्री माताजी ऑस्ट्रेलिया - २०.०२.१९९२

महालक्ष्मी तत्त्व संपन्न असणाऱ्या व्यक्तीमध्ये धोका, कष्ट या बाधांपासून ही व्यक्ती दूर राहते.

महालक्ष्मी व महाकाली दोन्ही बरोबर चालतात. महाकाली आपल्या बरोबर राहते. महालक्ष्मी पुढे येते निश्चित स्वरुपात आत्मसाक्षात्कार आणि अडचणी सोडविण्यास मदत करते. आर्थिक अडचणींबरोबर इतर अडचणीही सोडविते. आत्मसाक्षात्काराची आपली इच्छा महालक्ष्मी पूर्ण करते. दोन्हीत स्पर्धा नाही.

या तिन्ही शक्ती बरोबर काम करतात आणि ज्या गोष्टीची गरज असेल ते कार्यान्वित करतात.

प. पू. श्री माताजी, कबेला -१७.१०.१९९९

परमेश्वर महालक्ष्मीच्या माध्यमातून कार्य करतो.

प. पू. श्री माताजी, कोल्हापूर - २१.१२.१९९१

महालक्ष्मी मध्यमार्गावर आहे आणि त्यामुळे कुंडलिनी जागृत होते. कागदाच्या साडेतीन घड्या केल्या तर त्यातली मधली घडी जी अत्यंत सूक्ष्म आहे. त्या नाडीलाच ब्रम्ह नाडी म्हणतात. त्या नाडीतूनच कुंडलिनी जागृत केली जाते. कुंडलिनी केसा इतकी जरी उठली तरी ती ब्रम्हरंद्र छेदू शकते. एका केसाइतकी जागृती आली तरी ब्रम्हरंध्र छेदू शकते. त्यानंतर आत्मसाक्षात्काराची सुरुवात होते. मध्यमार्गाची घडण विशेष प्रकारची आहे की, कितीही समस्या आल्या तरी

कुंडलिनीच्या आगमनाने मार्ग प्रशस्त होतो. म्हणूनच आपण हे लक्षात ठेवून आधी शिखर व नंतर पाया असे मंदिर बनवले.

महालक्ष्मी आदर्श सिद्धांत आहे. महालक्ष्मी सारतत्त्व आहे. ते प्रत्येक गोष्टीचे सारतत्त्व आहे. सृष्टीची निर्मिती ही परमेश्वरी इच्छा आहे. महालक्ष्मी तत्त्व नसेल तर इच्छेला अर्थ नाही. कारण ते कार्यान्वित होऊ शकत नाही. म्हणून महालक्ष्मी तत्त्व असणे आवश्यक आहे.

महालक्ष्मी तत्त्वात इच्छा आहे. इच्छेत श्री गणेश आहेत. आपल्यात चित्ताची एकाग्रता विकसित व्हावी आणि सर्व भ्रमातून बाजूला होऊन शुद्ध आत्म्याशी एकरुप व्हावे.

प. पू. श्री माताजी, कोल्हापूर - ०१.०१.१९८३

❋❋❋

# <u>प्रकरण११</u>

## सूक्ष्म चक्रावर स्थापित शक्ती

**मूलाधार :**

**<u>श्री गणेश</u>**

ब्रम्हचैतन्याचे साकार रुप ओंकार आहे. त्याचे मूर्तस्वरुप श्री गणेश. श्री गणेश अशी देवता आहे, जिची निर्मिती आदिशक्तीने केली. आपल्या मातेच्या चैतन्यलहरी आणि पृथ्वी तत्त्व यातून गणेशाचे सृजन केले गेले.

प. पू. श्री मातजी, पुणे - २५.१२.१९९०, कबेला - ०७.०९.१९९७

चैतन्यलहरी ज्यांच्याबद्दल तुम्ही नेहमी विचारता. श्री गणेशाशिवाय चैतन्य लहरी म्हणजे काही नाही. <u>माता आणि बालकामधील वात्सल्य भावना म्हणजे चैतन्य लहरी होत</u>. व्यक्तीला असे वाटले पाहिजे की, तो अजून बालक आहे. त्याची माताही आहे जी बाळाची देखभाल करते, भरणपोषण करते, बाळाला सर्व शक्ती देते, मुलाच्या गरजेनुसार त्याची देखभाल करते आहे.

प. पू. श्री माताजी - ०८.०८.१९८९

श्री गणेश म्हणजे फक्त पावित्र्य. ते अनंताचे बालक आहेत. म्हणून ते अनंतपुंज आहेत. त्यांच्यासारखे मूल जगात मिळणे अवघड आहे. त्यांचे सर्व प्रेम म्हणजे पावित्र्य आणि या पावित्र्यामुळे मूलाधारावर त्यांची स्थापना आहे. मूलाधारावर गौरीमाता व श्री गणेश दोघेही आहेत. धर्म आणि सेक्स यांचा एकत्र विचार होतो. तेव्हा सेक्सचा विचार लहानमुलाच्या सेक्सबद्दलच्या अबोधितेप्रमाणे व्हायला हवा. त्यामुळे श्री गणेशापर्यंत पोहोचणे अतिशय कठीण बाब आहे. श्री गणेश ही अत्यंत पवित्र देवता आहे, आत्मा आहे. त्यांच्या आत जाण्यासाठी

आपल्याला खूप स्वच्छ व्हावे लागते. तरच आपण त्यांच्यापर्यंत पोहचू शकतो. नाहीतर ते आणि त्याची आई याशिवाय तिथे (मूलाधार) कोणी बसू शकत नाही.

प.पू. श्री माताजी - २५.११.१९७३, चैतन्यलहरी, २००३, सप्टेंबर, ऑक्टोबर

श्री गणेशाचा सिद्धांत (तत्त्व) अत्यंत सूक्ष्म आहे. सूक्ष्माति सूक्ष्म सर्व गोष्टीत ते विद्यमान आहेत. सर्व पदार्थात चैतन्य लहरी असतात. या चैतन्यलहरी सर्व पदार्थांच्या अणु रेणूत असतात. श्री गणेश प्रथम देवता आहे. ज्यांना भौतिक पदार्थातही स्थापित करता येते. त्यामुळे गणेशजी चंद्र, सूर्य, पूर्णब्रम्हांड, पूर्ण सृष्टी आणि मानव यांच्यात विद्यमान आहेत. माणूस आपल्या कर्मांमुळे आपल्या अबोधिततेवर आवरण घालतो, ती झाकून टाकतो. पशु अबोध आहेत. माणूस स्वतंत्र आहे. त्याने ठरविले तर आपले पावित्र्य झाकू शकतो आणि गणेशासाठी आपली दारे बंद करु शकतो आणि म्हणू शकतो की गणेश अस्तित्त्वातच नाही.

प. पू. श्री माताजी - ०८.०८.१९८९

प्रत्येक पदार्थाच्या अणुमध्ये एक शक्ती कार्यरत असते. सर्वकार्य (परिवर्तन) सर्वश्री गणेशाच्या सिद्धांतानुसार नियंत्रित केले जाते. श्री गणेश म्हणजे अतिशय छोटे बालक मात्र कार्ये मोठमोठी. निर्जिव, सजीव, झाडेझुडपे व मानव यापर्यंत ही शक्ती कार्य करत असते. पदार्थांच्या बाबत ही शक्ती म्हणजे विद्युतचुंबकीय शक्ती म्हणू शकता. विकासाच्या वेगवेगळ्या स्तरात उर्जेचे विभिन्न स्तर दिसतात. मानवात मांगल्य, पावित्र्य व अबोधिता यात ही शक्ती विद्यमान आहे.

प. पू. श्री माताजी - इटली - १९.०९.१९९३

श्री गणेश पूर्णपणे निष्कलंक आहेत. त्यांची सर्वात मोठी शक्ती आहे अबोधितता. अबोधिततेमुळे आपल्याला नैतिक समजउमज आणि नैतिक शक्ती मिळते. अबोधितता मार्ग दाखविते. प्रतिक्रिया न देणे अबोधिततेची खूण आहे. अबोधितता काही मागत नाही, कशाची अपेक्षा करीत नाही, सर्वत्र फक्त आनंदाचा प्रसार करते.

प. पू. श्रीमाताजी - कबेला - १६.०९.२०००

श्री गणेशाची दुसरी शक्ती आहे पवित्रता. श्री गणेश सर्वांना शुद्ध करतात. जर तुम्ही तुमचे पावित्र्य बिघडवीत असाल तर गणेशजी क्षमा करीत नाही. ते म्हणतात नरकात जा आणि तो नरक आपल्या जीवनातच असतो. दारुडे, धूम्रपान करणारे, वेश्यावृत्ती करणारे लोक नरकाच्या वेदना जीवंतपणी अनुभवतात. या नरकापासून श्री गणेश तुम्हाला कधी वाचविणार नाहीत.

प. पू. श्री माताजी - कबेला - ०७.०१.१९९७

आमच्या आत असणारी श्री गणेशभक्ती जागृत करताना आपण पवित्र असले पाहिजे. पवित्रतेत गणेशाचे सुंदर, भोळेरुप घ्यायला हवे. माणसात भोळेपण हवे.

प. पू. श्री माताजी, मुंबई - १५.०९.१९८८

श्री गणेश आपल्याला बुद्धी - विवेक व समजउमज देतात. उत्तम चित्त श्री गणेशाची देणगी आहे. तो विवेकाचा दाता आहे. विवेक स्वतः कार्य करतो. ती एक महान शक्ती आहे. आमच्यात सुजाणता, शहाणपण, विवेक देतो.

प. पू. श्री माताजी - मुंबई- १५.०१.१९८४

श्री गणेश नेहमीच दृढ असतात. स्वतःवर विश्वास होणे गरजेचे असते. हे गणेशाच्या माध्यमातूनच शक्य होते. गणेशजी तुम्हाला पूर्ण आत्मसन्मान देतात. तुम्ही कोणापुढे वाकत नाही आणि इतरांना वाकायला भाग पाडीत नाहीत.

गुरुत्त्वमध्याची शक्ती पृथ्वीमातेपासून येते. पृथ्वीमातेपासून गणेशाची निर्मिती झाली. स्वाभाविकपणे हे गुरुत्त्वाकर्षण मानवातही आले आहे. जर तुम्ही मध्यात गुरुत्त्व बिंदूवर असाल तर चुकीच्या दिशेकडे वळत नाही.

सृष्टीच्या सर्व वस्तू संतुलित आहेत. समतोल कायम ठेवण्याचे कार्य श्री गणेशजीचे आहे. स्थिर झाल्यावर गणेश समतोल प्रदान करतात. संतुलन जेव्हा उजव्या बाजूला जाते तेव्हा नवनिर्माणाचे कार्य सुरु होते. मात्र चुकीच्या रस्त्याने

गेल्यास गणेशजी विध्वंसक होतात. समतोलाशिवाय जीवन चालू शकत नाही. सृजनात्मकता आणि विध्वंस यांचे संतुलन आवश्यक असते.

प. पू. श्री माताजी - ऑस्ट्रेलिया - फेब्रुवारी १९९२

श्री गणेशजीचे सारतत्त्व हे आहे की, ते त्यांच्यात दृढतापूर्वक आपली इच्छा प्रकट करण्याचे सामर्थ्य आणि आपल्या इच्छेने संपूर्ण विश्वाचा संहार करण्याची शक्ती सामावली आहे. उजवीकडून फिरणारा स्वस्तिक उलट्या दिशेने चालू लागला तर तो विनाशकारी होऊ शकतो.

प. पू. श्री माताजी -२५.०९.१९९९

सांसरिक जीवन व आध्यात्मिक जीवन यांच्यातली दरी जर पार करायची असेल तर श्री गणेश प्रथम देवता आहे. त्यांना शरण जा. विश्वविद्यालयाच्या कुलपतींप्रमाणे ते प्रत्येक चक्रावर विराजमान आहेत. ते तुम्हाला सांगतात की तुमची कार्यपद्धती चूक आहे. तुम्ही जर मर्यादांचे उल्लंघन करीत असाल तर तो श्री गणेशाचा अपमान करीत आहात.

शाश्वत, निर्मल, शिशुस्वभावामुळे श्री गणेश तुम्हाला सर्व अपराधासाठी माफ करतात जे अपराध सहजयोगात येण्याआधी तुम्ही केले असतील ते माफ करतात. पण तुम्ही जर गणेशाचे गुण स्वीकारित नसाल तर त्यांना आवरणे महाकठीण कार्य आहे. अशांसाठी श्री गणेशाजवळ क्षमा नाही. त्यांच्याकडे क्षमा मागूही नका. ती मिळणार नाही. श्री गणेश मी केलेली क्षमा (श्री माताजी) स्वीकारतात परंतु संधी मिळताच वार करतात.

यामुळेच माणसांना दुर्धर रोग जडतात. जर तुम्ही त्यांचा सन्मान केला नाही तर नपुंसकता, एड्स आणि इतर गुप्तरोग होतात. तुमच्या मूलाधारावर तुम्हाला रोगमुक्त करणे खूप अवघड कार्य आहे.

प. पू. श्री माताजी - कबेला - ०७.०९.१९९७

जर तुम्ही श्री गणेशाला न आवडणारी कामे कराल तर पहिल्यांदा काही सीमेपर्यंत तो तुम्हाला क्षमा करतो, मात्र त्याच्या नंतर पुरुषांना शारीरिक आणि स्त्रियांना मानसिक आजार सुरु होतात. हे श्री गणेशाच्या नाराजीमुळे घडते.

ते सृष्टीतही समस्या निर्माण करतात. 'प्राकृतिक प्रकोप हा श्री गणेशाचा अभिशाप होय'. जेव्हा खूप लोक सार्वजनिकपणे वाईट आचरण, दुर्व्यवहार करु लागतात. त्यांना शिक्षा देण्यासाठी नैसर्गिक आपत्ती येतात. ते पृथ्वीमातेला सांगतात की, लोक ज्या स्थानाचे पावित्र्य राखत नाहीत तेथे भूकंप होऊ द्या. तसेच होते.

श्री गणेश आपल्या मातेप्रती पूर्ण समर्पित आहेत. ते फक्त आपली माता आदिशक्तीला ओळखतात.

प. पू. श्री माताजी - १९.०९.१९९३

श्री गणेशाची संपूर्ण श्रद्धा आपल्या आईत आहे. आईच्या प्रति पूर्ण समर्पण हीच त्यांची शक्ती आहे. ते आपल्या मातेला प्रसन्न ठेवण्याचा सतत प्रयत्न करतात. माणसाने मातृसन्मानासाठी श्री गणेशाचे उदाहरण समोर ठेवले पाहिजे. जर तुम्हाला अंतर्ज्ञान प्राप्त करायचे असेल, प्रगती करायची असेल तर गणेशाकडून शिकावे लागेल की, मातेला प्रसन्न ठेवण्यासाठी ते काय करतात? मातेशी त्यांचे संबंध कसे आहेत? जी माता पालन, पोषण व फलदाती आहे तिच्याशी गणेशाचे वर्तन कसे आहे हे तुम्ही शिकलात तर हळूहळू तुमचेही उत्थान निश्चित होईल.

प. पू. श्री माताजी - जर्मनी - २७.०७.१९९३

मुले श्री गणेशाला खूप प्रिय आहेत. ते नेहमी मुलांच्या रक्षणासाठी सिद्ध असतात.

प. पू. श्री माताजी - ०७.०९.१९९७

मोनालिसाचा चेहरा अत्यंत सौम्य आहे. अत्यंत मातृत्त्वपूर्ण, पावन आहे. कारण तिच्यात गणेश तत्त्व आहे. ती माता आहे. मुलांना बघणे, त्यांच्या संगतीत रमणे ही मानवजातीसाठी अति आनंददायक गोष्ट आहे. कारण मुलांना बघितले की,

त्यांची मधुरता आपल्या हृदयाला स्पर्श करते. लगेच चेहरा खुलतो. मुलांमध्ये गणेशतत्त्व असते.

श्री गणेशाच्या अनेक गुणांपैकी एक हा आहे की, ते अनंताचे बालक आहेत. त्याचप्रमाणे अत्यंत विनम्रही आहेत. ते विनोदप्रिय आहेत. आकाराने स्थूल असूनही ते वजनाने खूप हलके आहेत. एक उंदीर त्यांचे वाहन आहे. ते देखावा करीत नाहीत. आपल्या गोड वाणीने सर्वसाधारण कामकाजाने लोकांना आकर्षित करतात. त्यांचा प्रभाव पडतो. तुमचे वागणे, कामकाजाची पद्धत, उपहार आणि प्रेमाची सहज अभिव्यक्ती यामुळे तुम्ही सर्वांचे मन जिंकू शकता.

प. पू. श्री माताजी - जर्मनी - २७.०७.१९९३

श्री गणेश आमच्या मूलाधार चक्रावर आहेत. गौरी कुंडलिनीच्या उत्थानात ते सदैव तिच्या बरोबर राहून सतत तिचे संरक्षण करतात. इतकेच नव्हे तर चक्रावर जेव्हा कुंडलिनी चढते तेव्हा चक्राचे मुख बंद करुन कुंडलिनीला थांबविण्याचे कार्य करतात. श्री गणेश मूलाधार चक्रावर असणाऱ्या सर्व इंद्रियांना नियंत्रित करतात.

प्रत्येक चक्रावर गणेशाचे कार्य चालू असते. प्रत्येक चक्रावर निर्मळपणा व पवित्रता येत नाही तोपर्यंत कुंडलिनीचे चढणे असंभव होय.

प. पू. श्री माताजी - दिल्ली - ०५.१२.१९९३

श्री गणेशाचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. कारण ते तुमची प्रगती करतात, तुमची चक्रे शुद्ध करतात, त्यांना प्रकाशित करतात. प्रकाशाकडे अग्रेसर करतात. जी सूक्ष्मता तुम्ही सहजयोगात मिळविली आहे ती गणेशजींमुळे मिळाली आहे. जसे मी गणेशाला घडविले तुम्हालाही तसेच आत्मसाक्षात्कार देऊन तयार केले. दोघांनाही घडविण्यात जराही फरक केला नाही. तुमच्यात जर भोळेपणा, साधेपणा, विश्वास आणि सरळ वागणे असेल तर अशा निर्मळ अंतःकरणाने श्री गणेशाची जागृती होऊ शकते. जे सहजयोग करतात त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, आम्हाला निराकारात जायचे आहे. साकारात राहून तुम्ही निराकाराचे पूर्ण माध्यम होणार आहात. त्यासाठी

प्रथम आपल्यात श्री गणेशाला जागृत करावयाचे आहे. केवळ पूजेने नव्हे तर आपल्या आत पूर्ण शुद्धता यायला हवी.

श्री गणेशाप्रमाणे माणसाने आपले चित्त स्वच्छ ठेवले पाहिजे. चित्त शुद्धीचा प्रकार कोणता? चित्त कोठे आहे ते बघा. जर तुमचे चित्त परमात्म्यात आहे तर ते शुद्धच आहे कारण चैतन्य तुमच्यातून वाहते आहे.

श्री गणेशाची शक्ती तुमच्यात जागृत करावयाची असेल तर प्रथम हे लक्षात ठेवा की आपण चित्त निराकाराकडे द्या. चैतन्याकडे चित्त द्या. तुमच्यातून वाहणाऱ्या चैतन्याकडे लक्ष द्या.

तुमच्या आत श्री गणेशाची शक्ती असणारी गंभीरता आणा. आनंदाची गंभीरता जाणा. आपण गौरीमातेच्या मदतीने तिच्या शक्तीबरोबर, त्या निराकार अवस्थेत जाऊ (उतरु) जेथे आपल्याला पूर्ण आनंद प्राप्त होईल. आमच्या रोमारोमातून ती शक्ती वाहू लागेल. ती शक्ती बघून जगातील लोक म्हणतील की, सहजयोगाने काय कमाल केली!

प. पू. श्री माताजी - १८.०९.१९८८, मुंबई चै. ल. खंड ५
अंक - ९- १०, १९९३

सहजयोगींना पूर्णपणे हृदयापासून मानावे लागेल. ही गोष्ट तुम्ही लक्षात ठेवा. श्री गणेशाचे स्थान मूलाधार चक्र आहे. पण जेव्हा ते तुमच्या हृदयात येतात तेव्हाच आत्मस्वरुप होऊन चैतन्यमय होतात. आत्मा म्हणजेच गणेश. तो आमच्या हृदयात प्रकाशित होतो. म्हणून तोच चैतन्यही आहे. ज्याने श्री गणेशाला हृदयापासून पुजले तो क्षणोक्षणी आनंदात डुंबतो, त्याला इतर गोष्टींची पर्वा नसते. ऋद्धी - सिद्धी त्याच्या पायापाशी असतात. श्री गणेश तत्त्व आज्ञाचक्राजवळ येऊन अत्यंत सूक्ष्म होते. आज्ञा चक्रावर असे म्हटले जाते की, आता तो त्याच्या आध्यात्मिकतेच्या पातळीवर आला.

प. पू. श्री माताजी - मुंबई- १८.०९.१९८८

कणाकणात श्री गणेश आहेत. पण तुम्हाला त्यांना जागृत करावे लागेल. उदाहरणार्थ, तुम्ही चैतन्यमय जल बघितले आहे. चैतन्यितजल म्हणजे त्या जलात गणेशतत्त्व जागृत केले आहे. हे पाणी जेव्हा तुमच्या पोटात, डोळयात जाते किंवा तुम्ही इतर ठिकाणी ते वापरले तर त्याचे कार्य सुरु होते. जेथे तुम्ही हे पाणी घालता तिथे गणेशतत्त्व जागृत करते. त्यांना कार्यान्वित करते. गणेशतत्त्व जागृत होऊन गोष्टी समजते, आयोजन करते, कार्यान्वित करते. आता तुम्ही बंधन देता तेव्हा चैतन्याला गतीशील करता.

प. पू.श्री माताजी - ०८.०८.१९८९

श्री गणेश आपले सगळ्यात मोठे सहजयोगी आहेत. त्यांना कधीच योग करायची आवश्यकता पडली नाही. ते सदैव योगात असतात. ते आपले महानतम योगी आहेत. देवतांचे महानतम पद प्राप्त करण्याची त्यांची योग्यता आहे. मी तर म्हणेन ते आपले महानतम देव आहेत, त्यांची पूजा करायला हवी. त्यांच्या माध्यमातून सर्व देवतांची पूजा होते आणि ते प्रसन्न होऊन आशीर्वाद देतात.

प. पू. श्री माताजी - २५.०९.१९९९

त्यामुळे सर्वप्रथम प्रत्येक स्थानावर श्री गणेशाची स्थापना केली जाते.

प. पू. श्री माताजी, बेंगलोर - १३.०२.१९९०

प्रत्येक चतुर्थीला श्री गणेशाचा जन्मदिवस साजरा होतो. मंगळवारी कृष्णपक्षात येणाऱ्या अंगारिका चतुर्थीचे महत्त्व विशेष असते.

अंगारिका म्हणजे काय? श्री गणेश जळत्या अंगाराला थंड करतात. कुंडलिनीही एक ज्वाला आहे. तिचे उत्थान भडकलेल्या ज्वालेप्रमाणे आहे. पृथ्वीत गुरुत्त्वाकर्षण आहे आणि वर जाणारी प्रत्येक गोष्ट पृथ्वीच्या या आकर्षणामुळे तिच्याकडे खेचली जाते. फक्त अग्नीच गुरुत्त्वाकर्षणाविरुद्ध वर जातो. श्री गणेश दोन प्रकारे आतल्या आत असणारा अग्नी शांत करतात. सर्व अवगुणाच्या व्यतिरिक्त व्यक्तीसाठी आत्मसाक्षात्काराची प्रार्थना कुंडलिनीला करतात. कुंडलिनीला शांत करतात. ते कुंडलिनीचे बालक आहेत आणि आपल्या आत शिशू आहे. या संबंधात

ते कुंडलिनीला समजावतात की तूच माझी आई आहेस आणि कृपा करुन इच्छापूर्तीत माझी मदत करा. तेव्हा शांत होऊन कुंडलिनी विचार करते की, माझ्या मुलाच्या इच्छेनुसार मी वर उठले पाहिजे. श्री गणेश कुंडलिनीला सांगतात की, तुम्ही आपल्या बालकास जन्म देत आहात आणि या वेळी क्रुद्ध होणे योग्य नाही. असे सांगून ते कुंडलिनीला शांत करतात.

कुंडलिनी श्री गणेश शक्तीद्वारे उठते. कुंडलिनीमध्ये जे अग्नीलोळ उठतात त्यांना शांतही गणेशजीच करतात. एकाप्रकारे आपल्या क्रोधाला शांत करतात.

जेव्हा कोणी राक्षस किंवा दुष्प्रवृत्ती मनुष्य तुम्हाला त्रास देत असेल तर गणांचे स्वामी त्यांचा विनाश करतात. तुम्हाला काही करावे लागत नाही. हे गण तुमच्या बरोबर आहेत.

प. पू. श्री माताजी - गणपतीपुळे - महाराष्ट्र - २१.११.१९९१

गणेशतत्त्व उत्तम राखणे हे सहजयोगींचे एक मोठे उत्तरदायित्त्व आहे. त्याशिवाय पूर्ण सहजयोग आंदोलन डळमळीत होईल. स्त्री आणि पुरुष दोघांनीही आपल्या जीवनशैलीत श्री गणेशाला सन्मानाचे स्थान द्यायला हवे. आम्ही सदैव हे ध्यानात ठेवायला हवे की श्री गणेशाच्या आशीर्वादामुळे आपल्याला आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला आहे.

प. पू. श्री माताजी - २७.०७.१९९३

तुम्ही विवेकपूर्ण कार्य करा कारण तुमच्यात गणेशतत्त्व जागृत आहे आणि ते पूर्णपणे विवेकशील आहे. विवेकाचे दाता आहेत. ते असुरांना नष्ट करुन आमच्या संवेदना जागृत करतात. आमचे सर्व कष्ट निवारतात.

दिशाज्ञान श्री गणेशाची देणगी आहे. श्री गणेश सर्वांच्या आतील चुंबक आहेत. हे चुंबक कपटी माणसांना आमच्यापासून दूर पळवते. निष्कपट व अबोध व्यक्तींना आमच्याजवळ आणतो. आकर्षित करत निष्कपट बना. चातुर्य आमच्यासाठी महत्त्वाचे नाही. ती मानसिकता आहे. मात्र 'अबोधित' अंतर्गुण आहे. तो गुण सर्व व्याप्त शक्तीशी संबंधी आहे.

प. पू. श्री माताजी - ऑस्ट्रेलिया - २६.०८.१९९०

श्री गणेशाची शक्ती तुमच्यात आहेच. तिचा फक्त तुम्ही उपयोग करायचा आहे. त्यांची पूजा करताना आपल्या हृदयात दया, करुणा, क्षमा याची मागणी करा. याचना करा. चला आपण सर्व आपले पूर्वीचे दुर्विचार, बंधने, पाखंडीपण या दोषांना वायू तत्वात विलीन करु या. आपल्या अबोधितेस अंतःकरणातून प्रवाहित करु या. या गुणांचे संवर्धन करु या.

पृथ्वी मातेवर बसून श्री गणपती अथर्वशीर्ष वाचा. गणेशाचे ध्यान करा. तुमच्या सर्व समस्या संपुष्टात येतील.

प. पू. श्री माताजी - २६.०८.१९९०

***

हा ॐकार काय आहे? सर्व जगाचे कार्य या
ॐकार शक्तीपासून होते. आपण याला चैतन्य म्हणतो.
ॐकार हे ब्रम्हचैतन्याचे आकार रुप आहे. त्याचे मूर्त रुप
किंवा विग्रह श्री गणेश आहेत. श्री गणेश ॐकार आहेत.
त्याचाच अवतार येशू ख्रिस्त आहे. ॐकार अति पवित्र असून
अनादिकाळापासून कार्य करणारी शक्ती आहे. आत्म्याची
शक्तीही ॐकाराचीच शक्ती होय.

प. पू. श्री माताजी - गणपतीपुळे (महाराष्ट्र) - २५.१२.१९९०

## मूलाधार

## श्री गौरी (कुंडलिनी)

गौरी गणेशाची आई असून आपल्या पावित्र्य रक्षणासाठी तिने गणेशाला जन्म दिला. तशीच कुंडलिनीही गौरी असून आपल्या मुलाधारावर श्री गणेश विराजमान आहेत. मूलाधार गौरी कुंडलिनीचे निवासस्थान आहे. श्री गणेश कुंडलिनीचे रक्षण करतात. आपले पावित्र्य (अबोधितता) त्याची श्री गणेश देवता आहे. फक्त गणेशच या अवस्थेत राहण्यास समर्थ आहेत. कारण (पेल्विक) श्रेणीय - चक्र मलमूत्र त्याग क्रिया करतात. वातावरणातील घाणमुक्ती करुन केवळ गणेशच त्या चक्रावर राहू शकतात. कारण ते तितके शुद्ध व अबोध आहेत. कुंडलिनी गणेशाची कुमारी माता आहे. लोक मेरी माताच्या विरुद्ध बोलू लागले की तिला पुत्र कसा झाला? परमात्म्याच्या राज्यात काहीही शक्य आहे. हे समजण्याची आमची पात्रता नाही. ते या सर्व गोष्टींच्या वरती आणि सदा पवित्र आहेत. जर गणेश दुबळे झाले तर कुंडलिनीला आधार कसे देणार? कुंडलिनी जागृतीच्या वेळेस श्री गणेश आपली सर्व इतर कामे थांबवितात. मी कधी कधी एका जागी नऊ - दहा तास बसून असते. उठत नाही.

गौरी शक्तीचा सन्मान केला पाहिजे कारण तीच आपली माता आहे. तिने आपल्याला पुनर्जन्म दिला आहे. ती आपल्याबाबत सर्व जाणते. अतिशय सद्हृदय व करुणामयी आहे. उत्थान व चक्रभेदनाचे सर्व कष्ट झेलते. पुनर्जन्म देते. ती सर्व जाणते समजते, सर्व व्यवस्था करते आणि तुमचे आंतरिक गुण, सौंदर्य सर्वांसमोर आणते.

साक्षात्कार आणि ज्ञानप्राप्ती करुन देण्यासाठी आपण गौरीमातेप्रति कृतज्ञ असायला हवे. आपण नेहमी तिचे पूजन करायला हवे. विस्तार करायला हवा, जागृत करायला हवे. फक्त उत्थानच पूर्ण विश्व परावर्तित करील. त्यामुळे आपण गौरी मातेला सदैव प्रार्थना केली पाहिजे. तुम्हाला शुद्ध करणे, हृदय व मस्तिष्क (मेंदू)

शुद्ध राखणे व योगाद्धारे अमरत्त्व मिळवून देणे हे तिचे कार्य आहे. असे झाले तर परमात्म्याच्या प्रेमाच्या सुंदर शक्तीचा अनुभव घेऊ शकू. त्यासाठी जे जे आवश्यक कार्य असेल ते ते करा. पूर्णपणे सामूहिकतेत रहा. गरज असेल तर बलिदान करा आणि सहजयोगाचा प्रचार करा. कारण तुम्ही सहजयोगाला वृक्षाप्रमाणे वाढवाल, पसरवाल तेव्हा त्याची गहनता वाढेल. हे कार्य कुंडलिनी जागरणाप्रमाणे सुंदर व्हायला हवे. कुंडलिनीने तुम्हाला कोणताही त्रास दिला नाही. कोणतीही समस्या निर्माण केली नाही. यापासून आम्ही शिकायला हवे.

मी आता सर्वांना विनंती करीन की, आपल्या कुंडलिनीवर चित्त ठेवा. तिला नेहमी जागृत ठेवा. आपल्या चैतन्य लहरींचे सातत्य टिकवून ठेवा. फक्त आपल्याच चैतन्यलहरी योग्य ठेवू नका तर इतरांप्रतीही सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. गरज असल्यास दृष्टिकोन बदला. इतरांचे दोष शोधण्याऐवजी त्यांचे गुण शोधा. चांगले कार्य केल्यामुळे येणारे सामर्थ्य शोधा. कुमारी असूनही गौरी किती विवेकी (विवेकपूर्ण) आहे. आम्हालाही तिच्याप्रमाणे विवेकी आणि संवेदनशील बनायचे आहे, हे विसरु नका.

प.पू. श्री माताजी, गौरीपूजा - ऑकलँड - ०८.०४.१९९१

✹ ✹ ✹

## स्वाधिष्ठान चक्र

### १.श्री सरस्वती

श्री सरस्वतीचे कार्यक्षेत्रशरीराचा उजवा भाग आहे. स्वाधिष्ठानावर कार्य करुन जेव्हा ही उजवीकडुन डावीकडे जाते तेव्हा कला, विवेक या गुणांमध्ये वाढ होते. कला परमात्म्याची ज्योती (प्रकाश) आहे. तुम्ही ते बघू शकत नाही पण त्यात चैतन्यलहरी आहेत. जर तुम्ही तिकडे हात पसरले तर तुम्हाला हातावर चैतन्यलहरी जाणवतील. विशेषतः या कलेची निर्मिती जर साक्षात्कारी व्यक्तीने केली असेल तर हे विशेषत्त्वाने जाणवते. आपण स्वाधिष्ठानाचा एकच भाग विकसित केला आहे. दुसऱ्या भागाकडे दुर्लक्ष झाले आहे. स्वाधिष्ठानाचा उपयोग आपण फक्त लिहिण्या वाचण्यासाठीच करतो. त्या क्षेत्रात आपण प्रगती केली आहे.

परंतु त्या पुढेही एक अवस्था आहे ज्याबद्दल आपण विचार करीत नाही त्यामुळेच हे असंतुलित आहे. तुम्ही बघता की, कला साहित्यात खूप प्रगती झाली आहे. पण तरीही लोक म्हणतात की, लक्ष्मी सरस्वती एकत्र राहत नाही. त्यांचा संगम होत नाही. खोलात जाऊन विचार केला तर आम्हाला या असंतुलनाचे कारण समजू शकते. सहजयोगात लक्ष्मी व सरस्वती आज्ञाचक्रावर भेटतात. कलाकार आपले कार्य करीत राहतात पण त्यांच्या इच्छेप्रमाणे फळ मिळत नाही (मोबदला). आज्ञाचक्रावर आल्यावर कलाकाराला समजते की इतर कलाकारांना जे मिळाले ते मला का प्राप्त झाले नाही? मी गरिबीत का आहे? दोन्ही तत्त्वांना योग्य दृष्टीने बघितल्याशिवाय आपण प्रगती करु शकत नाही. कलेला (सरस्वती) लक्ष्मीशी जोडण्यासाठी आमच्यात विशुद्धी दृष्टी हवी.

जिद्दी स्वभाव आपली (कलावंत) कमजोरी आहे. एकाने हत्ती बनवला तर सर्व कलाकार हत्तीच तयार करतात. काही विशिष्ट प्रकारे एक गायक गात असेल तर इतरही तसेच गातात. यात बदल करायला सांगितल्यास ते नाराज होतात.

आज्ञाचक्रावर तुम्ही विचार केला तर जिद्दी स्वभाव तुम्हाला पुढे जाऊ देत नाही. तुम्ही कलेची मोडतोड करा असे मी म्हणत नाही पण संतुलित प्रकारे कलेकडे बघणे आवश्यक आहे. मी तुम्हाला एक व्यावहारिक गोष्ट सांगते की, आपल्यात एक प्रकारचा आळस आहे जो तुम्हाला जिद्दी करतो. कुठलीही नवीन गोष्ट शिकायला आमचा मेंदू लगेच तयार होत नाही. तेथे थोडी शिथिलता आहे. या शिथिलतेमुळे आम्ही लक्ष्मीशी जोडले जाऊ असे काही नवे शिकत नाही. नवे प्रयोग करीत नाही. त्या दृष्टीची समज उमज असेल तर मेंदू चेतनामय होईल. जिद्दीपणाचा वाईट परिणाम व्यक्तीच्या पूर्ण जीवनावर पडतो. सहजयोगात आल्यावर परिवर्तन येते. तेव्हा सहजच लक्ष्मीशीही जोडले जाता. (कलावंत) आमच्या अहंला योग्य केल्यास आज्ञाचक्रही टीक होते. हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन किंवा ब्राम्होसमाजी होण्याची भावना आधारहीन आहे. फक्त मानव हेच सत्य. त्या व्यतिरिक्त काही नसते. (जात, धर्म, पंथ).

सत्य हे आहे की आम्ही सर्व एक आहोत. एक विराट. एक पूर्णत्त्व. याच्या विरुद्ध गेल्यास तुम्ही एकटे पडता. सामूहिकतेतून वेगळे होता. हे खरे आहे की, झाडाचे एक पान दुसऱ्या पानासारखे नसते पण ती आहेत तर एकाच झाडाची पाने ना! ती सर्व पाने एका विराटाचे अंग प्रत्यंग आहेत. जेव्हा आपण एकमेकांपासून दूर जातो तेव्हा आपले सरस्वती तत्त्व महासरस्वती तत्त्व होत नाही. महासरस्वती तत्त्वात तुम्ही राहता तेव्हा बघता की तुम्ही विराट आहात. अशा वेळी कलाकार काही निर्मिती करतो तेव्हा लोक त्या निर्मितीचा हृदयापासून स्वीकार करतात.

तुम्ही कलाकृती निर्माण करता ती परमेश्वरास समर्पित केली पाहिजे. या भावनेने केलेली निर्मिती शाश्वत असेल. परमेश्वराला समर्पित केलेले काव्य, संगीत, इतर कलाकृती आजही जीवित आहेत. आजचे फिल्मी संगीत येते आणि जाते मात्र संत कबीर, संत ज्ञानेश्वर यांचे दोहे, ओव्या, भजने आजही आवडीने म्हटली जातात कारण ती सर्व भजने परमेश्वराला समर्पित केलेली आहेत. आपल्या आत्मसाक्षात्काराद्वारे महाशक्ती सरस्वतीपासून हे प्राप्त केले. त्यामुळे ज्या रचना

त्यांनी केल्या त्या अजोड होत्या. या रचनांनी विश्वाला एक सूत्रात बांधले. म्हणून माणसाने सरस्वती तत्त्वापासून महासरस्वती तत्त्वाकडे जायला हवे. कारण सरस्वती तत्त्व 'बी' आहे तर महासरस्वती तत्त्व झाड आहे. त्या 'बी' पासून वृक्ष झाल्याशिवाय तुम्ही महालक्ष्मी तत्त्वाशी जोडले जाऊ शकत नाही. आत्मसाक्षात्काराची प्राप्तीही महालक्ष्मीचे वरदान आहे. महासरस्वती, महाकाली आणि महालक्ष्मी या तीन शक्ती आज्ञाचक्रावर एकत्र येतात. तेथे सूक्ष्मरुपात अहंपण आहे. त्यामुळे व्यक्तीने अंतःदर्श न (स्वतःत डोकावून आत बघितले पाहिजे) ठरावीक सीमेमध्ये राहूनही मी पूर्ण विश्वाला कसे प्रकाशित करु शकतो? मी खूप वेळा सांगितले आहे की आपल्या आत, आत डोकावा.

खूप लोक देवीप्रमाणे माझी पूजा करतात. पण याचा मला काय फायदा? मी तर जी आहे तीच आहे. माझ्या प्रती श्रद्धा राखल्यास तुम्हाला फायदा होतो. तुम्ही सहजयोगात आलात. सरस्वतीपासून महासरस्वती तत्त्व प्राप्त केले. माझ्यावर केवळ विश्वास ठेवल्याने तुम्ही संतुष्ट होऊ नका. तुम्ही प्रथम स्वतःवर विश्वास करा आणि स्वतःचे उत्थान करा.

सरस्वती तत्त्वामुळे व्यक्ती समर्थ आणि स्फुर्तिदाय होते. महाकालीत तुम्ही इच्छा करता आणि आत्मसात करता (मिळवता). या इच्छांना कृतीत आणणे, कार्यान्वित करणे महासरस्वतीचे कार्य आहे. काही लोकांना वाटते सहजयोगाचा प्रसार व्हावा. पण यात तुमचे कार्य कोणते? तुम्ही किती जणांना आत्मसाक्षात्कार दिला? किती लोकांशी सहज योगावर बोललात? आपल्या इच्छा कार्यान्वित करा. कार्य सुरु झाले की इच्छा समाप्त होतात. ज्या पूर्ण होतील अशा इच्छा तुम्ही करायला हव्यात. कारण अशक्य इच्छा धरणे योग्य नाही. ही सरस्वती पूजा पूर्ण भारतात केली जावी. सरस्वती पूजा पूर्ण भारतासाठी आहे कारण आळसाचा रोग संपूर्ण भारताला लागला आहे. आम्ही जराही तरतरीत (चुस्त) नाही. आमच्या इच्छा दृढ आहेत. परंतु त्यांच्या पूर्ततेसाठी आम्ही काही करीत नाही. एकत्रित होऊन विचार करा की, सहजयोग पसरविण्यासाठी आपण काय करु शकता.

प. पू. श्री माताजी - कलकत्ता (कोलकाता) - ०३.०२.१९९२

आपण सरस्वतीचीही आराधना केली पाहिजे. सरस्वतीचे कार्य महान आहे. सरस्वतीने प्रथम पूर्ण अंतरिक्ष तयार केले. त्यात पृथ्वीतत्त्व महत्त्वाचे आहे. पृथ्वीला चंद्र आणि सूर्यांध्ये आणून ठेवले त्यामुळे पृथ्वीवर सृजनाचे कार्य सोपे झाले. ही जिवंत क्रिया होती. या क्रियेमुळे हळूहळू मानवाची निर्मिती झाली. माणसाला एक एक महत्त्वाची शक्ती प्राप्त झाली ती म्हणजे सृजनाची. नवनिर्मितीची शक्ती. सृजनातून अनेक कलांचा जन्म झाला. हा सरस्वतीचा आशीर्वाद आहे. आमची मुले शाळांमध्ये विद्यार्जन करतात. मात्र त्या विद्येत आत्मा हवा. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, बिना आत्मा प्राप्त केलेली विद्या म्हणजे अविद्या होय. आत्मसाक्षात्काराशिवाय तुम्ही विज्ञान शिका किंवा अर्थशास्त्र. ते तुम्ही पूर्ण समजू शकत नाही किंवा ते उपयोगातही आणू शकत नाही. म्हणजे ज्ञान आकलन होते पण उपयोग कौशल्यापर्यंत जाता येत नाही.

मुले दोन प्रकारची असतात. एक ज्यांना शिकण्याची आवड आहे आणि दुसरे ज्यांना आवडत नाही. काही मुले खुप हुशार बुद्धिमान असतात पण काही हुशार नसतात बुद्धी कमी असते. उत्तम बुद्धिमत्ता ही सरस्वतीची देणगी आहे पण सुबुद्धि आत्मा देतो. बुद्धीमुळे मिळालेले ज्ञान सुबुद्धीवर मोजले नाही तोवर ते ज्ञान हानिकारक होते. आत्मसाक्षात्कारानंतर जे विद्यार्जन होते त्यात नीर- क्षीर - विवेक येतो. भल्याबुऱ्याचे योग्य ज्ञान त्यात असते. काय शिकावे काय नाही हे समजते. या आधी सीमांचे ज्ञान नसते. मनुष्य कोणत्याही रस्त्यावर जाऊ शकतो. कुठेही वळून वाईट कृत्य करु शकतो. यावर एकच उपाय अशा व्यक्तींना आत्मसाक्षात्कार होणे. आत्म्याचा साक्षात्कार झाल्यावर सरस्वतीची चमक बुद्धीमध्ये येते. जी मुले लिहिण्यावाचण्यात कमजोर असतात तेही आत्मसाक्षात्कारानंतर उत्तम प्रकारे अभ्यास करु लागतात. त्यानंतर कलांची उत्पत्ती होते. आत्मसाक्षात्काराशिवाय कलेला आत्मसात करता येत नाही. तशी कला अर्धवट राहते किंवा तो कलाकार अमर्याद

होऊन अशा जागी धडकतो जिथे त्याचे अस्तित्त्वच संपते. त्यामुळे प्रथम आत्मसाक्षात्कार करुन नंतर सरस्वती पूजन करणे ही शुभ गोष्ट होय.

आत्मसाक्षात्कारी व्यक्तीची कला अनंताच्या शक्तीने पल्लवीत होते. तेव्हा तुम्हीही आत्मसाक्षात्कारी झाले आहात. कलात्मकता तुम्हाला त्वरित निर्विचारीतेत नेते. कलात्मक वस्तूच्या दर्शनाने मन मोहून जाते. म्हणून ते तत्काळ निर्विचार अवस्थेत जाते. सौंदर्याच्या दर्शनाने चैतन्य एकदम वाहू लागते. सौंदर्यामुळे तुम्ही निर्विचारी होता म्हणून आदिशंकराचार्यांनी याला 'सौंदर्यलहरी' म्हटले आहे.

कलेची जेव्हा विक्री होते. पैसे कमावले जातात तेव्हा तिचा आत्मा नष्ट होतो. कला आनंदमयी व्हायला हवी, तिच्यापासून पैसे मिळवणे नव्हे. शांतिमय ध्यानावस्थेमध्ये राहिल्याशिवाय कलासृजन अपूर्ण राहते. आपल्याला कलेचे तंत्र किंवा टेक्निक तंत्र माहीत हवे. तुम्हाला आत्मसाक्षात्कार होतो तेव्हा सृजनकला वाढते.

प. पू. श्री माताजी - यमुनानगर - ०४.०४.१९९२

सरस्वतीचा आणखी एक गुण हा आहे की, ती अत्यंत सूक्ष्म गोष्टीत प्रवेश करु शकते. ज्याप्रमाणे पृथ्वी माता सुगंधात परिवर्तित होते. त्याचप्रकारे संगीत लयीत परिवर्तित होते आणि ज्या गोष्टींचे ती सृजन करते ती महान होत जाते. जो पदार्थ ती उत्पन्न करते ती सौंदर्याने संपन्न होत जाते.

प. पू. श्री माताजी - धुळे (महाराष्ट्र) - १४.०१.१९८३

२)<u>ब्रम्हदेव</u>

ब्रम्हदेव स्वाधिष्ठानावर बसले आहेत. ते स्वाधिष्ठानाला शक्ती देतात. त्यांचे प्रथम कार्य म्हणजे सृजनासाठी शक्ती प्रदान करणे.

प. पू. श्री माताजी - निर्मलायोग - जुलै-ऑगस्ट १९८५

"ब्रम्हदेव जे आहेत. त्यांनी क्रिया करुन सारे जग निर्माण केले. सुंदरतेने सर्वकाही बनवले. पंचमहाभूतांना घेऊन त्यांनी सर्व जगाची उत्पत्ती केली.

प. पू. श्री माताजी - निर्मलायोग - दिल्ली - १७.०२.१९८१

जे चित्त आहे ती ब्रम्हदेवाची देणगी आहे.

प. पू. श्री माताजी - पुणे - २३.०२.१९९०

हजरत अली या पृथ्वीवर अवतरले - तो ब्रम्हदेवाचा·अवतार होता.

प. पू. श्री माताजी - १४.०८.१९८८

# नाभीचक्र

## १) श्री विष्णु – धर्म आणि विकासाचे आधार

आपल्या आत जे दुसरे महत्त्वपूर्ण तत्त्व आहे ते आहे विष्णुतत्त्व. विष्णुतत्त्वामुळे आपले धर्माचरण होते. ते नाभीचक्राने ते प्रभावित होते. नाभित आपल्या आत धर्माचा उदय होतो. जसे तुम्ही अमिबा होता तेव्हा अन्नपाणी शोधण्यासाठी हालचाली करीत होता. आता अमिबाच्या वर तुम्ही मानव झालात आणि सत्ता शोधण्यासाठी हालचाली करता. तुमचा खरा धर्म हा आहे की, तुम्ही परमेश्वराला शोधा. त्यासाठी हालचाली करा. हा माणसाचा धर्म आहे. जनावरे, प्राणी परमेश्वराला शोधू शकत नाहीत. याची दहा अंगे (भाग) आहेत. धर्मतत्त्व आपल्याला विष्णुकडून मिळते.

बरीच माणसे विचार करतात की श्री विष्णुकडुन आम्हाला धन पैसा मिळतो. लाभ होतो. परंतु त्यांच्याकडून पैसा मिळणे हा एकच लाभ नाही. आमच्या अशा धारणा आहेत की, आमचे सुख, आनंद (क्षेत्र) जितके आहे, आम्हाला श्री विष्णू तितके देतात. सर्व सुखांपासून काय लाभ होतो तुम्ही बघा, तुम्ही समजा.

एक मासोळी आहे. समुद्रापासून ती पूर्ण संतुष्ट आहे. तिने समुद्रातून सर्व मिळविले. समुद्राचा धर्म समजला. आता पृथ्वीचा, जमिनीचा धर्म जाणू या. प्रथम एक नंतर अनेक मासोळ्या बाहेर आल्या पाण्यात त्या पोहत होत्या. जमिनीवर सरपटू लागल्या मत्स्यअवतार जन्माला आला. आधी पाण्याचा धर्मनंतर जमिनीचा धर्म. जमिनीवर सरपटताना त्यांनी झाड बघितले. झाडाची पाने खाऊन भूक भागविता येईल. भूक प्राथमिक गरज आहे. भूक हा मानवी धर्म आहे. माणूस अन्नाच्या शोधात असतो. सरपटणाऱ्या प्राण्यातून कच्छ अवतार जन्मला. झाड उंच होते म्हणून पक्षी, जनावर आणि शेवटी मनुष्य अशी प्रगती माणसाने केली. अशा तऱ्हेने धर्म धारण करीत मासा ते मानव अशी प्रगती केली. जशी रुपे बदलली धर्मही विस्तारित होत गेले.

थोडक्यात माशाचा धर्म होता पाण्यात तरंगणे, नंतर कासवाचा धर्म होता जमिनीवर सरपटणे, त्यानंतर जनावर आले. त्याचा धर्म होता चार पायांवर चालणे. त्यांची मान खाली होती. त्यांच्यातील काहींनी मान उंच केली. सरळ झाले. उभे राहिले. मानव झाले. हा माणसाचा धर्म आहे. तो दोन पायांवर आणि सरळ उभा राहतो. ताठ मानेने बघतो.

हे सर्व बाह्य बदल झाले. ढोबळमानाने झाले. पण तत्त्वात माणसाने काय मिळविले? कारण जेव्हा जेव्हा तुम्ही एखादे कार्य करता ते तत्त्वही त्या कार्यात त्याप्रमाणे प्रभावित व्हायला हवे.

मनुष्याच्या आत एक नवे विकसित तत्त्व आहे ते परमेश्वराला शोधणे हे आहे. परमेश्वराचा शोध हे माणसाचे प्रथम महत्त्वाचे तत्त्व आहे. जो माणूस परमात्म्याचा शोध घेत नाही तो पशूहूनही बदतर (खालच्या पातळीचा) असतो. जेव्हा तो परमेश्वराला शोधू लागतो त्याचे नाभीतत्त्व विकास पावते. पूर्ण होते. परमेश्वरी शोध घेताना माणसाला सृष्टी दिसते, तारे ग्रह दिसतात आणि त्याला वाटते की यात परमेश्वर असेल. तिकडे दृष्टी गेल्यावर त्याला वेद लिहिणाऱ्या हिरण्यगर्भाची आठवण झाली. पंचमहाभूतांकडे, त्या तत्त्वांकडे माणसाचे लक्ष गेले. पंचतत्त्वांचे सार जाणण्याचा त्यांनी प्रयत्न केला त्यांना जागृत करीत त्यांनी यज्ञ, हवन केले आणि ब्रम्हदेव सरस्वतीची प्रार्थना केली पूजा केली.

सर्व काही केल्यावर त्यांना वाटले आम्ही सर्व काही बघितले. ओळखले. ज्ञान प्राप्त केले. ज्ञानाकडून माणूस विज्ञानाकडे वळला आणि आपल्यासाठी विनाशाची सामग्री निर्माण केली. हाती निराशा व असंतोष आला. यापासून वाचण्यासाठी त्याने नशा व वाईट गोष्टींचा आधार घेतला. परमेश्वर शोधायचा असेल तर विज्ञानाच्या मार्गाने जाता येणार नाही. विज्ञानातून आपण खूप ज्ञान मिळविले पण त्यातून आनंद मिळाला नाही.

प. पू. श्री माताजी - १५.०२.१९८१

मी काय सांगते ते लक्षात घ्या. विष्णु ब्रम्हांडाचे संरक्षक आहेत. सृष्टीची निर्मिती करीत असताना एका रक्षकाची गरज होती. नाहीतर ती सृष्टी नष्ट झाली असती. मानवाला संरक्षण मिळाले नसंते तर सृष्टीचा विध्वंस झाला असता. विकासाच्या काळात श्री विष्णुने वेगवेगळे अवतार घेतले आणि त्यांनी आपल्या भोवती पैगंबरांची (देवदूत) निर्मिती केली कारण धर्माचे रक्षण करु शकतील असे त्यांना वाटले. माणसाची टोकाला जाणे ही सवय असल्याने धर्मात संतुलन रहावे, संतुलनाशिवाय व्यक्तीचे उत्थान शक्य नाही.

प.पू. श्रीमाताजी - २५.०४.१९९४

श्री विष्णुच्या विकास प्रक्रियेत सर्व कसकसे विकसित झाले हे आपल्याला माहीत हवे. श्री विष्णुचे दहा अवतार आहेत. विष्णु पुढे जावून विराट रूप धारण करतात. आमच्यात विष्णु तत्त्वाची स्थापना अतिशय सुंदर रुपात आहे. याचाच परिणाम म्हणून आपण घर, सत्ता, प्रेम, मुले आणि सर्व वस्तू मिळवू इच्छितो. विकास प्रक्रिया ज्यामुळे विकसित झाली ते विष्णुतत्त्व. विष्णुतत्त्व ही सगळ्यात मोठी देणगी आहे.

देवदेवतांचा विकास मानवाप्रमाणेच झाला. जसे विष्णुचे मासा, कासव, वामन अवतार, यानंतर पाश्चिमात्य पुराणाती ग्रीक कथांचे नायक जो येशुच्या रुपात विकास पावला. त्यानंतर ते श्रीरामाच्या रुपात आले. ते अत्यंत विवेकी, सतर्क, सावध मर्यादा पुरुषोत्तम, सुंदर व्यक्ती होते. आपल्या सर्व शक्तींची जाणीव असूनही त्यांना आपला विष्णु अवतार विसरावा लागला. धर्माच्या मर्यादेत राहून मानव आदर्श स्थापित करावा लागला. विकास प्रक्रियेत श्रीरामाने आपल्या जीवन काळात या सर्व गोष्टींना व्यावहारिक रुप दिले.

परंतु अजूनही विकासाच्या एका पायरीची आवश्यकता होती. तो विकास श्री कृष्णाच्या रुपात श्री विष्णुद्वारा झाला. श्री कृष्णाचे पूर्ण रुप काय आहे? श्री कृष्णाच्या मते सर्व जीवन ही एक लीला आहे. त्यामुळे तुम्ही गंभीर होऊ नका. परंतु

सहजयोगींनी आधी राम बनायला हवे. श्री विष्णुंनाही आधी श्रीराम बनावे लागले. आमच्यासाठी आजपर्यंत श्रीरामाचीच अवस्था आहे.

परिवार, सुखसोयी, धन इ. आपल्याला प्राप्त आहेत. या वस्तूंच्या मोहात अडकले की, तुम्ही जाळ्यात फसले. जर तुम्हाला कृष्णासारखे व्हायचे असेल तर जीवन म्हणजे केवळ लीला किंवा आनंद नव्हे. कंसाला मारुन परिवार आणि प्रजा यांच्या अडचणीचा नाश केला तेव्हा श्री कृष्णाने सांगितले की, जीवन म्हणजे लीला आहे. आपल्या अंतरातील कंस आणि इतर राक्षस आहेत. त्यांचा वध केला तरच जीवनाला लीला म्हणू शकतो. श्री कृष्ण स्वतःला विष्णुचे अवतार आहेत हे जाणत होते. ते पूर्णावस्थेला पोहोचले होते. श्रीकृष्णांनी आपल्याला लीलेची संकल्पना स्पष्ट केली.

सहजयोग्यांसाठीही जीवन एक लीला आहे.

प. पू. श्री माताजी - १९.०८.१९९०

आता सहजयोग धर्माच्या रुपात स्थापन झाला आहे. धर्माचा आधार विष्णु आहे. विष्णुला समजून घेतले पाहिजे. व्यक्तींना धर्माचा आधार समजणे आवश्यक आहे. पदार्थ विज्ञानात आठ (मूलतत्त्वे आहेत). संयुगे (संयोजकता) मानवात ती दहा असतात. काही सकारात्मक तर काही नकारात्मक असतात. त्यांची निर्मिती श्री विष्णुंनी केली. तेच त्यांचे रक्षण, देखभाल, पोषण करतात. जेव्हा मानवाचा ऱ्हास होतो तेव्हा ते जन्म घेतात. विराटांच्या अंतिम अवस्थेत विष्णु तत्त्व दोन भागांत विभागले आहे. एक विराट दुसरे विराटांगना, तिसरे महाविष्णुतत्त्व जे येशू ख्रिस्ताच्या रुपात अवतरीत झाले. ही तिन्ही तत्त्वे सहस्त्रारात गतीशील आहेत. विष्णुतत्त्वात आपण आंतरिक धर्माचा संदेश सर्व विश्वात पसरत आहे हे बघू शकतो.

विकास प्रक्रिया - धर्माची स्थापना हे गुरुचे कार्य होते. मानवाला धार्मिक बनविले गेले होते. धर्म आत आहे. त्यामुळे विष्णुतत्त्व जागृत होणे आवश्यक आहे. हे तत्त्व दुसरीकडे पसरले तर विष्णु रोगमुक्त करतात. ते धन्वंतरी, चिकित्सक आणि

मानवाचे रक्षक आहेत. जर आम्ही धर्माचे रक्षण केले तर आम्ही आजारी होऊ शकत नाही. काही कारणाने तुम्ही आजारी झालात तर विष्णु तुमचे रक्षण करतात.

ते यमही आहेत. आपल्या मृत्यूला तेच जबाबदार आहेत. नक्कीच शिव जीवनतत्त्व ओळखले जाते. नंतर यम शरीराचा ताबा घेतो. श्री विष्णु निर्णय घेतात की, आपण कोठे जायचे? आत्म्याला योग्य ठिकाणी ठेवण्याचे कार्य महाविष्णुच्या मदतीने केले जाते.

श्री विष्णुला धुम्रपान तंबाखू पसंत नाही. दारु नशा येणारे पदार्थ, मानवाने तयार केलेली औषधे आवडत नाहीत. एखाद्या सहजयोगीने (अँटिबायोटिक) घेतले तर त्याला उलटी होईल. पुष्कळशी औषधे आपण घेऊ शकत नाही. जे सहजयोगाविरुद्ध - अधार्मिक आहेत ते घेऊ नयेत. सहजयोगात परिपक्वता आल्यावर तुम्ही कोणतेही चुकीचे काम करणार नाही. जे जे गुण ते विष्णु तत्त्व. विष्णु तत्त्व स्थापन करणे सहजयोगींसाठी कठीण नाही. आपली प्रगती झाल्यावर अधर्म क्षीण होतो. विष्णुतत्त्व जागृत होते.

प. पू. श्री माताजी -१३.०७.१९९४

## २) श्री लक्ष्मी – क्षेमप्रदायिका

### लक्ष्मीतत्त्व

आज दिवाळीच्या दिवशी आपण लक्ष्मी तत्त्व म्हणजे आपल्या नाभीचक्राची पूजा करतो. श्री लक्ष्मी इतकी हितकारक, करुणामयी आहे की, केव्हाही कोणावर दबाव टाकत नाही. उलट श्रीमंत माणसे नेहमी इतरांवर दबाव टाकतात. इतकेच नाही तर सहजयोगातही जर कोणी चांगल्या आर्थिकस्थितीतील असेल तर इतरांना मागे ढकलून त्यांच्यावर दबाव टाकून मागे ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्यांना वाटते की, पैशामुळे त्यांना ही शक्ती मिळाली आहे. पण खुद्द लक्ष्मीजी तर कमळावर उभी आहे. तिच्या व्यक्तिमत्त्वाचे सौंदर्य झळकते. कारण ती फुलावर उभी असून कोणालाही त्रास, कष्ट देत नाही. लक्ष्मीची पूजा करणाऱ्यांनी हे लक्षात ठेवा की, तुम्ही कोणावरही दबाव टाकू नका, कुणाला ढकलू नका, कोणावर नियंत्रण आणू नका. कोणालाही नष्ट करु नका. लक्ष्मीचे चरण कमळावर आहेत. तिच्या दोन्ही हातातही कमळे आहेत. कमळ सौंदर्याचे प्रतिक असून गुलाबी रंग प्रेमाचे प्रतिक होय. हे प्रतिक सांगते ज्याच्याजवळ लक्ष्मी आहे, धन आहे त्याने कमळाप्रमाणे उदार व्हायला हवे.

कमळ छोट्याशा भुंग्यालाही आपल्या आत झोपायला जागा देते. आपल्या पाकळयांनी झाकून आराम देते आणि त्याचे रक्षण करते.

धनवान व्यक्तीचा स्वभावही असाच असायला हवा. नाहीतर खूप लवकर त्याचे धन त्याला सोडून जाईल किंवा मनात नेहमी पैशांच्या सुरक्षिततेबाबत काळजी वाटत राहील. इथे तिथे तो आपला पैसा लपवतो. त्याचे घर त्याला सुख देत नाही. घर असे हवे जेथे आपल्याला स्वातंत्र्य मिळेल. भौतिकता प्रभावी झाली की, आपण लक्ष्मी तत्त्वाबाहेर जातो. आमचे आंतरिक वैभव, सौंदर्य समाप्त होते. लक्ष्मीतत्त्वाला समजायला हवे की भौतिक पदार्थ तुमचे प्रेम व्यक्त करण्यासाठी आहेत. इतरांसाठी तुम्ही काय काय करु शकता? त्यांना किती सुख देऊ शकता? मी बऱ्याचदा बघितले

आहे की, गृहलक्ष्मी गालिच्याच्या चिंतेत बुडालेली असते. इतका खालचा स्तर मानवीय नव्हे. त्यांच्या मते धन म्हणजे बँकेतील पैसे. लक्ष्मीतत्त्वाचा अर्थ आपले प्रेम इतरांवर व्यक्त करणे होय.

लक्ष्मीचा आणखी एक प्रतिकात्मक गुण आहे की, ती आपली माता आहे. ती आनंददायिनी आहे. मी नेहमी विचार करते की, तुम्हाला काय देऊ? मी बऱ्याच वस्तू देऊ इच्छिते. असे करणे मला आवडते. आनंद देण्यासारखे आनंददायी दुसरे काही नाही. आपल्या अंतर्मनात हे समजायला हवे की, आपण भौतिकतेत खूप अडकलो आहोत. पण याचा अर्थ हा नव्हे की, आपण धनसंपदा मिळवायची नाही. काम करु नये. आळशी व्हा असे नाही. तुम्ही जे पैसे कमावता ते इतरांना देण्यासाठी आहे. नाही तर तुमची परिस्थिती बिघडेल. धनाबाबत तुम्ही नेहमी असुरक्षित असाल. ज्यामुळे तुम्हाला सतत काळजी वाटते त्या धनाचा काय लाभ? यापेक्षा थोडे पैसे असावेत आणि सहजयोगाचा भरपूर आनंद घ्यावा.

लक्ष्मी तत्त्वात धनाचा लोभ नसावा. एखाद्या गाढवावर नोटांच्या गोण्या लादल्या तरी ते गाढव लक्ष्मीपती होत नाही. एखाद्याकडे गाडी आहे पण सतत घाबरलेला असेल तर त्या धनाचा उपयोग काय? त्यालाही लक्ष्मीपती म्हणता येत नाही. या धनात मोठेपण नाही. वेडेपण आहे. यात गोडवा नाही. संस्कृती नाही. अशा घरात मी जेवत नाही. जेवले तर उलटी होते. तुम्ही विचार करा. दुसऱ्यांसाठी आपण काय खर्च करणार? इतरांसाठी काहीतरी करणे, देणे ही सहजयोगीची पहिली ओळख आहे मी असे ऐकले आहे की, सहजयोगासाठीही लोक पैसे खर्च करायला तयार होत नाहीत. सहजयोग सर्वांचा उद्धार करण्यासाठी व विश्वाला मदत करण्यासाठी आहे. स्वतःला श्रृंगारण्यासाठी सहजयोग नव्हे किंवा सहजयोगाचा फायदा घेण्यासाठी नव्हे. सहजयोगात सुरुवातीला लक्ष्मीचे ओझरते दर्शन होते (झलक). नंतर लक्ष्मी व तिचा आशीर्वाद प्राप्त होतो. हे पहिले प्रलोभन आहे. यामुळे तुमची अधोगती होते. यानंतर लक्ष्मीचे दुसरे प्रतिक आहे. ती दोन्ही हाताने देते. घराची दोन्ही कवाडे उघडली तरी भरपूर हवा खेळेल. ज्यांचे लक्ष्मीतत्त्व

विकसित होते ते लोक इतरांना काय द्यायचे याचा विचार करतात. बिनकामाच्या गोष्टी ते कोणाला देत नाहीत. जें उपहार भेटी आहेत ते उत्तमच हवेत. ही कला शिकायला हवी. ती अतिशय सुंदर व आनंददायी कला आहे.

परिघावर दोन्ही प्रकारच्या शक्ती काम करतात. एकीकडे कंजूष दुसरीकडे अयोग्य फायदा उठविणारे. कधी कधी तुमचे शोषण करतात. काही हरकत नाही. शोषणकर्त्याला नक्कीच त्याचे फळ भोगावे लागेल. आपल्या दसपट त्याला त्रास होईल. सहजयोगींना ही गोष्ट समजली पाहिजे. आम्ही एकटे नाही. परमेश्वरी आशीर्वाद आम्हाला प्राप्त आहे. देणे म्हणजे माझे काही नाही हे समजणे. सहजयोगात मी हे बघून बेचैन होते. लोक आपल्या मुलांच्या प्रेमात गुरफटतात आणि दुसऱ्यांचा विचार करीत नाहीत. हा स्वार्थच आहे. पुढे हीच मुले राक्षस बनून तुम्हाला शिकवतील. लहानपणी मुलांना सामाजिक केले, इतरांना देण्यातला आनंद शिकवला तर अशी मुले लहानपणीच अत्यंत उदार होतील. उदारता हा अवतारांचा गुण आहे. ऐश्वर्य म्हणजे धन नव्हे तर उदारता हा श्रेष्ठ गुण अंगी येणे. हीच सहजयोगीची ओळख आहे.

लक्ष्मी तत्त्व कसे येते? लक्ष्मीचा जन्म समुद्रातुन झाला आहे. समुद्राकडे पाहा. त्याच्या विशालतेने सर्वत्र पंख पसरले आहेत. तो तापतो, ढग करतो. हे ढग पर्वताला अडले की पाऊस पडतो. हे पाणी नदीच्या रुपाने समुद्राला मिळते. मीठ समुद्र आपल्यात सांभाळतो. येशूने म्हटले आपण मीठ आहोत? आपल्या जेवणाला चव देणारे मीठ हे आपले गुरु तत्त्व होय. जर तुम्ही कंजूष असाल तर गुरु बनू शकत नाही. लक्ष्मी तत्त्वाचा जन्म गुरु तत्त्वातून झाला. जेव्हा आपल्यात गुरु तत्त्व जागृत होते तेव्हाच लक्ष्मीतत्त्व जागृत होते. धन मिळाल्याने नाही.

गुरु तत्त्वाशिवाय धर्म नाही. तुम्ही जर माता, पिता, सामूहिकता, विश्व याबद्दल विचार करीत नसाल. तर आपण स्वार्थी बनतो. परंतु जेव्हा लक्ष्मी तत्त्व उदयमान होते तेव्हा इतरांबद्दल प्रेम निर्माण होते. मी जाणते की, तुम्ही सर्वजण माझ्यावर प्रेम करता. हे सर्व आईचे पूर्ण प्रतिबिंब नाही. तुम्ही परस्परांवर प्रेम करा.

प्रेमाने एकमेकांना सर्व गोष्टी द्या. प्रेमाचा प्रकाश जेव्हा आपल्यावर येतो त्या प्रकाशात चालतांना आपण अतिशय उदार होतो. त्या उदारतेतला आनंद घ्या.

आपल्याला मध्यात आले पाहिजे. प्रेम प्रकट होण्यासाठी मध्यात येणे आवश्यक आहे. पूर्ण नम्रतेने आपली अभिव्यक्ती व्हायला हवी. असे आपण आपल्यासाठी करतो आहोत. दुसऱ्यांसाठी नाही. मी जर कोणाला पैसे देऊन मदत केली असेल तर ती माझी मलाच मदत होते. कारण त्या व्यक्तीचे कष्ट मला बघवत नाही. त्याबद्दल मी बोलू शकत नाही पण त्याचे कष्ट दूर झाल्याचा आनंद मिळतो.

आम्ही मुलांना कसे वाढवतो? ते उदार आहेत का? ते संत आहेत का? वागणे, बोलणे राहणे या संदर्भात सुंदर आहेत का? त्यांच्यात आत्मविश्वास आहे का? उद्या त्यांना सहजयोग्यांचे नेतृत्व करायचे आहे. आपल्या मुलांना दीपस्तंभाप्रमाणे केले आहे का? दिवा जळून इतरांना प्रकाशित करतो. आपण मुलांना स्वार्थी केले का? हजारो मुले जन्म घेतात. ते जन्मजात आत्मसाक्षात्कारी असले तरी त्यांना बिघडवू नका.

महालक्ष्मीतत्त्व शेवटी फातिमाबीच्या रुपात अवतरीत झाले. फातिमा गृहलक्ष्मी होती. ती घरी राहत होती. घरी राहून तिने मुलांची आणि सत्य धर्मासाठी लढणाऱ्या पतीची देखभाल केली.

**महालक्ष्मी तत्त्व काय आहे?** सत्याच्या यज्ञावर मुलांचे बलिदान म्हणजे महालक्ष्मी तत्त्व. सहजयोगात असे करण्याची गरज नाही कारण आपण आशीर्वादित आहोत. पण आपल्या मुलांचे पालनपोषण नीट केले नाही तर ही मुले आपल्याला जबाबदार धरतील. मुले जिद्दी असली, इतरांशी प्रेमाने वागत नसतील तर त्यांना थांबवले पाहिजे. मुले खूप हुशार असतात. अतिलाड बंद केले तर ती सुधारतील.

महालक्ष्मीचे तीन सिद्धांत आहेत. चौथा सिद्धांत माझा आहे (माताजींचा). माझे कार्य खूप वरचे, विशाल आहे. त्यासाठी अतिशय धैर्याची गरज आहे. मी एखाद्याचे बलिदान केले तर हे कार्य होणार नाही. तर माझे व कुटुंबियांचे बलिदान

द्यायला हवे. माझी झोप आराम-सुख यांचे बलिदान, त्याग करावा लागेल. हे केल्याशिवाय तुमच्यात महालक्ष्मी तत्त्वाची अभिव्यक्ती होणार नाही.

जर तुम्ही तुमची सुखे, आळस, स्वार्थ यांना चिकटून राहिलात तर सर्व गोष्टी असून त्याचा उपभोग घेता येणार नाही. आपल्या आनंदाची काळजी करुन आपण या गोष्टी नष्ट करतो. प्रेमाची शक्ती प्रत्येक गोष्टीवर प्रेमाचे प्रभुत्त्व गाजवते. शरीर मन अहंकार या गोष्टींवर अधिकार गाजवतो. आपले कोणावर निर्व्याज प्रेम असेल तर ही प्रेमशक्ती आपल्यावर सर्व वस्तूंचा वर्षाव करते. ज्यांच्याजवळ शुद्ध प्रेम नाही त्यांना असा आनंद मिळत नाही. प्रेमाची शक्ती आनंदाचा स्त्रोत आहे. प्रेमहीन हृदयाला ते आनंदाने परिपूर्ण करीत नाही.

प. पू. श्री माताजी - इटली - २१.१०.१९९०

भारतात लक्ष्मीला धनाचीदेवी या स्वरुपात मानतात. लक्ष्मीच्या या प्रतिकाचे वर्णन खरेतर संत आणि पैगंबरांनी केले. नंतर मात्र लोक नाप्रतीक. समजू शकले ना याच्या मागे असलेली वास्तविकता. त्यांनी विचार केला लक्ष्मी सोने, चांदी, धनदौलत, हिरे, मोती याचे प्रतिक होय. त्यांनी धनाची पूजा सुरु केली आणि वैभवाची प्रतीक देवी तिची मोडतोड करुन दाखविले गेले.

देवीलक्ष्मीचे प्रतीक एकदम भिन्न आहे. सर्वप्रथम ज्यांच्याजवळ लक्ष्मी आहे त्यांना आई व्हावे लागते. त्याच्यात आईचे प्रेम होणे आवश्यक आहे. आई पूर्ण शक्तिस्त्रोत आहे. तिच्यात धैर्य, प्रेम तसेच करुणा असते. व्यक्ती करुणामय नसते धनाचा उपयोग दुसऱ्यांच्या हितासाठी करीत नाही. तोपर्यंत धन असूनही तो प्रसन्न असत नाही. आज लोक आपल्या धनाने आपलाच विनाश करीत आहेत. क्रोध, वासना आणि लोभ यांच्या पूर्तीसाठी ते आपल्या धनाचा दुरुपयोग करीत आहेत. आपण सर्वोत्तम आहोत हे दाखविण्यासाठी माणसे अवडंबरावर पैसे उधळतात. माणसे पथभ्रष्ट होत आहेत.

प. पू. श्रीमाताजी - रुस - १२.११.१९९३

लक्ष्मी कशी जन्मली हे मी सांगितले. लक्ष्मीच्या दोन्ही हातात गुलाबी कमळे आहेत. ती प्रेमाची प्रतिके आहेत. ज्या माणसाच्या हृदयात प्रेम नाही तो लक्ष्मीपती होऊ शकत नाही. कमळाच्या फुलासारखे लक्ष्मीपतीचे घर हवे. कमळाच्या आत भुंग्यासारखा शुष्क प्राण्यालाही आश्रय मिळतो. लक्ष्मी याला आपल्या फुलात राहू देते. मांडीवर झोपवते. त्याला शांती देते. लक्ष्मीजी एका हाताने दान देते तर दुसऱ्या हाताने आश्रय देते. लक्ष्मीपतीचा अर्थ आहे त्याचे हृदय विशाल आहे. कंजूस माणूस लक्ष्मीपती होऊ शकत नाही. राजसीपण हवे. ज्या व्यक्तीत राजसीपण नसते त्याला लक्ष्मीपती म्हणू नये.

जेव्हा माणूस असा विचार करतो की, हे माझे आपले आहेत यांच्या बरोबर जे काही करायचे ते मी माझ्याशीच करीत आहे. तेव्हा खऱ्या अर्थाने लक्ष्मीतत्त्व जागृत होते.

कमळाप्रमाणे त्याचे राहणे, वागणे, दिसणे असायला हवे. असा माणूस असायला हवा. कमळाचे फुल तुम्ही बघितले आहे. ते थोडेसे झुकलेले असते. कमळ कधी ताट उभे नसते. त्यात विनम्रता असते. जे देखावा करतात, सांगत फिरतात माझ्याजवळ हे आहे ते आहे ते खऱ्या अर्थाने लक्ष्मीपती नव्हेत. मातृत्त्व, मातेचे हृदय असेल तरच ते लक्ष्मीपती होत.

लक्ष्मीजी दुसऱ्या हाताने दान देते. दातृत्त्व असणारा माणूस स्वतःसाठी साठवणूक करीत नाही. आपल्यासाठी काहीही न ठेवता इतरांना वाटून टाकणारा तो खरा माणूस देत राहतो. देण्यातला आनंद उपभोगतो. घेत काही नाही.

हा माणूस लक्ष्मीपती आहे तो हे सांगत नाही. जतवित नाही. दाखवित नाही की, याच्यासाठी हे केले ते केले. इतके दिले, तितके दिले. एकदम गुपचूप सर्व करतो. परमात्म्याने लक्ष्मीला स्त्रीरुप, मातेचे रुप दिले आहे. एका कमळावर ती उभी असते. विचार करा. कमळ हे अत्यंत साधेपणाचे प्रतीक आहे. माणसात साधेपण, हलकेपण हवे. थोडक्यात तो दोषमुक्त हवा.

जेव्हा तुमच्यात लक्ष्मीतत्त्व जागृत होते तेव्हा पहिली गोष्ट येते संतोष, समाधान. तसे तर कोणत्याच गोष्टीला अंत नसतो. अर्थशास्त्रात म्हणतात - Wants in general are instatiable. (सर्वसाधारण कोणत्याही इच्छेची तृप्ती होत नाही). आज तुमच्याजवळ हे आहे उद्या ते हवे. माणूस इच्छांमागे वेड्यासारखा धावत राहतो.

परंतु (लक्ष्मीतत्त्व जागृतीनंतर) माणसाला समाधान मिळते. जोपर्यंत माणसाला समाधान मिळत नाही तोपर्यंत कुठल्याही गोष्टीत मौज येत नाही. कारण संतोष वर्तमानाशी संबंधित गोष्ट आहे. प्रेझेंटची (Present) आशा आहे. भविष्याची बाब आहे. फ्युचरच्या (Future) बाजूला जी निराशा आहे. ती त्रस्त ची बाब आहे. भूतकाळाची, जेव्हा तुम्ही पूर्ण समाधानात उभे राहता तेव्हा तुम्हाला मिळालेल्या आनंदाचा पूर्ण आनंद उपभोगता (तुम्ही वर्तमानात रहा, मध्यात).

संतुष्टी करणे हा लक्ष्मीदेवीचा गुण आहे. लक्ष्मीकडून आशीर्वाद मिळणे म्हणजे संतुष्ट होणे. तुमच्या हे लक्षात येते की, धन, सत्ता आणि इतर बेकार गोष्टींच्या मागे मागे धावणे मूर्खता आहे. धन आहे तर त्याचा सदुपयोग करा दुसऱ्यांना मदत करा.

प. पू. श्री माताजी - लक्ष्मीतत्त्व - चै. ल. २००४

जेथे दारु आहे त्या घरात लक्ष्मीचा वास असू शकत नाही. संपन्नता, समृद्धी दारुच्या पूर्ण विरोधात असते. दारु इतकी विनाशकारी आहे की, इकडून बाटली आली आणि तिकडून लक्ष्मी देवी गेली. विचार करा आम्ही अशा घाणेरड्या गोष्टी जवळ केल्या आहेत. ज्यामुळे लक्ष्मीतत्त्व दूर गेले आहे. या सर्वांबरोबर लक्ष्मी तत्त्व जागृत करणे अतिशय कठीण गोष्ट आहे.

जेव्हा आपण तांत्रिक विद्या आणि काळ्या जादूच्या मागे लागतो (मेलीविद्या) तेव्हा लक्ष्मी उलट्या पावली परत जाते. ज्या घरात जादूटोणा सुरु होतो.

लक्ष्मी मागच्या पावली निघून जाते. काळी विद्या, भूतप्रेतांची विद्या, स्मशान विद्या, दुष्ट गुरु, जोपर्यंत या बाबी तुम्ही हृदयातून काढून टाकीत नाही तोपर्यंत तुमच्या समाजाची गरिबी संपणार नाही. कारण लक्ष्मी अशा ठिकाणी राहत नसते.

जे काही तुमच्याजवळ आहे त्यात समाधान ठेवा. आपल्या लक्ष्मीतत्त्वाला जागृत करा. त्या जागृतीसाठी बुद्धिमत्तेचे घोडे पळविण्याची गरज नाही. काही विशेष विचार करण्याची आवश्यकता नाही. फक्त कुंडलिनी जागृत झाली की, हे कार्य होऊ शकते.

तेव्हा जो पैसा लक्ष्मी स्वरुप आहे तो तुम्ही मिळवा.

प. पू. श्रीमाताजी - नवी दिल्ली - १५.०३.१९८४

लक्ष्मी आपल्या नाभीत निवास करते. तिच्या संतुष्टीनंतर महालक्ष्मी तत्त्व जागृत होते .ते तुम्ही पुढे बघू शकता. नाभीतच श्री विष्णुचे स्थान आहे. विष्णुची शक्ती लक्ष्मी आहे. त्याबद्दल आपला शोध सुरु होतो.

जेव्हा आम्ही अमिबात होतो, तेव्हा खाणे शोधत होतो. जरा त्याच्यापेक्षा मोठे जनावर झालो तेव्हा सहचर, साथी शोधू लागलो. त्यानंतर माणूस बनलो आता सत्ता शोधू लागलो. पैसा शोधू लागलो पण पैसा आणि सत्ता मिळविल्यानंतरही समाधान मिळत नाही. सत्ता आणि पैसा मिळविल्यावर माणसाला अपेक्षित असणारा आनंद त्याच्या प्राप्तीनंतरही मिळत नाही. आनंद नाही, समाधान नाही. आता आनंदाचा शोध सुरु होतो.

आनंदाचा शोध तर नाभीचक्रापासूनच सुरु होतो. या शोधण्याच्या इच्छेमुळे अमिबा ते मानव हा प्रवास पूर्ण झाला. आज त्याच शोधइच्छेमुळे परमात्म्यास शोधणाऱ्या मानवाला ओळखतो. या शोधामुळे ते शक्य झाले. म्हणून लक्ष्मी स्वरुप महत्त्वपूर्ण आणि आवश्यक गोष्ट आहे.

तिची चार कार्य - उदारता, सुरक्षितता, अतिथी सत्कार आणि करुणा. यानंतर तुम्ही एका वेगळ्या दिशेला जाऊ लागता. तुम्ही जिज्ञासू बनता. जिज्ञासा, ज्यामुळे जीवनातील संतोष, समाधान प्राप्त करता.

या लक्ष्मीतत्त्वात एक उच्च तत्त्व, स्वतंत्र असते किंवा आम्ही असे म्हणू शकतो की, महालक्ष्मी तत्त्व संपन्न व्हायला हवे.

प. पू.श्री माताजी - ०९.०३.१९७९

आपल्यात देवी लक्ष्मी नसते. जेव्हा आपली कुंडलिनी नाभीवर येते जेव्हा आपली कुंडलिनी उघडली जाते तेव्हा आपल्यात जागृती येते. त्यामुळे लक्ष्मीचे स्वरुप तुमच्यात प्रगट होते.

प. पू. श्रीमाताजी - ३१.०३.१९८५

श्री लक्ष्मी व इतर देवी सर्व महिला आहेत. त्यांचे वैशिष्टय काय आहे? आपला स्वभाव आणि गुणांचा आशीर्वाद लोकांना देणे. लक्ष्मीच्या वरदानात धन हे ही एक वरदान आहे. धन जेव्हा आवश्यकतेपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण होते तेव्हा लक्ष्मीतत्त्वाचा सन्मान होत नाही.

प. पू. श्री माताजी - काना जोहारी - २०.०७.२०००

## श्री माताजीद्वारे अष्टलक्ष्मीची व्याख्या

सर्वप्रथम आद्यलक्ष्मी, आद्य म्हणजे आदि (Primordial) लक्ष्मी. जसे मी तुम्हाला सांगितले होते की, ती समुद्रातून निघाली होती. मेरी किंवा मरियम यांची उत्पत्ती समुद्रातून झाली. त्यांना मेरी का म्हणत हे माहीत नाही. माझे नाव नीरा होते. म्हणजे जलातून उत्पन्न झालेली.

दुसरी विद्यालक्ष्मी : ही आपल्याला परमेश्वरी शक्तीला सांभाळण्याची पद्धत शिकवते. लक्ष्मी काय आहे हे समजून घेतले पाहिजे. ती करुणाशील आहे. त्या शक्तीचा उपयोग प्रेमपूर्वक कसा करावा हे शिकवते. हाच आशीर्वाद आपल्याला आद्यलक्ष्मीकडून प्राप्त होतो व जलाप्रमाणे होतो. पाणी काय आहे? स्वच्छ करण्याची शक्ती आहे. पाण्याशिवाय कोणीही राहू शकत नाही. पहिला आशीर्वाद हा आहे की

आपला चेहरा तेजोमय होतो. आद्यलक्ष्मीमुळे स्वच्छ होतो. सर्व गंभीर गोष्टी, प्रकाश, विस्मृतीतील गोष्टी आपण पाहू शकतो.

विद्यालक्ष्मी आपल्याला ज्ञान देते. ज्ञान आणि परमेश्वरी शक्तीला प्रेमपूर्व क कसे सांभाळायचे ते सांगते.

सहजयोगातील बंधने घेणे, सहजयोग सांगणे, ध्यान करणे या सर्व गोष्टी सन्मानपूर्वक मोठेपणाने सांगितले पाहिजे. विद्यालक्ष्मी परमेश्वराचे ज्ञान सन्मानपूर्वक कसे वापरावे याचे आशीर्वाद देते.

<u>सौभाग्यलक्ष्मी</u> : ही आपल्याला सौभाग्य प्रदान करते. सौभाग्य म्हणजे पैसा नव्हे तर पैशाचा सन्मान. पैसा खूप लोकांकडे आहे. गाढवावर धनाचे पोते ठेवावे तसा. अशा व्यक्तीत गरीमा, पैशाचा सन्मान नसतो. सौभाग्य म्हणजे पैसा नव्हे तर चांगले भाग्य प्रत्येक गोष्टीत चांगले भाग्य. आशीर्वादाचा सन्मानपूर्वक उपयोग केल्यास आपण आशीर्वादित होतो आणि इतरांनाही सौभाग्यपूर्ण आशीर्वाद प्राप्त व्हावा असे म्हणतो.

<u>अमृतलक्ष्मी</u> : अमृत जे घेतल्याने मृत्यू येत नाही. अमृतलक्ष्मी आपल्याला अनंत आयुष्य देते. चिरंजीव करते.

<u>गृहलक्ष्मी</u> : परिवारातील सगळ्याच गृहिणी गृहलक्ष्मी असू शकत नाहीत. काही भयानक आणि भांडकुदळ असू शकतात. कुटुंब देवतेचा निवास जर आपल्या आत असेल तर ती चांगली गृहलक्ष्मी असते.

<u>राजलक्ष्मी</u> : राजांना मोठेपण, सन्मान प्राप्त करुन देणारी लक्ष्मी. राजा जर नोकराप्रमाणे व्यवहार करीत असेल तर तो राजा नाही. त्याने सन्मानपूर्वक वागले पाहिजे. राजाचा पराक्रम, मोठेपण हे त्याला राजलक्ष्मीचे वरदान आहे. परंतु

सहजयोगी राजा होत नाही, अतिशय डौलात चालतो. चांगल्याप्रकारे कार्य करतो. लोकांशी नम्रतेने वागतो. आपली सर्व कामे कौतुकास्पद पद्धतीने करतो की, लोक म्हणतात राजा माणूस आला.

<u>सत्यलक्ष्मी</u> : सत्यलक्ष्मीमुळे आपल्याला सत्याची चेतना प्राप्त होते. त्याशिवाय सत्यचेतना आपल्यात विद्यमान आहे. त्या सत्याला आपण वेगळ्या पद्धतीने मांडतो. इतरांवर लादतो. परंतु हे योग्य नव्हे. बोलण्यात अरेरावी नको, मृदू व प्रेमाने आपले म्हणणे मांडणे योग्य.

ही सर्व लक्ष्मी तत्त्वे आपल्या हृदयात विद्यमान आहेत. त्यांची अभिव्यक्ती मात्र डोक्यातून व्हायला हवी. मेंदू विराटाचे स्थान आहे. ते विष्णुचे स्थान आहे. सर्व शक्ती विशेषत: सत्यलक्ष्मी डोक्यात आहेत. त्यामुळे आपले डोके असे काम करते की, ते बघताच लोक म्हणतात ही वेगळीच व्यक्ती आहे. सहजयोगी समजदार असतो. आनंद कसा घ्यावा हे त्याला माहिती असते. सहजयोगी कधी काळजी करीत नाही.

तुम्ही आनंददायक गोष्टीतून आनंद घ्या, परंतु बेढब वस्तूंना हसूही नका. रागवूही नका. मध्यात रहा. आनंद मिळविण्याची शक्ती एक महान शक्ती आहे. अनेक लोक आनंदाला मुकतात. त्यांना आनंद घेता येत नाही.

<u>योगलक्ष्मी</u> : जी आपल्याला योग प्रदान करते. ही शक्ती तुमच्यातच असते. तुमच्या आतील लक्ष्मीशक्तीमुळे तुम्ही इतरांना योग सांगता, शिकवता. योग सन्मानपूर्वक शिकवायला हवा. त्या शक्तीने तुम्हाला आशीर्वादित केले आहे. त्यामुळे आपले आचरण सन्मानपूर्वकच हवे. आपल्याला योगात स्थिर केले आहे. हे विसरु नका.

प. पू. श्री माताजी - रोम इटली - २५.१०.१९८७

## श्री आदिगुरु – गुरुतत्त्व

गुरुशिवाय, एका सुधारक शक्तीशिवाय परमात्म्याच्या दैवी व्यवस्थेत चालणे खूप कठीण आहे. कारण मानवी चैतन्य आणि परमेश्वरी चैतन्य यामध्ये अंतर असते आणि केवळ गुरुच हे अंतर पूर्णपणे समाप्त करु शकतात. गुरु असा शोधला पाहिजे जो परमात्म्याबद्दल सांगेल. जो तुमच्या आत्म्याची ओळख करुन देईल. गुरुची एकच ओळख आहे जो परमेश्वराला भेटवील.

प. पू. श्री माताजी - सप्टेंबर, १९८१, चैतन्यलहरी २००१

गुरु काय करतो? तुमच्या आत जे बहुमूल्य गुण आहेत, तुम्हाला ज्ञान मिळावे म्हणून गुरु ते गुण शोधतो. खरेतर सर्व ज्ञान, पूर्ण आध्यात्मिकता, सर्व आनंद तर तुमच्यातच विद्यमान आहे. गुरु तर तुम्हाला केवळ आपले ज्ञान आपला आत्मा याप्रती सचेत करतात. गुरुचे काम आहे की, तो तुम्हाला तुम्ही कोण आहात याचे ज्ञान देणे. बाह्य जग हा भ्रम आहे. याबद्दल तुमच्यात जागृती निर्माण करणे हे पहिले पाऊल आहे. तेव्हा तुम्ही आतून प्रकाशित होऊ लागता.

प. पू. श्री माताजी, कबेला - २३.०७.२०००

सद्गुरुचे स्थान आपल्या शरीरात आहे. ते आमच्या शरीरात नाभीच्या चारही बाजूस आहे. सद्गुरुचे स्थान प्रथमपासून स्थापित आहे. गुरुतत्त्व अनादि आहे. तुमच्यात तीन शक्ती अदृष्यरुपात कार्य करतात. महाकाली - महासरस्वती - महालक्ष्मी शक्ती. आपले गुरुतत्त्व या तिन्हीच्या समन्वयाने बनले आहे. हे गुरुतत्त्व आमच्या शरीरात परमेश्वराने नावीन्यपूर्ण पद्धतीने प्रस्थापित केले आहे.

श्री दत्तात्रेय आपले आदिगुरु आहेत. श्री दत्तात्रेयात श्रीब्रम्हा, श्री विष्णु, श्री महेश या तिन्ही देवतांची शक्ती समाविष्ट आहे. ही शक्ती तुमच्या भवसागरात समाविष्ट आहे. संपूर्ण विराट पुरुषातही ही शक्ती स्थापित केलेली आहे. ही शक्ती अनेक वेळा जन्म घेते. श्री आदिनाथ या शक्तीचे अवतार होत. तिन्ही शक्तींपासून निर्माण होणारी प्राथमिक शक्ती होय. या शक्तीत धर्मांधता नाही. सर्व धर्माचे जे सार

आहे सर्व धर्मातील नवीनता, नावीन्य, धर्माचे भोळेभाळे रुप जे या तत्त्वात समाविष्ट आहे.

जगात जितके जगत्गुरु झाले आहेत. त्यांनी सहजयोगाचा मार्ग अनुसरला होता. सर्व गुरुंनी समाजात राहून लोकांची, समाजाची सेवा केली. त्यांना धर्म शिकविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्या काळी लोकांनी धर्मगुरुंचे न ऐकता त्यांच्यावर अनेक जुलूम केले. काहींचा त्यात बळी गेला. समाजाबाहेर घालविले. आता त्यांनाच समाज पालखीत घालून मिरवित असतो. जिवंतपणी विरोध आणि मृत्यूनंतर जयजयकार हे सद्गुरु तत्त्वाविरोधी आहे.

प. पू. श्री माताजी - २५.०७.१९७९

आपल्याकडे अनेक संत होऊन गेले, अनेक सूफी संत झाले, ताओ लोक झाले, जैन, झाले. त्यांना त्रास दिला गेला, भिन्न प्रकारचे आत्मसाक्षात्कारी लोक पृथ्वीवर आले. त्या सर्वांना त्रास सहन करावा लागला. त्यांचे म्हणणे ऐकले नाही. परंतु आता तुम्ही सत्य जाणून घेण्याची वेळ आली आहे. सत्य म्हणजे करुणा, सत्य तेच जे स्वतःत सर्वांना सामावून घेते. सत्य आमच्या अस्तित्त्वाची दृष्ये उलगडते आम्ही पृथ्वीवर का आलो? आमचे उद्दिष्ट काय आहे आणि आम्ही काय करायला हवे? हे सत्य सांगते.

प. पू. श्री माताजी - कबेला - ०३.०६.२००१

पूर्वी सद्गुरुंकडे दोन तीन शिष्य असत. परंतु जोपर्यंत ही गोष्ट (आत्मसाक्षात्कार) सर्वशक्तिमान मानव, सर्व जनसमुदायापर्यंत पोहोचत नाही तोपर्यंत त्याला काही अर्थ नाही. आता हे ज्ञान आम जनतेपर्यंत पोहोचवण्याची वेळ आली आहे. कारण तुमची अंतररचना ज्ञान प्राप्तीसाठी परिपक्व झाली आहे. फक्त तुमचे कनेक्शन मेनशी प्रस्थापित झाले की बस!

समाजात परमेश्वर प्राप्तीसाठी आणि कुंडलिनी शक्ती जागृतीसाठी सद्गुरु आवश्यक आहे. मातेचे दोन प्रकार असतात. एक सद्गुरुतत्त्व आणि दुसरे मातृप्रेम. अशा मातेचे हृदय प्रेमशक्ती आणि परमेश्वरी करुणा यांनी काठोकाठ भरलेले असते.

असे वाहणारे प्रेम आणि परमेश्वरी शक्ती आपल्या मुलांना देण्यासाठी ती माता अत्यंत उत्सूक असते. परंतु या बरोबरच गुरुतत्त्वाच्या सर्व बाबींचे उत्तरदायित्त्व सह पालन करणे आवश्यक असते.

प. पू. श्री माताजी - मुंबई- २५.०९.१९७९

मी स्वतःला अत्यंत सामान्य बनविले आहे. कारण मला तुमच्यासमोर असे यायचे आहे की, तुम्ही दैवी व्यवस्था जाणाल. माझ्यासाठी काही व्यवस्था नाही. तुमच्यासाठीच मी हे सर्व करीते आहे आणि छोट्या छोट्या गोष्टी शिकविते. कारण तुम्ही अजून 'बच्चे' आहात. गुरु त्यागी हवा. जंगलात राहत असावा हे आवश्यक नाही. तो सामान्य गृहस्थही असू शकतो. तो राजाही असू शकतो. व्यक्तीचे बाह्य व्यक्तिमत्त्व महत्त्वाचे नसते. गुरु जोपर्यंत दैवी व्यवस्था आत्मसात करीत नाही त्याच्या सांसरिक पदाचे महत्त्व नसते.

मी पुन्हा सांगते तुम्ही दैवी विधाने आत्मसात केली पाहिजेत. दैवी विधाने कोणती आहेत? काय आहेत?

(१) पहिला नियम (विधान) हे आहे की, तुम्ही कोणालाही दुःख देऊ शकत नाही. मनुष्य दुसऱ्याला सुधारु शकतो परंतु हानी पोहोचविण्याचा अधिकार त्याला कोणी दिला नाही. (अहिंसेचा नियम) कोणत्याही माणसाप्रती हिंसा करु नये. त्याला कोणत्याही प्रकारे शारीरिक कष्ट देऊ नका किंवा दुःख होईल असे बोलू नका.

(२) दुसरा नियम हा आहे की, तुम्ही तुमच्या पायावर उभे राहायला हवे. हे लक्षात ठेवायचे की, तुमची एकाकारीता सत्यासाठी आहे. तुम्ही सत्य बघितले आहे. सत्याचे साक्षीदार आहात. सत्य काय हे जाणल्याने तुम्ही असत्याबरोबर जमवून घेऊ शकणार नाही. स्वतःला ओळखा. ही केवळ इतरांना सांगण्याची गोष्ट नाही. तुम्हाला सत्यनिष्ट व्हायचे आहे.

(३) गुरु होण्यासाठी सहजयोगीला जे तिसरे कार्य आवश्यक आहे ते म्हणजे स्वतःमध्ये निर्लेपता निर्माण करणे. एकदा तुमचे चित्त आत्म्याशी एकरुप झाले की अनावश्यक गोष्टींबद्दलचा मोह आपोआप कमी होऊ लागेल. निर्लिप्तभाव अवश्य

विकसित व्हायला हवा. येथे निर्लिप्तता म्हणजे तुम्हीच तुमचे पिता आहात, तुम्हीच तुमची माता आहात. तुम्हीच सर्व काही आहात. तुमचा आत्मा सर्व काही आहे. तुम्ही तुमच्या आत्म्याचा आनंद घ्यायचा आहे.

(४) चौथा दैवी नियम आहे की, चारित्र्यपूर्ण जीवन घालवा. हे आदेश गुरुंनी दिले होते. सॉक्रेटिस व नंतर मोझेस अब्राहम जनक, मोहम्मद साहेब आणि श्री साई बाबा या सर्वांनी म्हटले होते की तुम्ही 'चारित्र्यवान जीवन' जगायला हवे. येशू ख्रिस्ताने सांगितले होते की 'परागमन' त्याज्य गोष्ट आहे. (Thou shall not commit adettery) त्या काळात असा विचार करणे फार दूरदृष्टीची गोष्ट होती. ही डोळ्यांची पकड आहे. हे आनंदविहीत व्यर्थ आचरण आहे. यामुळे चित्त विचलित होते. लोकांकडे अत्यंत प्रेमाने, सन्मानपूर्वक आणि मोठेपणाच्या नात्याने बघा. त्यांना निरखू नका. टक लाऊन बघू नका.

(५) गुरुने संग्रह करु नये. त्याच्याजवळ त्याने जास्त वस्तू जमवू नयेत. गुरुपाशी अशा वस्तू असाव्यात ज्या प्रतिकात्मक असतील त्या वस्तूंमुळे त्याची ओळख महानतत्त्ववेत्ता म्हणून व्हावी. (ग्रंथ).

दैवी नियम सांगणारा गुरु परिपूर्ण असावा. त्याने आपल्या शिष्यांच्या समज शक्तीला इतक्या उंचीवर न्यायला हवे की, हे नियम ते सहज आत्मसात करु शकतील.

प. पू. माताजी - सप्टेंबर १९८१ - चैतन्यलहरी २००१

गुरुतत्त्व एक अवस्था आहे. पद नव्हे. कारण पद बाह्य असते आणि ते कोणालाही दिले जाऊ शकते. ही एक अवस्था आहे. अंतर्निहित अस्तित्त्वाचा विकास गुरुतत्त्वाच्या स्तरापर्यंत विकसित व्हायला हवा. याशिवाय ही अवस्था कशी प्राप्त करता येईल? काही गुण आम्हाला प्रथमपासूनच विकसित करायला हवेत.

(१) ध्यानावस्थेत निर्विचार होणे हा पहिला गुण आहे. ध्यानावस्थेत तुम्ही थोडा वेळनिर्विचारीतेत राहू शकता. हळूहळू ही वेळ वाढत जायला हवी. ही एक अवस्था

आहे. तुम्हाला निर्विचारीतेचा मंत्र मिळाला आहे. आता निर्विचार अवस्थेत तुम्ही साक्षी बनणे सुरु करा. साक्षी झाल्यावर जी वस्तू तुम्ही बघाल तिचा सूक्ष्म आणि स्थूलपणाबद्दल पूर्णविचार देईल. बघितल्याबरोबर तुम्हाला अर्थ कळेल. सहजयोगी असल्यामुळे हे तुमचे ज्ञान असते.

(२) गुरु शब्दाचा अर्थ आहे 'गुरुत्त्व' मोठेपण. गुरुपदाच्या दुसऱ्या अवस्थेमध्ये गुरुत्त्वाची अभिव्यक्ती, मोठेपण व्यक्त होणे आवश्यक असते. गुरुत्त्व तुमच्या आत आहे. जसे तुम्ही साक्षी होता गुरुत्त्व आपोआप प्रकट होते. ते क्रोध किंवा गंभीरतेच्या रुपात प्रगटत नाही. अत्यंत गौरवपूर्ण व तेजस्वीपणे त्याचे प्रगटीकरण होईल.

हे गुरुत्त्व चुंबकाप्रमाणे कार्य करते. तुम्हाला गुरुपणात चुंबकीय स्वभाव, चरित्र आणि व्यक्तित्त्व प्राप्त होते. चुंबकीय व्यक्तिमत्त्व त्वरित आपल्या शक्ती प्रकट करते. जेव्हा तुम्ही उच्च अवस्थेत असता तेव्हा काहीही न बोलता फक्त दृष्टिक्षेपाने आपल्याला काय सांगायचे ते व्यक्त करु शकता. आपल्या गुरुत्त्वामुळे अंतरातील गहनतेला स्पर्श करतो. ती आमच्यात दैवी शक्ती जागृत करते आणि व्यक्त करते. जोपर्यंत आम्ही अंतरातील गहनतेला स्पर्श करीत नाही तोपर्यंत आमची अवस्था 'हरेरामा हरे कृष्णा' प्रमाणेच असेल.

(३) आत्मसन्मान गुरुसाठी आवश्यक आहे. ही अत्यंत महत्त्वपूर्ण आवश्यकता आहे. आत्मसन्मान प्राप्त करण्यासाठी अंतरात डोकवावे लागेल. अंतर्दर्शन करावे लागेल, जाणावे लागेल की, मी पहिल्यासारखी सामान्य व्यक्ती नसून मी एक आत्मसाक्षात्कारी व्यक्ती आहे. माझ्यात प्रेम, करुणा, समज, उमज, रचनात्मकता आणि दुसऱ्याला साक्षात्कार देण्याची शक्ती आहे.

सहजयोगात आपण स्वतःबद्दल विचार करीत नाही. कारण स्वयंचेतना आपल्याला अहं देते पण आपल्यात हवा आत्मसन्मान. 'मी एक गुरु आहे. कोणी मडकछाप सामान्य माणूस नाही. मी सत्याच्या काठावर आहे. मला अंध आणि गुढ लोकांना वाचवायचे आहे.

तेव्हा एक संपूर्ण शांती तुम्हाला प्राप्त होईल. कोणत्याही संकटात तुम्ही शांत असाल. ही पण एक अवस्था आहे. जर एखादी गोष्ट दुःखी किंवा त्रस्त करीत असेल तर मौनाच्या त्या अक्षापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करा. ही शांती (मौन) तुम्हाला शक्तिशाली करील. हे मौन फक्त आपले नसते या काळात तुम्ही ब्रम्हांडमय होता. तुमचा संबंध ब्रम्हांड चालविणाऱ्या दैवी शक्तीशी जोडला जातो.

जर तुम्ही केवळ मौन झालात तर समजा तुम्ही परमात्म्याशी जोडले गेलात. तुम्ही परमात्म्याच्या साम्राज्यात आहात याची तुमचे मौन खूण आहे. आता तुम्ही शांत आहात कारण परमात्मा तुमची सर्व कामे सांभाळतात. आपल्याला काही कराव लागत नाही. केवळ निर्विचार रहायला हवे. जबरदस्तीने नाही. कोणतीही समस्या आली तर चित्त एकदम मौनात जाते आणि तुम्ही परमेश्वरी शक्तीने जोडले जाता.

प्रेमाची ही सर्व व्यापक शक्ती काय आहे? ती आमच्या भोवती पसरलेली ऊर्जा आहे की. एक प्रकारची नदी की आकाश? ही वास्तविकतेची संपूर्णता आहे. वास्तविकता कधी असफल होत नाही.

(४) तुम्हाला तुमचा आत्मसन्मान आणि संतुलन कायम राखावे लागते. संतुलनात आल्यावर गुरु इतरांना संतुलनात आणतो. पंचमहाभूते व माणसे सर्वांना संतुलनात आणण्याचे कार्य गुरुचे आहे.

गुरु अवस्था प्रलोभन, वासना, मोह यांच्या पल्याडची अवस्था असते. तिथे तुम्ही पोहोचले तर समस्या समाप्त होतात. तुमच्या आत तपस्विता येते. ती अंतर्जात असते.

(५) एकगुरु व सहजगुरु यांच्यात अंतर आहे. साधारण गुरु अत्यंत रागीट असतात. मात्र क्रोध करणे सहजगुरुचे काम नव्हे. इथे तर एकमेकांसाठी प्रेम, करुणा आहे. कोणाशीही कठोर वचन बोलण्याचा अधिकार सहजयोगीला नाही. करुणा, मधुरता आणि हिताची इच्छा या नुसार इतरांशी व्यवहार करतो. तेच गुरुपद होय. तुम्हाला मातृसुलभ, अतिशय मधुर, करुणामय, समजुतदार आणि क्षमाशील व्हायला हवे.

(६) काय चांगले आहे याचा निर्णय अनुभव उन्नत करुन घ्यायला हवा. आता तुम्ही चांगुलपणा, धैर्य, करुणा, धर्मपरायणता, हितैशी याचे अवतार आहात. माझ्यापेक्षाही जास्त आनंद तुमच्यात आहे. कारण माणूस असल्याने इतर माणसे तुम्हाला उत्तम समजतात. हिंमत न हारता कार्य करीत रहा. तुम्ही गुरु आहात आपल्या शक्ती धारण करा.

आपण म्हणतो 'श्री माताजी मी स्वतःचा गुरु आहे' तुम्ही केवळ तुमचे गुरु नव्हे तर तुम्ही हैराण व्हाल, तुम्ही पूर्ण विश्वाचे गुरु आहात आपले गुरुत्व सामूहिक आहे. आमच्यात सर्व शक्ती आहेत. त्या धारण करताच संत एक गुरु एक व्यक्ती ज्याला आपल्या गुरुत्त्वाची जाणीव आहे. त्यांच्यासमोर कोणी उभे राहू शकत नाही. (टिकू शकत नाही).

तुमचे ज्ञान अत्यंत उच्चस्तरीय, सूक्ष्म आणि महान आहे. त्यामुळे तुम्हाला अहंपणा स्पर्श करीत नाही. तुमची नम्रता सहजता तुम्हाला ही एक विशेष गोष्ट प्राप्त होते. अशाप्रकारे तुम्ही सत्याचे प्रेरक बनता.

(७) विश्वात आपली एकाकारिता सर्व शक्तिमान परमेश्वराशी आहे. परमेश्वराबद्दल वादविवाद करु नये. परमात्म्यावर आपला विश्वास अविचल हवा. तो स्वतः परमात्मा असतो. गुरुला ब्रम्हचैतन्य म्हणतात. जेव्हा आपला विश्वास पूर्ण स्थिर होतो की सर्व शक्तिमान परमात्मा आहे. आपण त्याचे दूत होतो. परमेश्वरावर विश्वास बसतो. आपल्यावर गुरुपद प्राप्त होते. आपण अशी स्थिती प्राप्त करा की, सतत गुरुपदी राहिले पाहिजे. तुम्ही कोणीही असा परमेश्वरावर विश्वास ठेवाल तर परमेश्वर तुमच्यासमोर प्रकट होईल. तो परमेश्वराप्रमाणे काम करील. परमेश्वराच्या साम्राज्यात सर्व शक्तिमान परमेश्वराच्या शक्तीवर आमचा पूर्ण विश्वास हवा.

प. पू. श्री माताजी -१९.०७.१९९२

गुरु शब्दाची निर्मिती चुंबकीय आकर्षणातून झाली. ज्या व्यक्तीत चुंबकीय शक्ती आहे. जिज्ञासा आहे, चित्ताला आकर्षित करु शकेल तोच गुरु. तो वजनदार, स्थिर, गहन आणि पृथ्वी मातेप्रमाणे कार्य असणारा हवा. पृथ्वीची आकर्षण शक्ती चुंबकीय होय. गुरुतही चुंबकीय आकर्षण गुरुत्त्वाकर्षण म्हणजे आपल्या जबाबदाऱ्यांची गंभीर समज व स्थिरता आवश्यक असते.

प. पू. श्री माताजी - कबेला - १९९८

तुमच्यात गुरुत्त्वाकर्षण प्रबळ हवे. गुरुत्त्वाकर्षणाचे वजन म्हणजे, चारित्र्य, मोठेपण, आचरण, श्रद्धा आणि आपला प्रकाश यांचे वजन होय. तुच्छता आणि खोटा अभिमान यामुळे तो गुरु होऊ शकत नाही. अभद्र भाषा, खालच्या पातळीचे विनोद, राग, क्रोध हे दुर्गण गुरुने सोडले पाहिजेत. आपले मोठेपण व भाषेचे माधुर्य त्यातून लोकांना प्रभावित करा. मी तुमच्यावर प्रेम करते तसे तुम्ही प्रेमळ बना. मी समजावेल तसे समजावण्याचा प्रयत्न करा. मी तुमच्यापेक्षा वेगळ्या अवस्थेत आहे. प्रेमापलीकडे गेले आहे. तरीही तुमच्यावर प्रेम करते. या व्यतिरिक्तही इतर शक्तींचा स्त्रोत मीच आहे. या सर्व शक्ती तुम्ही प्राप्त करु शकता. ज्या शक्तीची इच्छा कराल ती वापरु शकता. मी इच्छामुक्त आहे. तुमच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी मी बांधील आहे. त्या पुरविण्यासाठी तुम्हाला कोणत्याच अडचणी येऊ नयेत.

प.पू. श्री माताजी - सप्टेंबर, १९८१

आपण आत्मसाक्षात्कारी आहात हे विसरु नका. आपल्या चैतन्य ज्ञानाचा उपयोग आपल्या रक्षणासाठी करा. नकारात्मकता तुमच्या जवळच आहे.

नियमांची निर्मिती करा ते पाळा. दुसऱ्यांवर प्रेम करण्याचे ज्ञान तुम्हाला हवे. हे गुरु तत्त्व होय.

प. पू. श्री माताजी, कबेला - ०४.०७.१९९३

❋ ❋ ❋

नमस्तेऽस्तु महारौद्रे महाघोर पराक्रमे

महाबले महोत्साहे महाभय विनाशिनी !!१७!!

माहिमां देवि दुष्प्रेक्ष्ये शत्रूणां भयवर्धिनी !!१८!!

महारौद्र रुप, अत्यंत घोर पराक्रम, महानबल, वाढत्या उत्साहवाली

हे देवी!

तूम्ही महान भयाचा नाश करणारी आहेस, मी तुला नमस्कार

करतो.

तुझ्याकडे बघणेही कठीण आहे. शत्रूंना भयभित करणाऱ्या

हे दुर्गे माझे रक्षण कर.

दुर्गासप्तशती - देव्याकवच - १७/१८

## अनाहत (मध्य)

## शक्तीप्रदायिनी श्री जगदंबा

देवी जगदंबा साऱ्या सृष्टीची माता आहे. जगदंबा भक्तांचे रक्षण करते. भगवंताला शोधणाऱ्या भक्तांचे ती रक्षण करते. भक्तांसाठी तिने राक्षसांचा वध केला, त्यांचे रक्त प्यायली, त्यांची भूते खाल्ली, संहार करुन तिने त्यांचे निर्दालन केले.

प.पू. श्री माताजी - निर्मल योग, सप्टेंबर, ऑक्टोबर - १६.०३.१९८४

त्या काळात देवीचे रुप माया स्वरुपी नव्हते. ती आपल्या खऱ्या रुपात होती त्यामुळे शिष्य अत्यंत भयभित झाले. शिष्यांच्या आत्मसाक्षात्काराचा प्रश्न नव्हता. सर्वप्रथम त्यांचे रक्षण करायचे होते. ज्याप्रमाणे माता नऊ महिने बालकाला गर्भात ठेवते, दहाव्या महिन्यात जन्म देते, त्याप्रमाणे तुम्हा सर्वांचे नऊ युगांपर्यंत चांगल्याप्रकारे रक्षण केले. दहाव्या युगात तुम्हाला जन्म दिला गेला.

प. पू. श्री माताजी - स्विझरलॅंड - २३.०९.१९९०

देवी नऊ वेळा पृथ्वीवर आली. जे साधकांना त्रास देत होते, त्यांचे जीवन नष्ट करीत होते, अशांचा देवीने विनाश केला. सतावल्या गेलेल्या या महात्म्यांनी देवीची पूजा केली, प्रार्थना केली. त्यानंतर गरजेनुसार देवी नऊ वेळा अवतरित झाली (अवतार घेतले). प्रत्येक वेळी तिला अहंकारी आणि निरंकुश लोकांना सामोरे जावे लागले.

प. पू. श्री माताजी - कबेला - २७.०९.१९९२

देवीची शक्ती तुमच्या हृदयात असते, हृदयचक्रात. हृदयचक्र म्हणजे देवी चक्र. देवी तत्त्वामुळे आमच्यात संरक्षणाची भावना प्रस्थापित होते. जोपर्यंत मूल बारा वर्षांचे होते तोपर्यंत या देवी तत्त्वांनुसार हृदय अस्थी (छातीचा पिंजरा) मध्ये सैनिक तयार होतात. ते सर्व शरीरभर पसरतात. सावधान राहतात आणि शरीरावर हल्ला झाल्यास तो परतवून लावतात. थांबवतात.

प. पू. श्री माताजी - तत्त्व की बात - १५.१२.१९८१

श्री जगदंबा आदिशक्तीचा अंश आहे. दोन हृदयांच्या (डावे - उजवे) मध्यावर महत्त्वपूर्ण बिंदूवर तिचे स्थान आहे. या चक्रात सर्व शक्ती ठेवलेल्या आहेत. तुमच्या शरीराच्या जवळपास असणाऱ्या सर्वगणांमध्ये मध्य हृदयातील शक्ती संक्रमित होतात. हेच गण तुम्हाला संरक्षण, ऊर्जा, निद्रा व आशीर्वाद प्रदान करतात. सर्वजण जगदंबेप्रती समर्पित असून सतत कार्यमग्न असतात. जगदंबेच्या संपर्कात असतात. ती ब्रम्हांड जननी आहे. त्यामुळे पूर्ण ब्रम्हांडाची देखभाल करायला जगदंबेला सातत्याने व्यस्त रहावे लागते. हे केंद्र दुर्बल झाले तर गण दुबळे होतात आणि आपल्या शक्तींचा वापर करु शकत नाहीत.

ममता चक्र असल्याने हे केंद्र अतिसूक्ष्म आहे. मातेचे प्रेम समजणे असंभव आहे. जगदंबेच्या सर्व शक्ती नकारात्मकता नष्ट करण्यासाठी कार्यरत असतात. त्यामुळे विश्वाची, तुमची आणि सहजयोगविरोधी सर्व नकारात्मकता नष्ट करणे हा जगदंबेचा सर्वतोपरी स्वभाव आहे.

माता जगदंबेची विध्वंसक शक्ती अनेक प्रकारे कार्य करते. प्रथम आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, देवीच्या संदर्भात काही अपराध केले तर आम्हाला कॅन्सर, एड्स सारखे मनोशारीरिक रोग होतात. पण काही आजारांचा संबंध श्री गणेशाशी आहे. गणपती सर्व गणांचे स्वामी आहेत. माता जगदंबा आपले पुत्र श्री गणेशांच्या माध्यमातून या गणांचे संचालन करते. जेव्हा आपण मातेविरुद्ध अपराध करतो, चरित्रहीन होतो, धर्मविरोधी काम करतो तरी माता लगेच दंड देत नाही. आई असल्याने आम्हाला सुधारण्याचा वेळ देते. मार्गदर्शन करते. परंतु जेव्हा शिक्षा सुरु होते. तेव्हा अतिशय भयंकर प्रकारचे आजार तुम्हाला होतात. सावधान!

हे सर्व भीतीमुळे होते. जेव्हा एखादी व्यक्ती तुम्हाला घाबरवते, किंवा आक्रमक होते. तेव्हा पीडित, त्रस्त, भयभीत व्यक्तीचा देवीवरचा विश्वास डळमळायला लागतो. अशावेळेस मध्य हृदयचक्राची देखभाल करायला हवी. भयभीत व्यक्ती आईपासून दूर डाव्या बाजूस जाऊ शकते. कारण डावी बाजू आत्मविश्वास, साहस आणि पराक्रम देणारी बाजू आहे. परंतु तुम्ही जर खूप घाबरला

असाल, भीतीच्या छायेत वावरत असाल तर तुम्हाला डावीकडे फेकले जाण्याची शक्यता असते. अशावेळी तुम्ही असाध्य आणि गंभीर रोगाने ग्रस्त होऊ शकता.

जेव्हा आम्ही भयभीत होतो तेव्हा हृदयचक्रात हृदयअस्थी रीमोट कंट्रोलप्रमाणे गणांना सूचना देते की, आक्रमण होणार आहे. पण स्वेच्छेने तुम्ही वासनांमध्ये गुरफटून डाव्या बाजूस जाता तर हे चक्र जगदंबा, गण तुमची काळजी करीत नाही. ते म्हणतात जे मनात येईल ते करा. जा. कसेही वागा. डाव्या बाजूस जाणारी कामे तुम्ही केली तर तुम्ही मातेपासून दूरदूर जाऊ लागता.

जर तुमचा देवीवर विश्वास असेल तर तुम्ही हे लक्षात ठेवा की, ती अति शक्तिशाली आणि विवेकी आहे. जर तिला तुमचे रक्षण करायचे असेल तर अशाप्रकारे करील की, तुम्हाला समजणारही नाही. अनुभवाने हळूहळू ते कळते. कठीण काळातून आपण सावरलो ते केवळ देवी माँ मुळे हे लक्षात येते.

तुम्ही देवीचे पूजन करीत असाल तर तुम्हाला कुठल्याही प्रकारची चिंता किंवा भय वाटू नये. जे काही तुम्ही करीत आहात ते न घाबरता करा. देवीच्या सर्व शक्ती तुमच्यात व्यक्त होऊ लागतात. अशाप्रकारे तुम्ही आत्मनिर्भर होऊ लागाल. आत्मविश्वास विकसित होईल. जेव्हा तुम्ही आत्मनिर्भर व्हाल तेव्हा तुम्ही तुमची मदत करीत नाही तर इतरांनाही मदतीचा हात देऊ शकता.

मातेची एक आणखी शक्ती आहे ती तुम्हाला साक्षी स्थिती प्रदान करते. तुम्ही सर्व काही साक्षीभावाने बघता. तुमच्यात अथांग धैर्य येते. जे होते ते ठीक आहे. क्रोध नावाच्या भयानक अवगुणापासून तुमची सुटका होते. यामुळे तुम्हाला साक्षी अवस्था प्राप्त होते. तुमचे व्यक्तिमत्त्व अतिशय शांत होते कारण तुमची 'आई' तुमच्याबरोबर असते. आई माझ्या बरोबर नेहमीच असते हा दृढविश्वास वाढतो. तो विश्वास तुमचे रक्षण करतो.

ज्ञानमय विश्वासात 'आई' तुम्हाला आणखी एक शक्ती देते. ती म्हणजे 'विवेक', विवेकशक्ती तुमच्यात जागृत झाली की अहंपण वाढू शकत नाही. ती

तुम्हाला अत्यंत विनम्र, प्रेममय आणि करुणामय बनविते. आता तुम्ही स्वत: प्रकाश आहात. प्रकाश अंधाराला घाबरत नाही. अंधाराला दूर करतो.

तुम्हाला माहीत आहे देवीच्या सर्व गोष्टी अत्यंत गहन आणि सूक्ष्म असतात. प्रथम देवीने आईचे रुप घेतले. प्रेमाने भक्तांची देखभाल केली, राक्षस आणि नकारात्मकतेशी युद्ध केले. पण आजही काही राक्षस शिल्लक आहेत. त्यांनी तुमच्या हृदयात प्रवेश केला आहे. त्यांचा वध केला तरी ते मस्तकात राहतात. कधी हृदयात भावनेच्या रुपात तर कधी डोक्यात विचारांच्या रुपात. हे दुष्ट विचार समूळ नष्ट करायचे आहेत. चुकीच्या लोकांचे अनुकरण आणि चुकीच्या पुस्तकांच्या वाचनाने ही नकारात्मकता येते.

तुम्ही तुमच्या आईची महान ज्योती व्हा. तुमच्यात त्या सर्व शक्ती ओसंडून वाहत आहेत. तुमच्यात तो प्रकाशित ज्योती आहे. त्याचा प्रकाश तुम्ही भरपूर पसरवा. सर्व परिसर त्या प्रकाशाने उजळू द्या.

प. पू. श्री माताजी - कबेला - ०९.१०.१९९४

जर तुम्हाला मध्य हृदयावर बाधा जाणवली तर जगदंबेचा मंत्र म्हणा. मध्य हृदयाची बाधा दूरकरीत मला पण म्हणावे लागते की, मीच साक्षात जगदंबा आहे. तेव्हा तुमच्यात जगदंबा जागृत होते.

प. पू. श्री माताजी - कबेला - २७.०९.१९९२

जेव्हा आपल्याला एखादी व्यवस्था किंवा तत्त्व समजत नाही तेव्हा त्यात दोष उत्पन्न होतात. सहजयोगात तत्त्वे आहेत. ती चक्राचे दोष दूर करतात.

जेव्हा जगदंबाचक्र तुमच्यात जागृत होते तेव्हा तुमच्या मनातून भय, शंका पळून जातात. कोणत्याही प्रकारची भीती शंका मनात राहत नाही. माणसाचे काळीज वाघाचे होते. एकदम वाघाचे काळीज बेडर कारण देवी वाघावर बसली

आहे. खूप लोक माँ दुर्गेला भजतात, मानतात. ती इतकी प्रभावी आहे की, एकदा देवीला प्रसन्न केले की, जगात कोणाला घाबरायचे कारण नाही.

प. पू. श्री माताजी - निर्मल योग - १६.०३.१९८४

✹✹✹

नमस्तेऽस्तु महारौद्रे महाघोर पराक्रमे ।

महाबले महोत्साहे महाभय विनाशिनी ।।१७।।

माहि मां देवि दुष्प्रेक्ष्येशत्रूणां भयवर्धिनी ।।१८।।

महारौद्ररुप, अत्यंत घोर पराक्रम महानबल (ताकद) आणि अतिशय उत्साह असणारी देवी ।

तू महानभयाचा नाशकरणारी आहेस, मी तुला नमस्कार करतो. तुझ्याकडे बघणेसुद्धा कठीण आहे.

शत्रुंना भयभीत करणाऱ्या हे दुर्गे माझे रक्षण कर.

दुर्गासप्तशती, देवीकवच, १७, १८

अनाहत (उजवी बाजू)

<u>मर्यादा पुरुषोत्तम राम</u>

श्रीराम पितातुल्य आहेत. कितीतरी धार्मिक, संकोची, अनुकंपेने परिपूर्ण श्रीराम ते आमचे आदर्श असावेत. त्यांना बघून आम्ही म्हणावे, हो, मला असेच व्हायचे आहे.

प. पू. श्री माताजी - दिल्ली - १६.०३.१९८४

भगवान श्री विष्णुंचा सातवा जन्म (अवतार) श्रीरामाचा. श्रीरामाचा जन्म चैत्र महिन्याच्या शुद्ध नवमीला दुपारी बारा वाजता झाला. याला 'रामनवमी' म्हणतात.

श्रीराम उच्च मर्यादा मानदंड स्थापन करु इच्छित होते कारण भावी पिढ्या त्यांचे अनुकरण करतील. सर्वांना माहीत आहे की, सॉक्रटिसने त्यांना हितैषी राजाचे नाव दिले.

श्री राम महान देवीभक्तही होते. शक्तीचे पुजारी. लंकेवर आक्रमण करण्यापूर्वी त्यांनी देवीपूजन केले होते. देवीपूजा करुन देवीला प्रसन्न करण्यासाठी विविध कर्मकांडे जाणणाऱ्या ब्राम्हणाची त्यांना आवश्यकता होती. या कार्यासाठी श्रीरामाने देवीभक्त रावणाला बोलावले. रावण लगेच तयार झाला. त्यानंतर नम्रप्रकारे कर्मकांडाद्वारा <u>देवीपूजन करण्यासाठी श्रीरामाची मदत केली.</u>

श्रीराम जर दुष्ट प्रवृत्तीचे असते तर ते तिथेच रावणाचा वध करु शकले असते. परंतु ते होते मर्यादा पुरुषोत्तम. ते दोघे जरी शत्रू होते तरी पूजेदरम्यान शत्रूत्त्व पूर्णपणे विसरले होते.

<u>आपल्या जीवनकाळात श्रीरामाने अशाप्रकारे कार्ये केली की, जणू नाटकात भूमिका करीत आहेत. ते हे विसरुन गेले की, ते परमेश्वरी अवतार आहेत.</u>

प. पू. श्री माताजी - नोएडा हाऊस - ०५.०४.१९९८

श्रीरामाच्या जीवनात जितक्या घटना घडल्या - उदाहरणार्थ, अहिल्या उद्धार, शबरीची बोरे, वानर सम्राट वालीचा वध आणि रावणाचा वध इ. या घटना, धर्माचे शासन स्थापित करण्यासाठी होत्या.

श्रीराम प्रत्यक्षात धर्मातीत (निधर्मी) होते. खरेतर त्यांच्यापासून धर्माचा उदय झाला. धर्म त्यांच्यात स्थित होता. ते धर्माचे अवतार होते.

माणसाचे भले व्हावे या एका विचारातून त्यांनी या जगात कार्य केले. सर्व नाटक दु:खदायक घटनांचे होते. त्यांच्या शरीराने सर्व कष्ट, क्लेश सहन केले. आदर्शाचे तत्त्व प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी हे सर्व नाटक केले. एक आदर्श राजा, आदर्श पिता, आदर्श पुत्र कसे असावेत हे सांगण्यासाठी. अनवाणी पायांनी ते वनाजंगलात फिरले. कारण त्यांच्या पायाने भूमी चैतन्यमय व्हावी, व्हायब्रेट व्हावी. हा हेतू होता.

मी तुम्हाला सांगितले की, जगात रामराज्य यायला हवे. श्रीरामाने देशासाठी, जनतेसाठी पत्नीत्याग केला. सीता आदिशक्ती होती. त्यांना माहीत होते की, आदिशक्तीला कोणी हात लाऊ शकत नाही. तरीही त्यांच्या जीवनातील हे एक मोठे उदाहरण आपल्यासमोर आहे.

हृदयचक्राच्या उजवीकडे श्रीरामाचे स्थान आहे. तुमच्या लक्षात आले असेल की, आपल्या चक्रांमधील अत्यंत महत्त्वाच्या चक्रात श्रीरामाचे स्थान आहे. जर तुमचे कर्तव्य किंवा प्रेम यात कमतरता राहिली तर हे चक्र पकडमध्ये येते. दोष येतात.

जर कोणत्याही माणसाचे उजवे हृदय पकडते (दोषी होते) तर नक्की समजा की, त्यात पित्याचे दोष आहेत. जसे पित्याचा अकाली मृत्यू, पितृसुख उपभोगले नाही, पित्याशी संबंध नसणे अथवा पित्याबरोबर शत्रुत्व असणे. पित्यासंबंधी कोणतेही तत्त्व खराब झाले तर अशावेळी त्या माणसाचे उजवे हृदय पकडते. अस्थमा होण्याची शक्यता असते. अशा वेळी त्या माणसाने श्रीरामाचे स्मरण करायला हवे. त्यामुळे तुमचा अस्थमा दुरुस्त होवू शकतो.

प. पू. श्री माताजी - निर्मलयोग - १६.०३.१९८४

पृथ्वीवर अवतार घेतल्यानंतर श्रीराम तपस्वी जीवन जगले. त्यांना प्रजादक्ष राजा हे बिरुद पृथ्वीवर प्रस्थापित करावयाचे होते. अयोध्येचा राजा असतांनाही त्यांनी जीवनभर संघर्ष आणि त्यागालाच जवळ केले. त्यामुळे त्यांचे अनुयायीही त्यागी बनले. यथाराजा तथा प्रजा. गवतावर झोपणे, खडाव वापरणे, एककटीवस्त्र (धोतर) नेसणे या रामाच्या कृती इतर अनुयायी अनुसरु लागले. रामाने या साऱ्या गोष्टी पत्नी विरहात केल्या होत्या. सीतेवरील आपले आदर्श प्रेम दर्शविण्यासाठी केल्या होत्या. त्यांनी एकपत्नी व्रत घेतले होते. श्रीरामाचे जीवन महातपस्वीतेचे होते. अत्यंत धीरोदत्त जीवन होते. ते बघून लोकही तापसी आणि धीरगंभीर आयुष्य जगू लागले.

प. पू. श्री माताजी - न्यूजर्सी - ०२.१०.१९९४

एका शुद्राला रामायण लिहिण्याची संधी देण्याचे मोठे कार्य श्रीरामाने अवतार घेतल्याबरोबर केले. वाल्मिकी एक सर्वसामान्य मासे मारणारे कोळी होते. त्यांनी रामायण लिहिले. यावरुन हे सिद्ध होते की, श्रीरामाला जगाला हे दाखवून द्यायचे होते की, ज्या माणसाला आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला आहे तो विदवान होय. खरा पंडित, खरा ब्राम्हण होय. स्वतःला पंडित म्हणविणारे लोक खरे ब्राम्हण नव्हेत.

प. पू. श्री माताजी - मुंबई- १९९८

त्यांचा एक आणखी गुण होता की, राजकारणात त्यांनी जनमताला प्राधान्य दिले. पत्नी आणि मुले त्यांच्यासाठी गौण होती.

श्रीरामाचे जीवन अतिशय शुद्ध आणि निर्मळ होते. पत्नीच्या जाण्यानंतर जगातील सर्व आराम देणाऱ्या गोष्टींचा त्यांनी त्याग केला. ते दर्भावर जमिनीवर झोपत, अनवाणी चालत, साधेसुधे कपडे वापरीत. साधूप्रमाणे वस्त्रे परिधान करीत. ह्या खोट्या गोष्टी नाहीत. ते सत्य आहे.

रामराज्य आपल्याकडे आले तर इथले राजकारण संपून जाईल. आपल्याकडे जितक्या समस्या, अडचणी आहेत, नष्ट होतील. आपल्या प्रजेचे ते निरपेक्षभावनेने (विदेहरुप) लालन पालन करीत होते.

प. पू. श्री माताजी - २५.०३.१९९१

श्रीरामाच्या माध्यमातून आपले जीवन बदलू शकते. त्यांच्या माध्यमातून आमचा स्वभाव बदलू शकतो कारण ते आमचे आदर्श आहेत. श्रीरामाच्या आदर्श तत्त्वांपर्यंत गेल्यानंतरच इतर तत्त्वांपर्यंत आपण जाऊ शकतो. कारण ते माणसाचे आदर्श आहेत. ही अतिशय मोठी गोष्ट आहे की, माणसासाठी परमेश्वराने माणूस होऊन पृथ्वीवर जन्म घेतला. माणसासमोर आदर्श ठेवण्यासाठी रामरुपी परमेश्वराने प्रत्यक्ष विपत्तींचा सामना केला. संकटे सहन केली. त्यातून श्रीरामांना हे दाखवायचे होते की, जीवनात आपत्ती आणि संकटे येतातच पण त्या काळात माणसाने आपला धर्म सोडता कामा नये.

प. पू. श्री माताजी - २५.०३.१९९१

श्रीरामांनी जगात येऊन मानवासाठी मर्यादा निश्चित केल्या. आपले जीवन, आपले वर्तन, व्यवहार यातून मर्यादा पुरुषोत्तम कसा असतो याचे उदाहरण घालून दिले. राजा हा नेहमी प्रजाहितदक्षच असला पाहिजे, जो राज्यकर्ता आहे त्याने लोकमताचा आदर केला पाहिजे. आपल्या मर्यादांचे पालन केले पाहिजे. हे वर्तनातुन त्यांनी दाखवून दिले. आदर्श घालून दिला. पण आज तर लोक निर्लज्जपणे राज्य करतांना दिसतात. आदर्शविहीन राज्य कारभार चालू असतो. अशाप्रकारचा समाजघातक असेल पण त्याहीपेक्षा विश्वबंधुत्त्वाच्या संकल्पनेला नष्ट करील.

आज माणूस आपल्या देशात अत्यंत संकिर्ण झाला आहे. आम्ही आमच्या सीमा निर्माण केल्या आहेत. रामाच्या मर्यादा जर आपण आपल्याशा केल्या तर दुर्ब ल नव्हे सबल होऊ. शक्तिमान होऊ. ज्या मर्यादा आमच्या शक्ती नष्ट करतात त्या आम्ही सहजतेने उचलतो पण ज्या मर्यादा आमची शक्ती वाढवितात, हितकारक

आहेत, आमचे मोठेपण वाढवितात अशा सीमांचे आम्ही पालन करीत नाही. हा एक मोठा दोष आमच्यात आहे. आमच्या विचारात आहे.

प. पू. श्री माताजी - २८.०१.१९९१

***

उत्क्रांतीत प्रत्येक अवतार या धरेवर
अवतरित झाला. आमच्या अंतरात एक
दरवाजा उघडण्यासाठी किंवा आमच्या चेतनेत प्रकाश आणण्यासाठी.

प. पू. श्री माताजी - निर्मला योग - नोव्हेंबर, डिसेंबर १९८५

अवताराची जरुर उत्क्रांतीसाठी होते.
उत्क्रांतीचे कार्य विष्णुशक्तीमुळे होते.
म्हणून फक्त विष्णुशक्तीच अवतार घेते.

प. पू. श्री माताजी - २४.०९.१९७९

## अनाहत – डावाभाग

## आत्मज्योती – श्री शिव

शिवजी हे एक परमसंन्यासी आहेत. ते अतुलनीय आहेत. त्यांचे वर्णन शब्दांनी करता येत नाही. शिव सतत पवित्र आणि निष्कलंक आहेत. प्रेमाशिवाय शिवशंकर कोणी नव्हेत. प्रेम इतरांना सुधारते, पोषण करते आणि तुमच्या भल्याची कामना करते. प्रेमाने जेव्हा इतरांचे हित श्री शंकर जपतात, तेव्हा जीवनाची सारी चौकट बदलून जाते. तुम्ही जीवनाचा आनंद घेऊ शकता.

श्री ब्रम्हदेवाने निर्माण केलेली, विष्णुने विकसित केलेल्या प्रत्येक वस्तूला सुंदर करणे शिवाचा गुण आहे. सौंदर्य संवेदनेच्या निर्मितीचे सूक्ष्म कार्य त्यांचेच आहे. भक्तीचा आनंदही शिवाचाच आहे.

प. पू. श्री माताजी - इटली - १७.०२.१९९१

ते नटराज, साक्षात सर्व कलांचा प्रादुर्भाव करणारे अत्यंत आनंदी आणि आनंद स्वरुप आहेत. जे लयबद्ध जीवन आम्हाला मिळाले आहे. त्याचे ज्ञान आम्हाला नाही. मुल नऊ महिने आणि काही दिवसानंतर जन्म घेते. ऋतूंची तालबद्धता कोणाची देणगी आहे? वेगवेगळ्या प्रकारची फुले वेळेवर फुलतात. ऋतुचक्राप्रमाणे पृथ्वीत बदल होतात. हे सर्व कोण लयबद्ध करते? शिव स्वत: लय आहे. पृथ्वी आणि इतर सर्व गोष्टींमध्ये ही लय कायम ठेवली जाते. लयबद्ध व्यक्तीचे हृदय विशाल असते. क्रूर किंवा वाईट माणसास बघून ही लय बिघडते. शांत सुंदर सरोवरामध्ये तरंग नसतात केवळ प्रेम असते. पण जेव्हा ही लय हृदयाची शांती तुटते तेव्हा शिवशंकर परिस्थिती आपल्या हातात घेतात.

मी तुम्हाला सांगते, श्री महादेवच ज्ञान आहेत. ते शुद्ध विद्या आहेत. उच्चतम स्तराचे पूर्ण ज्ञान. ते ज्ञानाचा पूर्ण स्त्रोत आहेत. जे लोक नम्र नाहीत त्यांना शुद्ध विद्या प्राप्त होत नाही. जे अहंकारी आहेत, इतरांशी कोमलता, मधुरता,

सुंदरतापूर्वक आचरण करीत नाही. त्यांना महादेवाचा आशीर्वाद मिळू शकत नाही. जीवनात प्रगती करु शकत नाही.

प. पू. माताजी, पुणे - २५.०२.२००१

श्री शंकरासाठी बाह्य देखावा महत्त्वाचा नाही. केवळ आध्यात्मिकता महत्त्वपूर्ण आहे. कोणतीही कृत्रिम वस्तू त्यांचे चित्त आकर्षित करु शकत नाही. केवळ व्यक्तितील देवपण त्यांना आकर्षित करते.

प. पू. श्री माताजी, ऑस्ट्रेलिया - २६.०२.१९९५

शिव होण्याचा अर्थ म्हणजे सर्व जगभरातली लालुपता,आपल्या आत जो द्वेष आहे, ते सोडून देणे होय.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - १६.०३.१९९७

शिवशंकर शरीरावर प्रेम करीत नाही. शरीराची सुंदरता - शरीराबद्दल मोह त्यांना ठाऊक नाही. ते कुठेही झोपतात, ते स्मशानात जातात. तिथे राहतात. झोपतात. कारण ते निर्लिप्त आहेत. कैलास पर्वत असो की स्मशान श्री शंकराला फरक पडत नाही.

प. पू. श्री माताजी - पंढरपूर - २९.०२.१९८५

शिवाचे सर्व अलंकार पंचमहाभूतांपासून येतात. ते आपल्या गळ्यात सर्प धारण करतात. सर्प शीतल असतो. जगातील सदुष्टता, विपरितता, जगाचा दंश, सर्व आपल्यात सामावून ठेवतो. जगातील विष त्यांनी पिऊन पचविले आहे. जग शांत केले आहे. सर्व जगाची विपत्ती, आपत्ती, विष, महाशिवरात्रीच्या दिवशी महादेवाने प्राशन केले. रात्रभर ते ही विषे प्राशन करीत होते. त्यांनी मानवाच्या जीवनातील रात्रीचा अंध:कार स्वत:त सामावून घेतला.

माणसाचा अहंकारही ते प्राशन करतात. जगातील अहंकारी व्यक्तींपासून ग्रहण करतात. गंगेसारख्या गर्ववतीला त्यांनी आपल्या जटेत बांधले आहे. माथ्यावर गंगेचा बोजा वाहताना ते सर्वांचे गर्वहरण करणार आहेत.

त्यांच्यात एक मोठी शक्ती आहे. अशी असाधारण शक्ती आहे जी कोणाही देवतेत नाही. ती आहे क्षमा करण्याची शक्ती. ते दुष्टातील दुष्ट महादुष्टालाही क्षमा करु शकतात. श्री गणेश ज्यांना क्षमा करु शकत नाही त्याला श्री शंकर क्षमा करतात. शंकराकडेच क्षमा मागितली जाते. श्री शंकराला म्हणून भोळा सांब म्हणतात.

महादेव आम्हाला क्षमा करतात. आमचे अपराध, विध्वंसक कामे, इतरांना त्रास देणारे डोके, त्यांना ते क्षमा करतात. विध्वंस त्यांची महानतम शक्ती आहे. त्यांचा प्रकोप अचानक येतो. कारण ते पंचमहाभूतांचे स्वामी आहेत. ते सर्व तत्त्वांचे शासक आहेत. ते पृथ्वी तत्त्वाचे शासक आहेत. अन्न तत्त्वांवरही त्यांचे प्रभुत्त्व असते. ते शासक असल्याने कुठेही त्यांना गडबड दिसली तर महादेव ते नष्ट करु शकतात. मी तुम्हाला सांगते भूकंप प्रबंधन (थांबविण्याचे) कार्य श्री शिवजींचे आहे. माझे नाही. विनाश कार्यात माझी काही भूमिका नसते. पृथ्वीवर काय होत आहे आणि मानवाबरोबर काय घडते आहे.

प. पू. श्री माताजी - पुणे - २५.०२.२००१

एकीकडे सदाशिव अत्यंत करुणामय, असूर आणि राक्षसांप्रतीही दयाळू असणारे आहेत. पण दुसरीकडे ते अत्यंत कठोरही आहेत. लोक जर पतनाजवळ जात असतील, आध्यात्मिकता विसरले, पवित्रता समाप्त झाली, विश्वात समस्या निर्माण करणारी अनुचित कार्ये लोक सोडीत नसतील, तर महादेव पूर्ण ब्रम्हांडाचा विनाश करतील. ते आदिशक्तीच्या कार्याचे द्रष्टा आहेत. आदिशक्तीला सर्व कार्य करु देतात. मानवाचे सृजन करणे, त्यांना आत्मसाक्षात्कार देणे, पण त्यांना वाटले की, आदिशक्तीने ज्यांचे रक्षण केले ती मुले दुर्व्यवहार करीत आहेत. आदिशक्तीच्या कार्याचा नाश करताहेत, तेव्हा ते कृद्ध होऊन पूर्ण विश्वाचा विनाश करु शकतात.

प. पू. श्री माताजी - ऑस्ट्रेलिया - २६.०२.१९९५

शंकर अतिशय सरळ देव आहे. असे म्हटले जाते. नावाप्रमाणेच एकदम भोळे आहेत. त्यामुळे त्यांना समजणे सोपे नाही. कुंडलिनीचे कार्य आणि देवीचे

कार्य एकच आहे. देवीच ही चराचर सृष्टीची निर्मिती करते आणि शेवटी आपल्यात कुंडलिनी होऊन शिवापर्यंत पोहोचविते. शिवशंभोचे पूजन करताना हे लक्षात ठेवायला हवे की, शिवाचे गुण आमच्यात विकास पावले आहेत किंवा कसे. त्यासाठी सर्वप्रथम कुंडलिनीची गती समजून घ्यायला हवी. जेव्हा कुंडलिनीचे जागरण होते तेव्हा सर्वप्रथम तुमचे शरीर निरोगी करते. कारण शरीर स्वस्थ असणे गरजेचे असते. त्यामुळे आपले चित्त प्रथम आपल्या शरीरावर जाते. म्हणून आधी असे व्हायचे की, शरीराकडे लक्ष देऊ नका. त्याला कष्ट द्या.

आता सहजयोगात उलट प्रकार आहे. प्रथम वरचे शिखर केले. सहस्त्रार उघडले. सहस्त्रार उघडून सांगितले तुम्हीच तुम्हाला योग्य बनवा पण अजूनही आम्ही समजत नाही. सहजयोग कठीण योग आहे. जितका सहज तितकाच अवघड. शंकराप्रमाणे. कारण आमच्या शरीरांतर्गत अनेक नाडया आहेत. त्या नाडया उघडण्याचे तंत्र आहे आमचे चित्त. चित्त अस्थिर असते इकडे तिकडे जात राहते. ते तसे जाऊ नये. सहजयोगात उपवास करा असे म्हणत नाही, हिमालयातील थंडीत बसा असेही नाही पण काय केले तर आपली प्रगती होईल. मनात विचार करा आपण काय करावे? जसे की, तुम्ही कुठे गेलात आणि झोपायला जागा मिळाली नाही. तर तक्रार कराल आई झोपायला जागा नाही. शरीराच्या काळजीमुळे मी असा विचार करतो. माझे लक्ष तिकडेच आहे. आम्ही हा असा विचार करायला हवा की ठीक आहे मी सहजयोगी आहे, जागा मिळेल तिथे झोपेन.

मी माझ्या शरीराचा इतका आराम का बघतो. मी खास आहे आणि मी चित्ताची चंचलता थांबवून चित्तलीन करायचे आहे. चित्त विचलित झाले तर चैतन्यात मग्न कसे होईल?

(१) तुमच्या हृदयात जेथे शिवाचा निवास आहे तेथे चार नाड्या आहेत. त्यातली एक नाडी मुलाधारापर्यंत जाते. त्याच्यापुढे नरक आहे. काही लोक म्हणतात, त्यात काय वाईट आहे? पण तुम्ही सहजयोगी आहात. तुम्ही नरकात का जाता? चित्त स्वतःकडे करुन जरा लक्ष द्या. जी मला नरकात घेऊन जाईल अशी

वासना माझ्यात कुठून आली? माझे एक पाऊल वर आहे आणि एक पाऊल स्मशानात!

(२) दुसरी नाडी आम्हाला इच्छांकडे घेऊन जाते. बुद्धाने साफ सांगितले होते की,इच्छा करणे हेच आमच्या मृत्यूचे कारण होय. आमच्यातून इच्छा पूर्णपणे नष्ट व्हायला हव्यात. मात्र त्या नष्ट होत नाहीत. फक्त एक शुद्ध इच्छा रहायला हवी. ती कशी असावी? शुद्ध इच्छा अशी हवी की, तुम्ही विचार करा मला ही इच्छा का होते? अशा मला अनेक इच्छा झाल्या. त्याचा मला काय फायदा झाला? जे काही मिळाले त्यात आनंद मिळविणे हे 'सहजयोगी' चे कर्तव्य आहे. कोणाला इच्छा झाली की, मातेच्या अगदी समोर बसावे, दुसऱ्याला वाटले की, मी सर्वांत आधी मातेजवळ जावे. अशा इच्छा का जन्मल्या. कारण अज्ञानामुळे आम्ही हे विसरलो की, माता तर प्रत्येक ठिकाणी आहे. तिच्यासाठी कुठे जाण्याची गरज नाही. शुद्ध इच्छा म्हणजे जेव्हा तुम्ही इच्छा कराल तेव्हा कुंडलिनी वर चढते तेव्हा खाली वळलेली शुद्ध इच्छानाडी वरच्या दिशेला (उर्ध्व गामिनी) होते. तिच्यात शुद्ध इच्छा आहेत. सुख मिळावे म्हणून माणूस इच्छा करतो. पण मिळत काही नाही. त्यामुळे या इच्छेला आनंदात लीन करा. कारण शिवतत्त्व आनंदाचे तत्त्व आहे. त्यामुळे प्रत्येक गोष्टीत आनंद शोधला पाहिजे. तरच कोणत्याही गोष्टीची त्रुटी भासणार नाही. दोष शोधणे किंवा असे असते तर चांगले झाले असते, असे म्हणत राहणे खूप लोकांची सवय असते पण आपण जसा विचार करतो तसे होत नाही. खरे तर त्याच्याशी तुमचा काही संबंधही नाही. प्रत्येक गोष्टीचा ठेका घेता आणि मनात त्या विचारांची एक श्रृंखला तयार होते. पण जे बघता ते फक्त बघणे असते. एक क्षणभर निरीक्षण कराल तर मनात चित्रसमोर येईल पण ते बघणे नव्हे त्याला निरंजन बघणे म्हणतात. त्याच्यात रंजन नसते. त्या प्रति कुठलिही प्रतिक्रिया उमटत नाही. त्यामुळे निरंजन बघणे हेही शिवाचे तत्त्व आहे. शिवतत्त्व आहे. शिवाच्या स्थानाजवळ गेले. मूर्तीचे दर्शनही झाले, पण जोपर्यंत त्यांचा प्रकाश आमच्यात आला नाही तोपर्यंत सर्व व्यर्थ आहे.

(३) जी तिसरी नाडी आहे तिच्यात प्रेमतत्त्व आहे. माझा मुलगा, माझी मुलगी, माझा भाऊ, माझी बहीण, माझा पती, जगभराची नाती. यातही खूप लोक गुरफटलेले असतात. सहजयोगातही वर्षानुवर्षे हे सुटत नाही. हे नातेवाईकांचे प्रेम योग्य नाही. असे म्हणणेही बरोबर नाही. असे ममत्त्व ज्यात नात्यांसाठी तुम्ही अत्यंत टोकाला जाता, मुलांसाठी क्वचित खूनही करता. इतके टोकाचे ममत्त्व करुन कधीतरी लक्षात येते की हा मुलगा/मुलगी माझे नाहीत. (प्रेम करीत नाही). तेच तुम्हाला सतावतात, त्रास देतात. दुःखी करतात. आपल्याला दुःख देतात तेव्हा तुम्ही विचार करता मी याच्यासाठी काय केले नाही? आणि आज तो / ती आमच्याशी कसे वागतात? पूर्वी वानप्रस्थाश्रम होता. तेव्हा घरदार, मुले, संपत्ती सोडून विजनवास स्वीकारायचे पण सहजयोगात असे नाही. सहजयोगात कशाचाही त्याग करायचा नाही. उलट सर्वांना जवळ करायचे आहे. सहजयोग व्यक्तिगत कार्य नाही जे एकांतात नेऊन बसवील. तपश्चर्या केली, थोरपद प्राप्त केले. उपयोग काय? हे व्यक्तिगत उत्थान झाले. अवधूत बनले. चांगले प्रवचन द्याल. थोडे बहुत चैतन्य प्रवाहित कराल. पण त्यामुळे पूर्ण जग ठीक होईल का? आम्हाला तर साऱ्या जगाला सुधारायचे आहे. म्हणून विचार करा की, मी काही मोजक्या लोकांपर्यंत ममत्त्व का राखून ठेवू? एका झाडाला जर पाणी घातले तर त्या झाडाची सर्व मुळे, फांद्या, पाने, फुले, फळे यांच्यापर्यंत जाते. पुन्हा परत येते. पण ते पाणी एखाद्याच फुलात, फळात अडकले तर? तर काही काळाने ते झाड मरुन जाईल आणि ते फुलही कोमेजेल. देवी निर्व्याज प्रेम करते. जर ती कोणासाठी काही करते तर तिच्या हे लक्षातही येत नाही की, याने असे केले होते. ते अयोग्य आहे किंवा आणखी काही. तिचे मन कशातही अडकत नाही. ती करुणामयी आहे. करुणेचा सागर आहे. बरेच लोक छोट्या छोटया तक्रारी माझ्याकडे करतात. या तक्रारीमध्ये काही अर्थ नाही हे मला माहीत असते. तरी मी लक्षपूर्वक ऐकते. त्यांच्या परिघात (विचारांच्या) मी उतरत नाही. जर ते माझ्या परिघापर्यंत येऊ शकत नसतील तर तो त्यांचा दोष होय. त्यांनी करुणेपर्यंत यायला हवे. करुणा करुणेसाठी असते. कोणतेही काम, मतलब किंवा नात्यासाठी

नसते. करुणेत गरीब, श्रीमंत हा भेद नसतो. जसा समुद्र. रस्त्यातील प्रत्येक खड्डा भरुन काढतो. कुठेही त्रुटी असेल भरुन टाकतो. करुणा 'स्वभाव' आहे. 'स्व' म्हणजे आत्मा. आत्म्याचा भाव. तो आत्म्याचा भाव तुमच्यात यायला पाहिजे. मग या सीमा पुसट होतील. हा दिल्लीवाला, हा मुंबईवाला, इ. काही लक्षात राहत नाही. त्याचे महत्त्वही वाटत नाही. लक्षात राहतो तो माणूस. तो माणूस कोण आहे. हे नक्की लक्षात राहते. त्यांना बघून त्यांची दुःखे लक्षात येतील. याला हा त्रास आहे. त्याला तो त्रास. नजरेने दुःख समजेल आता त्यांच्या गावांशी काही मतलब नसतो. मोठ्या साधकाचे हेच लक्षण असते. त्या माणसाकडे हृदय आकृष्ट व्हायला हवे. तरच तुमच्या करुणेचा ओघ गरजूकडे सुरु होईल.

ही करुणा तुम्हाला 'सुमती' देते आणि स्मृतीही. कारण जितके सान्निध्य करुणेमुळे येते दुसऱ्या कुठल्याही गोष्टीने नाही. करुणा एक विशिष्ट बाब आहे. तिच्यामुळे नात्यापेक्षाही दृढबंध तुम्ही व त्रस्त व्यक्तीत निर्माण होतात. करुणेत तुम्ही लीन होता. या ममत्त्वाला लीन करा. हा सहजयोगात प्रगतीचा मार्ग आहे. मी कधीच तुम्हाला घरदार, संसार मुलेबाळे सोडा असे सांगितले नाही. हा सहजयोग आहे. तुम्ही जिथेही आहात, जसे आहात, आतून उन्नत होत रहा. आपल्या आत डोकावल्याशिवाय हे होणार नाही आणि विचारा की मी करुणामय आहे का? मला काही मिळाले तरच मी काहीतरी देईन हे ममत्त्व नाही. ममत्त्व आपला रस्ता स्वतः शोधते. करुणेचा रस्ता अत्यंत सुंदर आहे. आनंददायी आहे. परंतु त्यात लोभ नसतो. त्याची प्रचिती नसते. झाले, झाले होऊन गेले. जसे संगीत ऐकले, मजा आली, तिथेच संपले त्याचप्रमाणे काही काम आहे. करुन टाकले, झाले!

(४) हृदयात जी नाडी आहे ती चौथी आणि अत्यंत महत्त्वपूर्ण नाडी आहे. ही चौथी नाडी कुंडलिनी जागृतीने जागृत होते. डाव्या विशुद्धीतून निघून मस्तकात (मेंदूत) जाते व कमळ उमलवते. फुलवते. जेव्हा तुमचे चित्त या सर्वांत लीन होते, तेव्हा या कमळात जीव येतो. ते सचेत होते. त्यात शक्ती येते. झाडाला पाणी दिले तर ते आपोआप वाढू लागते. तसेच शुद्ध चित्त माणसाचे हृदय आनंदाने भरुन

जाते. हृदयाची कळी उमलते आणि कमळ रुप होऊन सहस्त्रारात प्रकाशित होते. मग त्याचा सौरभ, सुगंध चारही दिशांमध्ये दरवळू लागतो. असा माणूस एकदम नतमस्तक होतो. नतमस्तक होऊन इतरांसमोर नम्र होतो. कोणी म्हणाले, तुम्ही चमत्कार केलात, माझे मोठे काम केलेत तर ती गोष्ट याला स्पर्श करीत नाही. जशा लाटा तटावर जाऊन आवाज करीत फुटतात पण परत येत नाहीत. त्याचप्रमाणे ज्या माणसाची अशी स्थिती होते त्याचे काम बाहेर आवाज करते. त्याचा परिणाम बाहेर दिसतो. किनाऱ्यावर, आत त्याचा काही परिणाम नसतो. ध्यानही येत नाही. विचारही येत नाही. जे निनाद आहेत ते दुसऱ्या किनाऱ्यावर जाऊन स्पर्श करतात. मला ते नाव स्पर्शही करीत नाही. माझा जयजयकार ऐकू येत नाही कदाचित मी तिथे नसतेच.

जेव्हा तुम्ही स्तुतीचे गीत गाता, खुश होता, तुमच्या आतील देवता प्रसन्न होतात. तुमच्यातील अनंत नाड्यांचे तेजपुंजांसारखे प्रकाशकिरण तुमच्या आत प्रकाशमान करतात. किती मेहनत करतात तुमच्यासाठी. आम्ही पण शुद्ध व्हायला हवे. आमचे शरीर एक यज्ञ आहे. जसे काष्ठ यज्ञात जळते तद्वत शरीराचे यज्ञात भस्म होणे गरजेचे असते. पण सहजयोगात एक महत्त्वाची गोष्ट आहे. आता कृतयुग सुरु आहे. तुमच्या पूर्व पुण्याईमुळे सर्व गोष्टी तुमच्यापुढे हजर होतात. साक्षात्कार होतो. तुम्ही म्हणता चमत्कार झाला. सर्व गोष्टी तुम्हाला सहजसुलभ मिळणार आहेत. बरीच कामेही सहज होणार आहेत. सुलभ गतीने. कोणत्याही अशोभनीय कामाशिवाय हे होते. ही एक प्रकारची सूक्ष्म माया आहे.

आता असा विचार करु नका की, हे सर्व चमत्कार आमच्यासाठी होत आहेत. कारण आम्ही कोणी महान सहजयोगी आहोत. तुम्ही असा विचार करायला हवा की, आमच्या मनात, परमात्मा शीव, कुंडलिनी व खुद्द परमेश्वर यांच्यावरील विश्वास दृढ व्हावा म्हणून हे चमत्कार होत आहेत. शिव शुद्ध चित्त असल्याने आम्हीही आमचे चित्त शुद्ध ठेवायला हवे. त्यांच्या चित्ताच्या शक्तीला चित्ती म्हणतात. तेच चित्त होय. जे चैतन्य तुम्हाला माहीत आहे त्या चैतन्याचे जे चित्त

आहे, तो शिवाचा प्रसाद आहे. शिवाचे तत्त्व आहे. म्हणजे पूर्ण विश्वात शिव चित्त पसरले आहे. जेव्हा चमत्कार होतो, अशा घटना घडतात तेव्हा आपण समजावे की, 'चित्ता' ने कार्य केले आहे. अणु रेणुमध्ये त्यांचे चित्त आहे. चित्ताचा अर्थ असा की, ते साक्षी आहे. बघताहेत आणि कार्यान्वित आहे. ते ब्रम्हचैतन्य आहे. पण संगीतकार जसा गायकाला बघून वाजवतो त्याचप्रमाणे ब्रम्हचैतन्य चित्ताच्या दृष्टीनुसार कार्यान्वित होते. त्या चित्तीला ब्रम्हचैतन्य ओळखते, जाणते. ब्रम्हचैतन्य देवीची शक्ती आहे ती कार्यप्रवण आहे. जर तुम्ही आज शिवपूजा करीत असाल तर मी सांगितलेल्या चार नाड्यांकडे लक्ष द्या. मी सांगितल्याप्रमाणे चित्ताला त्यात लीन करा. ही फार गहन गोष्ट नाही पण सूक्ष्म आहे. या प्रकारे ध्यान केले, तपश्चर्या केली की चित्त शुद्धी होते. त्यामुळे शिवसागरात तुम्ही पूर्णपणे न्हाऊन निघता अशी स्थिती सर्वांची होवो हीच माझी शुद्ध इच्छा आहे.

प. पू. श्री माताजी, शिवपूजा, दिल्ली - ०९.०२.१९९१

एका प्रकारे हृदय सदाशिवाचे प्रतिबिंब आहे. शिवाचे स्थान सगळ्यात वर आहे. विचाराच्याहीवर. असे तत्त्व प्राप्त करण्यासाठी आमचे हृदय किती साफ, स्वच्छ आहे इकडे लक्ष द्यायला हवे. तुमचे हृदय स्वच्छ असेल तर ज्या आरशात परमेश्वराचे प्रतिबिंब पडणार आहे तो आरसाही स्वच्छ राहील.

प. पू. श्री माताजी - १४.०२.१९९९

मानवाचे अंतिम लक्ष्य हे आहे की, शिवतत्त्व प्राप्त करणे. शिवतत्त्व बुद्धीच्या पलीकडचे आहे. त्याला बुद्धीने जाणता येत नाही. जोपर्यंत तुम्ही आत्मसाक्षात्कारी होत नाही, तुमच्या आत्म्यास ओळखत नाही, स्वतःला ओळखले नाही, तुम्ही शिवतत्त्व समजू शकत नाही. शिवाच्या नावावर खूप अवडंबर, अंधविश्वास, अंधश्रद्धा पसरल्या आहेत. जो आत्मसाक्षात्कारी नाही तो शिवशंकराला समजू शकत नाही. शिवाची प्रकृती समजण्यासाठी माणसाला जेथे सर्व महान तत्त्वे विराजमान होतात त्या स्थितीत पोहोचायला हवे.

शिवजीसाठी असे म्हटले जाते की, ते भोळेशंकर आहेत. आमच्या माणसांना वाटते जो भोळा आहे तो मूर्ख आहे. परंतु भोळ्या शंकराचे भोळेपण असे आहे. भोळेपणाने ते सर्व बघतात. ते साक्षी स्वरुप आहेत. शक्तीचे कार्य बघतात. शक्तीने सृष्टीची निर्मिती केली आणि तिनेच सर्व देवीदेवता घडविले. त्यांची कार्ये ठरविली आणि त्यांना ती कार्ये सोपविली. आता शिवजीचे कार्य कोणते? शिवाला फक्त बघायचे आहे आणि बघण्यातच सर्व काही येते. त्यांच्या भोळेपणाचा परिणाम हा आहे की, त्यांची नजर ज्याच्यावर पडली तो तरुन जातो. त्याला काही करायचे कारण नाही. असा सगळा खेळ आहे.

हा शिवशंकराचा जो गुण आहे. सहजयोगीमध्ये यायला हवा. जसे शिवाने सर्व काही शक्तीवर सोडून दिले आहे, तशी स्थिती यायला हवी. या स्थितीचा अर्थ असा की, कोणत्याही प्रकारची नकारात्मकता तुमच्यात येणारच नाही. साप अंगावर फिरताहेत फिरु द्या, विष प्यायचे आहे, प्या आणि पचवा. जे पूर्ण शुद्ध स्वरुप आहे त्यावर कोणत्याही गोष्टीचा परिणाम होत नाही. ही शक्ती आमच्यात शिवतत्त्वातून येते. ती प्राप्त करण्यासाठी आत्मसाक्षात्कार आवश्यक आहे. कुंडलिनी शक्ती आहे. चक्रे पायऱ्या. या सर्व पायऱ्या चढून तुम्हाला, सर्व देवी देवतांच्या एक विचाराने शिवतत्त्वापर्यंत जायचे आहे. हे देवतांचे कार्य आहे आणि त्या कार्यपूर्तीसाठी ते सज्ज आहेत. देवदेवता हे विचारीत नाही की यात आमची स्थिती काय? आमचे काय होईल? कुठे बसू? माणसासारखा फायद्यापुरता विचार त्यांचा नसतो. माणसाला शिवतत्त्वापर्यंत नेण्याचे कार्य त्यांच्यावर सोपविले आहे. ते कार्य पूर्ण करण्यास ते कटिबद्ध आहेत. त्यांचे जे काम आहे ते एक अकर्म आहे.

आत्मसाक्षात्कार म्हणजे काय? बघा एक तुम्ही स्वत: आहात आणि एक तो, ज्याला तुम्ही आरशात बघता. ते प्रतिबिंब आहे आणि प्रतिबिंबाला बघण्याची जी क्रिया आहे ती तिसरी गोष्ट आहे. अशा प्रकारे तुम्ही तीन प्रकारामध्ये फिरता आहात. एक दिसणारे, दुसरे जे तुम्हाला दिसते आणि तिसरे जी बघायची क्रिया आहे. ती तिसरी बाब. या तिन्ही बाबी संपुष्टात येतील. कशा? जर तुम्हीच तुमचा

आरसा झालात तर. आता तुम्ही तुम्हाला बघत आहात, तुम्ही तुम्हाला समजता आहात, तुकाराम महाराज म्हणतात - जेव्हा स्वतः स्वतःला ओळखले आता आरशाची गरज काय? जेव्हा हे तीन रस्ते ओलांडून तुम्ही स्वतःत स्थिर झालात ही स्थिरता पूर्णत्वास जाते तेव्हा शिवतत्त्व स्थिर होते. कारण ते अतूट आणि अटळ आहे. या शिवतत्त्वात जेव्हा तुम्ही शिरता, प्रवेश करता, बसता तेव्हा तुम्ही काही करीत आहात असे वाटत नाही. तुम्ही तुमच्यात सामावून जाता. रमून जाता पण शिवयोगी होण्यासाठी अतूट विश्वासाची परम विश्वासाची गरज आहे.

शिवतत्त्वावर आरुढ माणूस निरीच्छ होतो. कोणतीही इच्छा शिल्लक राहत नाही. कारण आपल्या आत्म्यामुळे त्याचा आत्मा संतुष्ट असतो. शरीराची तो फिकीर करीत नाही. शरीराच्या आरामाची सुखसोयींची त्याला काळजी नसते.

शिवतत्त्वामुळे सर्व चुकीच्या गोष्टींची जाणीव व्हायला लागते. जसे हिंदू मुसलमानांचे झगडे. कोणी हिंदू आहे म्हणून शिवतत्त्व मिळाले असे नाही आणि कोणी मुसलमान आहे, ख्रिश्चन आहे म्हणून शिवतत्त्व प्राप्त झाले असे नाही. जेव्हा तुम्हाला शिवतत्त्व प्राप्त होते तेव्हा तुम्ही श्रीरामाला मानता आणि पैगंबरालाही मानता. फक्त मानतच नाही तर श्रीरामाप्रमाणे पैगंबर साहेबांचीही पूजा करता. जो पर्यंत तुम्ही शिवतत्त्वास प्राप्त करीत नाही तोपर्यंत धर्माच्या अवडंबरातून तुमची सुटका होत नाही. जो रहीम आहे तोच शिव आहे, जो रहेमान आहे, जो अकबर आहे तोच विष्णु आहे. हे समजले की तुमच्या मनातील धर्मभावना फुलांप्रमाणे विकसित होतील. त्यांचा सुगंध सर्वत्र पसरेल. जेव्हा शिवतत्त्वात तुम्ही मिसळून जाता तेव्हा तुमच्या सहज लक्षात येते की, हे सर्व धर्म, त्यांचे संस्थापक, हे अवतार शिवाचे एक एक अंगप्रत्यंग आहे. ते सगळे आमचेच आहेत. आमच्यात आहेत.

तुम्ही शिवतत्त्वात शिरा. शिव तुम्हाला सर्व गुणांनी अलंकृत करील. शिवतत्त्वातील गुणांमुळे तुमच्यात सहजपणे धर्माचरण रुजेल. सहजपणे सुबुद्धी येई ल, सहजपणे सर्व ज्ञान तुमच्यात परावर्तित होईल. सहजच तुमच्यात मधुरता, माधुर्य येईल.

सहज परिपक्वता येईल. किती गुण तुमच्यात सहज येतील माहीत नाही. पण सर्वप्रथम हे नम्रतापूर्वक जाणून घ्या की, आम्ही त्या तत्त्वांत शिरलो का? आम्हाला त्या तत्त्वांमध्ये खोलवर उतरायचे आहे का? तसे झाले तर सर्व शक्ती तुमच्यात आपोआप प्रस्फुटित होतील. तुम्ही तुम्हाला बघा. स्वतःला ओळखा.

आज शिवाची स्तुती गाताना जो अल्हाद तुम्हाला मिळाला, ही शक्ती आम्हाला शिवशंकराने दिली. म्हणून शिवाला आनंददायी म्हणतात. या आनंदात एक निखळ आनंद आहे. हा अल्हाद आमच्या भावनांशी जोडला आहे. भावनांमधून व्यक्त होतो. जसे फुलातून सुगंध प्रस्फुटित होत असतो. तशीच आमच्या हृदयात असणारी एखाद्या व्यक्ती, वस्तूंप्रती, ती चांगली असेल, उदार, प्रेरक, सुंदर अशा भावना शुद्ध भावना होय. या भावनांचा सुगंध म्हणजेच अल्हाद, म्हणजेच प्रेममय आनंद. या आनंदानंतर कुठल्याही गोष्टीची, आनंदाची गरज भासत नाही. या अल्हादाला उभारणारे, सांभाळ करणारे, योग्य वेळी त्याचा उपयोग, उपभोग घेणारे स्वयं शिवशंकर आहेत. हे सर्व आम्हाला स्पंदनांमधून जाणीव देतात. आता पण कोणा थोर महात्म्यांचे संतांचे नुसते नाव घेतले तरी शरीरावर रोमांच उभे राहतात. एकाच वेळी स्पंदने आणि लहरी दोन्ही वाहू लागतात. चैतन्यमय होते.

ही जी आत्मियता आहे ना ती शिवतत्त्वाकडून येते. एकमेकांना मदत करण्यासाठी, सांभाळण्यासाठी तुम्ही जे वाकता, वळता, तोडफोड (आपली) करता, थोडक्यात कष्ट घेता ते शिवतत्त्व आहे. सतत जी तुमची नितांत रस्सीखेच चालू आहे, आत्मियता आहे हे सारे शिवतत्त्वापासून प्राप्त करु शकता.

प. पू. श्री माताजी - १९.०२.१९९३

सर्वप्रथम आपल्याला शिवतत्त्वाला प्रस्थापित करायला हवे. प्रेम, आनंद आणि सत्याच्या तत्त्वाला. यात बऱ्याच समस्या आहेत. कारण लोकांना शंकराचा ब्रम्हांडीय स्वभाव ठाऊक नाही. उदाहरण स्वरुप, मी असे ऐकले आहे की, लोक शिवतत्त्व आणि विष्णुतत्त्वावर भांडतात. शैव, वैष्णव अशा वाटण्या करतात. खरेतर

असे आहे की, शिवतत्त्वापर्यंत जाण्यासाठी तुमच्याजवळ विष्णुभगवान आहेत आणि त्यांच्या शक्तीही आहेत. शिव, विष्णु दोन्ही भिन्न नाहीत. परस्परपूरक आहेत.

श्री विष्णुशिवाय तुम्ही श्री शिवापर्यंत पोहोचू शकत नाही, शिवतत्त्व समजल्याशिवाय श्री विष्णूपर्यंत वर उठणे पोहोचणे शक्य नाही. कुंडलिनीही सुषुन्मानाडी मार्गातून वर जाते. कुंडलिनी शिवाचे तत्त्व आहे. विकासप्रक्रियेत ती श्री विष्णुद्धारा तयार केलेल्या मार्गावरुन पुढे जाते. त्यामुळे तुम्ही दोन्हीपैकी एकाशिवाय पुढे जाऊ शकत नाही. एक मार्ग आहे तर दुसरा लक्ष्य.

प. पू. श्री माताजी - पुणे - ०५.०३.२०००

सहजयोगात आल्यावर तुमचा जीवात्मा, संपूर्ण लक्ष (अटेंशन) किंवा चित्त म्हणा पूर्णपणे शिवाच्या चरणावर लीन होते. त्या बरोबर तुमच्या अंतरात जे पंचमहाभुतांचे गुण आहेत ते अत्यंत सूक्ष्म रुप धारण करतात. सहजयोगात जर तुम्हाला शिवतत्त्वाची खरीखरी जागृती प्राप्त झाली तर तुमच्या आत जितके सूक्ष्मातिसूक्ष्मतर भाव आहेत ते जागृत होतात.

ज्याच्यात शिव जागृत आहे असा माणूस त्याला कोणी हात लाऊ शकत नाही. असा माणूस नेहमी संरक्षित असतो. आपल्या वैयक्तिक जीवनात, सहजयोगात तुम्हाला शिवशंकराचे अनुकरण करायचे आहे. नाही केले तर पहिली गोष्ट हृदयरोग होईल. I like it. I don't like it. यात दोनप्रकारचा खेळ असतो. एकतर अतिक्रोधाने हार्टवर परिणाम होतो. दुसरे अतिक्रोधानंतर पश्चात्तापामुळे 'अंजायना' आजार होऊ शकतो. तुम्ही तुमचे संरक्षण शिवशंकरामध्ये शोधा.

प. पू. श्री माताजी - दिल्ली - १४.०२.१९९९

❋ ❋ ❋

कधी कधी श्री शंकराची करुणा अत्यंत तर्कहीन वाटते.

परंतु त्याच्यामागे खूप मोठा तर्क असतो. तो तर्क म्हणजे

त्यांच्या प्रत्येक कार्यातून कोणत्या ना कोणत्या मोठ्या

समस्येचे समाधान होत असते. तीन शक्तींच्या कार्यशैलीची सर्व लीला हेच

दर्शविते की शेवटी विजय सत्याचाच होतो.

सर्वप्रथम श्री शंकराची करुणा आणि भोळाभाव,

दुसरी आहे श्री विष्णुचा लीला.

तिसऱ्या क्रमांकावर ब्रम्हाची लीला आहे जी सर्व सृजन करते.

प.पू. श्री माताजी - २६.०२.१९९५

## विशुद्धीचक्र

### १) श्री योगेश्वर कृष्ण

श्री विष्णुशक्तीचा उद्‌भव श्री कृष्ण अवतारात झाला म्हणून त्यांना पूर्णा वनार म्हणतात. इतकेच नव्हे ते विराट आहेत. विराट म्हणजे महान. महान भगवान ज्याला आपण अकबरही म्हणतो. मुसलमानही हे स्वीकारतात. 'अल्लाह - हो - अकबर' म्हणतात.

श्री कृष्ण अवतार संपूर्ण रुपात झाला - जशा चंद्राच्या सोळा कला आहेत. श्री कृष्णाच्याही सोळा पाकळया आहेत. म्हणून ते संपूर्ण आहेत. ते संपूर्ण पौर्णिमा आहे. संपूर्ण चंद्रमा. श्री विष्णुच्या अवताराबरोबर ते पूर्ण होते आणि त्यातूनच ही पूर्ण अभिव्यक्ती झाली. रामावतारात ज्या काही कमतरता राहिल्या त्यांची पूर्ती कृष्णावतारात झाली. उजव्या हृदयात बारा पाकळ्या आहेत. विशुद्धीमध्ये सोळा. या द्वारांकडे लोकांचे लक्षच जात नाही ते त्यांनी दर्शविले.

प. पू. श्री माताजी - २८.०४.१९९४

श्री कृष्ण असे व्यक्ती होते जे सत्यावर दृढ होते. त्यांनी जे काही केले ते सत्याच्या सिद्धांतानुसार केले. प्रत्येक खोटी गोष्ट नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सत्याच्या माध्यमातून स्वतःला स्थापित केले. ते सत्याची मूर्ती होते आणि आचरणातून त्यांनी सत्याची व्यापकता दर्शविली.

कृष्ण शब्दाची उत्पत्ती कृषी शब्दापासून आहे. कृषी म्हणजे शेती. त्यांनी अध्यात्माचे बी पेरले. त्यासाठी त्यांनी विचार केला की, आमची आध्यात्मिक स्थिती कशी आहे? आमची आध्यात्मिक भूमी कशी आहे? श्री रामाच्या काळात श्री रामांनी खूप मर्यादांची बंधने घालून घेतली होती, पण ती सर्व मानसिक होती. तशी बंधने पाळणे सोपे आणि स्वाभाविक नव्हते. परिणामी लोक अत्यंत गंभीर झाले. ते फार बोलत नव्हते. जास्त हसत नव्हते की, कुठल्या गोष्टीचा आनंद घेत नव्हते. त्यामुळे श्रीकृष्णाने निर्णय घेतला सर्वप्रथम लोकांना बंधनातून मुक्त करायचे. मोकळे करायचे.

प. पू. श्री माताजी - कबेला - ०५.०९.१९९९

लोकांच्या चुकीच्या समजुती संपवून त्यांच्या शक्ती जागृत करण्यासाठी श्री कृष्णावतार झाला. त्यांनी लीला रचली आणि लोकांना जागृत करण्याचा प्रयत्न केला.

लोकांना सामुदायिक करण्याचा प्रयत्न केला. राधा साक्षात महालक्ष्मी होती. महालक्ष्मी तत्त्वानेच उत्थान होते. ते गोपींच्या उघडया पाठीकडे दृष्टिक्षेप टाकीत कारण गोपींची कुंडलिनी शक्ती जागृत व्हावी. घडा फोडायचे कारण यमुनेचे चैतन्यमय जल गोपीकांच्या माथ्यावरुन वाहून पाठीवर यावे आणि जागृती मिळावी. रासलीलेत सर्वांना नाचवीत. राधेच्या शक्तीला सर्वांध्ये संचारित करीत होते. मुरली वाजवीत. मुरलीही एक प्रकारची कुंडलिनी आहे. सहा चक्रांप्रमाणे बासरीतही सहा छेद, छिद्रे असतात.

प. पू. श्री माताजी - दिल्ली - २८.०२.१९९१

होळी म्हणजे काय? जे पाणी यमुनेत वाहत होते त्यात राधेची पाऊले पडल्याने ते चैतन्यमय होत असे. ते पाणी घागरीत भरुन, लाल रंगाने रंगीत करुन कोणाच्या अंगावर टाकीत तेव्हा खरेतर कुंडलिनी जागृती करीत असत.

श्री कृष्णाने जितक्या पूजा होत्या (जसे गोवर्धन पूजा) सर्व बंद करवल्या व सांगितले की, तुम्ही पूजाबिजा करु नका. जो तुम्हाला मिळवायचा आहे त्या आत्म्याकडे जा. छोट्या गोष्टीत अडकू नका. क्षूद्र गोष्टीत रमणे योग्य नव्हे.

प. पू. श्री माताजी - २९.०३.१९८३

त्यांनी जी कार्ये केली त्यात उदारतेची पराकाष्टा केली. पूर्ण विवेकानुसार सर्व कार्ये केली. ते इतके विवेकी होते की, आपला मामा कंस त्याचाही त्यांनी वध केला. कंसाला त्याच्या चुकांची शिक्षा केली. त्यांना सांसरिक बंधने, नाती यांचा खूप मोह नव्हता.

प. पू. श्री माताजी - १८.०८.२००२

श्री कृष्ण चतूर आणि ज्ञानी होते,ज्ञानपूर्ण होते कारण ते बुद्धिमान आणि विराटरुप होते. त्यांचे समस्त प्रेम, करुणा फक्त साध्या सुध्या गोप, गोपिकांसाठी होते. राज म्हणून त्यांचे जीवन आपल्या समजण्यापलीकडे आणि रहस्यमय होते. पण सहजयोगी ते ही समजू शकतात. श्री कृष्ण जेव्हा राजे झाले, त्यांना विवाह करावा लागला. त्यांनी पांच विवाह केले. हे पांच विवाह खरेतर पंचतत्त्वांच्या परिणाम स्वरुप होते. श्री कृष्णाजवळ सोळा हजार शक्ती होत्या. शक्तींना स्त्रीरुपात अवतरित व्हावे लागले. त्या सोळा हजार राजकुमारी झाल्या. एका राजाने त्यांचे हरण करुन त्यांना दूषित करु इच्छित होता, तेव्हा श्री कृष्णाने आक्रमण करुन त्या कुमारींना मुक्त केले. आपल्या बरोबर आणले. प्रथेनुसार त्यांच्याशी विवाह केला. वास्तविक हा विवाह म्हणजे आपल्या शक्ती परत मिळविणे होते.

श्री कृष्णाने त्या शक्तींचा उपयोग विविध वस्तूंच्या सृजनासाठी केला. जर श्री कृष्ण अवतार झाला नसता तर आपल्याला आध्यात्मिक जीवनाचे ज्ञान ना होते. जरी संत आणि द्रष्टांनी आध्यात्मिक ज्ञान समाजाला दिले पण कोणत्याही अवताराने या संबंधात सांगितले नाही. वामनावतार, परशुराम अवतार, इ. अवतार झाले पण कोणी आध्यात्माबद्दल बोलले नाही. प्रथमच श्री कृष्णाने अर्जुनाला आध्यात्मिक जीवनाबद्दल ज्ञान दिले. त्या काळात लोक अध्यात्म समजून घेण्याच्या मनःस्थितीत नव्हते.

ऐतिहासिक दृष्टीने आम्ही श्री कृष्णाप्रति कृतज्ञ असायला हवे. कारण त्यांनी पहिली गाठ उकलली. हेच कारण आहे की, त्याला विष्णुग्रंथी म्हटले जाते. श्री कृष्णांची इच्छा होती की, आध्यात्मिकतेचे ज्ञान हळूहळू प्रगट व्हावे. त्यांच्या जितक्या लीला होत्या, सहजयोगाशी संबंधित होत्या. त्यांनी तेव्हा जी शेती कसली तीच वाढली आणि तुमच्या (सहजयोगी) रुपाने माझ्यासमोर आली आहे. माझ्यासमोर तयार वस्तू हजर झाली आहे (तुम्ही). त्या फळाचे मी देणे लागते. ते माझे साध्य आहे. मला द्यावेच लागेल.

प. पू. श्री माताजी - १९.०८.१९९०

श्री भगवत्‌गीता समजण्यासाठी तुम्हाला सहजयोगात यावे लागेल. फक्त वाचून गीता समजणार नाही. ज्यांनी गीता ऐकवली ते स्वतः श्री कृष्ण होते. प्रथम त्यांच्या विषयी जाणून घेऊ. श्री कृष्ण फक्त हुशार नव्हते. त्याकाळचे ते राजदूत होते. डिप्लोमसीचा जो अर्थ आहे एस्सएन्न्स तो ते पूर्ण समजत होते. डिप्लोमसीचा essence काय आहे? अशी absurd गोष्ट करा, जी केल्याने माणूस तोंडघशी पडेल. कृष्णाचा जो खेळ आहे तो समजण्यासाठी प्रथम सहजयोगात उतरायला हवे. मी तर समजावतेच पण तुम्हीही समजावून घ्या.

श्री कृष्णाने सांगितले की, तुम्हाला 'ज्ञान' व्हायला हवे. ज्ञान म्हणजे काय? ज्ञानाचा अर्थ तुमच्या सेंट्रल नर्व्हस सिस्टीममध्ये तुम्ही समजायला हवे की परम काय आहे? ज्यामुळे तुम्ही स्थितप्रज्ञ होता. गीतेच्या दुसऱ्या अध्यायात त्यांनी अत्यंत स्पष्टपणे हे सांगितले. व्याख्याच दिली की, सहजयोगी कसा असावा? प्रथम त्यांनी सांगितले की, आत्मानुभव मिळवून स्थितप्रज्ञ व्हा. दुसरी गोष्ट अतिशय मजेशीरपणे सांगितली. की बेटा तू कार्य करीत रहा सर्व कार्य परमेश्वरचरणी अर्पण कर. भावार्थ हा की, प्रथम आत्मा प्राप्त करा नंतर पुढची गोष्ट बोला. तुम्ही जेव्हा दुसऱ्या किनाऱ्यावर पोहोचता, पार होता तेव्हा काय म्हणता? येत आहे. जात आहे. होत आहे. तुम्ही असे म्हणत नाही की मी येतोय, मी असा आहे, मी हे करीत आहे (करतोय) असे म्हणत नाही तुम्ही तृतीय पुरुषात बोलता (थर्ड पर्सन).

भक्तीसाठी श्री कृष्ण म्हणाले पत्रं, पुष्पम, फलम, तोयम' जे काही पान, फूल, फळ पाणी द्याल ते आम्ही स्वीकारु. पण दैण्याच्या वेळेस एका शब्दाने, नाचविले जे लोकांना समजत नाही. म्हणाले की, तुम्ही 'अनन्यभक्ती' केली पाहिजे. अनन्य-ना, अन्य - दुसरा कोणीही नाही. जेव्हा तुम्ही माझेच अंग प्रत्यंग होता, भक्तीत तल्लीन होता. एकरुप होता. अद्वैत साधते. जेव्हा तुम्ही पराभक्ती कराल तेव्हाच फल पुष्प घेऊ. अन्यथा नाही. पण अनन्य शब्दच आम्ही खाऊन टाकला. शिल्लक राहिली ती फक्त भक्ती.

तुम्ही यात सरळ तीन गोष्टी समजू शकता. श्री कृष्णाचा कर्मयोग, त्यांचा ज्ञानयोग आणि त्यांचा भक्तीयोग. जर परमात्म्याला मिळवायचे असेल तर त्याचे अंग प्रत्यंग बना. अनन्य व्हायला हवे. जोपर्यंत अनन्य नसाल योग प्राप्त करु शकत नाही. अनन्य भक्ती प्राप्त करायला हवी. कृष्णाने हे स्पष्ट बजावले आहे.

कृष्ण समजण्यासाठी तीक्ष्ण दृष्टी हवी. कारण ते बुद्धिवादाची पराकाष्ठा आहेत. तुम्ही त्यांच्यासमोर उभेही राहू शकत नाही. ते प्रकाशित बुद्धिमान आहेत. त्यांची इच्छा आहे तुम्हाला जरा नाचवावे. योग्य रस्त्यावर आणावे.

'अब मैं नाच्यो बहुत गोपाल', देवा खूप नाचवलेस. आता नाचवणं थांबव मी तुला शरण गेलो आहे. मला सहजयोगात घे. आत्मसाक्षात्कार दे. तेव्हाच नाच थांबवनात. त्यांनी म्हटलेच आहे 'तूं शरणागत हो कृष्ण शरणागत हो'.

तर आमच्या विशुद्धीचक्रात जे श्री कृष्ण विराजमान आहेत त्यांना तुम्हाला जागृत करावे लागेल. जोपर्यंत ते जागृत होणार नाहीत तुम्हाला 'विशुद्धी' चक्राची तक्रार राहील.

श्री कृष्ण आपल्या अंतःस्थ स्थापित सोळा केंद्राचे नियंत्रण करतात. तुमचे गळा, नाक, कान, डोळे यांचेही नियंत्रण तेच करतात. प्रत्येक गोष्टीचे नियंत्रण त्यांच्या हातात आहे.

विशुद्धी चक्राचे तीन भाग आहे. डावा, उजवा आणि मध्य. जेव्हा श्री कृष्णाचा जन्म झाला. त्यांची बहीण विष्णुमाया होती तेव्हा कृष्णाच्या डाव्या बाजूस प्रादुर्भाव होता. बालकृष्णाप्रमाणे.

ते मोठे झाले राजा झाले. तेव्हा त्यांच्या उजवीकडे श्री विठ्ठलाचे स्थान असे आणि ते द्वारकेला राजा झाले. तेव्हा मधोमध श्री कृष्ण जे कोणत्याही प्रसंगी श्री कृष्णच आहेत स्थापित झाले.

जे मध्यभागी श्री कृष्ण आहे. त्यांच्या अनेक लीला आहेत. ते <u>लीलामय</u> आहेत. त्यांच्यासाठी सारी सृष्टीच एक लीला आहे. तेव्हा त्यांनी जगात येऊन जितकी

कामे केली, लोकांना ग्रस्त केले होते ते तोडून फोडून उत्तम केले. त्रासदायक विधी नष्ट केले.

सुदाम्याला डोक्यावर बसविले, विदुराघरी कण्या खाल्ल्या, जितके विधी, जितक्या परंपरा होत्या ज्या अनावश्यक होत्या त्यांच्यावर शस्त्र उगारुन त्या नष्ट केल्या.

सर्व सृष्टी श्री कृष्णासाठी एक लीला आहे. जेव्हा सहजयोगी पार होतात तेव्हा त्यांच्यासाठीही जी सृष्टी दिसते ती साक्षी असते. साक्षी रुपाने पाहतांना ज्या ज्या गोष्टीचा पूर्वी मोह होता. तो मोह नष्ट होतो. लक्षात येते, अरे हे सर्व खोटे होते. एक नाटक होते ते संपले.

ही श्रीकृष्णाची देणगी आहे. आमच्या चेतनेस त्यांनी विशेष रुप दिले आहे. जेव्हा ते जागृत होते. आपण साक्षीरुप होतो.

श्री कृष्ण एक दुसरे महत्त्वपूर्ण कार्य करतात. आमच्यातील अहंकार, ज्याला आपण नेहमी घाबरतो, दुसऱ्यांपुढे दबले जातो, दोन्हीला ते आपल्या आत ओढून घेऊ शकतात. दोन्ही गोष्टी त्यांच्यात सामावू शकतात. कोणीही अहंकारी व्यक्तीला बघा श्री कृष्णाने त्याचा अहंकार नष्ट केलेला दिसेल. द्रौपदीचे चीरहरण झाले. साड्यांचा ढीग पडला दु:शासन थकला. त्याचा अहंकार चकनाचूर झाला.

कोणीही अहंकारी व्यक्ती असेल तिच्यावर यांची गदा पडली तर खेळात ते असा ठोसा देतात की, समोरची व्यक्ती निपचित (परास्त) पडते. समोरच्याची शुद्ध हरपते. त्याचप्रमाणे भित्रट माणूस असेल किंवा समाजात दबलेला माणूस असेल, कोणी दारिद्री असेल (सुदाम्याप्रमाणे) त्याचा मान सन्मान करणे, मैत्रीला पुढे नेणे, मनापासून भरभरुन देणे हे श्री कृष्णाचे कार्य आहे.

आज सहा हजार वर्षे झाली ते इथे अवतरले होते. कोणी त्यांना समजावून घेतले? श्री कृष्णाने गीता सांगितली पण लिहिली कोणी? याचा विचार करा. कृष्णलीला बघा. प्रत्येक ठिकाणी बंधने कशी तोडली. गीता पराशराच्या मुलाकडून लिहून घेतली. वास्तविक तो मुलगा एका धीवरकन्येचा (कोळ्याचा) होता. तो ही

कायदेशीर नाही. बेकायदा झालेला. म्हणून व्यासांकडून गीता लिहविली की, असाही माणूस (बेकायदा जन्म) सद्पुरुष होऊ शकतो. जन्म दैवाहाती कार्य मनुष्याहाती. जाती आणि त्यांची बंधने आणि हे दाखविण्यासाठी (कायदे कानून करणाऱ्यांसाठी) की, सद्पुरुष कुठेही जन्म घेऊ शकतो. सद्पुरुषाची जात, धर्म वा इतर काही विचारीत नाहीत तर हे विचारतात सद्पुरुष कोण आहे?

प्रत्येकाला त्यांच्या थट्टेने, मस्करीने त्यांनी ठीक केले. त्यांची मस्करी खूप प्रेमळ होती आणि खोलही. ती थट्टा, मस्करी इतकी तीक्ष्ण असे की तिच्या दाऱ्यांपासून कोणी वाचले नाही.

त्यांची राधा कोण होती? अल्हाद, आदिशक्ती जी दुनियेला अल्हाद देते, प्रसन्न करते. श्री कृष्णाची ही इच्छा होती की, सर्वांशी प्रेमाने वागा, सर्वांना प्रेम वाटा. म्हणून त्यांनी होळीचा सण सुरु केला होता. कोणीही असू दे अगदी तुमचा झाडूवाला असू दे. सर्वांना प्रेमाने भेटा, गळाभेट घ्या. होळीच्या पर्वात सगळ्यांची थट्टा मस्करी, शिवीगाळ होते. घाणेरडेपणा करुन घाण एकमेकावर फेकतो. शिवीगाळ करुन तोंड खराब करतो. जीवनातील सर्व अमंगल व्यक्त करुन नष्ट करा. पुन्हा मंगलमय वातावरण निर्माण करा. प्रेम द्या, प्रेम घ्या. श्री कृष्णाच्या आज्ञेनेच एकमेकांबद्दल अभद्र बोलले जाते. पण त्या मंगल पर्वात याची आहुती देऊन आपण श्री कृष्णाचे गुणही आत्मसात करावयाचे असतात. श्री कृष्णाची मंगलमयता, मांगल्य, त्यांचे माधुर्य, मोहकता, आमच्या जीवनात यायला हवी. आपण अत्यंत गोडीने एकमेकांशी बोलायला हवे.

प. पू. श्री माताजी - १६.०३.१९८४

श्री कृष्ण एक ईश्वरीय राजनीतिज्ञ होते. ईश्वरीय राजनीती काय आहे? तुम्ही भांडायचे नाही. तुम्हाला एखाद्या ठोस परिणामापर्यंत पोहोचायचे असेल तर प्रयत्न [illegible] करावे लागेल. हे मोठे चातुर्याचे काम आहे. कोणाशी पूर्ण तादात्म्य पावणे त्याच्याबरोबर खेळण्यासारखे असते. व्यक्तीने जाणले पाहिजे की, राजनीतीचा निष्कर्ष परोपकार आहे. मानवाचे हित हे लक्ष्य तुम्हाला प्राप्त करावयाचे

आहे. तुम्ही हे कार्य करीत असाल तर तुमचे किंवा विशेष व्यक्तीच्या स्वार्थासाठी करीत नाही. म्हणून आरडा-ओरडीची आवश्यकता नाही. याच्याशी खेळत रहा आणि शेवटी परोपकाराकडे घेऊन जा.

श्री कृष्णाने आपल्याला मधुरतापूर्वक सत्य बोलायला सांगितले आहे. हे सत्य परोपकारासाठी बोलले पाहिजे. कदाचित आता तुमचे बोलणे त्या व्यक्तीला रुचणार नाही. पण त्या व्यक्तीचे हित हेच तुमचे लक्ष्य असेल तर भविष्यकाळात तीच व्यक्ती तुमच्यावर अनुग्रहित होईल. परोपकारासाठी तुम्हाला खोटे बोलावे लागले तरी हरकत नाही. कारण विशुद्धीचे शासक श्री कृष्ण सत्याला ओळखतात. त्यांना खरे काय ते माहिती आहे.

प. पू. श्री माताजी सफरोन - यु.के. - १४.०८.१९८९

श्री कृष्ण (कुबेर) अत्यंत चलाख आहे. अत्यंत धूर्तव्यक्तित्त्व. प्रत्येक कार्या ागे त्यांचे चातुर्य असते. धनासंबंधीच्या मामल्यातही प्रथम ते तुम्हाला मूर्ख बनवतात की, धनामागे धावा आणि असे केल्यावर तुमच्या लक्षात येते की असे करणे अगदी मूर्खपणा होता.

ते वैभवाचे देवता, महान देवता होते. धनदौलतीचा कसा उपयोग करायचा हे ते जाणत होते. उपयोग धर्मपूर्वक करावा, अधर्माने नाही. धनार्जन कोणत्याप्रकारे करावे हे ही त्यांना उत्तम अवगत होते.

प. पू. श्री माताजी - काना जोहरी - १८.०८.२००२

श्री कृष्ण अमेरिकेचे शासक देव आहेत.

प. पू. श्री माताजी - २९.०७.२००१

श्री कृष्णाचा एक दुसरा गुण आहे ते गोचर होते. आकाशतत्त्वापासून बनलेले आणि सर्वत्रव्याप्त असणारे. अणु, रेणु, परमाणूतही ते मावतात. तिन्ही प्रकारच्या अणुंना ते आंदोलित करु शकतात. कारण श्री कृष्ण प्रत्येक गोष्टीत प्रवेश करु शकतात. म्हणून ते पदार्थ, पशू, मानव, आत्मसाक्षात्कारी व्यक्तींमध्ये व्याप्त

होतात. पदार्थांमध्ये, चैतन्यलहरींच्या स्वरुपात, पशूंमध्ये मार्गदर्शकाच्या रुपात स्थित असतात.

श्री कृष्ण अन्न प्राशन करुनही खात नाहीत, झोपूनही झोपत नाहीत. पत्नी असूनही ब्रम्हचारी होते. यामुळेच ते योगेश्वर आहेत.

प. पू. श्री माताजी - ०२.१०.१९९४

योगेश्वराची ओळख आहे. सतत हसतमुख असणे. उपरोधी न होता प्रत्येक वस्तूच्या ज़ानाने परिपूर्ण होणे आणि अत्यंत स्नेहमय असणे.

हेच श्रीकृष्णाचे चरित्र आहे. आपण आपल्या आत डोकावून बघा की, आमच्या आत कोणकोणत्या गोष्टी आहेत. ज्या आम्हाला द्विधा करतात. श्री कृष्णाच्या जीवनात हे दाखविले गेले की, एका लहान मुलासारखे ते होते. अगदी शिशूप्रमाणे. एकदम अज्ञानी (अबोध) असे ते होते. स्वतःला काही कोणी समजत नव्हते. आपल्या आईच्या साथीने वाढत होते. याचप्रकारे स्वतःत डोकावून बघताना तुम्हीही हाच विचार करायला हवा की, मी एक अबोध बालक आहे. बालक म्हणजे अबोधिता, भोळेपण, त्या भोळेपणाने आत डोकावा. त्या भोळेपणात स्वतःला झाकून घ्या. श्री कृष्णाची जी गोष्ट होती ती ही की, बालपणी ते भोळे होते आणि मोठेपणी अत्यंत गहन गीता समजावली. हे कसे घडले की, माणूस इतका पुढे गेला. याच प्रकारे आपणही सहजयोगात प्रगती करु शकतो. पुढे जाऊ शकतो.

श्री कृष्ण पेक्षा कोणी महान योगी मी मानीत नाही. कारण त्यांनीच हा रस्ता दाखवला की, तुम्ही तुमच्या चुका बघा, आपले दोष ओळखा, परिचित व्हा. इतरांचे दोष दाखविण्या ऐवजी आमचे दोष बघून आम्ही हैराण व्हायला हवे की, आम्ही आमच्या आत किती राक्षस पाळले आहेत. किती घाणेरड्या गोष्टींचा आपण विचार करतो. दोष शोधल्यावर ते दुरुस्त करता येतात. दूर करता येतात. श्री कृष्णाचा संदेश हाच आहे की, आपल्या आत डोकावा आणि बघा.

प. पू. श्री माताजी - पुणे - १०.०८.२००३

या आदिपुरुषाचे महानतम महत्त्व हे की ते योगेश्वर होते. ते योगाचे ईश्वर होते. परमात्मा होते. आपल्या योगाचे स्वामी होते.

प. पू. श्री माताजी - लंडन - १५.०८.१९८२

योगेश्वराचा एक महान गुण त्यांची सद्सद्विवेक बुद्धी होती. ते ओळखून होते की कोण राक्षस आहे आणि कोण राक्षस नाही. कोण चांगला आहे आणि कोण वाईट? कोणाला भूतबाधा झाली आहे, कोणाला नाही. अबोध कोण आहे? कोण नाही? हा गुण त्यांच्यात (अंतर्रचित) अंतरात होता - सद्विवेकाची पूर्ण शक्ती त्यांच्यात होती.

प. पू. श्री माताजी - जिनेव्हा - २८.०८.१९८३

धर्माचे जेव्हा पतन होते तेव्हा त्याच्या पुनर्स्थापनेसाठी ते (श्रीकृष्ण) येतात. विष्णुच्या स्तरावर ते दर वेळेस धर्माची स्थापना करण्यासाठी पृथ्वीवर अवतार घेतात. परंतु श्री कृष्णाच्या स्तरावर ते योगेश्वराच्या रुपात येतात.

श्री कृष्ण संहारक शक्ती आहेत. ते विनाशक शक्ती आहेत. हे चांगले आहे की आपल्या सर्व आयुधांसह ते आमच्या रक्षणासाठी येतात. पण त्यांच्याकडे सुदर्शनचक्रही आहे. सुदर्शन - सु म्हणजे शुभ, दर्शन म्हणजे बघणे. ते आम्हाला शुभ दर्शन देतात. तुम्ही त्यांच्याशी चलाखी केली तर सर्व आपल्या मानेवर येते आणि तेव्हा तुम्हाला शुभदर्शन होते की, तुम्ही हवेत लटकत असता.

प. पू. श्री माताजी - लंडन - १५.०८.१९८२

धर्म आणि कर्तव्य यांच्यात जी ओढाताण किंवा संघर्ष होतो त्या वेळी हे लक्षात ठेवायला हवे की, धर्म कर्तव्यापेक्षा उच्च आहे. वरचा आहे आणि त्याच्याही वरची गोष्ट आत्मा. आम्ही जे छोटे वर्तुळ आखले आहे (परिघ) जे आमचे वलय, गेल आहे. त्याहून जे उच्च, वरचे गेल आहे ते मिळवायचे असेल तर या छोटयाला सोडावे लागेल. श्री कृष्णाने हीच शिकवण दिली. श्री कृष्ण म्हणतात की, आपल्या हितासाठी जर खोटे बोलावे लागले तर खोटे बोला. मोठ्या ध्येयासाठी ह्या छोट्या

गोष्टी आहेत. त्यांना सोडावे लागेल. आपल्या जीवनात येऊन श्री कृष्णाने हेच सांगितले.

प. पू. श्री माताजी - नवी दिल्ली - २९.०३.१९८३

श्री कृष्णाचे हे कथन आधुनिक संदर्भात पूर्णपणे सत्य ठरते. जेव्हा जेव्हा धर्माचा ऱ्हास होतो, जेव्हा जेव्हा संत महात्म्यांना सतावले जाते, मी संतांना वाचवायला, राक्षसांना, नकारात्मक शक्तींना नष्ट करण्यासाठी या पृथ्वीवर जन्म घेतो. अवतारित होतो. श्री कृष्णतत्त्वाची ही जागृती आमच्या अंतरात व्हायला हवी. आम्हाला त्यांच्या गुणांची जागृती आणि अनुकरण आपल्या अंतरात करायचे आहे. तरच आमच्या शक्ती योग्य प्रयोजनासाठी वापरात येतील. कार्य करतील.

हीच श्री कृष्णाची पूजा आहे.

प. पू. श्री माताजी - १०.०८.२००३

## २. कृष्ण शक्ती - श्री विष्णुमाया

विष्णुमाया अवतार आणि घटना यांची घोषणा करणारी शक्ती आहे. आध्यात्मिक दृष्टीने ती अपवित्र वस्तू जाळूही शकते. जेव्हा तुम्ही तुमच्या दोषांना सामोरे जाऊ इच्छित नाही तेव्हा डावे विशुद्धिचक्र पकडले जाते. मी चुका केल्या. ठीक आहे. पण मी आता त्या पुन्हा करणार नाही. बस सामना करा. पण ते दोषांचा सामना करीत नाही. ते स्वतःला दोष देतील. पण ते दोषांचा सामना करीत नाही. दोषभावनेला डाव्या विशुद्धीवर टाकून दोषभावनेचे काळे ढग एकत्र करतात. आता मेघगर्जना, ढगांचा गडगडाट, ढगांच्या थोड्याशा घर्षणाने निर्माण होणारी वीज, विजांचा कडकडाट आणि पावसाला प्रेरणा देणारी विष्णु माया अशा व्यक्तींवर प्रकोप करते. अचानक त्यांना झटका बसतो. ते अतिसंवेदनशील आणि व्यग्र होतात. ही अधिरता त्यांना विचार करायला भाग पाडते की, मी इतका अधिर का आहे? माझी समस्या काय आहे? अपराधभावनेचे अनावरण होते. ते कार्य विष्णुमाया शक्ती करते.

महाभारताच्या काळात तिने द्रौपदीच्या रुपात जन्म घेतला. विष्णुमाया पंचमहाभूतांमध्ये राहणारी पवित्रता आहे. हीच पवित्रता विवाहवेळी पाच पांडवांना दिसली होती. तिच्या कौमार्य (पावित्र्य) शक्तीचा उपयोग धर्मनाश करण्यास उत्सुक असणाऱ्या कौरवांचे बिंग फोडण्यासाठी केला गेला. द्रौपदीने पांडवांना आग्रह केला की, धर्म रक्षणासाठी तुम्हाला युद्ध करावे लागेल. त्याचा परिणाम काहीही होवो.

भावाच्या रुपात श्री कृष्णाने द्रौपदीची नेहमी मदत केली. म्हणून भारतात बहीण भावाच्या संबंधांना खूप महत्त्व आहे. सहजयोगींमध्येही असेच व्हायला हवे. आपल्याकडे रक्षाबंधन आणि भाऊबीज अतिशय प्रेमाने साजरे होणारे सण आहेत. रक्षाबंधनाच्या दिवशी बहीण भावाला राखी बांधते. भाऊ जन्मभर तिच्या संरक्षणाची जबाबदारी घेतो. भाऊबीजेलाही बहीणभावाला ओवाळते.

विष्णुमाया शक्ती भावाचे रक्षण करते. समान वय, सारखे विचार संरक्षण, प्रेम. आणि पावित्र्य यामुळे भाऊबहिणींचे नाते महत्त्वपूर्ण समजले जाते. हे संबंध विष्णु माया संचलित करते.

जेव्हा आपण खोलात जाऊन विचार करतो तेव्हा विशुद्धीच्या समस्या लक्षात येतात. पाश्चिमात्य देशात लोक स्वतःला दोषी मानून छोट्यात छोट्या चुकांपासून सुटका करुन घेण्याचा प्रयत्न करतात. पाश्चिमात्य जगातील कायदे कठोर आहेत. त्याचे पालनही करावेच लागते. त्यामुळे लहान सहान गोष्टीतही दोषभावना इतकी आहे की, कोणीही स्वतःला सुधारु शकत नाही. सदा दोषभावनेने ग्रस्त राहतात. जीवनाची सूक्ष्मता लुप्त होत जाते.

तुम्हाला सहजयोगात घेतल्याचा अर्थ आहे तुमची पूर्ण डावी बाजू पकडलेली आहे. तुम्ही चैतन्यलहरीं योग्य प्रकारे अनुभवू शकत नाही. कारण तुमच्या ग्रीवा नाडीवर तुमचा दोष बसला आहे. दोषभावनेने इतके जखडून टाकले आहे की, तुम्हाला डावी बाजू जाणीव होत नाही. एखादा भयानक आजार होईपर्यंत तुमची डावी पकड तशीच राहते.

विष्णुमायेची सूक्ष्म गोष्ट ही आहे की, ती खरी गोष्ट जाणते. ती चमकते (विजेसारखी) आणि सर्व काही बघते. याचप्रकारे विष्णुमाया तुमच्यावर काम करु लागते तेव्हा ती सत्य शोधून काढते. सत्याला अनावृत करते. पण जर तुमच्या डाव्या विशुद्धीची पकड कायम रहात असेल तर विष्णुमाया निघून जाते. तेव्हा तुम्हाला काहीही जाणवत नाही. तुमचा डावा भाग जडवत होऊन जातो.

म्हणून स्वतःला दोषी समजू नका, ते अयोग्य आहे. ह्या रचलेल्या गोष्टी आहेत. स्वतःला दोषी मानण्याचा फायदा काय? हे करणे व्यर्थ होय. तुम्ही अपराध केलाही असेल तर त्याला सामोरे जा. सामना करा आणि निश्चय करा की, ही चूक पुन्हा करणार नाही. अपराधाची फक्त जाणीव ठेवल्याने तुम्ही पुन्हा पुन्हा अपराध करीत रहाल आणि नंतर तेच सवयीचे होईल.

ही विष्णुमाया आपली शक्ती दाखविते. ती अशी अनेक कामे करते ज्याने लोक घाबरतात. कोणत्याही तत्त्वात प्रवेश करते. जर जलतत्त्वात तिने प्रवेश केला तर प्रचंड वादळे तुफान येतात. कोणत्याही महाभूतात तिने प्रवेश केला तर तेथे उत्पात घडविण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे.

तुम्हा सहजयोग्यांमध्ये विष्णुमायेच्या शक्तींचे संचालन करण्याची योग्यता यायला हवी. तिची पूजा करण्याची शक्तीही तुमच्यात हवी. त्यामुळे विष्णुमायेचे लक्ष तुमच्याकडे असेल, तुमची देखभाल करील आणि तुमच्या जीवनाचे संचालन करील, दिशा देईल.

लोकांना पैशाची इतकी चटक लागली आहे की, जीवनातील मूल्यांचा ऱ्हास होत आहे. धनप्राप्तीसाठी लोक काहीही करायला तयार होतात. मानवाचा मूलभूत आधार 'पवित्रता' लोकांमधून लुप्त होत आहे. जेव्हा तुम्ही विष्णुमायेच्या पवित्रतेचा अपमान करता तेव्हा माया आपला खेळ दाखवते. तुम्हाला एड्ससारखे रोग जडतात. आणखीही काही आजार होतात जे असाध्य आहेत. त्यांना गुप्तरोग म्हणतात.

ती कुमारी 'निर्मल' आहे आणि कौमार्याचा सन्मान करते. कौमार्य केवळ स्त्रियांसाठी नसते. जर पुरुषही आपले पत्निव्रत आणि पावित्र्याचा सन्मान करीत नसतील तर त्यांच्यावरही विष्णुमाया आक्रमण करते. विष्णुमाया अत्यंत शक्तिशाली आहे. ती माया रचते. माया रुपात लीला दाखवते. ती मायेला तोडू शकते आणि कोणतीही वस्तू जाळू शकते.

विष्णुमाया सुधारक आहे. जेव्हा आपण आपल्या अपराधांना दोष स्वीकृतीच्या नावावर लपवता, या अपराधाला कोणते वेगळे नाव देता, वेगळा रंग देण्याचा प्रयत्न करता तेव्हा ही शक्ती व्यक्तिगत, सामूहिक, राष्ट्रीय किंवा आंतराष्ट्रीय स्तरावर त्या अपराध्यांचे पितळ उघड करते, कारण यातील प्रत्येक बाबीत प्रवेश करण्याची शक्ती आदिमायेत आहे. सगळ्या नैसर्गिक आपत्ती विष्णुमायाच आणते. ह्या प्रकोपांचे कारण म्हणजे आपले अपराध हे लोकांनी समजले पाहिजेत. अपराध केल्यानंतर अपराधांना लोक डाव्या विशुद्धीमध्ये दडवून ठेवतात. त्यांचा सामना करीत नाहीत.

एकदा डावी विशुद्धी जड झाली की, हस्तचक्राचा विवेकही संपुष्टात येतो. अशावेळी तुम्हाला समजत नाही की, विध्वंस कोणता आणि नवनिर्माण कोणते?

जर तुमची डावी विशुद्धी खराब असेल तर तुम्ही विध्वंसक गोष्टींचा स्वीकार करु लागता. यामुळेच हिंसाचार, फसवाफसवी, भ्रष्टाचार सुरु होतात. फोफावतात. अशा भयंकर अवस्थेपासून वाचण्यासाठीचा एकमात्र उपाय म्हणजे सहजयोगाचा उत्तमप्रकारे अंगीकार करणे. आत्मविश्वासामुळे तुम्ही डाव्या विशुद्धीपासून सोडवणूक करुन घेऊ शकता. पण समस्या ही आहे की, मी तुम्हाला जेव्हा विचारते तेव्हा तुमच्यात अपराधीपणा येतो. जे काही तुम्ही केले, ते पूर्णपणे समाप्त झाले आहे, त्यासाठी तुम्हाला क्षमा केली आहे. नाहीतर विष्णुमायेने तुम्हाला दंड दिला असता.

उजवीकडचे लोक (राजसी) जे क्रोधीत होतात, दुसऱ्यांवर प्रभुत्त्व गाजवितात आणि अन्य लोकांना वश करुन घेतात. त्यांच्यात आपले दोष सुधारण्याऐवजी डाव्याविशुद्धीत ठेवून देण्याची विशेष शक्ती असते. म्हणून मी म्हणते की डावी विशुद्धीची समस्या अहंचे उपफळ आहे. दोषग्रस्त झाल्याने तुम्ही तुमचीच हानी करीत नाही तर इतरांचेहे नुकसान करता.

इतर दोन बाबीही विष्णुमायेला त्रास देतात. त्यातील एक आहे धूम्रपान आणि दुसरी गोष्ट जे लोकांना माहिती नाही ती म्हणजे 'मंत्र'. श्री विष्णुमाया मंत्रांना शक्ती देते. जर तुम्ही परमात्म्याशी योग न करता मंत्रोच्चारण करीत असाल तर तुम्हाला त्या शक्तीशी जोडणाऱ्या तारा जाळू शकतील आणि तुम्हाला गळ्याचे, घशाचे विकार होऊ शकतील. कारण कृष्ण आणि विष्णु यांच्यात काही अंतर नाही. तुम्हाला विराटाची समस्याही होऊ शकते.

काही लोक उदारता दाखवून आपले अपराध लपवू इच्छितात. या प्रकारचे वागणे अगदी अयोग्य असते. विष्णुमायेवर ते चालत नाही. ती तुम्हाला उत्तम प्रकारे जाणते. तुम्ही जर तिच्याशी चलाखी करण्याचा प्रयत्न केला तर ती आपल्या शक्ती दाखवून देते.

आमच्या डाव्या बाजूच्या सर्व समस्या विष्णुमायेच्या क्रोधामुळे निर्माण होतात. ती तुम्हाला दंड देते, तुमच्या अपराधांना उजेडात आणते. तुम्हाला तेज देते, दोष दूर करते. अशा अनेक शक्तींनी परिपूर्ण असणाऱ्या विष्णुमायेची पूजा आपण आज करतो आहोत.

श्री माताजी मी पूर्णपणे निर्दोषी आहे असे कोणी सांगितले तर विष्णुमाया अत्यंत प्रसन्न होईल. एकदा तुम्ही स्वतःला दोषी मानणे सोडून दिले की, पुढे चुका करणार नाही. कारण तुम्ही स्वतःला दोषभावनेपासून दूर ठेवता. स्वतःला अपराधी ठरविणे, अपमानित करणे, क्षुद्र मानण्याचे काही कारण नाही. स्वतःला स्वतःपासून वेगळे करा. तुम्ही आरशात बोलू शकता. नदीवर, समुद्रावर, जंगलातील झाडाजवळ

जाऊन म्हणा मी हा अपराध केला आहे. पण या नंतर मी असे करणार नाही. सर्व तत्त्वांशी तुम्ही असा वायदा करु शकता. विष्णुमाया पाचही महाभूतांमध्ये आहे. तिला तुमचा संदेश मिळेल.

प. पू. श्री माताजी - १९.०९.१९९२

## आज्ञाचक्र

## भगवान येशू ख्रिस्त

श्री येशू विश्वाचे आधार आहेत. ही पवित्रता, ही मंगलमयता हिचे सृजन एका अंड्याच्या रुपात केले गेले. नंतर ते अंडे दोन भागात फोडले. पहिला भाग श्री गणेश आहे. दुसरा अर्धा भाग परिपक्व झाल्यावर येशू ख्रिस्त स्वरुपात अवतरला. येशू स्वतः ॐकार स्वरुप आहेत. चैतन्यलहरी म्हणजेही श्री गणेशजी आहेत. इतर सर्व अवतारांनी शरीर धारण करण्यासाठी पृथ्वीतत्त्व धारण केले. येशूचे शरीर पूर्ण ॐकारमय आहे आणि श्री गणेश त्यांचे पृथ्वीतत्त्व आहे. त्यामुळे आम्ही म्हणू शकतो की, येशू श्री गणेशाची अवतरित शक्ती आहे. यामुळेच ते पाण्यावरुन चालू शकतात; ते देवत्त्वाचे निर्मलतम रुप आहे.

प. पू. श्री माताजी - ०३.०४.१९९४

सुरुवातीतील श्री गणेश रुपात त्यांचे (श्री येशू) सृजन झाले. या शिशूमध्ये फक्त पृथ्वीतत्त्वाचा अंश होता. आज्ञाचक्रावर ज्या अंतिम तत्त्वावरुन जावे लागले ते होते प्रकाशतत्त्व. अर्थात त्यांना दिव्य शक्तीच्या खऱ्या रुपात यावे लागले. ओंकार रुपात. तुम्ही असेही म्हणू शकता की चैतन्यलहरींच्या रुपात ज्यांना आपण नाद किंवा शब्दब्रम्ह असे काही म्हणतो. शेवटी त्याला ब्रम्हतत्त्व व्हावे लागले. ब्रम्हतत्त्व होण्यासाठी ज्यांना इतर सर्व महत्त्वाच्या गोष्टींपासून वेगळे व्हावे लागले. शेवटचे तत्त्व प्रकाशतत्त्व होते. ते येशूला पार करावे लागले जर त्याच्या आत पृथ्वी तत्त्व होते. कारण उटण्याच्या मळापासून त्यांचे सृजन झाले होते. इतरही तत्त्वे त्यांच्यात होती. पण जेव्हा ते आज्ञाचक्रावर येतात तेव्हा बाकी सर्व तत्त्वे त्यांना सोडावी लागतात. आपल्या आतील स्थित असणाऱ्या तत्त्वांनी दूर करण्यासाठी त्यांना (येशू ख्रिस्त) मरण पत्कारावे लागले. पूर्ण, संपूर्ण पावन आत्मा बनण्यासाठी जे कार्य त्यांनी सूक्ष्म रुपात केले ते स्थूल रुपात कार्यान्वित होते. हेच कार्य करण्यासाठी त्यांना मरावे

लागले. त्यांच्या आत ज्या गोष्टीचा मृत्यू झाला ती होती पृथ्वी तत्त्व, इतर तत्त्वे, आणि त्यांच्यात 'पावन आत्मा' चा उद्‌भव झाला.

त्यांचा पुनर्जन्म झाला. पावन आत्मा. शुद्ध ब्रम्हतत्त्वाचाही जन्म झाला. त्यांनी येशू ख्रिस्ताच्या शरीराची रचना, निर्मिती केली. त्यांना रक्षक यासाठी म्हटले जाते कारण की मानवाला शारीरिक संवेदने वेदनांच्या वर नेण्यासाठी त्यांनी हे दार पार केले. जे लोक पंचमहाभूतांवर अवलंबून असतात त्यांना आत्म्याच्या स्तरापर्यंत नेण्यासाठी हे दार पार केले.

त्यामुळे पुनर्जन्म हा आहे जिथे तुम्ही आपल्या चित्ताकडून परमेश्वराच्या चित्ताकडे उडी मारता. जिथे तुम्ही तुमच्या चित्तास अनुभवू शकता. ही घटना त्यांच्याबरोबर घडलेली आहे. पण जेव्हा त्यांचा पुनर्जन्म झाला तेव्हा ते शुद्ध आत्मा, शुद्ध ब्रम्हतत्त्व बनले. पुनर्जन्म मूलाधार चक्रापासून पृथ्वीत त्याच्या रुपात सुरु झालेली त्या दिव्य शक्तीच्या उत्क्रांतीची घटना आहे. जिने मूलाधारावर जन्म घेतला आणि आज्ञाचक्रावर आली. तिथे सर्व तत्त्वांना पार करुन शेवटी सहस्त्रारात प्रवेश करुन पूर्ण ब्रम्हतत्त्व होण्यासाठी येशू ख्रिस्ताचे सृजन केले गेले.

प. पू. श्री माताजी - ११.०४.१९८२

येशूख्रिस्त श्री कृष्णाचे पुत्र होते. ते मानवाचे चरित्रविषयक आधार आहेत.

प. पू. श्री माताजी - २३.०४.२००१

ते आदर्श होते. एक आदर्श संत, आदर्श साक्षात्कारी व्यक्ती, एका अशा व्यक्तीची प्रतिमूर्ती जी आमच्या रक्षणासाठी स्वर्गातून आली. येशू ख्रिस्ताने मृत्यूनंतर पुनर्जन्म घेतला होता. सहजयोगात आपणही मृत्यूनंतरच्या जीवनात प्रवेश केला आहे. ही गोष्ट समजून घेतली पाहिजे की, पुनर्जन्म आमच्या सर्वांसाठी पूर्ण विश्वासाठी, संदेश आहे की, आम्हाला पुनर्जन्म प्राप्त करावयाचा आहे.

येशू ख्रिस्ताचे आगमन जेव्हा झाले लोकांना अध्यात्माचे बिलकूल ज्ञान नव्हते. पण कसं कसं सगळं इतकं सुंदरपणे कार्यान्वित झाले की, लोक पुनरुत्थान

महत्त्वाचे आहे हे समजू लागले. तुमचाही पुनर्जन्म झाला. कुंडलिनी उठते आणि तुमचा संबंध दिव्य शक्तीशी जोडते.

येशू ख्रिस्त अत्यंत साधारण आणि गरीब व्यक्ती होते. ते एका सुताराचे पुत्र होते. त्यांच्यासाठी पैसा जास्त महत्त्वाचा नव्हता. निरुपयोगी होता. त्यांच्यासाठी आत्मा महत्त्वाचा होता. तोच सर्व काही होता. ते अत्यंत विवेकी होते. मोठमोठ्या चर्चांध्ये त्यांनी पाद्रींबरोबर जे वादविवाद केले ते आश्चर्यजनक होते. एक लहान मूल धर्मतत्त्व इतक्या खोलात कसे समजू शकते? त्यावेळेस येशू लहान बालक होते. परंतु ते परमेश्वराचे बंदे होते. खरेखुरे पाईक होते. परमेश्वराची ते निर्मिती होते. ते श्री गणेश होते. ते ॐकार आहेत, ज्ञान आहेत. सर्वकाही आहेत. याउपर त्यांना कोणी ओळखले नाही कारण लोक सत्याला ओळखू शकत नाहीत.

प. पू. श्री माताजी - टर्की - २२.०४.२००१

येशू ख्रिस्ताच्या जीवनाचा मोठा उद्देश हा होता की, आपल्या आत असणाऱ्या आज्ञाचक्राचा भेद करणे. यासाठी त्यांनी स्वतःला क्रूसावर टांगून घेतले. त्यानंतर परत जीवित झाले. हा चमत्कार वाटतो, पण परमेश्वरी कार्य काही चमत्कार नव्हे. याप्रमाणे त्यांनी दाखविले की, माणूस आज्ञाचक्राच्या बाहेर जाऊ शकतो.

प. पू. श्री माताजी - २५.१२.२०००

आज्ञाचक्र उघडण्यासाठी फाशीवर जाण्याचे कारण नाही आणि क्रूसावर लटकण्याचीही आवश्यकता नाही. आवश्यकता आहे अहंला क्रूसावर चढविण्याची. अहं अशी गोष्ट आहे ज्याच्यापासून लगेचच मुक्ती मिळू शकत नाही.

येशू ख्रिस्ताला अत्यंत तरुणपणातच क्रूसावर चढविले होते. त्यांचे क्रूसावर चढणे हे दर्शविते की, ते मृत्यूला घाबरत नव्हते आणि त्यांना हे माहीत होते की, ते पुनर्जन्म घेणार आहेत. हे कार्य त्यांना आज्ञाचक्राच्या माध्यमातून करावे लागले. आज्ञाचक्र खूप अरुंद आहे आणि या अरुंद मार्गातून त्यांना जायचे होते आणि त्यावर स्थापित व्हायचे होते.

प. पू. श्री माताजी - २२.०४.२००१

आज्ञाचक्रावर त्यांनी दोन मंत्र सांगितले ते बीज मंत्र होत,हम आणि क्षम. क्षम म्हणजे क्षमा करणे हा मोठा मंत्र आहे. जी क्षमा करु शकते तिचा अहंकार नष्ट होतो. येशूने दोन गोष्टी सांगितल्या. तुम्ही क्षमा करा आणि तुम्ही आत्मा आहात, आत्म्याला ओळखा.

प. पू. श्री माताजी - २५.१२.२०००

येशू ख्रिस्ताने आत्म बलिदान दिले. आपल्या जीवनाचे बलिदान देण्याचे कार्य स्वीकारुन नंतर पुनर्जिवित झाले. आज्ञाचक्राच्या संकुचित मार्गावरुन ते गेले. कारण तुम्ही लोक केवळ इतके ऐकून ठीक होऊ शकाल की, मी सर्वांना क्षमा करीत आहे. क्षमेचा गुण इतका शक्तिशाली आहे की, आपण त्याच्या माध्यमातून मृत्यूशीही लढू शकता तर मग क्षमा का करु नये?

आपल्या आज्ञाचक्राला खोलण्यासाठी येशूने पुनर्जन्म घेतला. आज्ञाचक्र अतिशय सूक्ष्मकेंद्र आहे. आपली बंधने आणि अहंमुळे प्राप्त विचारांमुळे लोकांची आज्ञा इतकी अवरोधित झाली होती की, त्याच्यातून कुंडलिनीचे वर जाणे असंभव झाले होते. येशू चैतन्याचे रुप होते म्हणून पुनर्जन्माचा खेळ रचला गेला. आम्ही हे समजले पाहिजे की, येशूच्या मृत्यूद्वाराही आमचा पुनर्जन्म प्राप्त झाला आहे आणि भूतकाळाचा मृत्यू झाला आहे. आमचे पश्चाताप आणि बंधने समाप्त झाली.

प. पू. श्री माताजी, इटली - १४.०४.१९९२

येशूख्रिस्ताने आम्हाला ही शिकवण दिली की, त्यांच्या हृदयात मानव प्राण्यांबद्दल प्रेम होते आणि ते पुनरुत्थानासाठी तयार करु इच्छित होते ते सहजयोग येण्याच्या आधी अवतरित झाले. त्यांनी हे कार्य केले नसते तर माझ्यासाठी हे प्राप्त करणे कठीण झाले असते अशाप्रकारे त्यांनी सहजयोगीसाठी परिस्थिती निर्माण केली. त्यामुळे तुमचे आज्ञाचक्र उघडले जाऊन आज्ञाचक्र पार केले. कुंडलिनीला वर नेऊन तुम्ही तुमच्या सहस्त्रारात आपल्या टाळू जवळील क्षेत्र उघडू शकता. त्यांनी विचार केला की, लोकांप्रति प्रेमाचे हेच अंग प्रत्यंग आहे. म्हणून येशूने हे कार्य केले आणि अनेक लोकांचे हित साधले.

प. पू. श्री माताजी - २२.०४.२००१

जर येशू ख्रिस्त या जगात आले नसते आणि स्वतःला आज्ञाचक्रात बसवून तारणाचा मार्ग, पुनर्जिवनाचा मार्ग सांगितला नसता तर सहजयोग साध्य झाला नसता. येशूचे आगमन अति आवश्यक होते.

प.पू. श्री माताजी - २५.१२.१९९०

सहजयोगात येशूख्रिस्त आम्हाला खूप मदत करतात. येशू आम्हाला हे सांगतात की, आम्ही आमचे आज्ञाचक्र उघडले पाहिजे, त्याच्यावर उठायला हवे. त्याला आपण तृतीय नेत्र म्हणतो (तिसरा डोळा). तिसरा डोळा उघडणे याचा असा अर्थ आहे की, तुमच्या आज्ञाचक्रावर येशू जागृत झाले आहेत. हाच तिसरा डोळा आहे.

येशू ख्रिस्त आपल्या आत साक्षीभावाची निर्मिती करतात आणि तुम्ही पूर्ण नाटकाचे दृष्य मात्र बनता. पूर्ण नाटक तुम्ही बघू शकता आणि आश्चर्यचकित होता की, तुम्ही किती शांत आहात. कशाप्रकारे निर्विचार चेतनेत आहात आणि प्रतिक्रिया न देता प्रत्येक गोष्ट बघू शकता. हे ते स्थान असे आहे जेथे आम्हाला हे मानावे लागते की, येशू ख्रिस्त आमच्या आज्ञाचक्रावर प्रकट झाले. तिथे त्यांचा पुनर्जन्म झाला. हे सर्व आमच्या आत घडून गेले आहे. मशीनच्या भागाप्रमाणे आमच्या आत सूक्ष्म तंत्र बनविले गेले आहे आणि आमच्या आत भिन्न चक्रे आणि ऊर्जा केंद्रे आहेत. हे अंतिम चक्र कठीणतम आहे. त्याला येशूने उघडले.

येशूख्रिस्ताने हे कार्य करण्याचे साहस केले आणि ते इतक्या सुंदर प्रकारे केले की आता आमच्यात अहं पाहण्याची योग्यता आहे. जेव्हा तुम्ही तुमच्या अहंला पाहता तेव्हा हैराण होता की, जे काही कार्य तुम्ही करता जितके काही करता आहात, तुम्ही थकणार नाही. थकता यामुळे की, तुमचा अहंकार नेहमी हेच सांगत राहतो की, अरे तुम्ही किती महान आहात, इतरांसाठी तुम्ही काय काय केले? त्यांच्यासाठी किती काम करता, तुम्हाला इतके काही मिळाले आहे. इ. इ. अशाप्रकारे आपला

अहंकार प्रत्येक वेळेस आमच्या खोट्या मोठेपणाबद्दल बढाया मारीत असतो आणि आम्ही स्वत:ला महान समजू लागतो.

या दुष्ट अहंकाराची दुसरी बाजू बंधन (conditioning) होय. याचाही अत्यंत सूक्ष्म संबंध आहे. येशूख्रिस्ताचे आम्ही आभारी असायला हवे कारण त्यांनी पुनरुत्थान कार्यरत केले, कारण प्रत्येक व्यक्तीला विवेकबुद्धी प्राप्त व्हावी. परमेश्वरी विवेक प्राप्त व्हावा. हा असा संघर्ष आहे. असा मार्ग आहे. ह्याचे सृजन त्यांनी केले. कारण अत्यंत सहजपणे आपण कठीण गोष्टी पार करु शकू. त्यामुळे आमचा अहंकार आणि बंधनांचा शेवट होईल.

प. पू. श्री माताजी - २२.०४.२००१

अहंकाराला बघण्याचा प्रयत्न करा आणि त्या वेळेस तुम्ही येशू ख्रिस्ताचे नाव घेतले तर अहंकार निघून जाईल. त्याच्या नामाच्या जपाने मात्र अहंकार दूर होईल.

आमच्या उत्थानासाठी येशू ख्रिस्त अत्यंत महत्त्वपूर्ण अवतार होते. जर ते स्वत: पुनर्जिवित झाले नसते तर आपल्याला उत्थान प्राप्त झाले नसते. येशूचे पुन्हा जिवंत होणे तुमच्या जीवनाप्रमाणे आहे.

आधी तुम्ही कसे होता आणि आज काय आहात. किती अंतर आहे, किती कायापालट आहे? त्यांच्या बलिदान आणि पुन्हा जन्मण्याने आम्हा सर्वांसाठी ही परिवर्तनाची अवस्था प्राप्त करण्याचा मार्ग तयार केला आहे.

पण ही अवस्था मानवासाठी वेगळी आणि येशूसाठी वेगळी आहे. येशू स्वत: पवित्रता आणि विशुद्धता होते. त्यांचे पुनर्जिवित होणे मात्र एक शारीरिक घटना होती. कारण त्यांना कायापालटची काही आवश्यकता नव्हती. त्यांना शुद्धीकरण करावे लागले नाही.

मृत्यूमुळे त्यांचे पुनर्जिवित होणे ह्या गोष्टीचे प्रतिक आहे की, मानवाचे अध्यात्माशिवाय जीवन, मृत्यू समान आहे. कारण माणूस पूर्णत्त्व, वास्तविकता

आणि पूर्ण सत्य समजल्याशिवाय सारे काही करीत राहतो. त्याचे प्रत्येक कार्य शेवटी (अंततोगत्त्वा) विनाशाकडे घेऊन जाते. इतपत की, या अवतारांनी चालविलेले धर्म पतनोन्मुख (घसरणीला लागले) आहेत. या अवतारांचे प्रतिनिधी (शिष्य) म्हणविणाऱ्या लोकांमध्येही धार्मिकतेचे नामोनिशाण मिळत नाही.

प. पू. श्री माताजी - इटली - ११.०४.१९९३

सहजयोगाद्वारे लोकांना पुनर्जिवित करा. त्यांचे पुनरुत्थान होवो, त्यांना आत्मप्रकाश द्या. एका अशा अवस्थेपर्यंत त्यांना घेऊन जा जिथे योग्य काय आहे हे समजेल. लोकांना प्रेम आणि करुणेचा अनुभव घेऊ द्या. असे जेव्हा होऊ लागते तेव्हा आमच्यातील तिसरी शक्ती कार्यान्वित होते.

येशू आपल्यावर आणि सर्व व्यापक शक्तीवर विश्वास व श्रद्धेचे अवतार होते. ही ज्योतिर्मय श्रद्धा होय. या श्रद्धेस समजायला हवे. त्यांना माहीत होते की, ते परमेश्वराचे पुत्र आहेत. याला त्यांनी कधी आव्हान दिले नाही. श्रद्धेच्या बाबत सहजयोगींनी येशू ख्रिस्ताप्रमाणे व्हायला हवे.

जेव्हा येशू ख्रिस्ताचा मृत्यू झाला सर्व पंचमहाभूते हादरली. येशू ख्रिस्त पंचमहाभूतांचे स्वामी होते. पंचमहाभूते खवळल्यामुळे धरणीकंप झाले, भूकंप झाले, महापूर आले, नैसर्गिक आपत्ती आल्या. पंचमहाभूतांनी त्यांचा मृत्यू जाणला. त्यांना वाटले की, इतकी महान शक्ती नष्ट केली गेली आहे. येशू पुन्हा जिवंत होणार आहे हे पंचतत्त्वांना माहीत नव्हते, पण नंतर ते यातून बाहेर आले.

येशूचा मृत्यू आपल्याला शक्ती देतो. आम्हाला मृत्यू नाही. आम्ही पुनर्जन्म घेतला आहे आणि पुनर्जिवन आमच्या बरोबर आहे. पण आम्हाला इथे स्थापित व्हायचे आहे. आपल्या सहजयोगाला आम्हाला स्थिर करावयाचे आहे. आमच्या ध्यानधारणेस स्थापित करायचे आहे. हीच महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. तुम्हाला इतरांना पुनरुत्थान प्राप्त करुन द्यायचे आहे. हेच महत्त्वपूर्ण कार्य आहे.

प. पू. श्री माताजी - २५.०४.१९९९

श्री येशू ख्रिस्ताने सर्व ब्रम्हांडाचे सृजन केले. ब्रम्हांड म्हणजे ग्रह. सूर्या पासून पृथ्वी ग्रहाची निर्मिती झाली त्यातून तुम्ही लोक उत्पन्न झाले. तुमच्या चक्रांमध्ये एका छोट्या विराटाची निर्मिती केली. ते तुमच्या आज्ञाचक्रात आहे. हे बलिदान अतिशय, अतिशय महत्त्वपूर्ण आहे. जरी ते स्थूल असले तरी ते सूक्ष्मही आहे. चेतनेला आज्ञा चक्राच्या मधून वर नेण्यासाठी ही घटना घडली. सूक्ष्मात जे काही घडणार असते त्याची अभिव्यक्ती याप्रमाणे स्थूलातही होते. जेव्हा येशू ख्रिस्ताला सुळावर चढविले तेव्हाही असेच झाले होते. परंतु पुन्हा येशूला क्रूसावर चढविता येत नाही असे वर्णन केले आहे. आता ते एकादश रुद्र बनले आहेत. शिवाच्या सर्व (अकरा रुद्रांची) शक्ती त्यांना देण्यात आल्या आहेत. अर्पण केल्या आहेत. जोपर्यंत त्यांचा जन्म झाला श्री कृष्णाने त्यांना आपल्या शक्ती प्रदान केल्या आणि ते महाविराट बनले. इतकेच नव्हे तर येशूला श्री कृष्णाच्या वरचे स्थान (आज्ञाचक्र) दिले गेले. जर आता ते अवतरित झाले तर त्यांच्याजवळ (येशू) शिवाच्या विध्वंसक शक्ती असतील. अकरा विध्वंसक शक्ती. यातील केवळ एक शक्ती सर्व ब्रम्हांडाला समाप्त करण्यासाठी पुरेशी आहे. आता त्यांना क्रूसावर चढवू शकत नाही. वेळ आली आहे की, त्यांचे स्वागत करण्यासाठी तयार व्हायला हवे. सर्व मूर्ख गोष्टी नष्ट करण्यासाठी ते येतील. त्यामुळे हा मधला वेळ तुमची उत्क्रांती आणि मोक्षासाठी खर्च व्हायला हवा.

प. पू. श्री माताजी - लंडन आश्रम - ०९.०४.१९८१

✹✹✹

येशू स्तुती (Lords Prayer) आज्ञाचक्राचा मंत्र आहे. आज्ञाचक्राचे दोन भाग आहेत. पहिला भाग आहे. हं आणि क्षम्. हं चा अर्थ आहे 'मी आहे' (अहं) आणि 'क्षम' म्हणजे 'क्षमा'. मी क्षमा करतो (I Forgive) आज्ञाचक्र जर पकडमध्ये असेल आणि तुम्हाला जाणवते की तुमच्या आत प्रति अहंकार आहे. तर तुम्ही म्हणायला हवे 'मी आहे' (I am I am) म्हणजे 'हं' आणि 'क्षम' प्रार्थनेचं बीजमंत्र आहेत. हे येशू प्रार्थनेचे बीज मंत्र आहेत. 'मी क्षमा करतो' (I Forgive) आमच्या आत जर 'अहं' असेल तर आपण म्हणायला हवे.

प. पू. श्री माताजी - ३०.०९.१९८१

## २. ज्ञानमूर्ती भगवान बुद्ध

भगवान बुद्ध तुम्ही जाणता गौतम होते. त्यांचा जन्म राजघराण्यात झाला होता. मोठे झाल्यावर त्यांनी माणसाची तीन प्रकारची दुःखे बघितली आणि ते संन्यासी झाले. ते या निष्कर्षावर आले की, इच्छांमुळेच ही तीन प्रकारच्या समस्या येतात. त्यांनी म्हटले की, माणसाने जर सर्व इच्छांचा त्याग केला तर तो सर्व समस्यांपासून मुक्त होईल. त्यांनी वेद, उपनिषद आणि इतर सर्व ग्रंथ वाचले. ते बऱ्याच संत व ज्ञानी लोकांकडे गेले पण त्यांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला नाही. खरेतर ते अवतार होते. अवतारांनाही वेगवेगळ्या प्रकारे आत्मसाक्षात्कार प्राप्तीपर्यंत पोहोचायचे असते. ज्या प्रकारे सर्व संभाव्य शक्तींना प्रकट व्हायचे असते. परंतु अवतारामध्ये यापेक्षा अधिक संभाव्य शक्ती असतात. जर दार उघडले तर त्या शक्ती अभिव्यक्त होतात.

बुद्धाने ही बाब जाणली की, मानवाची सगळ्यात मोठी समस्या त्याचा अहंकार आहे. आपल्या अहंमध्ये व्यक्ती एकानंतर दुसरे असे अतिचा हव्यास करीत जातो. म्हणून त्यांनी सदैव पिंगला नाडीवर कार्य केले आणि अहंकाराला नियंत्रणात ठेवण्यासाठी स्वतःला पिंगला नाडीवर स्थापित केले. स्थापना केली.

आज्ञाचक्र बघितले तर त्याच्या मध्यात येशू ख्रिस्त आहे. डावीकडे बुद्ध आहे उजवीकडे श्री महावीर. सर्वांना भगवान (Lord) म्हटले जाते. कारण ते या क्षेत्रांचे शासक आहेत. आज्ञेचे हे क्षेत्र तपस्येचे क्षेत्र आहे कारण या सर्वांनी आमच्यासाठी तप केले. आता आम्हाला तपस्या करण्याची गरज नाही. कारण या अवतारांनी आमच्यासाठी सर्व प्रकारची अपेक्षित तपस्या केली आहे. हेच कारण आहे की, सहजयोगींना तपस्या करावयाचे कारण नाही. आपल्या सुंदर चैतन्यलहरींबरोबर सहजयोगी अत्यंत सुंदर स्थितीत आहेत. त्यांना जंगलात जाण्याची, समाजापासून दूर जाण्याची, अशा जागी राहण्याची तिथे साप, विंचू, मुंग्या आणि जीवनासाठी इतर संकटे असतील, आवश्यकता नाही. तर तपस्येचे कार्य समाप्त झाले. भगवान बुद्धाने

आपल्या जीवन काळात सदैव सांगितले की, त्यागाची काही आवश्यकता नाही. कोणत्याही प्रकारचा त्याग अनावश्यक आहे.

भगवान बुद्धाबद्दल तुम्ही वाचले, त्यांच्या प्रारंभिक शिक्षणाबद्दल बघितले तर तुम्ही हैराण व्हाल की, कोणत्याही प्रकारचा त्याग अनावश्यक आहे.

त्यांनी स्वतः तपस्या केली कारण तो काळ तपश्चर्येचा होता. अत्यंत मनापासून त्या काळात त्यांना गरज होती. त्यामुळे त्यांनी या प्रकारचे जीवन अंगीकारले पण तपस्येत त्यांचा कधीच विश्वास नव्हता.

सत्य हेच त्यांच्या जीवनाचे सारतत्त्व आहे. सर्व प्रथम आपल्याला आपल्या प्रती इमानदार व्हावे लागते.

सहजयोगात मी बघते की लोक स्वतःप्रती इमानदार नाहीत, तर त्यांनी हे समजायला हवे की अहंकार एक अत्यंत चलाख गोष्ट आहे. इतकेच नव्हे तर अहंकार तुम्हाला इतरांच्या अहंचा दास बनविते. अहं काय आहे? अहंपासून व्यक्तिमत्त्व, चरित्र आणि स्वभाव मिळतो. म्हणून अहंकाराला नियंत्रणात आणण्यासाठी तुम्हाला भगवान बुद्धाची पूजा करायला हवी. पण सर्वप्रथम सिद्धांत आपल्या पावनतेचा सन्मान करणे हा आहे. भगवान बुद्धाचा सन्मान म्हणजे पावनतेचा सन्मान.

जगात तीन प्रकारचे लोक असतात. एक ज्यांना इतरांची काळजी नसते, एक असे की जे फक्त इतरांचीच चिंता करीत राहतात. श्री बुद्धाचा पहिला संदेश आहे स्वतःप्रती इमानदारी आणि इमानदारीचे पहिले क्षेत्र आहे स्वतःची पावनता.

माझे चित्त पावन असायला हवे. माझे जीवन पावन हवे. मी आत्मसाक्षात्कारी लोकांना प्रणाम करतो. 'धम्मं शरणं गच्छामी' म्हणजे मी धर्माला प्रणाम करतो म्हणजे विश्व निर्मला धर्मला. शेवटी त्यांनी सांगितले 'संघम शरणं गच्छामी' याचा अर्थ मी सामूहिकतेला प्रणाम करतो. या प्रकारे त्यांनी तिन्ही प्रकारच्या लोकांच्या समस्यांचे समाधान शोधले. सर्वप्रथम बुद्ध आहेत. बुद्ध म्हणजे आत्मसाक्षात्कार. सर्व आत्मसाक्षात्कारी लोकांचा सन्मान केला पाहिजे आणि त्यांना

समर्पित व्हायला हवे. 'बुद्धं शरणं गच्छामी' म्हणजे मी आत्मसाक्षात्कारी (प्रबुद्ध) संतांना शरण जातो.

यानंतर 'धम्मं शरणं गच्छामी' अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. आपण विश्व निर्मला. धर्मासाठी काय केले आहे? विश्व निर्मला धर्मासाठी जे काही आवश्यक आहे, ते तुमचे धन असेल किंवा तुमचे घर असेल, तुमच्या वस्तू असतील किंवा तुमच्या सेवा (परिश्रम) असतील. कोणत्याही प्रकारचे श्रम.

अहंकाराचे नियंत्रण तुम्ही बुद्धाच्या जीवनात बघू शकता. भगवान बुद्ध जे प्रकाश होते, करुणा होते, आनंद होते, ज्ञानमूर्ती होते. त्यांनी कधी कोणाची टीका केली नाही. सर्व भूते, राक्षस, असुरांची आलोचना करण्याचे भयानक काम त्यांनी माझ्यावर (माताजी) सोडले आहे. त्यांनी सरळ, सोपा, सुगम मार्ग अनुसरला. ते म्हणत या सर्वांशी कशाला भांडायचे. त्यांना त्यांच्या नशिबावर सोडून द्या.

आपल्या जीवनातून बुद्धांनी मला खूप सुंदर वस्तू दिल्या. जर खरोखरीच त्यांचे सर्व सारतत्त्व आत्मसात करायचे असेल तर आम्हाला आपल्या आत निर्लिप्ततेचा भाव निर्माण करावा लागेल. श्री बुद्धाने सांगितले होते पूजा करु नका, परमात्म्याविषयी बोलू नका, केवळ आत्मसाक्षात्काराबद्दल बोला. प्रथम लोकांना आत्मसाक्षात्कारी करा. ते म्हणाले कोणत्याही गोष्टीची पूजा करु नका कारण पूजेसाठी काही राहिले नाही. आम्ही त्या कठीण काळाचा विचार करायला हवा जेव्हा बुद्ध अवतार झाला.

भगवान बुद्धांनी आमच्यासाठी सहजयोगाची निर्मिती केली. त्यांच्या करुणेचा वर्षाव, कठोर परिश्रम, त्यांचे समर्पण आणि बलिदानाचा आनंद आम्ही लोक घेत आहोत.

प. पू. श्री माताजी - बार्सिलोना, स्पेन - २०.०५.१९८९

भगवान बुद्धांना वाटले की, माणसाने जीवनापेक्षा अधिक, जीवनाच्याही पुढे काही शोधले पाहिजे. अनेक लोकांप्रमाणे तेही सुखी जीवन, परिवाराचा त्याग करून सत्याच्या शोधात निघाले होते. सर्व काही त्याग करुन जेव्हा ते एका

वत्त्वृक्षाखाली रहात होते. तेव्हा आदिशक्तीने त्यांना आत्मसाक्षात्कार दिला. ते विराटाचे विशिष्ट अंश होणाऱ्यांपैकी एक होते. म्हणून त्यांना आत्मसाक्षात्काराची प्राप्ती झाली.

सहजयोगात तपस्येचा अर्थ आहे, ध्यानधारणा. तुम्हाला मुंडन करायचे नाही, अनवाणी चालायचे नाही, भुकेले रहायचे नाही (उपवास नाही) की गृहस्थ जीवनाचा त्याग करायचा नाही.

बुद्धाचा अर्थ आहे बोध. म्हणजेच सत्याला आपल्या मध्यनाडी तंत्रावर जाणणे. तुम्ही सर्वजण त्याग न करता बुद्ध झाले आहात.

श्री बुद्धाच्या चार गोष्टी तुम्हाला प्रातःकाळी सांगितल्या पाहिजेत. प्रथम बुद्धं शरणं गच्छामी, मी स्वतःला आपल्या प्रकाशित चित्ताप्रती समर्पित करतो. नंतर त्यांनी सांगितले, धम्मं शरणं गच्छामी म्हणजे मी स्वतःला धर्माप्रति समर्पित करतो. हा काही चुकीचा धर्म नाही. यात विकृती नाही. सोप्या भाषेत सांगायचे तर मी स्वतःला आपल्या धर्मपरायणतेला समर्पित करतो. तिसरी बाब जी त्यांनी सांगितली 'संघं शरणं गच्छामी' मी स्वतःला सामूहिकतेप्रति समर्पित करतो. आपण पूर्णाचे अंग प्रत्यंग आहात या बाबीचे ज्ञान तुम्हाला असायला हवे. याप्रकारे कार्ये होतात; आपण नकारात्मक आणि सकारात्मक, अहंकारी आणि नम्र व्यक्ती ओळखू शकतो. आम्ही खऱ्या सहजयोगीला आणि सहजयोगी म्हणविणाऱ्या व्यक्तींना ओळखू शकतो. अयोग्य व्यक्तींचा त्याग करतो. त्यांची संगत सोडतो.

प. पू. श्री माताजी, शुडीकँप, इंग्लंड - ३१.०५.१९९२

## ३. श्री महावीर

श्री महावीरांचा जन्म अशा वेळेस झाला जेव्हा ब्राम्हणवादाने अत्यंत भ्रष्ट, स्वेच्छाचारी आणि उच्छृंखल रुप धारण केले होते. श्री कृष्णानंतर लोक स्वेच्छाचारी, अत्यंत लंपट आणि व्यभिचारी झाले. लोकांच्या अशा उग्र स्वेच्छाचारी आचरणाच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी या काळात भगवान बुद्ध व भगवान महावीराने जन्म घेतला.

श्री महावीर एक राजा होते. त्यांनी आपला परिवार, राज्य व वैभवाचा त्याग करुन संन्यास घेतला. त्यांच्या अनुयायींनाही अशाच प्रकारचा त्याग करण्यास सांगितले. त्यांना मुंडण करुन, अनवाणी चालावे लागे. ते केवळ तीन जोडी कपडे ठेवू शकत होते. सूर्यास्तापूर्वी त्यांना जेवावे लागत होते. त्यांना फक्त पाच तास झोपण्याची परवानगी होती. सतत ध्यानात राहून आत्मोत्थानात प्रयत्नशील रहावे लागे. पशुवध आणि मांस खाणे त्यांच्यासाठी वर्जित होते. कारण त्याकाळी लोक मांस भक्षण करुन अति आक्रमक झाले होते.

श्री महावीर सेंट मायकलचे अवतार होते. सेंट मायकल ईडानाडीवर राहतात. मूलाधार ते सहस्त्रारापर्यंत या नाडीची देखभाल करतात. डाव्या बाजूचे असल्यामुळे श्री महावीरांनी लोकांना वाईट कृत्ये करु नयेत म्हणून इशारा दिला. त्यासाठी त्यांनी नरकाचे अत्यंत स्पष्ट वर्णन केले. महावीरांनी लोकांना कर्म कांडापासून वाचविण्यासाठी परमेश्वराचे निराकारतत्त्व समजावले. इतक्या कठीण नियमांमुळे व्यक्तीसाठी आत्मसाक्षात्काराची आशा करणे दुष्कर कार्य होते. श्री महावीरांच्या अनुयायांनी जैन मत चालविले. जैनचा उद्‌भव 'ग्ना' म्हणजे ज्ञान प्राप्ती होय. मोजेसप्रमाणे श्री महावीरांचे नियमही कठोर होते. त्यांच्या सिद्धांतांचा अतिरेक केला गेला.

श्री महावीरांबद्दल एक किस्सा आहे. ध्यानावस्थेत त्यांचे धोतर एकदा झाडीत अडकले. म्हणून त्यांना अर्धे धोतर फाडून तिथेच टाकावे लागले. अर्धे धोतर

गुंडाळून ते चालू लागले तेव्हा कृष्ण भिकाऱ्याच्या वेशात महावीरांची परीक्षा घेण्यासाठी आले. श्री महावीराने भिकाऱ्याला दयेपोटी गुंडाळलेले धोतरही देऊन टाकले. स्वतःला पानाने झाकून घरी गेले. परंतु आज त्यांचे तथाकथित अनुयायी या गोष्टीचा आधार घेऊन भारतात निर्वस्त्र फिरतात. "मला विश्वास आहे तुम्ही सर्व त्या निम्नावस्थेपर्यंत न जाता आत्मानुशासन अवश्य शिका. याशिवाय पूर्ण ज्ञान प्रेम आणि आनंदाच्या गहनतेपर्यंत पोहोचू शकत नाही.

नक्कीच तुम्हाला भगवान महावीराच्या सीमेपर्यंत जाण्याची आवश्यकता नाही. कारण नशिबाने मी तुम्हाला आत्मसाक्षात्कार प्रदान केला आहे. तरीही भौतिक वस्तूंकडे परत येऊ नका.

प. पू. श्री माताजी - १६.०६.१९९०

सहजयोगात आपण भगवान महावीरांना भैरवनाथाचा अवतार मानतो. त्यांनी इमान हुसेनच्या अवतारातही जन्म घेतला. सेंट मायकेलला सेंट जॉर्ज (लंडनचे रक्षक देवदूत) ही म्हणतात.

आमचे वर्तन, आचरण आणि संस्कृती यामध्ये सहजयोगाची अभिव्यक्ती व्हायला हवी. डाव्याबाजूने भक्ती आणि उजव्या बाजूने सृजन, नवनिर्मितीची अभिव्यक्ती होऊ शकते. आपल्याला भक्ती वाढवली पाहिजे. हे भगवान महावीराचे कार्य आहे.

प. पू. श्री माताजी - ०४.०४.१९९३

आज आपण भगवान महावीराचा जन्मदिवस साजरा करीत आहोत. भगवान महावीर भैरवनाथाचे अवतार आहेत. तुम्ही त्यांना सेंट मायकेलही म्हणू शकता आणि हनुमान पिंगला नाडीवर सेंट गॅबरील आहेत. सेंट मायकेल इडा नाडीवर आहेत. ते देवदूत होते पण मानव रुपात प्रकटले. शरीराच्या डाव्या भागाचे रहस्य आणि कार्यप्रणालीचा त्यांनी शोध घेतला.

उजव्या भागापेक्षा शरीराच्या डावा भाग जास्त गुंतागुंतीचा असतो. तुम्ही शरीराच्या डाव्या भागात नाड्या बघितल्या. त्या एका पाठोपाठ बनविल्या गेल्या

आहेत. शास्त्रात याचे वर्णन आहे आणि त्यांना नावे दिली आहेत. या सात नाड्या आपल्या भूतकाळाची काळजी घेतात. उदाहरणार्थ, प्रत्येकक्षण भूतकाळात परावर्तित होत असतो. प्रत्येक वर्तमानक्षण भूतकाळ बनतो. आमचे वर्तमान जीवन आणि आमच्या पूर्वजीवनाचा भूतकाळ आहे. आमच्या सृजनापासून आजपर्यंत आमच्या भूतकाळाची रचना आपल्या आत शाबूत असते. त्यामुळे मनोदैहिक (मानस शारीरिक) रोगांना शरीराच्या डाव्या बाजूस दिसणारी तत्त्वे प्रोत्साहन देतात. समजा एखाद्या व्यक्तीला लीव्हरचा आजार झाला आहे आणि अचानक डाव्याबाजूने त्याच्यावर आक्रमण झाले विशेषत: मूलाधार किंवा डावी नाभीकडून. मूलाधार हे असे चक्र आहे ज्याला ईडानाडी डाव्या बाजूने आणि डाव्या स्वाधिष्ठानाशी जोडते. मूलाधाराची समस्या मनुष्याच्या शक्तीबाहेरची आहे. डाव्या बाजूस असलेल्या चक्रांपैकी कोणावरही आक्रमण झाले तर (मनोदैहिक) मानस शारीरिक रोग होतात.

डाव्या बाजूच्या समस्यांच्या ज्ञानामुळे मनोदैहिक रोग (मानस शारीरिक रोग) ठीक होतात. मी डाव्या बाजूस असाध्य का म्हटले? कारण जेव्हा तुम्ही डाव्याबाजूस चालू लागता तेव्हा ते एका रेषेत चालते. परंतु हे खालच्या बाजूस जाते. पण उजव्या बाजूची गतीवर आहे. म्हणून अधोगती होऊन हे खाली वर्तुळ (कुंडल) करते. कुंडले तुमच्या आत जातात तुम्ही त्याच्यात हरवून जाता. परंतु दुसऱ्याभागाची (उजव्या) गती वर असणे आणि त्यात कमी वर्तुळे असल्यामुळे यातून बाहेर पडणे सुगम सोपे असते. म्हणून कोणत्याही कारणामुळे (भूतकाळाविषयी खूप विचार करीत राहिल्याने स्वत:साठी रडत राहणे किंवा सारख्या तक्रारी करणे). जे लोक डाव्या बाजूस झुकले आहेत त्यांना ठीक करणे उजव्या बाजूच्या (आक्रमण) लोकांपेक्षा कठीण असते. उजव्या बाजूचे लोक दुसऱ्यांसाठी आणि डाव्या बाजूचे लोक आपल्यासाठी त्रासदायक असतात.

अशाप्रकारे भगवान महावीराने डाव्या बाजूचा उत्तम शोध घेतला. नि:संदेह या विषयी त्यांना माहिती होती. त्यामुळे त्यांनी विस्तृतपणे सांगितले आहे की, जी व्यक्ती डाव्याबाजूस झुकते त्यांच्या बाबतीत काय होऊ शकते. त्यांनी सात प्रकारच्या

नरकाचे वर्णन केले आहे. ते इतके भयानक आहे की, तुम्हाला सांगू शकणार नाही. इतके भयानक, क्रूर, घाणेरडे, घृणास्पद आहे की, एका ह्या चुकेची, पापाची ही सजा आहे असे समजले तर माणसाला स्वत:ची किळस वाटते. महावीराने हे सर्व सांगितले. डाव्या आणि उजव्या बाजूस जाणाऱ्या लोकांना कोणता दंड मिळेल हे त्यांनी विस्तृतपणे सांगितले. त्यांनी उजव्या बाजूबद्दल सांगितले परंतु ते डाव्या बाजू इतके विस्तृत नव्हते.

पंचतत्त्वामुळे शरीरात आत्म्याचे सृजन झाले. उदाहरणार्थ, पृथ्वीतत्त्वाचा कारणात्मक आत्मा खूप कमी जाणवतो. हा कारणात्मक पिंड आणि चक्रांपासून बनली आहे. सूक्ष्मतत्त्व (पॅरा सिम्पथॅटिक) वर याचा प्रभाव असतो. बाहेरुन हे पाठीचा कण्या (स्पायनल कॉर्ड) वर बसते आणि सूक्ष्मनाड्यांना गतिमान करते. हिचा संबंध प्रत्येक चक्राशी आहे. मृत्यूनंतर आमच्या कुंडलिनीसह आमचा आत्मा आणि जीवात्मा (spirit) आकाशात निघून जाते. हाच आत्मा आमच्या अस्तित्त्वासाठी उरलेल्या क्रियांचे नव्या अस्तित्त्वासाठी मार्गदर्शन करते. आतापर्यंत केलेली सर्व कार्ये आत्म्यावर लिहिलेली असतात. आता विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की, कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूपश्चात त्याचा आत्मा गोल गोल आकारात दिसतो. ही वर्तुळे (छल्ले) जास्त असतात किंवा एकही असू शकते. मी सांगितले म्हणून त्यांनी हे छल्ले सूक्ष्मदर्शकाखाली बघितले आणि त्यांना हे दिसले की, प्रत्येक पेशी प्रतिबिंबित आहे. पेशींना प्रतिबिंबीत करणारा अंश जो पेशीच्या एका बाजूस असतो तोही आत्म्यास प्रतिबिंबीत करतो. मुख्य आत्मा मागे राहूनही या पेशीची देखभाल करणाऱ्या प्रतिबिंबीत आत्म्याला चालवते. आता परावर्तका (रिफ्लेक्टर) वर त्यांना दिसले की या प्रकारची सात वर्तुळे आहेत. सात वर्तुळे - आत्मा आठवा. (सातचक्रे आणि मूलाधार).

महावीरांनी हे शोधले की, मृत्यूनंतर काही आत्मे थोड्याच दिवसात पुनर्जन्म घेतात. हे अत्यंत साधारण प्रकारचे लोक असतात. यांप्रकारे त्यांनी मृत्यूपरांत

आत्म्यांचे वर्ग केले. दुसऱ्या प्रकारचे आत्मे काही काळ सामूहिक अवचेतनेत राहिल्यानंतर पुन्हा जन्म घेतात. ते लक्ष्यविहिन, व्यर्थ आणि साधारण प्रकारचे लोक असतात. पण काही आत्मे मृत्यूनंतर हवेत लटकत राहतात आणि त्यांच्या अपूर्ण इच्छा पूर्ण करु शकणाऱ्या व्यक्तीची वाट बघत राहतात. जसे एक दारुडा माणूस दुसरा दारुडा माणूस शोधून काढतो. जिवंत माणसाला जशी दारुची सवय जडते काही दारुडी भूतआत्मे त्या माणसात प्रवेश करतात आणि त्या माणसाला पक्का दारुबाज बनवू शकतात. मला एका बुटक्या बाईची गोष्ट आठवते. ती माझ्याकडे आली आणि म्हणाली की, मी माझ्यामुळेच अतिशय त्रासले आहे. तिच्या पतीने सांगितले की, ती बाई कधी कधी दारुची पूर्ण बाटली पाणी न घालता पिऊन टाकते. मी तिच्याकडे बघितले की, इतकी छोटी बाई इतकी जास्त दारु कशी पिऊ शकते? तिच्यावर बंधन घालून मी बघितले की, एक भला मोठा निग्रो माणूस तिच्यामागे उभा होता. तेव्हा मी तिला विचारले की, तूं कोणा निग्रोला ओळखतेस का? उसळून एकदम तिने विचारले तुम्ही त्याला बघितले आहे का? तोच पितो. मी नाही पीत. त्यानंतर मी तिला बरे केले आणि तिची दारुही पूर्णपणे सुटली.

जेव्हा तुम्ही एखाद्या सवयीत अडकू लागता तेव्हा तुमचे तुमच्यावरचे नियंत्रण कमी कमी होत जाते. एखादा प्रेतात्मा तुम्हाला पकडतो, तुमच्यात राहू लागतो आणि तुम्ही समजू शकत नाही की या सवयीतून कशी सुटका करुन घ्यावी. सहजयोगात जेव्हा कुंडलिनी उठते हे भूत आत्मे तुम्हाला सोडून देतात. तुम्ही बरे होता. महावीरांनी हे सर्व सांगितले नाही. त्यांनी फक्त नरकाविषयी सांगितले. जीवनातील पापे - पापांच्या दंड स्वरुपात मिळणारे नरक आणि त्या नरकातील यातना याविषयी त्यांनी सविस्तर चर्चा केली आहे. आपल्या हिताबद्दल विचार करणाऱ्या मनुष्यासाठी नरकाचा विचार करणे किती भयभीत करणारी गोष्ट आहे.

अवतार जेव्हा जन्म घेतात तेव्हाच नरकीय राक्षसही आवश्य जन्मतात. ते गुरु स्वरुपातही जन्म घेऊ शकतात. आजकाल आम्ही बघतो गुरुस्वरुपात येऊन ते माणसांना कसे पथभ्रष्ट करतात. आम्हाला गतिहीन करण्यासाठी आमची डावी बाजू

आणि डाव्या स्वाधिष्ठानाचा उपयोग करतात. भूतबाधाग्रस्त व्यक्ती लहरींचा अनुभव घेऊ शकत नाही. त्या व्यक्तीला अतिशय त्रास होतो. सहजयोगात आपण महावीराचे नाव घेतो. ईडा नाडीवर भ्रमण करीत ते प्रतिअहंकारावर थांबतात. सहजयोगात आल्यानंतर ते मनुष्याला नियंत्रित करण्यासाठी शुद्ध करण्यासाठी सर्व आवश्यक कामे करतात.

त्यांना महावीर का म्हटले गेले? वीर म्हणजे बहादूर, पराक्रमीव्यक्ती, केवळ अशी पराक्रमी व्यक्तीच भयंकर राक्षस आणि सैतानांचा नाश करु शकते. आमच्या आतील आसुरी प्रवृत्तींना पळवून लावण्यासाठी मानवी शरीरात प्रवेश करु शकतो. महावीराच्या मदतीशिवाय आपण हे कार्य करु शकत नाही. तुम्ही त्यांना कोणत्याही नावाने बोलावू शकता. पण मानव असल्यामुळे ते महावीर आहेत. हे सर्व त्यांच्यामुळेच शक्य आहे. हे त्यांचे फार मोठे वैशिष्टय आहे. नरकाबद्दलच्या सर्व कल्पना, पुराणात त्याचे वर्णन आहे सत्य आहे आणि अस्तित्त्वात आहे.

शाकाहाराची लाट अनावश्यक आहे, हेच महावीराने आपल्या जीवनात सांगितले. शाकाहाराचा सिद्धांत इतक्या चुकीच्या पद्धतीने पसरला की, मी आता लोकांना तो पुर्णपणे सोडून द्यायला सांगितले आहे. आता बघुया की, वास्तविक महावीरांची काय इच्छा होती? प्रोटिन्स घेतल्याशिवाय आपण भूतांशी लढू शकत नाही. जैनांच्या मते शाकाहार सिद्धांत नेमीनाथाने आणला. नेमीनाथाच्या विवाहप्रसंगी इतक्या बकऱ्या बकरे कापले की, त्यांना घृणा उत्पन्न झाली. या शरमेमुळे त्यांनी म्हटले मी मांस खाणार नाही. अशाप्रकारे जैन धर्मात शाकाहाराचा प्रवेश झाला. तो आजपर्यंत चालू आहे. हे अत्यंत नीरस लोक आहेत. धनामागे ते पळताहेत. त्यांचे आचरण विशिष्ट प्रकारचे असते. महावीराच्या सर्व उपदेशानंतरही अशाप्रकारचे त्यांचे शिष्य आहेत. बरे आहे सहजयोगात असे काही करीत नाहीत. तुम्हाला जे सांगितले आहे ते समजून घ्या. कार्यपद्धती आणि पूर्ण विषयींचे ज्ञान तुम्हाला आहे. एखादा तर्क किंवा जाहिरातीच्या आहारी जाऊन चुकीच्या रस्त्याला जाणे योग्य नव्हे.

मी जे सांगितले त्याचा अतिरेक करु नका किंवा तुच्छही समजू नका. मी जेव्हा तुम्हाला हे सांगते. तेव्हा तुम्ही तुमच्या स्वभावानुसार जे योग्य ते घ्या. जे तुम्हाला संतुलन देईल, जे सघन करील तेच तुम्ही उचला. संतुलनासाठी तुम्ही महावीराचा विचार करीत असाल तर श्री हनुमानाबद्दलही विचार करा. दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत.

प. पू. श्री माताजी श्री महावीर पूजा, पर्थ - २८.०३.१९९१

## ४. श्री एकादश रुद्र

आपण हे समजावून घेऊया की, एकादश रुद्र काय आहे? सृष्टीच्या विकासास विरोध करणारी, उत्क्रांतीचा विरोध करणारी, नवनिर्मिती विरोधी स्वभाव कायमचा नष्ट करु शकणारी कोणती शक्ती आमच्या शरीरात आहे?

सर्व पैगंबरांनी एकादशरुद्राची भविष्यवाणी वर्तविली आहे. त्यांनी म्हटले की एकादश (आकरा) अवतार येतील आणि सर्व आसुरी शक्ती, परमात्म्याविरोधातील कारस्थाने नष्ट करतील. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट ही आहे की, एकादश केवळ कलियुगात, आधुनिक युगातच कार्य करील. यापूर्वी हा गतिमान नव्हता. आता सहजयोगाच्या क्षेत्रात राक्षसी शक्ती प्रवेश करीत नाहीत. इथे तुम्ही अत्यंत प्रसन्न असता. तुमच्या मस्तकावर चहूबाजूने या क्षेत्राची देखभाल करण्यासाठी एकदश रुद्र उभे आहेत. ते सर्व बघत असतात. ते पहारेदार आहेत. कोणीही तुम्हाला इजा पोहोचवू शकत नाही. अत्यंत शानदारपणे तुम्ही सहस्त्रारात प्रस्थापित आहात. कोणीही तुम्हाला बोट लावू शकत नाही. तुम्हाला कलंकित करु शकत नाही. एकादश रुद्र अत्यंत चपळ आहे आणि त्याचे अनेक पैलू आहेत. प्रत्येक देवतेचे अनेक पैलू असतात. हे पैलू या क्षेत्राला नेहमी प्रकाशित करीत असतात कारण कोणत्याही बाह्य शक्तीने यात प्रवेश करु नये.

सहस्त्राराच्या क्षेत्रात जेव्हाही कोणती बाह्य शक्ती प्रवेश करण्याचा प्रयत्न करते तेव्हा हे त्वरित कार्यान्वित होतात आणि त्या व्यक्तीला इतका त्रास देतात की, तुम्ही हैराण व्हाल. मात्र या शक्तीला विकसित करण्यासाठी पूर्ण निष्ठा आणि समजून उमजून ध्यानधारणा करणे आवश्यक आहे.

प. पू. श्री माताजी - ०८.१०.१९८८

सहस्त्रारात प्रवेश करण्याच्या मार्गात सर्वांत प्रथम जो अडथळा येतो तो म्हणजे एकादशरुद्र. अकरा संहारक शक्ती इथे विद्यमान असतात. पाच एकीकडे, पाच दुसरीकडे आणि एक मध्यात. आमच्याकडून घडलेल्या दोन प्रकारच्या पापांमुळे

या कार्यात अडचण येते. जर आपण आपला माथा चुकीच्या (मिथ्या) गुरुपुढे नमवला आणि चुकीचा मार्ग अनुसरला तर उजव्या बाजूच्या पाच रुद्रशक्तिमध्ये दोष निर्माण होतो. जर तुम्ही चुकीच्या माणसाकडे किंवा परमेश्वराविरुद्ध वागणारा माणूस आहे आणि तुम्ही त्याला घाबरत असाल तर उजव्या बाजूस समस्या निर्माण होते. जर तुम्ही असा विचार करीत असाल की, मी स्वत:ची देखभाल स्वत: करु शकतो मीच माझा गुरु आहे, मला कोण शिकवणार? मी कोणाचे काही ऐकू इच्छित नाही आणि माझा देवावर विश्वास नाही. अशा तुमच्या भावना असतील तर तुमच्या उजव्या नव्हे डाव्या बाजूत दोष येतील. कारण तुमचा उजव पार्श्वभाग फिरुन उजव्या बाजूस आणि उजवा भाग डाव्या बाजूस जातो. त्यामुळे ह्या दहा गोष्टी आणि एक विराट विष्णुचे स्थान. कारण आमच्या पोटातही दहा गुरुंचे स्थान आहे. या सर्वा मध्ये दोष येतात. त्या वेळेस साधनेतही चुका होतात आणि हे दहा गुरु त्यांची स्थाने बदलतात. तेव्हा तुम्ही एकादश रुद्राच्या पकडीत येता. जेव्हा या प्रकारची बाब तुमच्या आत होते, तेव्हा मी सांगितल्याप्रमाणे कॅन्सरप्रमाणे असाध्य रोगाला बळी पडता. चुकीच्या व्यक्तीसमोर नतमस्तक होण्यामुळे हे आजार होण्याची शक्यता मोठी असते.

जे लोक विचार करतात की, मी खूप चांगला आहे. देवाला मानीत नाही. नास्तिक होतात अशा लोकांच्या डाव्या एकादश रुद्रात पकड अत्यंत त्रासदायक असते. कारण अशा लोकांना शारीरिक रुपात उजव्या बाजूला (पिंगला) नाडीचा त्रास जसे हृदयरोग आणि उजव्या बाजूचे अन्य त्रास होतात.

त्यामुळे कुंडलिनीच्या सहस्त्रार प्रवेशातील मुख्य अडचण असते एकादश रुद्राची. जो भवसागर (void) मधून येतो. जो मेधा म्हणजे मेंदूच्या पृष्ठभागाला (plate) झाकतो. याप्रमाणे टाळूक्षेत्रा (Limbic Area) मध्ये प्रवेश करु शकत नाही. जे लोक अयोग्य गुरुकडे जात होते, योग्य मार्गावर आले, सहजयोगात

आत्मसमर्पण केले, कमतरतांचा स्वीकार केला आणि म्हटले की मी स्वतः गुरु आहे. तर ते ठीक होऊ शकतात आणि जे लोक स्वतःला खूप मोठे समजतात मी देव किंवा देवदूताला मानीत नाही हे सर्व ईश्वरविरोधी लोक आहेत पण त्यांनी स्वतःला विनम्र बनविले, मध्यमार्ग (सुपरकॉन्शस) स्वीकारला, परमेश्वरी राज्यात प्रवेशाचा एकमात्र मार्ग म्हणजे सहजयोग हा विचार करुन सहजयोगात प्रवेश केला तर ठीक होऊ शकतात.

प. पू. श्री माताजी - दिल्ली - ०४.०२.१९८३

जर सहजयोगविरोधी नकारात्मक लोक आणि सर्व नकारात्मकता यांच्या विरोधात तुम्हाला राग येत असेल तर ठीक आहे. हे विचार जेव्हा परिपक्व होतील तेव्हा तुम्ही स्वतः एकादशाची शक्ती बनाल. जी व्यक्ती तुम्हाला अपमानित करील किंवा हानी पोहोचविण्याचा प्रयत्न करील ती नष्ट होईल. व्यक्ती अशी हवी ती स्वतः एकादश बनू शकेल. अशा लोकांना कोणी स्पर्शही करु शकत नाही. पण असे लोक करुणा आणि क्षमेने परिपूर्ण असतात.

एकादश रुद्र कसे कार्य करतो हे आम्हाला माहीत हवे आणि सहजयोगींनी स्वतःसह एकादशरुद्र व्हायला हवे. ही शक्ती स्वतःत निर्माण करण्यासाठी व्यक्तीने स्वतःमध्ये निर्लिप्तभावाची अगाधशक्ती विकसित करायला हवी. म्हणजे नकारात्मकतेशी अजिबात संबंध नसणे. उदाहरणार्थ नकारात्मकता माता, पिता, भाऊ - बहीण, मित्र आणि अन्यव्यक्तींशी येऊ शकते.

कोणत्याही चुकीच्या प्रकारचे तादात्म्य तुमच्या एकादश शक्तीला नष्ट करु शकते. तुम्ही मेंदूपासून - डोक्याने, विचाराने हे समजले पाहिजे की, सहजयोग काय आहे. त्यामुळे विवेकी वृत्तीने तुम्ही सहजयोग समजावून घ्याल.

प. पू. श्री माताजी - एकादश रुद्र पुजा - १९८४

एकादश रुद्रात अकरा विध्वंसक शक्ती आहेत. आम्ही म्हणतो दहा दिशा आहेत आणि अकरावी ही स्वतः अशा अकरा शक्ती होतात. दहा बाहेरील शक्ती

आणि एक आतील शक्ती. यांचा प्रकोप सहजयोगाला विरोध करण्यावर होऊ शकतो. कोणीही तुम्हाला त्रास देण्याचा प्रयत्न केला तर ही शक्ती कार्य करील.

जितक्या काही भयानक शक्ती आज कार्यरत आहेत त्यांना पूर्णपणे नष्ट करता येऊ शकते. जर आपण आपल्यात एकादश रुद्र विकसित केला तर हे शक्य आहे. एक सहजयोगी हजारो आसुरी शक्तींना नष्ट करु शकतो मात्र या राक्षसी शक्ती एकाही सहजयोगीला हानि पोहोचवू शकत नाही. खरेतर तुमच्यासमोर हे आसूर शक्तिहीन आहेत.

प. पू. श्री माताजी, व्हीएन्ना - ०८.१०.१९८८

एक लक्षात ठेवा प्रेमाच्या दिव्यशक्तीसमोर सर्व असत्य डळमळते. आसुरी शक्ती काही काळ उन्मत्त होतील परंतु शेवटी त्यांचे पतन होईल. हे सर्व माझे कार्य आहे. माझ्यावर सोडा.

प. पू. श्री माताजी - ०९.०५.१९९५

आता आपल्याला कलियुगात संपूर्ण नकारात्मकता नष्ट करण्यासाठी या एकादशरुद्र शक्तींना आवाहन करायचे आहे आणि प्रार्थनाही करावयाची आहे की, जर आमच्यात काहीही नकारात्मकता असेल तर ती नष्ट होवो. सहजयोगविरोधी नकारात्मकता नष्ट होवो. आमच्या आचार, विचारात काही नकारात्मकता असेल तर ती पण नष्ट होवो.

प. पू. श्री माताजी - ०८.१०.१९८८

एकादशरुद्र पूर्ण विध्वंसक शक्ती आहेत. यासर्व श्री गणेश, ब्रम्हा, विष्णु व महेश यांच्या विध्वंसक शक्ती आहेत. माता आदिशक्ती, भैरवनाथ, हनुमान, कार्ति केय, सदाशिव यांच्या विध्वंसक शक्ती आहेत. याशिवाय एकादशरुद्र हिरण्यगर्भ याचीही विध्वंसक शक्ती रुद्रात आहे.

जेव्हा ही शक्ती गतिमान होते. तेव्हा प्रत्येक अणूचा विस्फोट होतो. पूर्ण अणू ऊर्जा विध्वंसक होते. तर पूर्ण विध्वंसक शक्ती एकादश रुद्र! ही शक्ती अत्यंत शक्तिशाली आणि विस्फोटक असली तरी आंधळी नाही. ही अत्यंत विवेकशील आहे

आणि अत्यंत कौशल्यपूर्वक गुंफलेली आहे. सर्व चांगल्या गोष्टी सोडून ती फक्त सर्व वाईट गोष्टींवर आक्रमण करते. योग्य वेळी, योग्य ठिकाणी आघात करते. एकादश रुद्राची दृष्टी एखाद्या वाईट व्यक्तीवर पडली आणि त्या व्यक्तीसमोर दिव्य सकारात्मक गोष्ट आली तर त्या दिव्यत्त्वाला टाळून ही शक्ती वाईट व्यक्तीवर हल्ला करते. इतक्या कोमलतेने आणि विचारपूर्वक ही शक्ती कार्य करते.

ती अत्यंत तेजस्वी आहे, कष्टदायक आहे. एका झटक्यात गळा कापीत नाही. हळू हळू हे काम करते. भयानक कष्ट (कॅन्सर, महारोग) एकादश रुद्राची अभिव्यक्ती आहे. याप्रमाणे हळूहळू एकादश रुद्र माणसांना खाऊन टाकतो.

एकादश रुद्र गतिमान झाल्यावर शेवटी सदाशिवाच्या क्रोधामुळे पूर्ण विनाश होतो. तेव्हा पूर्ण प्रलय येतो.

प. पू. श्री माताजी, एकादश रुद्र पूजा - १९८४

रुद्र शिवाची प्रलयशक्ती आहे. क्षमा प्राप्त केल्यावर आत्मसाक्षात्कार प्राप्त झाल्यावर लोक अपराध करु लागतात तेव्हा शीव संवेदनशील आणि क्रुद्ध होतात.

जेव्हा त्यांच्या संहारक शक्ती वाढतात तेव्हा आपण म्हणतो की, आता एकादश रुद्र कार्यक्षम झाला. जेव्हा स्वयं कल्की कार्य करतील म्हणजे पृथ्वीवर नकारात्मकतेचा संहार होईल चांगुलपणाचे रक्षण होईल तेव्हा एकादश रुद्राची अभिव्यक्ती होईल.

प. पू. श्री माताजी, एकादश रुद्र पूजा, इटली - चैतन्य लहरी १९९३

❋ ❋ ❋

## सहस्त्रार चक्र

## सहस्त्रार स्वामिनी – महामाया – श्री माताजी -- श्री निर्मलादेवी

असे म्हटले आहे की, सहस्त्रारावर जेव्हा देवी प्रगट होईल तेव्हा ती महामाया होईल. आजच्या जगात याशिवाय कोणत्याही अन्य रुपात पृथ्वीवर येणे शक्य आहे काय? कोणताही दुसरा अवतार भयंकर कठीण परिस्थितीत अडकला जाईल कारण कलियुगात अहंकारावर स्वार झालेला मानव सर्वोच्च आहे. ते अतिशय मूर्ख आहेत. कोणत्याही दैवी व्यक्तित्त्वाला सर्व प्रकारे हानी करु शकतात किंवा हिंसा करु शकतात. महामायेशिवाय इतर अन्य रुपात विश्वात आपले अस्तित्त्व टिकवून ठेवणे असंभव असते. परंतु यांचे अनेक पैलू असतात आणि ती साधकांवरही कार्य करते.

एकप्रकारे ती तुमच्या सहस्त्राराला आच्छादते आणि साधकाची परीक्षा होते. जर तुम्ही ढोंगी साधू संन्यासी यांच्या खोट्या वेशभूषेला त्यांच्या कार्याला फसलात त्यांच्या कृत्यांकडे आकर्षित झालात तर हे आकर्षणही महामायेमुळेच आहे. कारण महामाया अशाप्रकारची परीक्षा घेत असते.

महामाया आरशाप्रमाणे आहे. तुम्ही जसे आहात तसेच दर्पणात दिसता. तेच तुमचे खरेपण असते. जसे आहात तसेच दिसाल. आरशाची काही जबाबदारी नसते. जर तुम्ही माकडाप्रमाणे आहात तर आरशात माकडाप्रमाणेच दिसाल. जर तुम्ही राणीप्रमाणे आहात तर राणीच दिसाल. तुम्हाला चूक किंवा खोटे रंगरुप दाखविण्याची ना दर्पणात शक्ती आहे ना तशी भावना, इच्छा आहे. सत्य जे असेल, जसेही असेल तेच आरसा दाखविल. त्यामुळे, महामाया भ्रमित करते, चकवते असे म्हणणे उचित नव्हे. या उलट आरशात तुमची वास्तविकता दिसून येते. जेव्हा महामाया गतिशील होते तेव्हा समस्या सुरु होते. तुम्ही क्रूर असाल तर आरशात क्रूरच दिसाल. तेव्हा आरशात आपली भयंकर छबी बघून तुम्ही तोंड फिरवता. सत्य

नाकारता. मी असा कसा झालो. मी खूप चांगला आहे. माझ्यात काही कमी नाही, काही नाही मी पूर्णपणे चांगला आहे असे म्हणता.

महामायाचा तिसरा पक्ष हा आहे की, पुन्हा एकदा तुम्ही स्वतःकडे आकर्षित होता. परत आरशात बघता. आरशात तुम्ही पूर्ण विश्वाला बघता. परिणामी तुम्ही विचार करता की, मी काय करतो आहे? मी कोण आहे? हे जग काय आहे? मी कुठे जन्मलो? हे प्रश्न पडणे म्हणजे स्वतःच्या शोधाची सुरुवात असते. पण नुसत्या प्रश्नांनी तुमचे समाधान होत नाही. अर्थात ही महान महामायेची महान मदत आहे.

लोक जेव्हा प्रथम माझ्याकडे येतात आणि मी पाणी पीत असले, पाणी पितांना मला बघितले तर म्हणतात हा कसा अवतार आहे? यांना पण पाण्याची गरज पडते काय? आणि मला कोकाकोला पितांना बघितले तर म्हणतील 'अरे ह्या कशा कोकाकोला पिऊ शकतात? यांनी तर अमृत प्यायला हवे. महामायेचा एक भाग हा आहे की, लोक मला भेटायला येतात आणि भयाने कापायला लागतात. त्यांना वाटते त्यांच्यात महान शक्ती आहे. त्या शक्तीमुळे ते हालू लागले आहेत. त्यांचा गैरसमज होतो किंवा मी तिथे गेलो, माझ्यात इतकी शक्ती आली की, मी हलायला लागलो. मी महान व्यक्ती आहे. परंतु जेव्हा त्यांना समजते की, असे कापणारे लोक वेडे असतात. तेव्हा हळूहळू ते सत्यपरिस्थिती जाणतात. वेळेवर येणारे शहाणपण तुमच्या समजुतीवर पडलेले आवरण दूर करते आणि तुम्ही सत्याला सामोरे जाता.

एकदा तुमच्यासंबंधी हे घडले की, तुम्ही इतरांशी तुमची तुलना करु लागता. तुम्ही असे वागू लागलात की, तुमच्या उत्थानाला सुरुवात होते आणि तुम्ही सहजयोगात स्थिर होता.

महामाया अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. तिच्याशिवाय तुम्ही मला सामोरे येऊ शकत नाही. तुम्ही इथे बसू शकत नाही, माझ्याशी बोलू शकत नाही. ज्या गाडीत मी बसते त्यात प्रवेश करु शकत नाही. ती चालवू शकत नाही. हे सर्व असंभव असते.

मी कुठे हवेत उडत असते तुम्ही इथे असता तर सगळी गडबड झाली असती. मी मानवी स्वरुपात असल्याने सर्व सोपे झाले.

माझे तुमच्यासमोर असणे महत्त्वाचे नाही. निराकार रुपातही मी इथे असू शकते. पण आपला संपर्क कसा होईल? आणि सौहार्द कसे प्रकटेल? यासाठी मला महामायेच्या रुपात यावे लागले. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे भय नाही की दुरावा नाही. समीप येऊन एकमेकांना समजणे महत्त्वाचे. कारण हे ज्ञान द्यायचे आहे तर महामायेच्या समोर कमीतकमी तुम्हाला बसावे लागेल. जर ते सर्व पळून गेले तर सहस्त्रारावर या मानवी व्यक्तित्त्वाची निर्मिती करण्याचा लाभ काय? म्हणून महामायेचे रुप घेणे, तुमच्यासमोर येणे आवश्यक आहे.

सहस्त्रार सर्व शक्तिशाली चक्र आहे. ते केवळ सात चक्रांचे नव्हे तर अन्य चक्रांचेही पीठ आहे. सहस्त्रारावर तुम्ही काहीही करु शकता.

महामायेच्या माध्यमातून गोष्टी सामान्य रुपात येण्यास मदत होते आणि असेच व्हायला हवे. उदाहरणार्थ, तुम्ही म्हणू शकता की, माताजी वातावरण पर्यावरणाच्या समस्येने ग्रस्त आहे. तुम्ही त्याला स्वच्छ का करीत नाही? मी जर ते स्वच्छ केले तर दुसऱ्या समस्या तुम्ही सांगाल. ह्या सर्व मानवांच्या समस्या आहेत. त्यांच्यावर तुम्हीच उपाय करायला हवेत. ती कामे जर मी पूर्ण केली तर तुम्ही तो तुमचा अधिकार समजू लागाल. पर्यावरण शुद्धीसाठी तुम्हाला तुमच्या सवयी बदलाव्या लागतील. प्रथम त्यांना हे समजायला हवे की, पर्यावरण आम्हीच दूषित करीत आहोत. माताजींनी ते एकदा शुद्ध केले तुम्ही पुन्हा घाण केली तर? आपल्या समस्यांचे समाधान आपणच केले पाहिजे. तुमच्या समस्या सोडविणे हा माझा उद्देश नाही आणि लक्ष्यही नाही. माझे लक्ष्य वेगळे आहे. तुम्हाला समर्थ बनविणे, त्यामुळे तुमच्या समस्या तुम्हीच सोडवाल. तुम्हाला तुमचा स्वतःचा डॉक्टर किंवा गुरु व्हायचे आहे. परंतु महामायेशिवाय तुम्ही हे करु शकत नाही. मानवाच्या शुद्धीकरण आणि नियंत्रणासाठी कुठपर्यत जायचे आहे त्या सीमा महामायाच जाणते.

या प्रकारचे मूर्खतापूर्ण स्वातंत्र्य सहजयोगींना नसते. त्यांना आत्म्याचे स्वातंत्र्य प्राप्त आहे. त्यांच्या समस्या सोडविणे उचित असते. त्यामुळे ते पूर्ण स्वतंत्र होतात. जे लोक जराही विचार न करता पूर्ण जगास हानी पोहोचविणार असतात त्यांना स्वातंत्र्य देऊन काय उपयोग? त्यांच्यासाठी ही चांगली गोष्ट आहे की, त्यांनी सहजयोगात यावे. यासाठीच महामायेचे हे रुप आहे. जर मी, माता मेरी, राधा या अन्य रुपात आले असते तर शक्यता आहे की, लोक इथे आले असते आणि सुंदर भजने गायली असती पण प्रत्यक्षात तसे नाही.

आता तुम्हाला परिपक्व व्हायचे आहे. काही बनायचे आहे, काही करुन दाखवायचे आहे आणि विकसित व्हायचे आहे. नाहीतर महामाया तिच्या लीला करीत राहील. त्यासाठी सर्वप्रथम तुम्हाला सहजयोगी व्हावे लागेल. तेव्हाच सहजयोगात तुमचा विकास होईल. नाहीतर महामायेच्या लीलेने तुम्ही संभ्रमित व्हाल. सहस्त्रार विराटाचे क्षेत्र आहे. विराट विष्णु आहे. राम, कृष्ण हे त्यांचेच अवतार. या सर्व लीला आहेत. त्यांच्या लीला म्हणजे एक प्रकारचे नाटक होय आणि नाटक योग्यप्रकारे वठविण्यासाठी तिला महामाया स्वरुप व्हावे लागेल.

बचावाचे अनेक मार्ग आहेत. कधीकधी लोक सहजतेने वस्तू शोधतात. त्यातच एक परमचैतन्य आहे. पण परमचैतन्य आपले काम करते. माझे चित्र दाखवते.

मी स्वतः आश्चर्यचकित होते. यापूर्वी असे झाले नाही. तुम्हाला महामायेबद्दल समजावण्यासाठी स्वतः परमचैतन्य महामायेस प्रगट करण्याचे प्रयत्न करीत आहे. ते स्वतःच हे करीत आहे. मी तर परमचैतन्यास असे करण्यास सांगितले नाही. पण हे खरे आहे कारण ते विचार करते की, आता जे लोक माताजींचे अनुकरण करतात त्यांचा स्तर जितका हवा तितका उच्च नाही. आपला विश्वास दृढ हवा. हा विश्वास अंधविश्वास नको. सहजयोगींनी हे समजले पाहिजे की, त्यांना विकसित व्हायचे आहे. हा विकासही द्विपक्षीय असायला हवा.

हे तुमचे कार्य आहे की, सहजयोगाविषयी तुम्ही किती विचार करता आणि व्यक्तिगत जीवनाबद्दल किती विचार करता? सहजयोगात आम्हाला परमात्म्याकडे झुकायला हवे. तुम्ही बघाल की, तुमचे सर्व विचार सहजयोगाकडे जात आहेत. पूर्ण विचार प्रक्रियाच सहज आहे. सहजयोगात एक मनोरंजक गोष्ट आहे की, जे कार्य तुम्ही करता ते बघता, सहज मार्गाबद्दल तुम्ही विचार करता.

या महामायेत तुम्ही मूल्यांकन (किंमत) कसे करता? सहजबद्दल कुठपर्यंत विचार करता? या व्यापारात मी किती अधिक पैसे मिळवीन? मला किती आनंद प्राप्त होईल? शारीरिक रोग किती कमी होतील? हे सर्व लाभ सहजयोगातील परिपक्वतेपुढे काहीही नाहीत. मेंदूच्या हातात नाड्या आल्या की, तो अतिशय विचारात पडतो. तुमची पत्नी, मुले, घर इ. खूप गोष्टींवर ते फिरत राहते. पण तुम्ही सहजपणे विचार केला तर तुम्ही म्हणाल की, मी असे काही कार्य केले पाहिजे ज्यामुळे माझे कुटुंब सहज होईल. मला असे घर हवे जे सहजयोगाला उपयोगी पडेल. माझे आचरण असे हवे ज्यामुळे मी सहजयोगी आहे हे समजेल.

तुमच्यात अशाप्रकारे परिपक्वता विकसित व्हावी की, तुम्हाला ते जाणवले पाहिजे. सर्वप्रथम शांती. अशांत व्यक्तीचे डोके (मेंदू) अस्थिर यंत्राप्रमाणे असते. तो योग्यप्रकारे बघू शकत नाही की, विचार करु शकत नाही. समजूही शकत नाही.

या महामायेमुळे सर्व गोष्टी उलटसुलट होत आहेत. जगात जे संघर्ष सुरु आहेत. ती युद्धे नव्हेत, ही शीत युद्ध नव्हेत ही विचित्र प्रकारची युद्ध-धुंदी, युद्धाचे यश आहे ज्याचे वर्णन शब्दात करता येत नाही.

परमात्मा आणि आध्यात्मिकतेचा व्यापार होतो आहे. आजच्या ह्या पतित विश्वासाठी महामायेचे अस्तित्त्व महत्त्वाचे आहे. तीच सांगू शकते की, तुमचे वागणे अयोग्य आहे. त्यासाठी ती दंड ही देईल. नाकी नऊ आणील.

या महामायेला आम्ही रोकडादेवी म्हणतो. म्हणजे लगेचच फळ देणारी. तुम्ही असे केले ठीक आहे तुम्ही हे हे घ्या. तुम्ही हे काम केले. ठीक आहे तुम्ही त्याचा आनंद घ्या. वास्तविक महामाया विशिष्ट प्रकारे गतिशील आहे. ज्याप्रकारे ती

लोकांना दंड देते कधी कधी मला भीती वाटते. पण वास्तविकता हीच आहे. जर तुम्ही म्हणाल की, बेदरकारपणे गाडी चालवणे मला आवडते तर ठीक आहे. समाप्त. तुटलेला हात किंवा लंगडणारी तंगडी हाच त्याचा शेवट असेल. महामायेच्या माध्यमातून दैवी कायदा लागू आहे. आजसारखा हा कायदा पूर्वी तेज (कडक) नव्हता. मानवाच्या स्वतंत्र इच्छेवर अंकुश ठेवण्यासाठी महामाया आपल्या स्वतंत्र इच्छेचा उपयोग करीत आहे. हे कथित स्वातंत्र्य आहे. त्याचा आनंद घेण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत, त्यातून आम्ही आमच्या शेवटाकडे निघालो आहोत.

लोक आपल्याच जाळ्यात अडकले आहेत. हे जाळे म्हणजेच महामाया. हे सर्व ती तुमच्याकरवी करुन घेते. कारण तुम्ही तुमचा सामना करु इच्छित नाही. सत्य काय आहे हे समजून घेत नाही. सत्यापासून दूर पळता. ही महामायेचीच माया आहे ज्यामुळे तुम्ही तुमचा सामना करण्यासाठी विवश होता. कितीतरी घटना घडल्या. त्यांचा विचार करा. मोठमोठे पुंजीपती जेलमध्ये गेले. मोठमोठे प्रसिद्ध लोकही कैदेत पडले. हे का घडते? कारण महामायेला तुम्हाला धडा शिकवायचा आहे. एका व्यक्तीला दंड देऊन ती हजारोंना योग्य मार्गावर आणीत आहे.

सर्व विश्व भयग्रस्त आहे. खूप असुरक्षितता आहे. आज प्रत्येक व्यक्ती व्यग्र आहे आणि आपला जीव वाचवू बघते आहे. तुम्ही सहजयोगात आलात तर तुम्ही या कष्टांपासून वाचू शकता. कारण महामायेचा एक पक्ष हा आहे, ती तुमचे रक्षण करते. जोपर्यंत सहजयोगी स्वतः इच्छा करीत नाही तोपर्यंत त्याला कोणीही मारु शकत नाही. त्याची आपली इच्छा आहे. त्या इच्छेला कोणी स्पर्श करु शकत नाही. महामाया सहजयोगीचे रक्षण कसे करते याच्या अनेक कथा आहेत स्वप्नातही ती सहजयोगींचे रक्षण करते. हे चेतन मस्तक आहे.

पण अत्यंत गहन सुषुप्ति अवस्थेत तुम्हाला समजते की, तुमच्यासाठी योग्य अयोग्य काय आहे? कोणत्या ना कोणत्या प्रकारे हे समजते की, तुमच्यासाठी भले बुरे काय आहे? हेच ज्ञान, अंतर्ज्ञान आहे जे महामायेच्या माध्यमातून आपल्याला

मिळते. फक्त तीच आपल्याला अंतर्ज्ञान देऊ शकते की, काय करायला हवे. कोणत्याप्रकारे समस्या सुटतील आणि तुमची त्यातून सुटका होईल.

कोणी जर सहजयोगीला त्रास द्यायचा प्रयत्न करीत असेल तर एका सीमेपर्यंत महामाया असे करु देते. नंतर अचानक गतिशील होते. लोक हैराण होतात, सहजयोगी आश्चर्यचकित होतात की, हा माणूस असा कसा झाला? ही महामाया माझ्या साडीसारखी आहे आणि रक्षणकर्ता आहे. ती अतिशय सुंदर, दयाळू, लक्ष देणारी, करुणामय, स्नेहमय आणि कोमल आहे. ती तुमची देखरेख करते. परमेश्वरी कार्यांमध्ये विघ्न निर्माण करणाऱ्या राक्षसी आणि आसुरी प्रवृत्तीच्या लोकांवर क्रुद्ध होऊन त्यांचा संहार करते.

महामायेचे एक कार्य हे आहे की, ती तुम्हाला परावर्तित करते, बदलून टाकते. मानवी मेंदू - मस्तक मानवासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. तुम्ही जर कुटिल आहात तर कुटिल आहात. तुम्ही लोकांची घृणा करीत असाल तर ते ही तुमच्या मस्तकात, मेंदूत आहे. मस्तकाची बंधने अत्यंत गुंतागुंतीची आहेत. अर्थातच सहस्त्रार अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. परंतु जेव्हा महामायेचे शासन, राज्य असते तेव्हा विराट आणि विराटांगनाची शक्ती प्रभावी होते. महामाया आपल्या मधूर पद्धतीने सहस्त्रार, तुमचे सहस्त्रार उघडते आणि तुम्हाला कुरुप, लोभी आणि रागीट बनविणारी सारी बंधने निवारते. त्या बंधनांना दूर करते. निवारण करते.

महामाया पृथ्वीमातेप्रमाणे आहे. ती सर्व काही मिळाल्यावर तुम्हाला प्रत्यक्षात अत्यंत प्रसन्न आणि आनंदी करते. कारण तुम्ही निरानंद म्हणजे केवळ आनंदाचे होय. जेव्हा तुमचे ब्रम्हरंध्र उघडले जाते तेव्हाच हे शक्य होते. तोपर्यंत तुम्ही परमेश्वराच्या प्रेमाची सूक्ष्मता आणि सतत संगत करणाऱ्या महामायेची करुणा यात प्रवेश करु शकत नाही. महामायेचे बाह्यरुप मी सांगितले पण आतून तुम्ही तिला केव्हा जाणाल? जेव्हा ब्रम्हरंध्रातून यात तुम्ही प्रवेश कराल तेव्हा. त्यावेळी सर्व शक्तिमान, अवतार महामाया एकदम भिन्न होते. एकीकडे ती तुम्हाला

शिकविण्याचा प्रयत्न करते. विनाशक शक्तींना समाप्त करते. दुसरीकडे तुमच्यावर प्रेम करते. कोमलपणे तुमचे रक्षण करते आणि मार्गदर्शनही.

तिचे प्रेम निर्व्याज आहे. प्रेमाशिवाय ती राहू शकत नाही म्हणून प्रेम करते. त्या प्रेमात तुम्ही रंगून गेले आहात आणि आनंद घेत आहात. प्रत्येकाला माहीत आहे की, महामाया त्याच्या अगदी जवळ आहे. अत्यंत जवळ. तो कुठेही असला आणि जेव्हाही त्याला गरज भासेल तो लगेच महामायेची मदत मागू शकतो. सहस्त्रार अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. केवळ त्याच्या माध्यमातून आपण प्रतिक्रिया देतो. या जगात राहून आम्हाला आता बदलायला हवे. चिखलात राहून कोणताही डाग लागत नाही अशा कमळाप्रमाणे व्हा. प्रचलित कोणतीही वाईट गोष्ट तुम्हाला प्रभावित करु शकणार नाही असे तुम्ही वागायला हवे.

ही परीक्षा आहे. या कठीण काळात कमळाप्रमाणे आपण उमलू शकू आणि सुगंधाचा वर्षाव करुन इतर सर्व लोकांना या सुंदर आणि सुगंधी वातावरणात आणू या.

नकारात्मकतेविरुद्ध हे एक सुंदर लिलामय युद्ध आहे. त्यांचा मूर्खपणा काय आहे? तो कोणीही बघू शकतो. म्हणून तुमचे मन, तुमची दृष्टी विकसित करा. त्यामुळे तुम्हाला हे स्पष्टपणे समजेल की, तुम्ही लोकच यासाठी जबाबदार आहात. या मस्तकाच्या, सहस्त्राराच्या तुम्हीच पेशी आहात आणि सर्वांना कार्य करावयाचे आहे.

सहजयोगात येणे म्हणजे तुमचे वैयक्तिक सीमित व्यक्तित्त्व आणि त्याच्या समस्या नव्हेत. एकीकडे तुम्ही स्वतः विकसित व्हायचे आहे आणि दुसरीकडे स्वतःच्या माध्यमातून इतरांना विकसित करावयाचे आहे. या दुसऱ्या बाबीची देखरेख तुम्हाला करायची आहे.

ही खूप सुंदर गोष्ट आहे की, परमेश्वरी साम्राज्यात प्रवेश करायला आणि स्वर्गीय आनंद घेण्यासाठी हे द्वार तुमच्यासाठी सदैव खुले आहे. मला विश्वास आहे

की, खूप मोठ्या प्रमाणात ते कार्यान्वित होईल. जर तुम्ही पूर्ण समर्पण आणि पूर्ण विश्वासाने हे कार्य केले तर अशक्य काही नाही. हे सर्व उत्तम प्रकारे कार्य करील.

प. पू. श्री माताजी - ०८.०५.१९९४

# <u>प्रकरण ११ अ</u>

## <u>श्री कल्की</u>

कुंडलिनी व कल्की देवता यांचा संबंध - कल्की शब्द निष्कलंक पासून बनला. निष्कलंक म्हणजे डाग विरहित - किंवा कोणताही डाग नाही. याचा अर्थ अत्यंत शुद्ध, पवित्र, निर्मल.

कल्की पुराणात कल्की अवतरणाबद्दल बरेच काही लिहिले आहे. त्यात श्री कल्की अवतरण ह्या भूतलावर संभाळपूर गावात होईल. संभाल या शब्दाचा अर्थ कपाळ. संभालचा अर्थ कपाळाचा प्रदेश (पूर) म्हणजे कल्की देवतेचे स्थान आमच्या कपाळावर आहे. ह्या शक्तीला श्री विष्णुची (हनन) विध्वंसक (संहारक) शक्ती म्हणतात.

श्री येशू व श्री कल्की यांच्या अवतरणाचा कालावधी, यात माणसाला स्वत:मध्ये बदल करुन परमेश्वरी साम्राज्यात प्रवेश करण्याची संधी आहे. यालाच बायबलमध्ये 'अंतिम निर्णय' म्हटले आहे. <u>ह्या पृथ्वीवरील प्रत्येक माणसाचा अंतिम निर्णय होणार आहे. परमेश्वराच्या साम्राज्यात प्रवेश करण्यासाठी कोण योग्य आहे कोण नाही ते निवडण्याची वेळ आली आहे. (The last Judgment).</u>

सहजयोगात निवडीचा अंतिम निर्णय होणार आहे. आपल्याला आश्चर्य वाटेल परंतू हे <u>सत्य</u> आहे. आईच्या प्रेमाने व्यक्ती सहजमध्ये पार होते म्हणून वरील गोष्ट अतिशय सूक्ष्म व नाजूक बनवली गेली आहे. त्यात कोणी विचलित होऊ नये. <u>सहजयोगातूनच तुमचा शेवटचा निर्णय होईल</u> हे आपणास सांगू इच्छिते, आपण परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करण्यास लायक आहात की नाही याचा निर्णय सहजयोगाद्वारा होणार आहे.

पुष्कळसे लोक वेगवेगळ्या कारणांनी सहजयोगात प्रगती करतात. समाजात काही साहसी वृत्तीचे, काही जड, काही सुस्त लोक आहेत, ते ईडानाडीवर कार्यान्वित होतात. असे लोक नशापाणी करतात, ते सत्यापासून दूर जातात तर

दुसऱ्या प्रकारचे लोक पिंगला नाडीवर कार्यान्वित होतात. ते फार महत्त्वाकांक्षी असतात. त्यांना स्वातंत्र्य पाहिजे व त्यांच्या अपेक्षाही विशेषच असतात. त्यामुळे त्यांची ईडानाडी (दुसरी बाजू) पूर्णपणे खराब होते. समाजात दोन्ही प्रकारचे लोक भेटतात. लोक तामसी वृत्तीत राहतील नाही तर 'राजस वृत्तीत'. तामसी वृत्तीचे लोक दारु पिणारच. स्वतःला जागृत स्थिती आणि सत्यापासून लांबच ठेवतात. दुसऱ्या प्रकारचे लोक काही सुंदर आहे, सत्य आहे त्याला नाकारतात. असे लोक अहंकारी असतात तसेच जे सुस्त, जड, लढावू प्रवृत्तीचे प्रतिअहंकारी असतात. दोन्ही प्रकारचे लोक सहजयोगात येणे कठीणच.

जे लोक मध्यम वृत्तीचे व 'सात्विक' आहेत असे लोक सहजयोगात लवकर येतात. जे लोक साधे, भोळे असतात. ते मेहनत न करता सहजयोगात सहज स्थिर होतात.

या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छिते की, सहजयोग तुम्हाला योग्य मार्गाने घेवून जाईल. परमेश्वरी ज्ञान शोधणाऱ्यांना परमेश्वरी ज्ञान मुक्तपणे दिले जाते. आत्मसाक्षात्कार कष्ट न करता, पैसे खर्च न करता सहजपणे मिळतो.

एक गोष्ट लक्षात ठेवा. आत्मसाक्षात्कार मिळण्यापासून परमेश्वरी राज्यात स्थिर होईपर्यंत अनेक अडचणी, बाधा येतात. कल्की शक्तीचा संबंध त्याच्याशी जोडला आहे. आत्मसाक्षात्कार मिळाल्यावरसुद्धा जे लोक जुन्या सवयी, प्रवृत्तीत रमलेले असतात, त्या स्थितीला योगभ्रष्ट स्थिती म्हणतात.

उदाहरणार्थ - काही व्यक्ती पार झाल्यावरही अहंकारात फसले आहेत किंवा पैसे मिळवण्यात मग्न आहेत, नाहीतर आपली हुकमत गाजवण्यात मग्न आहेत. अशा व्यक्ती आपला गट बनवतात आणि त्या गटाचे नेतृत्त्व आपल्याकडे घेऊन मिजास करतात. अशा व्यक्तीच्या बाबतीत लवकरच आपल्याला कळते की, ती व्यक्ती परमेश्वर आणि सत्याला वंचित झाली आहे. पुढे सर्वनाश अटळच.

प्रत्येक वस्तूचे विश्वात योग्य तऱ्हेने नियंत्रण केले जाते. तसेच सहजयोगात आहे. सहजयोगात देखावा करु शकत नाही. एखाद्या गोष्टीसाठी गटबाजी करु शकत

नाही. असे लोक सहजयोगात आल्यावर त्यांचे पितळ उघडे पडते. त्यांचे स्वभाव विशेष कळतात. अशा लोकांच्या चक्रावर जोराची पकड येते, पण ते त्यांच्या लक्षात येत नाही. चैतन्य लहरींची संवेदना थोडी फार राहते. थोड्या काळातच हे लोक नष्ट होतात. श्री कृष्णाच्या म्हणण्यानुसार योगभ्रष्ट लोक राक्षस योनीत जन्म घेतात.

जे लोक सहजयोगात येतात त्यांचा टिकाव लागेल नाही तर तेही इतर योनीत जन्मतील. श्री कल्की देवतेची शक्ती सहजयोग्याबरोबर गुरुकृपेने प्रत्येक क्षण कार्यान्वित करते. श्री कल्की देवता सहजयोग्याच्या पवित्रतेचे रक्षण आपल्या एकादश शक्तीने करते. जो सहजयोगांच्या विरुद्ध काम करेल त्याला खूप त्रास, अडचणी येतील. आपला इतिहास पाहिला तर संत, महात्मा यांना लोकांनी खूप छळले, त्रास दिला. परंतु आता मात्र साधु संतांना कोणी छळणार नाही. श्री कल्की देवता पूर्ण रुपात कार्यान्वित आहे. त्यांना छळाल तर श्री कल्की त्याला त्रास देईल आणि पळण्यासाठी पृथ्वी कमी पडेल अशी त्याची वाईट अवस्था करेल.

इतरांना सतवू नका, त्यांच्या चांगुलपणाचा फायदा उठवू नका. आपले मोठेपण दाखवून खोट्या गोष्टी करु नका. जर श्री कल्कीने आपल्या जीवनात विध्वंसक कार्य सुरु केले तर आपण काय करावे आणि काय करु नये अशी आपली स्थिती निर्माण होईल.

अज्ञानाने एखादी अगुरुच्या किंवा दुष्ट व्यक्तीला भजत बसतात किंवा त्यांच्या सहवासात येतात त्यावेळेसही तुमची अवस्था वरीलप्रमाणेच होईल. परमेश्वराच्या नावाने कोणी आपल्याकडून पैसे काढत असेल तर हा अघोरीपणा आणि शुद्ध वेडेपणा आहे. पुजाऱ्याला पैसा दिला म्हणजे आपल्याला फार फायदा मिळतो, असे का वाटते. म्हणजे सत्य समजून न घेता ह्या सर्व गोष्टी अंधविश्वासाने करतो. परमेश्वराच्याच नावावर आपण अनेक पापे करतो. पाप नष्ट करण्यासाठी आणखी पाप करतो. अशा लोकांना तामसी वृत्तीचे म्हणतात. आपल्याला मिळालेला वेळ बहुमूल्य आहे. आत्मसाक्षात्कार घेण्याकरिता सावध राहिले पाहिजे. दुसऱ्यावर अवलंबून राहू नये. आपण स्वतः साधना करुन परमेश्वराच्या हृदयात उच्च स्थान

प्राप्त केले पाहिजे. त्यासाठी स्वतः सहजयोगात येऊन आत्मसाक्षात्कारानंतर साधना करावी.

जेव्हा श्री कल्की अवतरण होईल, ज्या लोकांना परमेश्वराबद्दल प्रेम नाही. ज्यांना आत्मसाक्षात्कार नको अशा सर्व लोकांचा संहार होईल. त्यावेळेस श्री कल्की कोणावर दया करणार नाही. तिच्याजवळ अकरा बलवान शक्ती आहेत. त्यामुळे सावध.

वाईट गोष्टीत आपला वेळ वाया घालू नका. चमत्कार करणाऱ्या अगुरु मागे भगवान, भगवान करत पळू नका. जे खरे, सत्य आहे ते स्वीकारा. श्री कल्की अवतार येण्याचा काळ जवळ आलेला आहे.

काही लोक आपली बुद्धी आणि चलाखी यावर विचार करतात, त्यांनी नेहमी परमेश्वराला झिडकारले आहे. ते म्हणतात परमेश्वर कोठे आहे. हे सगळे खोटे आहे. हे सर्व चुकच आहे आज होवो उद्या होवो तरी ते चूक, चूकच आहे. म्हणून अशा चुकीच्या मार्गाचा स्वीकार करु नका. तो तुमच्या उत्क्रांतीत अडसर बनेल. तसं केलेच तर आपल्या कृत्याचा पश्चाताप करण्यासाठी सुद्धा वेळ मिळणार नाही. त्यावेळेस प्रत्येक व्यक्ती वेगवेगळी तपासली जाईल. आपल्या कर्माप्रमाणे कार्य होई ल.

श्री कल्की अवतरण फारच कठोर आहे. यापूर्वी श्री कृष्णाचे अवतरण झाले, त्यांच्या जवळ संहारक शक्ती होती, त्यांनी कंस व इतर राक्षसांना मारले. लहान असतानाच पुतना राक्षसीला मारले. परंतु ते 'लीला' करत होते, दयाळूपण होते. त्यांनी अनेक वेळा लोकांना माफ केले. ते क्षमाशक्तीने परिपूर्ण होते. क्षमाशीलता हाच श्री कृष्णांचा गुण आहे. त्या परमेश्वरी शक्तीला समजून घेतले नाही तर श्री कल्की देवतेचा विस्फोट होईल आणि सर्व क्षमाशीलता संकटाप्रमाणे आपल्यावर कोसळेल. श्री कृष्णाने स्पष्टच सांगितले की, थोडासा विरोध सहन केला जाईल. पण आदिशक्तीच्या विरोधात एक शब्द सुद्धा चालणार नाही. श्री कल्कीचे अवतरण होणार हे निश्चित. त्या शक्तीजवळ श्री कृष्णाची संहारक शक्ती, शिवाचे

तांडव, सर्व प्रकारची संहारक शक्ती असतील. त्या अवतारी पुरुषाकडे भैरवाचे खडग, गणेशाची फरशी, हनुमानाची गदा, विनाशाच्या शक्ती, (सिद्धी) बुद्धाची क्षमाशीलता महावीरांची अहिंसा ह्या संहारक बनतील. अशा अकरा शक्ती घेऊन श्री कल्की देवता येणार आहे. त्यावेळेस सर्वत्र हाहाकार उडेल. भयानक परिस्थिती निर्मा ण होईल.

त्यावेळेस सहजयोगी सुद्धा कोणाला मदत करु शकणार नाही. आपण सहयोगापासून वेगळे व्हाल आणि जो योग्य आहे तोच वाचेल. इतरांचा संहार होईल. देवीच्या अनेक अवतारांनी राक्षसांचा संहार केला पण राक्षस पुन्हा पुन्हा जन्मले मात्र या विनाशानंतर राक्षसांच्या जन्माची आशा नाही. फक्त सहजयोगातून माणसाची स्वच्छता होईल. परमेश्वर प्राप्तीसाठी होईल. वेळ वाया न घालविता पूर्ण श्रद्धेने सहजयोग स्विकारा ही आवश्यक गोष्ट आहे. भूतकाळातील चुका पापे यापासून मुक्ती मिळेल. आपण सावध व सजग रहा. स्वत:चा नाश करु नका. उठा जागृत व्हा. माझ्याकडे या. मी तुमची मदत करीन. जास्तीत जास्त वेळ सहजयोगात घालवा. आपल्यासाठी सहजयोग महत्त्वाचा आणि महान आहे. तो आत्मसात करण्यासाठी आपला वेळ द्या. जेव्हा लोक सहजयोगाकडे येणे थांबवतील त्यावेळेस कल्कीचा अवतार होईल.

कल्कीशक्तीचे स्थान भालप्रदेशावर आहे. जेव्हा कल्कीचक्र पकडले जाते तेव्हा डोके, कपाळ भारी होते. जड होते. कारण कुंडलिनी कल्कीचक्रापर्यंत पोहोचत नाही. ती आज्ञा चक्रावर जाते. नंतर खाली येते. आपण चुकीच्या माणसांसमोर नतमस्तक होऊ नये.

कपाळावर एकदोन टेंगूळ असेल तर तेथे कल्कीचक्र खराब झाले असे समजावे. जेव्हा कलकी चक्र खराब होते तेव्हा हातावर, शरीरभर उष्णता वाढते. अशा माणसाला कर्करोग (कॅन्सर), महारोग होण्याची शक्यता असते. त्यासाठी कल्कीचक्र स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. या चक्रात आणखी अकरा चक्रे आहेत. ती अकरा

चक्रेही स्वच्छ ठेवावी लागतात सर्व चक्रे पकडलेली असली तर त्या व्यक्तीला सहजयोगात येणे कठीण आहे. आत्मसाक्षात्कार देणे ही कठीण आहे.

कल्कीचक्र शुद्धीसाठी काय करायला हवे? परमेश्वराबद्दल आदर, आदरयुक्त भीती, प्रेम हवे. आपण चुका करता, पाप करता ते माझ्यापासून लपवायची गरज नाही. आपण चुकतो हे तुम्हालाच कळले पाहिजे. अशी पापे तुम्ही करु नका. परमेश्वराबद्दल प्रेम आहे, तो शक्तिमान आहे, देखभाल करतो, तोच उद्धार करणार आहे. तो उपकार करतो, आशीर्वादित करतो. परमेश्वर करुणेचा सागर आहे. तसाच क्रुद्धही आहे. त्याच्या कोपापासून वाचणे कठीण आहे. परमेश्वराला त्याच्या रागापासून कोणी थांबवू शकत नाही.

माझा प्रेमळ आवाजही यांच्यापर्यंत जाणार नाही. तेव्हा परमेश्वर म्हणेल तू मुलांना खूप लाडावले आहे म्हणून ते बिघडलेत. म्हणून तुम्ही चुकीचे वाईट काम करु नका. माझे नाव बदनाम करु नका. तुमच्या आईचे हृदय प्रेमळ आणि नाजूक आहे. हे सर्व सांगताना मला यातना होतात. मी विनंती करते, वेळ वाया घालवू नका. पितामह, परमेश्वर आपल्यावर कोपलेला आहे. वाईट कामाची तो शिक्षा देई ल. आपण स्वतःच्या आत्मसाक्षात्कारासाठी काही केले तर परमेश्वर राज्यात वरचे पद देईल.

आज तुम्ही करोडपति किंवा श्रीमंत असाल, पुजारी असाल तरीही परमेश्वराला जे मान्य असेल, आवडत असेल अशाच व्यक्तीला परमेश्वराच्या साम्राज्यात उच्च पद प्राप्त होईल. आम्ही धनवान आहोत म्हणजे सहजपणे परमेश्वरी साम्राज्यात प्रवेश होईल ही खूप चुकीची धारणा आहे. सर्वांत प्रथम आपला परमेश्वराशी संबंध जोडला जाणे आवश्यक आहे. परमेश्वराशी संबंध प्रस्थापित झाला की, आपला आत्मा ईश्वरी शक्तीशी कसे जोडला जातो याचे रहस्य कळते. सहजयोगात येऊन आपला उत्कर्ष व कल्याण करुन घेतले पाहिजे.

श्री माताजी - सहजयोग - कल्की शक्ती (निर्मला योगमधून)

✱ ✱ ✱

## प्रकरण १२

## परमेश्वराचे अस्तित्व – अवतरण

### परमेश्वराचे अस्तित्व –

'परमेश्वर आहे का? असा प्रश्न लोक विचारतात. प्रश्नच नाही, परमेश्वर आहे, पण त्यासाठी तुम्हाला आत्मसाक्षात्कार घ्यावा लागेल. तरच तुम्ही तो जाणू शकता. त्याशिवाय त्याला तुम्ही समजू शकत नाही.

प.पू. श्री माताजी - दिल्ली - ०४.०४.१९९०

या, हा परमेश्वर आहे कोण? पाहु या. मी परमेश्वरा विषयी बोलते. सुरवातीला केवळ मौन होते. केवळ मौन. मौन जागृत झाले, म्हणजे मौनाला जागृत केले गेले. मौनाला परमेश्वर बोलले जाते. मौन जागृत झाले. मौनालाच परब्रम्ह किंवा तुम्ही असेही म्हणू शकता की, मौन पूर्णपणे जागृत झाले. ते आपोआपच जागृत झाले. ज्याप्रमाणे आम्ही झोपतो आणि जागे होतो त्याप्रमाणे. त्यानंतर ते मौन सदाशिव बनले. जेव्हा सदाशिव जागे झाले, तेव्हा त्याचा उदय होऊ लागला, म्हणजे त्यांच्यात निर्मिती करण्याची इच्छा झाली. जसा सूर्योदयामुळे सूर्य उगवतो. तशीच ती इच्छा व्यक्त होऊ लागली. ती इच्छाच त्यांची शक्ती बनली आणि ती त्यांच्यापासून अलग झाली.

प.पू. श्री माताजी - १५.११.१९७९

सदाशिव आणि शक्ती एकच आहेत. जसा सूर्य आणि त्याचा प्रकाश परंतु जेव्हा निर्मिती करण्याचे ठरविले, तशी अनेक वेळा निर्मिती झाली आहे. तेव्हा सदाशिव आणि शक्ती वेगळे झाले. दोन अंगे झाली. या शक्तीलाच आदिशक्ती म्हणतात. त्या आदिशक्तीने व्यक्तित्व रुप धारण केले. कार्य करण्यासाठी तिला साकार रुपात येणे आवश्यक होते.

प.पू. श्री माताजी, दिल्ली - ०३.०२.१९७८

श्री सदाशिव सर्वशक्तिमान परमात्मा आहे. सदाशिव आदि पिता आहे. त्याला पहिला मानला जातो; ते बीजरुप आहेत. सदाशिवामुळे परिस्थिती तयार होते. संसार निर्मितीसाठी जोपर्यंत परिस्थिती निर्माण होत नाही तोपर्यंत निर्मिती होऊ शकत नाही. प्रथम स्थिती निर्माण करावी लागते नंतर अस्तित्व. हे सदाशिवाच्या शक्तीनेच होते. निर्मितीमध्ये सदाशिवाचा हात असतो. जसा मोठी इमारत बांधतांना पाया महत्त्वाचा तसा पाया दिसत नाही पण त्याशिवाय इमारत उभी राहू शकत नाही.

सदाशिव आमच्यात आत्मा स्वरुपात राहतात. जोपर्यंत ते आमच्यात आत्मस्वरुपात असतात तोपर्यंत आमचा संसार चालतो. ज्या दिवशी ते आपले डोळे बंद करतात त्या दिवशी आपण नष्ट होतो. मृत्यू पावतो. म्हणजे ह्या लोकातून आम्ही परलोकात जातो.

शिव विशेष कारणामुळेच निर्मिती करतात, हा तर त्यांचा विलास आहे. निर्मिती करतात नाही तर संहार, शिव आतून सन्यस्त तर बाहेरुन साक्षी आहेत. संसारात आम्ही जे काही भोगतो ते भोक्ता स्वरुप विष्णू स्वरुप आहे. विष्णुच्या स्वरुपात ते भोक्ता स्वरुप आहेत तर शिवाच्या स्वरुपात ते संन्यस्त. ब्रम्हाच्या स्वरुपात ते सृजन कार्य करणारे कर्ता आहेत.

आदिशक्तीच परमेश्वराच्या तीन रुपांना वेगवेगळे प्रकाशित करते. ती तीन रुपे आपण जाणतो. ज्यांची नावे ब्रम्हा, विष्णु आणि शिवशंकर आहे. एकाच तत्त्वाचे तीन पैलू आदिशक्ती धारण करते.

प.पू. श्री माताजी - २९.०२.१९७६

लक्षात घ्या, विराट हे विष्णुचे मोठे स्वरुप आहे. त्या विराटात त्यांचे हृदय आहे, त्यात श्री विष्णु बसलेले आहेत आणि ब्रम्हदेव त्यांच्या क्रियाशक्तीत सांभाळून बसले आहेत. त्यांनीच सर्व सृष्टीची रचना केली, सर्व काही सुंदर बनवलं.

प.पू. श्री माताजी - १७.०२.१९८१

प्रलयात सर्व सृष्टी, संसार, विलीन होतात म्हणजे त्या परब्रम्हामध्ये लीन होतात.

जेव्हा प्रलयकाळात सर्व सृजन केलेली सृष्टी, सर्व मेनिफेस्टेड जग विसर्जित होते, त्याच परब्रम्हात विलिन होते, तेव्हाही सदाशिव कायम राहतात (ते नष्ट होत नाहीत). त्यांचा संबंध परमेश्वराच्या त्या अंगाशी (भागाशी) नेहमी जोडलेला राहतो. जो कधी प्रगट होत नाही. कारण ते एक ऐन्‍ब्‍इनि आहेत. परमात्म्याच्या ज्या शक्ती प्रगट होतात त्या being आहेत आणि ज्या शक्ती प्रगट होत नाहीत त्या नॉन बिइंग - (Non being) च्या त्या नेहमी कायम राहतात (नष्ट होत नाहीत). यात सदाशिवाचे स्थान असे, जसे, एखादा हिरा तुटून विखुरला आहे. कितीही तुकडे झाले तरी तो चमकत राहणारच. त्याची चमक कधीच नष्ट होत नाही. श्री सदाशिवाचे स्थान अशाच प्रकारचे आहे.

प.पू. श्री माताजी - २९.०२.१९७६

सर्व शक्तिमान परमात्मा आदिपिता इच्छा शक्तीमध्ये आपल्या इच्छेची अभिव्यक्ती 'आदिमाँ' च्या रुपात करत असते. आदिमाँ आपली अभिव्यक्ती प्रेमाच्या रुपात करते. आदिपिता आणि आदिमाँ दोघांचे संबंध खूप सामंजस्याने परिपूर्ण आणि गहन आहे. श्री सदाशिवाच्या इच्छेने आदिशक्ती जी काही निर्मिती करीत आहेत, सदाशिव ते बघत आहेत, आणि त्याचे साक्षी आहेत. पूर्ण ब्रम्हांड आणि पृथ्वीला ते साक्षीभावाने (साक्षी रुपात) बघतात. साक्षीभाव त्यांची शक्ती आहे.

प.पू. श्री माताजी, दिल्ली - १४.०३.१९९४

हा जो परमात्मा आहे तो आम्हाला निर्माण करणारा आहे. आमचा रक्षक आहे. त्याची इच्छा आहे की, आमचे अस्तित्व टिकून रहावे. ते जे इच्छा करतील ते आमच्या बरोबर करु शकतात. ते दुसऱ्या विश्वाची निर्मिती करु शकतात. एवढेच नव्हे तर संसाराचा विनाश पण घडवून आणू शकतात, त्यांची इच्छा असेल तरच ह्या गोष्टी होऊ शकतात. परमेश्वर प्रत्येक प्रकारचा चमत्कार करण्यास सक्षम आहे.

त्यांच्या चमत्काराची व्याख्या करु शकत नाही, करु पण नये, हे सर्व आमच्या बुद्धीच्या बाहेरचे आहे. माणसाला परमेश्वराचा भास व्हावा यासाठी तो काहीही करु शकतो. तो तिन्ही (आयाम) जगामध्ये फिरु शकतो, चौथ्यात देखील. तो जी इच्छा करील ते सर्व काही करु शकतो.

प. पू. श्री माताजी, पंढरपूर - २९.०२.१९७६

अंतिम सत्य हे आहे की, ही सारी सृष्टी चराचरामधील सूक्ष्म रुपात पसरलेल्या ब्रम्हचैतन्याच्या साहाय्याने चालत आहे. (जिवंत) हे सारे चैतन्य परमात्म्याचीच इच्छा आहे. ह्याच परम चैतन्याच्या कृपेनेच आज आम्ही मानव अवस्थेपर्यत पोहचलो. आम्ही कोण आहोत याचे खरे ज्ञान हे परमचैतन्यच देऊ शकेल. ज्याच्यामुळे आम्ही जाणू शकतो आम्ही काय आहोत, कोठे आहोत, आमची स्थिती काय आहे. आमचे लक्ष्य काय आहे. याच शुद्ध ज्ञानानेच आपण आत्मस्वरुप होऊन जातो आणि परमात्म्याचे अस्तित्व सामूहिक होण्यामुळे आम्हाला सामूहिक चेतना निर्माण होते आणि आम्हाला ज्ञान होते की, आम्ही विराटाचे अंग,प्रत्यंग आहोत. त्या परमचैतन्याशी आम्ही एकरुप होतो. तेव्हा आमचे चित्त प्रकाशित होते. त्या प्रकाशित चित्ताने आम्ही खूप काही जाणू शकतो. जे आम्ही यापूर्वी कधीच जाणले नव्हते.

चक्र, लहरी, कुंडलिनी यांचे ज्ञान म्हणजे शुद्ध विद्या नाही. सर्व शक्तिमान परमात्म्याचे ज्ञान हीच शुद्ध विद्या. हे ज्ञान बौद्धिक स्वरुपाचे नाही. हृदयापासून सुरु होऊन सहस्त्रारापर्यंत जाते. हे एक असे ज्ञान आहे जे आपल्याला आनंदाची अनुभूती देते. ज्याप्रमाणे आपल्या आईला बघितल्याबरोबर तिचे प्रेम जाणतो त्या प्रेमाची व्याख्या करु शकत नाही. त्या प्रेमाचा उदय आपल्या हृदयातून होतो.

प्रेम सत्य आहे आणि सत्य प्रेम आहे. हे प्रेम मात्र परमेश्वरी प्रेम आहे. ह्याच प्रेमाने आमच्या विकासाची व्यवस्था केली आणि आम्हाला मानवी चेतनेच्या स्तरापर्यंत आणले. ईश्वरी प्रेम शाश्वत आहे; काही काळासाठी कमी होऊ शकते. आमचे उपकार आणि लक्ष्य प्राप्तीसाठी परत यावे लागते.

परमेश्वराशी कमी, जास्त संबंधाची, स्थिरता न होणे ह्या गोष्टीची जाणीव विद्यमान शक्ती होऊ देत नाही.

आता मात्र तुम्ही ह्याचा अनुभव घेऊ शकता. सत्याची जाणीव तुमच्या मध्य नाडी तंत्राच्या साहय्याने करु शकता, हे विचाराने होत नाही. सत्य अबाधित आहे व सर्व त्याचा अनुभव घेऊ शकतात. जे पूर्ण आहे व अबाधित आहे त्याबद्दल वादविवाद किंवा अनुभव वेगवेगळे असू शकतात. या गोष्टीचा जर आम्ही स्वीकार केला तर असे लक्षात येते की, ह्या सत्याचा अनुभव घेण्यासाठी आम्हाला मानवी चेतनेच्या पुढे जावे लागेल.

प.पू. श्री माताजी - मद्रास - १३.०२.१९९०

आम्ही असा का विचार करतो, आमच्याशिवाय ह्या जगात कोणी नाही. आपण तर ह्या रंगमंचावर आलो सुद्धा नाही. आपल्या मागे पुढे किती लोक चालतात, आपले रक्षण करतात, आपण अजून परमेश्वराला ओळखले नाही, त्याचे फक्त नावच घेतो. त्या परमेश्वराच्या चुका काढतात, दोष देतात. जर काम झाले नाही तर लगेच परमेश्वर नाही, असे म्हणण्याचे धाडस करतात. नाव ठेवण्याव्यतिरिक्त आपण त्याच्यासाठी काहीच केले नाही. आपण काही करा अगर नाही तरी तो परमेश्वर प्रेममय, कृपाळू, दयाळू पिता आहे. आपल्यासाठी जे करायचे, ते करतो, आपल्याला त्याच्या साम्राज्यात आणण्याची त्याची मनापासून इच्छा आहे. परमेश्वरी साम्राज्यात येऊन त्या सिंहासनावर विराजमान व्हावे असे त्याला वाटते.

त्याचे हे सिंहासन आपल्या सहस्त्रारात आहे. तेथे तुम्हाला प्रवेश करावयाचा आहे. ब्रम्हरंध्र छेदल्यावर त्याच्या कृपेचा जो आशीर्वाद मिळेल तो अनुभव आपल्या नसावर जाणवेल. आपल्या चरित्रात जाणवेल, व्यवहारात जाणवेल, मित्रांबरोबर जाणवेल, समाजात जाणवेल. एवढेच नव्हे तर आपल्या देशात व संपूर्ण विश्वात जाणवेल.

प. पू. श्री माताजी - दिल्ली - १६.०२.१९८५

## परमात्मा - अवतरण

मानव निर्माण होईपर्यंत विष्णूशक्तीने स्वतः अवतार घेतले. आपल्याला परमेश्वराने अवतार घेतलेला माहीत आहे. प्रथम माशाच्या स्वरुपात अवतार घेतला. नंतर कासव रुपात. कासवाच्या नंतर वराह. जसजशी मानवाची प्रगती होत गेली तसतशी परमेश्वराने स्वतः ह्या संसारात जन्म घेतला, आपल्याला मार्गदर्शन केले. त्याच्याशिवाय आपल्याला कोण मार्गदर्शन करेल; फक्त विष्णु शक्तीच अवतार घेऊ शकले, महाकाली शक्ती सुद्धा ज्या शक्तीला शिव-शक्ती म्हणतात, ती अवतार घेते. जेव्हा भक्तांवर संकट येते तेव्हा देवीने स्वतः येऊन आपल्या छायेखाली भक्तांचे संरक्षण केले. श्री विष्णुचे अवतरण श्री कृष्ण आहे.

प.पू. श्री माताजी, मुंबई - २४.०९.१९७९

दशावतार झालेत हे आपण जाणतो. ते झालेत की नाही, त्याचंप्रमाण देण्यासाठी आम्ही (आदिशक्ती) आलो आहोत. हे दहा अवतार झाले आणि त्यामुळेच आपली प्रगती झाली. अधिकतर अवतरण श्री विष्णुजींचेच झाले. त्याचा अर्थ असा की, ते आमच्यात धर्माची स्थापना करुन उत्क्रांतीचा मार्ग तयार करतात.

निराकार परमेश्वर साकार रुपात आला. त्याला यावेच लागले, त्याशिवाय तुम्ही कसे ओळखणार, जसा एखादा दिवा जळतो त्याची ज्योत दिसते, म्हणजे त्या ज्योतीचा आकार दिसतो. पण सर्वत्र पसरलेला प्रकाश निराकारच असतो. त्याप्रमाणेच निराकार जर साकार स्वरुपात आपल्यासमोर आला नाही तर निराकाराला आपण ओळखू शकणार नाही. त्यामुळेच अनेक अवतार पृथ्वीवर आले. साकारमध्ये श्रीराम, परशुराम, श्री कृष्ण साक्षात ह्या पृथ्वीवर आले आणि आम्हाला मानव बनवले. त्यांच्यामुळेच आपण बनलो व त्यांच्यामुळेच आपण जाणले की, ह्या पृथ्वीवर परमेश्वराचे अवतरण होते. तो साकार रुपात अवतरीत होतो.

परमेश्वर पृथ्वीवर अवतार घेत आहेत. हे समजल्यावर लोकांनी भक्ती सुरु केली. भक्ती सुरु करुन ते त्यातच रममाण झाले. आपल्या मनानेच मूर्ती, देव बनवायला सुरवात केली. पण त्यांची प्राणप्रतिष्ठा केली नाही, जागृती दिली नाही. नियमानुसार न केल्याने सुरुवातीलाच अडखळले. त्यानंतर लोकांनी मूर्ती बनवणे बंद केले आणि निराकारावर लक्ष दिले. कधी निराकार तर कधी साकार अशी लढाई सुरु झाली. म्हणजे नेमके काय हे कळलेच नाही.

म्हणजे एकाने फुलाची तर दुसऱ्याने मधाची, पण चर्चाच झाली, निष्कर्ष निघालेच नाही. आदिगुरु दत्तात्रेय. ते आदिगुरु आहेत ते अनेक वेळा पृथ्वीवर आले अवतरण म्हटल्यावर लोक त्यांना चिकटले. जसे राम, राम, राम, रस्त्यातून चालत असताना, बाजारात, कोठेही जा राम, राम, राम कोणालाच अक्कलच नव्हती रामाचे नाव कसे घ्यावे प्रत्येक वेळी रामनाम जप करत राहिले.

यासाठी खालीलप्रमाणे विश्लेषण केले.

श्री दत्तात्रेय राजा जनकाच्या रुपात अवतरले आणि त्यांनी नचिकेताला ओळखताच आत्मसाक्षात्कार दिला होता.

मोहम्मद साहेब ही श्री दत्तात्रेयच होते. त्यांची मुलगी फातिमा ती साक्षात जानकी होती.

मोहम्मद साहेब पुन्हा आले, त्यांनी गुरुनानक नावाने कार्य केले. गुरुनानकांची बहिण नानकी ही साक्षात जानकी होती.

हे सर्व निराकाराबद्दलच बोलत होते. कारण त्यांना माहीत होते की, माणसाला जर कळले ते अवतार आहेत तर त्यांना माणसांचा त्रास झाला असता, माणूस त्यांना चिकटला असता. त्यांनी आपल्या धर्माला सतत सांभाळले. शेवटी शिर्डीचे साईबाबा म्हणून आले. श्री दत्तात्रेयांचे अनेक अवतार झाले. ते काही मानव नव्हते. ते परमेश्वराच्या अबोधितचे तत्त्व होते, त्यांचे अवतरण होते. त्यांचे जीवनही निर्मल आणि निष्पाप होते. आपल्याला आश्चर्य वाटेल की, सीतेला दोन मुले झाली त्यांची नावे लव-कुश. दोघांनी हिंदुस्थान सोडला व उत्तरेकडे निघून गेले. लव

क्रोकेशियस (एशिया) कडे गेले व तेथे राज्य केले, तर कुश चीनकडे गेले, तेथे राज्य केले.

आता जी आमच्या आत धर्म व्यवस्था तयार झालेली आहे, त्यात अवतरण येत गेले पण अतिशय गुप्तपणे कार्य झाले. त्यावेळेस हीच दोन मुले पृथ्वीवर अनेक वेळा जन्माला आली. त्याबद्दलची माहिती आम्हाला नाही. (लोकांना) त्यानंतर आलेले बुद्ध, महावीर दुसरे तिसरे कोणी नव्हते तर ते लवकुश म्हणजे रामाची मुलंच होती आणि लोक म्हणतात आम्ही बौद्ध झालो तर कोणी जैन, पण ते होते कोण? ते तर सनातनी, सगळे सनातनीच होते.

जेव्हा आपण म्हणतो की, आम्ही सनातनी आहोत. आपण विचार केला पाहिजे की, सनातन्यांचा पदर (आंचल) फार मोठा आहे; त्याखाली सर्वच झाकले जातील. म्हणून सर्वच सनातनी बनले. बुद्ध आल्यावर त्यांनी मूर्तीपूजेला विरोध केला. म्हणजे मूर्तीपूजा करु नका, हे करु नका, ते करु नका कारण मूर्तीपूजेचे स्तोम माजवले होते. बौद्धधर्म मात्र फारच वाईटरित्या पसरला आणि ते सर्व शिष्य खुप मूर्खासारखे वागले, त्यामुळे त्यांनीच खुद्द (बुद्धांनी) परत जन्म घेतला, कारण बौद्ध धर्माची अवनती, गोंधळ भोंगळपणा आणि समाजाची वाताहात हे सर्व त्यांना सहन झाले नाही. त्यांनी पुन्हा हिंदू धर्माचे संस्थापक शंकराचार्यांच्या रुपात जन्म घेतला, त्यांना आपण मानतो. ते बुद्धच होते, त्यांना आपल्याच ज्ञानाचे विश्लेषण करावयाचे होते. बौद्ध धर्मियांना कोण समजावेल की, बौद्ध म्हणजे जागृत, ज्ञानी, म्हणजे ज्याने जाणले आहे. असे कितीजण बुद्ध आहेत?

भांडणासाठी माणसाला कोणते ना कोणते कारण लागतेच. पण भांडणाचे कारण काय? भांडणाचे काही ना काही कारण शोधतातच, कसे शोधतात काय माहीत. आदि शंकराचार्य म्हणाले की, 'न योगेने न सांख्येन' योगाने किंवा (सांख्य) संख्या काहीच होणार नाही. आईच्या कृपेनेच सर्व काही होईल. तीच सर्व करेल, कारण ते शक्तीचे काम आहे. म्हणून आम्ही सर्व शक्तीचे पुजारी आहोत. आपला कोणताही धर्म असला किंवा कोणत्याही धर्मात तुम्ही असलात तरी शक्तीचेच पुजारी

आहोत. शक्ती काय आहे. ती ब्रम्हाची शक्ती आहे. ब्रम्ह काय आहे? ती परमेश्वराची इच्छा आणि परमात्म्याचे प्रेम. जर परमात्म्याला आपल्याबद्दल प्रेम नसते तर ही डोकेदुखी कशाला घेतली असती, सर्व सृष्टी तयार करणेच एक मोठे दु:ख आहे. इतकी मोठी सृष्टी बनवली कारण तुमच्याबद्दल प्रेम होते, त्या प्रेमानेच तुम्हाला त्या साम्राज्यात उतरायचे होते.

सर्वात सनातन गोष्ट ही की, आम्ही ब्रम्हशक्तीपासून बनलो व ती शक्ती आम्हाला प्राप्त करावयाची आहे. तुम्ही जर त्या शक्तीला जाणले नाही तर ती तुम्ही कशी मिळवणार. ब्रम्हशक्तीला मिळवायचे आहे, त्यानंतर सर्व ब्रम्हविद्या आपल्याला पूर्णपणे समजून घ्यायची आहे.

प.पू. श्री माताजी - १७.०२.१९८१

आमच्यासमोर अनेक संतांचे उदाहरण असतानाही आपण कसे विसरतो की, ते ह्या जगात स्वत:साठी आले नाहीत. त्यांना जन्म घ्यायची गरजच नव्हती, त्यांनी सर्व मिळवले होते. ते आम्हाला देण्यासाठी आले जे त्यांना द्यायचे होते, ते आमच्याजवळ येऊन दिले. आमच्या आत, शरीराच्या अंतर्गत भागात करुन दिले. फक्त काम केले त्याची मात्र माहिती नाही. बाहेरुन आपण त्यांचे गुणगान करतो. स्तुती करतो, परंतु अजूनही आम्ही त्याबाबतीत अज्ञानात आहोत. ते आमच्या आत स्थित असलेल्या गोष्टींचे कार्य करण्यासाठी तत्पर आहेत. हे जाणले नाही.

चिरंजीव, भैरव, हनुमान ही वेगळ्याच प्रकारची व्यक्तित्वे आहेत. हे सर्व अवतार आहेत. हनुमान नंतर देवदूत गैब्रीलच्या रुपात आले, तर भैरवनाथ संत मायकेलच्या रुपात, नाव जरी वेगळी असली तरी ते एकच आहेत.

प.पू. श्री माताजी - १५.०२.१९७७

मोठमोठे देवदूत आणि मोठमोठे चिरंजीव आपले जीवन सांभाळण्यासाठी आपल्या पाठीशी उभे राहिले.

प.पू. श्री माताजी - दिल्ली - १०.०२.१९८१

पुष्कळसे अवतरण काही चक्रांपुरतेच (पर्यंतच) मर्यादित राहिले आणि काही स्वतःच आपल्या आसपासच्या लोकांमध्ये ती चक्र स्थापित करण्यात रमले. त्यांनी प्रयत्न केला, कार्यान्वितही केले परंतु ती खरोखर ते कार्यान्वित होऊ शकले नाहीत. म्हणून आदिशक्तीला यावे लागले, ते सर्व अवतरण आदिशक्तीबरोबर आलेत. ते सर्व आपल्याबरोबर आहेत व आपल्याला मदत करु इच्छितात. प्रत्येक चांगले कार्य, जे आपण करु इच्छितात त्यासाठी ह्या पवित्र लहरी किंवा चैतन्य आपल्याबरोबर राहो, अशी त्यांची इच्छा आहे.

प.पू. श्री माताजी - २०.०६.१९९९

मंथनाला सुरुवात झाली आहे. आपणास ते कळते की नाही त्याचा अंदाज नाही. जेव्हा आम्ही दही घुसळतो तेव्हा लोणी वरती येते त्यात आम्ही थोडे लोणी टाकून देतो, सगळे काही काढत नाही. हे समजून घ्या अवतार आहे, हीच परमेश्वराची कृपा आहे. ते सर्व त्या लोण्यालाच चिकटते आणि सर्व एकसारखे होते.

प. पू. श्री माताजी - १०.०२.१९८१

ज्या गोष्टी मी तुम्हाला सांगते, त्या पुस्तकात सुद्धा मिळणार नाहीत, कारण मीच फक्त जाणते म्हणूनच तुम्हाला सांगते. मी आई आहे म्हणूनच तुम्हाला खरं तेच सांगते.

प. पू. श्री माताजी - १३.०७.१९९४

❋ ❋ ❋

यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत:!

अभ्युत्थान धर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम ।।९।।

परिमाणाय साधुनां विनाशायच्च दुष्कृताम ।

धर्म संस्थापनार्थाय सम्भवामि युगेयुगे ।। ८ ।।

हे भारत जेव्हा जेव्हा धर्माची हानी आणि अधर्म वाढतो

तेव्हा तेव्हा मी माझ्या रुपाला प्रकट करतो.

साधुंचा उद्धार आणि दुष्टांचा नाश करण्यासाठी व

धर्माच्या स्थापनेसाठी युगायुगाने प्रकट होतो.

श्रीमद्भगवदगीता - ४ था अध्याय

# प्रकरण १३

## आत्मसाक्षात्काराचा अर्थ आणि आशीर्वाद

आत्मसाक्षात्कार कुंडलिनीच्या जागृतीचा आशीर्वाद आहे. आत्मसाक्षात्कार योग आहे. एकीकरण, लहान ब्रम्हांडाचे मोठे ब्रम्हांडाशी योग. आमच्यात कुंडलिनी शक्ती जागृत होणे त्या शक्तीला परमात्म्याच्या सर्वव्यापी शक्तीशी जोडणे, यालाच आत्मसाक्षात्कार म्हणतात.

प.पू. श्री माताजी - मे १९८३

आपल्याला आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला याचा अर्थ असा की, सर्व शक्तिमान परमात्म्याचे प्रतिबिंब आपल्या चित्तात कार्यरत आहे. आत्म्याच्या शक्तीमुळे आपले चित्त प्रकाशित झाले.

प.पू. श्री माताजी - २२.०३.१९८४

आमच्या हृदयात जो आत्मा आहे, तो साक्षी स्वरुपात बसलेला आहे. कुंडलिनी जेव्हा जागृत होते तेव्हा मस्तकातील ब्रम्हरंध्र छेदल्यावर परमेश्वरी प्रकाश त्याला प्रकाशित करतो. परमेश्वराचेच प्रतिबिंब आमच्या हृदयात आत्म्याच्या रुपात आहे. आमचा आत्मा जसा जागृत होतो त्या आत्म्याच्या चारी बाजूला सात चक्रांचे मंडल जागृत होते. म्हणून हे सात मंडल आमच्या हृदयात जागृत होतात हे मंडल जागृत झाल्यामुळे आमचे मस्तक, नसा, अतिशय सूक्ष्म रितीने उघडतात. त्यांच्यामध्ये शोषून घेण्याची जी शक्ती आहे, ती वाढते. सत्याला शोषण करण्याच्या शक्तीत वाढ होते म्हणून माणूस उभा राहू शकतो. (सक्षम बनतो).

आजपर्यंत मनुष्य कधीच सत्याच्या बाजूने उभा राहिला नाही. तो सत्याला ऐकतो, जाणतो, पाहतो, परंतु त्यावर उभा राहू शकत नाही. सत्याला आत्मसात करण्यासाठी, आत्म्याच्या जागृतीसाठी, आज ते सहजयोगात शक्य आहे.

आत्मा प्राप्त करण्यासाठी ती शक्ती आपल्या आतमध्ये जागृत झाली. त्यामुळे आपण सत्याला आत्मसात करु शकतो. सत्य आपल्या आत जागृत होऊ

शकते. दुसरा कोण आहे? सर्व काही आम्हीच आहोत. आमच्या आत सर्व काही आहे. आपल्याला सामूहिक चैतन्य पण मिळते.

प. पू. श्री माताजी - ०३.११.१९८६

मानवात जीवंत कुंडलिनी शक्तीचे सर्वव्यापक शक्तीशी (दैवी शक्ती) एकाकरिता झाल्यानंतर ती व्यक्ती अध्यात्मामध्ये आपली प्रगती करु लागते. आपल्या (अंतस) आतमध्ये व्यक्ती आध्यात्मिकतेला स्पर्श करते. एक नव्या आयाम, चौथे आयामपर्यंत प्रगती करतो. संतांसारखे बुद्धिमान व्यक्तित्व विकसित होते. हेच व्यक्तित्व सहज रुपात आपले रुप अभिव्यक्त करते. शुद्ध विद्याद्वारा सर्व व्यापक शक्तीला सांभाळणे शिकतो, ह्या नवीन आयामात फार गतीने प्रगती करतो.

प. पू. श्री माताजी - सहजयोग

चैतन्य लहरीच्या साहाय्याने परमेश्वर साक्षात आहे का? सत्य साक्षात आहे का? हे जाणू शकतो. कारण आपल्या आतमध्ये एक नवी चेतना ज्याला आपण लहरी (चैतन्य) म्हणतो. चैतन्यमय चेतना आली. त्यामुळे जे आपले (व्द्धारएन्एस्स) वर्तन आहे ते प्रकाशित होते. त्यातूनच आपण परमेश्वर आहे की नाही ते सिद्ध करु शकतो. परमात्म्याची शक्ती, ती कशी चालते, आमच्या आत चक्र आहेत का नाही, चक्रांमध्ये देवी देवता आहेत का नाही. आमचे उत्थान कसे होते, आम्ही स्वतःला व इतरांना बरे कसे करु शकतो. कोणाला कोणता आजार आहे. म्हणजे अनेक लहान, मोठ्या गोष्टींचा निर्णय आपण करु शकतो.

प. पू. श्री माताजी - दिल्ली - ०३.०२.१९७८

यावरुन आपण कल्पना करु शकतो की, आपल्याला कोणती महादीक्षा प्राप्त झाली. प्रथम दीक्षा प्राप्त होते. ज्या दिवशी आपली कुंडलिनी जागृत होते ती आपली दीक्षा आहे. त्यानंतर आपल्याला आत्मसाक्षात्कार मिळतो.

आत्मसाक्षात्काराचा अर्थ हा आहे की, आपल्याला पूर्ण ज्ञान प्राप्त झाले. मंत्र आणि कोणत्या चक्रांसाठी कोणता मंत्र तयार करायचा याचे ज्ञान होते. सर्व चक्रांना पाहण्याची शक्ती येते. कोणत्या चक्राला मदत गरज आहे कळते.

आपल्याला दुसऱ्यांची कुंडलिनी जागृत करण्याची शक्ती येते. जर कुंडलिनी खाली गेली असेल तर तिला उठवून वरती (सहस्त्रारवर) बांधण्याची शक्ती येते. चक्रांना बंधन देऊन त्यांना स्थापित करण्याची शक्ती मिळते. बंधनामुळे नकारात्मकतेपासून आपले संरक्षण करण्याची शक्ती आपल्यात आहे. आपल्या चित्ताला आपण कोणत्याही स्थानावर घेऊन जाऊ शकतो.

कुंडलिनी जागृतीच्या मार्गात येणाऱ्या बाधा आपण दूर करु शकतो. आपले सर्वच मंत्र प्रभावशाली आहेत. आपण कोणत्याही देवी देवतांचे नाव घ्या, आपले मंत्र सिद्ध व प्रभावशाली आहेत. एखादे चक्र पकडले असेल तर त्या चक्राचा मंत्र म्हटला की ते चक्र ठीक होते. कारण आपल्याला सर्व मंत्रांचे ज्ञान आहे. मंत्रांचे महत्त्व जाणतात. त्यांचे रहस्य जाणतात. आपल्याला सर्व देवी देवतांचे पूर्ण ज्ञान आहे. देवी, देवता नाराज का होतात, अडचणी कोणत्या देवी देवता का कोपित होतात. कोणत्या कारणाने नाराज होतात. हे कळते.

प. पू. श्री माताजी -०२.१२.१९७९

सहजयोगाचे ज्ञान प्राप्त करुन घेतले म्हणजे संपले नाही. ज्ञान झाले, आपल्या नाडीयंत्रावर आपण ज्ञान मिळवले, जे लोक उलट्या बाजूने चालतात, त्यांना असे वाटते ज्ञान मिळवणे म्हणजे जाणणे. बुद्धीने जाणणे म्हणजे आम्ही पुस्तक वाचून जाणून घेऊ किंवा एखाद्या गुरुजवळ बसून, नाहीतर कोणाकडून उपदेश ऐकून ज्ञानाचा अर्थ जे स्नायुतंत्र आहे त्याचे ज्ञान तोच बोध, तेच ज्ञान, (आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर आलेला अनुभव). आज आपण बुद्ध आहोत कारण जाणीव झाली आहे. (समजले) बोध झाल्यावर आपोआपच आपले चरित्र बनते. कुंडलिनी जागृत झाल्यावर आपले चरित्र बनेल. कुंडलिनी आपल्याला सुधारेल. जेव्हा आपण सत्याच्या बाजूने उभे रहाल, तेव्हा सुरवातीला थोड्या थोडक्या अडचणी येतील. त्या हळूहळू ठीक होतील. आता आपण विचार केला पाहिजे की, आपल्याला ज्ञान प्राप्त झाले, आता आपले चारित्र्य बनवले पाहिजे. चरित्र बनवण्यासाठी

आम्हाला तप व ध्यान करावे लागेल. कोणत्याही परिस्थितीत ध्यान व तप केलेच पाहिजे.

प. पू. श्री माताजी - ०३.११.१९८६

कुंडलिनीची जागृती झाल्यावर व्यक्तीमध्ये जे दहा संयोजक आहेत (दहागुरु) त्यांची पण जागृती होते. धर्म स्थापित होतो व आमच्यात सर्व प्राथमिकता बदलतात, सर्व प्रकारच्या धर्माचे लक्ष्य एकच आहे. सहजयोग. एखाद्या धर्मापुरता मर्यादित न रहाता सर्व धर्माचे सारतत्त्व ह्यात आहे. (सहजयोगात). खरंतर सर्व धर्म एकाच ध्येयाकडे, लक्ष्याकडे घेऊन जातात. ते लक्ष्य आहे आत्मसाक्षात्कार मिळवून पुर्नजन्म मिळवणे. संस्कृत भाषेत पक्षाला द्विज म्हटले जाते. दुसऱ्या वेळा जन्मलेला कारण पक्षी प्रथम अंड्याच्या स्वरुपात असतो, नंतर दुसरा जन्म घेतो. त्याप्रमाणेच आत्मसाक्षात्कार प्राप्त करुन ब्रम्हज्ञान मिळवणारा व्यक्ती द्विज होतो.

आमच्या आत दहा धर्माची जागृती झाल्यावर आम्हाला समजते की, सर्व धर्माची उत्पत्ती अध्यात्मिकतेच्या स्त्रोतातून झाली सहजयोगात कोणत्याही धर्माचा व्यक्ती येऊ शकते आणि तो जाणतो आम्ही सर्व एकाच धर्माशी संबंधित आहोत, हाच सर्व धर्मांचा सिद्धांत आहे. सहजयोगात कोणतीच कहरता, भांडण, लढाई नाही. प्रत्येक व्यक्ती स्पष्ट पाहू शकतो की, पूर्वी ज्या धर्माचे पालन करत होतो. तो कोठे कोठे भटकला आहे, कोणत्या चुका केल्या, त्या चुका सहजपणे सुधारण्याची योग्यता त्याच्यात सहजयोगामुळे येते.

प. पू. श्री माताजी, सहजयोग

आपण सतत सर्वव्यापक शक्तीबरोबर जोडले जातात. त्या शक्तीचे एक अंग बनतात. कुंडलिनी क्षमेचा सागर आहे. अर्थात भूतकाळात झालेल्या सर्व चुकांना क्षमा केली जाते. आपली जी सूक्ष्म ऊर्जा केंद्र (चक्र) त्यातून येणाऱ्या चैतन्याचा अनुभव आपण आपल्या बोटांच्या पेऱ्यावर घेऊ शकतो व सत्याची जाण येते. जात, धर्म, इतर मानसिक विचारातून आपण बाहेर येतो व वास्तविकता काय आहे ते समजते, जाणतो, अतिशय महत्त्वाची गोष्ट घटित होते ती म्हणजे आपण

निर्विचार स्थितीत जातो. जेव्हा आपण निर्विचार स्थितीत जातो तेव्हा पूर्णपणे शांत होतो. आपण आंतरिक संतुलनाचा अनुभव घेतो, चांगल्या आरोग्याचा अनुभव घेतो. आपले चित्त पण खूप पवित्र बनते. आपण अति शक्तिशाली बनतो. आपण पूर्ण सुरक्षित आहोत. याची आपल्याला जाणीव होते. याप्रमाणे आपण आत्मविश्वस्त होतो. अहंकारसुद्धा आपल्याला स्पर्श करीत नाही. आपले सगळे व्यक्तित्वच बदलते. आपण आपल्या जीवनाच्या नाटकाचे दृष्य बनतो. आता आपल्याजवळ एक श्रेष्ठ ऊर्जा (चेतना) आहे. तिला निर्विकल्प समाधी म्हणतात. आपण संपूर्णतेच्या आनंद सागरात डुंबतो आणि आपण प्रकृती, मानव आनंद लुटतो आणि आपण परमेश्वरी साम्राज्याचे नागरिकत्व मिळवतो.

प. पू. श्री माताजी - १३.०९.१९९५

व्यक्तीला हे समजले पाहिजे की, पूर्ण सुरक्षित शांतीला आमचे उत्थान होते, ते कसे कार्य करते, त्याची जाणीव करुन घ्यावी. आमचीच मूल्ये आणि योगी पदाचा आनंद कसा घ्यायचा आहे? सहजयोगी कधीच अहंकारी नसतो. आपली स्थिती (ध्यानातील) कशी आहे, याची बढाई मारत नाही. याउलट तो अधिक नम्र बनतो. शिवाय ही अवस्था सर्वांना प्राप्त व्हावी म्हणून मदत करतो. अशा व्यक्तीला पूर्ण विश्वाच्या हिताची काळजी असते. ही काळजी त्याला धर्म स्वरुपात असते. त्याच्यावर कोणी लादलेली नसते. ती अंतर्गतच उत्पन्न झालेली असते, कारण त्याने हे कार्य करावे यासाठी तो कोणताच गुन्हा करु शकत नाही, त्याचे जीवन गुन्हारहित बनते. एवढेच नव्हे तर गुन्ह्याबद्दल तिरस्कार वाटतो. ह्या विकास प्रक्रियेमुळे त्याच्यात गुन्हा, चुका याच्या प्रति तिरस्काराची भावना निर्माण झाली आहे. अशाप्रकारे व्यक्ती संपूर्ण विश्वाला बदलून टाकेल.

सहजयोग व्यक्तीला सत्य वागणारे व कपटी लोकांना ओळखण्याची आध्यात्मिक संवेदनशीलता देतो. दुसऱ्यांचे कष्ट व आपल्यातील कमतरता जाणण्याची संवेदना देतो. व्यक्ती स्वत:च स्वत:चा न्यायाधीश बनतो. जेथे व्यक्ती आपला निर्णय स्वत: करेल तोच अंतिम निर्णय आहे. कुंडलिनी निर्णायक बनेल.

माणसाला हे समजले पाहिजे की, हा धर्म सर्व धर्माचे सार आहे. हाच धर्म खरा अंतरीक अनुभव आपल्याला देऊ शकतो.

अध्यात्मात आपल्याला संवेदनशील बनवतो. ही संवेदनशीलता, अनेक भाषणे, उपदेश किंवा पुस्तके यातून मिळवली जात नाही. त्यामुळेच सहजयोगी सर्व अवतरणे आणि संतांना जाणतो आणि त्यांचा सम्मानही करतो. या दिव्य धर्माच्या काही विधी त्याला शेवटपर्यत जीवित आणि कार्यरत ठेवतात. ह्या गोष्टी आपण लक्षात घेतल्या पाहिजेत.

सहजयोगाची कार्यप्रणाली आणि कुंडलिनी यांना चांगलं समजून घेतले पाहिजे. कार्यप्रणाली व कुंडलिनी सर्वव्यापक शक्तीशी सतत जोडली रहावी. यासाठी सांगितलेली विधी समजून घ्यावा. व्यक्तीला समृद्ध करण्यासाठी ध्यान, ध्यानमग्न स्थिती सांगितलेली आहे. ध्यान नुसते करायचे नाही तर सतत ध्यानातच राहिले पाहिजे.

प. पू. श्री माताजी - सहजयोग

# प्रकरण १४

## आत्मसाक्षात्कारात स्थिरता

सहजयोगी बुद्धिवान असतात. ज्यांची कुंडलिनी जागृत करुन आत्मसाक्षात्कार प्राप्त होतो. ते अंकुरित बी प्रमाणे आहे. त्यांची अध्यात्मामध्ये जिवंत प्रक्रिया सुरु झाली. सर्व जिवंत कार्य करणारी सर्वव्यापक शक्ती (ब्रम्हचैतन्य) च्या लहरीचा अनुभव ज्यांनी घेतला नाही, ते सहजयोगी नाहीत.

आपल्या आत असलेल्या सूक्ष्म तंत्र - कुंडलिनीची उर्वरित शक्तीचे पुर्णज्ञान नसले तर ते सहजयोगी नाहीत. मध्य नाडी तंत्र, कमीत कमी आपल्या हाताच्या बोटांवर त्या परमेश्वराच्या सर्वव्यापक प्रेमशक्तीचा अनुभव केला पाहिजे. आपल्या अनुभवाचे रहस्यांचे ज्ञान झाले पाहिजे.

सर्वव्यापक शक्तीचे हे चैतन्य प्रत्येक वेळी वाहत राहिले पाहिजे. जर त्या लहरी (चैतन्य) थांबल्या तर ते चैतन्य पुन्हा सुरु करणे व कुंडलिनी जागृत करणे याचे ज्ञान असले पाहिजे. सर्वव्यापक शक्तीशी संबंध जोडण्याची हीच पद्धती आहे. ह्या शक्तीच्या अनुभवानंतर अजूनही आपली कुंडलिनी पूर्णपणे स्थापित झाली नाही हे कळले पाहिजे. सामान्य स्वरुपात आम्ही हे म्हणू शकतो की, आत्म्याचा परमात्म्याशी संबंध जोडला जाणे हाच महत्त्वाचा भाग आहे. यावरुन समजले पाहिजे की, कुंडलिनी पूर्णपणे स्थिर झाली नाही.

जर बी पासून अंकुर फुटणे सहज आहे, माळ्याला त्या नाजूक रोपाची देखभाल करावी लागेल. तसेच साधकाला सुरवातीपासूनच आपल्या आत्मसाक्षात्काराला सांभाळावे लागेल. काही लोक अत्यंत सहजपणे गहनता प्राप्त करतात. काही सहा, सात महिने किंवा त्यापेक्षा ही मोठ्या कालावधीपर्यंत कार्य करुनही स्थिर होत नाहीत. यासाठी आपल्याला सहजयोग, त्याची नियमावली, त्याचा अभ्यास यातून आपल्या समस्या कोणत्या आहेत हे जाणले पाहिजे.

प.पू. श्री माताजी - सहजयोग

सहजयोगात आल्यावर आपण आपली इज्जत, मान राखला पाहिजे. आपण संत आहात. त्यासाठी पूर्ण चित्त लावून बैठक करा (ध्यान) ध्यानाशिवाय हे

कार्य होऊ शकत नाही. जागृती मिळणे सोपे आहे. बी चे झाड बनवणे आपल्या हातात आहे. त्यासाठी सातत्य हवे.

प. पू. श्री माताजी-१६.०२.१९८५

सहजयोगाची प्राप्ती तर सहज होते. सहजयोगाला सांभाळणे कठीण आहे. हिमालयात आध्यात्मिक वातावरण आहे. पण आम्ही तेथे रहात नाही. अनेक प्रकारच्या वातावरणात आम्ही राहतो, शिवाय पूर्वाश्रमीच्या अनेक गोष्टी आम्हाला चिकटलेल्या आहेत म्हणून सहजयोगात शुद्ध बनणे, शुद्धता अंतर्गत स्थापित करणे हे कार्य आम्हाला करावे लागते. जसे पाण्याच्या नळात (तोटीत) काही भरलेले असेल तर पाणी येणार नाही. तसेच हे चैतन्य ज्या नसामधून (नाडीतून) वाहते. त्या नाड्या शुद्ध असल्या पाहिजेत. त्यासाठी नाडीचे शुद्धीकरण आम्हाला केले पाहिजे. त्यासाठी ध्यानाची गरज आहे.

प. पू. श्री माताजी - २७.११.१९९१

**सहजध्यान विधी**

सकाळी लवकर उठा, स्नान करुन ध्यान केले पाहिजे. सकाळी, सकाळी ध्यानाला बसले पाहिजे. सकाळी लवकर उठल्यामुळे त्या वेळेला माणसाची ग्रहणशक्ती जास्त असते. इतकंच नाही तर त्यावेळेला विश्वात ब्रम्हचैतन्य भरपूर असते.

प.पू. श्री माताजी, मुंबई- २५.०५.१९७६

अत्यंत नम्रतेने आपल्या हृदयाकडे लक्ष देऊन नतमस्तक व्हा. फोटो (श्री माताजींचा) समोर दोन्ही हात मांडीवर ठेवून, शांतपणे माताजींची परवानगी घेऊन ध्यानासाठी बसा. थोड्या थोड्या गोष्टीसाठी क्षमा मागावी लागेल. क्षमा मागा. "आमच्या कडून काही चूक झाली असेल तर माफ करा आणि आमच्याकडून ध्यान करुन घ्या." अशी प्रार्थना करा. ज्यांच्याशी आमचे वैर आहे त्याला क्षमा करतो, जर आम्ही कोणाबरोबर वैर केले असेल तर आपण आम्हाला क्षमा करा अत्यंत पवित्र भावनेने म्हणा व ध्यानात जा. डोळे बंद करुन आत्म्याकडे लक्ष द्या.

ध्यान करण्यासाठी जेथे बसता त्या जागेला बंधन द्या. स्वत:ला बंधन घ्या. (सात वेळा) फोटोला (श्री माताजींचा) बंधन द्या. त्यानंतर मनाला (चित्त) बंधन द्या. विशुद्धी, आज्ञा चक्राला बंधन द्या. हे परमेश्वरा, आम्ही तुझ्याच बंधनात रहावे, आमच्यावर कोणताच वाईट परिणाम न होवो अशी मनोमन प्रार्थना करा. श्रद्धापूर्वक प्रार्थना करा.

ध्यानाच्या वेळेस फक्त फोटोकडे दृष्टी ठेवून डोळे बंद करा, हात, पाय इकडे, तिकडे करण्याची गरज नाही. त्या वेळेस कोणतेही चक्र खराब असेल तर त्यावर दृष्टी टाकल्याने ते चक्र ठीक होऊन जाईल.

प्रथम आपली चक्रे शुद्ध झालीत, ठीक झालीत यावर लक्ष द्यावे. त्यानंतर आपल्या आत्मतत्त्वाचा विचार करा किंवा आपल्या वर किंवा आत्म्याकडे चित्त घेऊन जा.

आत्मा हृदयात असतो परंतु त्याचे पीठ सहस्त्रारच्या वरती आहे. हृदयात नतमस्तक व्हा व आपले चित्त सहस्त्रारकडे घेऊन आत्म्याकडे समर्पित करा. आत्मतत्त्वाचे सार पवित्रता आहे. पूर्ण निर्मल पवित्रता म्हणा. त्याच्याकडे नजर करा तो पूर्णपणे अलिप्त आहे. कोणत्याही गोष्टीत, वस्तूत अडकलेला नाही. जी गोष्ट किंवा वस्तू आपल्याला चिकटलेली आहे त्यामुळेच आपण आत्म्यापासून दूर आहोत. आत्मतत्त्व म्हणजे प्रेम, त्याचा विचार करा, हा फार मोठा विचार आहे. आत्मतत्त्व म्हणजे प्रेम, प्रेम आणि निखळ प्रेमच.

ध्यानात कोणताच असा विशेष विचार येऊ द्यायचा नाही. परंतु आपण असे म्हणू शकतो की, मी तेच प्रेम तत्त्व आहे, "मीच परमेश्वराची प्रेमशक्ती आहे". मी तेच आत्मतत्त्व आहे. असे २/३ वेळा म्हटल्यावर आपण आशीर्वादित व्हाल. कारण आपण सत्य बोलत आहात. त्यामुळे आपल्या आतून जोराने चैतन्य वाहायला सुरवात होईल.

प.पू. श्री माताजी - २७.०५.१९७६

ध्यानात जाण्यापूर्वी आपले कोणते चक्र पकडले आहे, हे तुम्हाला तुमच्या हातांच्या बोटावर कळेल. कोणते बोट गरम, जड किंवा त्याची आग होणे. त्या चक्राला बंधन टाकले तर ते चक्र सुटते. पण अधिकच पकड असेल तर हात झटकायचा आणि बंधन द्यायचे.

ध्यानात आपले डोळे लवत असतील, फडकत असतील तर समजावे आज्ञा चक्रावर पकड आहे.

आपले शरीर हालत असेल तर मूलाधार चक्रावर पकड (दुखापत) असेल. आपले हाथ जर थरथरत असतील तर आपल्या आतमध्ये खूपच मोठी खराबी झालेली आहे. त्यासाठी (शू बिटींग) जोडेपट्टीचा उपाय खूपच चांगला.

ध्यानात आपली प्रगती व्हावी यासाठी अतिशय महत्त्वाचा, जरुरीचा (गरजेचा) गुण म्हणजे अबोधितता(लहान मुलासारखे स्वच्छ, भोळेपण). हुशार, कपटी, धुर्त, जे आपल्याला चलाख समजतात असे लोक, शिवाय त्यांना परमेश्वराबद्दल प्रेम नसतेच फक्त आपलीच हुशारी दाखवतात ते ध्यानात प्रगती करु शकत नाहीत. त्यासाठी भोळेपण अबोधितता पाहिजे.

प. पू. श्री माताजी - ०१.०२.१९७५

ध्यानासाठी सहज सुख देणारी, आरामदायी स्वरुपात आपण बसले पाहिजे. उगाच हात पाय ताणून बसू नये, त्यावर कोणतेही दडपण नको. आपले हात मोकळे आपल्याला काही तरी अनमोल मिळते ह्यासाठी नमस्कार करताना दोन्ही हात वरती उघडी असले पाहिजेत. डोके जमिनीवर टेकवलेले हात, सहस्त्रारपासून दूर.

प. पू. श्री माताजी, कबेला - २१.०२.१९९१

ध्यान दोन प्रकारचीअसतात. अंतर्मन, बहिर्मन. आपल्या आतमध्ये जेव्हा ध्यान करतो तेव्हा आपल्या त्रुटी बघतो. त्या ध्यानाला अंतर्मन ध्यान म्हणतात. बाहेरच्या जगात आम्हाला कसे रहायचे आहे ते बहिर्मन ध्यान. अंतर्मन ध्यान महत्त्वपूर्ण आहे. प्रत्येकाने दररोज सकाळ, संध्याकाळ ध्यान केलेच पाहिजे.

प. पू. श्री माताजी, ब्रिसबेन - ०६.०८.१९९१

सकाळचे ध्यान आपल्याकडे पाहण्याचे ध्यान आहे. मी काय करतो? माझ्यात कोणते दोष आहेत. मला राग येतो का? त्या रागाला कसे नष्ट करु (शांत). मला अशी कोणती इच्छा आहे की, ती मला दुःख देते. मला संपवणारी गोष्ट कोणती. तिकडे मी का जातो. ह्या सर्व गोष्टींवर ध्यान दिल्याने आपले कोणते चक्र पकडले आहे. त्या चक्राला तुम्हाला स्वच्छ करावे लागेल. त्याला ठीक ठाक करुन परत ध्यानाला बसा, चक्राची व मनाची सफाई करा.

जे लोक सकाळी उठून ध्यान करणार नाहीत ते सहजयोगात कितीही कार्य करणारे असले तरी ते गहनतेला प्राप्त करु शकत नाही.

संध्याकाळचे ध्यान त्यात समर्पण ह्या वेळेला हा विचार केला पाहिजे की, मी सहजयोगाला काय दिले (केले). हे सर्व मन, तन, धन, बुद्धीने काय केले. संध्याकाळचे ध्यान (बाहेर) बाह्य गोष्टीसाठी, मी इतरांसाठी काय केले हे विचार आपले असले पाहिजेत. एक दिवस जेवले नाही तर काही बिघडत नाही, एखाद्या दिवशी आराम झाला नाही तरी बिघडत नाही, पण सहजयोग्यांनी ध्यान अवश्य केले पाहिजे, कारण ध्यानातच आनंद मिळतो. सकाळचे ध्यान ज्ञानासाठी, संध्याकाळचे ध्यान भक्तीसाठी.

प. पू. श्री माताजी - २७.११.१९९१

ध्यान रोजच करावे लागेल. जोपर्यंत ही तपस्या केली जात नाही, तोपर्यंत आपण पूर्ण स्वरुपात प्रकाशमान होऊ शकत नाही. जोपर्यंत तुम्ही ध्यान करत नाही तोपर्यंत आम्हाला समजू शकणार नाही. आम्हाला तुम्ही बिलकुल समजू शकणार नाही. कारण तुमच्यात अनेक दोष (त्रुटी) असतील आणि त्यांच्यातून आम्हाला पहाल. एक जरी चूक किंवा दोष, कमतरता तुमच्यात असेल तर त्याप्रमाणेच आम्ही तुम्हाला दिसू. आम्ही तुम्हाला खऱ्या स्वरुपात दिसणारच नाही.

**प. पू. श्री माताजी, दिल्ली - ०३.११.१९८६**

**आपण जर ध्यानधारणा करत नसाल तर आपल्याशी माझे कोणतेच नाते नाही. आपण सकाळ - संध्याकाळ नियमित ध्यान नियमानुसार ध्यान करीत नाही,**

तर आपण आईच्या छत्रछायेत नाही राहू शकत. कारण संबंध केवळ ध्यानातूनच प्रस्थापित होतो. सुरवातीला ध्यानाला जास्त वेळ लागतो, पण तुम्ही ध्यान समजून घेतले तर माझ्या बरोबरचा आनंद समजून घ्याल. माझ्यात एकाकारिता साधली तर तुम्हाला समजेल की, इतर माध्यमांची गरज संपली. आपण पूर्णपणे एकाकार झालात हे केवळ ध्यानातूनच शक्य आहे. पूर्ण निष्ठेने ध्यान केले तर आपल्याला सौंदर्य, मोठेपण सहजच मिळेल.

प. पू. श्री माताजी कबेला - ०६.०६.१९९३

आमच्या अस्तित्वाची शांती, सौंदर्य किंवा महानता आमच्यातच आत स्थित आहे. त्याचा महान सागर आमच्या आत आहे. त्याला बाहेर शोधण्याची गरज नाही. त्याला आतच शोधा ध्यानाच्या माध्यमातून त्याला शोधा व त्याचा आनंद घ्या.

प.पू. श्री माताजी सिडनी पूजा - १४ मार्च १९८३

आपण स्वतःच ह्या गोष्टी समजून घ्यायच्या आहेत. आपणच पहायच्या आहेत, आपणच जाणायच्या आहेत आणि आपणच प्रगती करावयाची आहे. सर्वच गोष्टींचे ज्ञान मिळवायचे आहे. परमेश्वरी विज्ञानाला व त्याच्या रहस्याला समजायचे आहे. तेव्हाच आपण गुरु होतो. आपले स्वामी आत्मा आहेत. आपल्याला ही स्थिती प्राप्त झाली पाहिजे. जे तुम्हाला दिले जाते ते तुमचेच आहे. मला यात काहीच करायचे नाही. मी फक्त उत्प्रेरक आहे.

प. पू. श्री माताजी - २२.०३.१९८१

ध्यानधारणा ही आपल्या आतली शांत स्थिती आहे.

विचारांची शांती, सागराची गहनता त्यात जाणे ही आपली अंतर्गत स्थिती आहे.

प. पू. श्री माताजी लासएंजिल्स - ०३.११.२००२

जर आपण आपल्या आत आनंद अनुभव करीत नाही तर आपल्यात आनंदाचा अभाव आहे. त्यासाठी सर्वोत्तम उपाय ध्यानधारणा करा. ध्यानधारणेतून तुम्ही जाणू शकाल. सहजयोग, चैतन्यलहरी यांचा आनंद कसा घ्यावा.

प.पू. श्री माताजी, जर्मनी - सप्टेंबर २००२

## प्रकरण १५

## ध्यानात गहनता आणि निर्विचार चेतना

सकाळी लवकर उठा ध्यान करा. बोलू नका. बस ध्यान करा. सकाळी दैवी चैतन्य किरण येतात, सूर्य नंतर उगवतो. चिमण्या चिवचिव करतात, फूलं उमलतात, सर्व जागे होतात.

ध्यानात आपले विचार थांबवण्याचा प्रयत्न करा. उघड्या डोळ्यांनी माझा फोटो पाहा विचार बंद करण्याचा प्रयत्न करा. विचारांना थांबवा. त्यासाठी सोपा उपाय आहे. जीझसची प्रार्थना - Lords Prayer ही स्थिती आज्ञाचक्राची असते. सकाळी जीझसची प्रार्थना किंवा गणेश मंत्रांचे स्मरण करा किंवा म्हणा. दोन्ही एकच आहेत. किंवा तुम्ही असेही म्हणू शकता "मी क्षमा करतो. ध्यानाला गणेशाच्या मंत्राने सुरवात करु शकता. नंतर जीझसची प्रार्थना (Lords Prayer) आणि मी क्षमा करतो यामुळे आपले विचार थांबतील. आपल्याला निर्विचार स्थिती येईल, मग ध्यान करा. त्या अगोदर ध्यानच होऊ शकत नाही.

आपण प्रथम निर्विचार स्थितीत या. त्यानंतर अध्यात्मिक स्थिती सुरु होते. या अगोदर नाही. तर्क व युक्तीच्या आधारावर आपण सहजयोगात उठू शकत नाही. (ध्यान होऊ शकत नाही). निर्विचार स्थितीत ही अडथळे येतात तर त्या अडथळ्यांकडे लक्ष देऊ नका. ते विसरा.

आता आपले समर्पण सुरु करा. एखादे चक्र पकडले असेल तर म्हणा, आई हे चक्र तुम्हाला समर्पित करतो. इतर गोष्टी करण्याची गरज नाही, उगाच तर्क वितर्क करत बसू नका. चिंता करु नका. समर्पणमध्ये तर्कवितर्क चालत नाही. जर खरं प्रेम, हृदयाची पवित्रता आपल्याला आहे त्यावर उत्तम इलाज आहे समर्पण. आपल्या सर्व काळज्या आईवर सोडून द्या. वाईट विचार येतात. चक्र पकडते. त्यावेळेस आईवर सोपवा, थोड्याच वेळात ते आपोआप सुटते. सकाळी हात, पाय

हलवू नका, ध्यानात सर्व चक्र आपोआप सुटतात. आपण प्रेमळ बना, आपल्या गुरुला (आदिशक्ती) आपल्या हृदयात स्थापन करा. त्यांना मनापासून, प्रेमाने व भक्तीने नमस्कार करा. आत्मसाक्षात्कारानंतर आपण जे आपल्या डोक्याने करतो ते केवळ कल्पना नाही. कारण आपले डोके आपली कल्पना स्वप्रकाशित आहेत. आई च्या चरणावर नम्रतेने समर्पित व्हा त्यानंतर ध्यानासाठी आवश्यक वातावरण असावे याची विनंती करा. ध्यानात आपण परमेश्वराशी एकरुप होऊन जातो. आईच हवी ती परिस्थिती निर्माण करते, आपल्याकडून ध्यान करवून घेते.

आपल्या मनात वरील गोष्टी केल्यावरही विचार येत असतील तर पहिला मंत्र म्हणा, आतमध्ये पाहा, श्री गणेश मंत्र म्हणा ध्यानासाठी मदत होईल. आपणच आपलं निरीक्षण केले पाहिजे व शोध घेतला पाहिजे. विचार ही सर्वात मोठी बाधा आहे. त्यासाठी निर्विचारनेचा मंत्र म्हणा. "ओम त्वमेव साक्षात श्री निर्विचार साक्षात श्री आदिशक्ती माताजी श्री निर्मला देव्यै नमो नमः".

त्यानंतर अहंकार, ही एक मोठीच बाधा आहे. विचार थांबेल, परंतु डोक्यावरचा दबाव कमी झालेला नाही. मग तुम्हाला "ओम त्वमेव साक्षात श्री महत् अहंकार साक्षात श्री आदिशक्ती माताजी श्री निर्मला देव्यै नमो नमः"!!

हा मंत्र तीन वेळा म्हणा, महत म्हणजे मोठा, अहंकार म्हणजे इगो.

तरीही तुम्हाला अहंकार कमी झालेला वाटत नसेल तर डावी बाजू उजवीकडे टाका, (उचला) हे हातानेच करावे, डावा हात श्री माताजींच्या फोटोकडे व उजव्या हाताने डावी बाजू उचलावी. उजवी खाली. त्यामुळे अहंकार व प्रतिअहंकार यात संतुलन प्रस्थापित होईल. हे ७ वेळा करु शकता. त्यानंतर आत काय फरक पडतो, त्याची जाणीव घ्या.

तुम्ही संतुलनात येता तेव्हाच तुमचे चित्त आपल्या मनःशक्तीवर लावू शकता. आपल्या मनात ज्या काही समस्या असतील त्या सर्व सोडवल्या जातात. आपल्या भावनांशी समरस होतो व ध्यानात त्यांच्याकडे लक्ष देतो तेव्हा त्याच भावना आपल्या आत उठतात. जर त्या भावना आइ (श्री माताजी) च्या चरणकमलावर अर्पि

त केल्या तर त्या विलीन व्हायला सुरवात होते (नाहीशा). त्या विस्तृत होऊन पसरतात तेव्हा तुमचे त्यांच्यावर नियंत्रण येईल. आईबद्दलची आपली भावना अधिक विकसित, प्रकाशित, प्रभावशाली होईल.

आता तुम्ही तुमच्या श्वासाकडे लक्ष द्या. श्वास थोडा संथ करा, श्वास बाहेर काढा काही क्षण थांबा, श्वास आंत ठेवा काही क्षण थांबा. परत तीचा क्रिया करा. श्वासातले अंतर वाढवा १ मिनिटापेक्षा श्वास आत ठेवा, बाहेरही एक मिनिट ठेवा. हळूहळू आपला श्वासाचा वेग कमी होतो, याचा अभ्यास करा. हे करत असताना आपले लक्ष भावनांवर ठेवा.

आत पाहा कुंडलिनी वर उठते. जेव्हा आपण श्वास घेतो व सोडतो त्यात अंतर पडते त्यावेळेला रिकामेच (मोकळेच) राहू द्या. श्वास आत घेणे व सोडणे ह्या क्रियेच्या वेळी आपले लक्ष हृदयाकडे ठेवा. असे करताना काही क्षणासाठी आपला श्वास घेणे बंद होते. म्हणजे आपण आता स्थिर झालात. आपला प्राण आणि मन यामध्ये लय घटित झाली, दोन्ही शक्ती एकत्र येतात. एक होतात. आता आपली कुंडलिनी उठवून सहस्त्राच्या वरती न्या व वरती बांधा परत दुसऱ्या वेळी कुंडलिनी उत्थापन करुन सहस्त्रारच्या वरती नेऊन दोन गाठी बांधाव्यात. तिसऱ्या वेळेस पुन्हा कुंडलिनीचे उत्थापन करून वरवर नेत सहस्त्रारच्या वरती न्यावे व तेथे तीन वेळा बांधावे. (बांधण्याची कृती करावी) आत सहस्त्रारच्या वरती चित्त देऊन तीन वेळा सहस्त्रारचा मंत्र म्हणा.

"ओम त्वमेव साक्षात श्री कल्कि साक्षात श्री सहस्त्रार स्वामिनी मोक्ष प्रदायिनी माताजी श्री निर्मला देव्यै नमो नमः!!"

आता तुमचे सहस्त्रार उघडेल. अशा प्रकारे तुम्ही सहस्त्रारला पुन्हा उघडू शकता. आता तुम्ही स्थिर झालात तुम्ही ध्यानात जा.

श्वास संथ ठेवणे चांगले. आपला श्वास रोखून धरा, त्यासाठी श्रम नकोत, ह्या गोष्टी सहज व्हाव्यात.

प. पू. श्री माताजी, निर्मलायोग - जाने. फेब्रु. १९८४

तुम्ही माझ्या बरोबर आहात व मी तुमच्या बरोबर, ध्यानात रहा. येथे पूर्ण शांत रहा आणि जाणीव घ्या. वाद, विवाद नको, बोलणे नको, डोक्याचा उपयोग सुद्धा नको. फक्त ध्यान आणि ध्यानच.

स्वतःलाच म्हणा 'शांत हो, माझ्या डोक्या शांत हो', स्थिर हो, ही गोष्ट आपल्या आतच आहे. ह्याच स्थितीत जास्त वेळ राहण्याचा प्रयत्न करा. या स्थितीत तुम्ही अतिचेतनाच्या स्थितीतही जाऊ शकता. त्यासाठी समर्पित व्हा. मला तिथे पाहा, तेव्हाच आपले सहस्त्रार उघडेल.

तुम्ही सर्व माझी मुले-मुली आहात. तुम्ही गणेशाप्रमाणे आहात. आम्ही सर्व पैगंबराप्रमाणे आहोत.

"आमच्यात पैगंबराची शक्ती आहे का?"

"श्री माताजी आम्ही खरंच साक्षात्कारी लोक आहोत का?"

"आम्ही मानवी सभ्यताचे सारतत्त्व आहोत का?"

"आम्ही लोक परमेश्वराच्या कृपेला पात्र आहोत का?"

हे प्रश्न विचारा आणि आपल्यात ह्या शक्ती विकसित करा.

प. पू. श्री माताजी - १४.०१.१९८३

आपल्याला थोडा जरी त्रास असेल, तरी तेथे लगेच हात ठेवा आपली तब्बेत चांगली होईल.

प. पू. श्री माताजी, मुंबई- २७.०५.१९७६

- सप्तमी आणि नवमीला आमचे विशेष आशीर्वाद आपल्याला असतात, त्यावेळेला आपण पूर्ण ध्यान करा. सामुदायिक ध्यान ज्या जागेत माझी पावलं पडलीत तेथे करा. कारण ती जागा शुद्ध व पवित्र झालेली आहे.
- अमावास्या आणि पौर्णिमेला रात्री लवकर झोपा, चित्त सहस्त्रारवर ठेवून व बंधन घेऊन लवकर झोपा.

- ❖ अमावस्येला शिवाचे ध्यान करावे व शिवाचे ध्यान करुन त्याच्या हवाली आपल्याला करुन झोपले पाहिजे. म्हणजे आपले चित्त हृदयात व सहस्त्रात ठेवूनच झोपावे.
- ❖ पौर्णिमेला श्री रामचंद्राचे ध्यान करावे म्हणजे आपले चित्त उजव्या अनाहत चक्रावर असावे. रामचंद्रचा अर्थ निर्मिती. आपली जी निर्मिती शक्ती आहे ती पूर्णपणे श्री रामचंद्रांना समर्पित करावी.
- ❖ सहजयोग्यांनी झोपण्यापूर्वी पाच मिनिट का होईना मिठ पाण्यात बसले पाहिजे, म्हणजे मीठ पाणी करावे. फोटो पुढे दिवा असावा. कपाळावर कुंकू दोन्ही पाय मीठ पाण्यात व समोर हात पसरुन. त्यामुळे आपल्या निम्म्यापेक्षा जास्त समस्या दूर होतील.
- ❖ आपण घरातून केव्हाही बाहेर जात असाल तेव्हा स्वत:ला बंधन घ्या. प्रत्येक वेळी आपण बंधनात रहा.
- ❖ स्वत:ला बंधन मी आपली आई आहे तरी मी स्वत: बंधन घेते. ते बंधन तुमच्या सगळ्यांसाठी असते. दिवसात कमीत कमी पाच वेळा बंधन घेतले पाहिजे. जणू पाच वेळा नमाजच पडतो आहोत त्याप्रमाणे.

बंधन म्हणजे सुरक्षा, संरक्षण आहे. म्हणून जेव्हा आपल्याला वाटेल तेव्हा बंधन घ्या.

प. पू. श्री माताजी - २७.०५.१९७६

**गहन ध्यानधारणा - आध्यात्मिक विकासाचा मार्ग:**

ध्यानधारणा आपल्या आतील शांत स्थिती आहे. सागराची गहनता व विचारांची शांती यासाठी आपल्याला आपल्याच अंत:स्थितीत जायचे आहे. परमेश्वराच्या शक्तीला सतत प्रवाहित करण्यासाठी ध्यानधारणा आहे. ध्यानधारणा तर दिव्यात तेल घालण्यासारखे आहे. ध्यानधारणेमुळेच परमेश्वराशी संबंध जोडला

जातो. सर्व नकारात्मक विचारांना दूर करते. ज्या गोष्टीमुळे निराशा येते त्यांना ती काढून टाकते. आपल्याला संरक्षण देते, आपल्यातला राग, चिडचिड नष्ट करते. ध्यानधारणा करणारे लोक गहनतेत जातात व प्रगती करतात.

प. पू. श्री माताजी, लॉस एंजलिस - ०३.१०.२००२

जेव्हा तुम्ही ध्यान करता ती तुमची परमेश्वराकडे व्यक्तिगत यात्रा होते. ध्यानाचा हेतू साध्य झाल्यावर तुम्ही सामूहिक होतात. व्यक्तिगत यात्रेत आपले नातलग, सगे, सोयरे कोणी नाहीत. आपण पूर्णपणे एकटेच आहोत, आपल्याला आतमध्ये एकाकारानेच यात्रा करावी लागेल. जेव्हा तुम्ही त्या सागरात उतरता, तेव्हा सर्व परिवार आपला होऊन जातो. जेव्हा तुम्ही आपल्या आत्म्यात प्रवेश करतात. तेव्हाच ह्या गोष्टी घडतात आणि तुम्ही आत्मरुपी डोळ्यांनी पाहू लागतात. शांत होतात.

प. पू. श्री माताजी, सिडनी - १४.०३.१९८३

सर्व प्रथम ध्यान, दुसरं धारणा,नंतर समाधी. साधना जेव्हा आपल्यात जागृत होते, तेव्हा आपले चित्त आपल्या इच्छित गोष्टीवर टाकतो. ते ध्यान होय. आपण आपले चित्त नेहमी आपल्या इष्ट देवतेवर ठेवले पाहिजे. तेव्हाच आपल्यात ती स्थिती विकसित होते त्याला धारणा म्हणतात.

ज्यात आपल्या चित्ताचे एकीकरण इष्ट देवतेबरोबर होते त्याला धारणा म्हणतात. ही स्थिती परिपक्व झाल्यावर तिसरी अवस्था समाधीचा उगम होतो. ही कोणती अवस्था आहे? जिची आपण पूजा करतो, आपल्या कामातही त्या इष्ट देवतेला पाहतो, आपल्याला मार्गदर्शनही तीच करते. अशी स्थिती आपल्या डोक्यात तयार होते. आपल्या आतमध्ये जी अवस्था तयार झाली, ती डोक्याची नवी अवस्था आहे. 'ऋतंभरा प्रज्ञा ज्यात प्रकृतीचा एकाकारिता आपल्याशी व आपली प्रकृतीशी. वेगवेगळ्या घटना, कार्य परमेश्वराला आपली चिंता (काळजी) परमेश्वर स्वत: प्रकृतीच्या माध्यमातून प्रगट होतो, हे घडते, त्यालाच समाधी म्हणतात.

**प. पू. श्री माताजी, मुंबई - १९.०१.१९८४**

सहजयोग नवा रस्ता (मार्ग), नवा प्रकार आहे. नवी दिशा आहे. नवी गोष्ट आहे, ज्यात आपण प्रवेश घेतला आहे. आपण अचेतन मनाने त्या सागरात उतरलो, गहनतेत उतरायचे असेल तर ध्यानात उतरावे लागेल. उदाहरणार्थ, एखादी घागर खोल असेल तर एखादी उथळ त्याप्रमाणेच त्यात पाणी मावेल. खोली घागरीत नसेल तर. पाणी टाकण्यात मतलब नाही. आपली गहनता ध्यानाने वाढवायची आहे. ध्यानात स्थिर व्हायचे आहे. ध्यानात जे विचार येतात, त्यांच्याकडे पाहात आपण निर्विचार होऊन जाल. निर्विचार होताच आपण अचेतन मनात आपल्या चेतनेसह जाल. आपली चेतना संपणार नाही, चेतना जाणाल.

प. पू. श्री माताजी, मुंबई - ०१.०२.१९७५

आम्ही भविष्याचा नाहीतर भूतकाळाचा विचार करतो. मी तुम्हाला वर्तमानात रहावयास सांगते. दोन विचारात जो क्षण किंवा वेळ (विलंब) तो खूप छोटा असतो, त्याला आपण पकडू शकत नाही. आम्ही कधी भविष्यात तर कधी भूतकाळात रमतो. वर्तमानात आम्ही नसतोच. वर्तमानातच वास्तव आहे. भूत, भविष्याचे अस्तित्व नाही. कुंडलिनी जेव्हा जागृत होते तेव्हा ती ह्या विचारांना दूर सारते व आपण आपल्या ध्येयाकडे वाटचाल करतो. आपल्याला जी पहिली अवस्था प्राप्त होते, ती आहे निर्विचार समाधी. तुम्ही पूर्णपणे चैतन्य युक्त होतात, विचार नसतात, त्यालाच ध्यान म्हणतात.

प. पू. श्री माताजी, मुंबई- २२.०३.१९७९

आम्ही ध्यान करत नाही. ध्यानात असतो. ध्यानातच रहावे लागेल. आम्ही ध्यान करु हे म्हणणे अर्थहीन आहे. आम्हाला ध्यानातच रहावे लागेल. आपण घरात असता किंवा बाहेर, घरात असताना तुम्ही असे नाही म्हणू शकत की, मी घराच्या बाहेर आहे. तसेच घराच्या बाहेर असताना मी घरात आहे असे म्हणू शकत नाही. याचप्रकारे आपण जीवनात तीन प्रकारे (आयाम) चालतो. भावनात्मक, शारीरिक आणि मानसिक. म्हणजे तुम्ही आत नाही. जर तुम्ही आत असाल तर आपण निर्वि चार चेतनेत असाल. अशास्थितीत तुम्ही असाल तर आपण सर्वत्र विद्यमान (संचार)

असतात. कारण तो एक असा बिंदू आहे. स्थान आहे तेथे तुम्ही सर्वेसर्वा असता. तेथे तुम्ही शक्ती, चैतन्य स्त्रोताला जोडलेला असतात. त्या शक्तीमुळे प्रत्येक पदार्थाचा कणाकणात प्रत्येक भावनात्मक विचारात, प्रत्येक योजनेत, विश्वाच्या प्रत्येक विचारात प्रवेश करु शकते, पृथ्वीची निर्मिती करणाऱ्या पंचतत्व किंवा सर्व नखात आपण प्रवेश करु शकतो. आवाजातही प्रवेश करु शकतो, परंतु आपली गती फार संथ आहे. आप, वायु, तेज, आकाश यातही प्रवेश करु शकतो, त्यांना व्यापू शकतो.

जेव्हा आपण म्हणतो की, मी ध्यान करतो, याचा अर्थ असा की, सर्वव्यापी शक्ती (Universal Being) बरोबरच्या क्रमात बदल करत चालले आहोत. आपण स्वतः गतिशील नाहीत. आपणाला ज्या वस्तू किंवा गोष्टी अडथळे (बाधा) आणतात त्यातून मुक्त करतात. जेव्हा आपण ध्यान करतो तेव्हा आपल्याला निर्विचार चेतनेत ठेवा त्या स्थितीत अचेतन स्वयंचैतन्य आपलं दायित्व सांभाळेल आणि आपण चैतन्याच्या शक्तीने चालाल. अचेतन कार्यान्वित होईल आणि आपल्याला जेथे जावयाचे आहे तेथे ते घेऊन जाईल. प्रत्येक वेळी आपण निर्विचारतेत रहा. त्यात राहण्याचा प्रयत्न करा. तुम्ही परमेश्वराच्या साम्राज्यात आहात, त्यामुळे त्याची गती चेतना आपली व्यवस्था करेल. आपल्यामध्ये येणारी सर्व बाधा आपल्यासमोर येणाऱ्या भौतिक अडचणी ह्या जेव्हा येतात तेव्हा तुम्ही तीन आयामात असतात. सहजयोगाने आपआपल्या अस्तित्वाचे दरवाजे उघडले आहेत.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - १९७६

जेव्हा आपण पूर्ण निर्विचार होतात तेव्हा परमेश्वराच्या सर्व सृष्टीचा आनंद घेता.

प. पू. श्री माताजी, न्यूयॉर्क - ३०.०९.१९८१

एखाद्या वस्तूकडे आपण लक्ष दिले आणि ती वस्तू पाहताना एखादा विचार मनात आला तर तिच्यापासून आनंद मिळत नाही. त्यात आनंद, आस्वाद नसतो.

विचार आला की, विचारामुळे अंधार पसरतो, पण निर्विचार नेत त्या वस्तूकडे बघितले तर तिच्यातील निराकार स्वरुपाचे दर्शन होते त्यामुळे आपल्या आत प्रेमाची शक्ती वाढेल व सर्व काळज्या, चिंता दूर होतील.

सहस्त्रारात स्थिर होऊन, वर्तमानात वावरतात, प्रत्येक क्षण आपल्यासाठी आरसा असतो.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - १६.०२.१९८५

जेव्हा एखादे सुंदर दृश्य पाहता, परमेश्वरी रचना पाहता तेव्हा आपण निर्वि चार होतो. निर्विचार झाल्यावर त्यात जी आनंदशक्ती आहे ती आपल्या आत पूर्णपणे प्रतिबिंबित होईल. आपण त्यात तादात्म पावाल. परमेश्वराने आपल्यासाठी विविध शृंगार तयार केले आहेत. त्यांचं सौंदर्य चहुबाजूला पसलेले आहे. सौंदर्यांमुळे आपल्यात आनंदाची उत्पत्ती होते. तो आनंद उपभोगण्यासाठीच तर आपण जन्मास आलो आहोत. दुःखी होण्यासाठी नाही.

प. पू. श्री माताजी - २५.११.१९७३

प्रत्येक काम करताना आपण निर्विचार होऊ शकता. निर्विचार झाल्यावर त्या कामाची सुंदरता, त्याचंज्ञान आणि आनंद आपल्याला मिळू लागतो.

प पू. श्री माताजी, मुंबई - ०१.०२.१९७५

कोणी तुमच्यावर अत्याचार करेल, कोणी तुमच्याशी वाईट वागेल, बोलेल, कोणी त्रास देईल, आपल्यात अशी स्थिती आहे, त्यावेळेस तुम्ही निर्विचार व्हा. ह्या सर्व गोष्टी साक्षी रुपात बघा, एखाद्या नाटकाप्रमाणे, यासाठी तुम्ही आपल्या निर्वि चारतेच्या किल्ल्यात स्थिर व्हा म्हणजे आनंद देणारी जी शक्ती आहे ती तुम्हाला आपल्या आत नेईल आणि वरील गोष्टीमुळे तुम्हाला त्रास होणार नाही.

निर्विचार अवस्थेत तुम्ही परमेश्वराशी एकरुप होता. पाण्याचा थेंब (आपण स्वतः) समुद्रात (परमेश्वर) येऊन एकजीव होतो तसा. त्यामुळेच परमेश्वराची शक्ती आपल्यात येते.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - १९७६

जेव्हा आपण निर्विचारतेने जातो, तेव्हा आपली प्रेरणा,सर्व शक्ती आणि इतर सर्वस्व प्राप्त होऊ लागते. निर्विचारतेत जे ही मिळते ते उच्च (प्रबुद्ध) व प्रकाशमान असते. आपण स्वत:च आपल्या मदतीने उभे रहाल. तुम्ही प्रकाशमान व्हाल. निर्विचारतेत जे विचार येतात, ती एक अंत:प्रेरणा (Inspiration) असते.

निर्विचारता जुना संगणक आहे आणि त्याच्या शक्तीचा पुष्कळसे परिणाम होणाऱ्या कामात उपयोग केला गेला. जर तुम्ही निर्विचार अवस्थेत असाल तर परमेश्वर आपल्याला सगळीकडे नेतो.

प. पू. श्री माताजी - ०३.०९.१९८१

आज दिवाळीच्या दिवशी मी असे सांगते की, स्वत:ला निर्विचार समाधीने ज्योतिर्मय बनवा. हे कार्य कठीण नाही, ही स्थिती आपल्या आत आहे. विचार इकडून येतात तिकडे जातात, ही आपल्या डोक्याच्या लहरी नाहीत, ह्या तर आपल्या प्रतिक्रिया आहेत. आपण ध्यानधारणा करतो तर आपण निर्विचार चेतनेत जातो हीच स्थिती मिळवणे आवश्यक आहे, डोक्यात येणारे वाईट विचार समाप्त होतात असे विचार समाप्त झाल्यावर आपले उत्थान शक्य आहे.

प. पू. श्री माताजी, लॉस एंजिल्स - ०३.११.२००२

❋❋❋

# प्रकरण १६

## आत्मपरीक्षण

आत्मपरीक्षणाने आपल्या आत डोकावण्याचा (पाहण्याचा) प्रश्न महत्त्वपूर्ण आहे. आपली चेतना उत्तम बनवण्याचा चांगला उपाय आहे.

जर आपले ध्यान लागत नाही तर आमच्यात काही खराबी आलेली आहे. काहीतरी गडबड आमच्या आत झालेली आहे. अशुद्ध विचार आमच्यात शिरले आहेत. ते पाहिले पाहिजे, जाणले पाहिजे, समजले पाहिजे आणि स्वच्छता केली पाहिजे. यालाच आत्मपरीक्षण म्हणतात. (ध्यान का लागत नाही यासाठी आत्मपरीक्षण महत्वाचे).

आम्ही कसे विश्लेषण करतो. कोणत्या चक्रावर पकड आहे. आम्हाला चैतन्य लहरी येतात का? मी योग्य प्रकारे ध्यान करतो की नाही. मला ध्यानाची जाणीव होते की नाही. ह्या सर्व गोष्टी मिळवल्या व प्रामाणिकपणे कार्यान्वित केल्या पाहिजेत.

आत्मपरीक्षणातून आपल्या कमतरता शोधून काढा. आपल्याकडे लक्ष द्या. आमचा हेतू आपल्या आतील वास्तवता पाहणे असला पाहिजे.

आपले पूर्ण चित्त आपल्या कमतरतेवर असले पाहिजे. आपल्या पदावर नाही. आम्हाला आमच्यातल्या कमतरतेचे ज्ञान असले पाहिजे. आपल्या अहंकाराला जिंकले पाहिजे, अहंकार आपल्याला कसा दूर करतो, ते पाहा. स्वत:च आपल्या आत असणाऱ्या समस्या, अडचणी शोधल्या पाहिजेत.

प. पू. श्री माताजी - २७.११.१९९१

दुसऱ्यांचे दोष बघण्याची आमची जी सवय आहे, ती बदला, कारण तेच दोष आमच्या आतही आहेत. दुसऱ्यांचे दोष बघण्याच्या अगोदर आपल्यात कोणते दोष आहेत ते पाहा. हे पाहणं जर आम्हाला आले तर खूपच चांगले. आमच्याजवळ साधन आहे जसे श्री कृष्णाचे ध्यान करणे. श्री कृष्णाचे ध्यान केल्याने आमच्या

आतील स्वच्छता होऊन जाते. ध्यानात आपण आपल्या वरतीच ध्यान करतो. आपल्याला हे पहावयाचे आहे की, आपला स्वभाव (विचार) कोठे चालला आहे, कोठे भटकतो, श्री कृष्णामुळे हळूहळू स्वच्छता होईल. त्यासाठी आत्मपरीक्षण महत्त्वाचे.

प. पू. श्री माताजी, श्री कृष्ण पूजा - १०.०८.२००३

सर्वात प्रथम हृदयचक्राला ठीक करा. आमचे हृदय स्वच्छ आहे की नाही? आमच्या मनात कोणाबद्दल राग आहे का? कोणाच्या बद्दल काही शंका आहे का? हे प्रश्न आपल्या हृदयाला विचारा. हृदय मेंदूला नियंत्रित करतो आणि हृदयानेच आपण सारे काम करतो. तुमचे व आमचे संबंध हृदयामुळे आहेत. म्हणून हृदयाला पूर्णपणे स्वच्छ करा. आपण आपल्याकडे बघा माझ्यात काही अंतर आले का? माझ्या आत कोणता बदल झाला, काय वेगळे घडले हे बघा.

संतांची सर्व लक्षणे आपल्या आत आली पाहिजेत. लोक हिमालयात जात होते. आपल्या आत शांतता यावी म्हणून परंतु तुम्हाला हिमालयाची गरज नाही. तुमच्या आतला वातानुकूलित खुला करा. आपल्या बाबतीत दक्ष रहा, दोष व चक्र पाहा.

प. पू. श्री माताजी, मुंबई- २०.०१.१९७५

प्रत्येकवेळी आम्हाला आत्मपरीक्षण करावे लागेल. प्रथम आपण नम्र आहोत का? हे पहावे लागेल. दुसऱ्यांच्या समोर स्वतःला नम्र बनवू शकतो का? हे फार महत्त्वाचे आहे. राग हा फार मोठा दोष (अवगुण) आहे. कोणकोणत्या गोष्टींचा आपल्याला राग येतो. आपल्याला राग का येतो, हे समजण्याचा प्रयत्न करा. त्याचे कारण शोधा. जे दोष तुम्ही इतर लोकांत पसंत करत नाही, तेच आपल्या आत विद्यमान आहेत. जे आपल्यात कमी आहे, त्याचे शुद्धीकरण सहजयोगात आवश्यक आहे.

आपले आज्ञाचक्र तर्काने वेढले गेले आहे. आपण प्रत्येक गोष्टीत तर्क करु शकता, कोणाची हत्या झाली. जरी तुम्ही ती कशी केली याचा युक्तिवाद मांडता.

आज्ञाचक्राच्या माध्यमातूनच स्वतःला न्यायी समजता. कारण आज्ञा चक्राला मुक्त करत नाही, त्यामुळे तो आपला शत्रू बनतो आणि तो म्हणतो मी काय करु, घटना अशी घडली. हे दुर्गुण घालवण्यासाठी आरशासमोर उभे रहा. स्वतःवरच रागवा. म्हणजे आज्ञा स्वच्छ होईल. मोह अत्यंत सूक्ष्म असतो. व्यक्तीच्या विशेष गोष्टीशी आपण चिकटू नये, त्याच्या विशेष गोष्टींची चिंता करणे आपले काम नाही. हे तर परमेश्वराचे काम आहे. हे परमेश्वरावर सोपवा आणि पाहा आपली मुलं आणि आपले संबंध, इतरही गोष्टीत सुधारतात.

प. पू. श्री माताजी - २७.१२.१९९४

आपण आपल्यात त्याच कमतरतेचा शोध घेतला पाहिजे. कोणत्या बाजून पकड आहे, डावीकडे की उजवीकडे ध्यान धारणेतून आपण आपले आत्मपरीक्षण करुन शोधू शकता. आपण धन, व्यापार, परिवार, द्वेष यांच्याशी चिकटलेले आहात. ध्यानधारणा करुन ह्या गोष्टींपासून निर्लिप्त होण्याचा प्रयत्न करा. हाताच्या बोटांच्या पेऱ्यावर (अग्रभागावर) चक्राची स्थिती समजते. जे चक्र पकडले असेल ते सहज उपचारातून टीक करा.

प. पू. श्री माताजी, ऑस्ट्रेलिया - २६.०२.१९९५

आपल्याला तुच्छ लेखू नका. आपल्या कल्पनेला विस्तृत करा. आपले विचार विशाल बनवा कारण आपला संबंध फार मोठ्या वस्तूबरोबर आहे (विशालतम बरोबर) (Primordial). आपले महत्त्व जर जाणले तरच तुम्हाला कार्यान्वित होता येईल. आपल्याला सुधारावे लागेल, प्रगती करावी लागेल, ही आवश्यक गोष्ट आहे. जेव्हा तुम्ही स्वतःला बघता ती पूर्णावस्था आहे. कोणाच्या बाबतीत आक्रमण होत नाही आणि कोणी आपल्या बाबतीत परंतु आपल्याला आपण स्पष्ट पाहा, हेच कार्य आपल्याला करावयाचे आहे. हळूहळू आपण आपले चक्र, बाधा यांना पहायला सुरवात करतो. त्यामुळे आपल्या समस्या समजतात.

प. पू. श्री माताजी, डॉलिस हिल - १८.११.१९७९

आपली चक्रं सांभाळावी लागतात. आपल्याला गहनतेत उतरावे लागते, आपले जीवन गहन बनवावे लागते.

आई म्हणून व शक्ती म्हणून विनंती व आग्रह करते, गहनता मिळवा, गहनतेत उतरा, ही शक्ती आपल्यासाठी वाढवा व इतरांना द्या. हे फार मोठे काम आपल्याला करावयाचे आहे.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - ०३.०३.१९७८

आपल्याबद्दल आपल्याला पूर्ण कल्पना असावी. आपण कोण आहोत? आपल्या बद्दलचे पूर्ण ज्ञान आपल्याला असले पाहिजे. कोणता हेतू साध्य करण्यासाठी आपण आलो आहोत व त्यासाठी आपण काय करतो? त्यासाठी आपले हृदय विशाल व व्यक्तित्व महान असावे. आपण सगळे द्विज आहोत म्हणून महान आहात. आम्ही स्वत:साठी पूजनीय झालं पाहिजे. जे आपण करतो त्यात संतांची गरीमा, सौंदर्य, प्रेम किंवा महानता असणे आवश्यक आहे.

प. पू. श्री माताजी, गौरीपूजा बोर्डी - १२.०२.१९८४

आम्ही लक्षात ठेवले पाहिजे की, आम्ही महान आहोत का? आपल्याकडे पाहा, दुसऱ्याकडे नाही, आपणच पाहा आपण खरोखर जेन्विन आहोत का? आपल्यावरच प्रेम करा म्हणजे आपले दोष दिसतील, ज्या वस्तूवर आपले प्रेम असते किंवा आवडते तिला तुम्ही ठीक (चांगले) करता, जी वस्तू आवडत नाही ती सोडून देता, आपल्यावर प्रेम करा. प्रेमाचा संसार आमच्या आत आहे. त्या सागरात डुबकी मात्र मारायची आहे.

प. पू. श्री माताजी, मुंबई - २१.१२.१९७५

आपल्याला स्वत:कडे पाहताना विचार केला पाहिजे की, आम्ही बालक आहोत. बालक म्हणजे अबोधितता. भोळेपणा, त्या भोळेपणाला आपल्या आत पहायला शिकले पाहिजे.

प. पू. श्री माताजी - १०.०८.२००३

❋ ❋ ❋

आपल्या स्वत:ला दृढ राखण्यासाठी पहिले कार्य आहे, आत्मपरिक्षण. प्रकाशाला आतमध्ये प्रतिबिंबित करुन स्वत:ला बघणे म्हणजे आत्मपरिक्षण... आत्म्याच्या प्रकाशात आम्ही पाहू शकतो की, आमच्यात कोणते दोष निर्माण झाले आहेत... एक मापदंड हा हवा की मी सहजयोगासाठी काय केले आहे? मी श्री माताजींसाठी काय केले? परमेश्वरासाठी कार्य करणे हे महानतम कार्य आहे. हाच सर्वात महत्वपूर्ण, सर्वोच्च उद्योग (उद्यम) आहे. तो करण्याची संधी मानवाला प्राप्त झाली आहे. तुम्ही हे शोधायला हवे की, मला सहजयोगासाठी का निवडले? आत्मपरिक्षणाचा हा दुसरा विषय (मुद्दा) आहे.

प. पू. श्री माताजी, शुडीकॅंप, इंग्लंड - ०६.०८.१९८८

# प्रकरण १७

## सामूहिक चेतना

जागृतीचा अर्थ - आमचा जो जागृत स्वभाव आहे किंवा जी सामूहिक चेतना आहे ती प्राप्त होणे. ज्याला अलख म्हणतात किंवा परोक्ष आहे ते आमच्या चित्तात जागृत होतात, त्यालाच जागृती म्हणतात.

प. पू. श्री माताजी - २४.०९.१९७९

लहानपणी टाळूच्या हाडात बाळाचा टाळू असतो. तो सतत धडकत असतो. आत्म्याने तेथे प्रवेश केला होता म्हणून तो धडकतो, जेव्हा धडकणे बंद होते त्यावेळेस आत्मा हृदयात स्थापित (स्थिर) होतो. तेव्हा आपण आत्माभिमुखी व्यक्ती होऊन जातो. कुंडलिनी आज्ञाचक्राचे भेदन करुन सहस्त्रार पार करते. म्हणजे (व्यक्ती) व्यक्तीला सामूहिकतेत सामावून घेतो आपले ज्या दिवशी हे घडते त्या दिवशी आमच्या आत सामूहिक चेतना जागृत होते.

प. पू. श्री माताजी - २३.०५.२००२

आजचा सहजयोग दोघा, तिघासाठी नाही, सामूहिक चेतनाचे (सामुदायिक) कार्य आहे.

विशुद्धी चक्रावर आपण सामुदायिकतेत येतो.

प्रत्येकवेळी आम्हाला सामुदायिकतेत राहणे आवश्यक आहे. ही सर्वात मोठी गोष्ट आहे. सामुदायिकतेतच सहजयोगाचे आशीर्वाद आहेत. एकट्या व्यक्तीसाठी आशीर्वाद नाही. व्यक्तिगत तुम्ही हे सर्व हरवून बसाल.

प.पू. श्री माताजी - १०.०२.१९८१

आपण सर्व त्या विराटाचे अंश आहोत. ज्याप्रमाणे बोट माझ्या हाताचा भाग आहे. त्याप्रमाणेच आपण त्या विराटाचे अंग प्रत्यंग आहात. आपण जागृत झालात, पण आत सामुदायिकतेचा भाव आला नाही तर त्याचा अर्थ आहे की तुम्ही अपूर्ण (अर्धवट) जागृत आहात.

प. पू. श्री माताजी, नवी दिल्ली - ०७.०५.१९८३

सामुदायिकता हा गहनता प्राप्त करण्याचा एकमेव उपाय आहे. याशिवाय कोणताच दुसरा उपाय नाही. लोक जर विचार करु लागले, आश्रमापासून कोठेतरी दूर एकट्याने राहून ते खूप काही (जास्त) प्राप्त करतील तर सहजयोगात असे होत नाही. इथे आध्यात्मिक उत्थानाचा प्रश्न नाही. सामुहिक उत्थानाचा प्रश्न आहे. अशाप्रकारे तुम्ही एक अशी व्यक्ती होता जी सामुहिक आहे. सामुहिकतेचा आनंद घेते. सामुहिकतेबरोबर कार्य करते आणि सामुहिकतेत राहते. अशाव्यक्तिमध्ये नव्या प्रकारच्या शक्ती विकसित होतात. सामुहिक न होता तुम्ही त्या उंचीपर्यंत जाऊ शकत नाही जी आज सहजयोगासाठी आवश्यक आहे.

प.पू. श्री माताजी, कबेला - १९७७

सहजयोगाची सामुहिकता लोक समजू शकत नाहीत. त्यामुळे खूप गडबड होते. आई मी घरी बसून ध्यान करतो. रोजपूजा करतो. माझे व्हायब्रेशन बंद झाले. होणारच. तुम्हाला सामुहिकतेत यावे लागेल. तुम्हाला केंद्रावर यावे लागेल. आठवड्यातून एकदा तरी केंद्रावर जावं लागेल, आपली व्हायब्रेशन (चैतन्य) योग्य आहेत की, नाही ते पाहावे. दुसऱ्यांवर मेहनत करावी लागेल (इतरांना चैतन्य देणे). हा दिवा सामुहिकतेतच जळू शकतो. सहजयोग सामुदायिक आहे. व्यक्तिगत नाही.

प.पू. श्री माताजी - १०.०२.१९८१

सामुदायिकरित्याच ध्यानधारणा आवश्यक आहे. केंद्रावर परमेश्वरी शक्ती वाहत असते. श्री आदिशक्ती केंद्रावर असतात तुम्ही कर्मकांडासाठी नाही जात हे लक्षात घ्या. तुम्ही नेहमी केंद्रावर जात राहिलात तर तुमच्या अडचणी, समस्या सहजपणे सुटतील. सामुदायिक ध्यानधारणा महत्त्वाची.

प. पू. श्री माताजी, कळवा - ३१.१२.२०००

सामुदायिकता आमच्या उत्थानाचा आधार आहे. केंद्रावर जात नाही, आपसात भेटत नाही, मिळत नाही, तर आपल्या बोटाचे नख कापल्याप्रमाणे परिस्थिती होईल, परमेश्वराशी काहीच या बाबतीत देणं - घेणं नाही. फुल जसे

झाडावरुन पडल्यावर ते मरुन जाते तीच अवस्था आपली आहे. सामुदायिकता स्थापन झाली नाही, तर सहजयोग संपेल. शरीराचा मस्तकाशी संबंध असणे आवश्यक आहे. तसाच सहजयोग सामूहिकतेशिवाय जिवंत राहू शकत नाही. आत बाहेर सामुदायिकता प्रस्थापित झाली पाहिजे. आत जे असेल तेच बाहेर प्रगट होणार. आपण कोणालाही भेटलात तर त्याच्यात कोणता गुण आहे, त्याचा चांगला गुण मी कसा ग्रहण करेल. आपल्या आध्यात्मिक प्रगतीसाठी ह्या गोष्टी आवश्यक आहेत.

इतरांना प्रसन्न करणे, प्रेमाने वागणे, दुसऱ्यांना प्रसन्न करण्याचा निर्णय घेतला तरी आपली वाणी बदलते. वाणीत गोडवा येतो. धैर्य प्रेमामुळेच येते. प्रेमच आपल्याला मदत करते.

आपण टीका टिपण्णी करायला नको, त्यापेक्षा कौतुक करावे. आक्रमकता सामूहिकतेचा शत्रू आहे. परस्परांमध्ये समझोता आणि गहनतेत संबंध असावेत.

आपण सगळ्यांना क्षमा केली पाहिजे असे म्हणतो, पण तसे आचरण आपण करत नाही. छोट्या, छोट्या गोष्टी लोक लक्षात ठेवतात. दहा, पंधरा वर्षांपूर्वी च्याही गोष्टी सांगतात आणि म्हणतात. अमूक व्यक्तीने मला दुखवले होते. आपण कोणाला कष्ट, त्रास दिला होता हे मात्र विसरतात. माणसाच्या डोक्यात अहंकार असल्यामुळे त्या व्यक्तीचा काही दोष नसताना त्याला त्रास, दुसऱ्याकडून मिळाल्याचे सतत त्याबद्दल तक्रार करत राहतो. अशा ह्या वर्तनामुळे आपण सामूहिकतेला तोडतो.

प. पू. श्री माताजी - १०.०४.१९९१

जे सामुदायिकतेत गहन नाही ते सहजयोगात टिकत नाही. सामूहिकतेतील गहनता समजली पाहिजे. आम्ही सर्व विराटाचे अंग प्रत्यंग आहोत. त्यामुळे एक व्यक्ती पुढे नाही जाऊ शकत व त्याची प्रगतीपण होऊ शकत नाही. एखादा म्हणेल मी आईच्या (आदिशक्ती) जवळ आहे. पण तसे होत नाही. तो दूरच जातो. सर्व एकच आहेत. सर्व एकाच दिशेने जाणारी आहेत. सहजयोग फार मोठी क्रांती आहे.

पवित्र क्रांती आहे. ती प्रेमानेच व आतूनच होते. आम्ही वेगळे नाही, आम्ही त्या विराटाचे अंग प्रत्यंग आहोत. जो आत्म्यापासून निर्माण होतो. त्याला आत्मज, ज्याचा आत्म्याशी संबंध होतो ते सर्वच सामूहिक होतात. सर्वच एकत्र आले तर काय घडेल. विचार कर म्हणजे आपल्यामध्ये सुरक्षिततेची भावना आपल्या आत निर्माण होईल, सर्व आपले भाऊ बहीण आहेत असा भाव वाढेल. यावरुन सामुदायिकता वाढेल. सामुदायिकतेतूनच आपल्याला महत्त्वपूर्ण आशीर्वाद मिळतात आपण कोणत्या देशाचे, कोणत्या राज्यातले त्याला महत्त्व नसते. शेवटी तुम्ही सर्व त्या परमेश्वराचीच लेकरे आहेत.

प.पू. श्री माताजी - १०.०२.१९८१

सामूहिक बनल्याशिवाय आध्यात्मिकतेत विकसित होऊ शकत नाही. सहजयोगात व्यक्तीला सामूहिक चेतनेतच राहिले पाहिजे.

दिव्य प्रेमच सामूहिकतेचा आधार आहे.

प. पू. श्री माताजी - सहजयोग

***

सामुदायिकतेत राहणे आवश्यक गोष्ट आहे. सामुदायिकता तोडणे, अडचणी, समस्या निर्माण करणे, नेते लोकांचा अपमान करणे, हे अतिशय वाईट विचार आहेत. असे लोक स्वता:चा गट बनवतात. त्यापासून आपण सावध राहिले पाहिजे अशा लोकांना साथ देऊ नये.

प. पू. श्री माताजी, अथेना पूजा, युनान - १९९३

सामुदायिक चेतना विकसित झाल्यावर आपल्याबरोबर असणाऱ्या व्यक्तीचे अज्ञान कळते. आपल्या देशातीलच नाही तर संपूर्ण विश्वातील समस्यांचे ज्ञान होते. आपल्या विवेक बुद्धीने आपले मित्र, देश व विश्व यातील विध्वंसक, आक्रमक, अत्याचार समजून घेतो. प्रेमाच्या दिव्य शक्तीने ते ठीक करण्याचे कार्य करतो.

प. पू. श्री माताजी - सहजयोग पृ. ३८

## प्रकरण १८

## निर्व्याज प्रेम

प्रेमशक्ती तिटकाऱ्यापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. समुद्राची प्रेमाची गहराई सतत वाढतच रहाते. संसारात कितीही तिटकारा, राग द्वेष वाढले तरी त्यापेक्षा प्रेमच वाढत रहाते.

प. पू. श्री माताजी - २१.१०.२००१

प्रेम शक्ती आपल्या हातातून वाहते, तेच चैतन्य आपल्या आत वाहते. हे चैतन्य म्हणजेच प्रेम. ज्या दिवशी तुमचे प्रेम कमी होते त्याच दिवशी तुमचे चैतन्य कमी होते. प्रेमाचा पदर पकडून राहिले तरी चैतन्य वाहात राहील कारण ते परमेश्वराचे प्रेम आहे. म्हणून ते वाहत राहते. आपल्या आतुन शुद्ध प्रेमच वाहत राहील. जे स्वत: साक्षात चैतन्य आहे. तेच सत्य आणि सौंदर्य आहे. सत्यामध्ये सर्वात मोठी शक्ती प्रेमाची आहे. प्रेमाचा अर्थ आहे अहंकाररहित, कोणतीच अपेक्षा नसलेले, कोणतीच आशा नसलेले असे प्रेमाचे साम्राज्य पसरावे. सत्य आणि प्रेम दोन्ही एकच. प्रेमाला बाजूला केले तर सत्य नष्ट होईल. सत्याची जी शाखा आहे तिची ज्योत प्रेमाच्या तेलावर जळते.

प. पू. श्री माताजी - ०३.१२.१९९५

प्रेमाचा अर्थ असा नाही की, मी माझ्या मुलीवर प्रेम करतो. मी मुलावर, भावावर प्रेम करतो, ह्याला प्रेम नाही म्हणत. यासाठी शब्द आहे निर्वाज्य, निर्लेप किंवा अलिप्त प्रेम. झाडाकडे पाहा त्याचे प्रेम त्याच्या फांद्या, पान, फूल, फळ ह्या सगळ्यांपर्यत पोहचते, तो कोठे थांबत नाही. जर एखादे फळ किंवा फूल त्याला आवडले तो तेथेच थांबला तर झाड मरेल. पण पान, फूल, फळ देखील मरतील. म्हणून ज्याला जे द्यायचे ते दिले पाहिजे. तसेच आपल्या घरी, संसारात, समाजात देशात आणि सर्व विश्वात ज्याला जे द्यायचे, ते द्या. पण नि:स्वार्थपणे त्याला चिकटू नका. प्रेमात निखळ प्रेम हवे तरच त्याची शक्ती वाढते. त्यात स्वार्थ आला की,

प्रेमाची शक्ती क्षीण होते. "वसुधैव कुटुंबकम" सर्व पृथ्वीच त्याचे कुटुंब आहे. हा प्रेमाची महिमा आहे. हे सर्व आत्मा प्रकाशित झाल्यामुळेच ह्या गोष्टी घडतात.

प. पू. श्री माताजी - ०९.११.२००३

हे माझे ते माझे - माझे, माझे सहजपणे सुटत नाही. त्यासाठी आपली कुंडलिनी जागृत झाली पाहिजे. ती जागृत झाल्यावर व आपण पार झाल्यावर तुमच्यात तुमचे, आमचे, आपले अशी सुरवात होते. निर्व्याज प्रेम कुंडलिनी जागृतीमुळेच येते. मानवी प्रेम त्या व्यक्तीचा ताबा घेते. त्याला नियंत्रित करते. परंतु आदिशक्तीचे प्रेम आपल्याला शांत करते व नवचैतन्याच्या स्थितीत घेऊन जाते.

प. पू. श्री माताजी - २९.११.१९८४

प्रेमामुळेच दुसऱ्यांच्या भावना जाणू शकतो. त्याच्यात चर्चा नाही. बोलचाल नाही, आपण फक्त प्रेम जाणतो. प्रेमाचा अनुभव आत होतो, ही आपली स्थिती असते म्हणूनच ती आपण जाणू शकतो.

दुसरे लोक आपल्यावर प्रेम करतात, नाही करत, काही फरक पडत नाही, जाणीव तर आत होत असते. आपल्यात गहनता असल्यामुळे आपण त्याचा आनंद घेतो. प्रेमाचा स्त्रोत शाश्वत आहे. त्याचे वर्णन शब्दांत करणे सोपे नाही. हे सर्व मानवी अभिव्यक्तीच्या पलीकडचे (बाहेरचे) आहे. एखाद्या व्यक्तीत प्रेम असले तर ते पसरेल. व्यक्तीला समजले पाहिजे की, प्रेमाचा सागर आपल्या आतमध्येच आहे. त्यात आम्हाला डुंबायचे आहे. त्या प्रेम सागरात जर आम्ही हरवला तर प्रत्येक गोष्ट आपली होईल. कोणताच वाद-विवाद न करता, कोणतेच प्रश्न न करता ही सगळी व्यवस्था सहजपणे करु शकतो.

प. पू. श्री माताजी - ०४.०७.२००४

मानवी जीवनातील भयंकर चालीरिती, कर्मकांड हे बंद करण्यासाठी आम्हाला आमच्या हृदयात प्रेमाची शक्ती विकसित करावी लागेल. प्रेम अशी गोष्ट आहे की, तो कोणाचे अहित (वाईट) करण्याचा विचार करु शकत नाही. तो जे करेल ते हितकारीच असेल.

प. पू. श्री माताजी - २१.१०.२००१

सर्वात महत्वपूर्ण गोष्ट प्रेम आहे. मानवाची जी मशीन आहे ती प्रेमानेच चांगली होते. माणूस आतून खूप जखमी आहे. दुःखी आहे त्याला, त्याच्या दुःखाला प्रेमानेच ठीक करता येईल.

प. पू. श्री माताजी - ०१.०२.१९७५

अबोधितता प्रेमाचा स्त्रोत आहे. पावित्र्याचा सन्मान केल्याशिवाय आपण प्रेममय होऊ शकत नाही. तिरस्कार प्रेमाने नष्ट करता येतो. आपल्याला प्रेमात प्रगत करावे. ते आपले बक्षीस आहे. आपण आनंद आणि प्रेम उधार घेतलेला नसतो. त्याचा स्त्रोत आतमधून वाहत असतो. म्हणून ते प्रेम आपल्यात जागृत केले पाहिजे. म्हणजे ते वाहत राहील. त्यामुळे एकमेकांमधील राग, द्वेष, ईर्ष्या, दुर्गुण ह्या प्रेमाच्या प्रवाहात वाहून जातील.

ध्यानधारणेमुळे आपण ही शक्ती वाढवू शकतो. प्रेम आपल्या आतून दाखवता आले पाहिजे. जे प्रेम परमेश्वराकडून प्राप्त केले ते परमेश्वराला समर्पित करण्यापूर्वी लक्षात टेवले पाहिजे की, सगळ्यांशी आपले संबंध प्रेमाने बांधले जावेत.

प. पू. श्री माताजी - ०९.११.२००३

मला परत असे म्हणावेसे वाटते की, आत्म्याला प्रेमात कसे आणू शकतो. विचार करा सर्व गोष्टी मी प्रेमाने करतो का? हे सर्व करणं, धरणं प्रेमानेच होते का? प्रेमात कोणाला मारु ही शकता. देवीने इतक्या राक्षसांना प्रेमानेच मारले. ते राक्षसाचे महाराक्षस बनू नये म्हणून त्यांच्यावर प्रेम केले. शिवाय भक्तांना त्यांच्यापासून वाचवण्यासाठी मारले. ह्यात प्रेमच होते. ज्यात त्यांचे हित ते प्रेमच असे प्रेम आपण करता का "त्याचे हित पाहता का? स्वतः पाहा आमच्या डोक्यात प्रेम करणे आहे की घृणा.

प. पू. श्री माताजी - २१.१०.२००१

प्रेम शक्तीचा आनंद घ्या. म्हणजे आपल्याकडे लोक रक्षक म्हणून पाहतील, रुबाब करणारी व्यक्ती म्हणून नाही. ज्या व्यक्तीत अहंकार असेल त्याने तो सोडला तर अहंकाराच्या जागी प्रेम निर्माण होईल व संसार सुखमय होईल. प्रथम

हृदयाचे दरवाजे उघडा, आम्हाला भेटल्यावर लोकांना आनंद व प्रसन्न वाटले पाहिजे. सर्वांना आपले प्रेम व्यक्त करणे सर्वोत्तम. त्यात दया नको, शुद्ध प्रेम जे आनंद देणारे असेल. सगळ्यांशी प्रेम करणे, क्षमा करणे. त्याचं कौतुक करणे, त्याला आनंद कसा देता येईल, याचा अभ्यास करायचा आहे.

प. पू. श्री माताजी - ०९.११.२००३

मी स्वतःवर जेवढे प्रेम करतो, तेवढे प्रेम इतरांवर का करु शकत नाही. शाश्वत प्रेम आपला आत्मविश्वास व उच्च पद मिळवून देईल. येशू आणि महंमदने आपल्यासाठी कष्ट का घेतले? त्यांना काय मिळाले? तर त्यांना शाश्वत प्रेमाच्या अभिव्यक्तीचे समाधान. आपण असे का करीत नाही?

प. पू. श्री माताजी - ३०.१२.१९९२

राग करणे, नाराज होणे, भांडण करणे, दुसऱ्यांचे दोष पाहणे यात आपला वेळ आपण वाया घालवता, त्यापेक्षा तो माझ्याशी किती प्रेमाने वागला ते पाहा. सहजयोगातील प्रेम शुद्ध प्रेम आहे. त्यात अशुद्धता असेल तर ते प्रेमच नाही. ते प्रेम निर्व्याज असावे.

मी आपल्याला सांगते की, आपण सर्व ह्या प्रेम शक्तीला वाढवा. तीच शक्ती ह्या असुरी शक्तीचा सामना करुन सर्वत्र समाधान निर्माण करेल.

तुम्ही सर्व माझ्या हृदयात आहात मी तुमच्यावर खूप प्रेम करते. आपण सर्व लोक प्रेम आणि शांतीचे खरे शिपाई बना अशी माझी हृदयापासून इच्छा आहे.

प. पू. श्री माताजी - २१.१०.२००१

तुम्ही स्वतःला तयार करा अशी माझी प्रार्थना आहे. जरा विचार करा. आपण सगळ्यांशी प्रेमाने वागतो का? आपण प्रेमळ आहोत का? आपण दुसऱ्याशी प्रेम करता? हा विचार सुद्धा महत्त्वाचा आहे. माझ्याशी किती लोक भयंकर व्यवहार करतात, तरीही मी त्यांच्याशी प्रेम करते. असेच प्रेम तुम्हालाही करावे लागेल. प्रेमामुळेच कमळसुद्धा तुमच्यासमोर प्रसन्नतेने उमलेल. कमळाच्या पाकळ्या

उमलतात. तेव्हा सुंदर सुगंध दरवळतो, असेच आपले हृदय उघडेल व प्रेमाचा सुगंध संपूर्ण विश्वात पसरेल व आपणही सुगंधित होऊन जाल.

प. पू. श्री माताजी - १८.११.१९७९

पावित्र्याचे दुसरे नाव म्हणजे निर्व्याज प्रेम, ते सतत वाहते. काहीच मागत नाही. त्याची तृप्ती त्यातच असते.

प. पू. श्री माताजी - ३०.०३.१९९०

प्रेम माणसाचा अंतर्जात गुण आहे. त्याची ती स्वत:ची संपदा आहे. माणसाला प्रेमाचे सामर्थ्य दिले आहे.

आदिशक्तीचे शरीर पूर्ण व्यक्तित्व करुणेने प्रेमाने बनलेले आहे. त्यांचे सर्व काम (कार्य) प्रेम व करुणा याच्या माध्यमातून चालते. देवीची ही शक्ती प्रेमाच्या शुद्ध इच्छा शक्तीशिवाय काहीच नाही. प्रेम शक्ती गणेशाला दिली तशीच ती तुम्हाला दिली आहे. आपण ती धारण केली तर व्यक्तिगत किंवा सामुदायिक रुपात ती तुम्ही सांगू शकाल. एखाद्या व्यक्तीला आपल्याला जिंकायचे असेल तर आपल्या हृदयात म्हणा की, "देवी या, कृपा करुन याच्यावर कार्य करा, माझे पवित्र प्रेम त्याच्यावर कार्य करो." आपल्याला आश्चर्य वाटेल की, आपण त्या व्यक्तीला जिंकू शकलो. ९९ टक्के लोक ह्या पवित्र प्रेमाच्या पूर्ण नियमनात येतील हे पवित्र प्रेम सर्व नकारात्मक शक्तीला नष्ट करते.

प्रेम आपल्याला वास्तविकतेच्या पूर्ण तसबिरीला कसे समजून घ्यायचे हे शिकवते. प्रेमाचा असा प्रकाश आहे की, तो अंध:कारला प्रकाशित करतो. आपल्यात जेव्हा हे प्रेम येते तेव्हा आपण आतून शांत होतो व आत बाहेर प्रकाशित होतो.

प. पू. श्री माताजी, मास्को - १७.०९.१९९५

प्रेम महत्त्वपूर्ण व मौल्यवान गुण आहे. ते प्रेम स्वच्छ असावे. त्यात लोभ, स्वार्थ व कामुकता याला स्थान नाही. प्रेम प्रेमासाठीच असते, प्रेमात कृत्रिमता नको, आपल्यात खरं प्रेम आहे. तर आपण अतिशय मधुर बनतात. प्रेम हा देवीचा मोठा आशीर्वाद आहे. प्रेम व्यक्तीला वेडा (पागल) करीत नाही. प्रेम पवित्र आहे व

शक्तिशाली आहे व कार्य करीत असतो. प्रेम अतिशय चांगल्या पद्धतीने कार्य करते. प्रेम विवेकशील असून ते आपल्याला समाधानी बनवतात. प्रेम कोणाला दुःख व कष्ट देत नाही. आपण परस्परांशी प्रेम करावे, दुसऱ्यांचा सन्मान करावा तेव्हाच आपल्याला प्रेमाचे महत्त्व कळेल.

प. पू. श्री माताजी, मास्को - १७.०९.१९९५ चैतन्य लहरी फेब्रुवारी २००२

प्रेमाची जाणीव होते, त्याबद्दल बोलू शकत नाही. दाखवू शकत नाही. ते अंतर्गत असते, ते जाणू शकतो. आपल्यात परमेश्वरी प्रेम आहे कारण ते आपल्या आत हजर आहे ते आपण मिळवू शकतो. असे प्रेम कोणी आपल्याला विकू शकत नाही आणि देऊ शकत नाही. वाटू शकत नाही. ते फक्त आपल्या हृदयात हजर (मौजूद) आहे. दुसरे आपल्याशी प्रेम करतात की, नाही याचा काही फरक पडत नाही.

प. पू. श्री माताजी - ०४.०७.२००४ चैतन्य लहरी ऑक्टोबर २००४

❋ ❋ ❋

माझे प्रेम म्हणजे प्रेम आहे. आपल्याला शांत करते व नवचेतन्याच्या स्थितीत घेऊन जाते. येथे कोणतीच वस्तू विकली जात नाही. त्यासाठी काही द्यावे लागत नाही. ही तर सतत वाहणारी शक्ती आहे. या संदर्भात विश्वात कोणतीच व्यक्ती जाणत नाही. ती सतत निरंतर वाहणारी - अत्यंत सुंदर!

प. पू. श्री माताजी, ब्रिटन - १५.११.१९७९

## प्रकरण १९

## उन्नतीच्या मार्गातील अडचणी

उत्थानप्रक्रियेत अमिबापासून मानवावस्था प्राप्त करुन घेतल्यानंतरही मानव आपल्या पूर्व संस्कारापासून तोपर्यंत मूक्त होऊ शकत नाही जोपर्यंत आत्मसाक्षात्कार द्वारा उत्क्रांती मिळवून मनुष्य परमेश्वराशी एकरुप होत नाही. मानवाच्याही तीन श्रेणी आहेत.

मला हे समजत नाही की, मी कशाप्रकारे ही बाब सुरु करु, म्हणजे तुम्हाला धक्का बसणार नाही. एक आमच्याप्रमाणे मनुष्य. त्याला 'नरयोनी' म्हणतात.

दुसरीश्रेणी 'देवयोनी' आहे. असे लोक जे जन्मानेच साधक आहेत किंवा आत्मसाक्षात्कारी आहेत.

आणि तिसऱ्या श्रेणीतील लोक 'राक्षस' आहेत. त्यांना गण ही म्हटले जाते. (राक्षसगण) परंतु आम्ही म्हणू शकतो की माणसाचा एकवर्ग राक्षस आहे. ते लोक असूर आहेत. म्हणून जगात असूर लोकही आहेत, श्रेष्ट लोकही आहेत आणि या दोन्हीच्या मधले लोकही आहेत. श्रेष्ठ लोक खूप कमी आहेत. असे लोक जन्माने आत्मसाक्षात्कारी असतात. माझ्यासमोर त्यांची समस्या जास्त नाही. परंतु जे मध्यम लोक आहेत आपल्याला त्यांना सांभाळायचे आहे. त्यांना चांगल्या दिशेने जायचे आहे. परंतु काही बाधांनी त्यांना जखडले आहे. अशा लोकांच्या कुंडलिनीमध्ये अंतर्निहित काही दोष असतात. ते समजून घेणे आपल्यासाठी आवश्यक आहे.

१. सर्वप्रथम अस्वस्थ शरीर - (शारीरिक रुपाने अस्वस्थ असणे). वेगवेगळे देश, वेगवेगळी स्थाने - (देशाची वैशिष्ठ्ये, स्थळांची वैशिष्ठ्ये) यानुसार ह्या समस्या असतात. प्रत्येक देशाची काही वैशिष्टये आहेत त्यामुळे माणसाला आरोग्यासंबंधी समस्या येतात. सहजयोगी असण्याच्या नात्याने व्यक्तिने समजले पाहिजे की,

आरोग्य अतिशय महत्वाची बाब आहे. हे शरीर परमात्म्याचे मंदिर आहे. म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. त्याची देखभाल करावी लागेल.

तुम्ही हे सुद्धा जाणता की जेव्हा कुंडलिनी उठते तेव्हा पहिली घटना घडते, ती म्हणजे तुमचे स्वास्थ्य ठीक होत जाते. कारण तुमचे पराअनुकंपी (पॅरासिंपथेटिक) तंत्रकार्यान्वित होते. पराअनुकंपी, व्यक्तिला ज्योती (उर्जा) प्रदान करते. त्याचा प्रवाह अनुकंपीतंत्र (सिंपथेटिक) मध्ये असतो आणि माणसाचे आरोग्य सुधारते. कुंडलिनी जास्त करुन आजार बरे करण्यास मदत करते. मात्र ज्या आजारास माणूस कारणीभूत आहे अशा किडनीसारख्या आजारात नव्हे. किडनीच्या आजाराच्या एका रोग्याचा इलाज सहजयोगाद्वारे झालेला आहे. नक्कीच आम्ही किडनीरोगावर इलाज करु शकतो. परंतु एकदा जरी माणसाला डायलिसिस करावे लागले तर प्रयत्न करुनही त्याला रोगमूक्त करता येत नाही. त्याचे आयुष्य वाढविता येते परंतू संपूर्ण रोगमुक्ती करणे शक्य नसते.

परंतु आजार बरे करणे हे तुमचे कार्यच नव्हे. ही बाब तुम्ही स्वतः लक्षात ठेवा. कोणाही सहजयोगीने लोकांचे आजार बरे करण्याचे काम करु नये. आजारी माझ्या फोटोचा उपयोग करु शकतात. परंतु तुम्ही लोकांना रोगमुक्त करण्याचे काम करु नका. कारण याचा अर्थ असा आहे की, तुम्ही स्वतःला खूप मोठी परोपकारी व्यक्ती समजता आहात. मी बघितले आहे की, जे सहजयोगी रोगमुक्तीच्या कार्यात गुंतले त्यांनी ते कार्य वेड्याप्रमाणे केले आणि ते हे सुद्धा विसरले की त्यांनाच एखादी पकड आली आहे किंवा काही त्रास आहे. ते स्वतःला ठीक करीत नाहीत आणि शेवटी मी बघते की, ते सहजच्या बाहेर जातात. परंतु माझ्या फोटोने तुम्ही लोकांना ठीक करु शकता. मला असे काही लोक माहिती आहेत ते रोगमुक्त करण्याच्या शक्तिमुळे नियमितपणे हॉस्पिटलमध्ये जाऊ लागले आणि हॉस्पिटलमध्येच त्यांचा अंत झाला. त्यांनी कार्यक्रमाला येणे सोडले, मला भेटायलाही ते येत नव्हते.

व्याधिंमध्ये एक आहे शारीरिक रोग. शारीरिक रोगामुळे सुद्धा तुम्ही इतक्या खालच्या स्तरावर जाऊ नये. तुम्हाला काही समस्या असेल तर ती विसरुन जा.

हळूहळू तुम्ही बरे व्हाल. काही लोकांना बरे होण्यास जरा जास्त वेळ लागतो. मुख्य बाब तर आपला आत्मा प्राप्त करणे ही आहे. म्हणून सतत असे म्हणू नका की "श्री माताजी मला बरे करा, मला बरे करा, मला बरे करा." तुम्ही फक्त इतकेच म्हणा "माताजी मला आध्यात्मिक जीवनात कायम असू द्या."तुम्ही स्वतःच्या स्वतः बरे व्हाल. शक्यता आहे काही जणांना बरे होण्यास वेळ लागेल. परंतु आयुष्यभर आजारी राहण्याऐवजी बरे होण्यास काही काळ लागला तरी हरकत नाही. वेगवेगळे आजार बरे करण्याचे जे विधी आम्ही सांगितले आहेत, त्यानुसार कार्य करा.

'स्वास्थ्य महत्वपूर्ण आहे परंतु तुमचे चित्त आत्म्यावर असायला हवे. चित्त तुमच्या आत्म्यावर असायला हवे कारण चित्तच वेगवेगळ्या दिशांना पळत असते (जाते) आणि अडकते. तुम्ही त्याला त्याचे कार्य करु द्या आणि ते कार्यान्वित होईल.'

२. अकर्मण्यता - मला जी दुसरी अडचण जाणवते तिला अकर्मण्यता म्हणतात. म्हणजे व्यक्तिमध्ये कार्य करण्याच्या इच्छेचा अभाव, (काम करु नये असे वाटणे, आळस) जे लोक बेकार आहेत आणि ज्यांना आत्मसाक्षात्कार नको आहे त्यांना विसरुन जा. आत्मसाक्षात्कार प्राप्त केल्यानंतरही काही लोक त्याला कार्यान्वित करु इच्छित नाहीत, सोप्या शब्दांत सांगायचे तर ते आळशी आहेत. परंतु सहजयोगात आम्हाला खूप सावध रहायला हवे. लोक सहजयोगात येतात, मग काय होते? त्यांना आत्मसाक्षात्कार मिळतो, शीतल चैतन्य लहरी सुरु होतात, नंतर बंद होतात. याचे कारण हे आहे की त्यांना सहजयोगात कार्य करायचे नसते. (ध्यान, धारणा) अकर्मण्यता (आळस) एक अन्य धोका आहे.

यात शंका नाही की, कुंडलिनीला तुमचे डोळे उघडायचे आहेत. परंतु तुम्ही पुन्हा पुन्हा डोळे बंद करुन घेता. मग आळसापुढे झुकण्यासाठी तुम्ही स्वतंत्र आहात. आता हे सामुहिकही होऊ शकते. मी फक्त इतकेच म्हणेन की, हा फार मोठा आजार पसरतो आहे.

३. संशय - हा तिसरा धोका आहे. संशय करणे. मला तर हेच समजत नाही की, संशयरुपी वेडेपणाचे वर्णन कसे करायचे? उदाहरणार्थ, इथे आलेल्या

लोकांपैकी काही टक्के लोकांचे असे म्हणणे की, 'मला अजून शंका आहे'. हे काय विवेकी माणसाचे लक्षण आहे? तुम्ही कोणत्या गोष्टीवर शंका घेत आहात? आतापर्यंत तुम्ही काय मिळविले? ही शंका कोठून येते? ही तुमच्या 'श्रीयुत अहंकाराची' देणगी आहे. आता तुम्ही शंका घेता. कशावर शंका? तुमचा संशय काय आहे? तुम्हाला शीतल चैतन्यलहरी जाणवतात ना? मग बस. त्या कुंडलिनीला वर नेतील. आपल्या डोळ्यांनी ते कुंडलिनी उठतांना बघतील, आपल्या डोळ्यांनी ते कुंडलिनी वर उठतांना, धडकतांना (धकधक करताना) आणि सहस्त्राराचे भेदन करतांना पाहतील. तरीही ते बसतील आणि म्हणतील 'मला शंका आहे'. तुम्ही आहात कोण? तुम्ही कुठपर्यंत पोहोचले आहात? आपल्या विषयाबाबत तुम्हाला काय आणि किती माहिती आहे? या मुद्यावर आल्यावर तुम्ही विनम्र व्हा. हृदयापासून विनम्र होऊन म्हणा "मी स्वतःला समजून घेतले नाही. मला स्वतःचे (बद्दल) ज्ञान प्राप्त करावयाचे आहे. आतापर्यंत मला स्वतःबद्दल ज्ञान प्राप्त झाले नाही. मला पूर्ण ज्ञान प्राप्त झाले नाही. कोणत्या उपकरणाने (शरीरतंत्र) मी शंका घेत आहे?" कुंडलिनी जागृतीमध्ये हीच सर्वांत मोठी अडचण, बाधा आहे की, जागृतीनंतरही संशय कायम असतो.

४. प्रमाद - चौथ्या बाधेस आपण प्रमाद म्हणू शकतो. यामुळे आपण सतत डळमळीत असतो. येता जाता मुर्खासारखे (वेड्यासारखे) प्रश्न करीत राहतो. तर प्रमादरुपी दुर्गुणाचा उदय होतो कारण इथे येणाऱ्या सर्व लोकांना कुंडलिनीची जागृती निःशुल्क (फुकट) प्राप्त होते. सर्व लोकांसाठी. भले नर्कात राहा किंवा स्वर्गात किंवा त्यांनी जगातील सगळी वाईट कृत्ये केली असतील. परंतु तुम्ही सहजयोगाला दोष देता. आपल्या आत घडणाऱ्या स्वतः घडणाऱ्या या घटनेला आपण दोष देतो. कधीही स्वतःला दोष देत नाही की, 'नाही मीच ती चुक केली असेल'. ठीक आहे काही हरकत नाही. मी जर चुका केल्या असतील तर दुरुस्तही मीच करीन. ठीक आहे. निश्चितच श्री माताजी क्षमा करतात. परंतु अनेकदा माझी माफीसुद्धा व्यर्थ जाते. कारण जोपर्यंत आपल्या आत तुम्हाला याची जाणीव होते की मी चुका केल्या

आहेत, तोपर्यंत तुम्ही या मार्गाने जाण्याऐवजी दुसऱ्याच मार्गाने जायला लागता. तुम्ही त्या मार्गात जात आहात तर रस्त्याने जाण्याचे नियमही समजावून घ्या. म्हणून प्रमादरुपी बाधा जडल्यानंतर आमच्यात एक अन्य अंतर्गत (अंतर्निहित) समस्या उभी राहते तिला म्हणतात:

५. भ्रमदर्शन - भ्रमदर्शन म्हणजे दृष्टीभ्रम. आपल्याला भ्रम होतो. विशेषत: अशा लोकांना जे एलएसडी (LSD) तसेच अन्यप्रकारचे मादकपदार्थ घेतात. ते मला बघत नाहीत. कधी, कधी तर त्यांना केवळ प्रकाश दिसतो किंवा याचप्रकारे भूत किंवा भविष्य काळ किंवा एखादा भ्रम. ते अशाचप्रकारे दुसरा भ्रमही बघू शकतात. तुम्ही जर मला स्वप्नात बघत असाल तर ठीक आहेकिंवा स्वप्नात दुसरी एखादी गोष्ट बघितली तरी ठीक आहे. परंतु तुम्ही जर भ्रमदर्शन सुरु केले तर तुमच्यात भ्रम वाढू लागतो. यातील सर्वात मोठी कमतरता ही आहे की, लोक भ्रमाबद्दल खोटे बोलायला लागतात. मी सर्वांविषयी जाणते, भ्रमदर्शन एकदा सुरु झाले तर चैतन्य लहरींसाठी ते अत्यंत भयानक असते.

काही लोकांचा स्वत:वर पूर्ण विश्वास असतो, हे मी बघितले आहे. ते साऱ्या जगाला सांगत असतात की 'या गोष्टीचे चैतन्य योग्य नाही, त्या गोष्टीचे चैतन्य ठीक नाही.' सर्वांवर रुबाब गाजवतात पण खरी गोष्ट अशी असते की, त्यांचे चैतन्यलहरींवर स्वामित्व नसते. आता मला सावध व्हायला हवे. कोणा गुरुप्रमाणे मी बोलू शकत नाही. म्हणून मी म्हणते स्वत:ला बंधने द्या, घ्या आणि तुमचे हात माझ्याकडे करुन बघा. जर त्यांना कोणत्याही प्रकारे समजले की मी सर्व जाणते की ते खोटे बोलताहेत तर बस ते संपलेच. त्यांचे खोटेपणही मला स्वत:पुरते ठेवावे लागते. याबाबत मी खूप सावध आहे कारण मी जाणते की, ते लोक भयंकर घसरणीवर उभे आहेत. एखाद्या बाबीसंबंधी सांगण्याची माझी शैली जरी रुक्ष नसेल तरी ती घटना घडू शकते (घडते). म्हणून माणसाने ही गोष्ट समजायला हवी की

सत्यापासून विचलित न होण्यातच आमचे हित आहे. आपल्यासंबंधी आमचे जे विचार आहेत त्यांच्यापासून बहकता कामा नये.

६. विषयचित्त - एक वेगळी अडचण (बाधा) व्यक्तिमध्ये येते ती म्हणजे 'विषयचित्त'. अशा परिस्थितीत आमचे चित्त आत्मसाक्षात्कारापूर्वी आम्हाला जे रुचकर (आवडते) होते अशा पदार्थांकडे आकर्षित होते. समजा, तुमचे चित्त क्रिकेटकडे आकर्षित होत होते तर ठीक आहे. परंतु तुम्हाला तो रोग जडायला नको. मला असे म्हणायचे आहे की, क्रिकेटचा अर्थ असा नाही की तुम्ही क्रिकेटची बॅट व्हाल. तसेच तुम्ही अन्य बाबींसाठी कुचकामी आहात? सर्व व्यावहारिक कार्यासाठी तुम्ही मेले आहात काय? (निष्क्रीय आहात?) कोणत्याही वस्तुबद्दल वेडे आकर्षण तुमच्या चित्ताला अत्यंत चुकीच्या अवस्थेत घेऊन जाते. म्हणून हे सहजयोगींसाठी योग्य नाही.

या अडचणींशिवाय दोन खूप मोठी संकटे आहेत. त्यांच्यामुळे आपण खूप त्रास सहन करतो. ते निम्नलिखित आहेत. (खाली लिहिल्याप्रमाणे आहेत) एकतर लोकांना भूतबाधा होते आणि त्यांच्या डोक्यात खूप विचार, कल्पना (धारणा) भरल्या जातात. ते भजन गाऊ लागतात, इ.इ. या गोष्टी मला पेचात टाकतात. मला समजत नाही काय सांगावे, काय बोलावे? भूतबाधीत व्यक्तिच्या माध्यमातून बोलणारा राक्षस मला दिसत असतो.

दोन अन्य परिस्थिती आहेत जिथे कुंडलिनी वर तर उठते परंतु पुन्हा खाली पडते, (घसरते). मनुष्यात अंतर्गत, अंतर्निहित, अंतर्जात भय आहे. अनेकांनी मला विचारले "श्री माताजी आत्मसाक्षात्कार प्राप्त झाल्यानंतर ही परिस्थिती अशीच राहते का? ही स्थिती तशीच राहते. तिचा काही भाग कायम राहतो. कधी तिचा अगदी थोडा भाग तिथे राहतो किंवा कधी पूर्णपणे कुंडलिनी पुन्हा खेचली जाते. ती वापस (पुन्हा) खेचली जाते. जेव्हा असे होते तुम्ही म्हणाल 'मला जरा शंका येते' इथे कोठे लिहिले आहे की, तुमची उन्नती (उत्थान) होईल आणितुम्ही उच्च स्थितीत कायम स्वरुपात स्थिरावाल. भले तुमच्यात कितीही कमतरता, त्रुटी असोत असे शक्य आहे

का? काही लोकांच्या बाबतीत असे होते की त्यांची कुंडलिनी खाली पडून जाते. हे फार भयंकर चिन्ह आहे. ही समस्या चुकीच्या गुरुंमुळे, चुकीच्या ठिकाणी जाण्याने, मृत आत्म्यापर्यंत पोहोचण्याने किंवा काळी जादू करण्यामुळे होत असते. जे अवतरण नाहीत अशांना नमस्कार केल्याने (मस्तक झुकवून) चुकीच्या वेळेस उपवास केल्याने, व्रत, कर्मकांड, तसेच चक्रांचा अर्थ न समजल्यामुळे आणि पूर्ण सहजयोगाची सम्यकता (समग्रत्व) न समजल्याने ही समस्या येते. तुम्ही बघितले असेल की, काही लोकांमध्ये कुंडलिनी उठते आणि लगेचं खाली पडते. ही अत्यंत भयानक बाब आहे. वास्तविक ही कष्टप्रदसुद्धा आहे.

अंतिम धोका: ज्याचे ज्ञान तुम्हाला असायला हवे. तो म्हणजे तुम्हाला वाटू लागते की,तुम्ही परमेश्वर झाला आहात किंवा कोणत्यातरी अवताराप्रमाणे झाले आहात. हा फार मोठा धोका आहे. तेव्हा तुम्ही कायदा तुमच्या हातात घ्यायला लागता. इतरांवर हुकूम चालवता, आणि मनमानी करायला लागता (स्वत:ला हवे तसं वागता). स्वत:वर पूर्ण समाधानी, संतुष्ट राहता. हा फारच मोठा धोका आहे.

विनम्रता हा असा एकमात्र मार्ग आहे त्याच्यामुळे तुमच्यासमोर विशाल सागर आहे हे तुम्हाला कळते, समजते. ठीक आहे तुम्ही नावेत बसला आहात परंतु अजून तुम्हाला खूप शिकायचे आहे, खूप समजावून घ्यायचे आहे. अजून तुम्हाला तुमच्या चित्ताकडे ध्यान द्यायचे आहे. आपल्या चेतनेकडे लक्ष द्यायचे आहे. अजून तुम्ही याप्रकारे कार्य करावयाचे आहे की, वास्तवतेत तुम्ही स्वत:ला पूर्ण रुपात सहजयोगी स्थापित करु शकाल. त्यामुळे सामुहिकता तुमच्या अस्तित्वाचे अंग प्रत्यंग होईल आणि तुमच्या मनात कोणत्याही प्रकारचा संशय राहणार नाही. जोपर्यंत हे तुमच्यात घडत नाही तोपर्यंत ती माझी जबाबदारी नाही. ती तर एक अवस्था आहे, ज्यामध्ये तुमच्या हाताच्या एका इशाऱ्याने कुंडलिनी वर उठेल. जोपर्यंत तुम्ही ही अवस्था प्राप्त करुन घेत नाही तोपर्यंत कृपा करुन ते कार्य करीत रहा (कार्यान्वित करीत रहा). आळशी बसू नका. तुम्हाला तुमच्या चहूबाजूस बघायचे आहे. लोकांना भेटायचे आहे, त्यांच्याशी बोलायचे आहे. जितके जास्त तुम्ही याबाबत बोलाल,

तितके जास्त तुम्ही इतरांना हा योग द्याल, जितका जास्त सहजयोग कराल तितका जास्त तो प्रवाहित होईल. जितके जास्त तुम्ही घरी बसून विचार कराल, असे, तसे. 'ओह मी तर घरी पूजा करतो', तर काही होणार नाही. तो निष्क्रिय होत जाईल. तुम्हाला त्याला इतरांना द्यावे लागेल. अधिकाधिक लोकांना आत्मसाक्षात्कार द्यावा लागेल. हजारो लोक ते प्राप्त करतील. थोडक्यात हे लक्षात ठेवायला हवे की, तुम्ही अशा भ्रमात राहू नका की ब्रम्हांडाच्या सर्व शक्ती तुमच्यात प्रगट झाल्या आहेत. या शक्तिंची अभिव्यक्ती जेव्हा तुमच्यात होईल तेव्हा तुम्ही त्याविषयी जाणू लागाल, तुम्हाला त्याबद्दल माहिती होईल.

आता तुमच्यापैकी काही लोक सीमारेषेवर (किनाऱ्यावर) उभे आहेत. त्यांना आपण किनाऱ्यावर टेवू या. हे तुम्ही चांगल्याप्रकारे समजता. काही लोक मध्यापर्यंत येतात आणि काही जण अंतवर्तुळात (मध्यबिंदू) आहेत. सर्वजण अशा स्थितीत आहेत जिथं सीमारेषेवरुन त्यांना बाहेर केले जाऊ शकेल. ते बाहेर पडू शकतील. तेव्हा तुम्हाला कळत नाही की, सहजयोगी असे का वागला? कोणा सहजयोगीला तुम्ही असे वागताना बघितले, परिघाच्या बाह्यरेषेवर जात असताना बघाल तर समजा की, तुम्हीसुद्धा असे करु शकता. म्हणून तुम्ही सावध रहा. सावध रहा.

प.पू. श्री माताजी, १०.१२.१९७९

## प्रकरण २०

## सहजयोगात परिपक्वता

तुमच्यात परिपक्वता असणे आवश्यक आहे. सर्व प्रथम आपली लक्षणे सुधारा. ही सुधारणा निष्कपट, आत्मनिरीक्षण आणि प्रत्येक क्षणी स्वत: आपले आचरण हे साक्षी भावाने बघितल्यावर संभव आहे.

प.पू.श्री माताजी, २४.०७.१९९४

क्षमाभाव - सहजधर्मात क्षमा पहिली आवश्यक गोष्ट आहे. तुमच्यात जितकी क्षमेची शक्ती असेल तितके तुम्ही शक्तिशाली व्हाल. सर्वांना क्षमा करा. कलियुगात क्षमेशिवाय कोणतेही मोठे साधन नाही.

प.पू. श्री माताजी - २०.११.१९७५

नेहमी आपण विचार करीत राहतो की, कोणी मला दुखावले, कोणी काय त्रास दिला. त्याऐवजी असा विचार करायला हवा की, आपण क्षमा करायला हवी. त्याला मी क्षमा केली आणि माफ केल्यावर तुम्ही हैराण व्हाल की एकदम एका झटक्यात कुंडलिनी वर चढेल.

प.पू. श्री माताजी - १४.०२.२००४

एकमंत्र आहे फार मोठा मंत्र आहे. सर्वांना क्षमा करा (तीन वेळा म्हणा क्षम-क्षम-क्षम). त्याशिवाय प्रगती नाही. आमचा आईशी मतलब आहे, सहजयोगाशी मतलब आहे. दुसरे कोणी चुकीचे बोलले त्याला सुबुद्धिने समजा, त्याला काय बोलायचे ते बोलू द्या. आम्ही इकडे लक्ष द्यावे की, ही चुकीची गोष्ट ऐकून आमच्या आत तर काही चुकीचे जात नाही ना?

येशू ख्रिस्ताने एकच गोष्ट सांगितली होती, सर्वांना क्षमा करायला हवी. क्षमा करणे गरजेचे आहे. येशू ख्रिस्ताने त्या लोकांसाठी प्रेमपूर्वक प्रार्थना केली होती ज्यांनी त्यांना सुळावर चढविले होते.

प.पू. श्री माताजी - २१.०४.२०००

क्षमा - क्षमा कशी येते? भूतकाळ विसरण्यामुळेही, क्षमा येते. जे झाले ते झाले. सोडा. ते गतकालिन आहे, भूतकाळ आहे. विसरुन जा ते. तुम्ही आता

वर्तमानात उभे आहात, सहजयोगात योग्यता मिळविण्यासाठी तुम्हाला आपल्या भूतकाळापासून मुक्त व्हावे लागेल. अपराधाचा स्वीकार करण्याची गरज नाही - क्षमा करायला हवी. जर क्षमाशील असाल तर भारापासून सुटका होईल (भारमूक्त व्हाल). जो क्षमा करु शकत नाही तो सहजयोगी होऊ शकत नाही.

प.पू. श्री माताजी - २३.०८.१९९७

जर क्षमा करणे शिकला नाहीत, जर आतून क्षमाशीलता आली नाही तर एक दिवस तुमच्यात सर्व काही नष्ट करण्याची खूप शक्ती येईल आणि आपणच आमच्या लोकांना नष्ट करु.

प.पू. श्री माताजी - १६.०२.१९८१

क्षमेसाठी सर्वांनी क्षमाशील होणे आवश्यक आहे. आणि विचार करा की ज्याने जे केले आहे तो तसे भोगेल. मला त्याचे काय? त्याने जे म्हटले असेल तो स्वत: ते वापरतील (भोगेल). आम्ही त्यात का पडावे? याप्रकारे निरीक्षता आली तर तुम्ही क्षमा करुन टाका, सर्वांना क्षमा करा. तेव्हा आज्ञा चक्र ठीक होईल.

प. पू. श्री माताजी - १४.०१.२००४

ठीक आहे कोणी चूक केली तरी माफ करुन टाका. जे करु नये असे काम एखाद्याने केले तरी त्याला माफ करा. त्याला माफ करा कारण उद्या जर तुम्ही असे काम केले - तुम्ही ते केले तर तुम्ही कशाची सजा घ्याल? तुम्हाला कोण सजा देईल? म्हणून हे समजा की आम्हा सहजयोगींना हा अधिकार बिलकूल नाही की, आम्ही कोणाला सजा द्यावी आणि त्यांना शिकवावे.

प.पू. श्री माताजी - १४.०१.२००४

तुम्ही हे समजायला हवे की परिस्थिती नुसार तुम्ही अन्य लोकांपेक्षा वर पोहोचले आहात. उंचावर गेला आहात. तेव्हाच तुम्ही सर्व अपराधांना क्षमा करु शकाल. जो मोठा असतो तोच क्षमा करु शकतो. क्षुद्रव्यक्ती काय क्षमा करणार? चांगल्या (मोठ्या) तब्बेतीचे लोक असतात ते क्षमा करतात. त्यांची क्षमाशीलता खूप जबरदस्त असते.

प.पू. श्री माताजी -

(२) अहंकारमुक्ती - मानवाची सर्वात मोठी समस्या अहं आहे. अहंचा अर्थ आहे की, तुम्ही फक्त स्वतःवर प्रेम करता आणि तुमचा कोणता शेवट दिसत नाही.

प.पू. श्री माताजी -२४.०४.२००१

अहं प्रत्येक वेळेस आपल्या खोट्या मोठेपणाविषयी आम्हाला प्रोत्साहन, उत्साह देत असतो आणि आपण आपल्याला फार मोठे अथवा महान मानायला लागतो.

मानवासाठी अहं अतिशय सूक्ष्म आहे. काही लोकांमध्ये तर इतका सूक्ष्म असतो की थोड्याशा गोष्टीने आकाशात उडू लागतो. छोट्या छोट्या गोष्टींसाठी ते नाराज होतात किंवा ज्याच्यावर अधिकार गाजविता येईल अशी व्यक्ती ते शोधतात. जर तुम्ही अहं बघू शकलात तर त्याला हसा आणि विचार करा की, माझ्यात काय कमतरता आहे? अहं बंधन नव्हे कारण बंधने बाहेरुन लादली जातात आणि अहं आंतरिक आहे. कोणत्याही गोष्टीमुळे अहंकार येऊ शकतो. मानवात सर्व मूर्ख गोष्टींसाठी अहंकार येतो. व्यक्तिने हे बघायला हवे की, त्याच्यात कशाप्रकारे अहं कार्यरत आहे आणि त्याच्या पतनाचे कारण बनतो आहे.

अहंला ठिकाणावर आणण्यासाठी आम्ही काय करायला हवे? मुख्य बाब अहंला बघणे (अहंकार झाला आहे याची जाणीव होणे) आणि त्याचे साक्षी होणे. साक्षी अवस्थेत हे बघायला हवे की, अहं मला चांगल्या मार्गापासून कसा परावृत्त करतो. अहंभाव जेव्हा वाढू लागेल तेव्हा स्वतःलाच बजावा की "श्रीयुत! तुम्ही हे कार्य करीत नाही. हे कार्य तुम्ही करीत नाही." ही बाब जर तुम्ही स्वतःला सुचवित राहिलात तर तुमच्यात अहं येणार नाही.

प.पू. श्री माताजी, दिल्ली - १४.०३.१९९४

अहंकार एक दीर्घकाय (फार मोठी) समस्या आहे. त्याचे निराकरण म्हणजे दुसऱ्यांना क्षमा करणे. तुम्ही क्षमा करायला शिकले पाहिजे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत क्षमा याचना करीत रहा आणि आपले दोन्ही कान धरुन म्हणा 'हे

परमेश्वरा, आम्हाला क्षमा करा!'. सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्याचे स्मरण करीत रहा. नेहमी आठवण काढीत राहिल्याने श्री येशू ख्रिस्त तुमच्या अहंकाराला खाली घेऊन येतील.

मनुष्याला परमेश्वरानेच विशेषत: अहंकाराचे वरदान दिले आहे. त्यातून आम्ही शिकायला हवे. परंतु अहंकाराला मारुन तो मरत नाही, पण आपोआप स्वत:च सुटत जाणे हीच सहजयोगाची पद्धत आहे.

प.पू. श्री माताजी, निर्मलायोग १९८४

'मला आवडते', 'मला नाही आवडत' - हे शब्द वापरायला नको. अहंला जिंकण्यासाठी भाषा आणि शैलीला बदलायला हवे. तृतिय पुरुषी (टहरिद ऋ्रसॅन) मध्ये बोला. हा फार चांगला उपाय आहे. नेहमी तुम्ही (सहजयोगी) म्हणता की, हे होत आहे, हे घडते आहे. स्वत:ला तुम्ही तृतिय पुरुषी प्रमाणे बघू लागता.

सेवेमध्ये एक खूपसूक्ष्म मूर्खासारखा अहंकार असतो. तुम्ही कोणावर उपकार करणार आहात? ते तर सर्व तुमचे अंग - प्रत्यंग आहेत.

प.पू. श्री माताजी - ०३.०२.१९७८

उपवास करणे, जप, तप करणे या सर्व गोष्टींनी अहंकार वाढतो. हवन केल्यानेही अहंकार वाढतो कारण जो अग्नि आहे तो उजव्या बाजूस आहे. आम्ही जी काही कर्मकांडे करतो त्यामुळे अहंकार वाढतो.

आता या अहंकाराचा उपाय काय? त्याचा विचार करायला हवा. त्याचा इलाज येशू ख्रिस्त होते आणि त्यांनी शिकविले की सर्वांवर प्रेम करा. आपल्या शत्रूवरही प्रेम करा. त्याचा उपाय त्यांनी प्रेम म्हटले आहे, प्रेमाशिवाय कोणताच उपाय नाही. हे प्रेम परमचैतन्याचे प्रेम आहे.

प.पू. श्री माताजी - २५.१२.१९९७

अहं तुमचा शत्रू आहे. त्याचे सृजन तुम्ही स्वत:च केले आहे. अहंकार अतिशय शक्तिशाली आणि खूप सशक्त आहे. अहंकार जे पहिले कार्य करतो ते म्हणजे माणसाला मूर्ख बनविणे. अहंकारच तुम्हाला मूर्खपणा आणि असभ्य वागणे

शिकवितो, तो क्रोधाला जन्म देतो. अहं व्यक्तिला शिरजोर बनवितो, लोक हे बघतही नाहीत की, त्यांच्यात कोणत्या त्रुटी आहेत. त्यांना काय मिळवायचे आहे आणि काय मिळविण्याची त्यांची योग्यता आहे. अनियंत्रित अहंकारामुळे तुम्ही परमेश्वरालाही आव्हान देता.

प. पू. श्री माताजी - ०५.०५.२००२

उत्थानाच्या मार्गातील अहंकार ही फार मोठी अडचण आहे. तुम्ही बघा अहंकार अशा जागेवर बसला आहे ज्याला ओलांडून तुम्हाला सहस्त्रारावर जायचे आहे. तुमच्यात एक हजार शक्ती आहेत. परंतु अहंकारामुळे तुम्ही त्याचा वापर करु शकत नाही. अहंमध्ये विवेक नाही, ती आमच्या मार्गातील बाधा आहे.

'सहजयोगाचा अर्थ आहे तुम्ही अहंकारी होऊ शकत नाही. अहंरुपी हा दुर्गु ण अनेक स्त्रोतांमधून आला आहे पण त्याला शुद्ध करुन घ्यायला हवे'.

प.पू. श्री माताजी - ०५.०५.२००२

मी नेहमी सांगते की, अहंकाराच्या समस्येमुळे आपण खूप विघटित (दर्सिन्तिग्रात्एद) आहोत. परमेश्वराबरोबर आमचा योग (संबंध) योग्यप्रकारे प्रस्थापित होत नाही. छोट्या, छोट्या नगण्य गोष्टींमध्ये जर तुम्ही तुमचा वेळ व्यर्थ घालविला तर तुमचे विघटन वाढत जाईल. तुम्ही एकटे पडाल, कारण अशा वेळेस सर्व निर्णय अहंकाराच्या माध्यमातून घेतले जातात. हे मला आवडत नाही, मी असे करीत नाही, मला ते दिसत नाही, इत्यादि..इत्यादि. कोणत्याही प्रकारे तुम्ही तुमच्या अहंकाराच्या कार्यशैलीला बघू शकलात तर त्यापासून मुक्ती प्राप्त करु शकता. हेच काम तुम्ही करायचे आहे. अहंशी लढायचे नाही - मी असे कधीच म्हणत नाही की, अहंकाराशी लढाई करा - मी म्हणते समर्पण करा - हा एकमात्र उपाय आहे. त्यामुळे तुमचा अहंकार दूर होऊ शकतो.

प.पू. श्री माताजी - ०३.०२.१९७८

(३) <u>समर्पण</u> - आधुनिक सहजयोगाची केवळ एकमात्र अट आहे. मनापासून तुम्हाला समर्पण करावे लागेल. समर्पणाअभावी परमेश्वराच्या राज्यात प्रस्थापित

होणे तुम्हाला शक्य नाही. असंभव होय. समर्पण म्हणजे असे नाही की तुम्ही आपली मुले, घरदार याचा त्याग करा. समर्पणाचा अर्थ आहे तुम्ही आपला अहंकार आणि बंधनांचा त्याग करावा. समर्पणामुळे तुमच्यात एक अशी परिस्थिती विकसित होते जी आंतरिक रुपात तुम्हाला सन्यासी बनवते, याचा अर्थ हा आहे की, कोणतीही बाब तुमच्यात प्रबळ होत नाही. संन्यासी व्यक्ती सर्व गोष्टींच्या वर असते.

समर्पणाचा अर्थ हा ही नाही की बाह्य वस्तूचा त्याग करा. समर्पण म्हणजे स्वत:ला पूर्णपणे शुद्ध राखा, पूर्णपणे निर्लिप्त होणे, निर्लिप्तता उत्थानाचा एकमात्र मार्ग आहे.

समर्पणाची एक दुसरीही बाजू आहे. असे मानायचे की, मी एक सहजयोगी आहे आणि सर्वशक्ती मी माझ्यात आत्मसात करु शकतो. एकदा शक्ती आत्मसात झाल्या की त्यानंतर त्या शक्तिंना तुम्ही आत सांभाळून ठेवा, ग्रहण करा. आश्वस्त व्हा की तुमच्यात या शक्ती आहेत.

प.पू. श्री माताजी, दिल्ली - १४.०३.१९९४

तुमचा सर्वव्यापक शक्तिबरोबर खरा, दृढ आणि निष्कपट संबंध असायला हवा. आणि तुमच्या मेंदूत सतत हे ज्ञान हवे की, तुम्ही जोडलेले आहात. परमात्म्याशी तुमचा एकाकारितेचा आभास तुम्हाला सतत होत असेल तर ही अवस्था प्राप्त करणे तुम्हाला सहज शक्य आहे. तुम्ही जितके प्रगत (उन्नत) होण्याचा प्रयत्न कराल, तुमच्यातील शक्ती तुम्हाला तितके सामर्थ्य देतील.

तुमच्यात शक्ती आहेत, हे मी तुम्हाला वारंवार सांगते की, तुमच्यात या शक्ती आहेत. ज्यात तुम्ही आत्मनिरीक्षण करु शकता आणि साक्षीभावाने स्वत:ला बघून समर्पण करु शकता.

प.पू. श्री माताजी, कबेला - २४.०७.१९९४

समर्पणाचा अर्थ आहे की, तुम्ही तुमच्या आईशी (श्री माताजींशी) सहजयोगाने आणि जे सत्य तुम्ही प्राप्त केले आहे त्याने, दृढतेने जोडले आहात. समर्पणाविषयी पहिली गोष्ट जी समजून घ्यायची आहे ती ही आहे की तुम्ही पूर्णपणे

समर्पित आहात, तुम्हाला कोणाचे भय नाही. तुमच्या नुकसानाचीही तुम्हाला काळजी नाही. समर्पणाचा अर्थ हा प्रकाश आहे या व्यतिरिक्त कोणताच अर्थ लावायला नको. हा प्रकाश चमकतो, तो सुधारतो आणि इतर लोकांचे पथप्रदर्शन करतो. समर्पणाने तुम्ही गतिमान (डायनॅमिक) बनता - तुम्ही वास्तवात शक्ती बनता, विनाशाची नव्हे, सृजनाची.

प.पू. श्री माताजी, लंडन - ०६.०८.१९८२

(४) <u>निर्विचारसमाधी</u> - निर्विचार ध्यान धारणा परिपक्वता प्रदान करते. उत्थान प्राप्तीसाठी निर्विचार समाधी आवश्यक आहे, याशिवाय उत्थान होऊ शकत नाही.

निर्विचारितेत सहज कार्यप्रवण होतो. याशिवाय होत नाही, नाही होत याशिवाय. तुम्ही पाहिजे त्या योजना ठरवा, हवे ते करा ते कार्यान्वित होणार नाही. ते जर सहजवर सोडले तर कार्य होऊन जाते. पण याचा अर्थ असाही नाही की कार्या प्रति तुम्ही आळशी किंवा बेफिकीर व्हा. तुम्हाला अत्यंत चपळ व्हायला हवे. चपळ (ॲक्टीव) झाल्याशिवाय तुम्हाला हे कळणार नाही की सहजयोग तुमची कशाप्रकारे मदत करीत आहे.

प.पू. श्री माताजी - २७.०७.१९९४

निर्विचार समाधी एक सुंदर अवस्था आहे, जी तुम्हाला प्राप्त करायची आहे. जीवनाला नाटक मानून भिन्न प्रकारच्या लोकांना साक्षीभावाने बघत आनंद घेण्यासाठी, ही तुम्हाला शांती आणि साक्षीभाव प्रदान करते.

(५) <u>दोषभाव मुक्ती</u> - दोषभावना अनावश्यक आहे. तुम्ही काही वाईट केले नाही. स्वतःला दोषी समजू नका. तुम्हाला माहीत हवे की, तुम्ही मानव आहात.

<u>तुम्ही परमेश्वर तर नाहीत. तुम्ही चुका करु शकता, ठीक आहे. स्वतःला दोषी समजण्याचे कारण नाही. त्याचा सामना करा आणि त्याला समाप्त करा.</u> परंतु तुम्ही या दोषभावनेला सतत आपल्या डाव्या बाजूस घेऊन फिरता, परिणामी हृदय - शूल (अन्जिना) अंजायनाच्या जाळ्यात (हँसुली) अडकता. दोषभावाचा मुखवटा सर्वा

ंनी चढवला आहे. त्यांना जर आम्ही सांगितले तर ते विश्वास ठेवणार नाहीतपरंतु हेच सत्य आहे.

प.पू. श्री माताजी, गोवा - १६.०२.१९९४

आपण सर्वजण सहजयोगी आहोत. शेवटी आपण सर्वजण एक आत्मा आहोत. आत्मा कधी अपराध करीत नाही. अपराधामुळे आपण साक्षीभाव हरवतो. आम्ही चूक काय आहे हा विचार करु शकत नाही आणि आम्ही आमच्या चुका, खोटेपणाचा सामना करु इच्छित नाही. उदाहरणार्थ एखादी स्त्री अथवा पुरुष स्वभावाने अत्यंत निर्दय आहे. तो समजतो की तो निर्दयी होता आणि तो आपल्या निर्दयीपणाचा वाईट समजून त्याग करतो. परंतु तो त्या भावनेचा सामना करीत नाही. सामना करणे म्हणजे त्याने हे समजावे की तो / ती निर्दयी का होता? त्याने निर्दयी असायला नको होते आणि आता तो निर्दयी बनणार नाही. तुम्ही कधीही दोषभावाचे शिकार होऊ नका. तुमच्यात कोणी दोषभावना भरली (लादली) कोणी तुम्हाला भले बुरे (वाईट) बोलले तरीही कधीही स्वत:ला दोषी समजू नका.

प.पू. श्री माताजी, कबेला, इटली - १५.०८.१९९३

(६) उदारता - परिपक्व होण्यासाठी एक अन्य आवश्यकता आहे. उदारतेने, उदारपणे भौतिक, गोष्टिंपासून मुक्ती मिळविणे. कोणाला काही देणे खूप चांगली गोष्ट आहे. उदारता आनंदासाठी आहे. एकदा का तुम्ही उदारतेचा आनंद घेऊ लागलात की, तुम्हाला हे समजेल की प्रेम आणि करुणा तुमच्यापासून इतरांपर्यंत वाहू लागली आहे. हे प्रेम आणि करुणा सर्व लोकांपर्यंत जायला हवी. सर्वांमध्ये पसरायला हवी.

आत्मनिरीक्षणाने तुम्ही निश्चित उदार बनू शकता. ही उदारता वाहू लागली आहे. उदार विवेक तुमच्यात तेव्हा येईल जेव्हा तुम्हाला जीवनाचे लक्ष्य नक्की करता येईल आणि हे समजेल की, तुम्ही इथे कशासाठी आहात? मात्र स्वत:ला सहजयोगात परिपूर्ण करण्यासाठी किंवा कोणत्याही कर्ताभावाशिवाय सहजयोगात काही करण्याची योग्यता प्राप्त करण्यासाठी.

प.पू. श्री माताजी - २४.०७.१९९४

अत्यंत उदार होणे प्रति संतुलन (counter balance) करण्याचा एकमात्र उपाय आहे. तुम्ही जर अतिशय उदार झालात तर लोभ पळून जाईल. म्हणून तुम्हाला उदार व्हायला हवे. स्वतः प्रति नव्हे, अन्य लोकां प्रति. जोपर्यंत शक्य आहे, उदार व्हा. उदारता प्रेमदायक आहे. ती तुमच्या प्रेमाची अभिव्यक्ती आहे.

प.पू. श्री माताजी, कानाजोहरी - १८.०८.२००२

(७) सहजयोग प्रचार - प्रसार - आपली जागृती तसेच आध्यात्मिकता यांना उन्नत करणे आणि सहजयोगाच्या स्वचलित आंदोलनाला संपूर्ण सहयोग आणि समर्पण देणे आवश्यक आहे. तुमच्यात आत्मविश्वास असायला हवा म्हणजे निर्भय होऊन तुम्ही सहजयोगाचा प्रचार करु शकाल.

प.पू. श्री माताजी - २४.०७.१९९४

तुम्हाला तुमच्यावर आणि तुमच्या सर्व सहकाऱ्यांवर सहजयोगींवर विश्वास ठेवावा लागेल. मी तुम्हाला सांगितले की, व्यक्तिगत स्तरावर सहजयोग कार्यान्वित होणार नाही. कोणी जर स्वतःला इतरांपेक्षा महान समजत असेल, तर त्याचे पतन नक्कीच होऊ शकेल. कोणीही व्यक्तिने फक्त स्वतःसाठी सहजयोगाचा उपयोग करता कामा नये. सामुहिक रुपात सर्व लोकांसाठी तुम्ही कार्य करायला हवे.

तेव्हाच तुम्ही पुढे जाल (प्रगती होईल) आणि तुमची शक्ती वाढेल. आत्मसाक्षात्कार प्राप्त करणे अंतिम उद्देश नाही. त्याच्या खूप पुढे जायचे आहे. आता तुम्ही (इतरांना) आत्मसाक्षात्कार द्यायला हवा. आम्हाला सहजयोगाला कार्यान्वित करायचं आहे आणि आत्मसाक्षात्काराला आपल्या आत विकसित होऊ द्यायचे आहे हे समजणे आपणा सर्वांसाठी अत्यंत महत्वाचे आहे. अशाप्रकारे तुमच्यात परिपक्वता येईल.

प.पू. श्री माताजी - १५.१०.१९७९

परिपक्व होण्यासाठी प्रथम तुम्ही हे समजले पाहिजे की तुम्ही सहजयोगी आहात, जर तुम्ही परमेश्वरीशक्तिशी जोडले आहात तर नेहमी संपूर्ण स्थितीला

सांभाळू शकता. तुमचा सर्व व्यापक शक्तिशी संबंध खरा, दृढ आणि निष्कपट असायला हवा आणि तुमच्या मेंदूत नेहमीच हे ज्ञान हवे की तुम्ही जोडलेले आहात. परमेश्वराशी आपल्या एकरुपतेचा भास जर नेहमी होत असेल तर उच्चावस्था प्राप्त करणे अत्यंत साधारण गोष्ट आहे.

परिपक्वता ती आहे ज्यात तुम्हाला तुमच्या शक्तिचे ज्ञान असेल. तुमच्या शक्ती तुम्ही सुरक्षित राखू शकाल. पूर्ण शांतीमध्ये तुम्ही उन्नत होऊ शकाल आणि जेव्हा लोकांना भेटाल तेव्हा आपल्या आत शक्तिंना धारण करु शकाल. एकदा का तुम्ही सहजयोगी झालात. तेव्हा तुम्हाला तुमचे मोठेपण, श्रेष्ठत्व (गरिमा) दाखवायला हवी. दुबळेपण घेऊन फिरु नये.

प.पू. श्री माताजी - २४.०७.१९९४

परिपक्वता आल्यावर पूर्ण व्यक्तिमत्व आणि स्वभाव परावर्तित होतो (बदलतो). पूर्ण चेहरा आणि वागण्याची पद्धत (वर्णन) बदलून जाते. बोलण्या चालण्याची पद्धत (शैली) अशी बदलते जणू काही आतली सर्व मशिनरीच परावर्तित झाली आहे. तुमच्यात एका खऱ्या सहजयोगीचे गुण विकसित होतात.

प.पू. श्री माताजी - ०९.१०.१९७४

* * *

# प्रकरण २१

## अंतिम निर्णय

आत्मसाक्षात्कारी व्यक्तीस जेव्हा आत्मसाक्षात्काराचे महत्त्व समजते. त्यात उन्नत होतो तेव्हा त्याचे रक्षण केले जाते. तुम्ही आत्मसाक्षात्कारी, सहजयोगी आहात तर पूर्णपणे आपले रक्षण होईल. हे रक्षण कोण करते? "आदिशक्ती". ह्या विश्वातएक विध्वंसक शक्ती सुद्धा कार्यरत आहे. राक्षसी नाही तर शिवाची विनाशात्मक दिव्यशक्ती. आदिशक्तीचे कार्य चांगले चालले आहे. तर ते प्रसन्न होतात लांबून ते प्रत्येक व्यक्तीला पाहतात, सहजयोगीचे सर्व कामकाज पाहतात, त्यात त्यांना काही गोंधळ, गडबड आढळली तर आदिशक्ती ते नियंत्रित करु शकत नाही. शिव ते नष्टच करतो. एकालाच नाही तर हजारोंना एकाच वेळी नष्ट करतात.

नैसर्गिक आपत्ती येतात. ज्याप्रमाणे भूकंप, पूर, दुष्काळ, वादळ इ. आम्ही म्हणू शकतो की, हे महादेवाचे काम आहे. अशा स्थितीत मी तुम्हाला काही मदत करु शकत नाही. जर आपण लोकांना आत्मसाक्षात्कार दिला तर ही गोष्ट टळू शकते.

प. पू. श्री माताजी - कबेला - ०३.०६.२००१

मी तुम्हाला सांगते हा अंतिम निर्णय आहे आणि हा अंतिम निर्णय कोणाचे रक्षण करायचे व कोणाला नष्ट करायचे याचा न्याय करेल. ही गंभीर गोष्ट आहे. ज्यांना ह्या गोष्टींचे ज्ञान आहे. त्यांनी विचार केला पाहिजे. इकडे, तिकडे जोड-तोड करुन काम भागणार नाही. जोपर्यंत मानवाच्या हृदयात परिवर्तन होत नाही तोपर्यंत त्यांना वाचवता येत नाही.

आपण ह्या वाईट स्थितीत राहतो, ह्या गोष्टी समजून घ्या. आपण आपल्या आत गहनतेत उतरले नाही, आपण कोण आहोत, आपण बदलाला स्विकारत नाही. ह्या स्थितीत काही घडू शकते.

प. पू. श्री माताजी - लंडन - १४.०७.२००१

मानवाच्या इतिहासातील हा भयानक व महत्त्वपूर्ण काळ आहे. अंतिम निर्णयाची सुरवात झाली आहे. आम्ही त्याचा सामना करतो. बोकडाची कातडी पांघरुन लांडगा आपल्याला भ्रमीत करण्यासाठी अवतरला आहे. आपण फक्त सत्याला ओळखा, ह्या इतर गोष्टीत फसू नका.

परमेश्वर दयाळू, करुणामय, प्रेमळ आहे, ह्याने आम्हाला स्वयंम्चे ज्ञान मिळवण्याचे स्वातंत्र्य दिले (आत्मसाक्षात्काराचे). परमेश्वराने आपल्याला अमिबापासून मानवापर्यंत विकसित केले. चारही बाजूला सुंदर विश्व (जग) निर्माण केले. आता आपल्याला त्याच्या निर्णयाचा सामना करावा लागेल.

परमेश्वर आपल्याला कोणत्या दृष्टिकोनातून पाहतात. आपल्याला कसे समजतात. आम्ही परमेश्वरावर विश्वास करीत नाही, पण आम्ही चुकीचे काम केले, तर आम्हाला शिक्षा मिळते. आपल्याला समजते परमेश्वर कार्यरत आहे.

परमेश्वर एखाद्या न्यायाधिशाप्रमाणे बसला आहे, प्रत्येकाला नंबराप्रमाणे बोलावतो, शिवाय आपला तेथे वकील आहे असे आपण समजतो. निर्णयासाठी आपल्या अंत:स्थित शक्ती स्थापन केली आहे. मानवाच्या विकास प्रक्रियेत हे सर्व स्थापित करुन कार्यान्वित केले आहे. परमेश्वराने अमिबापासून मानवापर्यंत विकसित करतांना हे कार्य सुंदरतेने कार्यान्वित केले. अनेक पशूंना ह्या विकास प्रक्रियेतून बाहेर काढले. जास्त आक्रमक, लोकांची प्रजाती नष्ट झाली. इतिहास वाचा. हिटलरसारख्या माणूस आला आणि तो संपला. जी व्यक्ती इतरांवर हुकुमत गाजवते, गाजवण्यासाठी येते ती संपते.

आकलन सुरु झालेले आहे, न्यायाधिशाचा एक समुह आपल्या आत बसवून दिला. ते सर्व आपल्या पाठीच्या कण्याच्या मज्जारज्जू मध्ये मस्तकातील चक्रावर आहेत.

ह्या सर्वांचे काम दंडाधिकारीप्रमाणे आहे. ते सर्व लोक म्हणजे न्यायाधिश आपल्या डोक्यात विराजित आहेत.

प.पू. श्री माताजी - ११.०६.१९८०

## गहनतेच्या आधारे कुंडलिनी आकलन करील.

कुंडलिनीमुळेच तुमची गहनता, स्वरुप समजेल किंवा ज्ञान होईल. परमेश्वर काही तराजूत टाकुन तोलणार नाही. कुंडलिनी जागृत होऊनच आपला निर्णय होईल. तो अंतिम निर्णय सुरु झाला आहे. जे सहजयोगात थांबतील त्यांच्यासाठी कल्की अवतरण निवड करील. कोणी आपल्याला बोलणार नाही, भाषण देणार नाही. फक्त एक तुकडा इकडे, एक तिकडे.

प. पू. श्री माताजी - १०.०२.१९८१

परमेश्वर आपल्याला कुंडलिनी जाग्रणाच्या माध्यमाने समजून घेईल. नाहीतर त्यांना कसे तपासता येईल? सहजयोगात तुम्ही गहनता किती प्राप्त केली ते पाहिले जाईल. त्यातून आकलन होईल.

गहनतेत कोठपर्यंतजाऊ शकता. जास्तीत जास्त त्या बिंदूपर्यंत जेथे आम्ही परत धारणा बनतो जी गहनता आम्हाला मिळाली, ती तार्किकतापर्यंतच म्हणजे धारणाच्या बिंदूपर्यंत त्याच्या पुढे जाता येत नाही. आपली अध्यात्मिक प्रगती मोजली जाईल. सहजयोगातील प्रगती (गहनता) पाहिली जाईल. बीला चांगला अंकुर आला की, बी चांगले आहे, हे जाणतो. तसेच आत्मसाक्षात्कार आणि त्यात प्रगती त्याचा सन्मान त्यातून तो कळतो. हाच उत्तम उपाय आहे. तपासण्याचा उत्तम उपाय होय.

कोणते कपडे वापरता, कोणत्या पदावर विराजमान आहात, कोणत्या घरात राहता, कोणते नोबेल पारितोषिक जिंकले, यावरुन तुमचे ज्ञान होणार नाही. लोकहितात आपण कोणते कार्य केले. दानधर्मात किती धन दिले यावरुन तुमचा अहं वाढेल आणि आपण खाली खेचले जाऊ. व्यक्तित्व समजण्याचा हा एकदमच वेगळा प्रकार आहे.

प. पू. श्री माताजी - १०.१२.१९७९

यावरुन तुमच्या लक्षात येईल की, कुंडलिनी जागरण हाच एकमेव मार्ग आहे. त्यातूनच त्याला ओळखले जाईल. यासाठी आपल्याला कठोर परिश्रम करावे लागतील. आत्मसाक्षात्कारानंतर आपल्याला उच्च स्थितीत पोहचायचे आहे. त्यासाठी

सत्यनिष्ठापूर्वक कार्यान्वित केले पाहिजे. आपले मस्तक पूर्णपणे चैतन्यात झाकले जाऊन ते चैतन्य, आशीर्वाद आत येऊ द्या. त्यासाठी मी (श्री माताजी) खूप उत्सुक आहे.

प. पू. श्री माताजी - जानेवारी १९८४

उत्थानासाठी सहजयोग वरदान आहे ठरावीक उंचीपर्यंत जाण्यासाठी मदत तर होईलच पण फायदाही होईल. खाली पडलात तर खूप खोलात जाल. आपल्याला सर्व आशीर्वाद मिळतात. सौंदर्य, प्रेम, आनंद, ज्ञान, मित्र सर्व सोयी पण आपण जर चलाखी केली तर हे मिळणार नाही. आपल्याला ताबडतोब बाहेर फेकले जाईल. देव अत्यंत कामात व्यग्र आहेत. ते आपल्याला पाहतात, त्यांना आपली देखभाल, मदत, रक्षण करायचे आहे. परमेश्वरच आपल्यासाठी सर्व चांगली कामे करतात. हे जरी खरे असले तरी ते माझ्याशी (आदिशक्ती) जोडलेले आहेत. परमेश्वर तुमच्याशी जोडलेला नाही. तुम्ही माझी मुले आहात. म्हणून ते तुमची देखभाल करतात. आपण दुराचरण केले की समाप्त. आपल्या आईची करूणा महान आहे. त्यामुळे क्षमा करणे, आपल्याला संधी उपलब्ध करण्यात प्रयत्नशील आहे. ती देवतांना सतत शांत राहण्यास विनंती करते, ठरावीक मर्यादेपर्यंत आईची आज्ञा मानतात. जर तुम्ही घृणास्पद, क्रूर, अपराधी होऊनही सहजयोग इतर धर्माप्रमाणे नाही. जिथे तुम्ही चुका करता, मनमानी करता, हत्या करता, धोका देत राहता तसे येथे खचित चालणार नाही. इथे तुम्हाला खरेखुरे सहजयोगीच व्हावे लागेल.

प. पू. श्री माताजी - जिनेव्हा - २३.०३.१९९०

आपल्या हृदयात जर सहयोगाबद्दल प्रेम नसेल, आपल्या आई (श्री माताजी) बद्दल प्रेम नसेल आणि तुम्ही व्यर्थ गोष्टींमागे पळता. आपल्याला स्वत: नष्ट करायचे असेल तर सहजयोग सोडून त्याने इतरत्र जावे. सहजयोगासाठी समर्पित, इमानदार असले पाहिजे तरच आपण नष्ट होऊ शकत नाही. काही शक्ती वेगवेगळ्या वर्षी कार्यरत होतात. संचलित होतात. ह्या वेळेस पोलखोल नाही. शक्ती संचलित होईल. आपण कोणती बेईमानी केली असेल तर आपला पोल खोलला

जाईल आणि आपल्याला योग्य दंड मिळेल. सहजयोग जरी तुम्हाला शिक्षा करणार नसला तरी अनेक प्रकाराने ही शक्ती तुम्हाला शिक्षा करु शकते. तुम्ही वास्तवात समर्पित आणि इमानदार व्हायला हवे.

ह्या शक्तीचा कार्य करण्याचा पहिला प्रकार अलक्ष्मी. अलक्ष्मी म्हणजे जेव्हा आपल्याला दंडित केले जाईल. त्यावेळेस तुमचे दिवाळे निघालेले असेल. आपल्याजवळ धन शिल्लकच राहणार नाही. तुरुंगात सुद्धा जावे लागेल.

भ्रष्टाचाराने सुद्धा सहजयोगात प्रवेश केला आहे. असे भ्रष्टाचारी शोधून त्यांना शिक्षा व दंड केला जाईल. मी त्यांना दंडित नाही करणार त्याची कुंडलिनीच त्यांना दंडित करेल. सहजयोगात आम्ही अपराध करण्यासाठी आलो नाही. अपराधीच्या रुपात आम्ही आमची अभिव्यक्ती करणार नाही. आम्ही पूर्ण आहोत हे निश्चित करण्यासाठी आलोत.

पूर्वसंस्कार सोडून आम्ही नव्या साम्राज्यात प्रवेश करीत आहोत. नवीन क्षेत्रातील आनंद आम्हाला उपभोगायचा आहे.

ज्या लोकांनी सहजयोगाला पतनाकडे नेले त्यांची मला काळजी वाटते. मी सर्वच जाणते, त्यांना त्रास झाला तर त्यांनी मला दोष देऊ नये. यावरुन लक्षात येते, ते सहजयोगाच्या जवळ पण पाहचले नाहीत. सहजयोग दिवसेंदिवस आपल्याला पवित्र बनवतो.

"आपण संसाराच्या दलदलीत फसू नका, त्यात खूप लोक हरवले आहेत."

प. पू. श्री माताजी - दिल्ली - २१.०३.२००१

आपल्या नाशाचे कारण आपण स्वत:च आहोत

आपला नाश आपणच करतो. आपल्या ऱ्हासाला आपणच स्वत: जबाबदार आहोत. खरे तर परमेश्वर स्वत:च जाणत नाही. आपण कसा मनुष्य तयार केला आहे. आपण आपल्या चारही बाजूला मूर्खासारख्या गोष्टी तयार केल्या आहेत. याची माहिती परमेश्वराला सुद्धा नाही. हे सर्व अहंकाराशी एकरुप होण्यासाठी केलेले आहे. त्याचा शिक्का त्यावर मारुन घेतला आहे आणि त्यातून सुटू शकत नाही.

आत्मसाक्षात्कारानंतर जे ज्ञान मिळवतो त्या आपल्या चेतनेच्या माध्यमातून पाया पक्का करुन आपल्याला अधिक जाणणे आणि ज्योर्तिाय होणे आवश्यक आहे. आपण हे समजून घ्या, ह्या चेतनेतूनच आपल्याला उन्नत व्हावयाचे आहे. मानवी चेतनेला आता अधिक उन्नत व्हायचे आहे. ह्या चेतनेला आत्मसाक्षात्कार मिळाल्यावरही खूप लांबचा प्रवास करावा लागतो.

प. पू. श्री माताजी - चैतन्य लहरी २००२

परंतु आपण मध्येच अडकतो. आपल्याला चैतन्यलहरी प्राप्त होतात. त्यावेळेस प्रत्येकाच्या प्रतिक्रिया वेगवेगळ्या असतात.

काही म्हणतात मला गार वाटले, कोमट वाटले, गरम वाटले तर काही म्हणतात जाणवलेच नाही. कोणाची कुंडलिनी झटक्यात चढते कोणताच अडथळा येत नाही. तर कोणाची चढूनही खाली येते. म्हणजे साप शिडीचाच खेळ सुरु असतो. आपले पिता सदाशिव यांचे स्थान मस्तकात आहे. त्यांच्याविरुद्ध आगळीक केली असेल तर

- ❖ काही लोक या लहरींचे मूल्य समजत नाहीत.
- ❖ काही लोक शिकण्याचा प्रयत्न करतात की याचा अर्थ काय आहे?
- ❖ आणि काही लोक लगेच विचार करतात की, आता आम्ही आत्मसाक्षात्कारी झालो आहोत. कोणालाही आत्मसाक्षात्कार देऊ शकतो.

ते अहंकारावर स्वार होतात. असफल होऊन त्यांना पुन्हा तेथेच परत यावे लागते.

येथे 'साप आणि शिडी' या खेळाप्रमाणे होते. म्हणून चैतन्यलहरींप्रति तुमची प्रतिक्रिया अत्यंत खूप विनम्र, ग्रहण करण्यास सज्ज आणि आदराची हवी.

मी सांगितले त्याप्रमाणे बाह्यरुपात मेंदूमध्ये पिता सदाशिवाचे स्थान आहे. म्हणून जर तुम्ही पित्याविरूद्ध काही पाप करीत असाल तर आगामी नवी क्षेत्रे (आयाम) उघडण्यास वेळ लागेल. मग आम्ही पुस्तक वाचतो. तुम्हाला सांगितले आहे की, आधी पुस्तकाच्या चैतन्यलहरी बघा मग वाचा. पण तुम्ही म्हणता अन्य

पुस्तके वाचायची आहेत. त्यानंतर सापशिडीच्या खेळाप्रमाणे तुम्ही खाली येता. सहस्त्रार उघडायला वेळ लागतो. शिवाय ध्यानासाठी वेळ नाही. हे करायचे ते करायचे, कशाला हवे ध्यान, मग आपली प्रगती, उन्नती थांबेल नाहीतर काय होईल. विचार करा.

हे लक्षात घ्या, सहजयोगात फारच इमानदार राहिले पाहिजे. पैशांच्या बाबतीतील आपले सहजयोगासाठी कसे आचरण आहे. त्याचा सुद्धा तुमच्या प्रगतीवर परिणाम होतो. त्यात नाभीचक्र खराब होते. नाभीचा परिणाम भवसागरापर्यंत पसरतो. भवसागर खराब झाले तर एकादश रुद्रची संहारक शक्ती जी भवसागरात आहे, ती पकडली जाते. आपण हुशारी दाखवता किंवा चलाखी करण्याचा प्रयत्न करता. तरी नाभीचक्र खराब होते, चैतन्य हरवते. नष्ट होते. त्यासाठी आपल्याला सजग राहणे आवश्यक आहे.

सहस्त्रारमध्ये ब्रम्हरंध्र ज्या बिंदूवर आहे, तेथेच आपले हृदयचक्र आहे. ब्रम्हरंध्राचा हृदयाशी सरळ संबंध आहे. जर तुम्ही सहजयोग हृदयापासून न करता यांत्रिकतेने केला तर तुमची प्रगती नाही होऊ शकत. यासाठी सहजयोगात सर्व गोष्टी हृदयापासून केल्या पाहिजेत.

काही लोक येतात मागे बसतात व बडबडत असतात. हे असे हवे, ते तसे करावे वगैरे. अशा लोकांना येशूने (murmuring souls) कुरकुर करणारे जीवात्मे म्हटले आहे. असे लोक फार दुःखी असतात. परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करायचा तर त्याचे हे नियम आपण पाळले पाहिजेत. त्यामुळे दंड होणारच.

परमेश्वराच्या साम्राज्यात आपली स्थिती खूपच आनंदमय आहे. पूर्ण आशीर्वाद आपल्यावर उधळले जातात. संपत्ती, आरोग्य, मानसिक, भावनात्मक सर्व प्रकारची संपदा आपल्याला सहजयोगामुळे प्राप्त होते. आपल्याला अनंत आशीर्वाद मिळतात तशीच क्षमा पण केली जाते.

सहजयोगात बेईमानी करु नका याचा अर्थ तुम्ही स्वतःशीच बेईमानी करीत आहात. स्वतःशी इमानदार नाही, सहजयोगाशी कपट करता तर आपल्याला कष्ट तर भोगावेच लागतील आणि आपण हास्यास्पद ठराल. यामुळे सहजयोग बदनाम
होईल.

परमेश्वर प्रत्येक बाबतीत आपले रक्षण करतो. पूर्ण चित्ताने, सावधतेने आपल्याकडे लक्ष देतो. परमेश्वर इतकं प्रेम करतो; ते शब्दांत सांगता येणार नाही. फक्त अनुभवच घेऊ शकतो. ते परिस्थितीमुळे, शिक्षेमुळे, पालन पोषणातील कमतरतेमुळे भीतीमुळे असे वागतात. त्याचप्रमाणे आपले पूर्वसंस्कार यानुसार आपल्याला जन्म मिळतो, त्यानुसारच कुंडलिनीची अवस्था असते. परंतु आत्मसाक्षात्कारानंतर जे लोक महान पुरुषार्थी आणि निश्चयी असतात वेगाने प्रगत होतात. तारे, ग्रह, नक्षत्र इ. च्या सर्व समस्या नष्ट होतात आणि आपण सहजयोगी होतो. पूर्णपणे वेगळेच व्यक्तिमत्व निर्माण होतं. जसा अंड्याचा पक्षी बनतो.

स्वार्थी लोक आपलेच नुकसान करुन घेतात, सहजयोग तर प्रस्थापित होई लच. नौकेत दहाच लोक असले तर परमेश्वराला चिंता नाही. पण आई (श्री माताजी) म्हणून मला वाटते. नौकेत अधिकाधिक लोक यावेत, बेईमानी करुन नौकेतून बाहेर उडी मारण्याचा प्रयत्न करु नका.

छोट्या छोट्या गोष्टीत सतर्क रहा. ह्या कृतयुगात आत्मसाक्षात्कार प्राप्त करणे सोपे आहे. फक्त सचेत रहा.

प. पू. श्री माताजी-दिल्ली-०४.०२.१९८३

## आमच्यात साक्षीभाव विकसित व्हावा.

साक्षीभाव - हा सर्व खेळ आहे. या नाटकाचा प्रेक्षक आम्हाला बनायचे आहे. मायेमध्ये आपणास हरवून जायचे नाही. आपण प्रेक्षक आहोत तर माया आणि तिची कार्यशैली पाहू शकतो.

साक्षी स्वरुप होऊन आपण वस्तू पाहतो, तेव्हा आपल्याला आपण नाटक पाहतो असे वाटते. त्यावेळेस आपण अभिनय करतो असे वाटते. जेव्हा खेळ संपतो तेव्हा तो खेळ आहे हे समजते. मस्तकाने हे सर्व साक्षीभावाने पाहावे. या स्थितीसाठी तुम्हाला निर्विचारस्थिती आवश्यक आहे. मायारुपी विश्वात आपल्याला फसायचे नाही, साक्षी बनायचे आहे.

आम्हाला साक्षीभाव विकसित करायचा आहे. प्रतिक्रिया करण्याची सवय आपल्याला आहे आणि तो आपला अधिकार समजतो, हा अधिकार आत्मघातक आहे. प्रतिक्रिया करणे चूक आहे. साक्षीभावात आपण सर्व पाहा. म्हणजे मायेचा खेळ समजेल त्यात आपले स्थान पाहू शकाल. प्रतिक्रिया आपण करतो म्हणजे आपली निर्णयशक्ती नष्ट झालेली असते.

प्रतिक्रिया व्यक्त केल्यामुळे काय मिळते व काय घालवतो हे कळत नाही. प्रतिक्रिया व्यक्त केल्यामुळे आम्ही पुर्णत: नष्ट होऊत. ह्या शक्ती आतमध्ये वळवा आणि स्वत:लाच हसा. दोष द्या. अलोचना करा. प्रतिक्रिया करणे थांबवले की, हळूहळू आपला अहंकार खाली येतो. नष्ट होतो. आपल्या मनाला अडचणीत टाकू नका. ज्याला आपण मन म्हणतो ते आपले आज्ञाचक्र आहे. तेच चक्र आपल्या मस्तकाला फार सूक्ष्म रुपात प्रभावित करते आणि आपल्या आत दूषित चित्र तयार करते. ज्या लोकांवर बंधन (मर्यादा) असतात ते मानसिक दृष्टया (परेशान) भ्रष्ट होतात.

परमेश्वराशी संबंध नष्ट होतात तेव्हाच तो प्रतिक्रिया व्यक्त करतो. परमेश्वराशी संबंधित व्यक्तीला संसारातील कार्य नाटकाप्रमाणे वाटते व सर्व परमेश्वरावर सोपवतो व शांत राहतो. परमचैतन्य कार्यकुशल, व्यापक आहे. ते आपल्याजवळ येते, आपला मान करते कारण आपण सहजयोगी आहोत. प्रतिक्रियाविहित दृष्टिकोन आपल्याला संतुलित आज्ञाचक्रामुळे आला पाहिजे, रागकिंवा शांततेने नाही.

प. पू. श्री माताजी - न्यू जर्सी - ०२.०४.१९९४

प्रत्येक वस्तूला आपण साक्षीरुपाने पाहा म्हणजे सर्व अडचणी आपण चांगल्या सोडवाल. काही न बोलता, काही न करता आपण साक्षीभावात शक्तिशाली बनतो. साक्षीभावाने आपण सहजयोगाच्या अनेक समस्या सोडवू शकता.

प. पू. श्री माताजी - २३.०२.१९९२

निर्विचार समाधी प्राप्त करुन ध्यान धारणेतुनच साक्षीभाव प्राप्त करणे शक्य आहे. ह्या दोन्ही स्थिती एकमेकांशी संबंधित आहेत. साक्षी अवस्थेत व्यक्ती प्रतिक्रिया करीत नाही. प्रतिक्रिया करताच समस्या सुरु होतात. बंधन आणि अहंमुळेच प्रतिक्रिया व्यक्त होते. प्रतिक्रिया नंतर प्रतिक्रिया असे पुढेच जातो, बंधन सुद्धा अंतर्रचित आहे. त्यापासून येणाऱ्या समस्या अत्यंत भीतीदायक आहेत. आपण मानव आहोत आपल्या आत मानवी गुण आहेत. म्हणून आपण प्रतिक्रिया थांबवल्या आणि साक्षी बनलो, तरच समस्या संपतील.

साक्षी अवस्था मानसिक स्थिती नाही. ही आध्यात्मिक उत्थानाची स्थिती आहे. त्यामुळेच आपण साक्षी बनतो. साक्षी अवस्थेत टिकून राहण्यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे दुसऱ्यांवर टीका टिप्पणी न करणे. कोणत्याही व्यक्ती वा वस्तूत दोष काढणे आपला अधिकार नाही. परंतु काही लोक समजतात कि आपण टीका केली नाही तर हे असेच चालत राहणार. हे कधी सुधारणार नाही. खरे तर असे नाही.

त्या अवस्थेत टिकून राहण्यासाठी कोणाची तक्रार करु नये. आपला अधिकार नाही. आपले चित्त प्रकाशित आहे. प्रकाशित चित्ताने वस्तूंकडे पाहिले तर सर्व वाईट गोष्टीत सुधारणा होतील. साक्षीभावाने पाहिल्यामुळे आपल्याला उच्च स्थिती प्राप्त होते.

साक्षीभाव असल्यामुळे त्यांच्यात बदल होतो. स्मरणशक्तीमुळे प्रत्येक वस्तू बारकाव्यासकट त्यांच्या डोक्यात स्थिर होते. सहजयोगी असल्यामुळे आम्हाला अजिबात प्रतिक्रिया व्यक्त करायला नको. एखाद्याने चुकीची वस्तू दाखवली तरी ठीक आहे. त्यावर ध्यान करा, चुकीचे काम करत असेल तर आपण पाहात असाल तर त्यावर चित्त द्या. आपल्या बरोबर क्रूरतेने वागत असेल, तरी प्रतिक्रिया करु नका.

तो शांत झाल्यावर त्याला सांगा. हळूहळू त्याच्या चुकीची जाणीव होईल. त्याचं हृदय तुम्ही जिंकाल कोणत्याही वस्तूबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करणे घातक व मूर्खता आहे.

आपण जसे आहोत, ठीक आहोत, दुसऱ्या व्यक्तीशी तुलना का करायची, प्रतिक्रिया देणे अयोग्य होय. त्यातून अंतर्दर्शनाला सुरवात होईल.

व्यक्तीला इतरांच्या प्रतिक्रियांची गरज नाही, आपल्याबद्दल काय विचार करतात, काय वाटते, काय बोलतात याची काळजी करण्याची गरज नाही. अंतर्दर्शनातून आपण स्वयं हे पाहिली पाहिजे. साक्षीत्वाची ही शक्ती आपल्या आत विकसित केली पाहिजे. प्रतिक्रिया करणं बंद करा, तुम्ही स्वतः खूप शक्तिशाली बनाल. आपल्यात कोणत्याच इच्छा आणि जवळीक नसेल, त्यामुळे सर्व नाटक साक्षीभावाने पाहात रहाल.

साक्षीरुपात पाहणे मनोरंजक आहे. त्या प्रत्येक वस्तूच्या मागे असलेला विनोद, मूर्खता दिसेल लोक किती जहाल आहेत, त्यावर आपणांस हसू येईल. उत्तेजित न होता, न थकता ह्या नाटकाला हसाल.

प. पू. श्री माताजी - कबेला - १६.०८.१९९८

प्रतिक्रिया करणे मानवी स्वभाव आहे. परंतु आपल्याला अतिमानवीय व्हायचे तर प्रतिक्रिया करु नये. तरच तुम्ही उन्नत व्हाल. कोणत्या तरी दबावाखाली जर तुम्ही प्रतिक्रिया केली, तर तुम्ही आत्मा होऊ शकत नाही.

प. पू. श्री माताजी, कबेला - २७.०९.१९९८

## संतुलनाची गरज :

पुष्कळ लोक सहजयोगाचा प्रचार प्रसारासाठी खूप काम करतात. ते लोक स्वतः लक्ष देत नाही, उत्थानाच्या गतीला प्राप्त करत नाही. बाह्य स्वरुपात ते खूप काम करतात. परंतु आतल्या शक्तीला वाढवत नाही. तर काही लोक आतली शक्ती खूप वाढवतात, बाहेरच्या शक्तीकडे लक्ष देत नाही. यामुळे दोन्ही प्रकारच्या लोकांमध्ये संतुलन येत नाही. बाह्य शक्तीकडे वाटचाल करतात तर आतील शक्ती क्षीण होते. अशा टोकाला जातात. त्यामुळे ते अशा स्थितीत येतात की अहंकारात बुडायला लागतात.

अशा व्यक्ती एका बाजूलाच जातात. दुसऱ्यांशी संबंध ठेवत नाही. दुसऱ्यावर रुबाब करणे इतपतच त्यांचा संबंध असतो. आपलंच महत्त्व, कौतुक, आम्ही हे केले, ते केले, स्वतःचे महत्त्व वाढवणे त्यामुळे चैतन्य म्हणते तुला जे करायचे ते कर, तुला संपायचे तर संपून जा, मिट. तुला कोणीच थांबवणार नाही कारण स्वतंत्रतेला तो मानतो. आपल्याला स्वर्गात जायचे की नरकात याची तो व्यवस्था करतो.

आम्ही एकटे नाहीत सर्व सामुदायिक विराट शक्तीचे अंग, प्रत्यंग आहोत. परंतु आपल्यालाच विशेष समजणे, महत्त्व देणे, त्यामुळे एक नख काढून फेकून दिले जाते. तसे आपल्याला फेकून दिले जाईल.

दुसरे लोक आपल्या स्वतःच्याच प्रगतीचा विचार करतात. दुसऱ्याशी काय देणं घेणं आम्ही आमच्या खोलीत बसून आईची (श्री माताजी) पूजा करतो, आमची उन्नती होवो, दुनियाशी त्यांचा काही संबंधच नाही. असे लोक प्रगती नाही करु शकत. आपण एकाच शरीराचे अंग प्रत्यंग आहात.

पाच दिवस जर आपली करंगळी बांधली तर ती काही कामाचीच नाही. तसेच आपल्या बाबतीत होते. आपण संतुलनात राहणे आवश्यक आहे. आपल्याला सामुदायिकतेत राहिले पाहिजे. आपल्याला दोन्ही बाजूंना म्हणजे बाह्य व आत लक्ष

देणे जरुरीचे तसेच आपली व सामूहिक शक्ती दोघींना सांभाळलं तरच आपल्या आत पूर्ण संतुलन येईल.

प. पू. श्री माताजी - ३०.०९.१९९०

आपण संतुलनातच राहिले पाहिजे. कोणत्याही गोष्टीत टोकाला जाऊ नये, तो माणसाचा गुण आहे. त्यामुळे काहीच कार्यान्वित होणार नाही. भावनात्मकतेच्या नावावर चुकीची काम करतात, त्यामुळे संतुलनात रहा. मध्यात रहा.

प. पू. श्री माताजी - कबेला - ०१.०८.१९९८

अतिला जाण्याची गरज नाहीच मध्यात येण्याचा प्रयत्न करा. मध्यबिंदूपासून डावीकडे किंवा उजवीकडे गेलात तर संतुलन राहणार नाही. एखादा माणूस खूप विचार करतो तर तो उजवीकडचा तर त्याला डावीकडे नेले पाहिजे. डावी म्हणजे भावुकता त्यात पुढे गेलात तरी त्याला संतुलनात आणले पाहिजे.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - ०७.०५.१९८३

मस्तक जस सांगेल तेच आम्ही करतो, स्वत:वर नियंत्रण नसते. आमचे मानसिक संतुलन नाही तसेच शारीरिक गरजा संतुलित नाही. कोणतेच संतुलन नाही. जसं समजते तसंच करत जातो. ह्यात विवेकशीलता नाही. विचारपूर्वक काम करावे.

प. पू. श्री माताजी - २२.०४.२००१

संतुलनात राहिल्यानेच प्रगती होईल. सहजयोगात आल्यावर जे दोष असतात. ते नाहीसे होतात. दोष कमी होतात यावरुन आपण समजून घेतले पाहिजे की, आपण फार मोठी गोष्ट मिळवली. ते दोष तसेच राहिले तर आपण मध्यात नाही, हे समजून घेतले पाहिजे. तुम्ही संतुलनात आलात की, कोणत्याच वस्तूला चिकटून रहात नाही. सगळ्यात सामावून जाता. एकाच वस्तूला चिकटून राहिलात तर आपण संतुलनात नाही हे समजून घ्यावे.

आम्हाला पकड येते कारण आम्ही अतिला जातो. आपल्या सवयी बदलत नाही. खूप हुशार काही कामाचा नाही. मंदबुद्धी सुद्धा काही कामाचा नाही.

परमेश्वराची बुद्धी मध्यात (संतुलनात) राहणारी आहे. त्यांच्या बुद्धीत सामावून राहणे म्हणजे मधोमध राहणे. सहजयोगात स्थिर होण्यासाठी संतुलनात राहिले पाहिजे. झाडाची मधली फांदी घ्या, पाण्याचा प्रवाह बरोबर मध्यात चालतो, तसंच माणसाला मध्यात, संतुलनात राहिले पाहिजे.

प. पू. श्री मातजी - दिल्ली - १७.०४.१९८१

आमच्याबरोबर अहंकार आणि प्रतिअहंकाराच्या समस्या आहेत. आळशी लोकांना काम करण्याची सवय लावून घेतली पाहिजे. प्रतिअहंकार डाव्या बाजूच्या बाधांनी ग्रस्त लोकांना संतुलनात आणण्यासाठी भविष्याचा विचार केला पाहिजे. आपल्या मनकाला भविष्याच्या योजना करु द्या, म्हणजे हळूहळू डाव्या बाजूच्या खेचण्यातून बचाव होईल. हळूहळू तुम्ही संतुलनात याल.

एखाद्या व्यक्तीची उजवी बाजू अधिक गतिशील असेल तर तामसिकतेद्वारा संतुलन करु नये. मध्याचा उपयोग करावा.

डाव्या बाजूच्या समस्यांचे समाधान, उजव्या बाजूला गतिशील करुन होते. डाव्या बाजूच्या समस्यांचं समाधान मध्यात स्थापित करुन डाव्या बाजूला तमोगुण, उजव्या बाजूला रजोगुण आणि मध्यात सत्वगुण असे हवे. आपण सततच मध्यात राहून आपली प्रगती करुन घेतली पाहिजे.

प. पू. श्री माताजी - १७.०५.१९८०

❋ ❋ ❋

# प्रकरण २१ अ
## उत्क्रांतीचा मध्यमार्ग

अनेक महानगुरु पृथ्वीवर 'सत्य' सांगण्यासाठी अवतरित झाले त्यांनी आपआपल्या स्तरावर मानवाला समजावण्याचा जीव तोडून, अत्यंत मनापासून प्रयत्न केला. लोकांना हे समजावले की आध्यात्मिकता काय आहे. परंतु विषमता इतकी आहे की, आध्यात्मिकता आमच्यासाठी अत्यंत आवश्यक आहे तसेच परमेश्वराशी, त्यांच्या प्रेमच्या सर्वव्याप्त शक्तिशी एकाकारिता प्राप्त करायची आहे. त्या बाबी माणसे कधीही समजू शकली नाहीत.

त्यांनी आपले सर्व प्रयत्न चुकीच्या दिशेने केले. हे तर नक्कीच की मानव अतिशय बुद्धिमान होता. त्याने शोध सुरु केला. परंतु 'सत्या' चा नव्हे तर एकप्रकारे आपल्या मुक्तीचा शोध. किंवा मला समजत नाही काय म्हणावे, आपल्या प्रगतीचा शोध आणि या दिशेने ते विसरले की, सर्वप्रथम त्यांना <u>आध्यात्मिकतेचा शोध करायला हवा</u>. कारण आध्यात्मिकता महत्वपूर्ण आहे.

आमच्यासमोर दोनप्रकारच्या यात्रा होत्या. एक उजवीकडची आणि दुसरी डावीकडची. भारतात का कोणजाणे लोक संत होण्यासाठी जंगलात गेले. ते लोक उजवीकडची तपश्चर्या करीत होते. म्हणजे एकानंतर एक पंचतत्वांमध्ये प्रविष्ट होत होते व पंचतत्वांवर स्वामित्व प्राप्त करीत होते.

सर्व तत्वांच्या आंतरिक चेतनेविषयी त्यांना माहिती होती आणि त्या कारणामुळेच ते त्यांची पूजा करीत होते. पूजेपूर्वी या तत्वांना अवाहन केले जाई की, ते पूजेचे साक्षी होवोत. परंतु ही सर्व उजव्याबाजूची कार्ये झाली म्हणजे फक्त कर्म कांडे. डाव्या बाजूशिवाय उजवा पक्ष अत्यंत भयानक असतो. तुमच्यात जर उजवापक्ष (कार्यशक्ती) नसेल तरीही हे भयानक आहे. परंतु सर्वप्रथम तुम्हाला तुमचा डावापक्ष (भक्तीपक्ष) विकसित करायचा आहे. सुरुवातीस सहजयोगात आम्ही हेच केले.

करुणा, प्रेम आणि सर्वांप्रति सौहार्दाची भावना म्हणजेच डावा पक्ष (भावपक्ष) आहे. आपण इतकेच करु शकतो की, हा देवीचा आशीर्वाद आहे. त्याचे

वर्णन 'देवी महात्म्य' या ग्रंथात केले आहे. देवी तुमच्यात वेगवेगळ्या रुपात विराजमान आहे. डाव्या बाजूस खूपशा गोष्टी आहेत. जेव्हा मी तुम्हाला सहजयोगाबद्दल सांगितले होते तेव्हा मला तुमचा डावा पक्ष जास्त दृढ करायचा होता. (तुमचा डावा पक्ष दृढ व्हावा ही माझी इच्छा होती).

ज्या लोकांनी आपला उजवा पक्ष जवळ केला - तिकडे ते अधिक झुकले ते अत्यंत आक्रमक झाले आणि त्यांनी पंचतत्वाच्या स्तरावर स्वामित्व प्राप्त केले. इथपर्यंत तर ठीक होते परंतु ते लोक अत्यंत रागीट स्वभावाचे झाले. इतक्या क्रोधी स्वभावामुळे ते लोकांना शाप देऊ लागले. ते अत्यंत कठोर वचने बोलत, सर्व व्यापकतेवर त्यांचा विश्वास नव्हता.

जे लोक आक्रमक आहेत भक्तिशिवाय जे उजव्या बाजूचा मार्ग पकडतात, परमेश्वरी आशीर्वादाशिवाय ते चालतात. ते वास्तवात राक्षस बनू शकतात आणि मानवतेसाठी खूप मोठे संकट निर्माण करु शकतात. ही खूप खूप गंभीर गोष्ट आहे.

आक्रमकतेने तुमचे उत्थान होत नाही. म्हणतात तुम्ही खूप मोठे तपस्वी होऊ शकता. जे दुसऱ्याला शाप देऊ शकतील, त्याला कष्टात टाकतील आणि ही फार मोठी शक्ती आहे असे समजतात. ही मोठी शक्ती नाही, असे बिलकूल नाही. कारण तुम्ही अन्य शक्ती, नकारात्मक शक्ती द्वारा दबलेले नसता. तुमची आपली स्वतःची शक्तिच आपले जीवन घेऊन टाकते.

म्हणून कुंडलिनी जेव्हा उठते तेव्हा सर्वोत्तम मार्ग भक्तिकडे जाणे आहे. दुसऱ्यांवर टीका न करता, त्यांच्याशी वाईट न वागता स्वतःच्या आत डोकावून बघायचे आणि आपल्यातील त्रुटिंचा शोध घेऊन हे शोधण्याचा प्रयत्न करा की तुमचा आदर्श काय आहे.

मी म्हणेन तुमच्या डाव्या पक्षावर स्वामित्व मिळविले आहे. तुमच्यात कुंडलिनी जागृतही झाली आहे, परमेश्वराशी तुमची एकाकारिता आहे, आता तुम्ही उजव्या बाजूस गतिशीलतेकडे येऊ शकता आणि या पक्षाविषयी जाणू शकता. त्याची

अभिव्यक्ती करण्याचा प्रयत्न करु शकता. इतरांवर स्वामित्व प्रस्थापित करुन तुम्ही याची अभिव्यक्ती करु नका. स्वत:वर स्वामित्व मिळवूनही तुम्ही हे करु शकता. तुमच्यात जर प्रेम असेल, तर एका वेगळ्याप्रकाराने, अन्य लोकांवर प्रभुत्व गाजवू शकता. तुम्हाला प्रभुत्व स्थापित करावे असे वाटणारच नाही. कारण प्रेम, उदारता आणि विशाल हृदयासमोर लोक स्वत:च झुकतात.

आध्यात्मिक व्यक्तिंकडून आशा केली जाते की, ते अत्यंत विनम्र असावेत. करुणामय, सदहृदय तसेच प्रेमळ असणे हा प्रसन्नता प्राप्तीसाठी सर्वोत्तम उपाय आहे.

प.पू. श्री माताजी, कबेला - २१.०७.२००२

आपल्या कठोर तपस्येद्वारा भारतातील साधूंनी उजव्या बाजूच्या शक्ती प्राप्त केल्या. उजवीकडील सर्व शक्ती त्यांच्या पाशी होत्या. परंतु उजव्या बाजूच्या या शक्तींसह ते कोठे पोचले? मला सांगायला हवे की, ते नरकात पोचले. तिथे कोणलाही आत्मसाक्षात्कार मिळाला नाही.

म्हणून मी जे पहिले कार्य केले ते होते की, कुंडलिनी उठवण्यात वाकबकार बनणे. मला माहीत होते की, मी याच कार्यासाठी आले आहे. फक्त लोकांची कुंडलिनी उठविण्यासाठी, त्यामुळे ते मध्यमार्गावर येतील. ना डावीकडे जातील ना उजवीकडे. परंतु मी प्रथम केवळ उजव्याबाजूचे ज्ञान आणि कुंडलिनी उठविण्याविषयी सांगितले. कुंडलिनीच्या माध्यमातून तुम्ही सहस्त्रार भेदन केले आणि तुम्ही वास्तविकतेच्या खऱ्या आनंदाच्या क्षेत्रात प्रवेश केला. तुमचे सर्व दुर्गुण समाप्त होऊ लागले.

मध्यमार्गावर सर्वप्रथम मूलाधार आले. मध्यमार्गावर मूलाधार जागृत करण्यासाठी तुम्ही लोक अत्यंत पवित्र झाले. तुमच्यातील वासना समाप्त झाली.

तुमचे छचोरपण, उथळपणा संपले आणि तुम्ही अत्यंत पवित्र व्यक्ती बनलात. जोपर्य ंत असे होत नाही तो पर्यंत सहजयोगात राहू शकत नाही.

त्यामुळे पहिली गोष्ट ही आहे की, तुम्ही तुमच्या आत पावित्र्य - विवेक (Sense of Chastity) विकसित करा. याचा सन्मान करा आणि तो आनंद घ्या. तुमचे मूलाधार जागृत झाल्यानंतरच हे घडू शकले आहे. डाव्या बाजूचे हे पहिले चक्र आहे. तिथे तुमच्या आत श्री गणेश विराजमान आहेत.

परंतु आमच्या उजव्या बाजूसही देव-देवता विराजमान आहेत. कमतरता दूर करण्यासाठी प्रत्येक चक्रावर देव विराजमान आहेत. श्री गणेश मध्यात आहेत. त्यामुळे आपल्याला त्यांच्या शक्तिशाली पावित्र्याचा आशीर्वाद प्राप्त झाला आणि आपण पावनतेचे सौंदर्य, पावनतेची शक्ती समजू लागलो. अशाप्रकारे आपण आपल्या उजव्याबाजूच्या दोषांना समाप्त केले. उजवीबाजू युद्ध करण्यासाठी, हत्या करण्यासाठी आणि क्रोधासाठी होती. या लोकांसाठी शांती नव्हती. यांना केवळ हेच ज्ञात होते की, लोकांवर कशाप्रकारे रुबाब गाजवायचा आणि कशाप्रकारे असहिष्णू व्हायचे.

अशाप्रकारे ते स्वाधिष्ठानाच्या उच्चतम स्तरापर्यंत गेले. स्वाधिष्ठानात उंची गाठल्यामुळे सृजनात्मक लोकांमध्ये सृजन करण्याची आक्रमकता जागी झाली. यश प्राप्त करण्यासाठी सर्व प्रकारच्या विचित्र आणि घाणेरड्या गोष्टिंचे सृजन करण्याची आक्रमकता.

तर ती एक वेगळी गोष्ट आहे, जी आपल्याला स्वाधिष्ठानाकडून प्राप्त झाली. ज्या लोकांना नाव कमावयाचे होते किंवा एखादे पद प्राप्त करावयाचे होते त्यांना ही गोष्ट उजव्या स्वाधिष्ठानातून प्राप्त झाली.

नाभीचक्र तिसरे चक्र आहे. या चक्रावर लोक धन कमावायला निघाले, लक्ष्मी नव्हे धन! कोणत्याही प्रकाराने धन कमावण्यासाठी निघाले. त्यांनी पूर्ण विश्वाला धोका दिला. जे धन त्यांनी याप्रकारे जमा केले त्याच्यातून सर्व प्रकारची

दुष्ट कामे केली. एकतर त्यांनी धोकेबाजपण केले किंवा ते आक्रमक झाले. भारतासारख्या डाव्या बाजूच्या देशात धोकाबाजी खूप होती आणि उजव्या बाजूच्या देशांमध्ये आक्रमकता होती.

मध्य स्वाधिष्ठानावर जेव्हा आपण असतो तेव्हा आमच्यात सृजनात्मकता (नवनिर्माण) असते. अत्यंत सुंदर, अत्यंत गहनतापूर्ण आध्यात्मिक कलेचे सृजन! हे सर्वगुण समाप्त झाले आणि लोक अवतरणांनाही वाईट सवयींनी युक्त (पूर्ण) दाखवू लागले. या उन्नतीबरोबर सर्वप्रकारची घाणही आली.

यानंतर जसे मी सांगितले नाभीचक्र आहे. नाभी चक्रावर लोक धनामागे धावू लागले. डावीकडील लोक धन मिळवित होते आणि उजवीकडील लोक धनामुळे आक्रमक झाले होते. धन मिळविणाऱ्या लोकांनी विचार केला की, ते विश्वाच्या शिखरावर आहेत. ज्यांना धन मिळाले होते ते विचार करु लागले की, माझ्यापेक्षा श्रेष्ठ कोणी नाही. अशाप्रकारच्या विचारांनी त्यांना नष्ट केले. ही विचारधारा त्यांना संपवीत आहे आणि त्यांना टोकापर्यंत घेऊन जाईल जिथे ते हे समजू शकतील की,धन नाशासाठी नाही. धन निर्मितीसाठी आहे. देशाच्या निर्मितीसाठी, माणसामाणसांमध्ये शांती, प्रेम, सहयोग, तसेच सर्वप्रकारच्या उत्तम गुणांच्या निर्मितीसाठी.

त्यानंतर हे आक्रमक लोक आईच्या चक्रावर आले. इथेतर मातासुद्धा भयंकर होत्या. तिथे त्यांनी आपल्या मुलांवर आणि इतर सर्वांवर रुबाब गाजविण्याचा प्रयत्न केला. आपल्या मुलांसाठी तिने काहीही बलिदान केले नाही. आपल्याकडे अशा खूप महिला आल्या, त्या आपली मुले आणि पतींच्या बाबत अतिशय आक्रमक होत्या. इतकेच नव्हे तर पुरुषांमध्ये सुद्धा पितृभावना मृत होऊन समाप्त झाली. हे हृदयचक्र होते.

त्यानंतर सामूहिकतेचे चक्र आले. त्याला विशुद्धी चक्र म्हणतात. विशुद्धी चक्रावर लोकांनी पूर्ण जगावर कब्जा मिळविण्याची इच्छा धरली. पूर्ण विश्वाला त्यांनी आपले साम्राज्य बनविण्याचे ठरविले, ज्यामुळे ते सम्राट बनू शकतील. त्यांनी

साम्राज्ये निर्माण केली आणि अशाप्रकारचे अमानवीय वर्तन केले जे करणे मानवाला शक्यच नव्हते. असंभव आहे. मी म्हणेन की, असे लोक खरेतर राक्षस आहेत. हे राक्षसी गुण आजही विद्यमान आहेत. या लोकांच्या वागण्याने सर्व कामकाजातून तुम्ही बघू शकता की, यांचे इतरांशी वर्तन कसे आहे. आणि आक्रमक व आध्यात्माला विरोध करणाऱ्या लोकांचे सृजन करतात. (तसे विचार पसरवितात). अशा लोकांमुळे हे जग दोन्ही बाजूचे झाले. अशा जगात आक्रमक आणि इतरांना कष्ट देणारे लोक आहेत. असे दोन्ही बाजूचे जग आजही आहे. परंतु खूप कमी आहे. याचे श्रेय सामुहिक समजुतदार पणाला द्यावे लागेल. अनेक चांगल्या संस्थांची स्थापना झाली. परंतु त्या संस्थाही काही विशेष कार्य करीत नाहीत. लक्ष्य प्राप्तिमध्ये त्यांना भरघोस यश मिळाले नाही कारण त्यांचे उच्च पदस्थ लोकच सर्वकाही नियंत्रित करतात. परंतु नियंत्रण कसले? ते स्वतःला नियंत्रणात ठेवीत नाहीत. इतरांना नियंत्रित करतात. त्यांच्या वागण्याने या चक्राचे सर्व कार्य बिघडविले आहे.

## संतुलनात राहून सहजचा प्रचार - प्रसार व्हायला हवा

आपण जर सामुहिक रुपात तुम्ही चहूबाजूस बघितले, तर सर्वत्र युद्धे चालू आहेत, लढाया होत आहेत. मारणे, कापणे सुरु आहे विनाश होत आहे. असे कसे घडते? या विश्वात आता अनेक आध्यात्मिक लोक आहेत. त्याचे कारण हे की, आध्यात्मिक लोक अतिशय मौन झाले आहेत आणि आपल्या आध्यात्मिक जीवनाचा आनंद लुटताहेत. ते अत्यंत निश्चेष्ट आणि शांत झाले आहेत. परंतु अशाप्रकारे शांती येत नाही. तुम्हाला गतिमान व्हावे लागेल आणि या विश्वात शांती प्रस्थापित करावी लागेल. यासाठी तुम्हाला काही ना काही करावे लागेल. आमच्या प्रगतीमुळे आम्ही खूप समाधानी आहोत. परंतु आम्हाला याची फिकीर नाही की, इतरांनी किती प्रगती केली आहे. ते कुठपर्यंत पोचले, आपण त्यांना कुठे भेटू शकतो? (दोन्ही प्रगतीत अंतर किती?) आणि कशाप्रकारे त्यांना परावर्तित करु शकतो. परंतु तुम्ही लोकांनी

तुमच्या स्तरावर किती लोकांना परावर्तित केले आहे. तुम्ही काय केले आहे? हे सर्व बघायला हवे. आताही तुम्ही आज्ञेवर अहंकारात राहता आणि आपल्याच शांतीमध्ये प्रसन्न आहात.

आज सर्वात मोठी आपत्ती ही आहे की, ज्याला संपूर्ण विश्व सामोरे जात आहे ती म्हणजे जे लोक आध्यात्मिक आहेत आणि जे अतिशय उंचीवर निघून गेले आहेत त्यांना जराही काळजी वाटत नाही की काय करावे. आपल्या आध्यात्मिकतेचा आनंद घेण्यासाठी ते पूजेत येतात, जास्तीत जास्त आध्यात्मिकता प्राप्त करतात. परंतू इतर लोकांच्या परीवर्तनासाठी (बदलासाठी) त्यांनी कोणतेही सामुहिक कार्य केले नाही. काही लोक एक दोन कामे करीत आहेत. बस. बाकी सर्वजण मजेत आहेत. लोक त्यांना महान आत्मा आणि चांगले लोक म्हणून मानतात या गोष्टीचा आनंद घेत आहेत.

मला वाटते की, तुम्ही लोक अंतर्मुख होऊन बघा की तुम्ही किती सामुहिक कार्य केले आहे? तुम्ही किती जणांना आणले आहे? कोणाबरोबर तुम्ही बोलता? किती लोकांना तुम्ही सहजयोगाविषयी सांगितले आहे? इथे केवळ इतकेसे लोक आहेत. येशू ख्रिस्ताचे केवळ बारा शिष्य होते. ते तुम्हा सर्वांपेक्षा जास्त गतिशील (डायनॅमिक) होते.

म्हणून तुम्ही उजव्या बाजू (क्रियाशक्ती) चा उपयोग करा. जेव्हा तुम्ही उजव्या बाजूचा उपयोग कराल तेव्हा प्रगतीशील लोकांचे सृजन होईल. ते आजारी, रोगी, अतिशय अबोल आणि निष्क्रीय लोक नसतील. अशा लोकांचे सृजन हे सहजयोगाचे लक्ष्य नव्हते. सहजयोगाचे लक्ष्य परिवर्तित (परिवर्तन) करणे हे आहे. खूप लोकांचे परिवर्तन करणे. जे लोक हे कार्य करीत आहेत माझा त्यांना आशीर्वाद आहे. परंतु जे स्वत:पुरते मर्यादित आहेत ही काही चांगली गोष्ट नाही. तुमच्या देशातील किती लोकांनी सहजयोगाचा स्वीकार केला. शोधा, किती लोकांवर तुम्ही सहजयोग कार्यान्वित केला.

म्हणून तुमचा योग अपूर्ण, अर्धा आहे. हा डावीकडचा अर्धवट योग आहे. ज्यात तुम्ही खूप प्रेमळ आहात, करुणामय आहात, असे आहात आणि तसे आहात. तुम्ही फक्त क्रियाशील होऊन जा. परंतु मी हे सुद्धा बघितले आहे की, काही लोकांना लिडर व्हायचे असते. परंतु तुम्ही किती जणांना साक्षात्कार दिला आहे? कितीकांशी सहजयोगाबद्दल बोलले आहात? मी बघितले आहे की, विमानातून जातांना, गल्लीतून फिरतांना लोक सहजयोगाबद्दल बोलतात परंतु इथे आम्ही सहजयोगाचा त्याच्या महानतेसाठी आणि स्वतःला समजण्यासाठी वापर करीत आहोत. तुम्हाला सहजयोग यासाठी दिला नाही. तो तुम्हाला यासाठी दिला आहे की, तुम्ही अनेकांना आत्मसाक्षात्कार द्यावा. तरुणांना तरुणपिढीला माझी प्रार्थना आहे की, तुमच्या सहज शक्तिंना तुम्ही चुकीच्या गोष्टींमध्ये नष्ट करु नका. जसे जुन्या लोकांनी केले. तुम्ही पुढे चला हे उत्तम. सहजयोगाबद्दल बोला, सहजयोगाचा प्रसार करा (पसरवा). यांना शाळा चालविणे, अनाथाश्रम काढणे, त्यांची देखभाल करणे यात रुची आहे. हे तुमचे कार्य नाही. तुमचे कार्य अनेकानेक सहजयोगी आणि सहजयोगीनी बनविणे आहे. परंतु असे होत नाही. मी बघते, असे होत नाही. क्रियाशक्ती (उजवीबाजू) च्या उपयोगाची कमतरता आहे. तुम्हाला क्रियाशील व्हावे लागेल. तुम्हाला काहीही होणार नाही.

कोणी तुम्हाला मारु शकत नाही, कोणी तुम्हाला त्रास देऊ शकत नाही. कोणी तुम्हाला पकडू शकत नाही. हा माझा वायदा आहे. शब्द आहे. तुमच्यात शक्ती आहेत पण तुम्ही त्याचा वापर केला नाही तर असेच होऊन जाल. हेच कारण आहे की, आपण निश्चेष्टता (निश्चलता) च्या स्तरावर आलो आहोत (आपण निष्क्रीय झालो आहोत). आम्ही ही गोष्ट समजायला हवी की, आपल्याला आपल्या क्रियाशीलतेचा उपयोग करायला हवा. क्रियाशीलतेचे महत्व अतिशय आहे.

तुम्ही लोक काहीही कराल पण तामसीप्रवृत्तीचे (राईटसाईडचे) असू शकत नाही. हिटलरप्रमाणे निरंकूश नियंत्रक होऊन नाही. सहजयोगींमध्ये हिटलरही होऊन गेले. परंतु आता तुमच्यासाठी वेळ आली आहे की, तुम्ही पूर्वसूरींच्या संतांपेक्षाही पुढे

काही करावे. त्यामुळे सहजयोग कार्यान्वित होईल. याला (सहजला) स्वत:पुरते मर्यादित ठेवू नका. तुमचे कुटुंब, तुमची मुले आणि तुमच्या आनंदासाठी याला सिमीत करु नका. सहजयोग या कार्यासाठी नाही. तो तर सर्व विश्वाला परिवर्तित करण्यासाठी तुम्हाला याबद्दल विचार करावा लागेल. तुम्ही काय करीत आहात? तुम्ही काय (कोण) आहात आणि सहजयोगापासून तुमची जमेची बाजू काय?

त्यानंतर आपण आज्ञेवर येतो. आज्ञा पार केल्यावर सहजयोगी असे तयार झाले की ते काहीही सहन करु शकतात. कोणत्याही कष्टाला सामोरे जाऊ शकतात. आम्हाला हे अपेक्षित नाही. आम्ही तर इतरांचा त्रास कष्ट, आक्रमकता दूर करु इच्छितो. आमच्याकडे त्या प्रकारची व्यवस्था नाही. तशी समज - उमज आमच्यात नाही. जर हे कार्यान्वित झाले तर तुम्ही अगदी भिन्न प्रकारची व्यक्ती व्हाल.

म्हणजे आम्ही संतांप्रमाणे बनलो आहोत. जसे संत आपल्या आश्रमातील हॉलच्या सभागारात बसत असत तसेच बनले आहोत. त्यापेक्षा जास्त काही नाही.

आक्रमकतेशिवाय जर आम्ही काही सकारात्मक कार्य करण्याचा प्रयत्न केला तर उत्तम होईल. मी जाणते की तुमच्यातील काही लोक अजूनही खूप आक्रमक आहेत आणि देखावा करतात. ही गोष्ट मी जाणते. परंतु जर सामुहिक रुपात कार्य करण्याची इच्छा तुमच्यात जागी झाली तर तुमच्यातील कमतरता तुम्हाला समजतील. अजूनही तुमच्या व्यक्तित्वात कोणते दोष आहेत. हे खूप महत्वाचे आहे. आज्ञाचक्रावर बरेचसे सहजयोगी गडबडून जातात. त्यांना काय होते मला समजत नाही? मी त्यांना सांगितले आहे की, आज्ञाचक्रावर सर्वांना क्षमा करा. पण याचा अर्थ असा नाही की, तुम्ही लोकांना चुकीची कामे करीत राहण्याची परवानगी देऊन टाकायची. तुम्हाला त्यांना क्षमा करावयाची आहे म्हणून भांडण करु नका. काही सांगू नका. या गोष्टींपासून दूर रहा. बस क्षमा करा. खूप सोपे आहे. नाही? जाऊन त्या व्यक्तीशी बोला, समजावून सांगा की हे अयोग्य आहे. तुम्हाला त्याचा सामना करावा लागेल. जर तुम्ही त्याचा सामना करु शकत नसाल तर तुम्ही

बेकार (अयोग्य) आहात. कोणत्याही अन्य साधारण व्यक्तिप्रमाणे आहात. तुम्ही आत्मसाक्षात्कार मिळवून काय उपयोग झाला?

आमच्यात चैतन्य आहे. इतके पुरेसे नाही हे आम्हाला समजायला हवे की, आम्ही ठाक - ठीक आहोत आणि लोकांना रोगमुक्त करु शकता. तो शेवटचा शब्द नव्हे. नाही, तुम्हाला सहजयोग पसरवायचा आहे. तुम्हाला जनतेत जायचे आहे. याबाबतीत सामुहिक होऊन तुम्हाला सहजयोगाचा प्रसार करावयाचा आहे. जगभरात इतके सहजयोगी आहेत तरी आपण विशेष प्रगती केली नाही. म्हणून आता तुम्ही लोकांनीच याची योजना बनवायची आहे की, तुम्ही काय करु इच्छिता. कशाप्रकारे हे कार्य तुम्हाला करायचे आहे? कशाप्रकारे सहजयोगाला पसरावयाचे आहे? हे खूप महत्वपूर्ण आहे. तुम्ही लोक सहजयोगाबद्दल बोलण्यात आणि भजने गाण्यात खूप कुशल (हुशार) आहात परंतु खुप खूप लोकांना सहजयोगात आणण्याचा प्रयास केल्याशिवाय हे सर्व व्यर्थ आहे.

आपल्या समस्या, आपले शत्रू, आपल्या शक्ती यांचा नुसता विचारकरण्यापेक्षा त्या जागी इतर लोकांना शक्ती देऊन त्यांना सहजयोगी बनविण्याबद्दल विचार करा. असे करणे अत्यंत आवश्यक आहे. तुम्ही जर सहस्त्रारात असाल तर तुमच्याजवळ या भरपूर शक्ती आहेत. सहस्त्रारात असूनही तुम्ही सहजयोग पसरवीत नसलात तर आत्म-साक्षात्कार घेण्याचा फायदा काय? केवळ स्वत:साठी? असे करणे अत्यंत स्वार्थिपणाचे होईल. म्हणून मी म्हणेन की, तुमचे श्रेष्ठत्व (गरीमा) आपले यश, आपले नाव याच्या प्रसाराऐवजी कृपा करून सहजयोगात अधिकाधिक लोकांना आणा. अत्यंत गतिशीलतेने कार्य करा.

जोपर्यंत तुम्ही हे कार्य करीत नाही तोपर्यंत तुम्ही पुर्ण नाहीत (अपूर्ण आहात) आणि आदिशक्तीच्या शक्ती तुम्ही अजून पूर्णपणे ओळखल्या नाही. तुम्ही सहजयोगाला केवळ पसरवायचे नाही तर लोकांमध्ये परिवर्तन करावयाचे आहे, त्यांना जाणीव करवून द्यायची आहे.

माझे पूर्ण आशीर्वाद, पूर्णप्रेम आणि पूर्णशक्ती मी तुम्हाला देते परंतु समजण्याचा प्रयत्न करा. ठीक आहे?

आपणा सर्वांचे हार्दिक धन्यवाद.

प.पू. श्री माताजी, कबेला - २३.०५.२००२

देवी आपल्या शक्तिंचा उपयोग गणांच्या माध्यमातून करते. हे गणच तुमच्यातील सर्व सुधारणांना जबाबदार आहेत. गण डाव्या बाजूने कार्य करतात. देवीला त्यांना सांगावे लागत नाही, त्यांचे मार्गदर्शन (पथप्रदर्शन) करावे लागत नाही. त्यांची संरचनाच त्या प्रकारची आहे. तर गण तुमच्या शरीराच्या आत डाव्या बाजूस संरक्षणाची रचना करतात. त्याची प्रतिक्रिया स्वरुप उजव्या बाजूसही संरक्षण मिळते. देवी आपल्या गणांमार्फत तुमच्या डाव्या बाजूची देखभाल करते. परंतु उजव्या बाजूलाही जे लोक आक्रमक आहेत. देवी आपल्या शक्तिने त्यांना ही ठीक करते. कारण तुम्ही सामान्य अवस्थेत पुन्हा परत यावे. विनम्र व्हावे आणि हे समजावे की, तुम्ही देवीचे बाळ (बालक) आहात आणि बालसुलभ आचरण करावयाचे आहे.

प.पू. श्री माताजी, उत्तर अमेरिका - २१.१०.२००२

सर्वप्रथम हे समजावून घ्या की, सहजयोग आंतरिक उत्क्रांती आहे. जी बाहेरच्या बाजूस आपली अभिव्यक्ती करते. म्हणून पूर्ण विचाराअंती (समजून - उमजून) उत्क्रांती प्राप्त करावयाची आहे. तुमच्यातील काही लोक बुद्धिवादी आहेत. बुद्धिवादाला बौद्धिक रुप देण्याची खूप वाईट सवय असते. परमात्म्याच्या दृष्टीने बुद्धिवाद काही नाही कारण परमात्म्यानेच त्याचे सृजन केले आहे. म्हणून तुम्हाला सावध रहायला हवे. काही लोक अतिशय भावूक असतात आणि अतिशय भावूकतापूर्ण पद्धतीने अभिव्यक्ती करतात. तुम्हाला त्या धारणांमधून बाहेर यावे लागेल आणि हे समजून घ्यावे लागेल की जीवनात भावनांची अतिशय भयानक भूमिका असू शकते. आपली स्थिती (मध्यमार्ग) मध्ये स्थापित होण्यानेच तुमचे मोठेपण सिद्ध होईल. तुम्ही महान होऊ शकाल.

प.पू. श्री माताजी, बोर्डी - १२.०८.१९८४

❋ ❋ ❋

# प्रकरण २२

## सूक्ष्म अवस्थेची प्राप्ती – "पुनर्जन्म"

ही महत्त्वाची गोष्ट आहे की, आम्ही काय प्राप्त केले. सर्वप्रथम आपला सर्वशक्तिमान शक्तीशी संबंध जोडला गेला, त्याचा अनुभव घेतला आणि आपल्या जीवनाला नवीन दिशा मिळाली. आपण आपल्याला पूर्ण स्वतंत्रता मिळवली आहे. ही फार सूक्ष्म अवस्था आहे.

प. पू. श्री माताजी - ०७.०५.१९९५

अहंपासून आपल्याला सुटका मिळाली. अहंच्या ह्या भिंतीला आपण पार केले. जो अहं आपल्याला वारंवार सतावत होता. त्या अहंकाराच्या बंधनातून आपण मुक्त झालो. भौतिकतेशी जवळीक न केल्यामुळे आपला आत्मा स्वतंत्र आहे.

आपण स्वच्छ झालात, पूर्ण धुतले गेलात, आपले मस्तक बंधनातून मुक्त झाले, आपण काचेसारखे सुंदर बनतो. त्या आरशात आम्ही ज्या समाजात राहतो त्याचे चित्र पाहू शकतो.

आपल्यात जे अंतर्जात गुण आहेत ते हरवले होते. पण कुंडलिनी जागृत होऊन तिने सहस्त्रार भेदले त्यामुळे आपले अंतर्जात गुण जे हरवले होते ते जागृत झाले. आपली अबोधितता, निर्माणक्षमता, आपला धर्म, करुणा, मानव प्रेम, निर्ण यात्मक शक्ती, विवेक हे सुप्तावस्थेत होते ते सर्व जागृत झाले.

आपल्या आतील प्रकाश आपल्याला चांगले, वाईट सांगेल. सहस्त्रार उघडल्यावरच हे झाले, पण हे नवीन नाही. आतली रचनाच आहे. आपले मोठेपण, स्वभाव, महानता हे पाहता तुम्ही. सहजपणेच आपले एकीकरण होते.

एकीकरण फक्त बाह्य स्वरुपातच नाही तर आंतरिक पण होते. सुरवातीला आम्ही जे करत होतो त्यात आमचे मन वेगळेच सांगत होते, तर हृदय वेगळेच, मस्तक वेगळेच. म्हणजे तिन्हीही वेगवेगळे सांगत होते. कुंडलिनी जागृतीनंतर ते तीन

एक झाले मस्तकाची गोष्ट हृदय आणि चित्त पूर्णपणे स्वीकारतो. आपण स्वत: एकीकृत होता.

प. पू. श्री माताजी - १०.०५.१९९२

सर्वांत महत्त्वाची गोष्ट प्राप्त करुन घेतली ती आतमध्ये. हृदय, मस्तक, जीवन या मध्ये एकाकरिता स्थापित झाली. मस्तक जो विचार करतो तोच विचार हृदय स्वीकार करतो आणि जे हृदय स्वीकारते तेच मस्तक विचार करते. आपले चित्त, हृदय आणि मस्तक यांच्याशी एकाकार झाले. आपले हृदय, मस्तक, चित्त यात द्वंद्व नाही. सर्व प्रलोभनावर मात करणारी शक्ती किंवा आत्मा आपल्यात आहे. ही एकाकारिता आपल्याला मानसिक, भावनिक, आध्यात्मिक स्वरुपात पूर्णपणे सहजयोगाची समज देते.

प. पू. श्री माताजी - १०.०३.१९९२ - ऑस्ट्रेलिया

आपल्या आत जी अवस्था प्राप्त झाली आहे, ती मस्तकाची नवी अवस्था आहे. संस्कृत भाषेत याला फारच सुंदर नाव आहे. "ऋतंभराप्रज्ञा". कठीण नाव आहे, हे प्रकृतीचे नाव आहे. व्यक्तीला वाटते सर्व प्रकृतीच प्रकाशित झाली आहे. आपली अवस्था ही तशीच प्रकृतीची आपल्याशी आणि आपली प्रकृतीशी एकाकारिता झालेली आहे. परमात्मा अनेक घटना, कार्य, प्रेम, सुरक्षा, आपल्या प्रती परमेश्वरी चिंता. स्वत: प्रकृतीच्या माध्यमातून अभिव्यक्त करतात हे अनंत आहे. जेव्हा ऋतंभराप्रज्ञा सहजयोग्यासाठी कार्य करते तेव्हा आपण निश्चितच समजू शकत नाही, इतक्या वेगाने ते होते.

प. पू. श्री माताजी - १९.०१.१९८४

ह्या नवीन अवस्थेच्या अस्तित्वात आपण उन्नत होतो आणि सर्व वेडगळ, मूर्ख गोष्टीतून वरती येतो त्या तेथेच सोडतो. आपल्यात इतकी शक्ती येते की, चारी बाजूला असणाऱ्या नकारात्मक शक्तीला समाप्त करु शकतो.

ही एक अवस्था आहे. हा केवळ तोंडी जमाखर्च नाही. केवळ मानणेपण नाही. ती तर एक अवस्था आहे.

त्या अवस्थेपर्यंत आपण पोहचू शकतो, ह्या सर्व वस्तूच्या वरती, जेथे तुमच्याकडे सर्व ज्ञान असेल, शुद्ध ज्ञान असेल. आपल्या अस्तित्वाचे सूक्ष्म ज्ञान, हाच ज्ञान मार्ग आहे. असे म्हणतात की, प्रत्येक जण हा ज्ञान मार्ग मिळवू शकत नाही. पण ही चुकीची कल्पना आहे. सर्व लोक हा मार्ग मिळवू शकतात. तो आमच्या आत मुळातच आहे. ही उत्थानाची देणगी आहे. त्यामुळे ते जागृत होतात. ते आमच्या आत विद्यमान आहेत आणि ते आम्ही प्राप्त करु शकतो, त्यासाठी आत्मविश्वास हवा.

आतापर्यंत तुम्ही जे जाणले किंवा तुम्हाला जे कळले ते पुस्तकात लिहिलेले आहे किंवा आई, वडिलांनी माहिती सांगितली असेल, ही सर्व माहिती, शोध बाहेरचा आहे. शुद्ध ज्ञान, खरेज्ञान, जे वास्तव ज्ञान हे आपण आपल्या उत्थानानंतरच मिळवू शकतो आणि आपल्या आत स्थिर होते. सगळ्यांना ते ज्ञान मिळविण्याचा अधिकार आहे.

त्या अवस्थेत पोहचल्यावर तुम्ही ज्ञानी बनता, आपल्या विषयात, इतर लोकांच्या बाबतीत, आपल्या चारी बाजूला असलेल्या वस्तू या सर्वांबद्दल ज्ञानी बनतात. यात आपल्याला स्थिर करुन प्रगती करायची आहे. जेथे कोणताच संशय राहणार नाही अशा अवस्थेत आपल्याला स्थित व्हावयाचे आहे.

आमची उत्थान प्रक्रिया मानवी चेतनेपेक्षा वरती आली आहे. आध्यात्मिक व्यक्तीसाठी ह्या सर्व मानवी चेतना मूल्यहीन आहेत. त्याला पूर्ण ब्रम्हांडाचे ज्ञान असते. ह्या ज्ञानात तारे किती, ग्रह किती, ब्रम्हांड किती हे नसते. हे सर्वतो जाणतो. सूक्ष्मतेत अनेक वस्तूंना शोधतो, अशा काही गोष्टी असतात की, त्याने यापूर्वी पाहिलेल्या पण नसतात, ऐकलेले पण नसते. म्हणजे व्यक्तित्व ज्ञानमय बनते. म्हणजे तो ज्ञानी बनतो आम्हाला तेथपर्यंत पोहचायचे आहे.

आम्ही मानव रुपात जन्मलो, वास्तविक आम्हांस अनेक गोष्टींचे ज्ञान आहे, पण ते बाह्य स्वरुपातले. वास्तविकतेचे ज्ञान नाही. हे ज्ञान भावनिक, बौद्धिक, पुस्तके वाचून होणारे नाही. हे ज्ञान शाश्वत आहे. टिकावू आहे. अस्तित्वात आहे

आणि राहील. ते परिवर्तित होऊ शकत नाही, त्याला आकार नाही. तो जसा आहे तसा आहे. त्याचे ज्ञान आपल्याला मिळवायचे आहे.

जेव्हा तुम्ही परमेश्वराशी एकरुप होतात तेव्हा परमेश्वर आपल्याला काय देतो? तो आपल्याला वाईट वस्तू, नष्ट होणारे भौतिक पदार्थ देत नाही. शाश्वत स्वभावाचे वरदान देतो. संतुलन देतो, शांत स्वभाव, आनंदी जीवन आपल्याला देतो. हे सर्व गुण आपल्या आत जागृत होतात.

ही शांती मानवी क्रुरतेला समाप्त करते. याच्या व्यतिरिक्त इतर शक्यता आपल्याला मिळतात. ज्ञान सर्वच गोष्टींचे सूक्ष्म ज्ञान. हे ज्ञान आपल्याला शाळेत किंवा महाविद्यालयात नाही मिळत. हा ज्ञानाचा सागर आपल्या आतच आहे. जे आपल्याला पहायचे आहे, जे प्राप्त करावयाचे आहे, ते सर्व आपल्या आत विद्यमान आहे. हेच खरे ज्ञान आहे, जे आपण सूक्ष्म ज्ञानाच्या माध्यमातून प्राप्त करतो. सूक्ष्म ज्ञान म्हणजे चक्रांचे ज्ञान, ब्रम्हांडाचे ज्ञान यातून आपण सर्व प्राप्त करु शकतो. इतर लोकांना ज्ञान देण्याची आवड वाढते. आपला पूर्ण दृष्टिकोन बदलतो. आपले डोळे एकदम शांत होतात. हेच तर आपल्याला मिळवायचे आहे.

जीवनाची सर्व पुंजी प्राप्त झाली आहे. तेच तर आपल्याला मिळवायचे होते. ते आपल्या आत मध्येच आहे. ते आपल्याला सर्व सुख, सर्व आनंद, श्रेष्टता मिळवून देईल. ती आपल्याला महान वैभव, श्रेष्टशक्ती मिळवून देईल.

सदसद्‌विवेक आपल्यात जागृत होतो. त्यामुळे आपण सतत समाधानी राहता. आपण जाणतात, आपण काही चुकीचे काम करत नाही. चैतन्यलहरीच्या माध्यमातून खरे - खोटे जाणण्यात हुशार होतात. चैतन्यलहरीवरुन आपणाला सर्व समजते.

प. पू. श्री माताजी, कानाजौहरी - २९.०७.२००१

आमचे सहा शत्रू आहेत. ज्यांना आपण षड्‌रिपू म्हणतो. कुंडलिनी जागृत झाली की, आपण परमेश्वराशी एकरुप होतो. तेव्हा हे सारे दुर्गुण सुटून जातात.

आपण जाणता की, आपण सत्य मिळवले आहे. आता या विघातक सवयीचा आनंद आपण घेऊ शकत नाही. षड्रिपू आपल्याला मुक्त करतात.

प.पू. श्री माताजी - २३.०४.२०००

आपल्या आत आपण परमेश्वरी साम्राज्यात प्रवेश करतो. परमेश्वरी साम्राज्यात प्रवेश केल्यावर आपला खरा पुनर्जन्म होतो. आपली आई, व्यक्तिगत आई, कुंडलिनी जागृत करुन आपला पुनर्जन्मच आपल्याला देते आणि आपला परमचैतन्याशी योग होतो.

मी तुम्हाला सांगितले की, कुंडलिनी लहान बीच्या अंकुरासारखी असते. हा अंकुर वृक्ष बनला तर आपण आश्चर्यचकित होतो. तसेच त्या अंकुरातून व्यक्तीतही परिवर्तन घडून येते. आपल्या आत असणारे षड्रिपू नष्ट होतात. त्यांच्यापासून मुक्त होऊन आपण आत्मविश्वासाने परिपूर्ण बनतात. आपली आक्रमकता नष्ट होते, शिवाय इतर लोकांचे दोष आपण पहात नाही. साक्षी बनतो, प्रतिक्रिया देत नाही. डोक्यापासून आपण वरती उठतो, हाच आपला पुनर्जन्म आहे.

प. पू. श्री माताजी - १७.०४.२०००

बायबलमध्ये अनेक गोष्टी आहेत, त्यात पुनर्जन्माच्या वेळेस आपले शरीर कबरीमधून बाहेर येईल. ही फक्त ख्रिश्चनांसाठी नाही, मुसलमान, यहुदीसाठी पण आहे. ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. कबरीमध्ये आपली हाडे असतात, त्यांना आपण कसा आत्मसाक्षात्कार देऊ शकतो. नल दमयंती आख्यानात स्पष्ट सांगितले आहे की, सर्व साधक पर्वनात त्या परमेश्वराला शोधतात ते सर्व कलियुगात पुनर्जन्म घेतील व त्यांना आत्मसाक्षात्कार मिळेल.

प. पू. श्री माताजी, गणपतीपुळे - २५.१२.१९९३

सहजयोगात आपले शरीर (जिवंत) असतानाच आपल्याला पुनर्जन्म मिळतो. यापूर्वी तुम्ही त्या व्यापक शक्तीस जोडले नव्हते. आपण आपली भावना, इच्छा यांच्या माध्यमातून सर्व कार्य करत होतो. अहंकाराच्या कबरीमधून आपण

बाहेर पडू शकलो नाही. येशूने सांगितले की, आपल्याला जाणा. ते जाणत होते की, स्वतःला जाणल्याशिवाय पुनर्जन्म होऊ शकत नाही.

प.पू. श्री माताजी, कलकत्ता - एप्रिल १९९५

येशूने मृत्यूनंतर पुनर्जन्म घेतला होता. सहजयोगात आम्ही मृत्यूच्या नंतर जीवनात प्रवेश केला आहे. पुनर्जन्म आमच्यासाठी पूर्ण विश्वासाठी आहे. हा संदेश आहे की पुनर्जन्म म्हणजे पुनरुत्थान मिळवणे, प्राप्त करणे.

प. पू. श्री माताजी, टर्की - २२.०४.२००१

तुम्ही माझा श्रृंगार आहात. संपूर्ण विश्वातील लोक माझी मुले आहेत. मी वास्तवामध्ये आपल्यासाठी असे काम केले की, श्वासागणिक तो विचार होता. आपण पूर्ण स्वच्छ व्हाल, निर्मळ व्हाल तेव्हा प्रेमाची शुद्ध मूर्ती बनाल. तो दिवस तुमचा व माझा जन्म दिवस असेल. आपला पुनर्जन्म झाला. आतापर्यंत आपण लहान बालक होतो. आपण सहजयोगात मोठे झालात, आपण मोठे आणि गहन व्यक्ती बना.

प. पू. श्री माताजी - २१.०३.२००१

**मोक्षावस्था-**

जो जन्माला येतो तो मरतोच. आपण नाही समजत की, आपल्याला शाश्वत जीवन मिळालेले आहे. आपण कधी मरु शकत नाही.

मृत्यू म्हणजे शरीर संपणे नाही. मृत्यू म्हणजे जेव्हा तुम्ही आपल्या आत्म्याचे नियंत्रण घालवून बसता. जेव्हा तुम्ही आत्मसाक्षात्कारी होता. तेव्हा पूर्ण नियंत्रण आपल्या जवळच असते. आपल्याला जन्म घ्यायचा असेल तर जेथे पाहिजे तेथे आपल्या आत्म्याला घेऊन जाऊ शकता. आपल्या इच्छेशिवाय आपला जन्म होणार नाही.

आपल्यासाठी मृत्यू विशेष गोष्ट नाही. आपल्याला जीवन प्राप्त झालेले आहे. आपण हेच शरीर कायम नाही ठेवू शकत. कपडे बदलतो, तसे शरीर बदलत राहील. आपण जिवंत आहात आपण सतर्क आहात आणि समजता की शरीर नसतांना आपण सहजयोग आणि सत्यासाठी प्रत्येक वेळी उपलब्ध असता.

प. पू. श्री माताजी, कबेला - ०७.०५.१९९५

# प्रकरण २३
# सहस्त्राराचे सार–पूर्णसमग्रता

सहस्त्रार म्हणजे सहा चक्रांचा समूह. ह्या चक्राच्या दोन्ही बाजूला एक हजार नाड्या आहेत. जेव्हा प्रकाश टाळू भागात (लिंबिक एरिया) येतो तेव्हा ह्या नाड्या प्रकाशित होतात. त्या ज्वालेसारख्या नाजूक दिसतात. अतिशय सौम्य ज्योतीसारख्या दिसतात. त्यांच्या ज्योतीत सात रंग असतात. जे इंद्रधनुष्यात दिसतात. शेवटी सर्व ज्योती एकत्र होतात. समग्र ज्योत होने, हा प्रकाश स्वच्छ (Crystal Clear) असतो. ते सात प्रकाश शेवटी एक स्वच्छ (स्फटिका) प्रकाश बनतो. कुंडलिनी टाळू भागात प्रवेश करुन मस्तकाला प्रकाशित करते. मस्तक प्रकाशित झाल्यानंतर सहस्त्रार ज्वालाच्या गुच्छासारखे दिसतो. हा फार गहन विषय आहे. कुंडलिनीमुळे मस्तक प्रकाशित झाल्यानंतर आपल्या मस्तकात सत्याची अनुभूती होते. म्हणून सहस्त्रारला सत्यखंड म्हणतात. आपण सत्याला मस्तकातूनच ग्रहण करता यापूर्वी तुम्ही जे पहात होता ते सत्य नव्हते. म्हणून उत्थानानंतर सत्य पाहता येते. आत्मा प्रकाशित झाल्याशिवाय मस्तकाची दिव्यता पाहू शकत नाही.

आपल्याला जी अनुभूती होते ती सत्याची. ती सत्यच असते. सज्जन माणसाला कोणता त्रास आहे, हे आपण बोटांवर पाहू शकतो. चित्ताने बोटांकडे लक्ष दिले की, आपल्याला कळते. अगोदर पहातो नंतर कोणते चक्र खराब आहे हे सांगतो.

सत्यखंड, सहस्त्रार जास्त उघडले तर आपल्याला विचार करावा लागत नाही. आपण तात्काळच सांगतो. त्यावेळी आपले चित्त आणि सत्य यात अंतर राहत नाही. प्रकाशमान चित्त आणि प्रकाशित मस्तक एकाकार होतात. त्यामुळे व्यक्तीला कोणतीच अडचण रहात नाही. बोटांवर पण पाहण्याची गरज पडत नाही. आपण जे म्हणाल वास्तवतेत तेच होते.

सहस्त्रार अधिक उघडले तर ते आत्म्याबरोबर एकाकार होते, प्रथम चित्ताशी एकाकार नंतर आत्म्याशी - आत्म्याशी एकाकारितेमुळे आपण जे सांगाल ते सत्य असते.

मस्तक तीन नवे प्रकार प्रकट करते.

प्रथम - तार्किक निष्कर्ष (Logical Conclusions) तून सत्य व्यक्त होते. तर्का प्रमाणे मस्तक सत्याचा स्वीकार करते, तरीही मस्तक बाह्य स्तरावरच कार्यशील रहाते.

निर्विकल्प अवस्था - आपण विश्वासाने सांगतो की, हे चक्र विशुद्धी चक्र आहे. यात शंका नसते. ह्या अवस्थेला निर्विकल्प अवस्था म्हणतात. तिच्यामुळे सहजयोग व श्री माताजी यांच्याबद्दल शंका राहत नाही. त्याचवेळेस मस्तकाचे अधिक उघडणे (उन्मोचन) सुरु असते. यासाठी आपल्याला ध्यान करावे लागते. नम्रतेने आपल्याला ध्यानात बसावे लागते. या अवस्थेत आपले चित्र आपल्या मस्तकात, प्रकाशित मस्तकात विलीन होते. यासाठी सहजयोगीला अत्यंत सच्चाई व नम्रतापूर्वक सहजयोगाला आत्मसमर्पण करावे लागते.

सहस्त्रारचा सार समग्रीकरण आहे. सहस्त्रारमध्ये सर्व चक्र स्थित आहेत. शिवाय सर्व देवी देवतांचे समग्रीकरण आहे. त्यांच्या समग्रतेची अनुभूती आपण घेऊ शकतो. कुंडलिनी सहस्त्रारात पोहचते तेव्हा आपले मानसिक, भावनात्मक, आध्यात्मिक व्यक्तित्व एक होते. आपले शारीरिक व्यक्तित्व त्यात विलय (एकाकार) होऊ लागते. आपल्याला कोणतीच समस्या रहात नाही. आपल्या व्यक्तित्वाचे समग्रीकरण आवश्यक आहे. ते आतूनच येते. आपला आत्मा त्यांना बळ देतो, सामर्थ्य देतो. "माझा आत्मा कार्य करो" असा संकल्प करा आणि कार्याला सुरवात होईल. जेव्हा आपल्या आत्म्यानुसार काम करता तेव्हा तुम्ही कोणाचे गुलाम (दास) नसता. आपण समर्थ बनता. समर्थचा अर्थ शक्तिशाली व्यक्तित्व. शक्तिशाली व्यक्तित्व बनल्यामुळे आपल्याला कोणतेच प्रलोभन उरत नाही, कोणताच वाईट विचार नसतो. कोणतीच समस्या किंवा अडचण रहात नाही.

समग्रीकरणामुळे आपल्याला शक्ती मिळते, त्याप्रमाणे आपण कार्य करतो. आपण त्यामुळे अशा अवस्थेला पोहचतो की, तेथे निरानंदच असतो. निरानंद आपल्याला मिळाला म्हणजे तुम्ही आत्मस्वरुप बनतात.

निरानंद अवस्थेत कोणताच भेदभाव रहात नाही. अद्वैतभाव निर्माण होतो. 'एक' व्यक्तित्व होता आपण पूर्णपणे समग्र होता आणि आनंदात काही अपूर्णता रहात नाही. यात दुःख किंवा प्रसन्नता नसते. फक्त आनंदच असतो.

आनंदाचा अर्थ असा नाही की, आपण खो-खो हसाल किंवा हसत रहाल. ती निस्तब्धता असते (Stillness) अंतर्मनचा विश्रामभाव, शांती. आपल्या आत्म्याची, व्यक्तित्वाची, जी चैतन्यलहरींच्या रुपात अवतरित होते. त्यांची अनुभूती म्हणजे आनंद. त्यावेळेस आपण सूर्य प्रकाशाच्या प्रभावासारख्या अनुभव करतो. त्या सौंदर्याची सावली चारही बाजूला पसरते.

परंतुप्रथम आपण आपल्या वैयक्तिक, स्वार्थी, मूर्ख, कल्पनांनी घाबरतो. त्यांना फेकून द्या. पूर्वी आम्ही असुरक्षित होतो, विचार चुकीचे होते, त्या सर्व फेकून द्या. परमेश्वराशी एकरुप व्हा म्हणजे तुम्हाला कळेल ही भीती खोटी होती.

मी (श्री माताजी) म्हणते की, सहस्त्रार परमेश्वराचा आशीर्वाद आहे. अतिशय सहजतेने सहस्त्रार कार्यान्वित झाले आहे. जेव्हा सहस्त्रारचा भेद केला तर लक्षात येते की, हे सहज व सोपे काम नाही पण त्यात मला सफलता मिळाली.

सहस्त्रारच्या मध्यात सत्याची मुळे खोल जाऊ द्या. ती प्रकाशित होतील तर आपल्याला मार्गदर्शन करतील. तेव्हा आपल्याला समजून घेतले पाहिजे की, आपले सहस्त्रार आपल्या आत्म्याद्वारा पुर्णतः प्रज्वलित झाले. आपल्या मुखमंडलावर तो प्रकाश जाणवला पाहिजे, आपल्याला कोणी पाहिल्यावर म्हटले पाहिजे की, हा तर प्रकाश आहे. सहजयोगात आपण एखादी गोष्ट दृढतापूर्वक पकडतो म्हणजे आत्मा पकडतो. आपला आत्मा आणि व्यक्तित्व पतंगाप्रमाणे आकाशात उडतो. आपण

आपले कुटुंब, पैसा, संसारिक वस्तू यांची खरोखरच चिंता करत नसाल तर सहजयोगात आपण सफल व्हाल.

व्यक्तिगत इच्छेचे काही महत्त्व नाही. परमेश्वरी इच्छेचेच महत्त्व आहे. “परमेश्वरा तुझी जशी इच्छा असेल तसे होवो”. आश्चर्य म्हणजे आपल्या इच्छाच बदलतात. आपले संकल्प बदलतात. आपण काही म्हटले की, तसे घडते. यातूनही लोकांमध्ये अहंकार वाढतो. यासाठी सतर्क रहा. हे शक्तीद्वाराच केले जाते. आपल्याकडून हे होत नाही. आपल्याला आत्मा बनायचे आहे. जेव्हा तुम्ही आत्मा बनता तेव्हा अकर्म होता.आपण काय करतो ते समजत नाही.

हे सर्व सांगितल्यावर आपली अधिकतर चक्रे उघडलेले असतील. हे सर्व माझ्या कुंडलिनीचे काम आहे. आपल्याला पण अभ्यास करायचा आहे आणि आपली प्रगती पाहायची आहे. आपण आपल्याला आरशात पाहा आणि आपलाच सामना करा. आपण उन्नती करता, अधिक प्रगती करा. लहान, लहान गोष्टींच्या बाबतीत सतर्क रहा. ह्या कृतयुगात आत्मसाक्षात्काराचे लक्ष्य गाठणे सोपे आहे.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - ०४.०२.१९८३

## प्रकरण २४

## निरानंदाची अनुभूति

योगाचा अर्थ आहे जोडणे, दुसरा अर्थ आहे युक्ती म्हणजे संबंध जोडले जाणे हा एक अर्थ आहे तर दुसरा युक्ती. युक्ती म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे. तीन पद्धतीने ते समजावले जाते.

(१) युक्तीचे ज्ञान येणे. हे ज्ञान बुद्धीने नव्हे. आपल्या बोटांवर हातात ही कुंडलिनी पुर्णपणे जागरुक होते. हे ज्ञान होते, त्याचबरोबर इतरही ज्ञान आपल्याला होते. अनेक गोष्टी तुम्ही यापुर्वी समजत नव्हत्या, त्या समजायला लागतात. शिवाय कोण खरा आहे कोण खोटा हेही समजायला लागते.

(२) भक्ती : आमची तुम्ही भक्ती करता, पण ती अनन्य भक्ती असावी. तेव्हाच तुम्ही आमच्याशी एकाकार व्हाल, एकरुप व्हाल. आम्ही जसा विचार करु तसाच आपणही विचार कराल. आपले विचार, कार्य, प्रेम हे माझ्यावरील प्रेमासारखेच असावे. हा जर प्रेमाचा स्त्रोत आहे. जर आडात असेल तर पोहऱ्यात येईल. दुसरी गोष्ट कशी येईल? जर दुसरी गोष्ट आली तर (श्री माताजी) मी असे समजते की, दुसऱ्याच आडातून, घटात पाणी भरले आहे. तो घट माझा नाही.

यावर उपाय "आई माझ्या हृदयात या". माझ्या जीवनातल्या प्रत्येक कामात आपण या. तुम्ही जेथे म्हणाल तेथे मी (श्री माताजी) हजर आहे. हात जोडून. आपण हे मनापासून म्हणा म्हणजे संबंध जोडला जाईल. आपल्याला काही करावे लागणार नाही.

(३) मी सजावट केली, हे काम केले, मी ते केले असे वाटत असेल, तर आपण सहजयोगी नाही. सहजयोगात सर्व कर्म अकर्ममय व्हावे. मी, मी ची गोष्ट जेव्हा मनात सारखी येते तेव्हा आपण विचार केला पाहिजे की, असा विचार माझ्या मनात का आला? याचा अर्थ योग पुरा झाला नाही. जेव्हा योग पुरा होतो तेव्हा आपण असा विचार करत नाही. अकर्मामध्येच हे होत आहे. होत आहे, घटित होते,

ते सर्व होत आहे, असे आपण बोलू लागता. तेव्हा पूर्णपणे तुम्ही तादात्म्य पावता. विचार करा मी करतो, मी करत आहे, मी काय करतो. जेव्हा तुम्ही प्रकाश शोधत होता तेव्हा तुम्ही काही करत होते. कारण आपल्या आत अहंभाव होता आपण एकटे होता, एक व्यक्ती एक व्यक्तिमध्ये होता. आता आपण समष्टीत आलो. जेव्हा तुम्ही सामूहिकतेत येता तेव्हा काहीच करत नाही. आपण अंग, प्रत्यंग आहात. कार्य होत रहाते.

अशा पद्धतीने आपले म्हणणे असावे, आपल्याकडे नजर करा, पाहा मी काय विचार करतो. दुसऱ्यासाठी काय विचार करतो. त्याच्यातले मला चांगले गुण दिसतात की वाईटच. दुसऱ्याचे चांगले गुण दिसत असतील आणि आपले वाईट, तर खूपच चांगली गोष्ट आहे. दुसऱ्यांचे दुर्गुण आपण घालवू शकत नाही पण आपले मात्र हटवू शकतो. आपल्यातल्या त्रूटी शोधून त्या नीट करु शकतो.

सहजयोग फार अद्‌भूत गोष्ट आहे. अजूनही आम्ही सहजयोगाची मजा, आनंद घेऊ शकत नाही. कारण आपल्यातच काही दोष, खराबी आहे. त्यासाठी ह्या युक्त्या शिकून घ्या म्हणजे फक्त आनंद, निरानंद. आपण आनंदातच बुडून जाल.

या परिवर्तनाला कबिराचे आशीर्वाद आहेत त्याचे वर्णन करु शकत नाही. कबीर म्हणतात "अब मस्त हुऐ फिरक्या बोले". आपण सर्व त्या मस्तीत या. ही मस्ती प्राप्त करा आनंदित रहा.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - ३०.०३.१९९०

सहस्त्राराच्या आनंदाला निरानंद म्हटले जाते, प्राचीन काळापासून निरानंद अथवा निर्मल आनंद म्हटले जाते. काही लोक त्याला निर्मलानंद म्हणतात. हा आनंद आपण सुळावर चढताना सुद्धा अनुभवतो. आपल्याला विष दिले जाते, मृत्यूशय्येवरही हा निरानंदाचा अनुभव करतात. तोच हा निरानंद.

प. पू. श्री माताजी - ३१.०७.१९८२

* * *

**चैतन्यलहरी :**

चैतन्यलहरी आमच्यातील आदिशक्तीचा. शक्तीचा सूक्ष्म प्रवाह आहे.

प. पू. श्री माताजी, महावतार - १९८०

ही आईची शक्ती आहे. आदिशक्तीची ऊर्जा आहे. चैतन्यलहरीच्या माध्यमातून सर्वत्र कार्य करते. ही अत्यंत सूक्ष्म ऊर्जा आहे. जी तुमच्या सहस्त्रारातून वाहू लागते.

प. पू. श्री माताजी, कबेला - ०६.०५.२००१

चैतन्यलहरीची कार्य प्रणाली मोठी मनोरंजक आहे. ती साधारणत: अर्धविरामाच्या(;) आकाराची असते, त्यांच्या आकारात बदल होत राहतो. अबोधिततेचे प्रतीक स्वस्तिकाचा पण आकार धारण करते. आमचे अस्तित्व, आमच्या चेतनाचे प्रतीक ओंकाराचा आकारही धारण करते. स्वस्तिक रुप धारण करुन डाव्या बाजूचे शरीराचे व ओंकार रुप धारण करुन उजव्या बाजूच्या शरीराचे पोषण करते.

प. पू. श्री माताजी - ०५.०५.१९९१

# प्रकरण २५

## सत् – चित् – आनंद

आम्ही म्हणतो परमेश्वर सत् चित् आनंद आहे. सत् म्हणजे सत्य. मानवीय भाषेत आम्ही सत्याचे संबंधीत रुप जाणतो. ज्या सत्याची गोष्ट मी तुम्हाला सांगणार आहे. ते पूर्ण सत्य आहे. त्यातूनच सर्व संबंध प्रस्थापित होतात.

सत् हाच पुरुष आहे. तोच परमात्मा आहे. तो निर्मितीत भाग घेत नाही. फक्त उत्प्रेरक (Catalyst) असतो. उदाहरण असे देता येईल-मी सर्व कार्य करते पण माझ्या हातात प्रकाश आहे. त्याच्या शिवाय मी काहीच करु शकत नाही. हाच माझ्या निर्मितीचा कर्ता आहे. पण तो प्रकाश कोणत्याही तऱ्हेने माझे काम करीत नाही. तसाच सर्व शक्तिमान परमेश्वर त्या प्रकाशासारखा साक्षी मात्र आहे.

परमेश्वराचा दुसरा गुण चित्त आहे. उत्तेजित झाल्यावर त्याचे हृदय धडधडते. तेव्हा आपल्या चित्ताने परमेश्वर सृजन करु लागतो.

तिसरा गुण आनंद - आनंदाचा अनुभव परमेश्वर आपले विचार, निर्मितीतून मिळवतो.

हे तीन सत्, चित् आनंद जेव्हा शून्य बिंदूवर भेटतात तेव्हा ते ब्रम्हतत्त्व बनतात. जेव्हा हे तिन्ही गुण एक होतात. तेव्हा सृजन आणि अभिव्यक्ती होत नाही. आनंदाची एकाकारिता चित्तानेच होते.

कारण आनंद विलयाच्या बिंदू (कगार) वर तर आनंदाची एकाकारिता सत् बरोबर झालेली असते. तिन्ही गुणांचे संमिश्रण वेगळे केल्यावर तीन प्रकारच्या दृश्यांची निर्मिती करतात.

आनंद सृष्टीच्या बरोबर असतो, तेव्हा सृष्टी अधोगतीकडे वाटचाल करते. सत्याकडून असत्याकडे माया किंवा भ्रमाकडे.

जेव्हा आपले मिलन सर्वशक्तिमान परमात्म्याबरोबर होते. त्यावेळेस दृष्टांताचा दुसरा भाग आरंभ होतो. ही प्रक्रिया हळूहळू उच्चतर, अधिक सूक्ष्म किंवा

उत्कृष्ट होऊ लागते. पशूपेक्षा.मानवाचा आनंद खूप सुंदर आहे. आपल्या आनंदाच्या अभिव्यक्तीत बदल होऊ लागतो. आपल्याला विशाल आनंद प्राप्त होतो. कुत्र्यासाठी सौंदर्य अर्थविहीनआहे. कुत्र्याला शालीनता अर्थविहिन आहे. परंतु मानव एका स्थितीत पोहचल्यावर आपले सत् जी आपली चेतना आहे ती विकसित करतो. त्या सीमेपर्यंत आपला आनंद आणि सृजनशीलता विकसित करतो. हा मानव आणि कुत्रा (प्राणी) यातील फरक आहे.

आपल्या लक्षात आले असेल की, परमात्म्याची सृजनात्मकता, आनंद, त्याचा प्रकाश मानव हृदयात आत्मा बनून पोहचतो. हे फारच सुंदर आहे.

आमच्या अंतःस्थित आत्मा अंतरात्मा सर्वोत्तम आहे. त्याची उत्कृष्टता अथांग आहे. म्हणून त्याचे शाश्वत महत्त्व आहे. असीम असल्यामुळे आम्हाला त्याचा थांग लागत नाही.

प. पू. श्री माताजी, चैतन्यलहरी - १९९३

आत्मा (Realization) च्यासुरवातीपासूनच हृदयात विराजमान आहे. वेगळा क्षेत्रज्ञ झालेला. पाहत राहणारा, आपले काम जसे असेल तसे पहात राहणे, हे करत असतो. परंतु त्याचा प्रकाश आमच्या चित्तात नाही. तो वेगळा आहे. हे आत्मसाक्षात्कारापूर्वीचे त्याचे स्वरुप होय.

आत्मसाक्षात्कारानंतर तो प्रकाश चित्तात येतो, चित्त भवसागरात (Void) आहे. त्यानंतर त्याचा प्रकाश सत्यात येतो, मस्तकात प्रकाश आल्यावरच आम्ही सत्य जाणतो, बुद्धीने नाही अनुभवाने, त्यानंतर त्याचा प्रकाश हृदयात येतो, हृदय विशाल होऊ लागते. त्याची आनंदाची शक्ती वाढते. म्हणून सच्चिदानंद - सद - चित - आनंद, सत मस्तकात, चित्त आमच्या धर्मात (भवसागरात), आनंद आमच्या आत्म्यात (हृदयात) प्रकाशित होऊ लागतात. सुरवातीला प्रकाश हळूहळू पसरतो नंतर वाढतो.

हे फारच सूक्ष्म स्वरुपात असते, आम्ही ज्या स्थूल व्यवस्थेत राहतो, त्यात पकडणे कठीण. हळूहळू पकड येते, जोपर्यंत त्याचा प्रकाश चारहीबाजूला पसरणार नाही तो पर्यंत. कुंडलिनी वरती आल्यावर आपण सदाशिवाच्या स्थानाला नमस्कार केला. आपल्या आतला आत्म प्रकाश अंधुक, अंधुक वाहू लागला. पण मस्तकात तो पूर्णपणे पसरला नाही. आपण मस्तकातून प्रकाश पसरविण्याची इच्छा कराल, ते शक्य नाही. आपले मस्तक आणि हृदय यात संतुलन आणावे लागेल. जेव्हा आपण आपल्या बुद्धिने अधिक कार्य कराल तर (ह्एारत फाल्रिए) हार्ट अॅटॅक येतो. जेव्हा तुम्ही हृदयाने जास्त काम कराल तर मेंदू फेल होतो. हृदय आणि मेंदूचा फार गहन संबंध आहे आणि जेव्हा तुम्ही पार होता तेव्हा हे संबंध अधिकच गहन होतात. जेव्हा त्याचे संबंध घनिष्ट होतात तेव्हा चित्त परमेश्वर स्वरुप बनते.

ह्या योगात ही असे म्हटले जाते की, मन आणि अहंकार दोन्ही नष्ट होतात. पण असे सांगूनही लोकांच्या लक्षात येणार नाही. मन आणि अहंकार यांना कसे जिंकायचे. त्यासाठी एकच द्वार आहे ते म्हणजे आज्ञाचक्र. आज्ञाचक्रावर काम केल्याने मन आणि अहंकार यांचा पूर्णपणे लय होतो. मेंदू आणि हृदय यांच्यात पूर्ण सामंजस्य येते. त्यांच्यात एकता यायला हवी, ती एकता आम्हाला मिळवायची आहे.

आपले हृदय सहस्त्रार होते, सहस्त्रार हृदय होते. जो आपण विचार करतो तो आपल्या हृदयात आहे, जो हृदयात आहे तोच आपण विचार करतो, असे जेव्हा घडेल तेव्हा कोणतीही शंका, अविश्वास, भीती काहीच राहत नाही.

एखादा माणून एखाद्या वस्तूला भित असेल तर आपण ती वस्तू त्याला प्रकाशात दाखवतो व त्याची भीती कमी करतो हे बुद्धीने जाणतो. ज्या मस्तकाने जाणतो, जो आपल्या मनाला समजावतो, मनाला सांभाळतो, तेच मस्तक आपले मन झाले तर आपण पूर्ण गुरु बनतो अशी अवस्था आमच्यात आली पाहिजे.

तुम्ही ही गोष्ट समजण्याचा जरा प्रयत्न करा. ज्या मेंदूमुळे तुम्ही विचार करता, जो मेंदू तुमचे मन जाणतो आणि मनाने विचारही करतो आणि सांभाळतो. तोच मेंदू तुमचे मन झाले तर? समजा असे एखादे यंत्र आहे. ज्यात अॅक्सीलेटर

आणि ब्रेक दोन्ही ऑटोमॅटिक (स्वयंचलित) आहेत आणि दोन्ही एकत्र आहेत. हवे तेव्हा ब्रेक होते आणि वाटल्यास ॲक्सीलेटरचेही काम करते. वेग वाढविते किंवा कमी करते. ते यंत्र स्वत:च काम जाणते आणि योग्य तेव्हा योग्य तेच कार्य करते.

अशी परिस्थिती जेव्हा येईल तेव्हा तुम्ही गुरु व्हाल.

आम्ही अशा स्थितीला पोहोचायला हवे.

प. पू. श्री माताजी - ०५.०५.१९८३

सत्, चित्, आनंद - पराचेतना सर्वव्यापक शक्ती, चित्त चेतना आहे. आता तुम्ही चेतन आहात आणि मला (श्री माताजी) ऐकत आहात. परंतु हा क्षण मृत होतो आहे, प्रत्येक क्षण भविष्याकडून वर्तमानाकडे येतो आहे. ऐकताना विचार येतात आणि त्यांचे पतन होते. विचार येतात ते पाहू शकतो पण त्यांनी खाली पडलेले पाहाता येत नाही. त्या दोन विचारांतील अंतर म्हणजे विलंब. असं जर विचारांना आपण थांबवू शकलो तर चेतन मस्तकाकडे पोहचू शकतो. तोच सत्-चित्-आनंदचे अस्तित्व आहे. आपण असे म्हणू शकतो की सत्-चित्-आनंद ही मस्तकाची अवस्था आहे. तेथे काही विचार नसतो, आपण चैतन्यमय, निर्विचार होतात. ही प्रथम अवस्था आहे. हीच पराचेतन अवस्था होय.

काही लोक विचार करु शकतात की, आत्मसाक्षात्काराने ही अवस्था प्राप्त झाली पाहिजे. अशी अवस्था आदिशंकराचार्यांना प्राप्त झाली होती. असं काहीच साधकांच्या बाबतीत घडू शकते, सगळ्यांसाठी नाही.

निर्विचार ही पहिली अवस्था. हे घटित होते जेव्हा आज्ञाचक्रांच्या वरती जाता तेव्हाच तुम्ही निर्विचार अवस्थेत जाता. मस्तकाच्या क्षेत्रात प्रवेश करता, जेव्हा आपले चित्त सत् बिंदूला स्पर्श करते तेव्हा वास्तविकता खोट्यापासून वेगळी होते. आपले व्यक्तित्व दुहेरी बनते.

चित्त गॅसच्या प्रकाशासारखा लुकलूक करते. कुंडलिनी जिच्यात गॅस आहे. ती आत्म्याला स्पर्श करते आणि आत्म्याचा प्रकाश मध्यनाडी तंत्रावर पसरतो.

बाह्य आवरणात चित्ताचा अर्थ आहे ध्यान - तत्त्व (Attention Part). ह्या स्थितीत कुंडलिनी ब्रम्हरंध्राला छेदते आणि आपल्या हातावर ब्रम्हचैतन्य जाणवते. इतरांच्याही चैतन्य लहरी जाणवतात. आपण सामुदायिक होतो. सत्, चित् आनंदात आता सुद्धा चित्तालाच स्पर्श करता. त्यावेळी चित्त आपल्याला जाणवते आणि आपण सत्-चित्-आनंदच्या सागरात डुंबतो तेथे आपल्याला सामुदायिक चेतना जाणवते. आपल्याला शांती जाणवते. निर्विचार अवस्था येते. निर्विचार चेतना आपण जाणतो. पण त्यात आनंदाची अनुभूती मिळत नाही.

खूप कमी लोक त्या अवस्थेपर्यंत पोहचले आहेत. प्रथम अवस्था ही चित्ताची असते. चेतनाची अवस्था आपण सत्‌ला स्पर्श करतो आणि वास्तविकता काय त्याला पहायला लागतो. चैतन्य प्रवाह आपल्याला जाणवतो. त्यावेळेस आपण म्हणतो ते येत आहे, ते जात आहे, मला प्राप्त आहे मी देतो आहे, अशी आपली भाषा नसावी.

अजूनही अहं आणि प्रतिअहं संतुलित झाले नाहीत. अजून त्याच स्थितीत आहेत आपले चित्त उन्नत झाले आहे. त्यामुळे आपण चैतन्य जाणू शकतो. ह्या सामुदायिक चैतन्यात लोकांना आपण रोगमुक्त करु शकतो. त्यांना आत्मसाक्षात्कार देऊ शकतो. विश्वातल्या कोणत्याही व्यक्तीची कुंडलिनी स्थिती जाणू शकतात. त्यांची चक्रे ठीक करु शकतो. घरी बसून त्या व्यक्तीची स्थिती बघू शकतो. जेथे आपले चित्त जाईल तेथे ते कार्य करते. आपले चित्त ब्रम्हांडीय बनते. आपले चित्तरुपी थेंब सत्-चित्-आनंद रुपी सागरात एकरुप होऊन जातो.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - १५.०२.१९७७

✹ ✹ ✹

# प्रकरण २६
# आत्मा आणि आत्मबोध

आत्मसाक्षात्कार म्हणजे आपली ओळख. आपण स्वत:ला ओळखत नाही, आपण आपल्याला न ओळखता ह्या विश्वात वावरतो. आपण स्वत:ला जाणत नाही, आपण कोण आहोत हे ओळखत नाही. आपण आत्मा आहोत.ज्ञान, शुद्ध ज्ञानाचा स्त्रोत. सहजयोगात तुम्हाला तुम्ही आत्मा आहात, हे समजते. आत्मा नाही तर आपण कोणीच नाही.

प. पू. श्री माताजी, लंडन - १४.०७.२००१

आमच्या आत असणारा आत्मा हा सर्व शक्तिमान परमेश्वर सदाशिवाचे प्रतिबिंब आहे. आमच्या आत परमेश्वराचे प्रतिबिंब आहे. तोच पवित्र आत्मा आहे. सूर्याचे पाण्यात प्रतिबिंब पडते तसेच परमात्म्याचे प्रतिबिंब म्हणजे आत्मा. जर सूर्या चा प्रकाश दगडावर पडला तर त्याचे प्रतिबिंब दगडावर पडणार नाही तो फक्त चमकेल. पण तेच आरशावर पडले तर ते प्रतिबिंबित होऊन परावर्तित होईल. त्याचप्रमाणे माणसातही परमेश्वराची अभिव्यक्ती व्यक्तीनुसार असते. व्यक्तीचे व्यक्तित्व जर स्वच्छ, पवित्र असेल तर आरशावर पडलेल्या प्रतिबिंबित सूर्य प्रकाशासारखे असेल. संत लोक सर्व शक्तिमान परमेश्वराला चांगले प्रतिबिंबित करतात. भाग्यवान आहात तुम्ही, तुम्हाला सर्वांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झालेला आहे. याचा अर्थ असा की, सर्व शक्तिमान परमात्म्याचे प्रतिबिंब आपल्या चित्तात अगोदरच कार्यरत आहे. (कुंडलिनी जागृती) आत्म्याच्या शक्तीमुळे मस्तक प्रकाशित झाले आहे. आत्म्याची शक्ती हेच प्रतिबिंब आहे.

प. पू. श्री माताजी, ऑस्ट्रेलिया - २६.०२.१९९५

सर्व शक्तिमान परमेश्वराचे प्रतिबिंब आत्मा, हाच पूर्ण आनंद सत्याचा स्त्रोत आहे. मानव अवस्थेत आत्मा आमच्या चेतनेत प्रकाशमान होत नाही.आत्मसाक्षात्कारानंतर आत्मा आमच्या चेतनेला ज्योतिर्मय (प्रकाशित) करतो. पूर्ण सत्य, पवित्र प्रेम, शांती, आनंद याचा शोध घेण्यासाठी व्यक्तीला आत्मा बनणे आवश्यक आहे. ही गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे. कारण शरीर, मन, बुद्धी,

भावना, बंधन, अहं, नाही. तर आम्ही फक्त आत्मा आहोत. आपण म्हणतो माझे मन, माझे शरीर. असे माझे म्हणणारा कोण आहे? हाच आत्मा आहे.

प. पू. श्री माताजी, (परा आधुनिक युग)

आत्मा काय आहे? आमच्या आत असून कोणते कार्य करतो आणि परमेश्वराशी कसा संबंधित आहे? असे म्हणतात आत्मा हा परमेश्वराचे प्रतिबिंब आहे आणि तो आमच्या हृदयात आहे. आत्म्याचे प्रतिबिंब जसे सूर्याचे प्रतिबिंब पाण्यात पडते तसे पाण्यात सूर्याचे प्रतिबिंब पाहू शकतो, पण तो पाण्यापासून खूप दूर आकाशात असतो. त्याचप्रमाणे आत्मा प्रत्येकाच्या दृष्टीला अनुरुप असेल तसा दिसतो. प्रत्येक वस्तूपासून दूर आहे. त्याला कोणीच सीमाबद्ध (मर्यादित) करु शकत नाही. आरशात आपले प्रतिबिंब पाहतो, तो जर स्वच्छ असेल तरच प्रतिबिंब स्पष्ट व स्वच्छ दिसेल. दगडांवर, मातीवर प्रतिबिंब दिसणार नाही. तसेच ती व्यक्ती आरशासारखी स्वच्छ नसली तर तिच्यात परमेश्वराचे प्रतिबिंब ती पाहू शकणार नाही. ती व्यक्ती त्रासलेली, दुःखी असते. वाहत्या पाण्यातही सूर्याचे प्रतिबिंब पडते, पण त्याने आपले स्थान सोडलेले नसते. प्रतिबिंब आकार बदलते. धूर्त व्यक्ती ज्यांच्या हृदयात अनेक इच्छा, आकांक्षा यांनी परिपूर्ण आहेत. त्यांच्यात आत्मा प्रतिबिंबित होत नाही. झाला तर तो लुप्त होतो. म्हणून आमचे शरीर, मन, बुद्धी, अहंकार इ. आरशासारखी स्वच्छ नितळ बनावीत.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - १८.०८.१९७९

आत्म्याची तुलना सूर्याबरोबर करु शकतो, सूर्य ढगांनी आच्छदलेला असू शकतो. ग्रहण लागते. तरीही तो त्याच्या स्थानावर स्थिर असतो. सूर्याला आपण ज्योतिर्मय करु शकत नाही. तो स्वतःच प्रकाशित आहे. ढगांना दूर केले तर त्याचे आच्छादन समाप्त होते. सूर्य पुन्हा वातावरणात येतो आणि चमकतो.

तसाच आमचा आत्मा अज्ञान अंधःकारात आच्छादित आहे. जोपर्यंत हे आच्छादन असते तोपर्यंत तुम्ही आत्मा पाहू शकत नाही. थोडा अंधःकार बाजूला झाला तरी आच्छादन तसेच राहते. आत्म्याच्या प्रकाशाला चमकण्यासाठी आकाश पूर्णपणे निरभ्र होणे आवश्यक आहे. अनेक प्रयत्नांनी हे आच्छादन आपल्याला दूर करता येऊ शकते. त्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. आपल्या आत आपण हा निर्णय

पक्का केला पाहिजे की, आपण आत्मा आहोत. हे बाकी आच्छादन आहे. आत्म साक्षात्कारानंतर आपण हे समजू शकतो की, आपण जे आहोत ते काही अधिक आहे. जे आजपर्यंत समजले होते. त्यापेक्षा वेगळे.

नवीन अवस्था आपल्याला प्राप्त होते त्यात अंधविश्वास रहात नाही. आपला विश्वास अनुभवावर आधारित असतो. म्हणजे विश्वास ही अनुभवाची देणगी आहे. आपल्या बुद्धीने त्याच्याशी भांडण करु नये, त्याला आव्हानही करु नये. आकाशात ताऱ्यांचे चमकणे पाहूनच वैज्ञानिक ओळखतात हा तारा आहे. आपल्याला ही आत्मसाक्षात्काराची चमक (झलक) प्राप्त झाली तर आपण आत्मा आहोत. हे मानले पाहिजे. त्या अनुभवावर स्थिर व्हा आणि चित्त त्या सत्यावर स्थिर करा की मी शुद्ध आत्मा आहे. आपल्या बुद्धीने म्हणा म्हणजे फसवणूक होणार नाही. म्हणजे बुद्धीची दिशा बदलू शकता. बुद्धी आत्मा शोधायला सुरवात करील.

जरी ढग बाजूला झालेले पाहिले असतील तरी काही ढग आहेतच. ढग बाजूला करण्यासाठी वाऱ्याचा उपयोग करा. आपल्या ज्या थंड लहरी आहेत. त्याचा फायदा करुन घ्या. हा स्त्रोत आदिशक्तीचाच आहे. आपल्या कुंडलिनीचाच आहे. शिवाय आपल्या समोर आदिकुंडलिनी साक्षात आहे.

प. पू. श्री माताजी - १८.०६.१९८३

आपण आत्मा आहोत. हे आपल्याला चांगले समजले की, त्यावर पूर्ण विश्वास असावा. मग आपण जे काही कराल त्यात विश्वस्त बनाल. आत्म्यावर पूर्ण विश्वास म्हणजे आपला आत्मविश्वास.

प. पू. श्री माताजी - २६.०२.१९९५

आत्मा आरसा आहे, त्यात स्वतःला पाहता. स्वतःत बदल घडवून आणता. आत्मा जागृत झाल्यावर अंतर्दर्शनाची गरज नाही. आपल्याला आपल्यातील कमतरता जाणवू लागतात.

प. पू. श्री माताजी, कबेला - १९९८

जी खरी गोष्ट असते, ती आत्मा सांगतो म्हणूनच त्याला सत्य स्वरुप म्हणतात. आत्मा जागृत झाल्यावर आपले चित्त जेथे जाईल तेथे काम होऊन जाते.

त्या अगोदर आत्मा स्थिर झाला पाहिजे. योग पूर्ण झाला पाहिजे म्हणजे चित्त जेथे द्याल ते काम होईल.

आमचा संबंध चारही बाजूला पसरलेल्या सृष्टीशी प्रस्थापित होणे आवश्यक आहे, त्यासाठी कुंडलिनी जागृती हाच एक मार्ग आहे. इतर मार्ग नाहीत.

ज्ञानाचा अर्थ आपण स्वत:ला ओळखा. स्वत:लाच ओळखत नाही तर आपण काहीच ओळखत नाही. ह्या कलियुगात हे परमतत्त्व आपण प्राप्त करणार आहोत ते आपल्या आत आत्मस्वरुपात विराजित आहे. त्या प्रकाशातच आपण स्वत:ला जाणाल आणि आपले कोणते दोष गळून पडले आहेत हे कळेल. आपण शुद्धचित्त आत्मस्वरूप झालात.

व्यक्तीला आपले अंतिम लक्ष्य काय हे समजले पाहिजे. आमच्या विकासाचे अंतिम लक्ष्य आत्म बनणे आहे. जे आमच्या हृदयात सर्व शक्तिमान परमात्म्याचे प्रतिबिंब आहे. ही एकात्मकता (Self Identity) आणि आत्मज्ञान (Self Knowledge) आहे.

प. पू. श्री माताजी - २६.०३.२००१

तुम्ही सहजयोगात आहात म्हणजे स्वत:ला स्वच्छ करुन घेतले आहे. आपल्या कुंडलिनीने आपल्याला स्वच्छ केले आहे. तुम्ही आता पवित्र व्यक्ती बनलात. हेच कारण आहे की परमेश्वराचे प्रतिबिंब आपल्यात स्पष्ट आहे.

प. पू. श्री माताजी - २६.०२.१९९५

आपण परमेश्वरी शक्तीशी एकरुप झालात. आत्म्याने आपल्या चेतनेला प्रकाशित केले आणि आपल्या मध्यनाडी तंत्रातून चैतन्य वाहू लागले. ती आपल्या अस्तित्वाला ज्योतिर्मय बनवते. परमचैतन्याच्या थंड लहरी आपल्याला जाणवायला लागल्या. ह्या चैतन्य लहरी आपल्या आणि परमात्म्याच्या प्रेमाची व्यापक शक्ती आहे. ते हात, बोटे, टाळू या भागातून आपल्याला जाणवतात.

सर्व चराचरात एकच ब्रम्हचैतन्य वाहते. जेव्हा आपल्याला आपण ओळखतो तेव्हा ब्रम्हचैतन्य आपल्यातून वाहू लागते. तुम्ही हजारो वर्षापासून जी गोष्ट शोधत होते. तेच द्यायला मी आले आहे. ही वस्तू तुमचीच आहे. फक्त मला

तिची जागृती माहीत होती (कुंजी). मी माझे काहीच देत नाही. तुमचेच तुमच्याकडे सोपवते आहे. आपण आपल्याला ओळखा आणि ब्रम्हतत्त्व मिळवा. हाच आत्मसाक्षात्कार, हाच परमात्म्याचा साक्षात्कार आत्म्याला जाणल्याशिवाय तुम्ही परमेश्वराला जाणू शकत नाही.

प. पू. श्री माताजी - १७.०२.१९८१

फारच बहुमूल्य गोष्ट आहे. तिला समजा, तिच्यात रहा. असा सहजयोग. जेवढे आपण त्यात तादात्म्य पावाल. तेवढे आपले आत्मतत्त्व चमकेल. आपणाला सहजयोगात प्रगती करायची तर आपलेच यंत्र सुधारावे लागेल. दुसऱ्यांचे यंत्र नाही. हे आपण समजून घ्या.

प. पू. श्री माताजी - २२.०३.१९८३

आपल्याला पवित्र आत्मा बनायचे आहे. आपण पवित्र आत्मा आहोत तर निर्लिप्त आहोत. निर्लिप्त व्यक्तीवर कोणीच आक्रमण करु शकत नाही.

प. पू. श्री माताजी, ऑस्ट्रेलिया - २६.०२.१९९५

मनुष्याचे सार आणि तत्त्व. त्याचा आत्मा आहे. जेव्हा आमच्या आत आत्मा जागृत होतो. तेव्हा आनंद आमच्या आत निर्माण होतो, प्रस्फुटित होतो.

आत्मा परमात्म्याचे सत्य स्वरुप आहे. सत्यासाठी आत्मा भटकतो, म्हणून त्याचे सत्य स्वरुप ओळखा.

प. पू. श्री मातार्जी - १६.०२.१९८५

***

सद्घनं चिद्घनं. नित्यमानंद घनं क्रियम। एकमेवा द्वयम ब्रम्हा नेह नानास्थि किंचन ।।

अतीतानुरुंधानं भविष्यद विचारणम। औदासीन्यम आदि प्राप्ते जीवन मुक्तस्य लक्षणम ।।

जो घनीभूत सत् चित् आनंद आहे, असे एक अक्रिय ब्रम्हच सत्य वस्तू आहे. त्यात इतर पदार्थ काही नाहीत.

गेल्या गोष्टींचा विचार न करणे, भविष्याची चिंता न करणे आणि वर्तानातील दुःखाने उदासिनता नसणे हे जीवन मुक्तीचे लक्षण होय.

विवेक चुडामणी.

# प्रकरण २७
# परमात्म साक्षात्कार
# God Realization

परमात्म सांक्षात्कार काय आहे. सर्वप्रथम आत्मसाक्षात्कार त्यानंतर परमात्म साक्षात्कार मनुष्य परमात्मा होऊ शकत नाही. आपण आत्मा सुद्धा बनले नाही. कारण आत्मा आपल्या माध्यमातून प्रसारीत होत आहे. आपला उपयोग करतो आहे. आपल्याकडे लक्ष देतो आणि आपली देखभाल करतो. आपण आत्माच बनलात तर काहीच शिल्लक राहणार नाही. आपल्या शरीरात राहून त्याच्या माध्यमातून काम करतो आणि पूर्ण प्रकाशित करते. तरी ही व्यक्ती सर्वशक्तिमान परमेश्वर बनणार नाही. ही गोष्ट समजून घेतली पाहिजे. नाहक महत्त्वाकांक्षी बनू नये.

परमात्माचा विषय म्हणजे परमात्म साक्षात्कार आहे. परमात्म्याच्या कार्य पद्धती समजणे आणि सर्वशक्तिमान परमात्म्याचे अंग, प्रत्यंग बनणे यातूनच तो सर्व कसे नियंत्रित करतो हे समजून घेणे हेच परमात्म्याचे ज्ञान आहे. जसे माझे बोट माझ्या मस्तकाबद्दल काही जाणत नाही. पण ते बोट मस्तकाच्या इच्छेनुसार काम करते. बोटाला मस्तक बनता येत नाही पण त्याच्या मर्जीनुसार काम करावे लागते. ती मस्तकाशी एकाकार झाली आहेत जेव्हा आपल्याला परमात्म साक्षात्कार होतो तेव्हा मस्तकाचा संबंध जाणता तर परमात्म्याला जाणता. त्याच्या शक्तीला चांगले जाणता. पण जेथे माझा संबंध आहे मला समजणे कठीण काम आहे. ती भ्रमात टाकणारी आहे. शेवटी ती आदिशक्ती आहे. सर्व काही करु शकते हे तुम्ही समजून घेतले पाहिजे. आपण ही सर्व काही करु शकता, पण माझ्यासारखे बनू शकत नाही. आपल्याला प्रेमाच्या माध्यमातून, प्रार्थनेच्या माध्यमातून, भक्तीच्या माध्यमातून परमेश्वराच्या शक्तीला समजून घेतले पाहिजे. तरच परमात्म साक्षात्कारी होऊ

शकता. प्रकृती आणि इतर गोष्टींना नियंत्रित करु शकता. परमेश्वराचे ज्ञान होण्यासाठी पूर्ण नम्र होणे आवश्यक आहे. आपण देवी देवता बनू शकत नाही. परंतु परमात्म साक्षात्कारी होऊ शकता. परमात्मा आपल्या माध्यमातूनच कार्य करतो. त्याच्या शक्तीने तो आपला उपयोग करतो, आपल्याला त्याचे माध्यम बनवतो. परमात्मा आपल्याबरोबर काय करतात, काय सांगतात, त्यांची इच्छा किंवा सूचना काय आहे. ह्या पद्धतीने परमात्म्याशी संबंध जोडला जातो. सहजयोगात अनेक लोकांना फायदा झाला. पण ते हे जाणत नाही हे कसे झाले. आपल्याला जर समजले की, ह्या सर्व गोष्टी कशा कार्यान्वित होत आहेत. आपल्याला शक्ती कोणती प्राप्त झाली तर हा परमात्म साक्षात्कार आहे.

असे लोक खूपच शक्तिशाली बनतात आणि ते सर्व गोष्टी कार्यान्वित करतात. असे अनेक संत झाले, पण अहंकार वाढल्याने त्यांचे पतन झाले. त्यांच्यातील श्रद्धा, नम्रता, प्रेम भक्ती आणि समर्पणाच्या अभावामुळे त्यांचे पतन होते.

इस्लाम म्हणजे समर्पण. मोहमद साहेबांनी इस्लामसंबंधी सांगताना म्हटले की, समर्पित व्हा. समर्पित झाल्याशिवाय परमेश्वराला मिळवू शकत नाही. त्याला समजू शकत नाही. त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, स्वतःला जाणल्याशिवाय परमात्म्याला जाणू शकणार नाही. निर्विचार अवस्था अतिशय सुंदर आहे. त्या अवस्थेत असले पाहिजे. या स्थितीत आपल्याला प्रभुत्व मिळवायचे नसते किंवा कोणाच्या दबावाखाली रहायचे नसते. निर्विचार समाधीत आपण स्वतंत्र पक्षी बनता, उडणे, आपले कार्य बनते. एक उड्डाण निर्विचार समाधीपर्यंत आहे. दुसरे निर्विकल्प समाधी, तिसरी परमात्म साक्षात्कारापर्यंत माझ्याबरोबर राहणारे लोक सुद्धा समजू शकले नाहीत. ते असे समजतात की आपण देवता बनलो. ते खूपच अहंकारी बनले त्यामुळे त्यांना सहजयोग सोडावा लागला.

मी (श्री माताजी) माझी स्तुती करत नाही. माझ्यासंबंधी खूप बोलावे असे नाही. ही परीक्षा आहे. जर काही सुधारणा करावयास सांगितल्या तर वाईट वाटून

घेऊ नका. मला हे काम करावयाचे आहे. माझा त्यात काही फायदा नाही. मी काही मागत नाही. मी फक्त एवढेच जाणते की, आपल्याला माझ्या साऱ्या शक्ती मिळतील. मी जी आहे ते तुम्ही बनू शकत नाही. पण कृपा करुन माझ्या शक्ती तर मिळविण्याचा प्रयत्न करा. माझ्या शक्ती मिळविणे काही कठीण काम नाही. हाच परमात्म साक्षात्कार आहे.

हेच शिव, सदाशिवाचे ज्ञान आहे. शिवाच्या माध्यमातून आपण सदाशिवाला समजता, प्रतिबिंबित पाहता आणि प्रतिबिंबामुळे समजता. प्रतिबिंबक कोण आहे. त्याला आपण परमात्म्याच्या साम्राज्यात स्थापित झालो. परमात्म्याला पाहू शकतो. परमात्मा जाणू शकतो, समजू शकतो, त्याच्यावर प्रेम करु शकतो. अशी अवस्था आपल्याला प्राप्त होते.

परमात्मा आपल्याला आशीर्वादित करो.

प. पू. श्री माताजी, शिवपूजा - ०३.०३.१९९६

✸✸✸

## प्रकरण २८

## खऱ्या सहजयोग्याची ओळख

पंचतत्त्वाची सूक्ष्म अभिव्यक्ती : आम्ही पाच तत्त्वांपासून बनलो आहोत. जेव्हा आपली जागृती होते आणि कुंडलिनी सहस्त्रात पोहचते, ब्रम्हरंध्राचे भेदन करते तेव्हा आपली परमेश्वरी शक्तीशी एकाकारिता होते, आपल्या माध्यमातून ही परमेश्वरी शक्ती वाहू लागते. संबंध जोडत जातो म्हणूनच ती शक्ती आपल्यातून वाहू लागते. तिची सूक्ष्मता आपल्याला समजली पाहिजे. सूक्ष्मता म्हणजे ज्या पंच तत्त्वापासून आपण झालोत त्यांना ह्या चैतन्यलहरी हळूहळू त्यांच्या सूक्ष्म तत्त्वांना जोडतात. बायबलमध्येही याबद्दल सांगितले आहे की, "शब्द" हाच परमेश्वर आहे. परंतु शब्द काय आहे? आपण असे म्हणू शकतो, शब्द म्हणजे मौन आदेश (Silent Commandment) भारतीय तत्त्वज्ञानानुसार शब्दापासून बिंदूची उत्पत्ती होते किंवा असेही म्हणू शकतो की, शब्द नाद बनतो, परत बिंदू आणि त्या बिंदूपासून पाच तत्त्वे एकानंतर एक प्रकट होऊ लागतात.

(१) तेज : प्रकाश व्यक्त होणारे प्रथम तत्त्व आहे. प्रकाश तेजाचे सार आहे. हे सर्व संस्कृतमध्ये लिहिलेले आहे. प्रकाशाचे प्रथम सूक्ष्म तत्त्व आहे. ज्ञानाचा प्रकाश (ज्ञानोदीप्ती) होणे. पण त्याचा दुसरा अर्थ आहे 'तेज'. आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर व्यक्तीचे मुखमंडल (चेहरा) तेजस्वी होतो. म्हणजे प्रकाशाचे सूक्ष्म तत्त्व तेजस्विता आहे. तेजस्वी चेहऱ्याच्या व्यक्तीकडे पाहून लोक प्रभावित होतात. अशा लोकांना विशेष सन्मान देऊ लागतात. तुम्ही माझे फोटो पाहिले तर त्यात प्रकाश दिसतो. हे दुसरे तिसरे काही नसून माझ्या आतील प्रकाश आहे. तो सूक्ष्म होऊन दैदीप्यमान होतो. माझ्यात जेव्हा प्रकाश सूक्ष्म होतो तेव्हा तो तेजस्वी बनतो. आपल्या आत ही अशी सूक्ष्म घटना घटित होते. आपले मुखमंडळ तेजोमय होते. आपल्या त्वचेचा रंगही वेगळा बनतो ह्या तेजाला समजले पाहिजे. ज्या स्थूल प्रकाशापासून आम्ही बनलो त्याचे सूक्ष्म तत्त्व म्हणजे तेज.

(२) वायू : प्रकाश तत्त्वापासून अन्य तत्त्वाचा उद्‌भव होतो तो म्हणजे "वायू". संस्कृतमध्ये त्याला वायू म्हणतात. वायू म्हणजे हवा, ह्या स्थूल वायूचे सूक्ष्म तत्त्व आपल्याला प्राप्त होणाऱ्या थंड चैतन्यलहरी. थंड चैतन्यलहरी त्या वायू तत्त्वाचे सार आहे. आम्हाला निर्माण करणाऱ्या पाच तत्त्वातील वायू तत्त्वाचे सार म्हणजे थंड चैतन्यलहरी. जेव्हा आपला आध्यात्मिक विकास होतो. तेव्हा ही सर्व सूक्ष्म तत्त्वे आपली अभिव्यक्ती करु लागतात.

आपण फक्त लहरीच अनुभवत नाही. थंड, शीतलतेचाही अनुभव करतो. हेच वायू तत्त्वाचे सार आहे.

(३) जलतत्त्व : जल आम्हाला तयार करणाऱ्यांपैकी एक तत्त्व आहे. त्याचे सूक्ष्म तत्त्व काय आहे? जल तत्त्व जेव्हा सूक्ष्म रुपात अभिव्यक्त होते. तेव्हा ते कठोर, कोरड्या त्वचेला कोमल करते. त्वचा कोमल बनते. आत्मसाक्षात्कारी व्यक्तीचे एक चिन्ह आहे की, त्वचेला स्निग्धता आणण्यासाठी कोणतेच क्रीम लावावे लागत नाही. त्यांच्या आतील जलतत्त्व चेहऱ्याला, त्वचेला चमक व पोषण प्रदान करते. शिवाय त्वचा कोमल बनवते. चेहऱ्याची ही कोमलता दिसून येते. आत्मसाक्षात्कारी व्यक्तीच्या चेहऱ्यावर ही अभिव्यक्ती आवश्यक आहे. याबरोबरच आत्मसाक्षात्कारी व्यक्ती अत्यंत विनम्र, मृदू होते. कोणाशी बोलत असला तर त्याच्या आवाजात प्रेम असते. असे ही म्हणू शकतो की, त्याच्या आवाजात पाण्याची शितलता असते. तो पाण्याप्रमाणे गतिशील, शीतल, शांती, स्वच्छता देणारा असला पाहिजे. आत्मसाक्षात्कारानंतर हे गुण आपल्या व्यक्तित्वाचे अंग प्रत्यंग होऊन जातात.

(४) अग्नितत्त्व : आपल्यात अग्नी आहे. परंतु तो शांत आहे. तो इतरांना जाळत नाही. आपल्यातील वाईट गोष्टी, आपल्या माध्यमातून इतरांच्या वाईट गोष्टी जाळतो. समजा एखादा रागीट माणूस माझ्याकडे आला तर त्याचा क्रोध माझ्यातील अग्नीने जाळला जातो तो शांत होतो. गहन आत्मसाक्षात्कारी व्यक्तीला अग्नी जाळू शकत नाही. अग्नीचे जळणे त्याच्यापर्यंत येऊ शकत नाही. ही गोष्ट समजून घेणं आवश्यक आहे. पण आपण जर चुकीचे काम करत असलो तर अग्नी आपल्याला

जाळतो. आपण चांगले सहजयोगी, विकसित सहजयोगी आहात. आपल्याला अग्नी जाळणार नाही.अग्नितत्त्वाचे सार आम्हाला प्राप्त झाले तर तो जाळत नाही. अग्नी आणि जल दोन्ही दिव्य बनतात. ज्या पाण्यात आपण हात टाकतो ते जल चैतन्ययुक्त बनते. याचा अर्थ असा की, जलाची सूक्ष्मता त्याच्यात येते. शीतलतेमुळे रोगमुक्त करण्याची शक्ती त्यात येते. सूक्ष्म झाल्यानंतर सर्व शक्तीची अभिव्यक्ती होऊ लागते. आणि आपण हे पाहू शकतो. यासाठी कोणताच प्रयोग आपल्याला करावा लागत नाही.

(५) पृथ्वी (आई): पृथ्वी आई आहे आणि ती अतिशय महत्त्वपूर्ण आहे. रशियात घेतलेल्या फोटोग्राफमध्ये कुंडलिनी पृथ्वीतून बाहेर येते. पृथ्वीनेच हे दाखवले आहे. माझ्या खोलीत ठेवलेली फुले उमलतात. इतकी मोठी होतात की, एवढे मोठे फुल लोकांनी यापूर्वी पाहिलेले नव्हते. मी त्या फुलांना काहीच करत नाही, मी फक्त तेथे बसलेली असते. फुलासाठी काय घडते, धरणी माता आपले कार्य करते. आईच आपल्याला पोषण देते. आपण स्वस्थ होतो. पृथ्वी तत्त्वाची सूक्ष्मता कार्य करते. पृथ्वीच्या ह्या वृक्षांना, रोपट्यांना फुलांना जन्म देते. ती आमच्या आत फार मोठी भूमिका पार पाडते. पृथ्वीशी आपला घनिष्ट संबंध आहे. पृथ्वी मातेची बरीचशी सूक्ष्मता आमच्यात येते. त्यातील एक गुरुत्वाकर्षण. गुरुत्वाकर्षणामुळे व्यक्ती अत्यंत आकर्षक होऊन जाते. हा बदल शारीरिक रुपाने नाही तर आध्यात्मिक रुपात होतो. असा माणूस इतरांना आकर्षित करतो. लोक त्याला पाहून विचार करतात. याच्यात काही विशेष आहे. हा पृथ्वी मातेचा गुण आहे. पृथ्वीत जर गुरुत्वाकर्षण नसते तर आम्ही पृथ्वीवर जोराने लांब फेकले गेलो असतो. पृथ्वी मातेप्रमाणे आम्ही सहनशील, धैर्यवान बनतो. आपण उग्र आहात सहनशील नाहीत. तर पृथ्वीमातच्या सूक्ष्म तत्त्वांची अभिव्यक्ती आपल्यात होत नाही.

प. पू. श्री माताजी - १६.१२.१९९८

आकाशतत्त्व : येशूने आज्ञाचक्र खोलण्यासाठी आपले बलिदान दिले. त्यांच्या बलिदानामुळेच आम्ही आकाश स्थितीपर्यंत पोहचू शकलो, नाही तर हे शक्य नव्हते. येशूने आपल्याला मस्तकाच्या वरती आणले हे अती कठीण कार्य आहे. ध्यानधारणेत आपल्याला मस्तकाच्या वरती जावे लागेल. येशूने आपल्याला हा फार मोठा आशीर्वाद दिला आहे. आपण त्याचा आनंद घेतला तरच आकाशतत्त्व कार्य करील. आकाश तत्त्व आपल्या चित्ताच्या माध्यमातून कार्य करते. आकाशतत्त्व माझ्यातही कार्य करते. त्यामुळे चित्ताने मी(श्री माताजी) फार कार्य करते. माझे चित्त पूर्णपणे निर्विचार झाले आहे. त्यामुळे ते जेथे जाते तेथे कार्य करुन येते. चित्ताचा उपयोग विचार करण्यासाठी केला तर कार्य थांबेल. व्यक्ती जर निर्विचार असेल तर चित्त चमत्कारिक रुपात कार्य करते. चित्ताला स्वत:तून उठून दुसऱ्यांमध्ये परत मानवाच्या उच्च स्तरावर जावे लागते तेव्हा आपला संबंध आकाश तत्त्वाशी होतो. त्यालाच आम्ही तन्मात्रा किंवा आकाश तत्त्वाचे सार म्हणतो. आकाश तत्त्वामुळे दूरदर्शन, फोन बनवतो. येथे बसूनही आपण कार्य करु शकतो. चित्तानेच हे कार्य होते जेथे तुम्ही चित्त द्याल तेथे कार्य होईल. हे एकदा तुम्ही मिळवले की कोणतीच समस्या, अडचण राहणार नाही. ह्या पाच तत्त्वातून आपली अभिव्यक्ती होते.

प. पू. श्री माताजी - २५.१२.१९९८

**गुण, काल, धर्म : अतीत होणे :**

<u>जेव्हा चित्त आत्म्यावर असेल तर सर्वप्रथम आपण गुणातीत व्हाल.</u>

(१) गुणातीत : गुणातीत झालात म्हणजे तुम्ही प्रगत व्हाल. म्हणजे तमोगुणी, इच्छा, अभिलाषा यांनी युक्त राहणार नाहीत. ह्या सर्व आकर्षणातून आपण दूर जातो म्हणजे आपण आक्रमक बनता. म्हणजे रजोगुणी. दुसऱ्याबरोबर स्पर्धा करता, भांडण करता. त्यानंतर आपण सत्वगुणी बनतो. यात साधना करतो आणि आपल्या वागण्यात कोणत्या चुका आहेत, अशा जीवनाची घृणा निर्माण होते. यातून आपल्याला मुक्ती हवी असते. म्हणून सत्य साधनेकडे वळतो. ही स्थिती संपते तेव्हा

आपण गुणातीत होतो. जेव्हा आपले चित्त आत्म्यावर असते तेव्हाच हे घडते. कारण आपले चित्त आपले जन्मजात बंधन, गुण, अहं यावर नसते. यातून आपण वरती उठतो, हे सर्व गळून पडतात. सामान्य लोकांसाठी ही असामान्य गोष्ट आहे. सहजयोग्यासाठी नाही. आता आपल्याला आपल्या सुख सुविधांची, लहान मोठ्या गोष्टींची काळजी राहत नाही.

आजपर्यंत हे तीन गुण (तम - रज - सत्व) कोणत्या ना कोणत्या प्रकाराने आपल्यावर शासन करत होते. आपण यातून वरती उठतो म्हणजे हे गुण गळून पडतात. मानवी चेतना पार करतो.

(२) कालातीत : आपण कालातीत होतो. वेळेपूर्वीच आपण वर उठतो. श्री माताजी म्हणतात एके दिवशी कार्यक्रमाला उशीर झाला. मी घरी बसल्या बसल्या बघत होते. तुम्ही सर्व आनंदात होता. म्हणजे आपण वेळेच्या बंधनातून मुक्त झालात. जो वेळ आहे तो आपला आहे कारण आपण वर्तमानात स्थित आहात. आपण भविष्य आणि भूतकाळात वावरत नाही. वर्तमान वास्तविकता आहे. वेळ आपल्याला झुकवू शकत नाही.

(३) धर्मातीत : वेळेच्या वरती उठतात. तसेच मानवी स्वभावातून वरती उठता. याचा अर्थ असा की, आपण जे ही कार्ये करतो, ती सर्व धार्मिक असतात. सर्व कार्ये धार्मिक, प्रयत्नही धार्मिकच असतात. व्यापारही करत असाल तरी धर्मानुकूल कराल. कर्मकांडापासून आपण लांब रहाता. कर्मकांडात काही चूक झाली तर ते लोक घाबरतात. दुःखी होतात. पण सहजयोग्याच्या बाबतीत तसे घडत नाही, तो चटकन, ह्या गोष्टी सोडतो कारण आपण नेहमीच ध्यानात असतो. काही गर्दी, गोंधळ झाला तरी आपण निर्विचारतेतच राहतो. तेथे आपल्याला सर्व समाधान प्राप्त होते. आत्मसाक्षात्कार प्राप्त होताच आपण बदलतो. आत्म्याच्या प्रकाशात आपण फक्त स्वतःलाच पाहतो. आपली वंशपरंपरा (जीन्स) बदलतात. हाच सहजयोग आहे. आपण अशा व्यक्ती बनता की, आनंद काय आहे. जो आनंदाचा आनंद घेतो,

इतरांना आनंद देतो. सत्य हे आहे की, आपण आत्मा बनता, आपण आत्मा बनलात की, गुणातीत, कालातीत, धर्मातीत होता. ह्या सर्व सीमा पार करुन, समुद्रातील एका थेंबासारखे बनता. थेंब समुद्रापासून बाहेर राहिला तर तो सूर्याला घाबरतो. सूर्याच्या तापाने तो सुकून गेला तर? याची थेंबाला भीती असते. त्याला कळत नाही काय करावे ते. पण समुद्राशी थेंबाची एकाकरिता झाली तर त्या पाण्याबरोबर राहून आनंद उपभोगतो. कारण तो एकटा नाही, तो सागराच्या लहरीबरोबर आहे. अशीच स्थिती आपण प्राप्त केली आहे. सहजयोगामुळे त्याचे ज्ञान आपल्याला आहे.

जेव्हा आपण धर्मातीत होता, त्यावेळेस तुम्ही प्रगत होता. धर्मच आपले अंग बनते. आपण चुकीचे काम करत नाही. न आवडणारी गोष्ट आपण करत नाही. आत्मा झाल्यावर आपल्याला काही सांगावे लागत नाही. आत्मा आणि त्याचा प्रकाश मार्गदर्शक आहे. त्यामुळे आपण गुणातीत, कालातीत व धर्मातीत बनतो. आपण कोणत्याच गोष्टीचे गुलाम नसतो. आपण घड्याळ, वेळ, आपल्या गुणांचे दास बनत नाही. आपण आक्रमक, तामसी आहोत कीं, संतुलित हे सुद्धा पहात नाही. आपण सहजयोगी आहोत, सहजयोगी याच्या वरच्या पातळीवर असतो. आपण गुणातीत, धर्मातीत आहोत, कारण धर्म आपले अंग बनले आहे. आपल्याला धर्मा च्या आज्ञा पाळाव्या लागत नाहीत. आपण आत्मा आहोत त्यामुळे वरची पातळी गाठतो यावरुन आपण महान आहोत.

प. पू. श्री माताजी, दिल्ली - २१.०३.१९९८

एकदा तुम्ही सहजयोगात येता तेव्हा आपण सामान्य रहात नाही. आपली प्रगती होते, आपण वरच्या पातळीवर जातो आपली पसंती नापसंती बदलते. सगळीकडे पाहण्याची आपली दृष्टी बदलते. आपण लहान मुलासारखे वागता तर कधी खूपच गहन विषयावर बोलता. साक्षात्कारानंतर स्वतःकडेच पाहतात, स्वतःला कसे सुधारायचे हे जाणता. आपण प्रसन्न कसे रहायचे हे जाणता. दुसऱ्यांना कसा

आनंद द्यायचा याचाच नेहमी विचार करता. आपण सुंदर, बुद्धिमान आणि आनंदी व्यक्ती बनता. आपल्यात विवेक जागृत होतो. त्यालाच परमेश्वराची सर्वव्यापक शक्ती म्हणतात. ह्या शक्तीबरोबर जोडलो गेल्यामुळे आपण खूप खूप सुखी होता.

आपणच बघा तुम्ही माझ्यापर्यंत कसे पोहचलात. सहजयोगात आलात, ह्या दिव्य शक्तीमुळे हे शक्य झाले. तुम्ही तुमच्या आत असणाऱ्या शक्तीचा प्रेमाचा अनुभव घेतला. एक गोष्ट निश्चित आहे की, सहजयोगी माझी शक्ती प्राप्त करतात.

आपली मुले आणि मुली, मोठी होतात आणि आईसारखी बनतात ही खूप आनंद देणारी गोष्ट आहे. आईला ह्यातून जो आनंद, प्रसन्नता प्राप्त होते. त्याचे वर्ण न करता येणार नाही.

प. पू. श्री माताजी - ०९.१२.१९९१

***

आपले लक्ष्य आत्मा बनणे आहे. आमच्या आत असणारा आत्मा सर्वोत्तम आहे. त्याची उत्कृष्टता अथांग आहे. परमात्म्याची सृजनात्मकता, आनंद आणि प्रकाश मानवाच्या हृदयात आत्मा बनून राहतो. हे अतिशय सुंदर आहे.

चैतन्य लहरी १९९३ खंड ५ पृ १५

आत्म्याचा दिव्य विवेक चित्तात स्थिर होणे. आपल्यातील लोभ, स्वार्थीपणा, स्वामित्वभाव, असंतुष्ट मस्तक, यांना नियंत्रित करतो.

परा आधुनिक युग

## प्रकरण २९

## पूर्ण समर्पण आणि अखंड श्रद्धा

आज मी तुम्हाला अशा काही गोष्टी सांगणार आहे. ज्या मी खूपपूर्वीच सांगायला हव्या होत्या.

तुम्ही मला ओळखणे अत्यंत आवश्यक आहे. उत्थानाच्या वेळेस मला मान्यता देण्याची अट आवश्यक आहे. ती मी बदलू शकत नाही. इसा - मसीह ने सांगितले की, "माझ्या विरुद्ध काही बोलले गेले तर चालेल. ते सहन केले जाईल. क्षमा केली जाईल. परंतु आदिशक्ती (होली घोस्ट) च्या विरुद्धात कोणतीच गोष्ट सहन केली जाणार नाही". हा इशारा येशूने दिलेला आहे. लोकांना याचा अर्थच कळलेला नाही. तुम्ही माझ्या विरुद्ध नाहीत हे खरे आहे. शेवटी तुम्ही माझी मुले आहात. मी तुमच्यावर खूप प्रेम करते, तसेच तुम्ही माझ्यावर तितकेच प्रेम करता. आम्हाला हे समजले पाहिजे की, जशी उन्नती व्हायला पाहिजे तशी का होत नाही.

लोकांना संमोहित केले तर त्यांच्या गुरुपुढे समोर ते लोटांगण घालतात. पूर्णपणे धरणीवर दंडवत घालतात. त्यामुळे हे लोक वेगाने अंधःकारात लोटले जातात. त्यांचा विनाश ठरलेलाच असतो, आपण सर्व सहजयोगी आहात आपल्याला आपली निर्मिती करावयाची आहे.

तुम्हाला पूर्णपणे माझ्याशी समर्पित व्हावे लागेल. सहजयोगाशी नाही, माझ्या प्रती समर्पित व्हा. सहजयोग माझा एक भाग आहे. सर्व काही सोडून तुम्हाला समर्पित व्हावे लागेल.

आपल्या उक्रांतीसाठी पूर्ण समर्पण हाच एकमेव मार्ग आहे. आजही लोकांना चक्रांवर पकड येतात, अडचणी निर्माण होतात. अनेक लोक विचारतात आत्मसाक्षात्कार प्राप्त झाल्यावर सुद्धा पतन का होते. याचे एकमात्र उत्तर आहे, आपले समर्पण अपुरे पडते. पूर्ण समर्पण आणि श्रद्धा निर्माण झाली पाहिजे. शिवाय मी परमेश्वरी शक्ती आहे हे तुम्ही समजू शकले नाहीत तर तुमचे पतन होणारच. ही

गोष्ट सर्वांनाच लागू पडत नाही. त्यासाठी तुम्ही तुमच्या ह्रदयात मस्तकात पहा. यावरुन लक्षात येईल की, श्रीकृष्ण, श्री येशू यांच्याबद्दल असणारी श्रद्धा, समर्पण माझ्या प्रति नाही. श्री कृष्णाने सांगितले होते की, "सर्वधर्माणाम् परित्यज्य मामेकम् शरणम व्रज". विश्वातल्या सर्व धर्मांना विसरा आणि मला शरण या. धर्माचा अर्थ, हिंदू, मुस्लिम, शीख, इसाई असा नव्हता. तर आश्रय म्हणजे कोणत्याच धर्माचा आधार न घेता सर्वसंग परित्याग करुन शरण या. ही गोष्ट त्यांनी सहा हजार वर्षापूर्वी च सांगितली होती. आज ही बरेच लोक आहेत ते म्हणतात, आम्ही तर सर्वच गोष्टीचा त्याग केलेला आहे. असे लोक कोठे आहेत. ज्यांना आत्मसाक्षात्कार दिला ते कोठे आहेत. त्यांच्या समस्या, नोकरी, कौटुंबिक अडचणी यांना प्राथमिकता, समर्प ण नंतर मी भ्रमात ठेवू शकते. भ्रम निर्माण करते. मी महामाया आहे. ही माया तुम्हाला शोधण्यासाठी, तुमची परीक्षा घेण्यासाठी आहे.

समर्पण उत्थानाचे महत्त्वपूर्ण अंग : सर्व विश्वच आधारविहीन झालेले आहे. सर्वच विनाशाकडे वाटचाल करीत आहेत म्हणून असा एखादा भक्कम आधार मिळावा व आपले रक्षण व्हावे असे वाटते. त्या आधारात पूर्ण विश्वास, श्रद्धा आणि पूर्ण शक्तीनेच धरुन ठेवले पाहिजे. जर आपण पावसात भिजलात तर काही विशेष नाही. पण समुद्रात बुडतांना आणि क्षणाक्षणाला मृत्यूच्या जवळ चालला आहात तर अशा वेळेस एखाद्याने मदतीचा हात पुढे केला तर आपल्याला तो पकडावाच लागेल, अधिक विचार करायला वेळच नाही. तो हात ताकदीने आणि श्रद्धेने पकडणे आवश्यक असते. तसेच प्रत्यक्ष जीवनातही घडते. अनेक बाधा, समस्या, नकारात्मकता यात आपण अडकतो, काय करावे हे सुचत नाही अशावेळेस कोणाचा तरी भक्कम आधार मिळावा, तो पकडून टेवावा अशी आपली दयनीय स्थिती होते. अशास्थितीत चांगला उपाय कोणता तर सर्व घटना, गोष्टी, समस्या यांना विसरणे उत्तम. जेवढी शक्ती आहे त्या शक्तीनिशी माझ्याशी जोडले जा, सोडू नका. ही महत्त्वपूर्ण गोष्ट आहे.

आमची समर्पण पद्धती आधुनिक आणि फॅशनेबल आहे. सहजयोगाचे महत्त्व नसते, माताजी तर काय फक्त अडचणीसाठी, मला याचे वाईट वाटते, असे चालणार नाही. खरे तर हे मला काहीच सांगायचे नव्हते. त्यापेक्षा तुम्ही देवी महात्म्य वाचा. देवीची एक हजार नावे घ्या भक्तीने देवी पावतेच. तिला उपासक, भक्त आवडतात. ती आपल्या भक्तांवर प्रेम करते. भक्ती, समर्पण सतत वाढत राहिले पाहिजे. त्यात खंड नको. हाच प्रगत होण्याचा मार्ग आहे.

आम्हाला आमच्या लहान, मोठ्या समस्यासुद्धा त्रासदायक होतात. त्या अडचणी महत्त्वपूर्ण वाटतात. कोणाला घराची, कोणाला मुलांची, कोणाला नोकरी, धंद्याची. हे सर्व श्री कृष्णाने वर्णलेला धर्म आहे. श्री कृष्णाने म्हटले आहे. “सर्व धर्मा णाम् परित्मज्य मामेकम् शरणम् व्रज.” सर्व धर्माचा त्याग करा म्हणजे पतीधर्म, पत्नी धर्म, पुत्र धर्म, पिता धर्म, माता धर्म, नागरिक धर्म , विश्व नागरिक धर्म. सर्व धर्म पूर्णपणे टाकून (त्याज्य) हृदयापासून समर्पित व्हावे लागेल.

श्री माताजी म्हणतात, मी जी आहे ती आहे, वाढणार नाही किंवा कमी होणार नाही. माझे व्यक्तित्व शाश्वत आहे. ह्या आधुनिक युगात, तुमच्या जन्माचा उपयोग व्हावा, तुमचा पूर्ण विकास व्हावा, शिवाय परमात्मा तुमच्याकडून जे काम करुन घ्यायचे ठरवतो या सर्वांना कार्यान्वित करण्यासाठी, मी आहे. पण तुम्ही माझ्याकडून किती आणि कसे प्राप्त करुन घेऊ शकता; हे तुमच्यावर अवलंबून आहे. समर्पणाला सुरवात झाली की, तुमच्या प्रगतीला सुरवात होते. ह्या स्थितीला निष्ठापूर्वक सांभाळा व वाढवा. ह्या सर्वांसाठी ध्यानधारणा महत्त्वाची आहे.

मला तुम्ही तुमच्या हृदयात बसवू शकता, बुद्धीने तुम्ही मला स्वीकारता हे जरी खरे असले तरी ध्यानधारणेच्या माध्यमातून तुमचे समर्पण वाढेल. समर्प णाशिवाय ध्यान धारणा काहीच नाही. पूर्ण स्वतंत्रतेने तुम्ही समर्पित झाले पाहिजे. स्वतंत्रता यात अहं नाही. अहं- मुळे स्वातंत्र्य नष्ट होते, हे लक्षात घ्या. त्याची हत्याच नाही तर ती कलंकित होते (स्वातंत्र्य). सूक्ष्मतेने पाहिले तर स्वतंत्रता पूर्णपणे अहंकारविरहीत असते. बासरीसारखी ती पोकळ असते. कारण परमेश्वराची मधुर

धुन त्यावर वाजवली जावी. हीच पूर्ण स्वतंत्रता आहे. आम्ही अज्ञानाच्या दलदलीत फसलो, पापाच्या दलदलीत फसलो, अज्ञान पाप वाढवते. अज्ञानामुळे पापे वाढतात. या दलदलीतून कसे बाहेर निघणार. जी व्यक्ती काढण्याचा प्रयत्न करील ती पण त्यात फसेल. दलदलीजवळ येणाराही फसतो आणि त्याचे अंग- प्रत्यंग बनतो. म्हणून कुंडलिनी वृक्षाला उन्नत व्हावे लागेल. या उन्नत वृक्षातून परमात्मा आपल्याला त्या दलदलीतून बाहेर काढील. स्वत: परब्रम्ह एक एकाचे हात धरुन दलदलीतून बाहेर खेचेल. जर तुमची पकड सैल असेल तर तुम्ही परत त्या घाणीत पडाल. आपण थोडे वरती येता परत खाली जाता. वरती येणे ही आनंददायक गोष्ट आहे. आपण पूर्णपणे स्वच्छ झाला नाहीत. पूर्ण स्वच्छ झाल्यावरच तुम्हाला आशीर्वाद मिळतील. परमेश्वराचे पूर्ण आशीर्वाद मिळवले पाहिजेत, तरच प्रगती होईल.

सहजयोगात येऊनही लोक समर्पण करीत नाहीत. तरीही त्यांची देखभाल केली जाते. त्याचे पोषण केले जाते. त्यांच्या बुद्धीत सुधारणा होते. संबंधात सुधारणा होते. पहिल्यापेक्षा त्यांच्यात खूपच फरक पडतो. ते पहिल्यापेक्षा खूपच बदललेले दिसतात. इतकेच नाही तर त्यांची परिस्थिती सुधारते. प्रत्येक वेळेस त्यांना सहजयोगाचा फायदा होतो. हे सर्व कशासाठी तर तुमची प्रगती व्हावी, उत्थान व्हावे यासाठी. आपल्याला पूर्णपणे दलदलीतून काढण्यासाठी.

आपल्याला समर्पित व्हावे लागेल व श्रद्धा दृढ करावी लागेल. आमच्या काही मर्यादा आहेत. आम्ही वस्तू लपवतो व चलाख बनण्याचा प्रयत्न करतो. ही भयानक स्थिती आहे. आपण आत बघण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अजून माझ्यात काय कमी आहे. कोणती बंधनं मला समर्पणापासून दूर ठेवतात. कोणती भांडणे, लढाई, झगडा, अहंकार, दृष्टिकोन अजूनही मला दलदलीतून बाहेर येऊ देत नाही. आकर्षण, संबंध यातूनही बाहेर पडावे लागेल. जोपर्यंत ह्या बंधनातून मुक्त होत नाही तोपर्यंत तुम्ही कार्यान्वित होत नाही.

अर्धवट लोकांना कोणतेच स्थान नाही. येशू ख्रिस्ताने सांगितले की, आपण आपली श्रद्धा आणि समर्पण मला द्या, बाकी सर्व माझ्यावर सोपवा. फक्त

आपली भक्ती, श्रद्धा, समर्पण यांनीच मला प्राप्त करु शकता. आमच्या मर्यादा आहेत, तुमच्यातील दिव्य शक्तींची पूर्ण अभिव्यक्ती माझ्यामुळेच होते. हे सहज आहे. त्याला सहज बनवले गेले आहे. जे लोक भोळे, अबोधित आहेत, चलाख नाहीत अशा लोकांच्या बाबतीत मी समाधनी आहे आणि मला प्रसन्न वाटते. मला प्रसन्न करणे सोपे आहे. जेव्हा तुम्ही परस्पराशी प्रेम करता, मदत करता एकमेकाची स्तुती करता सन्मान करता. एकत्र गप्पा विनोद करता. एकमेकाच्या संगतीचा आनंद घेता, या सर्वांमुळे मीआनंदीच नाही तर अतिशय प्रसन्न होते.

सहजयोगात स्वार्थाला काहीच स्थान नाही. स्वार्थाप्रमाणे कंजूषपणालाही स्थान नाही. कंजुषी म्हणजे बुद्धीचा कोतेपणा, मी माझ्यासाठी पैसे मागत नाही. धनाला चिकटून राहणारे, भौतिक वस्तू, भौतिक सुविधा, भौतिक पदार्थ, भौतिक बाबी ह्या सर्व गोष्टींशी चिकटून राहतात, ही अतिशय घातक गोष्ट आहे.

"आपली आई हीच महान संपत्ती आहे. तिच्यामुळेच विश्वभरातून प्रेमळ भाऊ बहीण भेटले".

भूतकाळ, भूतकाळातील जीवन, या दलदलीतून मुक्ती मिळवून घ्या. आपण जाणता की, माझ्या प्रेम शक्तीने आपल्या सगळ्यांचे कसे रक्षण केले. आपण जाणता प्रत्येक क्षणी मी तुमच्या मदतीसाठी आणि तुम्ही जेव्हा अपेक्षा केली तेव्हा ती पूर्ण करण्यासाठी पुढे आले. तुमचे उत्थान आतूनच आले पाहिजे. हे मात्र तुम्हीच प्राप्त केले पाहिजे. ह्यासाठी मी किंवा सहजयोगी कोणीच ते कार्य करणार नाही. आम्ही फक्त सांगू शकतो. सर्व उपलब्ध आहे, कार्यान्वित केले आहे, तुम्हाला कोठेच जायचे पण नाही हे अगोदरच सूचित केलेले आहे. आपल्याला काहीच द्यायचे नाही. धन तर बिल्कुलसुद्धा द्यायचे नाही. आपल्यात समर्पण विकसित करा. "समर्पण आपल्या समस्या, सर्व बाधा, यातून मुक्ती मिळवण्याचा सोपा उपाय आहे". आपल्या आत पहा. आपण खरेच समर्पित आहोत का? जे लोक धर्मांधतेने माझा स्वीकार करतात ते सुद्धा योग्य नाही. या विषयाच्या संबंधी कोणतीच धर्मांधता नको. एखाद्या व्यक्तीला डॉक्टरांकडे जायचे असेल तर धर्मांध व्यक्ती म्हणजे "श्री माताजी

माझी रक्षा करते, मी डॉक्टरकडे नाही जाणार, आजारी पडला की भांडतो, ही धर्मांधता आहे.

**समर्पण काय आहे** : आपल्या आत आपण म्हणा हे श्री माताजी, तुम्हीच माझ्या डॉक्टर आहात, तुम्हीच माझा इलाज करा. रोगमुक्त करा. याबद्दल मी काहीच सांगू शकत नाही. मी तिलाच ओळखतो, इतर कोणालाच ओळखत नाही. ही गोष्ट युक्तायुक्त आहे. आई सर्व शक्तिमान आहे, तर ती मला रोगमुक्त करेल. जर ती मला ठीक करत नाही तर ती तिची इच्छा मी तिच्यावर बळजबरी करु शकत नाही.

ही गोष्ट महत्त्वाची आहे की, माताजी माझ्या दुःखाला माझ्यापेक्षा अधिक जाणते. इसा-मसिहाला जेव्हा क्रुसावर चढविले तेव्हां आई म्हणून श्री माताजींना काय वाटले असेल असा विचार करा, ती तर महालक्ष्मी होती, मुलाला क्रूसावर चढवताना त्याला होणाऱ्या यातना सामान्य माणसाप्रमाणे झाल्या. कारण आज्ञाचक्र महत्त्वाचे होते. त्याचे सृजन अतिशय सूक्ष्म कार्य होते. त्यासाठी तिने आपल्या मुलाला बलिदान करावयास भाग पाडले. त्याच्या समर्पणावर पूर्ण विश्वास होता आणि तुम्ही आईकडून काही करण्याची आशा करता.

येशू ख्रिस्तासारखे समर्पण किती लोकांचे आहे. कोणाचेच नाही. ही गोष्ट सत्य आहे. येशू ख्रिस्त आपले मोठे भाऊ आहेत, कारण त्यांच्यासारखा कोणीच नाही. त्यांनी सर्व कष्ट सहन केले, कारण ते आईचे अंग-प्रत्यंग होते. त्यांच्या आईने तर त्यांच्यापेक्षा जास्त कष्ट केले. महान लक्ष्य, महान प्रसन्नता, महान उच्च जीवनासाठी ह्या सर्व कष्टातून, त्रासातून जावे लागले. या सर्व गोष्टींचा वाईट लोक फायदा घेऊ शकतात आणि सहजयोगाचा अपप्रचार करतात. जसे फार कष्ट, त्याग, सोशिकता लागते, हे सोपे नाही अशी इतरांची धारणा तयार करतात. पण आपण येऊनच त्याचा अनुभव घेतला पाहिजे. सुरवातीला आपल्याला सहजपणे कुंडलिनीच्या जागरणाची प्रक्रिया उपलब्ध होते. शिवाय काही काळ आपल्याला मार्ग दर्शन मिळते, स्थिरता यावी म्हणून श्री माताजी आपल्या उन्नतीसाठी मदत करतात.

त्यानंतर आपण जे काही करतो ते कष्ट नसतातच आपण आत्मा बनतो आणि जीवनाचा खरा आनंद उपभोगतो.

"नैनं छिंदन्ति शस्त्राणि, नैनं दहति पावकः न चैनं क्लेदयंत्योपो न शोषयति मारुतः"

आत्म्याला शस्त्र मारू शकत नाही, अग्नी जाळू शकत नाही, वारा उडवू शकत नाही. आत्मा कोणत्याही प्रकारे नष्ट होत नाही. आपण तर तोच आत्मा आहात, आपले पोषण झाले आहे. आपण प्रगत झालात, आपली उन्नती झाली. लोक जेव्हा तुम्हाला (सहजयोगी) पाहतील तर म्हणतील हे फुलासारखे आहेत. त्यांचा चेहरा तेजस्वी आहे. त्यांचे आत्मविश्वासपूर्ण वावरणे, सन्मानजनक वर्तन आणि सुंदरता लोकांना आकर्षित करते. आत्मा फक्त देतो, देणे हाच त्याचा गुण आहे. आपण बलिदान नाही करु शकत मात्र देऊ शकता.

आई मुलासाठी सर्व त्रास, कष्ट सोसते, मुलगा मोठा झाल्यावर तिला त्याचा अभिमान वाटतो. आईस मुलाबद्दल व मुलास आईचा अभिमान वाटतो. आई , मुलगा एकत्रयेऊन सर्व गोष्टी सुख दुःख वाटून उपभोगतात. असे होणे फक्त तेव्हाच संभव आहे जेव्हा तुम्ही सहजयोगी असाल सहजयोग संयमित जीवन जगाल. आतून अत्यंत समाधानी जीवनाचा अनुभव घेणारेच असे जगू शकतात.

सहजयोगात आम्हाला कशासाठी विकसित व्हावयाचे आहे. आपली प्रगती करण्यासाठी, पुढे जाण्यासाठी आणि महान आईची मुले शोभावीत यासाठी. ध्यानधारणेत पूर्ण समर्पणाचा अभ्यास आवश्यक आहे. सुरवातीला आपण लहान मुल होता. आता तुम्ही सामुदायिक बनलात. कोणतेही काम तुम्ही तुमच्यासाठी करत नाही. विराटाचे चैतन्य प्राप्त करण्यासाठी. आपण उन्नत होत आहात. हेच पूर्णत्व आपल्याला प्राप्त करावयाचे आहे. आपली नोकरी, परिवार, धन, संपत्ती हा सर्व मोह नष्ट झाला आहे. आपल्याला सहजयोगाची जबाबदारी उचलायची आहे. आपण सर्व समर्थ आहात म्हणूनच आपले पालन केले गेले. आपली क्षमता आणि आवडीप्रमाणे कार्य करा. पूर्ण समर्पणाने कार्यान्वित व्हा. समर्पण ही एकमात्र गोष्ट आहे.

पूर्ण समर्पण, पुढे उन्नत होण्याचा एकमेव मार्ग आहे. जे सहजयोगी अर्ध वट आहेत, त्यांना सोडून द्यावे लागेल. त्यांना आम्ही आमच्याबरोबर ठेवू शकत नाही. त्यांच्याबद्दल सहानुभूती दाखवण्याची गरज नाही. जर ते परत चांगले झाले तर त्यांना आपण परत बोलवू शकतो. अर्थात हे सर्व तुम्ही माझ्यावर सोडा. त्यांच्याकडे चित्त देऊ नका, आपल्या प्रगतीकडे लक्ष्य द्या. आज मी ज्या पद्धतीने तुमचा सामना करते तसेच तुम्हालाही इतर लोकांचा सामना करावा लागेल.

सहजयोग म्हणजे मौन नाही, मौन म्हणजे समर्पण नाही. आपल्याला फक्त ध्यान धारणेत रहायचे आहे. मौनातून बाहेर पडायचे आहे. सर्व देशांना, राष्ट्रांना, सर्व लोकांना या आपल्या पुनरुत्थानाची वेळ आली आहे. हा संदेश द्यायचा आहे. महान संदेशाचा पुनर्जन्म करायचा आहे. हीच वेळ त्यासाठी उपयुक्त आहे, कार्य करण्यासाठी तुम्ही लोक समर्थ आहात.

काम करताना कोणी टिंगल टवाळी केली तर त्याकडे दुर्लक्ष करा. आपली आवड निवड बाजूला ठेवा. सवयीचा गुलाम बनू नका. तुम्ही समर्पित झालात की, खूप कमी जेवाल. जेवणाची आठवण पण राहणार नाही. काय खाल्ले, कोठे झोपले हे सुद्धा लक्षात राहणार नाही. आपण स्वप्नाची निर्मिती कराल, ते पूर्ण कराल व त्यात समाधानी रहाल. पूर्ण समर्पण व समाधानाने हे कार्य करावयाचे आहे. आपल्या हितासाठी नाही. त्या गोष्टी सर्व संपल्या आहेत. मायेच्या दलदलीतून मुक्त होण्यासाठी दृढ भूमीवर उभे रहाण्यासाठी, परमपित्याचे स्तुतिगान उंच आवाजात म्हणण्यासाठी कार्य करावयाचे आहे. भ्रमात अडकलेले लोक काय गाणे गातील, ते सुरक्षा देऊ शकत नाही, इतर लोकांची मदत करु शकत नाही. यातून आपल्याला बाहेर यायचे आहे. यासाठी सतत विवेकाची गरज लागते. आपली देखभाल करण्यासाठी परब्रम्ह आले आहे. त्या परब्रम्हास दृढतेने पकडून ठेवा. मृत्यूसुद्धा घाबरेल. तो परत जाईल. आपल्या आईचे नाव अत्यंत शक्तिशाली आहे. इतर नावापेक्षा शक्तिशाली आहे. आपल्याला ह्या गोष्टीचे ज्ञान पाहिजे की, मंत्र कसा घेतला पाहिजे. अतिशय समर्पकतेने हे नाव घेतले पाहिजे.

निष्कलंक. अर्थात निर्मला अर्थात डागरहित. म्हणजे भ्रम - बिना भ्रम 'नि' -अर्थात पूर्णता - सहस्त्रारच्या आनंदाला नेहमी निरानंद म्हणतात. युग युगांतरापासून निर्मलानंद किंवा निरानंद म्हणतात. सुळावर चढवले तरी तुम्ही आनंदातच रहाल, असा हा आनंद आहे. विष प्राशनातही हा आनंद आपण मिळवतो, मृत्यू शय्येवरही हा आनंद आपण घेतो. श्रद्धा आणि विवेक ढळता कामा नये. तरच आमची उन्नती शक्य आहे. नकारात्मकतेचे सूक्ष्म ज्ञान आपल्याला झाले असेल. परमेश्वरी कार्य ते कसे नष्ट करतात हे लक्षात आले असेल. माझ्या समोर तुम्ही आहात, श्री कृष्णाने अर्जुनाला जे सांगितले तेच मी तुम्हाला सांगते.

"सर्व धर्माणाम परित्यज्य, मामेकम् शरणम्व्रज", याशिवाय कोणताच मार्ग नाही. व्रज म्हणजे ज्याने पुनर्जन्म प्राप्त केला तो. अत्यंत सुदृढ व्यक्तित्व. आपण सुदृढ झालात तर अवश्य समर्पित व्हाल. कुशल झाला तरी समर्पित व्हाल.

यामुळे भ्रमातून मुक्ती मिळण्यासाठी मदत मिळेल. आपले महान लक्ष्य प्राप्तीसाठी सहाय्यक होईल. श्री माताजी माझी का मदत करतात हे समजून घेत नाही. त्यांना वाटते माताजी फार उदार आहेत. मी उदार नाही. माझ्यात सहज बुद्धी आहे. परमात्म्याच्या आनंदाची पृथ्वीवर अभिव्यक्ती तुम्ही लोकच करु शकता. तुम्हीच ती बासरी आहात जिच्यातून मधूर संगीताची धुन वाजेल. परमात्मा आपला उपयोग करेल आणि संचलनपण.मी तुम्हाला यासाठी कुशल बनवते आहे. कारण तुम्ही परमेश्वराचे सुंदर माध्यम बनू शकाल. मी हे जाणत नाही की, तुम्हाला कळते की, नाही, पण ते जीवन अतिशय मधुर, सुंदर, समर्पण आहे. ज्यात समज उमज असेल पूर्णपणे समर्पित, पूर्ण पोषण प्राप्त झालेले, उच्च लक्ष्यापर्यंत पाहेचणारे, समर्पित जीवन जसे झाडाची पाने सूर्याच्या किरणाकडून पोषण प्राप्त करुन आपल लक्ष्य प्राप्त करुन वेगवेगळे रंग प्राप्त करतात.

आपण चंद्र, सूर्य, सागर, आकाश बनता आणि आत्मा ही बनता. सर्व तारे, तारका आणि ब्रम्हांड बनून त्याचे कार्य सांभाळता. सर्व तत्त्वांवर आपण ताबा

मिळवतो. म्हणून सर्व तत्त्वावर पोहचू शकतो. मीच ह्या सर्वांत तत्त्व आहे. यावर समर्पित रहा. मीच तत्त्वमय आहे. आपल्या तत्त्वाशी जोडलेले रहा.

मी कुंडलिनी आहे. मीच सार तत्त्व आहे. अत्यंत सूक्ष्म, अत्यंत गहन, अत्यंत प्रभावशाली, गतिशील, निरंतर शाश्वत वस्तूंच्या बाबतीत आपले समर्पण असावे. आपली कुंडलिनी आदि कुंडलिनीसारखी आहे. परब्रम्ह तिची शक्ती आहे.

त्याच्यापुढे जाऊन तुम्ही आत्मा बनला आहात. जहाज तयार झाल्यावर समुद्रात आणले जाते, त्याची परीक्षा घेतली जाते, पहातात ते समुद्रात पार करु शकेल की नाही, जेव्हा आपल्याला समुद्र आणि जहाज यांचे संपूर्ण ज्ञान आहे. पूर्ण स्वतंत्रता, विवेकाने आपले नांगर (लंगर) सोडून दिले पाहिजे. कारण, वादळ, पाऊस, तुफान यांना घाबरु नये. म्हणजेच आपल्याला सर्व ज्ञान आहे. पार करत जायचे आहे.

परमात्मा आपल्याला धन्यता देवो.

प. पू. श्री माताजी - ३१.०७.१९८२

***

# प्रकरण ३०

## सहजयोग – प्रचार – प्रसार

आपण महान साधक आहात. सत्य आणि प्रेमाचे साधक असल्यामुळेच हे सर्व मिळवू शकला, नाही तर हे शक्य नव्हते. एका व्यक्तीला बदलणे कठीण आहे परंतु आपण विवेकशील गहन होत! म्हणूनच हे सूक्ष्म ज्ञानाने आपल्यात प्रवेश केला. किती महान व्यक्तींनी या कलियुगात जन्म घेतला. किती संत माझ्यासमोर बसलेले आहेत. कोणी त्यावर विश्वास ठेवणार नाही. आध्यात्म ते इतिहास अशी घटना यापूर्वी कधीच घडली नाही.

प. पू. श्री माताजी - २१.०३.१९९३

हा अत्यंत महत्त्वपूर्ण समय आहे. मानवाच्या इतिहासात असा महत्त्वपूर्ण समय कधी आला नाही व पुढे भविष्यात ही येणार नाही. हा असा काळ आहे ज्यात तुम्ही चैतन्य व आत्मज्ञानच मिळवले तर इतरांना ही आत्मज्ञान देणे जाणता.

तुम्ही जाणता मला मात्र फार कठोर परिश्रम करावे लागले. बालपणापासूनच मी खूप कष्ट, श्रम केले. मी अतिशय कठीण परिस्थितीतून गेलेली आहे. ज्यांना मी साक्षात्कार दिला, जे साक्षात्कारी आहेत. असे लोक इतरांची जबाबदारी घेत नाहीत तें पाहून मला अधिक कष्ट, त्रास होतो. आज विश्वातल्या मानवतेचे रक्षण करणे, आमचे मुख्य कार्य आहे. आम्हाला हेच कार्य करावयाचे आहे. तुम्ही हिमालयात गेला असता किंवा उपाशी मेले असता, अनेक वर्ष परमेश्वराचे गुणगान गात बसले असते. नाही तर कर्मकांड करत बसले असते तरी हा आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला नसता. ही विशेष गोष्ट क्षणात तुमच्यात घटित झाली हे जाणले पाहिजे.

ही गोष्ट संभव नव्हती, यासाठी अनेक समस्या दबाव, यांचा सामना करून कठोर परिश्रम करावे लागले. आता एवढेच बघायचे की, सर्वांना उपयोग झाला की नाही म्हणजे सगळ्यांचे उत्थान झाले का हे पाहणे.

आम्हालाच फक्त सहजयोगी बनायचे नाही, तर अनेकांना सहजयोगात आणायचे, ती तुमची जबाबदारी आहे. माझ्यासाठी महानतम कार्य म्हणजे सहजयोगाचा प्रसार सहजयोग्याच्या मनात प्रचारासाठी उत्कट इच्छा असावी लागते. प्रचार, प्रसाराचे वेगवेगळे मार्ग त्यांनी शोधले पाहिजेत. त्यांच्यात अंतर्परिवर्तन घडून आणले पाहिजे त्यासाठी वेगवेगळ्या पद्धती शोधून काढल्या पाहिजेत. ते आदिशक्तीचा संदेश प्रसारित करतील.

तुम्ही सर्व सहजयोगी विश्व परिवर्तनासाठी जीव तोडून काम करताना मला पहावयाचे आहे. विश्व परिवर्तन होणे आवश्यक आहे. इतर लोक करु शकणार नाही. ते तुम्हीच करु शकता. तुम्हालाच तो अधिकार आहे. तुमच्यात ती शक्ती आहे. आपली प्रगती झाली तर आपण इतरांबद्दलही विचार करायला हवा. सहजयोगातूनच आपण विश्वाचे रक्षण करु शकतो. दुसरा मार्ग नाही.

हे फारच मोठे आंदोलन आहे. जे गतिशील बनवले पाहिजे. यासाठी प्रयत्न केले नाही तर प्रलय येऊ शकेल.

तुम्ही आध्यात्मिक कार्यकर्ता आहात. सामाजिक कार्यकर्ता नाही. तुम्ही सामाजिक कार्य करु शकता. पण तुमचे मुख्य कार्य मानवात परिवर्तन घडवून आणण्याचे आहे. मानवात फार मोठा आजार म्हणजे तुच्छता, क्रुरता, इतर लोकांना कष्ट देणे, त्रास देणे हे सर्व बाह्य स्वरुपाचे नाही. हे आंतरिक आहेत. ह्या रोगांना चांगले केले जाऊ शकते. आज तीच महत्त्वाची गरज आहे. जर आपले चित्त शारीरिक, भावनिक, आर्थिक, विवाहसंबंध लोकांच्या अडचणीकडे वेधले गेले तर उपयोगी नाही. हे कार्य तुमचे आणि माझे पण नाही. सहजयोगींचा आनंद वेगळा आहे.

आपल्यात एकमेकांबद्दल प्रेमाचे संबंध, एकाकारिता, आनंद, करुणा, प्रेम विकसित व्हावेत - सर्वसाधारणपेक्षा हा आनंद वेगळा असतो. तुम्ही लोक प्रकाशित झालात.ज्ञानी लोकांनी प्रकाश इतरांना दिला नाही, तर त्या प्रकाशाचा काय उपयोग? छोट्याशा मेणबत्तीकडे पाहिले तरी लक्षात येते की, जेवढा प्रकाश तिच्यात

आहे तो ती पसरविते. त्यासाठी ती स्वत: जळते. आम्ही जर इतरांना प्रकाश देत नाही तर आत्मसाक्षात्काराचा काय उपयोग.

प. पू. श्री माताजी, कबेला - ०३.०६.२००१

आता आपण एका नव्या युगात प्रवेश करतो आहोत. आपण सत्ययुगात प्रवेश करतो आहोत, सत्ययुग सुरु झाले आहे.

आपण शपथ घेऊया की, सहजयोगाला नव्याने विशाल आणि गतिशीलतेने आरंभ करु. त्यासाठी संघशक्ती आवश्यक आहे. संघशक्ती म्हणजे सामुदायिकता, ही संघशक्ती संघटित, समजदार, प्रेममय, अत्यंत दृढ असली पाहिजे. आपल्याला अत्यंत सृजनात्मक बनावे लागेल. आपल्याला कोणाच्या मदतीची गरज नाही. आपल्यात परमेश्वरी शक्ती परिपूर्ण आहे. त्या परमेश्वरी शक्तीचा उपयोग प्रचार - प्रसारासाठी केला पाहिजे. मानवाचा उद्धार करण्यासाठी त्या शक्तीचा उपयोग केला पाहिजे. त्यासाठीच ती मिळाली आहे. एक व्यक्ती हजारो लोकांची कुंडलिनी जागृत करु शकते.

परमेश्वरी राज्यात कोणत्याच विद्यापीठाची आपल्याला त्यासाठी पदवी मिळणार नाही, प्रमाणपत्र पण मिळणार नाही. आमचे प्रमाणपत्र म्हणजे कुंडलिनीने तुमचे सहस्त्रार उघडले आणि तुम्ही सहजयोगी झालात हेच आहे. तुम्ही किती आनंदी आणि जागृती देण्यासाठी किती उत्सुक आहात. तो आनंद किती लोकांना वाटता त्याला खूप महत्त्व आहे. स्वत:साठी आणि सहजयोगासाठी महत्त्वपूर्ण आहे. आपला संबंध पूर्ण विश्वाशी जोडला गेला आहे. जसे थेंब सागर बनतो आणि सागराशी तादात्म्य पावतो. तसेच आपले तादात्म्य सहजयोगाशी असले पाहिजे. जे लोक विनम्र, प्रेमळ असतील त्याच्याकडे अधिकाधिक सहजयोगी आकर्षित होतील.

आपल्या आईची एकच इच्छा आहे की, सहजयोगाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घ्या, सगळ्यांना सहजयोग सांगा सहजयोगातून मिळणारा आत्मसाक्षात्कार यापेक्षा कोणतीच गोष्ट मोठी नाही. जितका जास्तीत जास्त लोकांना आत्मसाक्षात्कार द्याल तितकीच मी आणि सर्वशक्तिमान परमेश्वर तुमचे आभारीच आहोत.

प. पू. श्री माताजी - ३१.१२.२०००

परमेश्वराच्या इच्छेचा प्रसार करण्यासाठीच आपण पृथ्वीवर विद्यमान आहोत. ह्या स्थितीपर्यंत पोहचण्यासाठी विचारांना आणि कार्याला सुरवात केली की परमात्म्याच्या इच्छेशी एकरुप व्हाल. आदिशक्तीची शक्ती आपल्या आत प्राप्त केली आहे. ती विवेकाने सांभाळणे, देणं दोन्ही गोष्टी महत्त्वपूर्णच आहेत.

प.पू. श्री माताजी, दिल्ली - १९७६

उच्चतम, बहुमूल्यतम अत्यंत महत्त्वपूर्ण शक्ती प्राप्त झाली आहे. जेव्हा चांगले कार्य करावयाचे असेल तेव्हा ही शक्ती आपल्या विचारात प्रवेश करते. त्यानंतर हे विचार समाजात, देशात आणि ब्रम्हांडात प्रसारित होतात. ह्या शक्तीला सामूहिक आणि व्यक्तीची पण चिंता असते. ह्या आधुनिक काळात विश्वातील लोक आणि त्यांचे जीवन चांगले करण्यासाठी ही शक्ती कार्यरत आहे.

प. पू. श्री माताजी, मास्को - १७.०९.१९९५

सर्वशक्तिमान परमेश्वर सर्वत्र विद्यमान आहे. त्यानेच सर्व काही केले. परमात्म्याच्या इच्छेने सर्व काही संचलित केले. आता तुमच्या माध्यमातून ते कार्य करावयाचे आहे. तुम्ही सर्वव्यापी परमात्म्याचे प्रतिनिधी व्हायचे आहे.

प. पू. श्री माताजी - १०.०५.१९९२

साक्षात्कारानंतर तुम्हाला मोक्ष मिळाला. इतर लोकांचा उद्धार करण्यासाठी तुम्हीच माध्यम आहात. माध्यमाशिवाय ही सर्वव्यापी शक्ती कार्यान्वित होणार नाही. सूर्याकडे पाहिले तर त्याचा प्रकाशकिरणांच्या माध्यमातून पसरतो. आपल्या हृदयाचे रक्त नसांच्या माध्यमातून शरीरभर पसरते. नसा अतिशय सूक्ष्म बनतात. आपणच माझ्या रक्तवाहिन्या आहात. माझे प्रेमरुपी रक्त सर्व लोकांमध्ये प्रवाहित होईल. रक्तवाहिन्या जर तुटलेल्या असतील तर रक्त लोकांपर्यंत पोहचणार नाही. ह्याच कारणामुळे तुम्ही लोक फार महत्त्वपूर्ण आहात.

प. पू. श्री माताजी - सप्टेंबर, १९८१

आपण लोकांना काळाच्या मर्यादा समजावल्या पाहिजेत. आपल्या महानतेला समजा. विश्वात चैतन्य पसरविण्यासाठी आपल्याला निवडले गेले आहे. आळस सोडा, जागृत व्हा, उठा.

प. पू. श्री माताजी, इटली - ०४.०५.१९८६

आपल्याला समजून घ्या. जेव्हा स्वत:ला जाणले जाते तेव्हाच दिलेही जाते. जोपर्यंत दिव्यात प्रकाश नसतो, तो दिवा पेटवला जातो. तो सगळ्यांना प्रकाश देतो. ते त्याचे कार्य आहे. तसेच एका दिव्याने अनेक दिवे लावता येतात. यालाच साक्षात सहजयोग म्हणतात.

प. पू. श्री माताजी - १०.०२.१९८१

चंद्र, सूर्य, तारे, तारांगण, ब्रम्हांड यांना एकच कार्य करावे लागते. सहजयोग पूर्णपणे पसरतो आहे, स्थिर होतो आहे. आपले लक्ष्य साध्य करतो आहे का? सर्व तत्त्वे विविध प्रकारचे कार्य करतात. आपणच माझे मार्ग आहात, शक्तीचे स्त्रोत आहात. सुंदर तथा संतोषप्रद रुपाने कार्य करा. परमात्म्याच्या कृपेने आपण सहजयोगाचा पाया बनाल. आपला विवेक, प्रेम, विश्वास, सामर्थ्य यांनी सहजयोगाचे घर (भवन) निर्माण करा.

प. पू. श्री माताजी - ०९.१२.१९९१

सहजयोग म्हणजे धर्म परिवर्तन नाही. स्वभाव परिवर्तन पण नाही. ही नवी रचना आहे. पुढे जाऊन ज्या मानवात परमेश्वरी इच्छा पुढे नेण्याची योग्यता आहे, परमात्मा सर्वव्यापी आणि सर्वज्ञ आहे. त्या शक्तीचा एक भाग आपल्यात आहे. आपली सर्वज्ञता प्रमाणित करण्यासाठी प्रत्येक वेळी आपण सहजयोगी आहोत हे लक्षात ठेवा.

प. पू. श्री माताजी, कबेला - १०.०५.१९९२

मी रात्रंदिवस कठोर परिश्रम केले. माझी एकमात्र इच्छा आहे, ह्या गोष्टी गंभीरतेने घ्या आणि कार्यान्वित करा. माझे हात आपणच मजबूत करा. लोक

म्हणतात देवीला एक हजार हात आहेत. ते एक हजार हात आपल्याकडे मागणी करीत आहोत की, दोन हातासह या आणि याला कार्यान्वित करा.

प. पू. श्री माताजी, कबेला - ०६.०५.२००१

✸✸✸

सहजयोग्याकडे सर्व जगाचे लक्ष आहे, आणि आपण गौरवशाली आहोत हे लक्षात घ्या. विश्वाची अपेक्षा तशीच आईचीही फार मोठी अपेक्षा आहे की, तुम्ही विश्वाचा उद्धार कराल. आपणच परमेश्वरी जंगलातील चालते, बोलते, फिरते प्रेम आहे. हीच ऋतंभराप्रज्ञा आहे. आपण स्वतःला आणि वेळेला समजण्याचा प्रयत्न करा.'

प. पू. श्री माताजी, बोर्डी - १२.०२.१९८४

# प्रकरण ३१

## पूजेचे महत्त्व आणि नियम

ओळख -

सहजयोगी असण्याच्या नात्याने श्री आदिशक्तिची प्रत्यक्ष रुपात अथवा त्यांच्या फोटोची पूजा करण्याची आज्ञा मिळण्याचे भाग्य आपल्याला प्राप्त झाले आहे. गरीमामयी आई प्रत्यक्षरुपात किंवा आपल्या सर्वव्यापक उपस्थितीच्या माध्यमातून आमच्या पूजेचा स्वीकार करते. जेव्हा जेव्हा आपण श्री माताजींचे ध्यान करतो किंवा प्रार्थना करतो त्या आमच्या बरोबर असतात. म्हणून श्री माताजींची पूजा करतांना सहयोगींचे एक उत्तरदायित्व असते. श्री माताजींच्या चरणकमलांवर चित्त पूर्णपणे स्थिर करुन त्यांची पूजा करायला हवी. पूजेच्या वेळेस चुकूनही चित्तविक्षेप (ध्यान न लागणे) सन्मान न केल्याप्रमाणे (अपमानास्पद) आहे. मंत्रोच्चारण, महादेवीचे महात्म्य वर्णन करण्यासाठी किंवा श्रद्धापूर्वक समर्पित केलेल्या भेटीचा स्वीकार करण्यासाठी केलेली विनंती देवीला केलेल्या प्रार्थना स्वरुप असते.

शुद्ध श्रद्धेचा उदय हृदयातून होतो आणि त्याचे प्रतिबिंब 'आत्मा' देवीची (आईची) शुभपूजा करण्याने प्रसन्न होतो. श्री माताजींच्या म्हणण्यानुसार अत्यंत सुंदर लहरींचे आवाहन करते. तसेच उपस्थित प्रत्येक व्यक्ती दैवी आनंदाचा अनुभव घेते.

पूजा जीवनाचा एक भाग बनली पाहिजे. आपल्या एका पत्रात श्री माताजी म्हणतात की, पूजा हृदयापासून केली पाहिजे. हृदयात केली पाहिजे. पूजेची दृष्ये हृदयात उतरुन आमच्यासाठी निरंतर आनंदाचे स्त्रोत बनायला हवेत.

हृदयाला आदिशक्तिचे सिंहासन बनू द्या आणि याप्रकारे गंगाजलाप्रमाणे पवित्र आणि अमृताप्रमाणे शुभ्र झालेल्या चित्ताने श्री माताजींच्या चरण कमलाची पूजा करा.

आदिशंकराचार्यांनी म्हटले आहे की, आध्यात्मिक विकासासाठी पूजा अत्यंत सहाय्यक आहे आणि ती आदिशक्तिच्या कृपेला अवाहन करते. जोर देऊन आदिशंकराचार्य सांगतात की सर्व-व्यापक शक्तिशी जेव्हा चित्त एकाकार होते तेव्हा निर्विकल्प अवस्थेमध्ये योगी, इष्ट आणि पूजारी यांच्या द्वैताच्या वर उठतो. जेव्हा आमची देवी आई (देवी माता) निरंतर विद्यमान (सतत उपस्थित) आहे तर पूजेचा स्वीकार करण्यासाठी तिचे अवाहन कशाप्रकारे करु शकतो? पूर्ण ब्रम्हांड जिथे तिच्या विराट अस्थित्वात स्थित आहे तर मग आम्ही त्या आईला काय भेट देणार?

त्यांच्या असिम (विराट) रुपाचे दर्शन करण्यास असमर्थ आम्हा सर्व सहजयोगींना आपल्या पूजेची संधी प्राप्त करुन दिल्याबद्दल श्री माताजींनी मर्यादित (सिमित) (मानव) रुप धारण केले आहे. या त्यांच्या कृपेसाठी आमचा रोम आणि रोम कृतज्ञ असायला हवा.

मनस्त्वं व्योमस्त्वं मरुद सिसारथिरसि
त्वमापस्त्वं भूमिस्त्वयी परिणतायां नहि परम् ।
त्वमेव स्वात्मानं परिणामयितुं विश्ववपुषा ।
चिदानंदकारं शिवयुवति भावेन विभूषे ।।

म्हणजे

तूं आहेस मन, वायू, आकाश, जल आणि भूमि तुम्हीच आहात.
तू मन आहेस आकाश आहेस, तू वायू आहेस ज्याचा वायू सारथी आहे तो अग्नीही तूच आहेस. तू जल आहेस आणि भूमी आहेस, तुझ्या कक्षेबाहेर काही नाही, तूच स्वतःला परिणत करण्यासाठी चिदानंदकाराला विराट देह भावाने व्यक्त केले आहेस

प.पू. श्री माताजी, चैतन्यलहरी - १९९१

पूजेचा अधिकार

सहजयोगासंबंधी आज मी तुम्हाला काही रहस्ये समजावणार आहे. एक रहस्य आहे की, पूजेसाठी तुम्ही मध्यम प्रकारच्या लोकांना आणू नका. कारण पूजा सहन करणे अतिशय कठीण असते. माझे अस्तित्व चरण आणि करकमलांचे मूल्य अजून लोकांच्या लक्षात आले नाही. ते येथे येण्यास योग्य नाहीत. म्हणून भाऊ, बहिण, मित्र यांना पूजेला आणू नका. ते अयोग्य आहे. सहन न होणारे (वातावरण) त्यांच्यावर लादल्याने त्या व्यक्तिच्या उत्थानाचे अवसर बिघडवीत आहात. ते, हे सहन करु शकत नाहीत. पूजा अत्यंत कमी लोकांसाठी आहे. म्हणून लक्षात ठेवा पूजा खूप लोकांसाठी नाही.

चरणामृत - अर्थात माझ्या चरणांचे अमृतही सर्वांसाठी नसते. तसेच पूजेचे आशीर्वादही सर्वांसाठी नसतात. म्हणून जे लोक पूर्णपणे तयार नाहीत त्यांच्यापासून वाचण्याचा प्रयत्न करा. सर्वप्रथम ते शंका घ्यायला सुरुवात करतील.

नियम - आचरणासंबंधी समस्या येतील. आवश्यक सन्मानाने ते पूजेचा स्वीकार करु शकणार नाहीत. इथे येणे अत्यंत नशिबाने घडते. हे नशिब प्रत्येकाला देता येत नाही.

जर तुम्ही समजू शकतात तर हे सहजयोगाचे रहस्य आहे आणि सुरुवातीला या रहस्याबद्दल कमी लोकांना सांगायचे आहे. एक दिवस सर्व रहस्ये उघडतील परंतु सर्वांसाठी नव्हे. आता तुम्हाला हे सत्य जाणवेल की, तुम्ही खूप नशिबवान आहात. तुमच्या आचरणातून हे प्रकट होईल. हे भाग्य तुम्हाला प्राप्त झाले आहे. आज जगभरात ध्यान करणारे लोक खूप आहेत. मी त्या सर्वांचा विचार करते. तुम्हालाही त्यांचा विचार करावयाचा आहे आणि हे समजावून घ्यायचे आहे की, ते सुद्धा तुमच्या प्रमाणेच विराट अस्तित्वाचे अंग-प्रत्यंग आहेत. परंतु तुम्ही लोक माझ्या अस्तित्वाचे सतर्क अंश आहात.

त्यामुळे या वेळेस ही पूजा तुम्ही केवळ लंडन आणि तुमच्यासाठी करीत नसून पूर्ण विश्वाच्या हितासाठी करीत आहात. विश्वभराच्या सहजयोगींशिवाय तुम्ही

स्वत:ला त्या सहजयोगींप्रमाणे अभिव्यक्त करीत आहात. जे मला ओळखतात आणि मी इतरांना आशीर्वाद द्यावेत म्हणून प्रार्थना करीत आहेत. त्यामुळे ते इतर जनही मला ओळखतील. मला आशा वाटते की, या पूजेनंतर तुम्ही मला आणखीन स्पष्टपणे ओळखू लागाल. माझी ओळख पटल्यानंतर तुम्ही केवळ स्वत:ला ओळखाल आणि सर्व कार्ये अत्यंत सुंदरप्रकारे पार पाडाल. सुंदरप्रकारे होऊ लागतील.

मला फक्त असे वाटते की, तुम्ही निष्कपट बना, सहजयोगामध्ये कपट करु नका. फसवू नका. कारण तुम्ही मुक्ती मार्गास हानी पोहोचवाल तर तुम्हाला दंड मिळेल. परिणामी तुमचीच हानी होईल. म्हणून निष्कपट होण्याचा प्रयत्न करा. हे कार्य कठीण नाही.

कपटाचा मार्ग सोडून द्या. बऱ्याच लोकांना वाटते की आई रागवते आहे. परंतु ते शब्द चुकीचे आहेत. त्याचा उपयोग माझ्या संदर्भात व्हायला नको. नशिबाने तुम्ही येथे आहात आणि तुम्हाला हे समजायला हवे की, चांगले भाग्य केवळ योग्य व्यक्तिंनाच प्राप्त होते. तुम्ही सर्वजण योग्य व्यक्ती आहात म्हणून हे सगळे तुम्हाला समजावत आहे.

निष्कपटता तुमच्या सफलतेची चावी आहे. हे तुमचे भाग्य आहे की, ती चावी मी तुम्हाला देते आहे. पाश्चात्य बुद्धिच्या लोकांना जर तुम्ही काही सांगितले तर ते दंड इ. अयोग्य शब्दांचा वापर करतात. तुम्ही माझ्यासाठी सन्मानजनक आणि योग्य शब्द उपयोगात आणायला हवे.

जर तुमचे आचरण योग्य नसेल तर तुम्ही उलटसुलट कामे करुन सर्व कार्य बिघडविता. म्हणून सावधान! ही संधी तुमचे महत्‌भाग्य समजा. तुम्ही सर्व विशेष लोक आहात आणि ही संधी तुमच्यासाठी विशेष कृपा आहे. सर्वसाधारण लोकांशी मी अशाप्रकारे बोलत नाही. पण तुम्हाला मी हे यासाठी सांगते आहे की, सर्व किल्ल्या मला तुम्हाला द्यायच्या आहेत.

स्वतःला बघून तुम्ही हे समजावून घ्या की, तुम्ही अत्यंत भाग्यवान आहात. सहजयोग काय आहे, तेव्हा तुम्ही समजाल की इथे हजर असणे किती भाग्याची गोष्ट आहे. तुमच्या सुकृतामुळे हे फक्त तुम्हाला प्राप्त झाले, तुमच्या इथल्या उपस्थितीने तुमचे पुढचे जन्म पुरस्कृत झाले आहेत. ज्ञान तुम्हाला अधिक निष्कपटपणे पूजा करायला मदत करील. ईश्वर तुम्हाला धन्य करो.

पूजेनंतर तुम्ही आवश्य ध्यान करा. कारण ध्यानाशिवाय तुम्ही माझ्या अमृत लहरींचे अमृतपान करु शकत नाही. नेहमीच असे होते, फार कमी पूजांमध्ये माझ्या सर्व लहरी शोषून घेतल्या जातात. केवळ अबोधितेद्वारे तुम्ही माझ्या संपूर्ण लहरी आत्मसात करु शकता. आपल्या मेंदूला कोणतेही प्रश्न न विचारता, दुराचरण न करता, लहरींच्या अमृतपानाची आज्ञा स्पष्टपणे द्या. असे करणे तुमच्या आपल्या पुष्टी, उन्नती आणि आनंदासाठी आहे.

परमेश्वर आपणास आशीर्वादित करो.

प.पू. श्री माताजी - ०५.०५.१९८०

आता पूजेसाठी तुम्हाला हे समजायचे आहे की, साक्षात्काराशिवाय पूजेला काही अर्थ नाही. कारण तुम्ही “अनन्य” नाहीत. तुम्हाला तुमच्या विराट रुपाप्रती चेतन व्हायचे आहे. कृष्णाने भक्तिला अनन्य म्हटले आणि सांगितले की मी अनन्यभक्ती प्रदान करीन. त्यांना अनन्यभक्ती अभिप्रेत आहे. अनन्य म्हणजे तिथे दुसरा कोणीही नाही (ना + अन्य) म्हणजेच जेव्हा तुम्ही साक्षात्कारी होता. अन्यथा ते म्हणतात, पुष्पम् फलं, तोयं. “म्हणजे पुष्प, फल, जल मला स्वीकार्ह आहेत, समर्पित करा”.

परंतु जेव्हा देण्याची गोष्ट येते तेव्हा ते म्हणतात अनन्यभक्तिपूर्वक तुम्ही माझ्या पाशी या. म्हणजे ‘माझ्यात एकरुपता झाल्यावरच तुमच्यात भक्ती जागृत होते. त्या आधी नाही. त्याच्या आधी तुमचे संबंध जुळत नाहीत.

पूजा मनुष्याच्या भावनांच्या डाव्या बाजूची अभिव्यक्ती आहे. ती उजव्या बाजूची उग्रता, विशेषतः अति उग्र स्वरुपाचा स्वभाव आणि उग्र वातावरणाला

निष्प्रभ करते. पूजा, भक्ती आणि समर्पणाची अभिव्यक्ती आहे. म्हणून ती उग्र स्वभावाच्या व्यक्तिंसाठी हितकारक आहे. पूजा केल्याने काय होते? असे म्हणतात आणि आता मी सुद्धा तुम्हाला हे सांगते पूजेतून तुम्हाला तुमच्यातील सुप्त देव देवतांना जागृत करायचे आहे. परंतु हे देव देवता, आदिदेव माझ्याबरोबर आहेत. तुम्ही माझी पूजा करा आणि माझ्यातील ते देव देवता जागृत होतील, परिणाम स्वरुप तुमच्या अंतरात असणारे देवही जागृत होतील. माझे आशीर्वाद ग्रहण करण्यायोग्य बनण्यासाठी तुम्हाला आपल्या लहरी सुधारणे अत्यावश्यक आहे.

जर ग्रहणसामर्थ्यच चांगले नसेल तर कोणतीही पूजा किंवा भाव अभिव्यक्तिचा काहीही लाभ नाही. सर्वात आधी एकाप्रकारे आपले यंत्र (शरीर) किंवा प्रक्षेपण - यंत्राला तयार करु. ही तयारी भिन्न देव - देवतांना प्रार्थना करुन - म्हणजे कुंडलिनी पूजेद्वारा होत असते. माझ्या कुंडलिनीची पूजा केल्याने तुम्ही आपल्या प्रतिबिंबाला सुधारतो. कारण तुमच्या प्रार्थनेमुळे माझ्या चैतन्यलहरींचा प्रभाव तुमच्याकडे वाहू लागतो आणि तुमच्या कुंडलिनीला जागृत करतो. ही जागृतीच तुमच्या उत्थानाची सुरुवात आहे.

एकदा तुमचे यंत्र योग्य झाले की, तुम्ही तुमची अभिव्यक्ती बाहेरच्या बाजूस करु लागता.

ही अभिव्यक्ती तुम्ही कशाप्रकारे करता? ब्रम्हांडाच्या रक्षकाच्या रुपातील देवीच्या शक्तिंचे गुणवर्णन (महिमागान) करुन तिची पूजा - अर्चनेद्वारे तुम्ही हे कार्य करीत असता.

महा-देवीच्या शक्तींचे गुणगाण वारंवार करुन आपल्या भावना व्यक्त करता, (भावाभिव्यक्ती) (हृदय - प्रेम) जेव्हा तुम्ही प्रतिध्वनित (गान,पठण) करता तेव्हा तुमची अभिव्यक्ती अत्यंत शक्तिशाली होते. एक अतिसूक्ष्म चमत्कारिक घटना घडेल. ह्या गोष्टी अतिशय साध्या वाटतात - जसे माझे चरण धुणे अतिसाधारण बाब आहे. आता तुम्ही ते चरण बघा. मला नाही माहीत तुम्ही त्यात पूर्ण ब्रम्हांड बघता

की नाही. (त्यात तुम्हाला ब्रम्हांड दिसते की नाही?) मी तर इथे ते (ब्रम्हांड) बघून आश्चर्यचकित होते.

माझे चरण धुतांना तुम्ही काय करता? खरेतर माझे चरण अत्यंत कष्ट घेतात आणि म्हणून त्यांना आराम मिळावा म्हणून थोडे पाणी त्यांच्यावर टाकता आणि संकेत देता की या चरणांनी केलेल्या प्रयत्नांचा तुम्ही अनुभव घेऊ शकता आणि तेव्हा एक प्रकारचे मधूर व संगितमय प्रेम या चरणातून बाहेर पाझरु लागते. जसं, आज मी येत होते तर अचानक पॉलला बघितले. तो उभा होता. तेच झाले. बघा किती काळजी आणि समजूतदारपणा आहे, श्री माताजी येत आहेत, त्या हरवल्या तर? बस इतक्याशा गोष्टीने करुणा वाहू लागली. कारण हे प्रेम सर्व काही समजते. कोणत्याही वस्तूची त्याला अपेक्षा नाही. परंतु फक्त प्रेमाला स्वीकारणाऱ्या व्यक्तिच्या 'असण्याने' ही तो उत्तेजित होतो. उत्साहित होतो.

तुम्ही हे कसं म्हणू शकता की, तुम्ही ग्राहक (मिळविणारे) आहात. या छोट छोट्या गोष्टींमधून! म्हणून माझ्या चरणांना आराम देता, त्यांना धुता, साफ करता, तेव्हा तुम्हाला त्यांचे महत्व माहीत असते. तुम्ही ते महत्व जाणता. या मान्यता तुम्ही कशा प्रकट कराल? हे छोटे, छोटे समारंभातून तुम्ही तुमच्या मान्यता प्रकट करता म्हणून छोटे असले तरी महत्वपूर्ण असतात. अज्ञानाने (समजून उमजून न घेता) तुम्ही हे विधी पार पाडाल तर ते अर्थहीन, जीवनहीन असतील. आणि ज्ञानपूर्वक (महत्व समजून) समजून कराल तर पूर्णपणे जीवंत होतील. माझ्या चरणांना आराम मिळावा म्हणून तुम्ही तेल इत्यादी इतर वस्तू लावता. याप्रमाणे तुम्ही हृदयापासून म्हणता.

"श्री माताजी तुम्ही अत्यंत कष्ट घेतले आहेत, आपल्या चरणकमलांनीही खूप परिश्रम केले आहेत".

सामान्यपणे (बुद्धि-प्रयोग) तुम्ही ही गोष्ट सांगितली तर त्याला काही महत्व नाही. परंतु माझ्या चरणांप्रति तुमचे प्रेम महत्वपूर्ण आहे. जसे मुलाने प्रेमाने आईच्या गालावर हात ठेवला. तरी त्या स्पर्शाने आईचे हृदय प्रेमाने भरुन येते (द्रवित) हे आचरण परस्परांमधील आहे. ही अत्यंत छोटी गोष्ट (सूक्ष्मक्रिया) आहे ती

याप्रकारे कार्य करते. तुम्ही हृदयापासून माझ्यावर जितके प्रेम करता, तितका जास्त आनंद तुम्हाला मिळतो. तर्क वा बुद्धिच्या उपयोगाने हा आनंद मिळू शकत नाही.

सर्वात आधी तुम्हाला शुद्ध करायला हवे. परंतु तुम्ही, माताजींसाठी असणारे प्रेम आधी व्यक्त करायलाच हवे, प्रेम अभिव्यक्ती हीच चरमसीमा, शेवटचे टोक आहे. ती प्राप्त केल्याक्षणी तुम्ही सर्वशक्तिमान बनता आणि इतर लोकांनाही ही शक्ती देऊ शकता. परंतु हे देणेसुद्धा एकमेकांशी संबंधित आहे. कारण देवी तुमच्यासंबंधी सर्व जाणते. जर तुम्ही चुकीच्या गोष्टी कराल तर देवी तुम्हाला स्पष्टपणे, संकोच न करता सांगेल की असे व्हायला नको. तेव्हा कार्य करण्यासाठी तुम्हाला हे माहीत हवे की, हे परस्परावलंबी आहे. हे एकांगी असू शकत नाही. निष्कपटता एकांगी नसते. ती दोन्हीकडून असायला हवी तेव्हाच ती योग्य प्रकारे कार्य करु शकेल आणि तेव्हा तुम्ही एक प्रकारच्या समभाव स्नेहाची निर्मिती करता, त्या रुपात प्रेम आणता, प्रेम पसरविता आणि शेवटी सुंदर हालचालींचा अनुभव येतो.

पूजा वास्तविक प्रोत्साहन देणारी कृती आहे. ती तुम्हाला नव्या साम्राज्यात घेऊन जाते. खरेतर हा चमत्कार आहे. एकदा तुम्ही पूजा केली की, तुमच्या मौनातुनही खूप काही व्यक्त करु शकता. तुमचे मौनसुद्धा अत्यंत शक्तिशाली बनते.

पशिचमी देशांतील लोकांना विशेष करुन आपली अबोधितता प्रस्थापित करायची आहे. हे अत्यंत महत्वपूर्ण आहे. सर्वात आधी त्याच्यावरच आक्रमण होते. अनेक दुष्ट शक्ती याच्यावर आक्रमण करतात. म्हणून आपल्याला आपली अबोधितता दृढ करायची आहे. हा अत्यंत शक्तिशाली गुण आहे. तो काही वाईट बघत नाही. अबोधितता काही बघत नाही. फक्त प्रेम करते. बालपणात लहान मुलाला हे माहीत नसते की, त्याचे माता-पिता किंवा इतर कोणी त्याची घृणा करतात (त्याच्यावर प्रेम करीत नाही). ते छोटे मूल अत्यंत निष्कपटपणे राहते - वागते. परंतु अचानक त्यांना जेव्हा समजते की, लोक परस्परांवर प्रेम करीत नाहीत तेव्हा त्यांना धक्का बसतो.

म्हणून पश्चिमी देशांसाठी श्री गणेश अत्यंत महत्वपूर्ण देवता आहेत. कारण तेच प्रत्येक गोष्टीचे सार आहेत. यामुळेच आपण सर्वप्रथम श्री गणेशाची पूजा करतो. परमेश्वराने सर्वप्रथम श्री गणेशाची निर्मिती केली. कारण तेच त्यांचे जेष्ट पूत्र आहेत. त्यांचा पहिला मुलगा. आपल्या भावंडांमध्ये ते सर्वात मोठे बंधू आहेत तरी कार्तिकेयाला नेहमी मोठ्या भावाचा मान दिला जातो आणि गणेशजी स्वत:ला छोटा भाऊ मानतात. खरेतर त्यांचे सृजन प्रथम झाले होते. श्री गणेश नेहमी बालकासमान आहेत. म्हणून ते लहान आहेत. ही अत्यंत सूक्ष्म गोष्ट आहे जी समजून घ्यायला हवी की, छोटे असूनही ते किती विवेकी आहेत. ते प्रत्यक्ष विवेक आहे. तुम्ही इतक्या बुद्धिमान छोट्या मुलाची कल्पना करु शकता ? वयाप्रमाणे आपण नेहमी श्री गणेशाहून मोटे आहात परंतु विवेकात तेच सर्वात मोटे आहेत.

यापमाणे तुम्हाला समजायला हवे की छोट्या, छोट्या कृतीतून, मंत्रोच्चाराने, कशाप्रकारे आपण आपल्या आतील देवांना -देवतांना आवाहन करतो कारण ते जागृत आहेत आणि तुम्हीही जागृत आहात. तुमचा प्रत्येक शब्द जागृत आहे, त्यानेच तुमचे सर्व मंत्रसुद्धा सिद्ध आहेत.

या गुरुपूजेमध्ये मी तुम्हाला सिद्ध करणे आणि सिद्धि स्थापित करण्याचा विधी सांगणार आहे. प्रत्येक चक्र आणि त्याच्या शासकदेवतेच्या सिद्धि प्राप्त करण्याचा विधी. या गुरुपूजेत नक्कीच होईल. पण ही पूजा पूर्णपणे समजून उमजून, पूर्ण मान्यतेने हे स्वत:चे परमभाग्य समजून व्हायला हवी.

सर्व देवता आणि ऋषिगण त्याची इर्षा करतात. तुमच्यासाठी महान लाभदायक व नशिबाची गोष्ट आहे. तेव्हा त्याचा संपूर्ण लाभ उठवा. खूप छोट्या, छोट्या गोष्टी मला प्रसन्न करु शकतात. तुम्हाला ठाऊक आहे की, तुमची आई अतिशय साध्या साध्या गोष्टीनेही प्रसन्न होते. किती हृदयापासून तुम्ही पूजा केली, बस ते महत्वाचे आहे.

कारण तुम्ही निर्विचार समाधीमध्ये जाल. अर्थात याविषयी अधिक समजायचे, विचार करायच्या स्थानावर हे समजायला, जाणवायला, अनुभव यायला हवा. यालाच ऊर्ध्वगती म्हणतात.

प.पू. श्री माताजी - १९.०७.१९८०

विग्रह, म्हणजे पृथ्वीमातेच्या चैतन्यलहरींचे स्वयंभू मूर्तरुपाची पूजा करण्यात लोकांसमोर खूप समस्या होत्या. सर्वप्रथम त्यांना सविकल्प समाधीमध्ये ध्यानमग्न व्हावे लागत होते. या अवस्थेत त्यांना विग्रहावर ध्यान लावावे लागत असे.

विग्रहाचा अर्थ चैतन्यलहरीने परिपूर्ण मूर्तिशी आहे. त्या मूर्तिकडे बघून आपल्या कुंडलिनीला ऊर्ध्वमुखी (वरच्या दिशेस नेण्याचा प्रयत्न) करण्याचा प्रयत्न जिज्ञासू करीत असत आणि कुंडलिनीसुद्धा आज्ञाचक्रापर्यंत येत असे. सहस्त्रारभेदन करुन कुंडलिनीचे बाहेर येणे अतिशय दुर्धर (अवघड) कार्य होते. कारण त्या अवस्थेत जिज्ञासूला साकारातूननिराकारात जावे लागते. अमूर्ताचे ध्यान करणे असंभव कार्य होते. मुसलमान आणि काही अन्य लोकांनी असे करण्याचा प्रयत्न केला. या परिस्थितीत निराकाराला साकार रुपात मानून घेणे हे त्यातील क्लिष्टता दूर करण्यासाठी आवश्यक होते. जसे तुम्ही साकाराचे ध्यान करता तुम्ही स्वत: निराकार होऊन जाता. उदाहरणार्थ, जर तुमच्या समोर असणाऱ्या बर्फाला स्पर्श केला तर ते वितळू लागते आणि तुम्हाला गारव्याचा अनुभव येणे सुरु होते.

समस्येचे समाधान आता 'सहज' च झाले आहे. पूजा एक असा विधी आहे ज्यात तुम्ही साकाराला निराकारात परिवर्तित करुन त्याचा अनुभव घेता. तुमची सर्व चक्र उर्जेचे केंद्र आहे आणि सर्व चक्रांवर त्यांचे निर्देशित देव-देवता विद्यमान आहेत. निराकार असूनही त्यांना साकार रुप दिले जाते. जेव्हा तुम्ही पूजा करता, तेव्हा त्यांचे साकार रुप परावर्तित होऊन चैतन्यलहरींच्या रुपात वाहू लागते. अशाप्रकारे सर्व चुकीच्या धारणा, मान्यता, त्यांनी आत्म्याला झाकले होते त्या दूर होतात. पूजेविषयी तुम्ही विचार करु शकत नाही कारण पूजेचे क्षेत्र विचारक्षेत्राच्या पलिकडचे आहे.

हे लक्षात ठेवा की, पूजेच्या संदर्भात तुम्ही तर्कशुद्ध दृष्टिकोण ठेवू शकत नाही. तुम्हाला तुमच्या चक्रांचा सर्वाधिक लाभ उठवायचा आहे. त्यासाठी तुम्हाला पूजा आणि चैतन्यलहरीच्या प्रवाहावर ध्यान केंद्रित करावयाचे आहे. लहरींचा हा प्रवाह अज्ञान अंधःकार रुपी ढगांना फाडून टाकील(नष्ट करील). त्यामुळे तुम्हाला एकच काम आहे, एकच साधन आहे की, पूजेवर ध्यान केंद्रित करा आणि साक्षी बना. 'तुम्ही द्रष्टा आहात' द्रष्टा शब्दाचे दोन अर्थ आहेत. पहिला हा की, तो केवळ तटस्थ राहून बघतो. तो फक्त ज्ञान आहे. कोणताही विचार अथवा प्रतिक्रियेशिवाय फक्त बघायचे आहे आणि सहजपणे ग्रहण करतो. तुम्ही आणि देवता यांच्यात अपेक्षित समानतेची कमतरता कित्येकदा माझ्यासाठी बोजा होतो (दडपण बनते).

एकीकडे तुमच्या मंत्रोच्चारणाने देवता जागृत होतात आणि दुसरीकडे तुम्ही तुमच्या अंतरात त्यांच्याकडून काहीही ग्रहण करु इच्छित नाहीत. यामुळे तुमच्या शरीरातील त्या अतिरिक्त शक्तिचा संचय मला करावा लागतो.

त्यामुळे आपले हृदय खुले ठेवा आणि बुद्धिचा वापर न करता, पूजा करणे तुमच्यासाठी हितकारक असेल. आज आपण पूजेच्या विधीमध्ये काही बदल करणार आहोत. आम्ही प्रथम हवन करणार आहोत नंतर पूजा. हे उपयोगी असेल कारण यामुळे आपण अग्नितत्वला जागृत करणार आहोत. ते सर्व दोषांना जाळून टाकील. माझे चरण धुण्याचाही हाच प्रभाव होतो. जो हवनाचा अग्नी प्रज्वलित केल्याने होतो. आज प्रथम आपण हवन करु आणि नंतर पूजा. दोन्ही समान आहे. तुम्ही माझी पूजा जल, अथवा अग्निने करु शकता.

अग्निचे सारतत्व कांतीमध्ये आहे. जे काही वाईट आहे ते जळण्याने (नष्ट करण्याने) ही कांती तुम्हा सर्वांचे शरीर आणि चेहऱ्याला चमकदार बनवते आणि जेव्हा तुम्ही हवन करता तेव्हा सारे वातावरण चैतन्यलहरींनी चैतन्यमय होते. परिपूर्ण होते.

परमात्मा तुम्हाला आशीर्वाद देवो.

प.पू. श्री माताजी - १८.०६.१९८३

आज मी तुम्हाला पूजेचे महत्व सांगणार आहे.

प्राचीन ख्रिस्ती सुद्धा "मेरी" ची प्रतिमा, फोटो किंवा बऱ्याच ठिकाणी येशूच्या मातेची रंगीत काचांवरील बनविलेल्या आकृतीची पूजा आराधना करीत असत.

परंतु नंतर लोक अधिक तार्किक झाले, पूजेच्या महत्वाचे ज्ञान नसल्याने या महत्वाचे वर्णन करु शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी नियमित रुपाने केल्या जाणाऱ्या पूजेचे महत्व गाणे बंद केले.

इ.स.पूर्व लोक एक विशेष प्रकारचा मंडप बनवित. ज्यामध्ये जिहोवाच्या पूजेसाठीही स्थान बनविले जात असे. आता सहजयोगात जिहोवा सदाशिव आहे आणि मेरीमाता महालक्ष्मी आहे.

तिने आधिही अवतार घेतला होता. 'देवी महात्म्य' नामक पुस्तकात येशूच्या जन्माविषयी स्पष्ट रुपात लिहिले आहे. येशू राधेचे पूत्र होते. राधा महालक्ष्मी आहे. म्हणून अंडेच्या रुपात एका अन्य अवस्थेत त्यांचा जन्म झाला आणि अर्ध्या अंडयातून श्री गणेशाच्या रुपात पुन: अवतार घेतला. उरलेला अर्धाभाग महाविष्णु जे आमचे भगवान येशू आहेत त्यांच्या रुपात अवतरला.

महाविष्णुचे वर्णन पूर्णपणे येशू ख्रिस्ताचे चित्रण आहे. महालक्ष्मी अवतरित झाली आणि निर्मल परिकल्पनेने (इच्छा) आपल्या शिशूला जन्म दिला. असे त्यांनी राधाजन्मात केले. म्हणून आता येशू महान ईश्वराचे (विराटाचे) पुत्र आहेत. वास्तविक श्री विष्णुच महाविष्णु किंवा विराट बनतात. आता हे विष्णुतत्त्व विराटाचे रुप धारण करते आणि राम, कृष्ण म्हणजे विराट म्हणजे अकबरच बनतात. येशू स्वतः ओंकार आहे तसेच चैतन्यलहरी सुद्धा स्वयं आहेत. उरलेल्या सर्व अवतारांना शरीर धारण करण्यासाठी धरामातेचे तत्व (पृथ्वीतत्त्व) घ्यावे लागेल. येशूचे शरीर पूर्णपणे ओंकार आहे आणि श्री गणेश त्यांचे पृथ्वी तत्त्व आहे.

म्हणून आपण म्हणू शकतो की, येशू श्री गणेशाची अवतरित शक्ती आहे. यामुळेच ते पाण्यावरुन चालू शकत होते. ते देवत्वाचे निर्मलतम रुप आहे. कारण ते

केवळ चैतन्यलहरीमात्र आहेत. म्हणून माझ्या साक्षात (प्रत्यक्ष) रुपाची तुम्ही जेव्हा पूजा करता त्यात अवास्तविक काही नाही. येशू आणि मदरमेरी यांच्या जीवन कालाताच लोकांनी त्यांची पूजा करायला हवी होती. ख्रिश्चनांच्या दहा धर्माचरणांच्या नियमात (टएन छेम्मन्द एन्त्स) असे सांगितले आहे की, ज्याचे सृजन पृथ्वी अथवा आकाशाने केले आहे त्यांचे पुन्हा सृजन, पुनरुपत्ती आणि पूजा करु नये. अवतारांचे सृजन परमेश्वरच करतो. केवळ आधुनिक काळातच अवतारांचे चित्र काढणे, फोटो घेणे संभव आहे. आधी त्याची शक्यता नव्हती. पृथ्वी मातेद्धारा सृजीत म्हणजे 'स्वयंभू' रचना (मूर्ती, आकार). आता 'स्वयंभू रचना' खूप ठिकाणी मिळू शकतील, सापडतील. काही साक्षात्कारी आत्म्यांनीही सुंदर प्रतिमांची निर्मिती केली आहे.

मी जेव्हा पोर्तुगालला गेले तेव्हा तिथे लेडी ऑफ रॉक्स, खडकाच्या (रॉक्स) देवीचा उत्सव होता. जेव्हा मी तेथे गेले तिथे मदरमेरीची पाच इंचाची अतिशय छोटी प्रतिमा होती. तिचा चेहरा अगदी माझ्या चेहऱ्याप्रमाणे होता. तेथील लोकांनी मला सांगितले की, दोन छोट्या मुलांना सशामागे धावत असतांना ही मूर्ती (प्रतिमा) सापडली. त्यांना खडकातील कपारीत प्रकाशाचा भास झाला. ते त्या प्रकाश स्रोताचा शोध पुढे गेले आणि शेवटी त्यांना प्रकाशाचा स्त्रोत म्हणजे ही मूर्ती सापडली. त्यांनी ती मूर्ती बाहेर काढली आणि त्या मूर्तीच्या प्रकाशात गुहेत चालत राहिले. बाहेर जमलेले सर्व लोक हे बघून आश्चर्यचकित झाले.

लोक आता त्या मूर्तीची पूजा त्याच ठिकाणी करतात. ही प्रतिमा त्यांना चैतन्यलहरी प्रदान करते जशा तुम्हाला प्राप्त होतात. परंतु जितक्या (जास्त) प्रमाणात मी चैतन्यलहरी देते तितक्या ही मूर्ती देत नाही. शक्यता आहे तिथे काही इतर मूर्तीही तुम्हाला चैतन्यलहरी देऊ शकतील. भारतातही तुमच्यापैकी काही जण गणपती पुळ्याला गेले असतील. तेथे महागणेश म्हणजेच येशू स्वयंभू रुपात पृथ्वीमातेच्या गर्भातून प्रकट झाले आहेत. महागणेशाच्या शरीराच्या खालचाभाग आणि शिरोभाग

संपूर्ण पहाड आहे. तेथे समुद्राचे पाणीही गोड आहे. तसेच गोडपाण्याच्या काही विहिरीसुद्धा तेथे आहेत.

जर तुम्हाला स्मरत असेल तर तेथे कित्येक जणांनी माझे फोटो घेतले. त्यातील काही फोटोमधून प्रकाश फाकतांना दिसतो आहे. काही जणांनी मला सांगितले की,फोटोत प्रकाश नव्हता परंतु आता त्यांनी निगेटिव्ह पासून पुन्हा फोटो डेव्हलप केले, तर त्या फोटोंमधून प्रकाश दिसू लागला.

तुम्ही हे आवश्य समजून घ्यायला हवे की, दैवी शक्तिच्या साम्राज्यात वेगवेगळ्या प्रकारचे चमत्कार होत असतात. बरोबर अशीच गोष्ट पूजेत आहे. जेव्हा आपण पूजा करतो तेव्हा प्रथम श्री गणेशाची आराधना करतो. अशाप्रकारे तुम्ही तुमच्या आत श्री गणेशाला जागृत आणि स्थापन करता. त्यांच्या रुपात माझी पूजा करुन तुमच्या आत अबोधितता प्रस्थापित होते. तुम्ही बघाल की, आता चैतन्यलहरी वाढल्या आहेत. तुम्ही तुमच्या आत शांती अनुभवता.

जेव्हा तुम्ही श्री गणेशाच्या नामांचा उच्चार करता तेव्हा तुम्हाला त्यांच्या गुणांचा परिचय होतो. जेव्हा तुम्ही त्यांच्या गुणांची आराधना करता, तेव्हा ते तुमच्याद्वारे आपले गुण व शक्ती विकसित करतात. याप्रकारे ही दैवीशक्ती कार्य करते. जणू आपल्या गुणांना पल्लवित (प्लावित) करते. तेव्हा तुम्ही आदिशक्तिची आराधना करता.

पूजा केल्यामुळे आदिशक्तीची सर्व (सात) चक्रे जागृत होऊन उठतात आणि त्या चक्रांद्वारा आपले कार्य सुरु करुन देतात. सृष्टीमध्ये पहिल्यांदाच असे अवतरण (अवतार) झाले आहे. तुम्ही प्रथम एक खोली बांधता, नंतर दुसरी त्यानंतर तिसरी अगदी तसेच हे आहे. अशाप्रकारे सात खोल्या बांधून झाल्यावर घराचे काम पूर्ण होते. तुम्हाला घराच्या किल्ल्या मिळतात आणि तुम्ही तुमचे घर उघडता. अशाचप्रकारे मी सामुहिक आत्मसाक्षात्कार देत असते. असे घडणे या आधी संभव नव्हते परंतु आता सातही चक्रांच्या समन्वयाने हे शक्य झाले आहे आणि आता तुम्ही आदिशक्तिची पूजा करु शकता. माझे तुमच्याप्रमाणे मानवी रुप, माझे महामायारुप

आहे. मी तुमच्यासारखे वर्तन करते. स्वत:ला अगदी तुमच्याप्रमाणे बनविले आहे. मात्र हे कार्य खूप कठीण होते. तुम्हाला सहजयोग समजावण्याची प्रक्रिया आणि तुमच्यात अंतर्भूत असणाऱ्या शक्ती सांगण्यासाठी माझ्या शरीराला खूप काही सहन करावे लागते.

जर तुम्ही माझ्याप्रति रुक्ष (निरस) वागाल, माझा सन्मान केला नाही तर येशूंना खूप राग येतो. कारण त्यांनी सांगितलेच आहे की, मी चैतन्याविरुद्ध काहीही सहन करणार नाही. त्यामुळे माझे आज्ञाचक्र जोरात फिरायला लागते आणि रागाने बेभान होते. परंतु मला त्याला सहन करावे लागते. मी तुम्हाला सांगू शकत नाही की, येशूंना त्याक्षणी माझ्यामार्फत काय सांगायचे असते. कारण त्यांना आपले कार्य त्वरित व्हायला हवे असते. परंतु मला थोडे सावध रहावे लागते कारण तुम्ही त्रस्त होऊ नये. त्याचबरोबर पूजेच्यावेळेस जर तुम्ही माझ्या प्रति विरोध दर्शवाल अथवा संशय आला आणि चैतन्यलहरी स्वत:मध्ये सामावू शकला नाही, तर मला समस्या होते. चैतन्यलहरी तर वाहताहेत परंतु, तुम्ही त्या आत्मसात करु शकत नाही. तेव्हा मला हे समजत नाही की, वाहत्या लहरींना स्वत:मध्ये कसे सामावून घेऊ. त्यांना सिमीत करण्यासाठी मला कष्ट भोगावे लागतात. कष्ट सोसावे लागतात. या सर्व बाबी प्रतिकात्मक आहेत आणि हे प्रतिक सत्यात कार्य करतात. उदा. तुम्ही प्रेमाने कोणाला एक पुष्प भेट देता तेव्हा त्याला अत्याधिक आनंद आणि कृतज्ञतेची अनुभूती होते आणि तुम्ही जेव्हा मला पुष्प, जल, किंवा भेट अर्पण करता तेव्हा तत्वावरील आणि चक्रावरील स्थित देवता प्रसन्न होतात आणि ते आपल्या गुणांची आणि तुमच्या प्रति आशीर्वाद स्वरुप चैतन्यलहरींचा वर्षाव करतात. अशाप्रकारे दैवीशक्ती कार्य करते. पूजेनंतर तुम्ही या शक्तिद्वारा केलेल्या कार्याची अनुभूती हळूहळू करु लागता.

आता जेव्हा या वेळेस इथे पूजा करीत आहोत आणि जगभरात सहजयोगींना यापूजेची माहिती आहे. ते ध्यानमग्न बसले आहेत आणि याप्रकारे आशीर्वाद प्राप्त करीत असतील. यासाठी आपण त्यांना पूजा प्रारंभ होण्याची वेळ

देतो. त्यासाठी आम्हाला वेळेवर पूजेसाठी बसायला हवे. त्यामुळे ध्यान मग्न होऊन अन्यत्र बसलेल्या सहजयोगीही तुमच्याप्रमाणेच लाभ प्राप्त करु शकतील.

जर आतापर्यंत सुद्धा पूजेचे महत्व या थोड्याशा गोष्टींचे ज्ञान प्राप्त करण्यायोग्य तुम्ही नसाल तरी काळजीचे कारण नाही. तुमची अनभिज्ञता (काहीही माहिती नसणे) आणि निर्दोष भाव परमेश्वर जाणतात आणि तुम्हाला क्षमा करतात. विनम्र हृदयाने पूजा करतांना तुमच्याकडून काही चूक झाली तरी तुम्ही दोष - भाव - ग्रस्त (हीन गंडग्रस्त) होऊ नका. हळूहळू तुम्हाला सर्व समजेल. परंतु तुम्ही समजून उमजून चूक केली तर हे योग्य नव्हे. जशी आपण आपल्या मुलांना क्षमा करतो तशीच क्षमा परमेश्वर आपल्या आबोध मुलांना करील. त्यामुळे तुम्ही या बाबत निश्चिंत रहा आणि हृदयात आनंदाच्या अनुभवासाठी पूजा सहजरुपाने करा.

परमेश्वर तुमच्यावर कृपा करो.

प.पू. श्री माताजी - २४.०५.१९८६

तुम्ही सर्वजण विश्वास करता की, मी आदिशक्ती आहे, त्याचे प्रमाण (पुरावा) सुद्धा तुमच्याजवळ आहे. पूजेच्या माध्यमातूनसुद्धा याचा पुरावा प्राप्त होऊ शकतो. यापेक्षाही जास्त पूजेमुळे माझ्या चक्रावर स्थित देवता उल्हसित होतात आणि अधिक लहरी सोडू इच्छितात. जेव्हा ते भरपूर चैतन्यलहरी सोडू लागतात तेव्हा तुम्ही आश्चर्यचकित होता की, कशाप्रकारे पूजेनंतर तुम्ही या लहरींमध्ये न्हाऊन निघाल आणि अत्यंत उच्च स्तरावर उन्नत होऊन जाल. पूजेच्या वेळेस तुम्ही खूप उच्चस्तराचा अनुभव घेता हे नक्कीच सत्य आहे. कारण तुम्हाला वाटते की, त्या उंचावर तुम्ही टिकून राहू शकाल. काही लोक खरेच या उंचीवर कायम राहतात. परंतु बऱ्याचदा लोक यो यो (बॉल) प्रमाणे खाली वर होत राहतात. म्हणून त्या उच्चतम अवस्थेमध्ये टिकून राहण्यासाठी माणसाने निर्विचार समाधीमध्ये ध्यान लावायला हवे. परंतु केवळ देवीच्या पूजेचीच आज्ञा आहे. परमेश्वराच्या पूजेचीही आज्ञा आहे परंतु आम्हाला हे माहिती हवे की, देवी कोण आणि परमेश्वर कोण? त्यामुळे कोणा ऐऱ्या गैऱ्याच्या (तुच्छ) अंदाधुंद पूजेचा स्वीकार करायला नको. हे ऐकून तुम्ही हैराण

व्हाल की, सहजयोगात पहिल्या चार वर्षांध्ये मी पूजेची परवानगी दिली नव्हती. इथपर्यंत की लोक म्हणाले की "आपण आमच्या गुरु आहात, आपण आम्हाला गुरुपूजेची आज्ञा द्या." मी म्हणाले "नाही, मी असे करणार नाही." नंतर चार वर्षांनी लोकांना नवरात्रीच्या दिवसात पूजा करावी असे वाटले. त्यांनी परवानगी मागितली मी म्हणाले, "ठीक आहे तुम्ही तसे करु शकता".

थोडेसे लोक होते त्यांना अनुभव आला की, पूजा त्यांना अत्याधिक लहरी आणि उन्नत आध्यात्मिकता प्रदान करते. अचानक त्यांनी कित्येक नवीन क्षितिजांपर्यंत (आयाम) ते पोहोचवले आणि मला प्रार्थना करु लागले की, "श्री माताजी कृपया आता आम्हाला पूजेची संधी द्या." लोकांना पूजा विधीची माहिती नव्हती. काम अवघड असले तरी पूजा विधींबद्दल मला सर्व काही सांगावे लागले. असे मी नेहमीच सर्व करीत राहिले.

तुम्हाला आश्चर्य वाटेल की, पहिल्यांदा मी जेव्हा दिल्लीला गेले (जर कोणी माझा फोटो शोधू शकला तर तुम्हाला समजेल) तर मी आक्रसून गेले. माझे पूर्ण शरीर संकोचाने आक्रसले, आकुंचित झाले. धक्क्याने मी क्षीण झाले. कारण ते लोक प्लास्टिकच्या जुन्या वस्तूंचा उपयोग पूजेमध्ये करीत होते. मी म्हटले "हे परमेश्वरा आता काय करावे? याच्या आधी मी पूजेसाठी पैसे देण्यास परवानगी देत नव्हते. तेव्हा मी म्हटले की, "ठीक आहे प्रत्येक पूजेसाठी एक पै देणे सुरु करा." आणि लोकांनी थोडे, थोडे पैसे द्यायला सुरुवात केली, जे त्यांनी हळूहळू वाढवित नेले. हे मी यासाठी केले की पूजेसाठी चांदीची उपकरणे, (पूजा साहित्य) लागते, त्याचा उपयोग करावा हे त्यांना माहीत नव्हते. प्रत्येक वस्तूवर माझे नाव लिहिले जाऊ लागले. कारण तुमच्याजवळ असूनही तुमच्या लक्षात राहील की ती माझी संपत्ती आहे.

याप्रकारे आमच्या लक्षात यायला लागले की, पूजेमध्ये विशिष्ट प्रकारच्या धातूची आणि विशिष्ट प्रकारच्या विधीचा वापर होतो. या धातूंचा आमच्यावर विशेष प्रभाव पडतो आणि कोणत्या धातूने तुम्ही पूजा करता त्याचाही एक विशिष्ट प्रभाव

पडतो. हे सर्व अध्यात्म विज्ञान आहे आणि पूजेचे उत्तम परिणाम प्राप्त करण्यासाठी विज्ञानाप्रमाणेच याचे ज्ञान असणे आमच्यासाठी अतिशय महत्वाचे आहे.

अशाप्रकारे पूजेचा प्रारंभ झाला. मला वाटते आता लोकांमध्ये पूजेविषयी चांगली समज आली आहे. महाराष्ट्रातील लोक पूजाविधीमध्ये अतिशय कुशल (निपूण) आहेत आणि या विषयात त्यांच्याशी तर्क करणे अति कठीण आहे. त्यांनी म्हटले, "माताजी आम्ही आपल्याला एक साडी भेट देणे योग्य आहे." मी म्हणाले तुम्ही मला साधी साडी द्या. मी महाग साडी घेणार नाही." अशाप्रकारे छोट्या छोट्या गोष्टींसाठी ते तर्क करीत राहिले. नंतर म्हणाले "आम्ही तुम्हाला नकली साडी भेट देऊ शकत नाही" मी म्हणाले, "ठीक आहे मला साडी द्या किंवा तुम्हाला हवे ते करा" आणि आता तुम्ही लोक इतक्या महाग साड्या द्यायला लागलात. मी कितीतरी वेळा प्रार्थनापूर्वक तुम्हाला समजावयाचा प्रयत्न केला की, मी आता वृद्ध झाले आहे आणि एका वृद्ध देवीला तुम्ही कोणतीही साधीशी वस्तू भेट म्हणून देऊ शकता. परंतु माझे हे म्हणणे ऐकायला कोणीही तयार नाही. बघूया आपण हा मामला कसा संपवू शकतो. अर्थात याने काही फरक पडत नाही. परंतु जे कार्य तुम्हाला करायचे आहे त्याच्याकडे किती लक्ष देता? याने फरक पडतो. हे अतिशय महत्वाचे आहे. परंतु जे कार्य तुम्हाला करायचे आहे ते पूर्ण चित्त, श्रद्धा आणि महत्व देऊन करायला हवे. उच्च प्राथमिकता दिल्याशिवाय कार्य होत नाही. आवश्यक महत्व न देता कार्य सफल होणार नाही.

जर तुम्हाला पूजेपासून लाभ हवा असेल तर याला सर्वोच्च प्राथमिकता द्यायला हवी. हे समजणे अत्यंत आवश्यक आहे. पूजेपूर्वी जर तुमचे मन सैतानी किंवा शंका घेत असेल तर शांत होऊन जाण्याची आज्ञा द्या. कारण हे मन तुमच्या विरुद्ध कार्य करू शकेल.

म्हणून पूजेसाठी ग्रहणशील बनून तयार रहायचे आहे आणि त्यापासून लाभ प्राप्त करायचा आहे.

प.पू. श्री माताजी - १८.१२.१९८९

<u>पूजेचे फळ आणि आशीर्वाद याबद्दल श्री माताजी सांगतातः</u>

पूजा एक बाह्य भेट आहे. परंतु पूजेचे फळ आणि पूजेचा प्रसाद कशाप्रकारे प्राप्त करायचे आहे. याचे ज्ञान तुम्हाला हवे. पूजा वा प्रार्थनेचा उदय आपल्या हृदयातून होतो. मंत्र तुमच्या कुंडलिनीचे शब्द आहेत. परंतु जर पूजा हृदयापासून केली नाही आणि मंत्रोच्चारणा बरोबर जर कुंडलिनीचा संबंध जोडला नाही तर पूजा फक्त कर्मकांड बनून "राहते".

पूजेत निर्विचार होणे, पूजेत हृदयापासून जोडले जाणे, पूर्ण निष्कपटपणे हृदयापासून पूजासामग्री एकत्र करणे व भेट करणे. पूजेत भेट देण्याबाबत काही दिखाऊपणा किंवा बंधन असू नये. हात धुणे ठीक आहे. परंतु तुमचे हृदयही स्वच्छ आहे का? चित्त जेव्हा हृदयावर असते तेव्हा ते अन्यत्र भटकत नाही. जर तुम्ही बाहेरुन शांत असलात आणि आतून द्वंद्व चालू असेल तेव्हा फार काळ तुम्ही मौन रहायचे नाही. जर माणसाचे हृदय स्वच्छ नसेल तर मौन अतिशय हानिकारक ठरते. परंतु नको असलेला संवादही महाविपत्तीचे कारण होऊ शकतो.

पूजेत पूर्ण श्रद्धेने तुम्ही मंत्रोच्चारण करा. श्रद्धेचा कोणताही विकल्प नाही. गहन श्रद्धा निर्माण झाल्यावरच पूजा करा. कारण स्वयं तुमचे हृदय सर्व पूजा करील. टोव्हा आशीर्वादाच्या लहरी वाहू लागतात. कारण आत्मा म्हणतो "यावेळेस कोणताही विचार कसा येऊ शकतो?"

लोक आपल्या (पेल्यात) मदिरा ओततात. तुमची पूजासुद्धा त्या प्रकारची आहे. तुमची श्रद्धा ही मदिरा आहे. तिला तुम्ही पूजा आणि मंत्रोच्चारणात ओतत आहात. सर्व काही विसरुन जेव्हा हे सुरापान तुम्ही करीत असता तेव्हा कसा कोणता विचार तुम्ही करु शकाल आणि तेव्हाच्या आनंदाचे वर्णन शब्दांमध्ये कसे करता येई ल? मद्याला अशी दैवी विचाररुपी तुच्छ प्रकारच्या पेल्यात पुन्हा कोण ओतील? हे दैवी सुरापान करण्याचा आनंद सदासर्वदा विद्यमान आणि शाश्वत राहते. तेच तुमचे वैभव बनते. माझ्या उपस्थितीत अशा खूप पूजा झाल्या आहेत. प्रत्येक वेळेस एक खूप मोठी लहर येते आणि एका नव्या साम्राज्यात नेते. अशा खूप साम्राज्यांचा

अनुभव तुमच्यापाशी असेल. तुमचा असेल. हा अनुभव तुमच्या व्यक्तिमत्वाला विशालता प्रदान करतो. तुमच्यासाठी आनंदाची नवनवी दारे उघडतो.

हृदयात पूजा करणे सर्वोत्तम. माझा जो फोटो (चित्र) तुम्ही पाहत आहात ते हृदयात ठसवा (हृदय गम्य करा) किंवा पूजेनंतर त्याची झलक तुमच्या हृदयात खोल अंतरात सांभाळून ठेवा. त्यामुळे आणि त्याक्षणी प्राप्त होणारा आनंद शाश्वत आणि अनंत असू शकेल. परमात्मा तुम्हाला आशीर्वादित करो.

<u>श्री माताजींच्या पूजेच्या वेळेस पालन करण्यास योग्य नियमाचरण</u> :

श्री माताजींच्या कृपेने आणि अनुभवाने काही मार्गदर्शक नियम बनविले गेले आहेत. माताजींची पूजा करतेवेळी या नियमांचे पालन आपण सर्वांनी केले पाहिजे. त्यामुळे आम्हाला पूजेचा अधिकतम लाभ मिळेल. श्री माताजींच्या पूजेच्या कार्यक्रमाचे योग्य स्थान आणि वेळ तर स्वत: दैवीशक्ती निश्चित करते. त्यामुळे पूजेसाठी एखादे विशिष्ट स्थान आणि वेळ यावर भर देऊ नये. त्याशिवाय पूजेची इतर कार्ये पूजेच्या कार्यस्थळावर अत्यंत शांततेने करायला हवीत.

नशिबाने जर कधी आपण साक्षात श्री माताजींच्या पूजेसमयी उपस्थित असलो तर त्यांच्या आगमनापूर्वी पूजेच्या ठिकाणी एकत्र येऊन, बंधने घेऊन, ध्यानात बसायला हवे. जेव्हा श्री माताजींचे आगमन होईल तेव्हा सर्वांनी त्यांच्या सन्माना प्रित्यर्थ उठून उभे राहावे आणि त्यांनी स्थान ग्रहण केल्यावर आपण बसावे. पूजेत आम्हाला खूप वेळ बसावे लागल्यास चित्ताच्या एकाग्रतेसाठी बरे होईल जर आम्ही पूजेपूर्वी काही (भोजन इ.) खाऊन घ्यावे. पूजेत सैल आरामशीर वस्त्रे घालावीत. बसावे.

सर्वांच्या वतीने काही थोडेजणच पूजा करतात, म्हणून आम्ही प्रत्यक्ष पूजा करीत नाही या विचाराने निराश होऊ नका. सहजयोगात सर्व काही दैवी शक्तीद्वारे पूर्व नियोजीत असते. म्हणून तुम्ही प्रथम बसलेली जागा कोणत्याही विशेष कारणाशिवाय, सोडू नका आणि आपण माताजींपासून दूर बसलो आहोत या गोष्टीची चिंता करू नये. ईश्वराने ठरवून तुम्हाला प्रदान केलेले (त्या पूजेपुरते) स्थान

ईश्वराच्या शोधासाठी आणि आमच्या प्रगतीसाठी उपयुक्त आहे. आमची आंतरिक गहनता शारीरिक निकटतेपेक्षा श्री माताजींना अधिक महत्वाची वाटते. हे लक्षात ठेवा.

सहजयोग सामुहिकतेवर आधारित आहे. श्री माताजी पूजेच्यावेळेस जे चैतन्य प्रवाहित करतात त्याने पूजेसाठी निवडलेल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून त्या आमच्या चक्रांना शुद्ध करतात.

याशिवाय अशा पूजांच्या माध्यमातून साधक कितीतरी अन्य शक्ती प्राप्त करु शकतात. म्हणून अशावेळी इथल्या तिथल्या गोष्टींचा विचार न करता, आपला वेळ वाया न घालविता, आपण पूर्ण एकाग्रतेने आपले चित्त श्री माताजींच्या पूजेकडे द्यायला हवे आणि पूजेचा अधिकाधिक लाभ उठविण्यासाठी प्रयत्नशील रहायला हवे.

पूजेचा प्रत्येक क्षण महत्वाचा असतो. म्हणून प्रत्येक सहजयोगीने पूजेच्या प्राप्त अशा उत्तम संधींचा लाभ उठविण्याचा प्रयत्न करायला हवा.

अशा पूजांच्या वेळी सहज योगींनी हे लक्षात ठेवायला हवे की, ते साक्षात आदिशक्तिच्या समोर बसले आहेत. त्यामुळे श्री माताजींच्या आज्ञेशिवाय आपले डोळे बंद करु नयेत. चित्त सदैव पूर्णपणे पूजेकडे असायला हवे. छोट्या छोट्या अडचणी आठवून चित्ताची एकाग्रता भंग होऊ देऊ नये.

ज्यांनी श्री माताजींचं दिव्य स्वरूप अजून ओळखले नाही अशा नव्या लोकांना सहजयोगींनी पूजेत आणू नये. कारण त्यामुळे पूजेतील चैतन्य प्रवाहात अडसर निर्माण होऊ शकतो.

प्रत्येक व्यक्तिने हृदयापासून प्रत्येक क्षण पूजेच्या कार्यक्रमात मग्न रहायला हवे. आणि चित्ताद्धारा अधिकाधिक चैतन्यलहरींना आत्मसात करण्याचा प्रयत्न करायला हवा. यामुळे केवळ आमच्या व्यक्तिगत उत्थानाला सहाय्य होत नाही. तर श्री माताजींच्या साकाररुपाद्धारा प्रसारित चैतन्यलहरींना योग्यप्रकारे ग्रहण केल्याने श्री माताजींनाही आराम मिळतो.

पूजेनंतर, श्री माताजींच्या आज्ञेनुसार, साधक, श्री माताजींचे दर्शन घेऊ शकतात.

<u>श्री माताजींच्या आज्ञेशिवाय कोणाही व्यक्तिने श्री माताजींना स्पर्ष करु नये. असे करणे दैवी-नियमाचरणा विरुद्ध आहे.</u>

जेव्हा श्री माताजी पूजास्थानातून जातात, प्रस्थान करतात तेव्हा प्रत्येक व्यक्तिने त्यांच्या सन्मानासाठी उभे रहायला हवे.

सहजयोगीने शक्य असेल तर श्रद्धापूर्वक प्रसाद ग्रहण करुन त्याचा आनंद घ्यावा.

<u>श्री माताजींच्या फोटोसंबंधी आवश्यक नियमाचरण</u>

श्री माताजींचा फोटो आपल्या घरात किंवा दुसरीकडे कोठेही स्थापित असेल तर तो साक्षात श्री माताजीचे प्रतिक आहे. त्यामुळे तो फोटो संपूर्ण सन्मानाने आणि सर्व नियमांचे, आचरणाचे पालन करुन ठेवायला, लावायला हवा. घरातील उंच ठिकाणी प्रतिष्ठापना करावी. श्री माताजींचा फोटो येता जाता इथे, तिथे हालवू नये.

श्री माताजींचे चित्र घर सुशोभित करण्याची शोभेची वस्तू नाही. म्हणून श्री माताजींच्या फोटोची दररोज पूजा करुन फुलांचा हार अर्पण करावा. गुलाब पाण्याने फोटो स्वच्छ करुन कुंकू लावावे. सकाळी आणि संध्याकाळी श्री माताजींच्या फोटोसमोर दिवा किंवा मेणबत्ती लावून मंत्रोच्चारण करणे इच्छा पूर्ण करणारे (वांछित) कल्याणकर (अभिष्ट) आहे.

चुकूनही किंवा झोपेतही श्री माताजीच्या फोटोकडे पाय करुन किंवा पाय पसरू नये. जर चुकून असे घडले तर नम्रतापूर्वक क्षमायाचना करणे आवश्यक आहे.

सामूहिकपूजा ध्यान-धारणा, त्यानंतर आरती आणि मंत्रोच्चाराच्या माध्यमातून इथे विद्यमान राहून आमची पूजा स्वीकार करण्याची प्रार्थना आम्ही श्री माताजींना करतो. पूजा आणि आरतीनंतर काही काळ शांत राहून श्रद्धा समर्पणाचे ते वातावरण कायम ठेवणे आवश्यक आहे. कारण त्या काळात चैतन्यलहरीतून श्री

मातजीं निराकार स्वरुपात उपस्थित होतात, प्रकट होतात. यावेळेस सहजयोगी शांतीपूर्वक ध्यान मग्न राहून श्री माताजींनी आशीर्वाद स्वरुप पाठविलेल्या चैतन्यलहरींना जास्तीत जास्त आत्मसात करुन आनंद मिळवितात.

सामुहिक पूजा व ध्यानाच्या वेळेस व्यक्तिगत विषयावर किंवा जे विषय सहजयोगाशी संबंधित नाहीत अशावर बोलू नये कारण असे केल्याने आमचे चित्त लक्ष्यापासून भटकते.

पूजेनंतर बंधन घ्या, हे चैतन्यलहरींचे कवच आहे. ते आमचे रक्षण करते. म्हणून निर्विचारितेत राहून श्री माताजी प्रति पूर्ण सन्मान आणि श्रद्धापूर्वक बंधन घ्यायला हवे. संतुलित व निर्विचार रहाण्यासाठी आपल्याला कुंडलिनी वर उठवायला हवी. या क्रियेच्या अभ्यासाने अंतर्ध्यान मात्र (केवळ चित्ताला आत घेऊन जाऊन) होण्याने आमची कुंडलिनी उत्थापित होईल (वर उठेल).

<u>पूजेसाठी काय आवश्यक आहे?</u>

आतापर्यंत तुम्हाला हे ज्ञान झाले आहे की, श्रद्धा आणि निर्विचार समाधीशिवाय काहीही आवश्यक नाही. पूजा उत्सव एक अशी मधूर अभिव्यक्ती आहे जे मनुष्याला अर्पण तसेच ग्रहण करण्याचे नाटक करण्याची आज्ञा देतात. एक म्हण आहे.

<u>"परमेश्वर शंभर पट परत करतो"</u>

(म्हण) प्रकट करते की ईश्वर आतूर आहे की आपण लोक हे अर्पण करण्याचे नाटक (तुम्ही) करा, कारण परमात्मा आम्हाला आपली कृपा आणि प्रेम यांच्यात न्हाऊ घालण्यासाठी अति उत्सुक आहे.

आपण हा लेख तीनप्रकारे उपयोगात आणू शकता:

१. साक्षात श्री माताजींच्या समोर, एकाविशेष पूजेसाठी स्वतःला तयार करण्यासाठी.
२. त्या सहजयोग केंद्रांना पथ - प्रदर्शक म्हणून. ज्यांना विशेष प्रसंगांसाठी सामूहिक पूजा करावयाची आहे.

३. घरी एक सामान्य पूजेसाठी मार्गदर्शकाच्या रुपात.

पहिला मार्ग पूर्ण उत्सव आहे. जो मानवाला श्री माताजींच्या समोर विशेष पूजेसाठी स्वतःला तयार करण्यासाठी आज्ञा देतो. जी भेट अर्पण केली जाते महत्वहीन नसते. पूजा आणि मंत्र बनविणाऱ्या ऋषींना हे माहीत होते की, पूजेच्या विधीमध्ये खूप लवचिकता आहे. तसेच परिस्थिती प्रति जुळवून (ॲडाप्टीबिलिटी) घेता येते.

पूजा करणे म्हणजे हे की, ज्या देवतांची पूजा श्री माताजींच्या समक्ष केली जाते, लोक त्या देवतांना प्रसन्न करु शकतील. कोणतेही कर्मकांड, लहरींचे ज्ञान तसेच कृपेच्या अनुभूतिचे स्थान घेऊ शकत नाही. याच्या विरुद्ध कर्मकांड लहरींच्या विरुद्ध कार्य करते. जरी आम्ही आमची आई "श्री माताजी" वर प्रेम करतो. तरीही सन्मानाच्या भावनेशिवाय परमेश्वराची पूजा होऊ शकत नाही. म्हणून सन्मान आणि नियमाचरणाची आवश्यकता आहे. परमात्म्या प्रति जितकी अधिक श्रद्धा आणि प्रेम आमच्यात असेल तितका अधिक सन्मान आमच्यातून प्रकट होतो. सुरुवात करण्यासाठी पहिली गरज या समारंभाचा शोध आणि त्याविषयी वाचन.

दुसऱ्या स्थानावर हा लेख विशेष प्रसंगात सामूहिक पूजा करण्याची इच्छा असणाऱ्या केंद्रांना पथदर्शन करतो या कार्यविधीचे नियमपूर्वक अनुकरण महत्वाचे आहे. यातील काही भाग कमी करता येतो. भजन गाणे, मौन राहणे किंवा श्री माताजींच्या नावांचे उच्चारण आमच्या इच्छेनुसार आहे कारण ही सर्व कार्येसुद्धा अर्प ण स्वरुप आहेत.

तिसऱ्या स्थानात घरच्या सर्वसाधारण पूजा येतात. श्री माताजींच्या चरण कमलांना सामान्यरुपात धुणे, अत्तर व फुले वाहणे किंवा दोन मंत्र म्हणणे, दिवा आणि अगरबत्ती लावणे पुरेसे आहे.

प.पू. श्री माताजी, चैतन्यलहरी - १९९१ खंड १

❋ ❋ ❋

माँ ही कर्ता, माँ ही भोक्ता,
श्रद्धा का है सार यही!
जाही विधी राखे ताही विधी रहिये,
पूर्ण समर्पण भाव यही!
ढाई अक्षर प्रेम पढे जो,
ज्ञानी पंडित होवे सोय!
इधर, उधर क्यों खोजे बंदे,
माँ तो तेरे अंदर होय!

## श्री मातृवंदना

तू खरी जगत जननी
विश्व कल्याणा अवतरली
सहजयोगाची जन्मदात्री
ध्यास कुंडलिनी जागृतीचा
आत्मसाक्षात्कार देण्याची
परमेश्वर साम्राज्यत प्रवेशाचा
माताच ती, चिंता मुलांची
उद्धारासाठी कष्टली किती
उसंत ना घेतली क्षणाची
विश्व व्यापले मातृप्रेमाने
प्रेम, प्रेमच दिलेच सर्वांस
स्वप्न तिचे महान किती
विश्वात नांदो सुख समृद्धि
मातृत्त्वाला करुनी वंदन
आम्हीही कसू कंबर
स्वप्न तुझे साकारण्यास
आशीर्वादित आम्हास कर.

प्रा. उषाताई पाटील. नाशिक

डॉ. नलिनी पिचड. नाशिक

अरे माझ्या मुलांनो, वास्तविक पाहता तुम्ही माझ्या सहस्त्रारापासून जन्मलेले आहात. माझ्या हृदयात मी तुमचा गर्भ धारण केला आणि ब्रम्हरंध्रापासून तुम्हाला पुर्नजन्म दिला. माझ्या प्रेमाची गंगा तुम्हाला सामुहिक चेतनेच्या साम्राज्यात घेऊन आली आहे. हे प्रेम माझ्या मानवी शरीरापेक्षा कितीतरी महान आहे. हे तुमचे पोषण करीत आहे, तुम्हाला शांत करत आहे आणि सुरक्षितता प्रदान करत आहे. क्षणाक्षणाला हे तुमच्या चेतनेला दिव्य आनंदाच्या योग्य बनवित आहे. हे प्रेम तुमच्यामध्ये सुधारणादेखिल करते आणि तुमच्यामध्ये बदल घडवते. हे तुम्हाला मार्ग दर्शन करते, दिशा दर्शन देत आहे. ख़ऱ्या ज्ञानाच्या स्वरुपात ते प्रकट होत आहे. हे तुमच्या धक्के किंवा आघाताला झेलते आणि मार्गदर्शक पत्यांप्रमाणे तुम्हाला सत्याच्या कठोर धारेवर स्थापित करते. अध्यात्मिक उंचीवर पोहोचण्याच्या तुमच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्याकरीता हे प्रेम शक्ती प्रदान करीत आहे.

**प. पू. माताजी श्री निर्मला देवी**